KÂVYASANGRAHA. 57.

THE MAHÂBHÂRATA

OF

NARAHARI MORES'VARA.

7. DROṆPARVA.

COMPILED WITH CRITICAL AND EXPLANATORY NOTES, DIFFERENT READINGS FROM OLD MANUSCRIPTS, PREFACE AND APPENDIX &C.

BY

DÂMODARA KESHAWA OKA,

AND

EDITED BY

BÂLKRISHṆA ANANT BHIDE, B. A.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS,

Bombay.

1906.

Price 1¾ Rupees.

काव्यसंग्रह. ५७.

नरहरिमोरेश्वरकृत

महाभारत.

७. द्रोणपर्व.

हें

दामोदर केशव ओक

यांनीं

दोन हस्तलिखित प्रतींच्या आधारें शुद्ध करून, अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन, आणि प्रस्तावना, परिशिष्ट वगैरे जोडून, तयार केलें.

तें

बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.

यांनीं संशोधिलें.

मुंबईंत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक
तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९०६.

किंमत १॥ रुपये.

मातृदेवो भव ।
पितृदेवो भव ।

तैत्तिरीयोपनिषद्–शिक्षाध्याय.

अर्पणपत्रिका.

दाजीनंदन **केशवा**ह्वय पिता अन्योपकारीं रत
मोक्षा जाय, मला त्यजून क्रमण्या दुःखार्णवींचा पथ, ।
दक्षत्वें मग लालनावन करी प्रेमें **रमा** माउली,
रम्य श्रीयुत त्या गुरुद्वयपदीं मीं ही कृती अर्पिली. ॥

दामोदर.

प्रस्तावना.

१. मुक्तेश्वराचीं उपलब्ध असलेलीं पहिलीं चार पर्वें प्रसिद्ध झाल्यावर, इतर कवींचीं पर्वें मिळवून, त्यांपैकीं चांगलीं असतील तीं निवडून घेऊन प्रसिद्ध करावीं; व अशा प्रकारें तरी निवळ मराठी वाचकांस महाभारतांतील विशाल व विविध ज्ञानभांडाराचा आस्वाद घेतां यावा; अशी माझे पितृव्य व गुरु ती० कै० वामनरावजी ओक यांची उत्कट इच्छा होती. ह्या आपल्या मनोदयानुरूप त्यांनीं गोपाळ, चंद्रात्मज, नरहरि, मैराळ, शंभुदास, मोरेश्वर, माधव इत्यादि महाराष्ट्र कवींचीं पर्वें मिळविलीं होतीं. मुक्तेश्वराचें विराटपर्व प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या पुढें नरहरिकृत उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण, हीं चार पर्वें अनुक्रमानें प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार होता. परंतु मुक्तेश्वराचें वनपर्व संपूर्ण प्रकाशित होण्यापूर्वींच त्यांना स्वर्गलोकीं जावें लागल्यामुळें, त्यांच्या इच्छेप्रमाणें नरहरिकृत चारी पर्वें प्रसिद्ध होऊं शकलीं नाहींत. त्यांच्या मृत्यूनंतर ज्या गृहस्थांच्या हातीं 'काव्यसंग्रहा'चें काम देण्यांत आलें होतें, त्यांस शुभानंदकृत उद्योग व भीष्म पर्वें ज्यास्त पसंत पडल्यामुळें, त्यांनीं त्यांचें प्रकाशन केलें; हें चांगलेंच झालें. परंतु बाकीच्या कवींत नरहरि बराच वरच्या दर्जाचा असल्यामुळें, त्याचीं द्रोण व कर्ण पर्वें, 'काव्यसंग्रहा'चे माजी संपादक कै० रा० नानासाहेब केळकर यांनीं प्रसिद्ध करण्याचें ठरवून त्यांच्या संशोधनाचें काम माझ्याकडे सोंपविलें. त्यांपैकीं 'द्रोणपर्व' यथामति शुद्ध करून अर्थनिर्णायक टीपा वगैरे देऊन आज वाचकांपुढें ठेवीत आहें.

२. नरहरीनें आपल्या मातापितरांसंबंधानें व स्वतःसंबंधानें थोडी माहिती प्रत्येक पर्वाच्या शेवटीं दिली आहे. तीवरून तो इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत हयात होता, असें सिद्ध होतें. हा कवि निजामशाहींतील बीड परगण्यांतील बीट ह्या गांवचा देशपांड्या होता व भीमराजस्वामी ह्या नांवाचे रामदासी सांप्रदायांतील साधुपुरुष त्याचे गुरु होते.

३. ह्या कवीचीं मधलींच चार ह्मणजे उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण, पर्वें उपलब्ध आहेत. परंतु त्या पर्वचतुष्टयापूर्वींच्या व पुढच्या पर्वांवर नरहरीनें मराठी पद्यरचना केली किंवा नाहीं हें खात्रीलायक सांगतां येत नाहीं. नरहरीनें उद्योगपर्वाच्या उपोद्घातांत

'विराटपर्वींचें सुधापान । सेवोनी, लांचावलें माझें मन, ।
उद्योगपर्वींचें ब्रह्मरसायन । इच्छा इच्छी अविलंबें. ॥' (अ० १।१६).

असा उल्लेख केला आहे. यावरून विराटपर्व व कदाचित् त्याच्या पूर्वींचीं पर्वेंही नरहरीनें रचिलीं असावीं अशी शंका उत्पन्न होते. पण त्याच्या कर्णपर्वाच्या उपसंहारांतील पुढील उल्लेखावरून, त्यानें चारच पर्वें रचिलीं होतीं, असें निःसंशय दिसून येतेंः—

उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण, । चत्वारि पर्वें गुणैकरत्नें ।
नरहरिमुखें सिंहाननें, । प्रकट केलीं श्रवणार्थ्यां. ॥ (अ० १६-२७)

ह्या पूर्वोक्त विधानाची असत्यता कोणीं सप्रमाण सिद्ध करून दाखविल्यास,

व नरहरीचीं आणखी पर्वें उपलब्ध झाल्यास, त्यांत प्रकृत लेखकास आनंदच वाटणार आहे. पण आज मितीस तरी कर्णपर्वापुढील नरहरीचीं पर्वें उपलब्ध नसल्यामुळें, वरील विधानास बाध येत नाहीं.

४. ह्या पर्वाच्या पहिल्या तीस अध्यायांचे संशोधनाचे कामीं ती० कै० **वा० दा० ओक** यांचे संग्रहीं असलेल्या एकाच प्रतीवर अवलंबून राहावें लागल्यामुळें, त्यांत वरींच दोषस्थळें राहिलीं होतीं. पण अक्कलकोट येथील आमचे हितेच्छु रा० रा० **विनायक मल्हार सरदेसाई** यांनीं एक पोथी मोठ्या प्रयासानें मिळवून पाठविल्यामुळें, अशा सर्व स्थळांची दुरुस्ती परिशिष्टांत करितां आली, याबद्दल आह्मी रा० **सरदेसाई** यांचे फार आभारी आहों. ही पोथी बरीच शुद्ध व वळणदार अक्षरानें लिहिलेली असून, हिच्या शेवटीं पुढील दोन ओंव्या आढळतातः—

> भारतकथा अतिगहन । लेखन केल्या दिव्य निरोपण, ।
> हृदयीं चिंतोनी सिंहवदन, । दास नरहरी साक्षेप. ॥
> श्रीनृसिंहराजनगरी[1], । तेथील 'कर्णीक' नामाधिकारी, ।
> नारायणसुत निर्धारीं । केरजगी[2] ग्रामीं वसतसे. ॥

त्या ओंव्यांखेरीज ह्या पर्वाचे शेवटीं "हें पुस्तक **सदाशिव माधवराव सुभेदार**, परगणे अक्कलकोट, [हिजरी] सन १२१४ वैशाख मास शुद्ध १४ समाप्त" असा उल्लेख आहे. **नरहरीनें** हें पर्व शके १६९० त रचिलें असा ह्या पर्वाचे शेवटीं स्पष्ट उल्लेख केला आहे, व लेखकानें तें शके १७०८ त ह्मणजे **नरहरीनें** तें रचिल्यानंतर सुमारें १८ वर्षांनीं उतरून घेतलें. यावरून हा कवि आपल्या हयातींत आपल्या प्रांतांत बराच प्रसिद्ध व लोकमान्य होता, असें अनुमान करावयास हरकत दिसत नाहीं.

५. सरतेशेवटीं 'काव्यसंग्रहा'चे चालक रा० रा० **बाळकृष्ण अनंत भिडे**, बी. ए. व मालक श्री. शेट **तुकाराम जावजी** जे. पी., यांनीं ही माझी अल्पसेवा मान्य केली, हे त्यांचे माझ्यावर मोठे उपकार आहेत. तसेंच रा० **विनायकराव सरदेसाई** यांनीं ह्या पर्वाची एक हस्तलिखित प्रत मिळवून दिली व माझे मित्र रा० रा० **नीळकंठ बळवंत भवाळकर**, बी. ए., (नागपुर), व **दामोदर रामकृष्ण बापट**, बी. ए., (नासिक), यांनीं हें काम करण्याचे कामीं वारंवार प्रोत्साहन देऊन, उपयुक्त सूचना केल्या, याबद्दल मी त्यांचाही फार उतराई आहें.

नार्मलस्कूल, नागपुर.
आगष्ट १९०७.

दा० के० ओक.

---

१ नरसोबाची वाडी. २ हा गांव धारवाड जिल्ह्यांत आहे.

नरहरिकृत द्रोणपर्वाची विषयानुक्रमणिका.

मुख्य मुख्य पाठभेद, शुद्धाशुद्ध, व टीपा, यांचें परिशिष्ट–पुढें १–५.

नरहरिकृत महाभारत.

७. द्रोणपर्व.

(ओंव्या.)

अध्याय पहिला.

ॐनमो जी! **ल**क्ष्मीकांता! । पूर्ण**ब्र**ह्मा! सर्वगता! । **मा**यानियंता! **अ**-च्युता। परमानंदा! सुखमूर्ती! ॥ १ ॥ निरामया! निर्विकारा! । निष्कलंका! निरुपचारा! । अद्वयानंदा! परात्परा! । कैवल्यधामा! [1]स्वदीप्ती! ॥ २ ॥ [2]लीलाविग्रही! नानालीळा । कौतुकें वर्धिसी [3]**मा**याकीळा । विश्व मोहुनी खेळसी खेळा । [4]शेखीं वेगळा सर्वांतें. ॥ ३ ॥ **ब्र**ह्मा, **वि**ष्णु, **म**हेश, **श**क्ती, । [5]मंगळां मंगळ **ग**णपती, । सनातन अमूर्तमूर्ती । तूंची वर्धसी, दातारा! ॥ ४ ॥ ऐशा गुणनिधी! रत्नाकरा! । शरण अनन्य **दा**मोदरा! । यशवर्णनीं [6]आर्तपुरा! । स्फूर्तिदाता मज होई. ॥ ५ ॥ नमो **स**रस्वती **भ**गवती । **रे**णुकामाया **तु**ळजा-**श**क्ती । पर**ब्र**ह्म अव्यक्तव्यक्ती । ईश्वरत्वा आणिलें. ॥ ६ ॥ नमो सद्गुरू महा-राज । क्षयातीत कैवल्यबीज । भीमविक्रमी **भी**मराज । वज्रपंजर दासांतें. ॥ ७ ॥ कृपाहस्त स्पर्शतां [7]मौळी । **जी**[8]वदशा दृढ काजळी । खंडुनी, **[9]शि**वत्व वर्धवी [10]कीळी । **मा**यामळी विलोपे. ॥ ८ ॥ नमो ऋषी, ज्ञानी, सिद्ध, भक्त । **व्या**स, **वा**ल्मीकि अवतार [11]धूर्त । ज्यांचेनि त्रिजग डोळसयुक्त । अतर्क्य **ह**री तर्किती. ॥ ९ ॥ नमो ग्रंथकारक कवीश्वरां । ब्रह्मवृंदा भव्याकारां । ज्योतिषी-गणकविद्याधरां । सभाचतुरां अर्थज्ञां. ॥ १० ॥ नमो पंडित, विद्वज्जन, । संत, सज्जन, श्रोते निपुण । त्यांचे अवधानें प्रज्ञापूर्ण । मूढ **सु**रगुरु [12]तुके पैं. ॥ ११ ॥ संत, सज्जन कृपामूर्ती । **ह**रिगुणप्रेमा दृढशक्ती । वक्तया सुखद नमनमुहूर्ती । जेवीं जननी तान्हया. ॥ १२ ॥ बाळकाचे बोबडे बोल । अर्थ-

---

१. आत्मज्योती, ब्रह्मस्वरूपतेजाच्या ज्वाळे! २. कौतुकानें शरीर धारण करणाऱ्या, लीलावतारा! ३. मायारूपी अग्नीची ज्वाला. ४. शेवटीं. ५. सर्व मंगळांचा मंगळ, मंगळश्रेष्ठ. ६. इच्छा पुरविणाऱ्या! ७. मस्तकाला. ८. प्राण्याचा अहंभाव, शरीराभिमान इत्यादिकांनीं युक्त असणारें जीवत्व. ९. ईश्वरस्वरूप, ब्रह्मतत्त्व. १०. ज्योत. ११. दिव्यदृष्टि. १२. बरोबरी करी.

हीन, पोचट, फोल; । [1]परी सर्वांगाचें कर्णयुगल । करूनी, तोषे माउली; ॥ १३ ॥ कीं [2]पित्याचे [3]अंतरवनीं । सदय मेघ वर्षे जीवनीं । [4]नां ते चकोरा तल्लीन ध्यानीं । फळे जेवीं हिमांशु. ॥ १४ ॥ कोण प्रीतीचें [5]ग्लान मानी? । पूर्वे पावे वासरमणी । मागें वत्सध्यासें पाहे जननी । [6]स्नेहें युक्त वोरसें. ॥१५॥ तयापरी करुणानिधी! । लाड पुरवोनि प्रज्ञावृद्धी । वाढ करूनी सोज्ज्वळबुद्धी । [7]भारतीं **भा**रत बोलवा. ॥ १६ ॥ **भा**रत **गं**गा **भा**गीरथी । नौकारूप तुमची शक्ती । [8]आश्राउनी, वर्णनीं धरिली मती । पार मातें करावें. ॥ १७ ॥ प्रभू! तुमचे अनुमोदनीं । वाक्तुषार सिंधुजीवनीं । कवित्वलतिका वर्धे गुणीं । हा प्रसाद तुमचा. ॥ १८ ॥ तुम्ही न होतां सानुकूळ । कवित्वलतिका होय [9]विफळ । जैसी योषिता [10]लावण्यकीळ । मूर्खसंगें विनाशे. ॥ १९ ॥ असो; **भा**रताब्धि [11]अपारपार । कोण पावेल पैलपार? । समर्थ [12]**स**त्यवतीकुमर । [13]बुड्या जाला जगहिता. ॥ २० ॥ कथारत्नें काढोनि [14]तोषी । केल्या **पु**राणाचिया राशी । तेची **म**हाराष्ट्रभाषाचरकासी । वोळोनि प्रकार निर्मिले. ॥ २१ ॥ हृदयीं, कंठीं, धरितां कर्णीं, । दुरिततम हरोनि झणी । मति विराजे धौतवर्णीं । दृष्टि [15]श्रवणीं उभारे. ॥ २२ ॥ **भा**रतींचा श्लोकचरण । जया होय श्रवणपठण । तेणें कपिलासहस्रदान । केलें जाण **सिं**हस्थीं. ॥ २३ ॥ [16]असो; **सो**मवंश विख्यात क्षिती । राजराजयां चक्रवर्ती । **ज**नमेजय पवित्रकीर्ती । विनवी भक्ती [17]मुनीतें. ॥ २४ ॥ "अहो! जी! [18]**व्या**सशिष्यवर्यपंक्तीं । अग्रता, मान, विद्या, सुमती, । वक्तृत्वधारणा घनाची शक्ती । [19]मानसधात्री निवाली. ॥ २५ ॥ इच्छाबीज इच्छीत **रो**हिणी । '**द्रोणपर्व**' प्रेरीं जळ कर्णीं । हृदयभूमी थारतां किरणीं । कथाकोंभ फुपाटे." ॥ २६ ॥ ऐकोनी राजयाची वाणी । शोक निवाला अंतःकरणीं । म्हणे, 'सार्वभौमा! पवित्रखाणी! । पूर्वजकीर्ति

---

१. अन्वयार्थः–परी सर्वांगाचें कर्णयुगल करूनि (=त्या शब्दाकडे कर्णद्वयाप्रमाणें इतर सर्व अवयवांचेंही ध्यान लावून, सर्व अवयवांना कानाचेंच जणूं काय रूप देऊन) माउली तोषे (=आई संतुष्ट होते). २. पिणाऱ्याचे, तान्हेल्याचे. ३. अंतःकरणरूपी अरण्यांत. ४. किंवा. ५. पीडा, श्रम. ६. पान्ह्यानें युक्त, पान्हा फुटलेली. वोरस=पान्हा. ७. वाणीनें, वाचेनें. ८. आश्रय घेऊन. ९. फलरहित, व्यर्थ. १०. फार सुंदर. कीळ=अग्नीची ज्वाळा. ११. ज्याच्या किनाऱ्याचा थांग लागत नाहीं असा, अपरंपार मोठा. १२. व्यास. १३. पाणबुड्या. १४. तोषदायक (हें कथारत्नांचें विशेषण). 'तोषीं' असा पाठ घेतल्यास, तोषीं=संतोषानें, आनंदानें. १५. श्रवण करण्याकरितां. १६. येथें मूळांतील कथाभाग सुरू होतो. १७. वैशंपायनऋषीस. १८. व्यासाच्या शिष्यमंडळांत. १९. चित्तरूपी भूमी.

ऐकिजे.' ॥ २७ ॥ राजा वदे 'मुनिसत्तमा! । विद्याउदधी! तेजधामा! । इंद्रियजिता! आवाप्तकामा! । वसतो[1] वृत्तांत निवेदी. ॥ २८ ॥ रविप्रतिमा सत्वनिधी । बळवीर्य समान उदधी । देवव्रत[2] अक्षयसिद्धी । पाडिला शिखंडी[3] ऐकतों. ॥ २९ ॥ पुढां धृतराष्ट्र शोकावर्ती । दुर्योधनादि सेना सुमती । काय करिते जाहले गती । विस्तारूनी बोलिजे'. ॥ ३०॥ वैशंपायन म्हणे, "राया! । भीष्म पांडवीं नेला लया । ऐकोनी शांति हृदयालया । धृतराष्ट्राच्या न होय. ॥ ३१ ॥ संतप्तमान शोकाकुलित । धडधडां हृदयीं जाळी चित्त । खेदें मानी त्रिभुवन रिक्त । आंग टाकी धरेतें. ॥ ३२ ॥ राजमंदिरीं शोकध्वनी । ऐकतां पाविजे[4] सर्वजनीं । शोक भरूनी उरे अवनीं[5] । गगनोदरीं न माये. ॥ ३३ ॥ तव तेची संधी गावलगणी[6] । येता जाला म्लानवदनी । शांतवोनी सकळां वचनीं । भूपचरणा वंदिलें. ॥ ३४॥ 'मी संजय कुरुक्षेत्रा । पाहोनी आलों प्रज्ञानेत्रा[7]!' । रायें स्पर्शोनियां वक्रा । निकटवर्ती बैसवी. ॥ ३५ ॥ श्वास घालोनी एकसरा । नयनांबुजीं अंबुधारा । विकळ मानसें शोकीं थारा । संजयातें अनुवादे. ॥ ३६ ॥ म्हणे, 'बाळका[8] विजयकेतू । भीष्म ग्रीष्मींचा पूर्णदीप्तू[9] । सौख्यसागरींचा तारानाथू[10] । शिखंडिकुक्कुटें[11] ग्रासिला. ॥ ३७ ॥ विचित्र प्रारब्ध दैवरेखा । आजन्म वाढ[12] केलें दुःखा । असो; पुढील वृत्तांत देखा । निवेदीं मातें बाळका! ॥ ३८ ॥ गांगेय प्रतापाचा तरणी । अस्ताचळा आक्रमितां धरणी । कुरुपांडव कैसी करणी । करिती? मातें जाणवीं'. ॥ ३९ ॥ संजय म्हणे, 'महाराजा! । भीष्में स्पर्शितां धरा वोजा[13] । उभयसेना विवर्णतेजा[14] । महागडी आतली. ॥ ४० ॥ तडाग फुटे, वावरे जळ । तैसे सेनेचे निघाले मेळ । हर्षामर्ष[15] निंदिती सकळ । क्षत्रधर्म अघोरी. ॥ ४१ ॥ खेद पावोनी उभयचमू । येउनी वंदिला राजा भीष्मू । शरासनीं शय्यासंभ्रमू[16] । उपधान[17] उशी बाणांची. ॥ ४२ ॥ जाणों धरे पावला तरणी । किरणमंडित शय्यास्तरणी ।

१. घडला असेल तसा. २. भीष्म. हा ब्रह्मचर्यव्रताच्या प्रभावानें देवांसारिखा देदीप्यमान दिसे ह्मणून याचें 'देवव्रत' असें नांव पडलें. ३. शिखंडीनें. ४. सर्व लोक आले—हा इत्यर्थ. येथील कर्मणिप्रयोग ध्यानांत ठेविण्यासारखा आहे. ५. पृथ्वींत. ६. गवलगणपुत्र (संजय). गवलगण हा धृतराष्ट्राचा एक सारथी होता. ७. (अंधळा असल्यामुळें) प्रज्ञा (=बुद्धि) हीच नेत्र ज्याचे अशा धृतराष्ट्रा! धृतराष्ट्र अंध असल्यामुळें संजय आपल्या नांवाचा उच्चार करून त्यास वंदीत आहे. ८. माझ्या मुलांचा विजयध्वज. हा 'भीष्म' शब्दाचा उद्देश. ९. सूर्य. १०. चंद्र. ११. शिखंडि हाच कुक्कुट (कोंबडा) त्यानें. १२. वृद्धि. १३. कौतुकानें (वोज=कौतुक). १४. म्लान, उत्साहरहित. १५. हर्षानें व क्रोधानें. १६. शय्या हेंच आदरातिथ्याचें साहित्य. १७. उच्छीर्षक, ज्याच्या योगानें डोकें वर करितां येतें तें.

देखोनियां मन उन्मनी[1] । वंदोनी चरणा निघाले. ॥ ४३ ॥ **पां**डववीर आल
कोटी । वीर प्रशंसा करिती होटीं[2] । म्हणती 'वीर पृथ्वीतटीं । **पार्थ**
प्रतापी. ॥ ४४ ॥ धन्य जननी! गुरुत्व गरिमा । कीर्तिदिशा उजळली व्यो
सिद्धी नेलें नेमिल्या नेमा । दुःसह सुरां असाध्य. ॥ ४५ ॥ जयाब्धी
अनंत लहरी । हेळाविती[3] शौर्यता पुरी । संरब्ध[4]नेत्र वक्रताकारी । शिबिरा[5]
पातले. ॥ ४६ ॥ **कौ**रववीर चिंतावर्ती । विव्हळ मानसीं, भ्रांत चित्त
क्रोधयुक्त मलिन[6]मती । खेदें दिशा लक्षिती. ॥ ४७ ॥ जैसे अविकांचे[7] कळ
रक्षक नसतां पावती ताप । भ्रष्ट होवोनी, दिशेचा माप । करूं[8] धांवती ज्या
॥ ४८ ॥ तैसे **भी**ष्म पडतां समरीं । सेना व्यापिली अवसरीं[9] । उद्विग्न मा
वस्त्रागारीं[10] । येते जाहले अशोभा[11]. ॥ ४९ ॥ **क**र्णाप्रति **दु**र्योधन । बोल
जाहला म्लानवचन । '**भी**ष्म सुखाचें **खां**डववन[12] । **पा**र्थअग्नीनें दग्ध के
॥ ५० ॥ जैसी कांतविरहित[13] कांता । कीं शुष्क तडागीं नव्हे आस्ता[14] ।
तो केसरी भ्रष्टतां तथा । वना आपदा ज्यापरी; ॥ ५१ ॥ तैसी विवर्ण[16]
मुची चमू । गोप्ता[17] नियंता प्रतापी **भी**ष्मू । **पां**डवशक्तीचा विक्रमू । खेद
चित्तातें.' ॥ ५२ ॥ **क**र्ण म्हणे 'राजेश्वरा! । सार्वभौमा! जगदीश्वरा! । से
धन**ध**नदेश्वरा । तूं दुसरा धरातळीं. ॥ ५३ ॥ **भी**ष्मनिधनगर्ते[18] चरण
घसरतां चित्त विवर्णवर्ण । शौर्यप्रताप विरागमान । तेवीं व्याकुळ, समथ
॥ ५४ ॥ भूपयष्टिका दृढतर गांठीं[19] । असतां, चिंता किमर्थ पोटीं? । सेनास
मेघ**कि**रीटी । घोटघोटितां न्यूनावे. ॥ ५५ ॥ तैसियापरी नृपमंडणा! । ग
अमित विक्रमी[20] सेना । काळविखारी भूप प्रवीणा! । जे अजिंक्य **कृ**तां
॥ ५६ ॥ **द्रो**ण विद्येचा अक्षोभ[21] उदधी । रणप्रवीण, विजय सिद्धी, । स
चारी, तपाची वृद्धी, । यमनियम स्वसत्ता. ॥ ५७ ॥ शौर्यप्रतापतीव्रतरणी

---

१. ब्रह्मस्वरूपांत लीन होण्याची स्थिति, ब्रह्माशीं तादात्म्य. २. ओठांनीं, तोंडानें. ३. हे
वणें=उचंबळणें. ४. संरब्ध=क्षुब्ध, त्रासलेले. ५. शिबिर=तळ, मुकामाची जागा. ६.
कुमती. ७. मेंढ्यांचे. ८. दिशेचा माप करूं धांवती=दिशांचा विस्तार मोजण्याकरितांच
काय धांवतात, दश दिशांना सैरावैरा धांवतात. ९. अवसर=वारें, पिसें, भूताचा सं
१०. तंबूंत. ११. शोभारहित, खिन्न. १२. मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय ४९ पहा. १३. गत
पतिविरहित. १४. आस्था, काळजी. १५. किंवा. १६. निस्तेज, भग्नोत्साह. १७. गोप्ता (रक्षण
व नियंता (नियमन करणारा). १८. भीष्माचें निधन (मरण) हीच गर्ता (खड्डा, खळगा)
१९. पदरीं, संग्रहीं. २०. पराक्रमी. २१. शांत, क्षोभरहित.

जितक्रमा,[1] अतर्क्यकरणी, । मंत्रदेवता जोडूनी पाणी । जिन्हेपुढें वोळगती.[2] ॥ ५८ ॥ **पा**र्थ प्रतापाचा तीव्र माळा । ज्याचेनि गुरुत्वें लोकीं कीळा । तुझ्या जयीं नरशार्दूळा! । चिंता केवीं मानसीं? ॥ ५९ ॥ तैसाची **द्रो**ण प्रतापरुद्र, । क्षयातीत, विद्यासमुद्र, । **फा**ल्गुनासमान **वी**रभद्र । तेजें अग्नि दूसरा. ॥ ६० ॥ तुझ्या हितीं अनन्यमती[3] । वीरां सकळां लावील ख्याती । **पां**डववंश किंचित् भूपती! । वांचतां[4] दिसे अनुमान. ॥ ६१ ॥ **कृ**तवर्मा[5] **या**दववीर । महाप्रतापी **वै**श्वानर । युद्धप्रवीण समरधीर । **कृ**तांत बाहीं[6] आकळी. ॥ ६२ ॥ **शा**रद्वत[7] **शा**रदेसरी । चतुर चतुरा मंत्रोद्धारी । ज्यांचेनि प्रतापें **का**ळ समरीं । पाय न घाली पुढारा. ॥ ६३ ॥ **सो**मदंत दंतीपाडे[8] । नाहींच करी सेनाझाडें । कुशळ युद्धीं वांडेंकोडें[9] । अग्निसेवनीं अक्षयी. ॥ ६४ ॥ **भ**गदत्तराज **भा**र्गवसरी[10] । प्रभिन्न[11] द्विप[11] समान[12] गिरी[12] । ज्याच्या बळाची महा थोरी । **भी**मादि वीर दचकती. ॥ ६५ ॥ भूप **सैं**धव[13] सैंधवगुणी[14] । ज्यावीण सेना भासे अळणी[15] । **त्रि**गर्त **सौ**वीर प्रतापकिरणी[16] । **कै**केयबंधुपंचक. ॥ ६६ ॥ **विंदा**नुविंद महाराजा! । तव अनुज[17] प्रतापध्वजा । **सौ**बळादि[18] वीर भूभुजा![19] । **सं**शप्तक[20] प्रतापी. ॥ ६७ ॥ **अ**लंबुवीर[21] राक्षसाधिप । ज्याचे मायेचें न कळे माप । मम तनय प्रतापदीप । **वृ**षसेन बळियाढा.[22] ॥ ६८ ॥ यांहीवेगळे भूप दक्षा! । वीर बलिष्ठ तुझिया पक्षा । **कु**लिशपाणी[23] पावेल शिक्षा । इतरां पाड कायसा? ॥ ६९ ॥ तूंही प्रवीण कुशळकुशळा! । अस्त्रसाधनीं प्रतापकीळा । नागायुत प्रचंडबळा । धर्म[24] दरारा वाहे पैं. ॥ ७० ॥ मीहि राजया चूडा-

---

१. ज्यानें श्रमास जिंकलें आहे तो, ज्यास कधीं थकवा येत नाहीं असा. क्लम=ग्लानि, थकवा, श्रम. २. सेवा करावयास तयार असती. ३. निष्ठा, दृढनिश्चय. ४. वांचणें संशयित आहे, वांचेल असा भरंवसा येत नाहीं. ५. हा नहुषकुलोत्पन्न हृदिकराजाचा पुत्र. यास बळरामानें एक अक्षौहिणी सैन्यासह दुर्योधनाचे साहाय्यास दिलें होतें. ६. भुजांनीं. ७. कृपाचार्य. ८. हत्तीसारखा (अत्यंत बलवान्). ९. आवडीनें, कौतुकानें. १०. परशुरामासारखा. ११. ज्याच्या गंडस्थळांतून मदाचा स्राव होत आहे असा हत्ती. १२. पर्वतासारखा. १३. सिंधुदेशाचा राजा (जयद्रथ). १४. वारूसारखा चपळ. पुढील चरणांत 'अळणी' शब्द आला आहे, तेव्हां 'सैंधव' शब्दाच्या 'घोडा' व 'मीठ' या दोन्ही अर्थांवर कटाक्ष दिसतो. १५. नीरस, कमजोर. १६. प्रतापसूर्य. १७. धाकटा भाऊ (दुःशासन). १८. शकुनी. १९. राजा (दुर्योधना). २०. संशप्तक=मी युद्धांत अमुक वीरास मारीन, न मारीन तर मला रौरवगति प्राप्त होवो, अशी जो शपथ घेतो तो. त्रिगर्तराजाचे सुशर्मा, सुरथ, सुधनु, सुबाहु व सुधन्वा—असे जे पांच पुत्र होते त्यांस संशप्तक असें साधारण नांव आहे. २१. जटासुराचा पुत्र. २२. बलवान्, प्रतापी. २३. वज्रपाणी (इंद्र). २४. यमधर्म.

मणी ! । अद्भुत चोज दावीन रणीं । [१]**भा**र्गव गुरूचा प्रताप अवनीं । स्फुरित करुनी दावीन. ॥ ७१ ॥ हा काळवरी आपणासम । करुनी, वर्धिलें मज [२]सं-भ्रमें । त्याचें उत्तीर्ण अवाप्तकाम । विक्रमें सर्वां वधीन. ॥ ७२ ॥ [३]मज असतां तुझिये [३]गांठीं । कायसी संग्रामाची गोष्टी ? । [४]जीवोदार **कृ**तांतमिठी । सोडवीन नरवर्या ! ॥ ७३ चित्तीं चिंता त्यागोनी राया ! । निद्रा करीं पसरूनी बाह्या । प्रसर करितां सूर्य समया । अद्भुत चोज देखसी.' ॥ ७४ ॥ सकळां कर्णी **क**र्णगोष्टी । ऐकतां लाभ मानिला पोटीं । विश्रामातें [५]उठाउठी । जाते जाले स्वानंदें. ॥ ७५ ॥ निशी विश्रामतां शयनीं । उदया पातला देव **त**रणी । स्वकर्में सारूनी वीरगुणी । युद्धालागीं निघाले. ॥ ७६ ॥ **पां**डवचमू [६]विभ्रां-जवंत । तैसी नववधू मुसमुसीत । कीं वर्षाकाळीं नदी [७]सुसात । उसळे लोट ज्यापरी; ॥ ७७ ॥ तयापरी विजयी सेना । एकवटली राया ! निपुणा । जय-श्रीचा [८]स्फुंद दुणा । तुच्छ **का**ळा मानिती. ॥ ७८ ॥ **कौ**रव वीरांचे अमित भार । सांवरूनी जाले स्थिर । परी कांता नसतां [९]कांतार घर । मानीं तेवीं अशोभा. ॥ ७९ ॥ उभयवीर पावोन रणा । **भी**ष्मासी करुनी प्रदक्षिणा । शि-रसा वंदोनियां चरणा । माघारले रणमूर्ध्नी. ॥ ८० ॥ **ध**र्म धार्मिक सत्यवादी । **भी**मार्जुन ऐश्वर्यनिधी । बळप्रताप अक्षोभ उदधी । शौर्य[१०]भानुकृशान. ॥ ८१ ॥ **मा**द्रीतनुज तेजकिरणी । विराजित **श**नि**सो**म मानी । **सा**त्यकिवीर विक्रम-खाणी । **शु**क्रापरी धगधगी. ॥ ८२ ॥ अनेक वीरांचे तीव्र मेळ । लोटले जैसें [११]प्रावृटीं जळ । **पां**डव [१२]अर्णव, खळबळ । वीरलहरी उसळती. ॥ ८३ ॥ रणभूमी मर्यादवेला । थोकोनि, क्रोधें वमिती ज्वाळा । **कौ**रवसेनेचा [१३]एक-वळा । **मै**नाकप्राय स्थिरावे. ॥ ८४ ॥ येरयेरां [१४]दृष्टीभेटी । क्रोधें सौख्यें भृ-कुटीगांठी । मिळों पाहती उठाउठी । एकमेकां निघातें. ॥ ८५ ॥ तंव **र**वि-नंदन रवीसमान । जाणों मूर्तिमंतरूपें **म**दन । अलंकारवस्त्राभरण । [१५]**न**ळकूबर ज्यापरी. ॥ ८६ ॥ [१६]विभ्राजमान लावण्य चोख । जाणों पूर्णिमेचा [१७]मयंक । मुगुट, कुंडलें, माळा, पदक, । गजमौक्तिकी गुंडळ्या, ॥ ८७ ॥ वीरकंकणें,

१. कर्ण हा परशुरामाचा शिष्य. २. सन्मानपूर्वक. ३. माझा तुझा संबंध जडला असतां, मी तुझ्या पदरीं असतां–हा इत्यर्थ. ४. जीवाची पर्वा न करणारा असा मी. ५. सत्वर, लवकर. ६. दिव्य, तेजोमय, झळकणारी. ७. सुसांट, सोसाट्यानें. ८. स्फुरण. ९. अरण्य. १०. कृशान=कृशानु=अग्नि. ११. पावसाळ्यांत. १२. समुद्र. १३. जूट, जमाव. १४. नजरभेट, दृष्टादृष्ट. १५. हा कुबेराचा मुलगा. १६. तेजस्वी. १७. चंद्र.

[1]बाहुवटें; । तेजें तारा दिपती वाटे; । करमुद्रिकालखलखाटें । वस्तिगृह वसिन्नलें. ॥ ८८ ॥ विराजमान [2]स्यंदन घन । तप्त[3]हाटकज्वाळवर्ण । पताका तळपती [4]विजूमान । [5]वारू वारिया वारिती. ॥ ८९ ॥ कीं तो [6]रावणी प्रतापभानू । हवनीं हवितां [7]बृहद्भानू । तोषोनी प्रसाद स्यंदन घनू । अर्पितां, वानरीं भ्रष्टिला. ॥ ९० ॥ तोची ठेवा गुप्त धरणी । जाणों अर्पिला राधेया गुणी । तेजें प्रदीप्त बालार्ककिरणी । [8]लक्ष्य लक्षी अलक्ष्य. ॥ ९१ ॥ ना तें [9]पुष्पक शोभायमान । देवीं [10]उंचिता वोपिलें घन । ऐसिया रथीं रविनंदन । आरूढ जाहला तेजस्वी. ॥ ९२ ॥ विभ्राज कवच ज्वाळमाळी । तेजें दिशा व्यापिल्या सकळीं । शरासन हस्तकमळीं । जाणों [11]त्र्यंबक दुसरें. ॥ ९३ ॥ तेज वर्चस्व, तीव्र बाण, । गुर्वी गदा, शक्ती ज्वलीन, । खड्ग चर्म, शंखीं कोंदण । विचित्र नाळ हिरियांचे. ॥ ९४ ॥ ऐसिया संभ्रमें तेजभरित । लोटला जैसा ग्रीष्मादित्य । सेना विक्रमी बळोन्नत । गजदुंदुभिघनघोषें. ॥ ९५ ॥ जाणों तारा तुटे गगनीं । कीं [12]दामिनी कडाडिली अवनी । ऐसिया संभ्रमें वीर [13]अयनीं । भीष्मदर्शना पातला. ॥ ९६ ॥ उतरूनियां [14]रहंवरयानीं । प्रवेशला सभासदनीं । दृष्टी देखिला प्रतापतरणी । शरासनीं सुशोभा. ॥ ९७ ॥ जाणों धरे पातला सूर्य [15]सांग । कीं द्रोणाद्रीचें [16]खवळे शृंग । ना तें सुदर्शन प्रत्यक्ष आग । गळोनी तळां पडियेलें; ॥ ९८ ॥ ऐसियापरी गंगाकुमरा । देखोनी [17]काळजीं सोडिली थारा । नयनांबुजीं अंबुधारा । कंठ सद्गद अशोभा. ॥ ९९ ॥ सांवरूनी शोकधाडे । वंदोनी उभा राहिला पुढें । म्हणे, 'पार्थ विक्रमाचें [18]बाडें । सुरांसुरां अभेद्य. ॥ १०० ॥ जितक्रमा, पुरुषार्थवृद्धी, । साम्यते न ये अक्षोभ उदधी । सर्वास्त्रप्रवीण, विजयसिद्धी । पुढें उभ्या राहती. ॥ १०१ ॥ विजयरथ अक्षोभ तूणीर । अशनिप्राय गांडीव प्रचुर । ध्वजीं विराजे [19]श्रीशंकर । सारथी स्वामी विश्वाचा. ॥ १०२ ॥ मनुष्यरूपाची धरूनी [20]बुंथी । साह्या मिनला इंदिरापती । भूभार हरुनी नानायुक्ती । यश वर्धवी त्रिजगतीं.

१. दंडभूषणें. २. रथ. ३. हाटक=सोनें. ४. विजेप्रमाणें. ५. घोडे वाऱ्याला सुद्धां मागें सारीत होते. ६. इंद्रजितानें अनेक यज्ञ करून दिव्यरथ, धनुष्यबाण, शस्त्रास्त्रें इत्यादि प्राप्त करून घेतलीं होतीं, अशी कथा आहे. ७. अग्नि. ८. [तो डोळ्यांना दिपवीत असल्यामुळें] लक्ष्य (मन) त्याला अलक्ष्य (दुर्निरीक्ष्य) लक्षी (मानी). ९. विमानविशेष. १०. उचित=नजराणा, भेट. ११. शिवाचें धनुष्य. १२. वीज. १३. मार्गानें. १४. हा सप्तमीचा पंचमीच्या अर्थी प्रयोग आहे. १५. स+अंग=देहधर, मूर्तिमंत. १६. खवळ (=भेग) पडलें, फुटलें. १७. अंतःकरणानें धैर्याचा आधार सोडला, काळजाचा धर सुटला. १८. भांडार, खजीना. १९. शिवावतार मारुति. २०. बुडखा, आडपडदा, आवरण.

॥ १०३ ॥ राम[1] विराम केला कदनीं । अजित क्षत्रिया सर्व अवनीं । ऐसिया तूतें समरांगणीं । शरासनीं निजविलें. ॥ १०४ ॥ हेंची आश्चर्य हृदयालया । गमे प्रौढ महाराया ! । **का**ळविक्रमी **वि**जयीं बा ! ह्या । वीरां सर्वां त्रासिलें[2]. ॥१०५॥ तव आश्रयें नरमंडणा ! । **दु**र्योधन प्रवर्तला रणा । आतां विगत-कामना । आश्रय कोठें दिसेनों[3]’. ॥१०६॥ **क**र्णमुखींची ऐकोनी वाणी । **भी**ष्म बोले प्रसन्नवदनीं । म्हणे, ‘वीरा ! पुरुषार्थखाणी । तुझी मी जाणें बाळका ! ॥ १०७ ॥ तुज असतां वर्तमान[4] । किमर्थ व्याकुळ **दु**र्योधन ? । धरणीं वीर तुजसमान । नाहीं विक्रमी सर्वथा. ॥ १०८ ॥ **पृ**था **कुं**ती तव उत्पत्ती । सूर्यवीर्य अमोघशक्ती । जिंकिल्या भूपांच्या अमित पंक्ती । जे अजिंक्य **का**-ळातें. ॥ १०९ ॥ सुरसमूहोपाळणशक्ती । जैसा रक्षक **शै**लघाती[5] । तैसा **कौ**रवसेनापती । तूं समर्थ वीरवर्या ! ॥ ११० ॥ **सु**योधनाचे हितस्वार्थी । पृथ्वीजय करितां शक्ती । विगत करूनी नृपांच्या पंक्ती । साधिला जय प्रतापें. ॥ १११ ॥ **कां**बोज, **अं**बिष्ठ, **त्रि**गर्त, । **गि**रिवज्र आणि **न**ग्नजित । **वि**देही करुनी निर्जित । **गां**धारराजें जिंकिले. ॥११२॥ **उ**त्कल, **मे**खल, **पौं**ड्रक, । **क**लिंग, **नि**षाद, **बा**ल्हिक, । **हि**मवंत, **दु**र्गें, **कि**रात, **श**क, । अनेक भूप जिंकिले. ॥ ११३ ॥ अर्पोनी अर्थ **दु**र्योधना । यशें दिशा भरल्या प्रवीणा । **कौ**रवांमाजी तुझी गणना । मजही प्रिय ज्यांपरी. ॥११४॥ सांप्रत वीर तुज-ऐसा । नाहीं मातें दृढ धिंवसा[6] । जाई रक्षीं **कु**रुनरेशा-। सह सकळां भूपांतें. ॥ ११५ ॥ महाप्रतापी **द्रो**णाचार्य । आणि तूं विक्रमी दुजा सूर्य । रक्षिजे **कौ**-रवां वीर्यशौर्य-। बाहुप्रतापें बाळका !’ ॥ ११६ ॥ ऐकोनी **दे**वव्रताची वाणी । **क**र्णें भाळ[7] स्पर्शिला चरणीं । आज्ञा घेवोनी प्रसन्नवदनीं । कडकडाटी निघाला. ॥ ११७ ॥ सेनाबद्ध सरितालोट । उसळोनी धरी समुद्रवाट । भाटीव[8] पुढें करिती भाट । गजदुंदुभि गर्जना. ॥ ११८ ॥ वीरआवर्त उसळती गगनीं । विराजित **क**र्णचंद्रमा किरणीं । पाहों सेनासमुद्रपाणी । भरतें दाटे उल्हासें[9]. ॥ ११९ ॥ कांता अंकांतीं[10] पावे वरू । कीं नौका बुडतां कर्णधारू[11] । ना तो अग्नि कोंडतां, जलधरू[12] । पावतां, हर्ष ज्यापरी; ॥१२०॥ तयापरी तया समया । हर्ष पावला महाराया । **दु**र्योधन उभवोनी बाह्या । हर्षानंदें फुपाटे. ॥ १२१ ॥

---

१. परशुराम. २. भिवविलें. ३. येथें मूळांतील तिसरा अध्याय संपतो. ४. हयात, कुशल, क्षेम. ५. वज्रधर, इंद्र. ६. भरंवसा. ७. मस्तक. संस्कृतांत ‘भाल’ शब्द पुल्लिंगी आहे. ८. स्तुति. ९. येथें मूळांतील चौथा अध्याय समाप्त झाला. १०. संकटकाळीं. ११. नौकेचें सुकाणूं धरणारा, सुकाण्या. १२. मेघ.

कुरुवर्या आल्हादकोटी । धावोनी हनु स्पर्शली बोटीं । म्हणे, "वीरवर्या! जगजेठी! । शून्य सृष्टी तुजवीण. ॥ १२२ ॥ तूं ऐश्वर्याचा विजयकेतू । तूं संग्रामसागरींचा नौकानाथू । सौख्यामृताचा सुशीळ वातू । मत्प्रियकर बांधवा! ॥ १२३ ॥ धरणी आश्रय धराधर[1] । सुरां सकळां **सु**रेश्वर । कीं वनस्पती **शी**तकर । तेवीं आमुतें नरवर्या! ॥ १२४ ॥ तूं असतां माझिया गोंठीं[2] । कायसी संग्रामाची गोष्टी ? । सेना भ्रष्ट बारावाटी । गोप्ता[3] नाहीं तयातें. ॥ १२५ ॥ तरी तूं होवोनी सेनापती । चमू[4] रक्षिजे आपुले शक्ती । **पां**डवां सकळां दक्षिणापती-[5] । भेटीलागीं पाठवीं." ॥ १२६ ॥ **क**र्ण वदे हर्षवर्धन । 'बोलसी राया! सत्यवचन । परी मज सेनापती करितां जाण । भूप तोषा न पवती. ॥ १२७ ॥ येऱ्हवीं माझी दु:सह शक्ती । तूं जाणसी राया! निर्गुती[6] । परी **द्रो**ण असतां नृपाच्या पंक्ती । अर्ह[7] मी तों नव्हें पां. ॥ १२८ ॥ योग्यायोग्य रत्नपारखी । पाहोनी ललाम जडी पदकीं । मान्यता मान मध्यनायकीं । शोभा सकळां पाविजे. ॥ १२९ ॥ तैसा **द्रो**णाचार्य वीर सुभट । त्यासीच साजे सेनापट । शौर्यप्रतापबळ उद्भट । मान्य सर्वां नृपांतें. ॥ १३० ॥ सर्वास्त्रभेदी, जितक्रमा, । धनुर्विद्येची पावली सीमा । शौचें[8] तपें **अ**ग्निप्रतिमा । युद्धीं **सु**रेशा असाध्य. ॥ १३१ ॥ जैसा सुरमंडळीं **गु**रु श्रेष्ठ । जैसा असुरांमाजी **ब**ळी वरिष्ठ । स्थापून, पुरुषार्थ करूं प्रगट । सर्व आम्ही नरवर्या! ॥ १३२ ॥ अमृतप्राय मानोनी वाणी । हर्षें[9] पातले हांतधरणी[10] । **गु**रुवर्य सूर्यसूर्य प्रतापखाणी । भाळ चरणीं न्यासिला[11]. ॥ १३३ ॥ जोडूनियां उभय पाणी । बोलता जाहला नम्र वचनीं । म्हणे, 'स्वामिया ! बुडतां जीवनीं । तूं त्राता मज होईं. ॥ १३४ ॥ तूं प्रतापाचा पूर्ण उदधी । सुखामृताचा अक्षय निधी । तुझिया बळाची अलोट वृद्धी । सुरां असुरां नागवे[12]. ॥ १३५ ॥ **रु**द्रांमाजी श्री**शं**कर । **व**सूंमाजी **पा**वक सौर[13] । **य**क्षगणांमाजी **कु**बेर । **म**रुतांमाजी **वा**सव. ॥ १३६ ॥ विप्रांमाजी **व**सिष्ठमुनी । तेजांमाजी **स**हस्रकिरणी । **पि**तरांमाजी धर्मज्ञखाणी । **ध**र्मराज जाण पां. ॥ १३७ ॥ **य**दुगणांमाजी **अं**बिष्ठघन । नक्षत्रांमाजी **नि**शारमण । सर्पांमाजी **स**हस्रवदन । सेने सेनानी **कुं**मारमणि[14].

---

१. पर्वत. २. पदरीं, आश्रयास. ३. रक्षणकर्ता. ४. सैन्य. ५. यमाचे भेटीस. दक्षिण दिशेचा स्वामी यम आहे. यज्ञपत्नीचें नांवही 'दक्षिणा'च आहे. ६. नि:संशय. ७. पूज्य, मान्य. ८. पवित्र आचरणानें. ९. येथें मूळांतील पंचमाध्याय समाप्त होतो. १०. हात जोडून, नम्रतेनें. ११. ठेविला. १२. सांपडत नाहीं, अंत लागत नाहीं. १३. श्रेष्ठ, उत्तम. १४. कार्तिकस्वामी. ओंव्या ३५–३७ ह्या कवीनें श्रीमद्भगवद्गीता–अध्याय १०, श्लोक २१–३८ यांच्या धर्तीवर रचिल्या आहेत. सेनानी=सेनाधिपति.

॥१३८॥ तयापरी वर्णवर्या[1]! । आमुतें मान्य प्रतापसूर्या! । सेनाधिकारी होउनी [2]बाह्या । वीरां सर्वां [3]अपंगीं. ॥ १३९ ॥ एकादश चमू तवाधीन । साह्य भूप विक्रमी क्रोधन[4] । जिंकी **पां**डवां प्रतापवान । निश्चय पूर्ण मी मानीं. ॥ १४० ॥ विराजमान [5]प्रभिन्न रथीं । देखतां तूतें कांपती रथी[6] । **पा**र्थ पुरुषार्थाची [7]गुंथी । युद्ध तूतें न करी पां. ॥ १४१ ॥ **ध**र्म धार्मिक धर्मवर्ती । सख्य करील न[8] लवतां पातीं । तव प्रताप **मा**र्तंडकांती । भूप केवीं साहती पां?' ॥ १४२ ॥ ऐकोनी राजयाचीं उत्तरें । **द्रो**णाआंगीं वीरश्रीवारें । भरूनी उसळे नदीधारे । मीन जेवीं त्यापरी. ॥ १४३ ॥ म्हणे, 'भूपा! सार्वभौमा! । मी न धरीं कोणाची तमा[9] । माझिया विक्रमाची गरिमा । सुराधीशा असाध्य. ॥ १४४ ॥ चतुर्वेद, पूर्ण षडंगें, । शास्त्रें, व्याकरण सर्वही सांगें । संपादिलीं अस्त्रप्रयोगें । जे का ठेवी **शि**वांची[10]. ॥ १४५ ॥ वीर मिनतां कोट्यानकोटी । भ्रष्टीन युद्धा न लगतां त्रुटी । माझिया घाता **पां**चाळ[11] कपटी । वर्धिला त्यातें न लेखीं[12]. ॥ १४६ ॥ धनुष्य असतां माझिये पाणीं । मी अजिंक्य सर्वां कदनीं । युद्धा पातले देव तिन्ही । विमुख त्यांतें करीन.' ॥ १४७ ॥ ऐकोनी **गु**रुवर्याची वाणी । हर्षें युक्त सर्व सैन्यश्रेणी । वाद्यें त्राहाटिलीं नानाध्वनी । सिंहनाद वीरांचे. ॥ १४८ ॥ ऐसें बोलतां **ऋ**षिराणा । आवेश न धरवे दुर्योधना । तात्काळ आणोनी हेमासना । **गु**रुवर्या बैसवी. ॥ १४९ ॥ रत्नाभिषेक करूनि मूर्ध्नीं । दिव्यांबर अर्पिलें भूषणीं । अनेक वाद्यांचिया ध्वनी । भेदूं पातल्या अंबरा[13]. ॥ १५० ॥ युद्धीं युक्त ऋषीश्वरीं । मंत्रयुक्त गिरागजरीं । गीत नृत्य विविधा परी । संपादिलें कर्मातें. ॥ १५१ ॥ संभावोनी[14] याचकवृंद । दक्षिणादानीं केले **ध**नद । हर्षयुक्त वदनारविंद । सैन्यश्रेणी उफाळे[15]. ॥ १५२ ॥ पूर्वीं देवसेनासेनापती । **कु**मार केला **वा**सवा[16] आर्तीं[18] । तैसा **गु**रुवर्य स्थापितां भक्ती । परमानंद समस्तां. ॥ १५३ ॥ पूर्वें विकासतां अंशुमाळी[17] । पद्मिनी प्रसन्न मुखकमळीं । तैसी सेना उल्हासमेळीं । वीरश्रीभरें फुंपाटे[19]. ॥ १५४ ॥ असो, प्रसंग तये समयीं । जाला अर्पिला श्रीगुरुपायीं । पुढील कथेची नवाई ।

---

१. चतुर्वर्णांत श्रेष्ठा! (ब्राह्मण.) २. बाहुबळानें. ३. सांभाळ. ४. रागीट, तापट. ५. श्रेष्ठ, मिरविसुव्यक्त, दिव्य. ६. योद्धे. ७. गुंथी=गुंफा, जाळें. पुरुषार्थाची गुंथी=पराक्रमाची प्रौढी मिरवि-
णारा. ८. [डोळ्यांचीं] पातीं न लवतां=एका क्षणांत. ९. पर्वा, फिकीर. १०. शिवापासून पर-
शुरामानें अस्त्रविद्या संपादन केली होती व द्रोणाचार्य हे परशुरामाचे शिष्य होते, या गोष्टीवर कटाक्ष आहे. (पांडवप्रताप ८।१९६–२०३.) ११. धृष्टद्युम्न. १२. पर्वा करीत नाहीं. १३. आकाशास. १४. संभावना करून, आदरसत्कार करून. १५. स्फुरण पावे. १६. इंद्राला संकट पडलें असतां, १७. सूर्य. १८. आवेशास चढे. १९. कौतुक, गोडी.

श्रोतयांतें समर्पूं. ॥ १५५॥ **भी**मराजगुरु मूळपीठ । कृपा नवरात्र, भाव घट । **न**रहर**मो**रेश्वरवाक्पुट । ध्यान विरूढे सज्जनीं. ॥ १५६ ॥

अध्याय दुसरा.

संजय म्हणे, 'नरेंद्रश्रेष्ठा ! । पुत्रोत्पत्ती अपर [2]स्त्रष्टा । **द्रो**ण स्थापितां सेनापटा । वीरश्रीभरें फुपाटे. ॥ १ ॥ पर्वतप्राय कांचनरथू । ध्वजा पताकीं सुशोभितू । गुणाढ्य [3]हय [4]बळसमर्थू । वायुवेगें तळपती. ॥ २ ॥ ऐसिये स्यंदनीं **द्रो**णाचार्य । शोभला जैसा उगवला सूर्य । [उपजवी सर्वत्र महाश्चर्य] । कोदंडपाणी तेजस्वी. ॥३॥ पाहोनी चमू हर्षवर्धन । निमोनी चिंता, वीर श्रीपूर्ण । देखोनी लोटली [5]नदीमान । जेवीं सागरीं [6]प्रावृटीं. ॥ ४ ॥ **सैं**धव, **क**लिंग, **अं**बिष्ठसेना । जाणो **कुं**भ**नि**कुंभ पातले रणा । सह **वि**कर्ण वीरराणा । दक्षिणपथीं थोकले. ॥ ५ ॥ सबळ बळ **सौ**बळशकुनी । [7]प्रहस्तप्राय लोटला कदनीं । **गां**धारराजे प्रतापखाणी । एकत्र पृष्ठीं मिनले. ॥ ६ ॥ **कृ**प, **कृ**तवर्मा, **चि**त्रसेन, । **वि**शंती, **दं**शती, **दु**ःशासन, । **दु**रासद, सेनाविक्रमी घन । [8]**अ**तिकायासारिखा. ॥ ७ ॥ कडकडाटी तेजःपुंज । येउनी नमोनी [9]**भा**रद्वाज । [10]आक्रमोनी वामभुज । उभे लोटले सेनेसी. ॥ ८ ॥ **द्रो**णाचार्यसन्निधानीं । **दु**र्योधन ऐश्वर्यखाणी । जाणों **द**शवक्र तेजकिरणी । **रा**घवसमरीं स्थिरावे. ॥ ९ ॥ **श**ल्य, **कां**बोज, **सु**दक्षिण, । **म**द्र, **त्रि**गर्त, **अं**बिष्ठ, जाण । प्रतीच्योदीच्य **मा**लव घन, । **शू**रसेन प्रतापी. ॥ १० ॥ **शि**वयो, **सौ**वीर, **कि**तव, । पश्चिम दाक्षिणात्य **मा**लव, । **य**वन, **कि**रात, [11]लघुलाघव । चतुरंग दळीं पातले. ॥ ११ ॥ नमोनियां राजेश्वरा । पुढां ठाकले रणगव्हरें[12] । **वै**[13]कर्तन तया अवसरा । **इं**द्रजितप्राय पातला. ॥ १२ ॥ विराजमान [14]हाटकरथू । ध्वजापताकीं सुशोभितू । जाणों उगवला [15]पद्मिणीकांतू । किरणसेना बळवृद्धी. ॥ १३ ॥ नमन करूनी ऐश्वर्यस्तंभा । अग्रता पुढें राहिला उभा । दृष्टी [16]न संटे प्रगल्भ आभा । वीरां सकळां आल्हाद. ॥ १४ ॥ म्हणती, '**पां**डवांचा

---

१. ह्या अध्यायांत कवीनें मूळांतील ६ वा अध्याय व सातव्या अध्यायाच्या पहिल्या नऊ श्लोकांतील कथाभाग वर्णिला आहे. २. प्रतिब्रह्मदेव. ३. घोडे. ४. बळानें टणके, सशक्त. ५. नदीप्रमाणें. ६. पर्जन्यकाळीं. ७. रावणाच्या प्रधानाप्रमाणें. ८. अतिकाय=रावणपुत्र. ह्याचें शरीर अतिस्थूळ होतें म्हणून त्यास हें नांव पडलें. ९. द्रोणाचार्य. १०. प्रदक्षिणा घालून. ११. फार कुशल, अत्यंत कसबी. १२. गव्हर=गुहा, प्रवेश करण्यास कठीण अशी जागा. १३. सूर्यपुत्र (कर्ण). विकर्तन=सूर्य. १४. सुवर्णरथ. १५. सूर्य. १६. न मावे.

केतुला केवा ? । युद्धीं पराभवूं देव **म**घवा' । वीरश्रीभरें तैं भूपअर्णवा । शौर्यलाटा उसळती. ॥ १५ ॥ **द्रो**णाचार्यें लक्षूनि सेना । परमानंद मानिला मना । 'शकटव्यूह' निर्मिला निपुणा । जो **कृ**तांता अजिंतू. ॥१६॥ वीररक्षणा वोपिले बळी । सेना आवर्त तीन [1]पौळी । दुंदुभी त्राहटोनी रणकल्लोळीं । गजरीं लोटले. ॥ १७ ॥ तयापरी **कौ**रवचमू । पाहोनी **पां**डवां शौर्यसंभ्रमू । भरतें भरुनियां राजा **ध**र्मू । आज्ञा करी सैनिकां. ॥ १८ ॥ '**द्रो**णाचार्य सेनापती । करुनी आले **कौ**रवशक्ती । प्रतिव्यूह रचोनियां निगुती । **गु**रुवर्या धडकिजे.' ॥ १९ ॥ **ध**र्ममुखींची ऐकोनी गोष्टी । वीरां उत्साह आनंद कोटी । [2]'क्रौंच-व्यूह' रचोनी उठाउठी । वीररक्षणा वोपिले. ॥ २० ॥ **नं**दीघोष विजयरथू । जाणों [3]अनळ मूर्तिमंतू । तेजें पताका हिणावितू । म्हणती 'सरा' रविकिरणा. ॥ २१ ॥ रुक्मघंटिका, किंकिणीघोळ, । जडावरत्न, फांकती कीळ, । जाणों पीत व्योमीं नक्षत्रमाळ । मंडळाकार तळपती. ॥ २२ ॥ **मे**रुशृंगप्रदीप्तकांती । तैसी ध्वजीं विराजे दीप्ती । सर्व बळाचें ऐश्वर्यगुंथी । ध्वजीं **मा**रुती विराजे. ॥ २३ ॥ च्याऱ्ही वारू **कै**[4]लासवर्णी । ना ते जन्मला क्षीराब्धि-[5]फेणी । कीं ते विजा एकवटोनी । गाळोनी पाणी निर्मिलें. ॥ २४ ॥ ना ते चंद्र सोलींव गाभा । हय निर्मिले प्रगल्भ आभा । बलाढ्य, गुणी, अतर्क्य शोभा । वेग वातासारिखे. ॥ २५ ॥ [6]धुरे सारथी **त्रै**लोक्यनाथू । ज्याच्या मायेचा न कळे अंतू । [7]षडैश्वर्यगुणभरितू । श्री**मु**कुंद **ज**गदात्मा. ॥ २६ ॥ सर्व जयाची [8]हातवटी । हात जोडुनी उभे निकटीं । **र**माधीश कल्याणसृष्टी । ध्यानीं **धू**र्जटी निमग्न. ॥ २७ ॥ [9]अश्वरश्मी करांबुजीं । चुचुकारीत मुखें वाजी । **पा**र्थभाग्य त्रिजगामाजी । वर्णनीं **शा**रदा [10]मोनांवे. ॥ २८ ॥ ऐसिया रथीं **वि**जय **पा**र्थू । शोभला जैसा [11]**श**चीकांतू । तो कुंडीं प्रदीप्तमंतू । [12]बृहे-द्भानु ज्यापरी. ॥ २९ ॥ प्रेरुनी स्यंदन रणांगणीं । पुढें उभा राहिला [13]मूर्ध्नी । वेष्टित भूप प्रतापकिरणीं । सूर्यापरी शोभले. ॥ ३० ॥ मध्यभागीं विजयी **ध**र्मू । भोंवते विक्रम महाचमू । वीरश्रीभरें **कृ**तांतकामू । भयें चकित होतसे. ॥ ३१ ॥ [14]अपर**का**ळ **भी**मसेन । हाटकरथीं विराजमान । गुर्वी गदा प्रभिन्न घन । **ध**र्मापुढें विराजे. ॥ ३२ ॥ **मा**द्रीतनय जावळेबंधू । शौर्यप्रतापें जैसे

१. भित, तट. २. शकटव्यूहावर मारक असा दुसरा व्यूह. ३. अग्नि. ४. पांढरे. ५. शेष. हा 'पयःफेनधवल' आहे. (मोरोपंतकृत हरिवंश १६।२६). ६. रथाच्या अग्रभागीं. धुर्=धुरा, जूं. ७. ऐश्वर्य, ज्ञान, वैराग्य, धर्म, यश व श्री या सहा गुणांनीं युक्त. ८. हातोटी, खुबी, युक्ति. ९. घोड्याची लगाम. १०. मौन धारण करिते, मुकी होते. ११. इंद्र. १२. अग्नि. १३. आघाडीस, बिनीला. १४. प्रतिकाळ, दुसरा यमच.

सिंधू । [**द्रौ**पदीकुक्षिज अनिंदू] । सिंह[1]शावक पांचही. ॥ ३३ ॥ **अ**भिमन्यु वीर प्रतापशूर । ज्याचिया विक्रमा कुंठित सुर । समरांगणीं **काळ** असुर । निसुरे[2]पणें माघारे. ॥ ३४ ॥ तैसाची **सा**त्यकी **धृ**ष्टद्युम्न । अमितविक्रमी महाघन । वेष्टूनियां **कु**रुनंदन । माघां पुढां तळपती. ॥ ३५ ॥ उभयदळीं वीरश्रीलोट्ट । लोटले शौर्यें भूधर लाट्ट । दृष्टी न थरे पाहतां थोट्ट । झांकती नेत्र गपगपां. ॥ ३६ ॥ पर्वत पर्वता लोटले । कीं समुद्रा समुद्र थडकले । ना तें **ब्र**ह्मास्त्र कडाडिलें । **मा**हेश्वरी अस्त्रातें. ॥ ३७ ॥ तैसियापरी उभयसेना । थडकोनी विर मिनले कदना । अनेक वाद्य सिंहगर्जना । बधिरत्व **का**ळा आथिलें[3]. ॥ ३८ ॥ वीरवीरांची संघट्टणी । धुळी व्यापिला वासरमणी । शस्त्रें खणखणाट ऊर्ध्वपाणी । स्फुलिंगें[4] रणीं दाटले. ॥ ३९ ॥ उसळोनी पुढां **धृ**ष्टद्युम्न । तीव्र शरांचा वर्षला घन । चमू त्रासिली व्याघ्रमान । गाव गोठणीं ज्यापरी. ॥ ४० ॥ दुःसह मानोनियां मनीं । **द्रो**ण धडकला जैसा वन्ही । रथ लोटूनियां रणीं । बाणजाळीं वर्षला. ॥ ४१ ॥ देखोनी **पा**र्थ लोटला पुढां । न साहोनी, वाहोनी मेढां[5] । रथ लोटला धडधडा । हस्तिकक्षा ध्वजाग्रीं. ॥ ४२ ॥ उभयशरीं भरलें गगन । रवि धूम्रीं आंखडी किरण । गजाश्व, रथी, पदाति, घन । शवें अपार पाडिलीं. ॥ ४३ ॥ लोहितें[6] दिशा रुधिरस्राव । शोभती जाहली भूमी सर्व । शिवा[7] अशुभ सूचिती रव[8] । क्षयकारक सर्वांतें. ॥ ४४ ॥ काक गीध अपसव्य फेर । क्रंद[9]मान वायस, सूकर । उल्कापात धरणीं घोर । भूत पिशाच नाचती. ॥ ४५ ॥ अशुभभय न मनोनी मनीं । वीर भिडले रणांगणीं । **द्रो**ण क्षोभला **व**ज्रपाणी । जेवीं समरीं दैत्यातें. ॥ ४६ ॥ **पां**चाळ, **पां**डव, **सृं**जय, । कंपवातें भरलें भय । जैसा मृगेंद्र धडकतां शौर्य । मृगा पळणी ज्यापरी. ॥ ४७ ॥ गरगराट मंडळाकृती । चाप फिरे प्रभिन्नकांती । जाणों अलात[10]चक्र भोंवे गती । **का**ळचक्रासारिखी. ॥ ४८ ॥ वारू, नाग, रथी, पदाती, । भूमी पाडिल्या शवांच्या पंक्ती । दुःसह मानोनी **ध**र्मं चित्तीं । सेनेसह लोटला. ॥ ४९ ॥ जैसा सक्रोध **अ**गस्तीमुनी । ग्रासूं धांवला समुद्रपाणी । कीं मेघ-

---

१. सिंहाचे बच्चे. २. श्रांत होऊन. ३. प्राप्त झालें. ४. विस्तवाच्या ठिणग्या. ५. धनुष्याची दोरी ओढून. 'मेढा' शब्द गोपाळ कवी वारंवार वापरितो. उदा०—साठी सायकांचा वेढा । पार्थता घालोनियां, मेढा । स्वशरें छेदोनियां पुढां । हस्तचाप पाडिलें ॥ कर्णपर्व १०।२२. धृष्टद्युम्न येतां पुढां । कर्णें वाहिला शीघ्र मेढा । जैसा जलौघातें गाढा । पर्वत धांवोनी रोधितू ॥ कर्णपर्व ११।३७. ६. लाल. ७. भालू. ८. शब्द, ओरडणें. ९. ओरडणारे. १०. कोलीत गरगर फिरविलें असतां जें चक्र दिसतें तें. (अध्याय ७५ पहा.)

माळा गडगडाट गगनीं । वायो भ्रष्टी सुसाटें. ॥ ५० ॥ तयापरी **युधिष्ठिर** । चमूसह **वृ**कोदर । महाप्रतापी **पा**र्थवीर । **मा**द्रीसुत दळेंसीं. ॥ ५१ ॥ **द्रौ**पदीसुत बंधुपंचक । **भैमी**[1], **सौ**भद्र वीरनायक, । **मच्छपां**चाळ**कै**कयादिक । वीर अमित लोटले. ॥ ५२ ॥ वर्षोनियां बाणधाडी । बुजोनी काढिला **द्रो**ण प्रौढी । जैसी सुरासुरांची पडे उडी । दैत्याधिप **ब**ळीतें. ॥ ५३ ॥ सर्वांग रक्तें भरलें पूर्ण । जाणो किंशुक[2] फुलला सुमन । कोपें प्रज्वळिला हुताशन । चाप रोषें वोढिलें. ॥ ५४ ॥ काळविखारी तीक्ष्ण शर । कोटीच्या कोटी सोडिले क्रूर । कीं ते उदेले दर्वीकर[3] । नाशावया सेनेतें. ॥ ५५ ॥ बाणामागें बाणवृष्टी । अस्त्रप्रयोग तयानिकटी । सेना मर्दिली महाहटी । गज, अश्व, रथी निघातें. ॥ ५६ ॥ स्थविर[4] **द्रो**ण जाहला तरुण । जाणों वसंतीं बालार्ककिरण । सेनाश्व चपळ फिरती त्राण । मंद म्हणती वारिया. ॥ ५७ ॥ विचित्र मंडळ फिरे रथू । बाणीं दिशा रोधिले पंथू । रुचिर शिरें मुगुटयुक्तू । तारामानें रिचवती. ॥ ५८ ॥ भूषित भुजा मंडित शस्त्रीं । खचोनी अपार पडिले धरत्री । खंडविखंड वीरगात्रीं । अहीपरी क्रंदती. ॥ ५९ ॥ दुःखमान सकळ चमू । देखोनी घाबिरा राजा **धर्मू** । वीरश्रीभारें त्यागोनी चमू । **द्रो**णाप्रती तगटला. ॥ ६० ॥ पाठी वीर उसळे शौर्यें । क्रोधें प्रदीप्त **पा**र्थसूर्य । **पा**र्षतवीर[5] अग्रतावर्य । **पां**चाळ**म**त्स्य**भी**मादि. ॥ ६१ ॥ **अं**तकदूत न सरती परा । तैसें **द्रो**णा वेढिलें निकरीं[6] । रौद्ररण जालें **वा**तकुमरा । आणि **अ**खया ज्यापरी. ॥ ६२ ॥ दैव उणीव तुझें भूपती । **द्रो**ण ब्रह्मांड जाळी शक्ती । **पा**र्षतपतंग शौर्य आर्ती । ग्रासिता जाहला, नरेंद्रा ! ॥ ६३ ॥ पांच दिवस तव वाहिनी । रक्षी सुरां **कुं**लिशपाणी[7] । तैसा **दु**र्योधन परिपाळोनी । सहस्ररथी मारिले. ॥ ६४ ॥ नांवाजिक[8] वीर ठळक । मर्दिले, जे का सुरां अटक । शौर्य विक्रम प्रतापार्क । **पां**चाळकूपीं बुडाला. ॥ ६५ ॥ सेनाअक्षौहिणीचे संगें[9] । नासोनी नृपा केला भंग । **द्रो**णशौर्याचें **मे**रुशृंग । **पा**र्षतकुक्कुटें खंडिलें.' ॥ ६६ ॥ ऐकोनी साशंक **अं**बिकासुत[10] । कल्पांत भाविता जाहला सत्य । म्हणे, '**सं**जया ! अघटित मात । सांगसी **द्रो**ण मर्दिला. ॥ ६७ ॥ हेंची आश्चर्य माझिये मनीं । शलभें[11] ग्रासिला देव तरणी[12] । कीं वडवाग्नी दावाग्नि-

---

१. भीमपुत्र (घटोत्कच). २. पळस. ३. सर्प, नाग. ४. वृद्ध. (अध्याय ८ श्लोक ९ पहा.) ५. धृष्टद्युम्न. ६. निकरानें, आवेशानें. ७. इंद्र. ८. नांवाजलेले, नामांकित. ९. संग=संघ, समुदाय. १०. धृतराष्ट्र. ११. पतंगानें. १२. सूर्य.

वदनीं । बिंबुड[1] जाहला स्पर्शतां. ॥ ६८ ॥ कुक्कुटें शोकिला[2] सागरू । कीं मेषथडके खचला **मे**रू । ना तो **फ**णींद्र विषाचा तरू । मुंगीमुखीं हरपला. ॥ ६९ ॥ तैसी जाहली **सं**जया पैरी[3] । **द्रो**ण प्रतापाचा महागिरी । ज्याची युद्धाची कुंसरी[4] । दिवौकसां[5] अचोज. ॥ ७० ॥ ज्यान्ही वेदपारंगत । दशग्रंथ मुखोद्गत । षडंग संहिता शास्त्रसंमत । संपन्न विद्या सर्वही. ॥ ७१ ॥ तपें समान **गा**धिनंदन । क्षमे **व**सिष्ठ दुजा जाण । शमदमनेमें **अ**त्रिमान । इंद्रियजित तुष्टात्मा. ॥ ७२ ॥ धनुर्विद्या अस्त्रप्रयोग । जाणों भूतळीं **र**मारंग । सर्व वाहिनी[6] आरूढ सांग । सर्वास्त्रभेदीं कूंसता[7]. ॥ ७३ ॥ जितक्रमा सहित आशा । ज्ञानी पंडित सदा तोषा । समरांगणीं अजयदशा । नाहीं स्वप्नीं पाहिली. ॥ ७४ ॥ सर्वलक्षणी गुणवर्धन । प्रतापतेजें **श**चीरमण । सेनाश्वरथीं विभ्राजमान । वेगवाणी तीव्रता. ॥ ७५ ॥ प्रभिन्न धनु असतां पाणी । कैसा वश जाहला कदनीं ? । काळविखारी[8] भूपश्रेणी । कोठें हरपली जाण पां ? ॥७६॥ संग्राम सागरींचा महापूर । **द्रो**णनौका कवळोनी थोर । **दु**र्योधनभूपतिभार । पैलपारा लोटला. ॥७७॥ दैव हीन आमुचें देखा । **मत्स्यपां**चाळें भ्रष्टली नौका । संततिवृद्धीची पताका । शोकसमुद्रीं बुडाली. ॥ ७८ ॥ वांचविता पदार्थ दुर्योधना । आतां नाहीं, बाळका ! प्रवीणा ! । खेदभरतें **कु**रुनंदना । दाटोनी, पडे धरेतें. ॥७९॥ धूळ लिंपिली सर्व गात्रीं । गळत्या लागल्या उभय नेत्रीं । श्यामता अंतली वक्रीं । निस्विंन्न जाहला सर्वांग. ॥८० ॥ 'अहा !' कार तये संधी । अमित मिळाली लोकमांदी[10] । राजगृहीं शोकवृद्धी । व्योम जाहलें अपुरतें. ॥ ८१ ॥ हृदय पिटोनी राजपत्नी । भावी जंगडोल[11] जाहला अवनीं । राजसंपदा शोकजीवनीं । बुडाली मानी मानसें. ॥ ८२ ॥ वृद्ध साधू चतुर गुणी । सांवरूनि भूप धरिला पाणी[12] । नेत्रीं स्पर्शोनी गुलाबपाणी । अंचळानिळा[13] वारिती[13]. ॥ ८३ ॥ सावध होऊनी राजेश्वर । श्वास घाली महाथोर । जैसा खंडित दर्वीकर[14] । उल्का वमी विषाच्या. ॥ ८४ ॥ **वै**शंपायन म्हणे, 'नराधीशा ! । समयीं जाहली ऐसी दशा' । विगत मानसें पुत्रआशा । खंडूनी, बोले **न**रेंद्र. ॥ ८५ ॥ म्हणे, "**सं**जया ! वीरवेळसा[15] । वारुनी **पां**चाळ शिरकला कैसा ? । भूपपुरुषार्थ कोळसा । **पां**डवीं केला मज वाटे. ॥ ८६ ॥ **भी**मार्जुनाचा दुःसह कोप । पाहोनी

---

१. लहान रोपडें. २. शोषिला. ३. प्रकार. ४. कौशल्य. ५. देवांस. ६. सैन्य. ७. युक्ति, तयारी. ८. काळसर्पाप्रमाणें विषारी (अत्यंत प्रतापी). ९. घामाघूम. १०. लोकांचा समुदाय. ११. भूकंप. १२. हातांनीं. १३. पदरानें वारा घालावयास लागले. १४. सर्प. १५. वीरांचें कोंडाळें, योद्धयांचा गराडा.

कृतांत पावे ताप । माद्रीनंदन नराधिप । शौर्यें सौभद्र आगळा. ॥ ८७ ॥ द्रौपदीतनय पांचजण । सात्यकी विक्रमी प्रतापवान । महावीर विक्रमी घन । मत्स्य, पांचाळ, कैकय. ॥ ८८ ॥ घटोत्कच राक्षसेंद्र । बळप्रवीण वीरभद्र । मागधसृंजयादि नरेंद्र । अमित वीर प्रतापी. ॥ ८९ ॥ हेंही असो केतुली प्राप्ती ? भीमार्जुन दुःसह शक्ती । ज्यांचे बळाची अतर्क्य शक्ती । चोज मानिती सुर पैं. ॥९०॥ वीर विक्रमी समरांगणीं । कोण कैसे भिडले कदनीं ? । निबिड मिठी वीरश्रेणी । कोण्हें कोण्हा वारिलें ? ॥ ९१ ॥ तैसे आमुचे दळीं । वीर प्रख्यात आतुर्बळी[1] । कर्ण, वृषसेन दुजे तळीं[2] । शुंभनिशुंभ जाण पां. ॥ ९२ ॥ कृप, कृतवर्मा, सोमदत्ती, । भगदत्तराज, अमोघशक्ती । ज्याच्या गजाची[3] प्रबळशक्ती । भीम मानी दरारा. ॥ ९३ ॥ फाल्गुनसमान अश्वत्थामा । सर्व विद्येची पावला सीमा । बाळक भूरिश्रव्याच्या संग्रामा । त्रास भूप मानिती. ॥ ९४ ॥ संशप्तक[4] पांच बंधू । समरीं सुर पावती खेदू । राक्षस अलंबु प्रसिद्धू । मायामय अतर्क्य. ॥ ९५ ॥ त्रिगर्त, सैंधव जयद्रथ, । विंदानुविंद, अवंतीनाथ, । मम तनय नागायुत[5] । दुर्योधन बळियाढा. ॥ ९६ ॥ यांहीवेगळी विक्रमी सेना । राजे बळिष्ठ नव्हे गणना । द्रोण प्रतापाचा राणा । विद्यागुरु क्षत्रियां. ॥ ९७ ॥ महावीर संग्रामजेठी । काळही [6]देवोनी निघे पाठी[6] । तयातें लावोनी बारा वाटी । सांगसी द्रोणा मर्दिलें.॥९८॥ या कारणें संजया ! गुणी ! । दैव बळिष्ठ सर्वांगुणीं[7] । वृथा यत्नकडसणी[8] । अदृष्ट[9] श्रेष्ठ विश्वातें. ॥ ९९ ॥ आग्रही थोर दुर्योधन । बळें क्षत्रियां आणिलें मरण । श्रीकृष्णमायाविंदाण[10] । ब्रह्मादिकां नेणवे. ॥ १०० ॥ लीलाविग्रही पूर्णावतारी । परब्रह्म आनंदलहरी । षडैश्वर्य भगवान् हरी । शौरी, मुरारी, मुकुंद. ॥ १०१ ॥ धराभार उतरावया । प्रगटलासे देवकार्या । मानवी रूपाची धरूनी छाया[11] । वृष्णिकुळीं विराजे. ॥ १०२ ॥ बाळपणीं अगम्य लीळा । अमित वैरी वोपिले काळा । पूतना विषारी, विषांचा[12] गोळी[12] । शोषूनि, केली

---

१. अति बलाढ्य. २. भूतळीं, पृथ्वीवर. ३. भगदत्त गजयुद्ध करण्यांत मोठा पटाईत असून, त्याच्याजवळ शिकविलेले हत्तीही पुष्कळ असत. ४. मागें पृ. ५ टीप २० पहा. ५. दहा हजार हत्तींसारखा बलिष्ठ. ६. पाठ दाखवून, रणांतून पराङ्मुख होऊन. 'पाठ देणें' हा शब्दसमूह पंतांनीं वारंवार योजिलेला आहे. 'ऐसें म्हणतचि, देउनि पाठ कृतघ्नासि, विधि पळाला, हो !' ॥ १।६ विनायकमाहात्म्य. ७. सर्व प्रकारें. ८. यत्नाची धडपड. ९. दैव. १०. हरीच्या मायेची लीला. ११. शोभा किंवा देखावा. १२. पूतनेनें आपल्या स्तनांत विष भरिलें होतें; तेव्हां तिच्या स्तनाला उद्देशून 'विषाचा गोळा' हे शब्द कवीनें योजिले आहेत.

निर्जीव. ॥ १०३ ॥ अघ, बक, काग, वत्सासुर, । मर्दिला मल्ल बळिष्ठ असुर । कुवलय हस्ती पाडिला निसुर । पुन्हा नुठे यावया. ॥ १०४ ॥ विमलार्जुना दीधली मुक्ती । वणवा ग्रासिला प्रभिन्न शक्ती । काळ काळिया विगत गती । रमणीक द्वीपा धाडिलें. ॥ १०५ ॥ कंसराज भोजपती । केशीं धरूनि मारिला क्षिती । शिशुपाळाची केली शांती । राजसूययज्ञीं अशस्त्रीं[1]. ॥ १०६ ॥ सौभदैत्य मायाकारी । रची नगरें वायोधारी । निर्मूळ केला नवलपरी । जो असाध्य देवांतें. ॥ १०७ ॥ हंस, डिंबक आपेंआप । मर्दोनी वारिला जगाचा ताप । जरासंधप्रतापदीप । भीमहस्तें मालविला. ॥ १०८ ॥ कासीक, कौशल्य, अंग, वंग, । मागध, पौंड्रिक, कालिंग, । नामें सांगतां मानस व्यंग[2] । अमित क्षत्रिय मर्दिले. ॥ १०९ ॥ तेवीस अक्षौहिणी सेना । मागधआश्रित आणिली रणा । शाल्ववीर प्रतापराणा । सहसेना मारिला. ॥ ११० ॥ भौमासुर सुरनायक । सेनेसह मर्दिला देख । कन्या पर्णिल्या सोळासहस्रक । लावण्यगुणीं आगळ्या. ॥ १११ ॥ खांडव वोपोनी तोषला वन्ही । चक्र[3] लाधला विश्वदळणी । स्वर्गभूषण सुरतरू[4] गुणी । श्रेष्ठ इंद्रापासाव आणिला. ॥ ११२ ॥ पाताळवासी पांचजन्यू । असुरप्रतापी तेजभानू । मर्दोनी, आणिला पांचजन्यू । शंखवर्य तिहीं लोकीं. ॥ ११३ ॥ सुरां असाध्य साधिलीं कर्मैं, । करूनी अकर्ता, न पवे श्रम, । नरनारायण द्विधा नाम । एक रूप जाण पां. ॥ ११४ ॥ तोची हा पार्थाचा सारथी । दैवें जोडला अनन्य भक्ती । सर्व ऐश्वर्य विजयशक्ती । ज्याचे पदीं विराजे. ॥ ११५ ॥ नरावतार विजयी पार्थू । सदा फळीं इच्छिला अर्थू । समरांगणीं अपर्णाकांतू[5] । जेणें बाहीं[6] तोषविला. ॥ ११६ ॥ निवातकवच, जंबुदैत्य, । कालकेय, पौलोम दानवनाथ । वासवा धाक असाध्य कृत्य । पार्थें हेळें[7] मर्दिला. ॥ ११७ ॥ कृष्ण फाल्गुनाचा प्राण । हरीआत्मा श्वेतवाहन । जैसा वत्स धेनु अनन्य[8] । धेनु वत्स ज्यापरी. ॥ ११८ ॥ पुष्प[9], परिमळ नव्हे भिन्न । शर्करा, गोडी

१. शस्त्ररहित असूनही. २. कोतें किंवा व्याकुळ. ३. खांडववनदहनसमयीं अग्नीनें प्रसन्न होऊन कृष्णास वज्रनाभ नामक चक्र व कौमोदकी नामक गदा दिली—अशी कथा आहे. [मुक्तेश्वर-आदिपर्व अध्याय ४९ पहा.] ४. पारिजातक. ५. शंकर. ६. बाहूंनीं, बाहुबळानें, मल्लयुद्धानें. ७. लीलेनें. ८. एकच, भेदभावरहित. ९. वर्णनसादृश्यः—कीं दीप प्रकाश दोघेजण । नामें वेगळीं, परी एकत्र जाण । तेवीं एकनाथ आणि जनार्दन । नव्हती भिन्न सर्वथा. ॥ १८३. कीं कपूर सुगंध एक पाहीं । कीं द्रवत्वनीरासी द्वैत नाहीं । ना तरी पुष्प मकरंद एके ठायीं । निज प्रीतीनें नांदती. ॥ १८४. भक्तिविजय अ० ४६. तशाच भक्तिविजयांतील ४५ व्या अध्यायांतील १२५-१२८ या ओंव्याही ताडून पाहण्यासारख्या आहेत.

कैचीं दोन? । हेम, कांती द्विधाभान । रत्न, कीळ वेगळी? ॥ ११९ ॥ तयापरी ऐक्यता पाहीं । भारातीत करावया मही । प्रगटले, जैसा मारदाही । अंत करी त्रिपुरातें. ॥ १२० ॥ धर्म धार्मिक धर्मराजू । धर्मी निरत धर्मात्मजू । अधर्मघातें तेजःपुंजू । सदाचारी तपस्वी. ॥ १२१ ॥ तो जरी क्षोभल्या बाळका! । रक्षा करील धरणी देखा । स्वप्रभक्रोधाग्नी स्फुरितां शिखा । भीष्मद्रोण वृद्ध दग्धले. ॥ १२२ ॥ ये-हवीं प्रतापअर्का । कोण जिंकी समरीं देखा । सुरां असाध्य, मानवलोकां । गणी कोण? बाळका! ॥ १२३ ॥ हीनबुद्धी मम नंदन । बळें त्यांहीं वांच्छिलें कदन । सकळ वीरांसी आणिलें मरण । संतती माझी बुडाली. ॥ १२४ ॥ असो. आजन्म शोकचिंता । भाळीं लिहुनी गेला धाता । द्रोण प्रतापाचा सविता । तळा कैसा आणिला? ॥ १२५ ॥ हें सविस्तर वर्तमान । अवंचकभावें करीं कथन । जें ऐकतां तृप्तती श्रवण । देखिलें वाटे नेत्रातें. ॥ १२६ ॥ द्रोणजीविता घालितां उडी । कोणें कैसी वारिली धाडी? । उभयवीरांची मिठी गाढी । क्षयाची वाढी अतर्क्य. ॥ १२७ ॥ आदिअंत युद्धलाघव । तूतें बाळका! विदित सर्व । वक्तयांमाजी तुझी ठेव । नाहीं चतुरा! दुसरी.' ॥ १२८ ॥ ऐसीं रायाचीं प्रश्नोत्तरें । पुढां ऐकिजे प्रीति चतुरें । विनवी नरहर मोरेश्वर । सादर श्रोतीं ऐकिजे. ॥ १२९ ॥

अध्याय तिसरा.

संजय म्हणे, "राजाधिराजा! । भारतकुळवंशध्वजा! । पुसिलिया प्रश्ना चित्तें ज्या । सादर श्रोतीं ऐकिजे. ॥ १ ॥ तव नंदनें द्रोणाचार्या । सेनाभिषेक केला, राया! । थोर उत्साह तया समया । अनर्घ्य वस्तु अर्पिल्या. ॥ २ ॥ भावें जोडूनियां कृतांजळी । मस्तक न्यासिला पदकमळीं । [वदे विनयें, 'गुरुजी! बळी!] । मी किंकरू आज्ञेचा. ॥ ३ ॥ संग्रामसागरीं मथितां बुद्धीं । भीष्मअजयविष पातलें संधी । तया हरणा कृपानिधी । तूं शंकर आमुतें. ॥४॥ सोसोनी उल्बण उठाउठी । यशःश्रीरत्नें वोपी मुगुटीं । तुझिया विक्रमा आड-

---

१. मदनदहन कर्ता (शंकर). २. यमाचा मुलगा. ३. राख. ४. ज्वाळा. ५. प्रतापसूर्यास. ६. कापट्यरहित वृत्तीनें, सचोटीनें, कांहीं चोरून न ठेवितां. ७. मूळापासून अखेरपर्यंत, अथपासून इतिपर्यंत. येथें मूळांतील अकरावा अध्याय संपतो. ८. तऱ्हा, ठेवण, पद्धति. ९. अमूल्य, अमोलिक. १०. बुद्धया केलेल्या संग्रामरूपी सागराच्या मंथनानें भीष्मपराभवरूपी विष उत्पन्न झालें असतां, तें त्वां दयानिधीनें प्यावें; कारण तूं आम्हांला शंकरच आहेस—हा ओंवीचा भावार्थ. ११. संकट, विपत्ति.

काठी । करूं धूर्जटी शंके पां. ॥ ५ ॥ सुरां अशनिपाणी[1] । जळचरांतें समुद्र-
गुणी । भूतां सकळां चक्रपाणी । वनस्पतीतें चंद्रमा; ॥ ६ ॥ कर्मासी आश्रय
वेद एक । दृष्टीतें तेज प्रदीप्त अर्क । सर्वसंपत्ती त्रिपुरांतक । तेवीं तूं आम्हां
जाण पां.' ॥ ७ ॥ राजमुखींची ऐकोनी गोष्टी । हर्षानंदें भरली सृष्टी । प्रस-
न्नता मुखसंपुटीं । सुधारवें अनुवादे. ॥ ८ ॥ म्हणे, 'राजया! इच्छित अर्थू[2] ।
सांगसी ते पुरवीन आर्तू[3] । देवां अटक[3] मनोरथू । पूर्ण करीन सांग पां.'
॥ ९ ॥ हर्ष पावोनी दुर्योधन । भाळीं स्पर्शिले उभय चरण । म्हणे, 'स्वामिया!
प्रतापवान । धरूनी धर्म मज देईं. ॥ १० ॥ विघंड[4] न होतां रणीं कांया[4] ।
प्रतापें जिणोनी देईं बाह्या[5].' । द्रोण[6] भावी, सदयता राया । वीरक्षयाची पातली[6].
॥ ११ ॥ मनीं बरवी धरिली बुद्धी । सख्य करूं पावे ते संधी । गुरु म्हणे,
'ऐश्वर्यनिधी! । कांरण[7] मातें निवेदीं.' ॥ १२ ॥ राजा वदे प्रसन्न चित्तें । 'पुन-
रपि द्यूत खेळोनी त्यांतें । वना धाडूनियां निरुतें[8] । अकंटक राज्य अनुभवूं.'
॥ १३ ॥ द्रोणें ऐकोनी त्याची वाणी । महा अकल्याण मानिलें मनीं । 'सुधा
पाजितां उंबगोनी । इच्छा इच्छी कांजीतें. ॥ १४ ॥ विनाशकाळ पावतां बळें ।
देखतां निधान[9] झांकिती डोळे । फणी भावोनी कांचनमाळे । त्यागोनी रज्जु[10]
अपंगी. ॥ १५ ॥ चौदंतें[11] लांभला[11] मागे[12] खर । धनदासनीं उठे[13] शिरें[13] । उत-
रूनी वांछी पाथर[14] । तेवीं दुर्योधन अभागी.' ॥ १६ ॥ ऐसें भावोनी द्रोणा-
चार्य । म्हणे, 'मागीतलें काय? । भुवनत्रयींचें सर्व राज्य । मागतां देतों सा-
मर्थ्यें. ॥ १७ ॥ हें तंव अघटित, न घडे मही । सूर्य अस्तू पावे पूर्व केहीं[15]? ।
गंगावोघ सागरडोहीं । मुरडुनी मूळा आक्रमी? ॥ १८ ॥ हिमालयाअंगीं
तापज्वर । अग्निसी बाधी शीत खांर[16] । मोडसी[17] सागरा न मिळे नीर । हें अ-
घटित, नरेंद्रा! ॥ १९ ॥ ऐसी हे घडे कवणे काळीं? । एकत्र धर्म, कि-
रिटी, वनमाळी, । असतां असाध्य चंद्रमौळी । इतरां पाड कायसा? ॥ २० ॥
फणी मिनतां कोट्यानकोटी । सुपर्णा[18] घालों सकती मिठी । कीं मत्त गजाची

---

१. इंद्र. २.आवड, कामना. ३.प्राप्त होण्यास कठिण असा, अलभ्य. ४.शरीरास कांहीं अपाय न होतां. ५. बाहुबळानें. ६. राया [दुर्योधनाला] वीरक्षयाची सदयता पातली [असें] द्रोण भावी (=मानी, समजला)=दुर्योधनाला रणांत होणाऱ्या वीरनाशासंबंधानें दया उत्पन्न झाली, असें द्रोणास वाटलें. ७. धर्मास धरून आणण्याचें कारण. ८. त्रासून, कंटाळून. ९. द्रव्याचा ठेवा. १०. दोरी. ११. ज्याला ऐरावत मिळाला आहे असा. ऐरावतादि दिग्गजांना चार चार सुळे आहेत, असें समजतात. १२. मागतो. १३. शिर उठणें=कपाळ उठणें, त्रास येणें. १४. पथ्थर, धोंडा. १५. केव्हां. १६. दंव. १७. मोडशी (अजीर्णामुळें होणारा विकार) झाली असतां समुद्रास प्यावयास पाणी मिळणार नाहीं, हें अघटित होय. १८. गरुडास.

पाहोनी दृष्टी । केसरी मानी दरारा? ॥ २१ ॥ विपरीत हेंही घडे राया
पार्थजिंकणीं आशा वायां । शब्द गुंतला तुझिया कार्या । नसतां जिष्णु, सिद्धत
॥ २२ ॥ वीरमंडळीं विक्रमी घन । वेगळा फोडिजे श्वेतवाहन । धरून देई
कुरुनंदन । निश्चयेंसीं नरेंद्रा!' ॥ २३ ॥ गुरुमुखींची ऐकतां गोष्टी । दुर्योधन
आल्हादकोटी । सेना सज्ज कडकडाटी । संग्रामातें लोटले. ॥ २४ ॥ द्रोण
भिषेकसर्वचरित । दूतीं धर्मासीं केलें श्रुत । साशंक अंतरीं बांधवातें । बो
लता जाहला; नरेंद्रा! ॥ २५ ॥ म्हणे, '[1]भारद्वाज सेनापती । जाहला, भारी
अवघड चित्तीं । त्यांचिया विक्रमा स्थिति[2] क्षिती । सर्वास्त्रभेदी जाणपां. ॥ २६ ॥
भार्गवविद्येची मांदुस[3] । उघडतां, प्राप्त सर्व त्रास; । कैसा करील रमाधीश? । हे
सर्वथा नेणवे'. ॥ २७ ॥ अर्जुन म्हणे, 'गुणसंपन्ना! । कासया खेद करिसी
मना? । शैलें[4] उफाळतां रणकंदना । कुलिश[5] मानी भयातें? ॥ २८ ॥ नवरत-
कळा प्रदीप्त कांती । आहाळोनी[6] सूर्य पडे क्षिती? । वडवानळ दुःसहशक्ती ।
समुद्र होय कोरडा? ॥ २९ ॥ प्रचंड वातें वाडेंकोडें । उन्मळोनी मेरु धरे
पडे । हलाहल विष प्राशितां गाढें । शंका शंकर पाविजे? ॥ ३० ॥ तैसिया-
परी महाराया! । किमर्थ चिंता करिसी वांया; । मत्पुरुषार्थ, विक्रमी बाह्या[7] । जा-
णोनी नेणें[8] कां होसी? ॥ ३१ ॥ हेंही असो; त्रिभुवनप्रभू । विजयश्रीचा सो-
लींव स्तंभू । विराटतरूचा कोमळ कोंभू । मायारंभ जेथूनी; ॥ ३२ ॥
आनंदाचें आनंदवन । विक्रमाचें ठेवणें पूर्ण । ऐश्वर्याचें शोभायतन ।
जनार्दन विश्वात्मा; ॥ ३३ ॥ स्वयंभु, शंभु, आराध्यमूर्ती । निगमागमा नये
व्यक्ती । सहस्रमुखें वर्णितां कीर्ती । अंत अनंता[9] असाध्य; ॥ ३४ ॥ ऋषिमुनि
देव मंवचा[10] । विनीत पदीं भोगिती विभवा । तो रमाधव सारथी देवा[11] ! । रक्षक
रथीं माझिया ॥ ३५ ॥ असतां, कायसी जया वाणी[12] ? । किमर्थ चिंता अंतःकरणीं? ।
मज वेगळें फोडितां कदनीं । पर्याप्त[13] भीम[13] द्रोणातें[13]. ॥ ३६ ॥ सात्यकीप्रताप
बृहद्भानू । अभिमन्यू नुरी वीरांचें भानू[14] । ज्यांचिया विक्रमा तेजिष्ठ भानू ।
साम्य नये; नरेंद्रा! ॥ ३७ ॥ माद्रीसुतादि बळिष्ठ भूप । देखोनी काळ पावे
ताप । धृष्टद्युम्न क्षयाग्निरोप[15] । द्रोणनिधना प्रदीप्त. ॥ ३८ ॥ मी तव निकरें

१. द्रोण. २. मर्यादा, प्रतिष्ठा. ३. पेटी. मागें अ० १, ओं० १४४, पहा. ४. पर्वत. ५. इंद्राचा
वज्र. ६. पोळून, भाजून. ७. बाहु, भुजदंड. ८. अज्ञान. ९. शेषाला. १०. इंद्र. ११. धर्मराजा!
१२. कमतरता, न्यून. १३. भीम द्रोणाला पुरे पडेसा आहे. १४. भान, बुद्धि किंवा तेज.
१५. प्रलयाग्नीचें रोप (=बालस्वरूप).

द्रोणाचार्या। सहसा युद्ध न करीं, राया ! । प्राणांतींही न मारीं तया । पांडु, तूं, तेवीं मज द्रोण. ॥ ३९ ॥ ईश्वर गुरु द्विधा व्यक्ती । नाहीं नाहीं, अवनीपती! । द्रौणीहून लालनप्रीती । करूनी विद्या अर्पिल्या. ॥ ४० ॥ माझिया विक्रमें तोष त्यातें । आनंदसमुद्र पावे भरतें । नयन झांकी देखोनी मातें । दृष्टी लागेल म्हणोनी. ॥ ४१ ॥ त्यातें करितां आन बुद्धी । केवीं पुढारे पाय संधी ? । जैसा भ्रमर स्नेहवादी । मरोनी पद्मा संरक्षी. ॥ ४२ ॥ ना ते पक्षिणी आत्मज बाळां । रक्षितां वश्य पारध्या काळा । कीं दुग्धीं स्पर्शितां अग्निज्वाळा । जळोनी पाणी त्या रक्षी. ॥ ४३ ॥ तैसिया परी धर्मराया! । अधर्म न शिवे माझी काया । परी जयश्री तुझिया बाह्या । कृष्णाश्रयें निश्चय.' ॥ ४४ ॥ पार्थमुखघनगर्जना । भूपमयूर नाचती रणा । वाद्य, किंकाट, घोष, गर्जना, । करूनी युद्धा लोटले. ॥ ४५ ॥ पर्वत पर्वतां आदळती । कीं सागर सागरां फुपाटती । ना ते सिंह केसरी झेंपावती । तेवीं युद्धा तगटले. ॥ ४६ ॥ पदाति वीर पदातिया । अश्वारूढ अश्वारिया । हस्तिपा हस्तीप ताडिती राया ! । रथी रथिया निघातें. ॥ ४७ ॥ द्रोणें रक्षिली न भंगे चमू । तैसाच फाल्गुन न पवे श्रमू । कर्ण पुरुषार्थ महाभीमू । रणमूर्धीं लोटला. ॥ ४८ ॥ शर वर्षोनी तीक्ष्णधारी । बुजोनी सेना काढिली समरीं । द्रोणाचार्य प्रतापगिरी । सेनाअग्रीं शिरकला. ॥ ४९ ॥ प्रळयघनाची तीव्र वृष्टी । तैशा मोकलिल्या बाणकोटी । दुःसह मानोनी जगजेठी । धृष्टद्युम्न थडकला. ॥ ५० ॥ येरयेरां संघट्टणी । बाणीं भरली पूर्ण अवनी । आहाळोनियां वासरमणी । पडों पाहे तळातें. ॥ ५१ ॥ क्रोधारूढ द्रोणाचार्य । जाणों ग्रीष्मींचा दीप्त सूर्य । ना तो वसंतीं वणवावर्य । जाळी तृणा ज्यापरी. ॥ ५२ ॥ क्रोधें प्रदीप्त अनळ । शरौघमाळा स्फुलिंगमाळ । [वीरगिरींचे कराया शकळ] । वज्रापरी उसळती. ॥ ५३ ॥ भयचकित पांडवसेना । निरुत्साह अर्दितमना । चाप चिकीर्षे पुनःपुनः । काळमेघासारिखें. ॥ ५४ ॥ पदाति, वाजि, वारण, रथी, । खिळोनी बाणीं, पाडिले क्षिती । जाणों शिळापृष्ठीं प्रतापक्षिति । तेवीं वृष्टी शरांची. ॥ ५५ ॥ अमित वीर तया तळा । क्षया आले नृपशार्दूळा! । धडमुंडांकित धराबाळा । जाणों शारदी शोभली. ॥ ५६ ॥ युगांतकाळीं भूतक्षय । करी तैसा द्रोणाचार्य । रक्तप्रवाहनदीवर्य । खळखळाट लोटली. ॥ ५७ ॥ अमर्षवेग उसळे जळ ।

---

१. दोन निरनिराळ्या मूर्ती. २. अश्वत्थाम्यापेक्षां ज्यास्त. ३. लढण्याच्या प्रसंगीं, आणीबाणीच्या वेळीं. ४. भिडले. ५. माहुतास. ६. रणांगणाच्या अघाडीस. ७. भाजून, पोळून. ८. त्रस्तचित्ता. ९. प्रचंड किरणांचा वर्षाव. १०. पार्वती, दुर्गादेवी. ११. रागाचा आवेश.

[1]क्रव्यादमेळ उभय[2]कूळ । बळ फुपाट फेण तुंबळ । वीरवृक्ष उन्मळती. ॥ ५८ ॥ कीं ते [3]सरस्वती ताम्रवर्णी । गज, अश्व, रथ, आवर्त गुणी । कवच-पद्म राजित किरणीं । शरौघ नक्र तळपती. ॥ ५९ ॥ वीरें[4]शीसीं केश सुंदर । तेची शेवाळ दाट घोर । मेदमांसकर्दम थोर । वाळू हस्ती जाण पां. ॥ ६० ॥ सपिच्छ शर मकराकृती । उसळोनी बळें उल्हाळ घेती । ढाल कच्छप विरुळे कांती । घंटा [5]र्दर्दुर अपार. ॥ ६१ ॥ श्वापदगणांचे संघाट । क्षत्रसंन्यासी-पक्षीं सुभट । पिशाच ब्रह्मराक्षस भट्ट । प्रयोगातें सांगती. ॥ ६२ ॥ ऐसें रौद्ररण कर्कश । भ्याडां भयनशीळ, वीरां तोष, । पाहोनी भूप वीरश्रीघोष । करुनी, पुढां लोटले. ॥ ६३ ॥ एकवटल्या चमू दोन्ही । जाणों संगमीं एकत्र पाणी । कीं खंड वस्त्र [6]जोडितां गुणीं । एकत्र होय ज्यापरी. ॥ ६४ ॥ ऐसि-यापरी येरयेरां । वीर निकरें पेटले मारा । द्वंद्वयुद्धाचा [7]उँबारा । रथी रथिया थडकले. ॥ ६५ ॥ जैसीं गंजिफांचीं पानें । टाकितां उचलीत विचक्षण । [8]गांवगुंडीचे डाव मांडितां जाण । उचली गारुडी ज्यांपरी. ॥ ६६ ॥ तयापरी महाराजा ! । वीर वीरश्री पिटोनी भुजा । रणीं लोटती विजयभाजा । [9]पर्णावया आवडी. ॥ ६७ ॥ उसळोनी **श**कुनी होतां पुढां । **स**हदेव [10]वांहोनी मेढीं । शर वर्षोनी अग्निदाढा । अश्वसारथी मर्दिले. ॥ ६८ ॥ **विं**शती धावोनी **भी**मसेना । वीस बाण अर्पिले [11]वज्रमौना । न कंपत उभा **भी**मराणा । मेष-थडके **हे**माद्री. ॥ ६९ ॥ सक्रोध **द्रो**ण प्रेरितां रथू । पुढां लोटला **पां**चाळ-रथू । परस्परें शरीं पंथू । बुजोनी व्योमा साधिलें. ॥ ७० ॥ अद्भुत युद्ध दोघां जणां । जाहलें आश्चर्य देवगणा । **भी**म भीमपुरुषार्थराणा । अश्वसारथी मर्दिले. ॥ ७१ ॥ **शा**ल्वें धांवतां [12]कैवारा । **न**कुळें केलें [13]आडवारा । युद्ध जाहलें दोघां वीरां । देवदैत्यांसारिखें. ॥ ७२ ॥ **न**कुळ उसळे शरसंधानीं । ध्वजाश्वसूत पाडिला धरणीं । जैसा खगेंद्र विशाळ फणी । [14]त्रिखंडें करी चपेटें. ॥ ७३ ॥ तैसिया [परी] पुरुषार्थ घन । करुनी शंख स्फुरिला [15]त्राणें । **का**ळयापरी फुपाटमान । **कृ**पाचार्य उसळला. ॥ ७४ ॥ धावोनी पुढां **धृ**ष्टकेतू । सत्तर बाणीं **गौ**तम-सुतू । ताडिला शोभला मयूरकेतू । जेवीं सपिच्छ साजिरा. ॥ ७५ ॥ न गणोनी **कृ**पें [16]उसण्याघाई । बाण सोडूनी भेदिले हृदयीं । जाणों वारुळांत शिरकले

---

१. राक्षससमूह. २. (नदीच्या) दोन्ही थडी (किनारे). ३. नदी. ४. वीरांच्या मस्तकीं. ५. बेडूक. ६. दोऱ्यानें शिवलें असतां. ७. कडाका, धामधूम. ८. मुठीचे खेळ, एकाद्या गांवांतील मंत्री व फिरस्ता गारुडी यांचे झगडे. ९. वरावया. १०. धनुष्याची दोरी ओढून. ११. वज्रासमान. १२. साहाय्यार्थ. १३. आडकाठी. १४. तीन तुकडे. १५. जोरानें, आवेशानें. १६. अत्यंत तांतडीनें.

अही । तेवीं वक्षीं रिघाले. ॥ ७६ ॥ सेनापती **पां**चाळराज । लोटला **सु**शर्मराजबीज । शर वर्षोनी तेजःपुंज । **पां**चाळसिंहें ताडिला. ॥ ७७ ॥ येरू प्रज्वळोनी क्रोधराशी । तोमर ताडिला जानुदेशीं । जैसी डळमळी पादपासी । [1]नागधडक[2] बैसतां. ॥ ७८ ॥ **वै**कर्तन विक्रमी **क**र्ण । महाप्रतापी जैसा अग्न । पुढारतां **म**त्स्य **पां**चाळ जाण । [3]तगटते जाहले निघाता. ॥ ७९ ॥ अद्भुत युद्ध तये काळीं । तीव्र माजली रणधुमाळी । **क**र्ण प्रतापाचा [4]हेळी । आच्छादिलें तयातें. ॥ ८० ॥ **शि**खंडीवीर शिखंडीत्राणें । उसळतां **भ**गदत्त रोषें पूर्ण । आडवोनी विंधिले बाण । **का**ळदंडासारिखे. ॥ ८१ ॥ येरें हांसोनी शरवृष्टी । **स्यं**दन भंगिला उठाउठी । **भ**गदत्तराज जगजेठी । भंगिता जाहला तयातें. ॥ ८२ ॥ **घ**टोत्कच राक्षसेंद्र । त्यातें **अ**लंबु थडके रुद्र । उभयतां वीर बळसमुद्र । मायामयी पुरुषार्थी. ॥ ८३ ॥ **ग**जेंद्र**न**क्राची [6]धुमाळी । पूर्वीं जाली जैसी जळीं । आश्चर्य वीर उभयतां दळीं । चोज मानिती मानसें. ॥ ८४ ॥ **ल**क्ष्मण [7]क्षत्रदेव । युद्धा मिनले लघुलाघव । जैसे **हि**रण्यकश्यप **र**माधव । पूर्वीं युद्धा मिनले. ॥ ८५ ॥ राजनंदन **पौ**रव नामा । पुढारतां अग्निप्रतिमा । **सौ**भद्रवीर प्रतापगरिमा । लोटुनी शरा वर्षला. ॥ ८६ ॥ येरें वाहोनी चाप प्रौढी । बाण सोडिले अग्निधाडी । **सौ**भद्रसंधानें देशधडी । करुनी क्षणें टाकिलें. ॥ ८७ ॥ **अ**भिमन्युवीर क्रोधानळीं । तीक्ष्ण वर्षोनी बाणजाळीं । ध्वजच्छत्रचाप पाडिलें तळीं । वृक्षशाखेसारिखें. ॥ ८८ ॥ क्रोधें प्रदीप्त अग्निशिखा । तैशा **पौ**रव सांडी उल्का । सप्त [8]नाराच रुक्मरेखा । सूताश्वबळें ताडिले. ॥ ८९ ॥ पावक क्षोभे शिंपितां घृत । कीं सिंह सुसाटे लागतां क्षत । ना तो फणिवर लागतां हस्त । ग्राहकही प्राणाचा; ॥ ९० ॥ तैसा **सौ**भद्र क्रोधवर्धन । बाण सज्जला धनुष्य घन । धारामुखीं डळमळी अग्न । स्फुलिंगकण विखुरले. ॥ ९१ ॥ जाणों [9]शमनें प्रेरिला दूतू । तैसा उठिला सुसाट वातू । वीर दचकले संग्रामधूर्तू । निवारूं भूप विसरला. ॥ ९२ ॥ **कृ**तवर्मा कुशळहस्ती । बाणद्वय सोडूनी निगुती । भंगोनी शरकोदंड क्षिति । खंडूनी धरे पाडिला. ॥ ९३ ॥ चापच्युत **अ**भिमन्युवीर । क्रोधें पेटला वैश्वानर । वोढूनी खड्ग पुसोनी धार । टाकोनी उडी धांवला. ॥ ९४ ॥ जैसा केसरी वारणावरी । चपेट करी क्रोधलहरी । तैसा **सौ**भद्र उडूनी शिरीं । रथाधुरीं बैसला.

---

१. झाडास. २. हत्तीची थडक. ३. भिडते. ४ सूर्य. ५. मोराप्रमाणें डौलानें व त्वेषानें. ६. धुडगूस, दांडगाई. ७. क्षत्रदेव हा शिखंडीचा मुलगा. ह्यास दुर्योधनपुत्र लक्ष्मण यानें मारिलें. ८. बाण. ९. यमानें.

॥ ९५ ॥ नखाग्रघात खड्गधारा । ताडुनी सारथी केला पुरा । पुढां शिरकोनी राजेश्वरा ! । भूप केशीं कवळिला. ॥९६॥ अंतकदूत मृत्युकाळीं । शिखा कवळोनी आसुडी बळी । कीं कंसचूडा वनमाळी । धरुनी पाडी तळातें. । ॥ ९७ ॥ तयापरी वीरंगुंठी । धरूनी आफळी भूतळवटीं । प्राणपंचकीं उठाउठी । पितृगृह वरियेलें. ॥ ९८ ॥ 'अहा' कार कौरवमेळीं । दुःसह मानिलें वीरीं सकळीं । सैंधवराज उसळोनी दळीं । बाणजाळीं वर्षला. ॥ ९९ ॥ अभिमन्युवीर तेजिष्ठ हिरा । शर खंडुनी खड्गधारा । अश्वसारथी धांवोनी त्वरा । कृतांतवरा धाडिलें. ॥ १०० ॥ जयद्रथें टाकोनी उडी । चेर्म खड्ग कर्षिलें प्रौढी । धांवतां रोषें बहु तांतडी । सौभद्र त्यातें थडकला. ॥ १०१ ॥ येरयेरां ताडिती घाव । गती विगती लघुलाघव । थरकसरक विद्याविभव । चोजकर सुरांतें. ॥ १०२ ॥ अर्जुनासमान आर्जुनी । टाळोनी घाव घातला मूर्ध्नी । चांचरी जातां सांभाळुनी । सौभद्रातें ताडिलें. ॥ १०३ ॥ शरभ शरभांची कैव । कीं गंडभैरवा गंडभैरव । ना ते मृगेंद्रा मृगेंद्रा हैव । चपेट तेवी दोघांतें. ॥ १०४ ॥ रणरंगधीर पार्थसुत । खड्गचर्म केला भस्मीभूत । क्रोधें प्रदीप्त जयद्रथ । शक्ती रोषें टाकिली. ॥ १०५ ॥ जाणों कृतांताची भगिनी । कीं ते खगेंद्रअरीची जननी । तेजें दिशा डंवरिल्या गुणीं । लक्षिली चक्षीं सौभद्रें. ॥ १०६ ॥ ताडुनी शस्त्र दोहींकडे । करुनी टाकिले भूमी गाढे । जाणों खगेंद्रपाणी फडे । खंडतां मही उतरले. ॥ १०७ ॥ 'भला भला' इहीं शब्दीं । स्तवोनी लोटली वीरमांदी । विराट, द्रौपद गजस्कंदीं, । भीमसेन, सात्यकी; ॥ १०८ ॥ धृष्टकेतु, शिखंडी, युधिष्ठिर, । कैकय, पार्षद, माद्रीकुमर, । द्रौपदीनंदन, भैमी, वीर । सहस्रशा लोटले. ॥ १०९ ॥ कौरववीरांची महादाटी । भीमसेना आवेशकोटी । गदा वाहोनी मुष्टी । वीरांमाजी शिरकला. ॥ ११० ॥ प्रतिबिंब न साहे केसरी ॥ कीं स्वजाती गजा गज वैरी । ना ते द्विजें द्विजांची थोरी । साहों न सकती ज्यापरी; ॥ १११ ॥ तैसा भीमाचा उत्कर्ष । न साहोनी करून रोष । गदा पडताळोनी नरेश । शल्यराजा धावला. ॥ ११२ ॥ गिरिवज्राची थडक । तैसे आदळले एकमेक । घाव घालिती त्राणें अचूक । यमसदना न्यावया. ॥ ११३ ॥ गदा मंडळें उडे

---

१. वीराची शेंडी. (गुंठी=झुचडा.) २. ढाल. ३. अभिमन्यु. ४. घेरी, चक्कर. ५. पकड, डावपेंच. ६. सिंहासिंहाची लढाई. ७. अस्त्रविशेष. ८. सर्पाची आई. ९. झांकल्या. १०. वीरसमूह. ११. इ. स. १७८० च्या सुमारास आपल्या समाजांत व राज्यांत किती फाटाफूट झाली होती हें ह्या दृष्टांतावरून सुस्पष्ट होतें.

पिच्छबाणी[1] । थरकसरक फेरे गगनीं । घायें घाव टाळोनी झणी । येरयेरां ताडिती. ॥ ११४ ॥ सर्वांग जाहलें रुधिरमय । न कंपत ताडिती, वांछिती जय । जयातें जैसी पडती सोय । निकरें गदा हाणिती. ॥ ११५ ॥ तव येउनी पडती मही । पुन्हा झगटती शौर्यें पाहीं । फूत्कारिती जैसे अही[2] । टाकिती उल्का विषाच्या. ॥ ११६ ॥ तरुण वृषभांची झुंझारी । एकमेकां सारिती खुरीं । सर्वांग क्षतें पूर्ण रुधिरीं । परी न सरती ज्यापरी. ॥ ११७ ॥ **भीम**-**सेन** प्रतापराशी । गदा वोपिली भूपशीसीं । चांचरी येउनी, धरेसी । स्पर्शता जाहला महींद्र. ॥ ११८ ॥ रोषें **द्रोण** वांहोनी[3] मेढा[3] । रणांगणीं लोटला पुढा । बाणीं शिरांचा जाला सडा । रांगोळ्या शवें अपार. ॥ ११९ ॥ उठा-वले **पां**डवभार । क्रोधार्णवा भरतें सैरें[4] । शरलाटा उसळती क्रूर । भंगावया **द्रो**णातें. ॥ १२० ॥ इंद्रसमरीं **ब**ळीपाठीं । निबिड दानवांची जैशी मिठी । कीं **रा**घवयुद्धीं **रा**वणनिकटीं । राक्षसथाटी[5] अपार. ॥ १२१ ॥ तैसियापरी **द्रो**णामागें । मिनलीं वीरांचीं महादांगें[6] । जैसें अधर्मास अँघें । पाठीलाग न सोडी. ॥ १२२ ॥ असो; **द्रोण** क्रोधानळीं । थडकोनी वर्षे बाणजाळीं । वीर वीर आणिले तळीं । रोष **धर्मा** नावरे. ॥ १२३ ॥ रथ लोटूनी सेनेसहित । अर्पिले बाण **गुरू**तें शत । येरू न कंपत हर्षयुक्त । खंडी धनुष्य हातींचें. ॥ १२४ ॥ चक्ररक्षक राजनंदनीं । **द्रो**णाचार्य पूजिला बाणीं । **गु**रुवर्य प्रतापाचा तरणी । विगत केलें तयांतें. ॥ १२५ ॥ सेना भ्रष्ट विगतदशा । पाहोनी वीर लोटले तोषा । बाणजाळीं भरल्या दिशा । मार्ग मार्गणा[8] दिसेना. ॥ १२६ ॥ एकेची वेळीं सर्वेही वीर । **द्रो**णाचार्या करिती प्रहार । सूर्य[9]गणित **शि**खंडीवीर । अर्पी बाण **द्रो**णातें. ॥ १२७ ॥ **द**[10]शग्रीवनेत्रांच्या गणना । **उ**त्तमौजा ताडी प्रभिन्न बाणां । इंद्रियद्विगुण**शि**ववदना[11] । **न**कुळें शरा विं-धिलें. ॥ १२८ ॥ ऋषिसंख्या[12] **स**हदेव वीर । अर्पिता जाहला बाण घोर । **स्वा**मिभुजांचे[13] द्विगुण शर । **धर्म**राजें विंधिले. ॥ १२९ ॥ **द्रौ**पदीनंदन सिंह तरुण । गुणसंख्या[14] अर्पिले बाण । **सा**त्यकी वीर हुताशन । नक्षत्रगणना[15] समर्पी. ॥ १३० ॥ **म**त्स्यराज शंकरभुजा[16]–। गणित वोपी बाण वोजा । जैसा अशनी न गणी विजा–। वृष्टी करितां सामर्थ्य. ॥ १३१ ॥

---

१. ससाण्यासारखी. २. सर्प. ३. धनुष्याची दोरी ताणून. ४. स्वैर, यथेच्छ. ५. गर्दी. ६. मोठीं अरण्यें. दांग=वन, अरण्य. ७. पापें. ८. बाणास. ९. बारा. १०. वीस. ११. १०×२×५= शंभर. १२. सात. १३. कार्तिकस्वामीच्या हातांच्या दुप्पट, चोवीस. १४. सहा. १५. सत्तावीस. १६. दहा किंवा अठरा.

तयापरी शरसंधान । वारुनी **द्रोण** विंधिला बाण । चतुरंग सेना खिळोनी घन । धरा शवें भरियेली. ॥ १३२ ॥ **गु**रुवर्य पेटला महामारीं । कोण्ही समोर नये समरीं । युगांतकाळ भाविला वीरीं । **धर्म** क्रोधें धडकला. ॥ १३३ ॥ सिंह चपेट करी वा[1]रणा । तैसें उसळोनी ताडिला बाणा । **द्रोण** प्रतापी वीरराणा । कुशळास्त्रप्रेरणीं. ॥ १३४ ॥ लघुलाघव नें[2]तपर्वणी । तीक्ष्ण शर सोडुनी झणी । रं[3]थांग भेदूनियां गुणी । नीडें[4]भरणीं पाडिले. ॥ १३५ ॥ धरा आ[5]ततां **युधिष्ठिरें** । वीर लोटले महा निकरें । मार्ग रोधिला शरांच्या पूरें । धं[6]जों **कृ**[6]तांत सं[6]रेना. ॥ १३६ ॥ **विराट**, **द्रु**पद, **कै**कय, **कृ**त, । **सा**त्यकी, **शि**बी, **व्या**घ्रदत्त, । **सिं**हसेन आणि **पां**चाळसुत । वीर अनेक विंधिती. ॥ १३७ ॥ सहस्रावधी शरसंधान । **द्रोणा**चार्या ताडिती बाण । येरें वारोनी **सिं**हसेन । सकुंडल शिर उडविलें. ॥ १३८ ॥ **व्या**घ्रदत्त व्याघ्रसरी । ताडुनी पाडिला धरेवरी । वीर सर्व त्रासिले समरीं । जे आजिंक्य **का**ळातें. ॥ १३९ ॥ किलकिलाट तये समयीं । घोर माजला शब्द महीं । **कौ**रव नाचती पिटोनी बाही । कार्य साधलें म्हणोनी. ॥ १४० ॥ वदती, '**द्रो**णें सत्यपणू । केला, गवसिला **कु**रुनंदनू । विजयी जाहला प्रतापभानू । **द्रो**णाचार्य गुरुवर्य'. ॥ १४१ ॥ **पां**डवदळीं 'हा! हा!'कारू । 'मुंगीनें ग्रासिला' म्हणती '**मे**रू । कीं कुक्कुटें शोषिला सागरू । अग्नि पतंगें प्राशिला; ॥ १४२ ॥ ना तो हिमालयासी उकाडा । सूर्य जाहला हिमां[7] वरपडा । वृकें धांवतां पसरूनी दाढा । **का**ळ भयें पळाला.' ॥ १४३ ॥ ऐशा तर्कांच्या उतरडी । उतरती चढविती नानाप्रौढी । **द्रो**णशरांची मिठी गाढी । जीवोदार सर्वही. ॥ १४४ ॥ तव **आ**नकदुंदुभिजामात[8] । सखा **क्षी**राब्धिसुताकांत[9] । धनुर्धरांमाजी रणपंडित । जाणों **भा**र्गव दुसरा. ॥१४५॥ **का**ळखंज आंतुर्बळी[10] । वधोनी, तोषला **चं**द्रमौळी । विजया बाह्या सर्वकाळीं । आरोग्य[11] **अ**ग्नि ज्यासंगें; ॥ १४६ ॥ तो **गां**डीवधन्वा **वि**जयरथू । देखतां,

---

१. हत्तीस. २. बांकदार. ३. चाक. ४. रथाच्या गाभाऱ्यांत. ५. स्पर्शतां. ६. (त्या बाणांच्या जुंबाडांत) घुसण्याला प्रत्यक्ष काळही पुढें पाऊल घेईना. ७. बर्फांत गुरफटलेला, बर्फांत सांपडलेला. ८. वसुदेवाचा जामात (अर्जुन). ९. लक्ष्मीकांत (कृष्ण). १०. बलाढ्य. ११. श्वेतकी नामक एका प्रख्यात राजानें असंख्य यज्ञ केले. ह्या यज्ञांत अनेक वर्षें घृतधारा सेवन केल्यामुळें अग्नीस जाड्य आलें व तो अगदीं निस्तेज झाला. व्याधिनिर्मुक्त होण्यास काय उपाय करावा, हें विचारण्यासाठीं अग्नि ब्रह्मदेवाकडे गेला, तेव्हां ब्रह्मदेवानें 'खांडव वन भक्षण करून अग्नीनें आपलें जाड्य निरस्त करावें' असा उपाय सांगितला. पण तें वन इंद्ररक्षित अस-

जाहला अकस्मातू । वीरां उत्सवो, भयांचा वातू । निमोनी, हर्षें नाचती. ॥ १४७ ॥ जैसे शरपंजरीं कपी पडले । ते द्रो[1]णाद्रिकीळें जिवंत जाहले । अब्धि मथितां विषें [2]आहाळले । देखोनी सुधा टवटवी; ॥ १४८ ॥ कीं तो दिनमणी पूर्वे कळा । पसरतां, हर्षें पद्मिणी उज्ज्वळा । ना तें इंदुमंडळ देखतां डोळां । [3]चातक तोषे ज्यापरी. ॥ १४९ ॥ तैसा उल्हास तये काळीं । होतां पावला **किरीट**[4]माळी । वीर मर्दिले बाणजाळीं । शवांच्या [5]पौळी अपार. ॥ १५० ॥ रक्तनदीची खळखळाट । उसळोनी समुद्रा पुसे वाट । रौद्र रणाची सांगतां गोष्ट । अंगा शाहारें येतसे. ॥ १५१ ॥ प्रभिन्नद्विप खंडमुंड । पडिले बीभत्स, ताडिती सोंड । हेम तुकितां मोल गाढ । अमित वारू विखुरले. ॥ १५२ ॥ कुंडलें मंडित शि[6]रसिसाळें । जाणों शोभती रातोत्पळें । वीरबाहुभूषणें कीळें । हिणाविती ग्रहांतें. ॥ १५३ ॥ करुनी चमूचा गौरव । धडकला जेथें **द्रोण**राव । हस्तक्रिया लघुलाघव । बाणीं व्योमा आच्छादिलें. ॥ १५४ ॥ दश दिशा व्यापिल्या शरीं । निबिड अंधार पडला समरीं । वीरसंज्ञा हरपली पुरी । कोण्ही कोण्हा धरीना. ॥ १५५ ॥ विगतपुरुषार्थ वीरमांदी । निघोनी गेली [7]जयाची बुद्धी । भूप निघाले मागिले पदीं । सांभाळोनी आपणा. ॥ १५६ ॥ **पां**डवचमू आल्हाद थोर । दुंदुभी पिटोनी गाजती तुरें । रथ स्वीकारोनी **यु**धिष्ठिरें । चाप पाणी कर्षिलें. ॥ १५७ ॥ **के**[8]तवदनीं **र**वी पडिला । तो दानप्रवाहें मुक्त जाहला । कीं शक्तीनें **ल**क्ष्मण ग्रासिला । [9]उगळिला [10]वेल्ली **मा**रुती. ॥ १५८ ॥ तयापरी अरिष्टशांती । विजयी जाहला **सु**भद्रापती । तंव अस्ता पावला गभस्ती । माघारला **गु**रुवर्य. ॥ १५९ ॥ **धर्म**राज हर्षवर्धन । आवरूनि युद्ध, आक्रमी सदन । शिबिरा पावोनी उभय

ल्यामुळें अग्नीस दुष्प्राप्य होतें—यामुळें अग्नि अर्जुनास शरण गेला व अर्जुनाच्या साहाय्यानें, इंद्र युद्धास आला असतां, त्याचा प्रतीकार करून, तें वन पंधरा दिवस यथेच्छ भक्षण करून व्याधिनिर्मुक्त झाला—अशी कथा आहे. (मुक्तेश्वर—आदिपर्व—अ० ४९ पहा.)

१. द्रोणगिरीच्या तेजानें. २. पोळले. ३. येथें 'चकोर' असा पाठ असावयास पाहिजे. कारण चकोर व चंद्र यांचें कविसमयांत सख्य आहे, परंतु चातक व चंद्र यांचें नाहीं. तथापि हीच चूक मोरोपंतांनींही निदान दोन ठिकाणीं तरी केली आहे. (१) नंद महाभाग जसा चातक चन्द्रा तसा जया सेवी । (हरिवंश १३।१). (२) टकमक पहात होते प्रभुमुखचंद्राकडेचि चातकसे. । (विराटपर्व ७।९८). ४. किरीटी, अर्जुन. ५. थर, ढीग, राशी. ६. शिर=सिसाळें=मस्तक. ७. जय मिळविण्याची उमेद. ८. केतू नामक ग्रहाच्या तोंडांत. ९. बाहेर काढिला. १०. संजीवनी नांवाच्या वेलीच्या योगानें.

सैन्य । विश्रामलें विश्रामीं. ॥ १६० ॥ प्रथम दिवसाचा वृत्तांत । जाला कथिला संकलित । पुढील कथेचा चरितार्थ । सज्जनीं पान करावें. ॥ १६१ ॥ श्रीगुरुभीमराजजलधर । कृपास्वात्युदक वाक्कर्दळीभार । कर्पूरनरहरीमोरेश्वर । कथासुगंध अर्पितू. ॥ १६२ ॥

अध्याय चवथा.

व्यासकृपेचें **नं**दनवन । वक्तयांमाजी शिरोरत्न । चातुर्यसिंधु गुणनिधान । सृष्टी दृष्टी देखणा; ॥ १ ॥ तो **सं**जय म्हणे, 'पवित्र भूपा! । त्रिशतकरवंशा (?) कुळदीपा! । पुढील प्रसंग ऐक बापा! । शतपुत्रांच्या निवाडें. ॥ २ ॥ वाहनें लावोनी विश्रामा । **द्रोण** पातला राजधामा । सन्मानुनी द्विजसत्तमा । उत्तमासनीं पूजिलें. ॥ ३ ॥ भूपवृंद सभासदनीं । सहित आप्तबंधुश्रेणी । **द्रो**णाचार्य गौल्यता वाँणी । बोलता जाहला **कुरू**तें. ॥ ४ ॥ म्हणे, 'दुर्योधना! ऐश्वर्यनिधी! । आजी **ध**र्म धरिला होता युद्धीं । परी **फा**ल्गुन पातला तये संधी । **का**ळचक्रासारिखा. ॥ ५ ॥ जैसी खगेंद्राची पडतां उडी । फणींद्रसेना देशधडी । ना ते अनंगाची पडतां धाडी । तपाच्या कोडी ढांसळती. ॥ ६ ॥ कीं तों **भा**र्गवाचें येतां ठाणें । भूप लंघिती दिशांचीं रानें । ना तो सबळ क्रोध वर्ततां त्राँणें । बुडे विवेकसमुद्रीं. ॥ ७ ॥ तयापरी वीर अर्जुन । भंगी सैन्य न लगतां क्षण । महाप्रतापी विक्रमी धँन । युद्धीं सुरेशा असाध्य. ॥ ८ ॥ म्यां तव तूतें केला नेमू । नसतां **पा**र्थ धरीन **ध**र्मू । तो तंव पावला होता क्रमू । परी **फा**ल्गुनें भंगिला. ॥ ९ ॥ आतां तरी राजया! समरीं । फोडुनी **पा**र्थ नेइजे दुरी । वीरविक्रमें तुझ्या भारी । निर्वीरधरा मज वाटे.' ॥१०॥ **द्रो**णमुखींची ऐकोनी वाणी । भूप खळबळे अंतःकरणीं । शौर्यसमुद्रा भरतें दुँणी । क्रोधलाटा उसळले. ॥११॥ जैसा सिंह उफाळोनी बाहे । फोडुनी रव उभा राहे । तैसा **त्रि**गर्ता क्रोध न साहे । [गंभीरवाणी अनुवादे.] ॥ १२ ॥ जुंझार जाहला जरी एडका । गजा परी सारील थडका ? । हेमंतीं शीताचा कडाका । बाधा बाधिजे रवीतें ? ॥ १३ ॥ वृश्चिकनांगी तीक्ष्ण विष । कुलिशधारा पावे नाश ? । कीं दर्दुराचा [श्रवुनी घोष] । दामिनी पळे माघारी ? ॥ १४ ॥ तयापरी न पवोनी भया । युद्धा करीन विजयी बाह्या । मत्पुरुषार्थ

---

१. येथें मूळांतील सोळावा अध्याय संपतो. २. द्विजश्रेष्ठास (द्रोणाचार्यास). ३. श्रेणी=जमाव, तांडा. ४. माधुर्ययुक्त वाणीनें. ५. जोरानें, आवेशानें. ६. अगाध, अलोट. ७. दुप्पट. ८. मारका, वाका टक्कर देणारा.

अटक तया । गुंमान थोरी उतरीन. ॥ १५ ॥ समरांगणीं विक्रमीं त्यातें । जिंकीन किंवा तोही मातें । विन्मुख परततां तुम्हांतें । मुख सर्वथा न दावीं. ॥ १६ ॥ अनृत लोक, ब्रह्मघाती, । मद्यपी, गुरुदारारती, । ब्राह्मणद्रव्यें हरणीं प्रीती, । शरणागता अव्हेरू, ॥ १७ ॥ अग्निदाही, अनुपकारी, । विषदाई, आत्महत्यारी[2], । श्राद्धवारीं मैथुनकारी, क्लीब युद्धा चुकावे[3]; ॥ १८ ॥ यया पापांचे प्राप्त लोक । परततां घडो आवश्यक । यया प्रतिज्ञेचा कलंक । लागतां, पितरां दुर्गती. ॥ १९ ॥ आह्मी बांधव पांच प्रौढी । पंचभूतांची पिळून नरडी । मेरूसी घालूनी आडी[4] । उपडूनी टाकूं सामर्थ्यें.' ॥ २० ॥ ऐसें बोलतां तयातें । संशप्तकां क्रोधभरितें । दाटोनी, म्हणती 'हें कृत्य । सिद्धी येऊं सर्वथा. ॥ २१ ॥ अर्जुनें मागें विक्रम केला । त्यांचें उसणें फेडूं यया काळा । हेत हृदयीं होता राहिला । मुक्त करूं प्रसंगें.' ॥ २२ ॥ गोपाळगण म्हणती, 'राया! । यदर्थीं चिंता करणें वांया । याचिलें आम्हां जया कार्या । सिद्धी नेऊं सामर्थ्यें.' ॥ २३ ॥ हर्षयुक्त वीरवदन । विसर्जुनी सभा, केलें शयन । पूर्वे उगवतां रविकिरण । नित्य क्रिया सारिली. ॥ २४ ॥ सिद्ध होवोनी उभय चमू । निघाले रणा त्यागोनी श्रमू । त्रिगर्तराज स्मरोनी नेमू । लोटता जाहला प्रतापें. ॥ २५ ॥ रुक्मस्यंदन विशाळ केतू । घंटा पताकीं सुशोभितू । पंच भ्रातृ पंचादित्यू । शस्त्रें प्रभिन्न हस्ताग्रीं. ॥ २६ ॥ सत्यरथ आणि सत्यवर्मा । सत्यव्रत, सत्यकर्मा । महारोषें क्रोधगरिमा । भेदूं भाविती अंबरा. ॥ २७ ॥ अयुत एकरथी प्रवीण । वाजी, वारण, पदाति घन । वीर उत्साही वाद्य त्राणें । पिटोनी रणा निघाले. ॥ २८ ॥ मालव तुंडिकिरातभूप[5] । तीन अयुतें वीरमाप । सेनेसहित प्रतापद्विप । तयापाठी निघाले. ॥ २९ ॥ मालव, कौलव, मद्रक, । ज्यांचा दुःसह वीर्यतवक[6] । तीस सहस्र रथी ठळक । सह सेना चालिले. ॥ ३० ॥ यांही वेगळे बळिष्ठ भूपती । अयुत एक प्रभिन्नशक्ती । युद्धा निघाले नेमवृत्ती । पितृगृहा[7] व्रजावया. ॥ ३१ ॥ करोनी अग्निसमारोपण[8] । देवपूजा आर्तमान[9] । तीर्थप्रसाद, तुळसीपर्ण । कर्णयुग्मीं खोविलीं. ॥ ३२ ॥ 'यावत दर्शन स्वर्गभुवनीं' । म्हणोनी भाळ स्पर्शिलें चरणीं । ब्राह्मण पूजोनी गंवादानीं[10], । वसुवसना[11] अर्पिलें. ॥ ३३ ॥ समस्तां करूनी पाठवणी ।

---

१. गुर्मी, प्रौढी. २. आत्महत्या करणारा. ३. चुकविणारा, टाळणारा. ४. आडी घालणें=दोन्ही पायांत धरून दाबणें. ५. मूळांत 'तुंडिकेर' असें नांव आहे. (अध्याय १७ श्लोक १८ पहा). ६. शौर्याचा आवेश (वेग). ७. स्मशाना. ८. अग्नीची स्थापना. ९. आवडीप्रमाणें. १०. गाईचे दानानें. ११. द्रव्य आणि वस्त्रें.

घेवोनी आज्ञा निघाले झणी । आल्हादयुक्त वीरश्रेणी । पिटोनी भेरी लोटिले. ॥ ३४ ॥ वीर दक्ष **द**क्षिणदिशा-[1]। पतीनें वोढिलें काळपाशा । आक्रमोनी राक्षसदिशा । [2]मूळ **अ**र्जुना धाडिलें. ॥ ३५ ॥ जैसा मृत्यु आलिया निकटीं । बुद्धि होवोनियां जाय खोटी । मूषक स्वगृह [3]भावोनियां पोटीं । फणीबिळीं प्रवेशे. ॥ ३६ ॥ ना ते जिकडे व्याघ्रजाळी । तिकडे मृगें लोटती [4]दळीं । देखत देखत ज्वाळानळीं । घालिती उड्या पतंग. ॥ ३७ ॥ तयापरी **फा**ल्गुनासी । निरोप धाडिला [5]गतायुषीं । ऐकोनी आश्चर्य मानसीं । 'बरवें' म्हणे [6]जयस्वी. ॥ ३८ ॥ साशंक **ध**र्म अंतःकरणीं । म्हणे, 'हे गुरूची हो! करणी.' **पा**र्थें[7] ऐकोनी शब्द कर्णीं । बोलता जाहला **ध**र्मातें. ॥ ३९ ॥ म्हणे, 'स्वामी! किमर्थ चिंता? । तुज यशस्वी कल्याणभरिता । **वि**रंचिलिखित माझिया हस्ता । **त्रि**गर्त मृत्या पाविजे. ॥ ४० ॥ **द्रो**णपणाची आठवण । न करी वीर प्रतापघन । रणीं विन्मुख **पा**कशासन । तूंही जाणसी सामर्थ्य. ॥४१॥ 'जिकडे **ध**र्म, तिकडे **ह**रि'। जयाशा कैसी येईल हारी? । वारणवृंद लोटतां [8]हारीं । [9]हरी [10]हारी आतुडे? ॥ ४२ ॥ प्रळयमेघ खंडधारा । करीं वारितां विंजणवारा । [11]बस्तसुतरुधिरघायवारा । **अं**जनीसुता बाधिजे? ॥ ४३ ॥ तयापरी तयाची खंती । न करी धार्मिका! धर्मवर्ती! । **त्रि**गर्ताची जाहली शांती । मानीं मी उभा तुजपाशीं. ॥ ४४ ॥ **सं**शप्तकाचा प्रतापू । देवा [12]दुर्धर्ष महातापू । विगत केला पूर्वीच दर्पू । आतां वोपीन **का**ळातें.' ॥ ४५ ॥ ऐसें वदोनी **ध**र्मराजा । पिटोनी भेरी, निघाला झुंझा । चतुरंगसेना पिटोनी भुजा । स्वल्प पृष्ठी निघाला. ॥ ४६ ॥ शोभायमान वेष्टित किरणीं । पश्चिम आक्रमी देव **त**रणी । तैसा **पा**र्थ अतर्क्यकरणी । **वि**जयरथीं लोटला. ॥ ४७ ॥ ज्याचिया रथाची साम्यता । स्यंदन नाहीं पृथ्वीवरुता । [13]पृथुरथभारें धरा [14]दुश्चिता । फिरतां सागर जन्मले. ॥ ४८ ॥ देवराज ऐश्वर्यनिधी । सहस्र वाजी स्यंदनसंधीं । हलकल्लोळ प्रबळ युद्धीं । अडचणी अडचण जाण पां. ॥ ४९ ॥ **र**विरहंवर वाटे दुणा । परी एकचक्री अंगें उणा । बहु जुनाट काळगणना । करी गणना

---

१. यमानें. २. बोलावणें, आमंत्रण. ३. समजून, मनांत मानून. ४. दळ=कळप, समूह. ५. गतायुषी जे त्रिगर्तराजे त्यांनीं. ६. जयशाली. 'जयस्वी' हा विलक्षण शब्द संस्कृतांतील 'यशस्वी' शब्दाप्रमाणें **न**रहरीनें नवीनच तयार केलेला आहे. ७. ही ओवी लिहितांना कवीच्या मनांत 'यतो धर्मस्ततो जयः' हें **गी**तावाक्य घोळत होतें, असें वाटतें. ८. हारीनें, रांगेनें, जुळून, जुटीनें. ९. सिंह. १०. पराभवाला. ११. बस्त=बोकड. १२. दुःसाध्य, दुर्गम. १३. मोठ्या रथाच्या भारानें. १४. दुःखी, कष्टी.

जगाची.[1] ॥ ५० ॥ तैसा नव्हे फाल्गुनरथ । सर्वां गुणीं अलंकृत । ज्यावरी बैसतां अजया[1] मात । स्वप्नांतरीं दिसेना. ॥ ५१ ॥ कीं त्रिपुरदहनीं सदाशिवा। रथ नेमिला देवीप्रभवा । कृत प्रयोजनीं गुप्त ठेवा । अग्नीनें पार्था अर्पिला. ॥ ५२ ॥ ऐसिया विजयरथीं पार्थू । धुरे सारथी इंदिराकांतू । रमा ऐश्वर्य त्यागोनी आर्तू । पादसेवे विनटली. ॥ ५३ ॥ ज्यांचिया महिमेचिया राशी । न लभे अंत आनंदासी । सदैव ध्यान निजमानसीं । प्रेमें कपर्दी[2] डुल्लतू. ॥५४॥ जो श्रुतिशास्त्रा अगोचर । मायानियंता सर्वेश्वर । ब्रह्मादिकां न कळे पार । तो सारथी पार्थाचा. ॥५५॥ तेथें जया काय वाणी[3]? । अष्ट[4] ऐश्वर्यें जोडिती पाणी । हरि[5] दाटितां रणांगणीं । वातवेगें उसळले. ॥ ५६ ॥ नेमिनादें[6] भरले गगनीं । दिशा व्यापिल्या तेजकिरणीं । वीरां खळबळ अंतःकरणीं । भाविती अंत पुरला. ॥ ५७ ॥ त्रिगर्तराज उसळोनी दळीं । पुढां लोटला रणकल्लोळीं । जाली शरांची धुमाळी । गर्दी हेळी मिळाला. ॥ ५८ ॥ संशप्तक सात बंधू । महा प्रतापी वीरसिंधू । उसळोनी पुढां रणी विषदू । बुजोनी पार्थ काढिला. ॥ ५९ ॥ कौतुकें हास्य किरीटमाळी । करुनी गांडीव स्फुरिलें कीळीं । वर्षता जाहला बाणजाळी । जाणों वृष्टि[7] हस्ताची. ॥ ६० ॥ धुळी धूसर अंबुकण । नाहींच करिती जैसे क्षणें । तैसे बुजोनी[8] बाणीं बाण । वीर वीर ताडिले. ॥ ६१ ॥ जैसा व्याघ्र अविकादळीं[9] । प्रवेशोनी त्यांची करी धुळी । तैं अर्जुन तये काळीं । करी धुमाळी सैन्याची. ॥ ६२ ॥ न साहोनी त्रिगर्त रागें। पंचक लोटले अंगें । शर सोडूनी वातवेगें । पार्थालागीं ताडिलें. ॥ ६३ ॥ शरांमागें शरांच्या कोटी । सोडिते जाहले महानिटीं । बुजोनी[8] काढिला कि-रीटी-। सह जगजेठी श्रीकृष्ण. ॥ ६४ ॥ पांडलिवृक्ष[10] फुलित फुलीं । वरी भ्रमरांची फिरे हउळी । तैसा शोभला किरीटमाळी । अतुर्बळी [अ]दुष्टात्मा. ॥ ६५ ॥ सुबाहुवीर त्रिगर्तराज । त्रिषट्क शर तेजःपुंज । ताडिता जाहला भी-मानुज । महात्राणेंकरूनी. ॥ ६६ ॥ पार्थ प्रतापाचा [11]हेळी । मुगुट उडविला बाणजाळीं । तळीं उतरतां भासला कीळीं । जाणों शक्र रिचवला. ॥ ६७ ॥ हस्तापासोनी हस्तावा । छेदोनी धरे पाडिला बरवा । बाण वर्षोनी महाहवा[12] ।

---

१. पराजयाची गोष्ट. २. शंकर. ३. कमतरता, न्यून. ४. ज्ञान, प्रज्ञा, कुळ, शीळ तप, लावण्य, संपत्ति व बळ–हीं अष्ट ऐश्वर्यें [मुक्तेश्वर–आदिपर्व अध्याय २।२२ पहा]. ५. घोडे. ६. चक्रध्वनि, चाकाचे आवाज. ७. हस्तनक्षत्राचा पर्जन्य. ८. आच्छादून, झांकून टाकिला. ९. मेंढ्यांच्या समुदायांत. १०. तांबडा लोध्र वृक्ष. ११. सूर्य. १२. मोठ्या युद्धांत.

सर्वांग शरीं भेदिलें. ॥ ६८ ॥ रोषें प्रदीप्त पंच भ्रातर । चापीं लावोनी तीक्ष्ण शर । विंधिते जाहले प्रतापशूर । **पा**र्थालागीं निघातें. ॥ ६९ ॥ शत शत दशबाण अधिक । एकेक ताडिते जाहले सेतीख । **फा**ल्गुनें मानोनी त्यांचा हरिख । पांच पांच पांचा ताडिले. ॥ ७० ॥ त्यावरी आणिक बाराबारा । अर्पण केले राजेश्वरा । क्रोध नावरे **सु**भद्रावरा । **सु**धन्वा चक्षीं लक्षिला. ॥ ७१ ॥ बाण वोढोनी कानाडी । शर सोडुनी **का**ळधाडी । [**सु**धन्व्यातें विंधूनी तांतडी] । सकुंडल शिर उडविलें. ॥ ७२ ॥ पुरोनी अवधी, टिपितां धरा । जाणों भासे उतरला तारा । 'हाहा'कार घोर महावीरा । पादानुगां आक्रांतू. ॥ ७३ ॥ **दे**वदत्त स्फुरिला **पा**र्थें । नादें गगन जालें पुरतें । वाहिनीं केलें मळमूत्रातें । भयें परा सरकले. ॥ ७४ ॥ **गां**डीव तक्षकविखारी । शर उल्बण गरळधारी । त्रास पावोनी वीर समरीं । लंविते जाहले दिशांतें. ॥ ७५ ॥ जैसा वणवा धडकतां वनीं । श्वापदां होय थोर पळणी । ना ते **अ**शोकीं राक्षसश्रेणी । देखोनी रुद्रा पळाले. ॥ ७६ ॥ कीं दुरिताची पडतां मिठी । विवेक पळे बारा वाटीं । ना ते अवलक्ष्मी बैसतां पाठी । पळती संपत्ती दिशांतें. ॥ ७७ ॥ तयापरी वीरवाहिनी । भय पावोनी निघाल्या रणीं । **त्रि**गर्तें उभवोनी ऊर्ध्व पाणी । गर्जना करी घनरवें. ॥ ७८ ॥ म्हणे, "तुह्मी पूर्वीं शपथा । करुनी, निघालां युद्धा असतां । मुख दावितां **कौ**रवनाथा । केवी श्लाघ्यता परत्रीं? ॥ ७९ ॥ 'जन्मला प्राणी पावेल क्षय' । ऐसा **श्रु**तीचा निजनिश्चय । कीर्तीनें प्राप्त लोकवर्य । अकीर्ती निरया भोगिजे. ॥ ८० ॥ पाहा पां पूर्वीं वीरश्रेणी । देह वोपिले समरांगणीं । त्यांचीं पुराणें विश्वकर्णीं । कुंडलें, पापा नाशती." ॥ ८१ ॥ ऐसी ऐकोनी राजवाणी । वीर परतले सहित श्रेणी । जैशा समुद्र-लाटा माघारोनी । पुन्हा तीरा धडकती. ॥ ॥ ८२ ॥ कीं गज गजासि मिळतां देखा । सरोनी माघां देती थडका । ना तो वृकें फोडितां हाका । फिरोनी माघां सुसाटे. ॥ ८३ ॥ तयापरी सर्वही सेना । माघारली, लोटली रणा । **सं**शप्तक**गो**पाळगणा । आवेश लोटे प्रतापें. ॥ ८४ ॥ सिंहनाद वाद्यध्वनी । पिटोनी लोटले समरांगणीं । **पा**र्थें विलोकूनियां नयनीं । बोलता जाहला हरीतें. ॥ ८५ ॥ म्हणे '**मा**धवा! **शे**षशयना ! । **मा**रजनका ! अंबुजानना ! । मानसमोहना ! **म**धुसूदना ! । **म**धु**मु**रुअंतका ! ॥ ८६ ॥ दानवारी ! गदा-

---

१. फार तीक्ष्ण. २. आकर्ण, कानापर्यंत. ३. आयुष्याची मर्यादा सरून. ४. सेवकांमध्यें. ५. सैन्यानें. ६. तीक्ष्ण. ७. रावणाच्या अशोकवनांत. ८. मारुतीस. ९. परलोकीं. १०. अपकीर्ति झाली तर. ११. लांडगा. १२. मदनताता.

धरा ! । चक्रपाणी! शार्ङ्गधरा ! । **श्री**निवासा ! कंबुधरा ! । विश्वंभरा ! पाही[2] पां. ॥८७॥ जैसीं मृगें मृगेंद्रपाठी । लागतां प्राणा केवीं भेटी ? । कीं मक्षिका धावोनी चपेटी । वन्हिरसा तृप्तता ? ॥ ८८ ॥ तैसियापरी प्राणावधी । पुरतां, लोटले मातें युद्धीं । प्रेरिजे हयें त्यांचिया मांदी[3] । **पि**तृगृहातें[4] वोपीन. ॥ ८९ ॥ वन्हि दाहक स्वभावता । त्यासी वायु जाहला साह्यता । कीं फणींद्रविवरीं आंतौता[5] । डवचील लया जाणता ?' ॥ ९० ॥ ऐसियापरी श्री**कृ**ष्णनाथें । सुसाट दिधले वारुवातें । उफाळले गगनपंथें । मागें ग्रह सरकले. ॥ ९१ ॥ जेथें वीरांची निबिड मिठी । रथ जोडितां तयानिकटीं । वरवाळूनी चमूच्या कोटी । वेष्टून **पार्थ** घेतला. ॥ ९२ ॥ जैसा ग्रामास कुंसाचा[6] वेढा । कीं **लं**केसी परिख[7] समुद्र गाढा । ना तो ध्रुवमंडळीं गराडा । नक्षत्रांचा ज्यापरी. ॥ ९३ ॥ तैसा **अर्जु**न वेष्टिला सकळीं । 'घ्या घ्या' 'मारा' एकची आरोळी । वर्षते जाले शरांचीं जाळीं । अनेक शस्त्रनिघातें. ॥ ९४ ॥ **कृ**ष्णसारथिसारथ्य राजा ! । त्रिजगा चळणा ज्याचिया तेजा । रथ फिरवी जैसिया विजा । लवोनी कोठें नाडले. ॥ ९५ ॥ गती विगती थरक सरक । चक्राकार भ्रमणादिक । लघुलाघव झप घोडके । पारियापरी डळमळी. ॥ ९६ ॥ **सं**शप्तक महाबळी । सहित वीर अतुर्बळी । बाणीं छादिला[8] **कि**रीटमाळी । जेवीं हेळी[9] धुळीनें. ॥ ९७ ॥ दशदिशा सुसाट बाण । जाणों वांकडी[10] लागली घनें । रथ बुजिला शरसंधानें । **कृष्णा**र्जुन दिसेना. ॥९८॥ वीरीं वाहोनियां टाळी । वाद्यें ठोकिलीं हर्षमेळीं । दुंदुभी, दमामे, काहळा, घोळी । ढोल, मृदंग, पणवादि. ॥९९॥ गजाश्व, रथी, पदातिवीर, । उसळोनी शस्त्रीं करिती मार । वीरमिठी निबिड घोर । किलकिलाट शब्दांचा. ॥ १०० ॥ स्मित हास्य करूनी चोज । बोलता जाहला **अ**धोक्षज । म्हणे, 'काळसर्पें ग्रासितां भेक[11] ज । कवळूं धांवे मशका. ॥ १०१ ॥ सिंहदंष्ट्रा शशक कोरी । भूतें वेष्टिजे **का**ळ समरीं । लोटोनी देवयानीचिया हारी । बुजों धांवती पावका. ॥ १०२ ॥ असो काळमहिमा उद्भट[12] । **पा**र्था! पुरुषार्थ करीं प्रगट । लोकत्रयीं कीर्तिवरिष्ठ । दावीं चोज[13] वीरांतें.' ॥ १०३ ॥ श्री**कृ**ष्णमुखींची ऐकोनी गोष्टी । क्रोधारूढ प्रदीप्त **कि**रीटी । भ्रुकुटी घालोनियां गांठी । **गां**डीव मुष्टिके कर्षिलें. ॥ १०४ ॥ नतपर्वणी तीक्ष्णबाण । सुवर्णपुंखी तीक्ष्ण पूर्ण । धारा-

---

१. पांचजन्य नामक शंखास धारण करणाऱ्या. २. संरक्षण कर. ३. समुदाय. ४. यमाच्या घराला. ५. आंत. ६. कोटाचा, भिंतीचा. ७. खंदक. ८. आच्छादिला. ९. सूर्य. १०. जोराची वृष्टि. ११. बेडूक. १२. जोरदार, बलाढ्य. १३. कौतुक.

मुखीं डळमळी अन्न । कोटीच्या कोटी सोडिले. ॥ १०५ ॥ आकाश भरलें तिहीं बाणीं । जाणों फुपाटे जैसा फणी । धडधडा वीर पडती धरणी । तुटोनी गात्र बीभत्स. ॥ १०६ ॥ प्रभिन्न द्विप शैलसरी । खंडुनी पडती धरेवरी । अमूल्य अश्व वायूपरी । ढळतां घाई दुखंड. ॥ १०७ ॥ पदाति-वीर मंडित शस्त्रें । पडलीं जैसीं गलित पत्रें । रथीं रथीं विभ्राजछत्रें । तुटोनी तळा कोसळती. ॥ १०८ ॥ शरलाघव हस्तकळा । ध्वज छेदिले एकेची वेळा । जाणों कुठारें पाडिलें ताळा । उभे धसूं न साधेची. ॥ १०९ ॥ चर्मकवचप्रताप धरणी । जाणों उगवल्या हिरेखाणी । शस्त्रें वस्त्रें भूषणें किरणीं । धरादेवी शोभली. ॥ ११० ॥ दुःसह मानोनी **सं**शप्तक । माया निर्मिल्या विविध देख । शस्त्रें वर्षती सहास तीख । रोषें **पार्थ** थडकला. ॥ १११ ॥ **गां**डीव ओढोनी कानाडी । **वा**यव्यास्त्र योजिलें प्रौढी । मंत्रोच्चार सबीज कोडीं । जपोनी, तोषें सोडिला. ॥ ११२ ॥ कडाडिला **कृ**तांतपाडे । तेजा गगन जालें थोडें । प्रसवले शरांचे जुंबाडे । जाणों विजा प्रळयींच्या. ॥ ११३ ॥ तटतटां शिरें पडलीं तळीं । बाहु उसळती नभमंडळीं । कायेपा-सोनी वेगळालीं । गात्रें खंड अपार. ॥ ११४ ॥ अश्वगजाची चांकोरी । भूमी रापल्या गजांच्या हारी । वीर विक्रमी **का**ळसरी । प्रेतदशा आतले. ॥ ११५ ॥ मही आकाश बाणमय । शवें व्यापिलीं, न पवे सोय । चतुरंग शवें खिचडीप्राय । एकमेकां संलग्न. ॥ ११६ ॥ **मा**वलमालव **त्रि**गर्तवीर । वायुचक्रीं फिरती सैर । निवटोनी त्यांतें **कृ**तांतघर । वस्तीलागीं वोपिलें. ॥ ११७ ॥ दैत्यगणांचे समुदाव । मारिले मर्दिले न कळे ठाव । खळखळाट रुधिरस्राव । नदी सागरा लोटली. ॥ ११८ ॥ उठोनी कबंध तये वेळीं । नाचों लागलीं रणगोंधळीं । भूतें चौंडकें टाळ-घोळीं । ब्रह्मराक्षस संबळे. ॥ ११९ ॥ श्वापद पक्षियांची सभा । दाटली घोर, पसरली जिभा । बाणमंडप घातला नभा । देवतापीठ **कृ**तांतू. ॥१२०॥ असो; रणकर्कश धुमाळी । **फा**ल्गुनसेना आणिली धुळी । जैसा पशुघ्न प-शूंच्या मेळीं । करी खंदळी निघातें. ॥ १२१ ॥ कीं निर्दय **का**ळ बाहुबळें । खंडी गजाचीं आयुष्यमुळें । ना तो खगेंद्र कौद्रवेयकुळें । भक्षितां न पवे त्रा-

---

१. पर्वतासारखे. २. ताडवृक्षास. ३. आकर्ण. ४. कौतुकानें. ५. दणाणला, कडकडाट उत्पन्न करिता झाला. ६. लोट, पेंडोळें, समुदाय. ७. चक्काचूर. ८.धड, मस्तकहीन शरीर. ९.चवंडकें, गोंधळ्याचें तुणतुणें. १०. संबळ=समेळ, गोंधळ्याची डल व धूम. ११. कंदळी, कदन, कत्तल, धुमाकूळ. १२. सर्पकुळें.

सातें. ॥ १२२ ॥ तैशा **अ**र्जुन शरांच्या धारा । वर्षतां न करी क्रोध परा । शर दाटले वसुंधरा । चालतां रथ थोकले. ॥ १२३ ॥ येरीकडे **द्रो**णाचार्य । व्यूह निर्मूनियां महावर्य । पातला तो कैथान्वय । पुढां सज्जनीं ऐकिजे. ॥१२४॥ श्रीगुरु**भी**मराजआदित्य । कृपारश्मी विकाशवंत । **न**रहरी**मो**रेश्वरसूर्यकांत । द्राव करी **ह**रिगुणा. ॥ १२५ ॥

अध्याय पांचवा.

संजय म्हणे, 'धरारमणा ! । कुमुदिनीकांतवंशाभरणा ! । स्वधर्मसेतु ! दुरितदळणा ! । शिक्षा करीं दुष्टांतें. ॥ १ ॥ **सं**शप्तक दानवेंद्र । सह **त्रि**गर्त बळसमुद्र । फोडुनी **पा**र्थ प्रतापरुद्र । नेते जाहले संग्रामा. ॥ २ ॥ 'सुपर्णव्यूह' **द्रो**णाचार्य । रचिता जाहला महावर्य । वीर वोपिले भागीं, भय । **का**ळ मानी जयांचें. ॥ ३ ॥ अग्रीं **गु**रु प्रतापभानू । सहित भूपराजनंदनू । दक्षिणपक्षीं आदित्य अनू । **कृ**तवर्मा दळेंसीं. ॥ ४ ॥ वामपक्षीं **विंदा**नुविंद । वेष्टीतसे महा विशद । मध्यभागीं चौदंत द्विरद । तेंवी राजा **कु**रुवर्य. ॥ ५ ॥ पृष्ठभागीं वीरनंदन । बंधुपुत्र भूपती प्रवीण । ज्याची दुःसह आंगवण । साहों न सके **सु**रेंद्र. ॥ ६ ॥ सेनागड विचित्र पौळी । रक्षणा वीर अतुर्बळी । **का**ळा **न** धरवे ज्यांची फळी । **भा**रती वीर प्रसिद्ध. ॥ ७ ॥ **क**रकाक्ष, **म**त्स्य, **भू**पशर्मा, । **सिं**ह, **क**लिंग, **क्षे**मवर्मा, । **कै**केय, **कां**बोज, **श**कुनि मामा, । **ज**यद्रथ, **भ**गदत्त, ॥ ८ ॥ **सु**रसेन, **द**रदभक्षक, । **भू**रिश्रवा, **सो**मदत्त, देख । **सु**दक्षिण, **श**ल्य नृपनायक, । **अं**बिष्ठ, **मा**गध, **पौं**ड्रादी, ॥ ९ ॥ **नै**षधसंपती, **य**वननाथ, । **भो**ज, **भू**मिजय, **भी**मरथ, । प्राची, पश्चिम, दक्षिण, उदित । भूमी भीमविक्रमी. ॥ १० ॥ यांहीं वेगळी अमित सेना । गजाश्वपती नव्हे गणना । विचित्र वाद्य गर्जोनी नाना । **पां**डव चमू लोटले. ॥ ११ ॥ जैसा जलार्णवा कल्लोळ । उसळे क्षयालागीं सबळ । कीं **शे**षमुखींची ज्वाळमाळ । भेदूनी तळा लोटले. ॥ १२ ॥ ना तो प्रावृटींचा मेळा । बुजों धांवला वडवानळा । कीं महर्षींचा क्रोधएकवळा । शापालागीं उसळला; ॥ १३ ॥ **द्रो**णाचार्य तैसियापरी । येतां देखिला **पां**डववीरीं । **ध**र्मराजें उत्साह गजरीं । 'मंडळव्यूह' निर्मिला. ॥ १४ ॥ रक्षक बळी वोपिले

---

१. येथें मूळांतील एकुणिसावा अध्याय समाप्त झाला. २. कथेचा संदर्भ. ३. चंद्रवंशभूषणा! ४. प्रताप, शक्ति. ५. उदीचीला, उत्तरेला. ६. भूतळाला किंवा पाताळाला. ७. रागाचा एकवटलेला आवेश.

वीर। ठाईंठाईं गंभीर शूर। अग्रीं **भी**मसेन **वै**श्वानर। वेष्टित वीर स्फुलिंगीं. ॥ १५ ॥ समुद्रा उकावे **अ**गस्ती। कीं **शुं**भा **दे**वी **श**क्ती। ना ते **ग**जासुरा **उ**मापती। थडके जैसा ज्यापरी. ॥ १६ ॥ **ध**र्मराज डेहुळ[1] चित्तें। बोलता जाहला **पा**र्षदातें। '**द्रो**ण प्रतापी बळाद्भुतें। धरूं मातें इच्छितो.' ॥ १७ ॥ हांसोनी बोले **धृ**ष्टद्युम्न। म्हणे, 'हें ऐकिजे अघटित कानें। गोगलगाईनें शिंगत्राणें। खोचोनी **मे**रु पाडिला; ॥ १८ ॥ ना ते डोळे उडवूनी थडका। महादिग्गजतवका। कीं बाळकें हाणोनि मुष्टिधडका। **शे**षमौळा भंगिलें; ॥ १९ ॥ तरीच **भा**रद्वाज तूतें राया!। जिंकील ऐसें भावीं हृदया। मी जिवंत असतां विजयी बाह्या। सामर्थ्य केंवी तयातें?' ॥२०॥ हर्षयुक्त **कु**रुनंदन। पिटुनी भेरी लोटिलें सैन्य। उभयवीर वैरवाळुन[3]। एकमेकां थडकले. ॥ २१ ॥ **पा**र्षदअश्व पारवेवर्णी[4]। पारियापरी ढाळी किरणी। रथ लोटुनी, प्रताप**त**रणी। मोहरला[5] **द्रो**णातें. ॥ २२ ॥ **दु**र्मुखें घालुनी आडवा रथ। बाणीं ताडितां **पां**चाळसुत। येरें निवारोनी शरघात। भ्रष्ट केला क्षणार्धें. ॥ २३ ॥ दुःसह मानोनी **द्रो**णाचार्य। क्रोधें धडकला प्रताप**सू**र्य। शर वर्षोनी अप्रमेय[6]। वीरें वीर खोंचला. ॥ २४ ॥ उभय चतुरंग वाहिनी। एकत्र जाहली, हाव दुणी। गजाश्वपती रथी धुंणी[7]। भरुनी वीर दाटले. ॥ २५ ॥ रथी वर्षती शरधारा। हस्तिप हाणे शस्त्र सैरा। गजगजांतें दंतभारा। एकएका धडकती. ॥ २६ ॥ अश्वारोह उसळोनी वेगें। शस्त्रें ताडिती वातवेगें। पदाति भिडूनी अंगें। विविध शस्त्रें हाणिती. ॥ २७ ॥ शस्त्रास्त्रमांदी सरतां पाहीं। वीर वीरा आसुडितां बाहीं। उंच नीच न गणती कांहीं। फावल्या वीरा ताडिती. ॥ २८ ॥ अंकुश स्पर्शोनियां मूर्ध्नी। गज दाटिले समरांगणीं। सारथी सांट[8] वारुवा गुणी। देवोनी धसती पुढारा. ॥ २९ ॥ वारणमुखींचे किंकाट। अश्वहिंसशब्द उद्भट। वीरांमुखींचे किलकिलाट। धडधडा रथाचे. ॥ ३० ॥ खणखणाट शस्त्रघाई। मागें न सरतीच कांहीं। झोडिती वीर फावल्या ठाईं। घाईं जर्जर जाहले. ॥ ३१ ॥ रथिया रथी विध्वंसिले। महावीर तळासी आले। रुधिरें सर्वांग डेंवरिलें[9]। किंशुकवृक्षासारिखें. ॥ ३२ ॥ मत्त मातंग पडिले मही। छिन्न गात्रें इषूनें तेही। एक खोडिती पाद पाहीं। शुंडाविरहित पैं एक. ॥ ३३ ॥ जैसें कुलिश **व**ज्रपाणी। ताडूनि शैळ पाडी

---

१. उद्विग्न चित्तानें; डहुळ=गढूळ. २ समज. ३. लोटून, चालून जाऊन. ४. पारव्या रंगाचे. ५. मोहरा देता झाला, सामना करिता झाला. ६. अगणित, असंख्य. ७. धुरोळ्यानें. ८. चाबूक. ९. माखलें.

धरणी । तैसे गजराज पडिले धरणी । एकीं दिशा लंघिल्या. ॥ ३४ ॥ अश्व-
ललामें मोलागळीं । छिन्नभिन्न पाडिली तळीं । वीरमौळें रुचिर कीळीं । हिणा-
विती नक्षत्रां. ॥ ३५ ॥ अधर प्रवाळ सुरेख भ्रकुटी । जाणों चढविल्या
धनुष्यकोटी । रत्नकीळा फांकती मुगुटीं । केशभारें साजिरे. ॥३६॥ ऐसी शि-
रांची लाखोली । भूलिंगासि वाहिल्या सबळी । करचरण बाहु वेगळाली । वपुविर-
हित अशोभा. ॥ ३७ ॥ कनकपताका ध्वजमंडित । विचित्र भूषणें सुशोभित ।
शस्त्रें कवच प्रदीप्त कांत । शोभा धरा डळमळी. ॥ ३८ ॥ घोर संग्राम
भयंकर । माजला, न सरे वीरश्रीभार । रक्तनदीचे तुंबळ पूर । सागरातें
लोटले. ॥ ३९ ॥ उभय चमूंचे रणखंदळीं । **द्रो**णशरांची वृद्धी आगळी ।
धर्मराज लोटुनी दळीं । बाणजाळीं वर्षला. ॥ ४० ॥ **द्रो**णप्रतापाच्या
लाटा । बाणीं रोधिल्या च्यार्‍ही वाटा । **धृ**ष्टद्युम्न रोषें कुरंटा । मोकळिल्या
शरकोटी. ॥ ४१ ॥ येरयेरांस अस्त्रप्रयोग । करुनी रुचिरें भेदिती अंग ।
शर शरांतें आणिती व्यंग । हस्तलाघव करुनी. ॥ ४२ ॥ न्यूनाधिक
पाहून नयनीं । **स**त्यजित लोटला धरणी । पंच बाण तक्षकमानी । **द्रो**ण-
सारथ्या अर्पिले. ॥ ४३ ॥ दश विंधिले हयोत्तमा । पृष्ठसारथी त्याची नेमा ।
ध्वज ताडुनी, घोरकर्मा । करुनी, धनु खंडिली. ॥ ४४ ॥ **भा**रद्वाज क्रोधा-
नळीं । वमिता जाला विषगुरळी । म्हणे, 'यांतें **कृ**तांतस्थळीं । वोपूं आतां
निर्धारें.' ॥ ४५ ॥ प्रदीप्त **द्रो**ण क्रोधावर्ती । अन्य चाप सज्जूनी निगुती ।
त्रिशत बाण **का**ळघाती । कंकपत्री सोडिले. ॥ ४६ ॥ **पां**चाळसुत **वृ**कनामा ।
मारिला **स**त्यजितें भावें नेमा । शत शर सोडूनी अमित प्रेमा । बाणीं बाण
खंडिले. ॥ ४७ ॥ तया मागें अति तांतडी । साहा शर अर्पिले **द्रो**णा प्रौढी ।
अद्भुत युद्ध लवडसवडी । निकरें जाहलें दोघांतें. ॥ ४८ ॥ एकत्र **स**त्यजित
वृक । नाराच वर्षती महा तीख । **द्रोण** क्षोभला अधिकाधिक । उल्का वमी
विषाच्या. ॥ ४९ ॥ तीक्ष्ण शर सोडून कोपें । उभयतांचें छेदिलें चाप ।
सहित सूत अश्वमापें । आयुष्याचीं भंगिलीं. ॥ ५० ॥ अन्य चाप सज्जोनी
रथीं । मोकळिल्या शरांच्या पंक्ती । छादिला **गुरु** जैसा गभस्ती । अभ्रजाळें
प्रावृटीं. ॥ ५१ ॥ **द्रो**णविद्येचा मगरगळा । हस्तलाघव कुशळकळा । कार्मुकें

१. घोड्यांचे साज, अलंकार. २. फार किंमतीचीं. ३. कुरंटा=तांबड्या कोर्‍हांटीचें झाड. ४. विषाची चूळ (गुळणा). ५. घाईनें, गडबडीनें. 'लवडीसवडी' हा शब्द **मु**क्तेश्वराच्या कवितेंतही आढळतो. (आदिपर्व—अध्याय ३४।५१ पहा). ६. बाण. ७. तीक्ष्ण, प्रखर. ८. येथें कदाचित् 'आगरमळा' असा शुद्ध पाठ असेल.

करोनी वैरवाळा । बाणकोटी सोडिल्या. ॥ ५२ ॥ उभय सारथी, चाप, घोडे, । पृष्ठी सारथी, केतूंचीं शिडें, । छेदुनी पाडिलीं जैसीं झाडें । कुठारें वनीं तळातें. ॥ ५३ ॥ तयापरी त्यांची गती । करुनी बाण सज्जिला शितीं । आकर्ण वोढोनी सोडितां दीप्ती । धरेवरी न समाये. ॥ ५४ ॥ जाणों तक्षक उसळला क्षया । कीं कृतांत धांवला दीप्त काया । तैसा अर्धचंद्रबाण महाराया ! । सत्यजितकंठीं बैसला. ॥ ५५ ॥ उसळोनी शिरस भरलें गगनीं । पुरोनी धांव, पिटिली धरणी । 'आहा !' शब्द पृतनावदनीं । पांडवदळीं माजला. ॥ ५६ ॥ क्रोधें वीर धडकले पुढां । शरांचा घातला वेढा । द्रोणाचार्य वेष्टुनी गाढा । शरांच्या पूरा वर्षती. ॥ ५७ ॥ गुरुवर्य प्रतापराशी । सर्वास्त्रभेदी संगरतोषी । मोकळोनी शर महारोषीं । विध्वंसिलें समस्तां ॥ ५८ ॥ जैसा तूंळीं धडकतां अग्नी । करुनी टाकी त्याचा धुंणी । कीं अभ्रपडळ वातगुणी । नाहींच करी सुसाटें. ॥ ५९ ॥ तयापरी त्रासितां वीरा । शतानीक धांविला सैरा । इषु वर्षोनी वज्रधारा । द्रोणाचार्या ताडिलें. ॥ ६० ॥ हांसोनी गुरु निजकौतुकें । बाण सोडिला रोषें तीखें । कुंडलें शिर सम्यक । खंडूनी धरे पाडिलें. ॥ ६१ ॥ 'अहा ! कटकटा ! मत्स्यवीरा' । म्हणती, 'मारिलें राजकुमरा.' । द्रोण शिरकोनी मत्स्यभारा । वीरां सकळां जिंकिलें. ॥ ६२ ॥ चैद्य, कारुष्य, कैकयभूप, । पांचाळ, सृंजय, पंडुराष्ट्र । विगत करुनी भग्नदर्प । घायें भयें त्रासिले. ॥ ६३ ॥ जैसा दावाग्नी धडकतां वनीं । श्वापदपक्षियां थोर पळणी । कीं अकाळवृष्टी वायुकिरणी । मार्गस्थांतें आकांतू. ॥ ६४ ॥ तैसियापरी द्रोणाचार्य । चमूभ्रष्ट वीरवर्य । क्रोधें तपें ग्रीष्मींचा सूर्य । भयचकिता वाहिनी. ॥ ६५ ॥ गजाश्व मारिले अमित रणीं । पदातिया नव्हे गणनी । रिक्त वाहनें फिरती कदनीं । पण्यांगनांसारिखीं. ॥ ६६ ॥ रूपरेखा लावण्यकीळा । फांके तारुण्यमद आगळा । राजपुत्ररथांचा मेळा । खंड धुळीं लोळत. ॥ ६७ ॥ बंब्राळ रुधिर सर्व गात्रीं । दाटली शवें पूर्ण धात्री । रक्तप्रवाह भूमिपात्रीं । नदी सागरा लोटली. ॥ ६८ ॥ सरितासाहित्यकल्पना । वेदव्यासें रचिल्या नाना । क्षणक्षणां बोलतां वदना । त्रास श्रोते मानिती. ॥ ६९ ॥ क्रूर श्वापदपक्षिगण । भूतपिशाचें घातलें ठाण । रौद्र संग्राम अतिदारुण । भ्याडा भीड निघेना. ॥ ७० ॥ दुःसह मानोनी पांडववीर । उसळले क्रोधें वैश्वानर । जाणों लोटला

१. हल्ला, धाड, घसरा. २. धनुष्याच्या दोरीवर. ३. पृतना=सेना. ४. कापसाचे ठायीं. ५. राख, धुरोळा. ६. अगदीं निखालस, निःशेष. ७. हायहाय. ८. वाटसरांस, प्रवाशांस. ९. धरित्री, पृथ्वी. १०. भयानक.

रत्नाकर[1] । क्षयालागीं युगांतीं. ॥ ७१ ॥ एकमेकां टाकोनी मागें । वीर धसले [वीर–] श्रीरंगें । धडकोनी द्रोणा महारागें । ताडिते जाहले शरांतें. ॥ ७२ ॥ नतपर्वणी[2] तीक्ष्ण भाळी । पांच अर्पी शिखंडी मौळीं । क्षत्रधर्मा शर अतुर्बळी । वीस विंधी गुरुवर्या. ॥७३॥ वसुदामवीरें शरासन । कर्षोनी विंधिले पांच बाण । उत्तमौजा राजनंदन । तीन क्रोधें अर्पिले. ॥ ७४ ॥ क्षत्रदेव काळघाती । सात अर्पिले द्रोणाप्रती । सात्यकी वीर सेनापती । शत ताडी द्रोणातें. ॥ ७५ ॥ युधामन्यु आठ शरीं । विंधी द्रोण प्रतापगिरी । बारा बाण निकरें समरीं । धर्मराजें विंधिले. ॥ ७६॥ धृष्टद्युम्न चावोनी अधर[3] । ताडिले दश बाण, तीक्ष्ण शर । चेकितान भूप दर्वीकार[4] । तीन विंधी गुरुवर्या. ॥ ७७ ॥ प्रतापरुद्र भारद्वाज । धीर शूर प्रभिन्न गज । तृणांकुरापरी इषुबीज[5] । मानोनी रोषें लोटला. ॥ ७८ ॥ कीटक भृंगी विषकांटा । भेद करी गजेंद्रललाटा । ना ते सूचिकाग्रें[6] गिरिकूटा । लोटतां भूमी ढांसळे. ॥ ७९ ॥ कीं कुंदपुष्पाचा झेंला[7] । ताडितां रुद्र पावे झोला । ना तें गोधाविष[8] तीव्र गरळा । पतंगेश्वरा[9] बाधिजे. ॥ ८० ॥ तयापरी द्रोणाचार्य । शर न गणोनी लोटला शौर्य । बाण वर्षोनी अप्रमेय । वीरवीर खोंचले. ॥ ८१ ॥ काळविखारी बाणवारा[10] । ताडुनी शिखंडी केला पुरा । रुधिरस्राव गलित धारा । धरादेवी अभिषेकू. ॥ ८२ ॥ उत्तमौजा पांचाळसुत । वीस बाणीं ताडिला त्वरित । गिरीखी[11] खावोनी लावी हात । ध्वजयष्टिका तांतडी. ॥ ८३ ॥ वसुदाम वसुमतीमान । महाराज प्रतापवान । द्रोणें सोडुनी निर्वाण बाण । यमसदना धाडिला. ॥ ८४ ॥ क्षत्रधर्मा विक्रमी भूप । ऐशीं शरें भंगिला दर्प । सुदक्षिणभूविखारी सर्प । सदुसष्ट बाणीं ताडिला. ॥ ८५ ॥ क्षत्रदेव विंधोनी बाणीं । नीडोंपा[12]-सोनी पाडिला धरणी । युधामन्यु शौर्यतरणी । चौसष्टीं शरीं खोंचला. ॥८६॥ रुक्मरथी[13] बिभ्राजकिरणी । युधिष्ठिर केला भ्रष्ट रणीं । कितवराज पांचाळ गुणी । धर्मसाह्या लोटला. ॥ ८७ ॥ तेणें करितां आडवारा[14] । द्रोण कोपला चौगुणा पुरा । बाण सोडुनी राजकुमरा । सूताश्वसह मारिलें. ॥ ८८ ॥ किलकिलाट

---

१. समुद्र. २. कमानदार, वक्र. ३. अधर (दांत) चावणें–हें रागाचें द्योतक चिन्ह आहे. 'दशन चावणें' हा शब्दसमूह मुक्तेश्वरानें आपल्या काव्यांत ठिकठिकाणीं योजिला आहे. [आदिपर्व–अध्याय ३१।६८; सभापर्व–अ० १४।२०८ पहा.] ४. सर्प. ५. बाणपरंपरा. ६. सुईच्या टोंकानें. ७. गुच्छ. ८. घोरपडीचें विष. ९. गरुडास. १०. शरसमूहाला. ११. चक्कर, फिरकी. १२. नीड=रथांतील बसण्याची जागा. १३. सुवर्णरथी. १४. अटकाव, अडथळा.

पांचाळचमू । 'मारील' म्हणती, 'राजसत्तमू' । विगत जाहला वीरश्रीभ्रमू । शौर्यसूर्य निमाला. ॥ ८९ ॥ जैसीं सूर्योदयीं विगती [१]भंगणें । भ्रष्ट होवोनी लपविती मान । कीं झुंझवातें घनाचें ठाणें । पळतें आपें ज्यापरी. ॥ ९० ॥ ना तें, गरुडपक्षाचे सुसाटें । तरुवर लागती बारा वाटे । कीं 'हरी'गजराचेनी नेटें । पळती पापें ज्यापरी. ॥ ९१ ॥ तयापरी भ्रष्टसेना । धीर न धरवे कोण्हा । **सृं**जय**पां**चाळ**धृ**ष्टद्युम्ना । **चे**कितादि वार्धक्य. ॥ ९२ ॥ **कै**कय, **म**त्स्य विगत तेजें । सहित सेना **ध**र्मराज । भूपती विक्रमी तेजःपुंज । भ्रष्ट जाहले सर्वही. ॥ ९३ ॥ जय लाधला **गुरु**वर्या । **कौ**रव चालती पिटोनी बाह्या । जैसा दानवजयीं **अ**मरवर्या । उत्साह तेवीं सर्वांतें. ॥ ९४ ॥ वीर वीर त्रासिले शरीं । भय पावोनी निघाले दुरी । विगत मानसें आनपरी । [२]गोता चक्षीं लक्षिती. ॥ ९५ ॥ **धृ**तराष्ट्र पावोनियां तोष । बोलता जाहला **सं**जयास । '**पां**डववीर पावले त्रास । चोज नोहे; बाळका ! ॥ ९६ ॥ **द्रो**णाचार्य प्रतापसूर्य । केवीं साहती त्याचें वीर्य ? । भीमपुरुषार्थी भूपवर्य । [३]खद्योतप्राय त्यां तेज. ॥ ९७ ॥ **दु**र्योधनाचे अनन्य हितीं । कळलें भंगिल्या नृपांच्या पंक्ती । सर्वास्त्रभेदी **का**ळघाती । कोण जया पावेल ? ॥ ९८ ॥ असो आतां **पां**डवसेना । भ्रष्ट जालिया विचक्षणा ! । काय करिते आणा मना । उभय वीर संग्रामीं'. ॥ ९९ ॥ **सं**जय म्हणे, 'नरमंडणा ! । विगत जालिया **पां**डवसेना । अत्यंत हर्ष **दु**र्योधना । अर्णवापरी हेलावे. ॥ १०० ॥ वर्षाकाळीं जळाची वृष्टी । नदी उसळते जैसी [४]लोटीं । कीं गतपुत्राची होतां भेटी । आनंदाश्रुठेवणीं. ॥ १०१ ॥ ना तें, जारणीचे भाषणीं । सुखाची [५]हाँव स्पर्शे गगनीं । कीं वसंताची पावतां भरणी । [६]द्रुमा टवटवी ज्यापरी. ॥ १०२ ॥ तैसा आनंद **दु**र्योधना । स्मितहास्य बोले **क**र्णा । म्हणे, 'पाहें पां **पां**डवसेना । क्रंदमान पळताहे. ॥ १०३ ॥ **द्रो**णप्रतापाच्या शरीं । चकनाचूर जाहले, भय अंतरीं । पुन्हा युद्धा न येती समरीं । ऐसें मातें दिसताहे.' ॥ १०४ ॥ हांसोनी बोले **र**विनंदन । म्हणे, 'तूं राया ! विचक्षण । जाणता होसी, किमर्थ [७]नेणें । **पां**डवांच्या पुरुषार्था ? ॥ १०५ ॥ जैसे [८]काकशारीरकाचे शब्दध्वनी । विगत होय विशाळ फणी । कीं गजेंद्र झिरपिल्या जीवनीं । चांचपतां बुडिजे,

---

१. नक्षत्रें. २. रक्षक, संरक्षण करणारा. ३. काजव्याप्रमाणें. ४. लोट=पाण्याचा लोंढा, पूर. ५. आशा. ६. झाडांस. ७. ओळखीत नाहींस. ८. कावळ्याचा देह धारण करणाऱ्याच्या ओरडण्यानें.

॥१०६॥ ना ते, राहुदशेचिया साउली । भ्रष्टोनी सूर्य मिळे धुळी । कीं माया-नदीच्या खळाळीं । कपिलमुनी वाहिजे, ॥ १०७॥ ना तें, स्वप्नीं शरीर खंडलें। ते जागृतीं साच मानिलें भलें । कीं अभ्रपडळीं झांकिलें । सोमबिंब नुगवे कीं; ॥ १०८ ॥ तयापरी पांडववीरा । अजय मानीं राजेश्वरा! । समरांगणीं वृको-दरा । उभा काळ भीतसे. ॥ १०९ ॥ महाप्रतापी अर्जुन बळी । करी वीरांची खंदळी । युद्धा मिनतां चंद्रमौळी । बाहुबळें तोषवी. ॥ ११० ॥ सुरासुर-दानवाधिपा । युद्धीं अजिक्य राक्षसनृपा । विगत कर्ता त्याचिया दर्पा । भूतळीं वीर दिसेना. ॥ १११ ॥ आतांची पाहें पां राया! दृष्टी । संगो[1]ळल्या वीरांच्या कोटी । जैसा अर्णव उसळे लोटीं । प[2]र्वीं लाटा जयाच्या. ॥ ११२ ॥ तयापरी शौर्यसमुद्रा । भरतें दाटलें दिसे मुद्रा । वीरलहरी संग्रामचंद्रा । देखोनियां उसळती. ॥ ११३ ॥ पाहें पां रथी बिभ्राजकीळी । [3]तप्तहाटकज्वाळमाळी । ध्वजीं पताका शोभा आगळी । जेवीं अग्नी होमाचा. ॥ ११४ ॥ रोषें शिखा लागती गगना । उसळोनी मिळों पाहती रणा । 'धांव धांव राया! रक्षीं द्रोणा । वीरमांदीसहितें.[4]' ॥ ११५ ॥ असो; आतां पुढील कथन । ध्वजवाहनरथ-निरोपण । भारत समुद्रींचें घुसळण । करितां ग्रंथ अफाट. ॥ ११६ ॥ ति-तुका कवळोनियां अर्थू । बोलों कथेचा न खंडतां तंतू । जैसा बीमाजी वृक्ष समर्थू । विचक्षणीं जाणिजे. ॥ ११७ ॥ कीं भारतकथातेजोरा[5]शी । वर्धतां पांथिका श्रोतियांसी । श्रम होवोनी निजमानसीं । श्रवणपंथा उबगती. ॥ ११८॥ तीव्र विस्तार मध्यान्हकाळ । टाळोनी, प्रार्थिला अपराह्णमेळ । कथा मार्ग कथितां अचळ । वक्तियां श्रोतियां आनंदू. ॥ ११९ ॥ कीं भारतजान्हवी पुनीत सर्व । कथापूर डहुळ गौरव । निवळोनी कुप्या अपूर्व । [6]रामनाथा भरिजे पैं. ॥ १२० ॥ ना ते भारतरत्नकामधेनू । कथाक्षीर सुदोहा वनू । गाबाळ अग्नी जाळुनी पूर्णू । उरे मग शुद्धत्वें. ॥ १२१ ॥ असो भोजन ष[7]ड्रस प्रकार। सेविल्या तृप्ती होय आदर । तेची सुधा प्राप्त जालिया ढेंकर । नुगवे [प्राशक-मुखीं का?]॥१२२॥ ना ते शर्करेची जाली प्राप्ती। किमर्थ उंसाची करणें खंती?। कीं आम्रफळ चढल्या हातीं । केवीं [8]मावणें चिबुडातें? ॥ १२३ ॥ असो वेद-

---

१. जमल्या, दाटल्या. २. अमावास्येच्या व पौर्णिमेच्या दिवशीं. ३. तापलेल्या सोन्याच्या ज्वाळांनीं शोभणारा. ४. येथें मूळांतील बाविसावा अध्याय संपतो. ५. भारतकथारूपी सूर्य. ६. गंगेची कावड रामेश्वरावर घालण्याचा प्रघात आहे. ७. षड्रस=मधुर,तिक्त, कषाय जाण । कटु, अम्ल आणि लवण। षड्रस बोलती विचक्षण। सूपशास्त्रीं जाणते॥' [मुक्तेश्वर—आदिपर्व अ० २९।५९]. ८. मोहणें.

व्यासकथामार्गे । गेले त्यांचिया पाठीलागें । मी बिगारी वोझें अंगें । घेवोनी मागें येतसें. ॥ १२४ ॥ श्रीगुरुसमर्थ **भी**मराज । कृपानुग्रह वर्षतां बीज । **नर**हरी **मो**रेश्वर कथाभोजें[1] । श्रोतियांतें वोगेरी[2]. ॥ १२५ ॥

अध्याय सहावा.

राजराज छत्रपती । **व्या**सवीर्यज[3] प्रख्यात क्षिती । **अं**बिकातनय[3] **सं**जयाप्रती । बोलता जाहला सुवाक्य. ॥ १ ॥ म्हणे, 'बाळका! रथाश्वचिन्ह । **द्रो**णा उंकावले[4] वीर घन । सविस्तर मातें करीं श्रवण । तूं विचक्षण सर्वार्थी.' ॥ २ ॥ **सं**जयो वदे, 'राया! सुमती! । केवीं ऐश्वर्य वर्णवे मती? । तथापि सांगतों तुझिये आर्ती । स्वल्प कांहीं; नरवर्या! ॥ ३ ॥ आरक्त अक्षि गुलालवर्णी । हयोत्तम विभ्राजकिरणी । रुक्मरथी गदापाणी । **वृ**कोदर फुपाटे. ॥ ४ ॥ रजतवर्ण शुद्ध हय । जाणों सांबणी[5] केलें पय । वीर **सा**त्यकी **या**दववर्य । रत्नरथीं मिरवला. ॥ ५ ॥ सारंगअश्व कज्जलवर्णी । वेग वायु सारिती चरणीं । **यु**धामन्यु **पां**चाळ गुणी । स्यंदनीं **द्रो**णा उकावे. ॥ ६ ॥ पारवा रंग पारियापरी । अळती[6] अश्व जंव समरीं । तप्तहाटकरथावरी । **धृ**ष्टद्युम्न तळपतू. ॥ ७ ॥ पद्मपत्र तुरंगमकांती । **शि**खंडीचे शोभती रथी । **कां**बोजराज धरापती । शुकरंग लाजवी दर्शनी. ॥ ८ ॥ भिंगुरप्राय[7] **न**कुळघोडे । वेगा वायूस पडे कोडें । मेघसंकाश[8] तेजिष्ट गाढें । **उ**त्तमौजाचे; नरेंद्रा! ॥ ९ ॥ तितरकल्पाश हयवर्णी । ज्यांच्या वेगा न पुरे धणी[9] । रुक्मरथीं[10] **स**हदेव गुणी । हययुद्धीं उकावे. ॥ १० ॥ जांबूनंद[11]प्रदीप्तकळा । जडाव रथीं विभ्राज कीळा । हयोत्तमभूषित घनमाळा । तेजें विराजे **धर्म**राजू. ॥ ११ ॥ ललामवर्णी उत्तमोत्तम । **पां**चाळरथीं तुरंगोत्तम । पाठी प्रताप नृपसत्तम । **उ**त्तमौजा लोटला. ॥ १२ ॥ पुत्रपौत्र सुहृद आप्त । सर्वास्त्रभेदी विद्यातृप्त । बारा सहस्र वीर धूर्त । एकताटी पंक्तीचे. ॥ १३ ॥ सुवर्णरथा साजिरे ध्वजू । पताका तळपती जैशा विजू । तुरंगम रथीं तेजःपुंजू । वेगें वाता सारिती. ॥ १४ ॥ आरबी, **ता**म्री, **धं**द, **तु**रकी, । **को**तळ, **को**ल्हार, **क**च्छ, इराखी, । **जा**बी, **आ**र्बान, **टा**कण, **तु**रकी । **का**ठीवाड, **डों**ब बंदरी; ॥ १५ ॥ **ब**दकशान, सारंग, निळे, । **चि**तोडे, जरदे, अंब्रिनीळे, । पंचकल्याण, गांगे, पिवळे, ।

---

१. कथारूपी भोजन. २. वाढी. ३. धृतराष्ट्र. ४. उठावले. ५. साबणाच्या फेंसानें युक्त. ६. अळल्याच्या रंगाचे, लाखट तांबड्या रंगाचे. ७. भिंगरीसारखे, अत्यंत चंचळ. ८. मेघासारखे (नीलवर्ण). ९. तृप्ति, वैपुल्य. १०. सोन्याच्या रथांत. ११. जांबूनद=सुवर्ण.

कुमाइत, शामकर्ण. ॥ १६ ॥ बोर, अबलख, वाघांबरी, । सप्तद्वीपींचे अश्व नानापरी । नवखंड धरे समुद्रतीरीं । जाती अनेक अश्वांच्या. ॥ १७ ॥ ऐसिया गुणीं अश्वोत्तम । रथीं जुंतिला पाखरा[1] हेम । रुक्मांबर वर्णी विचित्र काम । जाणों चित्रीं चित्रिले. ॥ १८ ॥ ऐसी स्यंदनांचिया धाटी । जैसा उसळे अर्णव लोटीं । तयामागें कैकय हटी । साहा सहस्र लोटले. ॥ १९ ॥ द्रौपदीपुत्र सिंहशावक । जाणों मूर्तिमंत पांच अर्क[2] । रूपलावण्य विद्याविक[3] । तेजें द्रोण पंचधा. ॥ २० ॥ श्रुतसोम पुत्र अर्जुनाचा[4] । पित्यासमान विक्रम त्याचा । माषपुष्पवर्ण[5] हयाचा । हेमरथी धडकला. ॥ २१ ॥ शतानीक नकुळतनय । शालिपुष्पित[6] रंगीं हय । बालार्ककिरणी स्यंदनवर्य । संगरातें धांवला. ॥ २२ ॥ कांचनवर्ण मयूरग्रीवा । हयोत्तम रथीं जेवीं मघवा । श्रुतकर्मा[7] भूषणीं बरवा । रणांगणा उफाळे. ॥ २३ ॥ श्रुतकीर्तीच्या लाटा । पार्थासमान विक्रमताठा । तासवर्ण[8] अश्व सुभटा । वातवेगें उसाळे. ॥ २४ ॥ शतधृती कांचनरथीं । आरूढे जैसा शचीपती । सोमरश्मी हयप्रदीप्तकांती । धांवे क्रोधें युद्धातें. ॥ २५ ॥ पिशंगीवर्ण[9] प्रथमवयसा । हय करिती रथा वळसा । अभिमन्यवीरप्रतापतोषा-। सारिखे रणीं राबती. ॥ २६ ॥ रुक्ममाळाअळंकृत । हेमवर्णी अश्वमंडित । काशिराज स्यंदनयुक्त । रणांगणीं डोलला. ॥ २७ ॥ कांबोज आणि प्रभद्रक । साहा सहस्र रथी ठळक । विचित्रवर्ण हय सम्यक । रथारूढ थडकले. ॥ २८ ॥ कांषायवर्ण[10] सुवर्णपाळा । चेकितानवाजी राजित कीळा । रुद्रधनुष्यासारिखी कीळा । कुंतिभोजवाजी सुदर्शी. ॥ २९ ॥ समुद्रसेन पुत्रासहित । समुद्रवर्णी हय उन्नत । शशांककांती वाजि श्वेत । चंद्रसेनरथाचे. ॥ ३० ॥ नीलोत्पलदलवर्णी । सैंधवअश्व थरकती गुणी । चक्रवाककांती हयगुणी । कौसल्यपतिपुत्राचे. ॥ ३१ ॥ शिव आणि चित्ररथ । विचित्र माळा हयमंडित । रासभवर्ण धगधगित । व्याघ्रदत्तवाजी प्रतापी. ॥ ३२ ॥ चतुर्दश अयुत वीरमांदी । उसळले भूप काळक्रोधी । द्रोण प्रतापाचा उदधी । अगस्तिरूप ग्रासावया. ॥ ३३ ॥ नानावर्ण विचित्रध्वज । घंटापताकीं तेज:पुंज । नानावर्ण हयोत्तमराज । माघारिती वायूतें. ॥ ३४ ॥ कांचनध्वज जडाव रत्नीं । स्यंदनारूढ गदापाणी । भीम

---

१. घोड्यांच्या झुली. २. सूर्य. ३. विद्यासंपन्न. ४. अर्जुनाच्या पुत्राचें नांव 'श्रुतकीर्ति' असें होतें. 'श्रुतसोम' हा भीमाचा मुलगा. ५. उडदाच्या फुलाचा रंग. ६. भाताच्या फुलानें युक्त= भाताच्या कणशीसारखे. ७. हा सहदेवपुत्र. ८. तास (चाष) पक्ष्याच्या रंगाचा. ९. पिंगट रंगाचे. १०. तांबड्या वर्णाचे.

पुढारे, जैसा कदनीं । सुरांसहित **सु**रेंद्र. ॥ ३५ ॥ माघां वीरांच्या थाटी । शस्त्रें झळकती तीव्रमुष्टी । **पा**र्षदवीर जगजेठी । अग्रभागीं चामके. ॥ ३६ ॥ **द्रो**णाचार्य कांचनरथीं । ध्वजीं मिरवे प्रदीप्तकांती । कृष्णाजिनाव्यक्तीं । चिन्हें सर्वही लक्षिती. ॥ ३७ ॥ वैडूर्यमणी रत्नखचितू । **भी**मसेनाचा विशाळ केतू । विभ्राजमान स्वानंदभरितू । लोटता जाहला वीरासी. ॥ ३८ ॥ **कु**रुवर्यराजशिखामणी । **ध**र्मराज ऐश्वर्यखाणी । विशाळध्वज सोमकिरणी । वीरभगणीं शोभला. ॥ ३९ ॥ अनेक वाद्यें वाद्यध्वनी । घोषें दिशा भरिल्या गगनीं । **न**कुळध्वज शरभचिन्ही । शोभायमान डोलला. ॥ ४० ॥ श्रीमान्य **स**हदेव हर्षयुक्त । कांचनध्वज चिन्हांकित । **पां**चाळराज केतुमंडित । जेवीं **म**रुद्गण **श**क्रा पैं. ॥ ४१ ॥ **अ**भिमन्युरथाचा केतू । हेमांबरी लखलखितू । शाङ्गपक्षीचिन्हांकितू । रुक्मघंटा साजिऱ्या. ॥ ४२ ॥ **घ**टोत्कच राक्षसराज । गृध्रपक्षी विशाळध्वज । कामिक अश्व मायाबीज । **रा**वणरथासारिखे. ॥४३॥ **मा**हेंद्र धनुष्य दिव्यकांती । **ध**र्मराजाचे शोभे हस्तीं । **वा**य्व चाप अभंग व्यक्ती । मिरवे मुष्टीं **भी**माच्या. ॥ ४४ ॥ पूर्वीं त्रैलोक्यरक्षणार्थ । **ब्र**ह्में निर्मिलें चाप समर्थ । तें **गां**डीवधनु उचितार्थ । **अ**ग्नीनें **पा**र्था अर्पिलें. ॥ ४५ ॥ **वै**ष्णव चाप **न**कुळप्राप्त । **स**हदेवासी **अ**श्विनीदत्त । **घ**टोत्कचासी **पौ**लस्तीकृत्य । प्राप्त धनु जयश्री. ॥ ४६ ॥ रौद्र अग्नीसमान कांती । **कु**बेरें निर्मिल्या होती । ते **द्रौ**पदीतनय जाली प्राप्ती । पांचांजणां अभंग. ॥ ४७ ॥ तीव्र धनुष्य लाधलें **रा**मा । तेणें **सौ**भद्रा अर्पिलें प्रेमा । जें चपळ अढळ संग्रामा । भंग **कृ**तांता नव्हेची. ॥ ४८ ॥ ऐसियापरी अनेक चाप । ध्वजा प्रज्वाळ अग्नीची रोपें । धडकते जाहले रोषें ताप । **द्रो**णाचार्या निघातें. ॥ ४९ ॥ जाणों वन्हीचा एकवळा । कीं द्वादश सूर्य एकत्र मेळा । कीं नवग्रह उसळे कीळा । क्षयालागीं युगांतीं. ॥ ५० ॥ तयापरी **पां**डववीर । उसळले क्रोधें महाथोर । **कौ**रव वीर धीर शूर । धसले पुढें उत्साहें. ॥ ५१ ॥ करितां **द्रो**णासी वैरवाळा । वीर आडवे लोटती सबळा । शर वर्षती अग्निज्वाळा । एकमेकां निघातें. ॥ ५२ ॥ **इं**द्रयुद्ध कडोविकडी । वीरवीरां ताडिती प्रौढी । जेंवी वन्हीची पडतां उडी । शिखा अग्रीं धांवती. ॥ ५३ ॥ कीं पर्जन्यवृष्टी नव्हतां पुरी । चिर कमान उचली वरी । कीं हिमवंताचिया विजोच्छारी । पुढां सीत सुसाटे. ॥ ५४ ॥ तैसियापरी वीरउठावा । एकमेकां

१. जाई, गमन करी. २. वीररूपी नक्षत्रांत. ३. उचित=उपायन, भेट, नजराणा. ४. बाण. ५. तडाख्यानें. ६. घुसले, शिरले. ७. हल्ला. ८. पुष्कळ वेळ उठाव (जोर) करिते,

वारितां हावा[1] । गजानीकाचा पाहोनी यावा । क्रोध **भी**मा न साहे. ॥ ५५ ॥ रथ लोटूनी प्रबळ रागें । शरीं भेदिलीं गजांचीं अंगें । भूमी पडती जैसीं शृंगें । वज्रें शैल ताडितां. ॥ ५६ ॥ प्रभिन्न करटी[2] मदस्रावित । फोडुनी वेगळे केले दंत । शतशा करूनी पदातीत । धरे कोथळे पाडिले. ॥ ५७ ॥ अट्टाहास्य भैरव शब्द । करुनी प्राण सोडिती द्विरद । एक छिन्नगात्री पावोनी खेद । दिशा सैरा धांवती. ॥ ५८ ॥ गजप्रतापवीर[3] । छिन्नगात्री उडविलें शिर । भयें उड्या टाकोनी सत्वर । बहुधा वना पिटिले. ॥ ५९ ॥ अधिकारिया[4] क्रूर वेळा । पावतां, अश्रांत लंघिती माळा[5] । कीं वना धडकती अग्निज्वाळा । श्वापदें पळती दिशांतें. ॥ ६० ॥ ऐसिया परी गजआपदा । **भी**मसेन पेटला द्वंद्वा । जळदप्राय वारणवृंदा । तळपे **भी**म जेवीं पैं. ॥ ६१ ॥ **दुर्यो**धन वारणस्कंधीं । दुःसह पावोनी पावला युद्धीं । शर वर्षोनी **का**ळक्रोधीं । **वृ**कोदरा ताडिलें. ॥ ६२ ॥ तया क्षणीं क्षितिपती क्षत । निरखोनी क्षया जाला उदित । तीक्ष्ण शर क्षरातीत । शरासनीं सज्जिले. ॥ ६३ ॥ वोढ[6] काढोनी सत्राणें । बाण सोडिले महात्राणें । **कौ**रवअंगीं खडतरून । धरेमाजी विझाले. ॥ ६४ ॥ त्वरा करुनी शरसंधानीं । ध्वज छेदोनी पाडिला धरणी । गजराज भूषित वस्त्राभरणीं । घंटामंडित ताडिला. ॥ ६५ ॥ शर शिरकतां कुंभस्थळीं[7] । घनाऐसी फोडूनी आरोळी । पडता जाहला महीतळीं । गिरिशृंगासारिखा. ॥ ६६ ॥ वारणरक्षक **म्ले**च्छभूप । महाप्रतापी दारुणदर्प । आडवे निघतां, **भी**मा कोप । द्विगुण जाहला वधार्थी. ॥ ६७ ॥ तीक्ष्ण वर्षोनी बाणजाळीं । शतशा शिरें उडविलीं अंतराळीं । 'हाहा'कार **कौ**रवदळीं । म्हणती 'भूप मारिला.' ॥ ६८ ॥ ऐकोनी वीरांच्या लोटल्या पंक्ती । अग्र **भ**गदत्त प्रतापकीर्ती । ज्याचिया गजासमान[8] क्षिती । नाहीं दुजा सर्वथा. ॥ ६९ ॥ कीं **ऐ**रावतीचा धाकुटा बंधू । नागायुतविक्रमसिंधू[9] । ज्याच्या बळाचा मानोनी खेदू । **का**ळ परां[10] सरतसे. ॥ ७० ॥ सदा मस्त; कर्ण, ग्रीवा, कटी, । त्रिधा मद गळे भूतळवटीं । धडकें[11] पर्वत माघां लोटी । रूपें मेघ दूसरा. ॥ ७१ ॥ रुक्मघंटा, विचित्र माळा । कर्णीच्या भदें फांकती कीळा । प्रभिन्न[12] शुंडीं दृढ

---

१. चाल, हल्ला, आवेश. २. हत्ती. ३. हत्तींवर आरूढ झालेले. ४. सरकारी अमलदार, मुत्सद्दी इत्यादिकांस. ५. माळ=लागवडीस न आलेली ओसाड जमीन. ६. ओढ घेऊन, (धनुष्याची दोरी) ताणून. ७. गंडस्थळांत. ८. मागें अ० २ ओं० ९२ पहा. ९. दशसहस्र नागबळी, दहा हजार हत्तींचें बळ ज्यास आहे असा. १०. पलीकडे किंवा मागें. ११. धडीकीनें, धडकीनें, टकरीनें. १२. विशाल, मोठ्या.

शृंखळा । वज्रप्राय खळखळी. ॥ ७२ ॥ [1]हलासमान विशाळदंत । जडाव रत्नीं सुशोभित । उन्नत केतु ववथवित । इंद्रधनुष्यासारिखे. ॥ ७३ ॥ पृष्ठभागीं [2]चवरडोल । जडाव रत्नीं रुचिरमेळ । वरी मिरवला वीरशार्दूळ । **भ**गदत्तराज प्रतापी. ॥ ७४ ॥ **भी**मबळाचा उत्कर्ष थोर। साहों न शके राजेश्वर । अंकुश स्पर्शोनी गजवर । रोषें **भी**मा लोटला. ॥ ७५ ॥ पाहोनी येरें कर्षोनी धनू । बाण सोडिले प्रभिन्न घनू । उसळोनी तेजें गगनू । गजेंद्रमूर्ध्नी शिरकले. ॥ ७६ ॥ रुधिरस्राव जाहला सडा । [3]झाडोनी मौळें लोटला पुढा । द्विगुण क्रोध दाटला गाढा । स्यंदनातें धडकला. ॥ ७७ ॥ धरूनी रथ [4]मकर-तोंडीं । भूमी आपटिला महाप्रौढी । चकचूर होऊनि गेलीं घोडीं । **भी**म दुपायीं उडाला. ॥ ७८ ॥ धांवोनी द्विरद पादपादा । देवोनी उराचा ताडिला [5]सांदा । शुंडें कवळोनी घालितां मदा । रोषें **भी**मा नावरे. ॥ ७९ ॥ आसडूनी हस्त वज्रमुष्टी । वोपोनी त्राणें घोर दृष्टी । चांचरी जातां उठाउठी । मोकळा जाहला **पां**डव. ॥ ८० ॥ सरक मारोनी गजोत्तम । शुंडे ताडितां **या**दवीं **भी**म । [6]द्वयविषाणीं ह्रदयपद्म । आसुडिले प्रतापें. ॥ ८१ ॥ गिरकी खावोनी ते काळीं । लत्ता वोपिली पादकमळीं । गज फोडूनी आरोळी । पुढां धांवला सरोषें. ॥ ८२ ॥ शुंडादंड प्रचंड धडका । साहों न शके **कु**रुकुळटिळका । चुकवोनी घाय अग्निशिखा । पोटातळीं निघाला. ॥ ८३ ॥ वीर **भी**मसेन जगजेठी । विन्मुख रणीं नेदीच पाठी । यालागीं निघोनी गजाच्या पोटीं । चुकवी मारी दोघांची. ॥ ८४ ॥ वारण अत्यंत घाबिरा । पायें तुडवूं पाहे वीरा । **भी**म चुकवी त्यांचा मारा । [7]बांकाइ-तासारिखा. ॥ ८५ ॥ जिकडे जिकडे फिरे गजू । तिकडे लोटे **पां**डवराजू । जसी प्रभिन्न चपळ विजू । लवोनी कोठें नाडली. ॥ ८६ ॥ ना ते समुद्राची लहरी । उसळोनी मग्न होय नीरीं । कीं वन्हिशिखा वरूनी वरी । शेखीं गुप्त त्यामाजी. ॥ ८७ ॥ तयापरी **भी**ससेन । करी घात धूर्तपणें । मुहूर्त एक कांहीं न्यून । गजातळीं कोंडला. ॥ ८८ ॥ 'हाहा'कार **पां**डवदळीं । म्हणती, 'मारिला अतुर्बळी । **भी**म पडिला काळानळीं । [8]निर्गमा मार्ग दिसेना. ॥ ८९ ॥ पाहा हो ! नवलाव कैसा थोरू ! । मुंगीमुखीं समावला मेरू । कीं टिवटिवचंचुजळाची

---

१. नांगरासारखे. २. अंबारी. ३. मस्तक झाडून. ४. मकरतोंड=रथाचा पुढचा भाग. हा शब्द मुक्तेश्वरानें योजिला आहे. 'पुच्छ गुंडाळोनी हातां । गदा वोपी राउतमाथा । मकरतोंडीं ताडी लाता । रथ भंगोनी सांडितू'. ॥ (विराटपर्व, ५।१०८). ५. सांधा. ६. दोन्हीं सुळयांनीं. ७. पट्टा खेळणाऱ्यासारखा. ८. बाहेर निघण्यास.

धारू । बुजोनी गेला वडवाग्नी. ॥ ९० ॥ कीं येतां तेजोराशि उदयासी । अडखळोनी पडे तमाच्या कोशीं । ना तो ग्रहगणासहित शशी । खद्योततेजें हरपला. ॥ ९१ ॥ तैसा विपाक अजी घडला । भीमसेन गजातें वश्य जाहला । काय पाहतां हस्तीची लीला । उभा चिरा दों ठाईं.' ॥ ९२ ॥ शब्दगौरव वीरमांदी । ऐकोनी लोटले तये संधी । धर्मराज प्रतापनिधी । वीरांसहित धांवला. ॥ ९३ ॥ पांचाळ, मच्छ, कैकयभूप, । चेकितान, सात्यकी, कुळदीप । अभिमन्यु, वीर वासुकीसर्प–। प्राय क्रोधें पातले. ॥ ९४ ॥ शरासनीं प्रभिन्न शर । सज्जोनी लाविले एकधार । जेवीं हेस्ताची वृष्टी निबिडघोर । क्षणार्धें करी समृद्धी. ॥ ९५ ॥ तयापरी नाराचधारा । गजअंगीं रुपती सैरा । रुधिरस्राव झरझरा । अद्रिप्रीय प्रवाहो. ॥ ९६ ॥ निर्बुजोनि गज फोडिलें रेंव । आर्द्रभेरीचा जेवीं गौरव । उसळोनी पुढां लोटला हाव । जेवीं मृगेंद्र ताडिल्या. ॥ ९७ ॥ इतस्तता होवोनी गेली चमू । सात्यकी अचळ जैसा द्रुमू । बाणीं विंधिले लक्षूनी वर्मू । अधिक गज क्षोभला. ॥ ९८ ॥ एक मांडी पुरुषार्थप्रौढी । वीर निघती संग्रामतोंडीं । सुसाट शरांची मुरकुंडी । सूर्यरश्मी बुजाले. ॥ ९९ ॥ प्रभिन्न गज पर्वतासरी । धांविल्या सात्यकीच्या रथावरी । सैंधवाश्वरथ कुसरी । भग्न करी सरोषें. ॥ १०० ॥ भूमी आतला यादववीर गाढा । गज रगडित चालिला पुढा । वीरीं घालोनी वेढा । 'घ्या, घ्या,' शब्द गर्जती. ॥ १०१ ॥ धृष्टद्युम्नें काळविखारी । सात तोमर ताडिले शिरीं । गज फूत्कारितां, घोडे चाऱ्ही । घेवोनी रथा पळाले. ॥१०२॥ युयुत्सुतनय आडवारा । करितां गज पावला त्वरा । अश्वासहित रथा चुरा । करूनी भूप मारिला. ॥ १०३ ॥ किलकिलाट शब्दध्वनी । करुनी वीर धांवले रणीं । शस्त्रें ताडिती विचित्रकिरणी । ज्यांस जैसी योग्यता. ॥१०४॥ सहज स्वभावें मत्त द्विरद । मद झरपतां अधिक धुंद । तो गजराज प्रसिद्ध । शक्तिमदें आगळा. ॥ १०५ ॥ शर खडतरे गात्रसंधी । तेणें अधिक उसळे युद्धीं । गर्जना रौद्र भैरव शब्दीं । करितां सेना खळबळी. ॥१०६॥ वातवेगें चपळ वक्र । गरगरां फिरे जैसा चक्र । भ्रमिष्ट वीर झांकिती नेत्र । 'आला आला' ह्मणवुनी.॥१०७॥ मुसांडीसरिसे प्रभिन्नहस्ती । दडदडां पडती शतशा क्षिती । वाजी पदाती टकोरघाती । वाळुप्राय विखुरती. ॥१०८॥ रौद्र रणरंगधुमाळी । माजली, वीर दचकती बळी । पाणितळें मुखकमळीं । शंख स्फुरिती अपार. ॥१०९ ॥ जैसा

१. धारेनें. २. हस्तनक्षत्राची. ३. बाणांच्या सरी. ४. पर्वतप्राय. ५. निर्बुजणें=घाबरणें ६. ओरडूं लागला. ७. काळसर्पासारखे.

अग्नि धडकतां [1]राहतवटी । जगा आकांत पडती थाटी । कीं दरवडा पडतां निशी-पोटीं । तेवीं आकांत संगिया. ॥ ११० ॥ कीं बिडाळ लोटला मूषकभारीं । तयासारिखी होय परी । ना तो ससाणा उतरतां अंबरीं । कुरर[2]कुंचिका आकांतू ॥ १११ ॥ तैसा [3]वैळसा तये समयीं । पीडितां वीर गजाचे घायीं । तरी परा न होत [4]कैयी । धांवती पुढा जयातें. ॥ ११२ ॥ गजारूढ **दा**शार्ह-पती । रोषें धांवला द्विपाप्रती । बाण अर्पोनी **काळ**घाती । करी गर्जना सत्रोणें. ॥ ११३ ॥ तिर्यग्दृष्टी संतप्त राजू ॥ कडाडिला जैसा विजू । धडका हाणोनी तोडुनी माजू । पुढें रोषें सुसाटे. ॥ ११४ ॥ **रु**चिपर्वा बळिष्ठ नृपती । त्याचा **सु**पर्वा पुत्र सुमती । आणि **सु**पर्वा पर्वतपती । धांवले रोषें गजेंद्रा ॥ ११५ ॥ नतपर्वणी तीक्ष्ण बाण । ताडितां मौळ झाडिलें त्राणें । रव फोडुनी महा-प्रभिन्न । उसळोनियां लोटला. ॥ ११६ ॥ चपेटोनी उभय वीरां । शुंडादंडें केलें पुरा । सहित वाजी **य**मघरा । वस्तीलागीं वोपिलें. ॥ ११७ ॥ 'आहा' शब्द [6]पृतनामुखीं । **सौ**भद्र धांवला थोर तवकीं । **द्रौ**पदीनंदन पंच तोकीं । हरीपरी पातले. ॥ ११८ ॥ युयुत्स आणि **चे**कितान । धडकोनी वर्षती बाणघन । **भ**गदत्त होवोनी क्रोधवर्धन । पदीं द्विप प्रेरिला. ॥ ११९ ॥ सुसाटतां स्वसेनेवरी । रवी इतस्तता जाले समरीं । **अ**भिमन्यु वीरकेसरी । पर्वतप्राय स्थिर तो. ॥ १२० ॥ शरासनीं **काळ** [8]काळविखारी । सज्जोनी बाण मंत्रोच्चारीं । सोडितां भरले गगनोदरीं । तेजें धरा डळमळी. ॥ १२१ ॥ वीज पडे पर्वतमौळीं । तैसे शिरकले कर्णबिळीं । त्रास पावोनी, [9]कानशळीं । झाडुनी, फोडी रवातें. ॥ १२२ ॥ किंकाट घोर गर्जना । अद्रिमौळी डळमळी सेना । [10]पडसादें भेदिलें गगना । धरादेवी दुमदुमी. ॥ १२३ ॥ [11]कानवडोनी लोटला पुढा । करीत सेना महा रगडा । वीर पडती दडदडा । धीर कोण्हा धरवेना. ॥ १२४ ॥ 'आला, आला, गजेंद्र**काळ** । पळा, पळा, न करा बळ । मरतमरतां वांचलों फळ । दैवयोगें स्त्रियेच्या.' ॥ १२५ ॥ हलकल्लोळ सेनामेळीं । भयपीडित चमू सकळी । गजेंद्रें मांडिली धुमाळी । चक्रापरी भ्रम-तसे. ॥ १२६ ॥ किंकाळी फोडूनी भैरव शब्दीं । धांवे जेथ निबिड मांदी ।

---

१. वस्तीच्या जागेंत, राहटींत. २. कुरर=टिटव्या. कुंचिक=मत्स्यविशेष. ३. संकट, प्रसंग. ४. कोणी मागें हटले नाहींत—हा भाव. ५. जोरानें, आवेशानें. ६. सेनेच्या तोंडीं. ७ जोरानें, आवेशानें. ८. काळसर्पासारखे. ९. कानशिलें. १०. प्रतिध्वनीच्या योगानें. ११. एका अंगाला होऊन, तिरकस होऊन, बाजूस सरून.

वीर लपती सांदोसांदीं[1] । एकमेकां आश्रय. ॥ १२७ ॥ अंकुश स्पर्शोनियां
मूर्ध्नीं । **भ**गदत्त वर्षे तीक्ष्ण बाणीं । दोन्हीकडूनियां जाचणी । वीरां सावर[2]
धरेना. ॥ १२८ ॥ माधवमासीं[3] उष्ण पीडे । गैवा[4] वांछिती साउली झाडें ।
कीं शीतीं पीडितां माकडें । लक्षिती आश्रा वन्हीचा; ॥ १२९ ॥ तैसे अ-
र्दित[5] सर्व वीर । न धरुनी धीर निघाले सैर । गजेंद्र विचरी चक्राकार ।
सैरावैरा धुमाळी. ॥ १३० ॥ पूर्वीं सुरांची सबळ सेना । **वि**रोचनें आणिली
रणा । तैसी दशा भूपाळगणा । जाली, **पां**डवां आश्चर्य. ॥ १३१ ॥ असो.
पुढां पर्वतारी-[6] । अनुजसखा प्रतापगिरी । **का**ळखंज दैत्य समरीं । प्रतापें जेणें
मर्दिले, ॥ १३२ ॥ तो **स**व्यसाची विक्रमतरणी । वीरवर्य मुगुटमणी । ये-
उनी मुक्तिप्रदानीं । **भ**गदत्तगजा बोळवी. ॥ १३३ ॥ हें निरूपण रसाळ
गोड । वीररसाचें सुफळित झाड । ऐकतां श्रोतियांचें पुरे कोड । आस्ता[7]
वाढे श्रवणार्थी. ॥ १३४ ॥ श्रीगुरुराज वंदोनी, पाणी । मस्तकीं मिरवतां,
प्रफुल्लवाणी । **न**रहर **मो**रेश्वर श्रोत्यांलागुनी । कथाकुसुम समर्पी. ॥ १३५ ॥

अध्याय सातवा.

संजय म्हणे, 'नरमंडणा! । पुसिला वृत्तांत आणिला मना । पुढें **पा**र्थ
प्रतापराणा । काय करी? ऐकिजे. ॥ १ ॥ **द्रो**णसमरीं महा गर्दी । आक्रंद-
मान चमूमांदी । दुःशब्द शब्द गर्जती संधी । किलकिलाट बीभत्स. ॥ २ ॥
समुद्रप्राय घनगर्जना । **भ**गदत्तद्विप फोडी त्राणा । पडसादा गिरि दणाणा ।
खेचर दिशा लंघिती. ॥ ३ ॥ ऐसी पृतनेची[8] खळबळ । ऐकोनी **पा**र्थ-
चित्त डहुळ । '**भ**गदत्तहस्तीची कीळ । महारुद्रा भयकारी. ॥ ४ ॥ **इं**द्रवरद
प्रभिन्न द्विरद । सदैव मस्त, नुतरे मद । समरांगणीं पृतना खेद । पावली असे,
निश्चय. ॥ ५ ॥ आमचा राजा **ध**र्मराज । सत्वसिंधु ऐश्वर्यबीज । काय क-
रील काज? । जावें सत्वर संकटीं.' ॥ ६ ॥ ऐसा चिंतितां हृदीं भावो ।
जातां **सं**शप्तकीं फोडिला टाहो । निशाणा[9] घालोनियां घावो । आडवे जाले
पार्थातें. ॥ ७ ॥ **फा**ल्गुन पडिला संशयावर्तीं । द्विधा संकट जालें प्राप्ती ।

---

१. सांधी कोंदींत. २. अवसान, धैर्य. ३. चैत्रवैशाखांत. ४. गाई. ५. येथें मूळांतील सव्वीसावा अध्याय संपतो. ६. पर्वतशत्रु (इंद्र) त्याचा अनुज (धाकटा भाऊ, विष्णु) आहे सखा (मित्र) ज्याचा तो (अर्जुन). ७. आस्था, काळजी. ८. सैन्याची. ९. रणभेरीवर. 'निशाण' हा शब्द याच अर्थीं **मु**क्तेश्वरानेंही योजिला आहेः–'सज्ज केली चातुरंग सेना । घाव घालोनियां निशाणा । अश्व, कुंजर, रथिये नाना । शस्त्रास्त्रीं सिद्धले. ॥' [आदिपर्व–अ० ३२।५.]

विचारदायक रमापती । सेव्य विबुधाविबुधातें. ॥ ८ ॥ 'वंद्य अमरां धरामरां । अमरत्व प्राप्त ज्यांचेनि सुरां । अमरावती विबुधेश्वरा । राजभोग प्रसादें. ॥ ९ ॥ अष्टमहासिद्धि विनीत चरणीं । पुढें उभ्या जोडूनी पाणी । तो शैलजारमण शूळपाणी । ध्यानीं निमग्न जयाचे. ॥ १० ॥ जलजनाभ, जलनिधिशयन । जलजारमण, जलजनयन । जलजपाणी, जलजशमन । जळोदर भवाची. ॥ ११ ॥ तो समक्ष माझिये रथीं । असतां कोण पुसे युक्ती?' । स्मितहास्य प्रसन्न चित्तीं । बोलता जाहला हरीतें. ॥ १२ ॥ म्हणे, 'माधवा! रमारमणा! । भगदत्तें पीडिली आमुची सेना । द्विपकिंकाट प्रळयघना-। प्राय श्रवणा येतसे. ॥ १३ ॥ गजराज दुर्धर अतुर्बळी । सर्व सेना आणिली धुळी । जावें तिकडे, [तरी] दानवी फळी । धरुनी आली युद्धातें. ॥१४॥ दोहींमाजी कृत्य आधीं । कोणतें करावें? सांगिजे बुद्धी' । हांसोनी बोले कृपानिधी । 'पराभविजे दैत्येंद्रा.' ॥ १५ ॥ गांडीवातें चढवितां मेढा । देवें अश्व प्रेरिला पुढा । वीरीं घातला शरांचा वेढा । जेवीं मैनाकसमुद्रीं. ॥ १६ ॥ चवदा सहस्र बळी असुर । त्रिगर्तराज अयुतवीर । गोपाळगण सहस्र चार । पार्थरथा वेष्टिले. ॥ १७ ॥ दानवीं करुनि वैरवाळा । बाण सोडिले अग्निमाळा । भरूनी काढिलें दिग्मंडळा । मंडप नभा घातला. ॥ १८ ॥ निबिड अंधार घनापरी । आच्छादिला रजनीवैरी । शर झमकती नक्षत्रसरी । हवयीकिरणासारिखे. ॥ १९ ॥ चहूंकडूनी सुसाट भाली । स्यंदनासहित वनमाळी । बुजोनी गेला किरीटमौळी । धरणी कांहीं दिसेना. ॥ २० ॥ जैसा धुई आच्छादिजे हेळी । कीं चंद्रमंडळ घन झांकोळी । ना तें वस्त्रें हरितां पांचाळी । अंगुष्ठ उघडें दिसेना. ॥ २१ ॥ कीं गोवर्धन धरूनी हेळी । गोकुळ झांकिलें तयातळीं । ना ते खांडवीं बागमाळी । वन्हिकोपीं आच्छादिला. ॥ २२ ॥ तैसियापरी धनंजया । झांकिलें, कोठें न दिसे काया । दैत्यसेना पिटोनी बाह्या । हर्षानंदें नाचती. ॥ २३ ॥ निबिड बाणांची घोर वृद्धी । रथ थोकले तये संधी । मोह पावला त्रिजगनिधी । रमारमण श्रीकृष्ण. ॥ २४ ॥ पार्थ प्रतापाचा उदधी । ब्रह्मास्त्र योजिलें बाणसंधी । गांडीव कर्षोनी आकर्ण क्रोधीं ।

---

१. सुरासुरांना, देव व राक्षस यांस. २. भूदेवांस. (ब्राह्मणांस.) ३. पर्वतकन्येचा (पार्वतीचा) पति, शंकर. ४. रमारमण, लक्ष्मीकान्त. ५. धनुष्याची दोरी. 'मेढा' हा शब्द मुक्तेश्वराच्या काव्यांतही आढळतो. (विराटपर्व–अ० ६।१३२ पहा.) ६. वरचढपणा, चाल. ७. सूर्य. ८. चंद्रज्योतीच्या किरणांप्रमाणें. ९. धुक्यानें. १०. लीलेनें. ११. ज्याची देवता ब्रह्म आहे असें अस्त्र. हें अस्त्र द्रोणाचार्यांनीं प्रसन्न होऊन अर्जुनास दिलें होतें.

बीजोच्चारीं सोडिलें. ॥ २५ ॥ सहस्र विजांचा एकवळा । कीं वडवाग्नी उसळला ज्वाळा । ना ते भर्गनेत्रींची ज्वाळा । उदित जाली क्षयातें. ॥ २६ ॥ तयापरी सुसाट बाण । धरा तेजें भरली पूर्ण । दैत्येंद्रशराचें तीव्र ठाण । जळोनी जालें कोळसा. ॥ २७ ॥ अस्त्रप्रभव सहस्रशा । प्रसवोनी बाण करिती वळसा । तटतटां शिरें धरणीकोशा । खंडूनियां रिचवती. ॥ २८ ॥ गजाश्वपदातिमहारथी । खंडूनी शवें दाटलीं क्षिती । वस्त्रें भूषणें प्रदीप्त कांती । धरा भारें ढेसॅली. ॥ २९ ॥ जिकडे तिकडे फिरती बाण । शरमय जाहलें अवघें रण । संशप्तकवीरश्रीठाण । उठोनी गेलें दिगंता. ॥ ३० ॥ रणतडाग नलिनीवीर । पार्थप्रताप द्विरदेश्वर । मर्दोनी करूनियां चकचूर । क्षणा एका टाकिले. ॥ ३१ ॥ 'साधु! साधु!' इहीं शब्दीं । पूजिते जाहले वीरमांदी । इंद्र, यम कुबेर, युद्धीं । माघारले दैत्यांच्या. ॥ ३२ ॥ तया करूनी विगत दशा । भ्रष्ट केलें संग्रामकोशा । अर्जुनयशें भरिल्या दिशा । नाहीं वीर यापाडें. ॥ ३३ ॥ भग्न करूनि संशप्तका । फाल्गुन निघाला द्रोणानिका । पाठी त्रिगर्त फोडुनी हाका । दळेंसहित लोटले. ॥ ३४ ॥ 'आम्हां डॅवळोनी संग्रामा । जाणें केवीं ? स्वधर्मगरिमा । पुरुषार्थाची हेची महिमा । शूरकर्मा अयोग्य.' ॥ ३५ ॥ ऐसी ऐकोनी वाणी । बोले हरीसी स्मितवदनी । म्हणे, 'अनंता! आनंदगुणी । श्रुतिशास्त्रां न लभेची. ॥ ३६ ॥ अठरा पुराणें महाप्रौढी । वर्णना निघतां जालीं वेडीं । सॅहस्रमुखाची गरिमा गाढी । वर्णितां जिव्हा द्विभाग. ॥ ३७ ॥ तो तूं पूर्णब्रह्म अव्यक्तव्यक्ती । सगुण जालासी कैवल्यपती । आम्हुतें वोळॅलासी कृपामूर्ती । कोण भाग्यें ? कळेना. ॥ ३८ ॥ पाहें, पाहें, जगन्निवासा! । त्रिगर्त करिती घोर घोषा । काळें वोढिलें मृत्युपाशा । न्यावया स्वर्गा आवडी. ॥ ३९ ॥ जैसा पथीं जातां मत्त कॅरटी । भुंकत श्वानें लागती पाठी । कीं स्त्रिया ताडितां गेली हटी । बोटें मोडिती कडकडां. ॥ ४० ॥ ना तो मार्ग क्रमितां विशाळफणी । वायस गर्जत धांवत ध्वनी । कीं यंत्रें आवाजीं जाहलिया गुणी । पेंडसाद माघ्रां गडाडी. ॥ ४१ ॥ तैसियापरी रमारंगा! । त्रिगर्त लागले आमच्या मागां । अश्वरश्मी ऐकत-प्रेरिजे रथ वीरॅदांगा । बोल उघडा मृत्यूचा.' ॥ ४२ ॥ अश्वरश्मी ऐकतक्षणी । डोलतां रथ भिडविला रणीं । किलकिलाट वीरश्रेणी । वर्षते जाहले शस्त्रांतें. ॥ ४३ ॥ गांडीव वाहोनी वीर अर्जुन । सुशर्मा विंधिला सात

१. मंत्राक्षरांच्या उच्चारासह. २. पाडती, वर्षती. ३. चेपली, चेंगरली. ४. चिडवून किंवा फसवून. ५. शेषाची. ६. प्रसन्न झालास. ७. हत्ती. ८. तोफ. ९. प्रतिध्वनि. १०. वीरांचे समुदाय.

वाणें । ध्वजधनुष्य खंडूनी त्राणें । पांच हट्टी बुडाले. ॥ ४४ ॥ त्रिगर्त बंधु
साहा साहा बाणीं । ताडुनी सुत मारिले रणीं । सुशर्मा क्षोभोनी चौगुणी ।
उल्का वमी विषाच्या. ॥ ४५ ॥ भुजंगप्राय ऐसी शक्ती । सोडिली
घोर फाल्गुनाप्रती । पांच तोमर कृतांतघाती । कृष्णावरी धाडिले.
॥ ४६ ॥ अस्त्रविद्येचा मुगुटमणी । पार्थें त्रिखंड केले तीं बाणीं ।
तोमर तोडुनी तत्क्षणीं । तुकडे धरे पाडिले ॥ ४७ ॥ शर वर्षोनी घनदाट ।
भवंडिला सेने थोर आट[1] । जेवीं तृणातें हव्यवाट[2] । भ्रष्टी तैसा सर्वांतें.॥ ४८ ॥
विगत करूनी सर्व सेना । निघता जाला प्रतापराणा । गरुडवेगें पावतां रणा ।
कौरवदळा खळबळी. ॥ ४९ ॥ भगदत्तगजा निहंटी[3] । भिडवी रथ कृष्णज-
गजेठी । पांडववीरां आल्हाद कोटी । धरातळीं न माय ॥ ५० ॥ जेवीं गॅत-
पती पतिव्रता । देखतां, आनंद न मानी धाता । कीं सीताशुद्धी आणितां हनु-
मंता । कपिदळा उत्साहो. ॥ ५१ ॥ ना तो फाल्गुन इंद्रगजर्जैता । आणितां
उल्हासे देवी पृथा । कीं कार्तवीर्य छळितां; रेंजसुता । जेवीं राम येतां
आनंदे. ॥ ५२ ॥ तयापरी पृतनातुष्टी । धांवोनी मिनली पार्थापाठी । फाल्गु-
नप्रताप जगजेठी । घाली मिठी भगदत्ता. ॥ ५३ ॥ कौरववीरांच्या चलथा ।
धांवोनी वर्षती शर पार्था । उभयवीरीं दाटितां रथा । गर्दी व्योमा उसळती.
॥ ५४ ॥ कौरववीर निबिड थाटी । वर्षती पार्था शरांच्या वृष्टी । वाजिवारण
अमित पाठी । ताडिती शस्त्र विचित्र. ॥ ५५ ॥ श्वेतवाहन रोषावर्ती । शर
सोडूनी काळघाती । खंडविखंड शरांच्या पंक्ती । धरेवरी पाडिल्या. ॥ ५६ ॥
दाहा सहस्त्र वीर रथी । विगत केले न लवतां पातीं । जेवीं अनिळ धडकतां
क्षिती । केवीं तृणकाष्ठा ? ॥ ५७ ॥ करूनी रणाची बोहॅरी । लोटला भगदत्त-
द्विपावरी । तंव तो प्रतापगजकेसरी । करी धुमाळी सैन्याची. ॥ ५८ ॥
विजयी पार्थ लोटतां पुढा । भगदत्त चावोनियां दाढा । करींद्र प्रेरिला गाढा ।
उसळला गोळा यंत्राचा ॥ ५९ ॥ घनप्रभिन्न गिरी । क्षतें झरपती गेरुकों-
सरी । मदें मस्तकावरी समरीं । सिंहप्राय धडकला. ॥ ६० ॥ श्रीकृष्ण

१. झपाट्यानें. २. अग्नि. ३. पाही. ४. प्रवासास गेलेला [परंतु आतां परत आलेला].
५. कल्पित गोष्टी. अन्वयः–[ती] आनंद धाता न मानी (=कल्पित न गणी, खरा समजते, प्रत्यक्ष
अनुभविते). 'धाता' शब्द रामदासांनीं या अर्थी योजिला आहेः–कथान्वय लापनिका । नामघोष
करतालिका । प्रसंगें बोलाव्या अनेका । धाता माता नेमस्त. ॥ दासबोध ४।२।१०. ६. गजगौरी-
व्रतासाठीं. ७. रेणुका. ही क्षत्रियकन्या असून, जमदग्नीची पत्नी व परशुरामाची आई होती.
८. भस्म, नाश. ९. गेरूप्रमाणें (रक्तवर्ण).

शार्ङ्गपाणी । चक्राकाररथ मुरडोनी । कीं फिरवितां वेगें चपळपाणी । गजमुसांड वारिली. ॥ ६१ ॥ विचित्र मंडळ नानाकळा । गती विगती उडवी हेळा। चतुरचतुरांचिया डोळां । आड झांपडी येतसे. ॥ ६२ ॥ कोठें दिसे, कोठें न दिसे । सरकोनी परा धडके रोषें । गरगरां अश्व वारियासरिसे । भ्रमवी पाणिकौतुकें. ॥ ६३ ॥ दुःसह मानोनी भगदत्त । अत्यंत जाला रोषें तप्त । चाप कर्षोनी आकर्णान्त । प्रभिन्न शर सोडिले. ॥ ६४ ॥ शिंळाशित[1] तीक्ष्ण पुंखी। सोडिले घोर महा तवकीं । अग्निस्फुलिंग सांडी मुखीं । तेजें धरा डळमळी. ॥ ६५ ॥ सुसाट उतरूनियां पाही । भेदुनी हरी ते विझाले मही । अर्जुन निमग्न खेदडोहीं । क्रोधानळीं धडकला. ॥ ६६ ॥ काळदंड सोडूनी भाळी[2] । चाप छेदोनी पाडिलें तळीं । परिवार मेळवूनियां धुळी । केली होळी सेनेची. ॥ ६७ ॥ क्रोधें भगदत्तें चुरूनी पाणी । चौदा तोमर सूर्यकिरणी । सोडितां अर्जुनें द्विभागुनी । खंडुनी धरे पाडिले ॥ ६८ ॥ गांडीव वोढोनी कानाडी[3] । शरजाळ सोडिले महाप्रौढी । गजवर्म करूनी देशधडी[4] । सपिच्छ मौळीं शिरकले. ॥ ६९ ॥ रुधिरस्राव जाला पुरा । जाणों पर्वतीं गळती धारा ॥ मस्तक झाडूनी आर्तस्वरा । फोडिता जाला बीभत्स. ॥ ७० ॥ भूप प्रदीप्त रोषावर्ती । रुक्मदंडें सोडिली शक्ती । जाणों दामिनी[5] लोटली क्षिती । येतां पार्थें छेदिली. ॥ ७१ ॥ त्वरा करूनी शरासनीं । ध्वजछत्र खंडूनी पाडिलें धरणी । दश बाण अर्पिले राजमूर्ध्नी । कंकपत्री हेमपुंख. ॥ ७२ ॥ अधिकाधिक क्षोभला भूप । जैसा लत्ताप्रहारें विखारी सर्प । तोमर सोडिले काळताप । ज्यांचेनि पावे खेदातें. ॥ ७३ ॥ येउनी पडिले पार्थहया । येरीं डोलली बलिष्ठ काया। पार्थें गांडीव कर्षोनी बाह्या । बाणीं मुगुट उडविला. ॥ ७४ ॥ रोष नावरे प्राग्ज्योतिषां[6] । बाणीं ताडिलें हृषीकेशा । फाल्गुनें करूनियां घोषा । तीक्ष्ण बाण सोडिले. ॥ ७५ ॥ कार्मुकतूणीर खंडुनी झणीं । द्विपीं सप्त बाण काळमानी । सोडूनी तीव्र अग्निवर्णी । सर्वांग वर्मी भेदिलें. ॥ ७६ ॥ जेवीं वर्मीं ताडितां शब्दबाणीं । फॅळका[7] उठे अंतःकरणीं । कीं भाडा[8] भर्जितां धान्यकणी । तडफडा होय लाह्यांचा ॥ ७७ ॥ तया रोष भगदत्त द्विरदा । प्रेरितां भूमी न घाली पदा । शरीर जर्जर जालें विशदा । खेदमान शरघायीं. ॥ ७८ ॥ जैसी दरिद्रियाची कांता । कांतवचन[9] करी वृथा । कीं वार्धक्य अंगा आततां । इंद्रिय सत्ता नायके ॥ ७९ ॥ अधिकार निघोनी गेल्या पाहीं । लोक नमस्कार न

१. साहाणेवर पाजविलेले. २. भल्ली नांवाचे बाण. ३. कानापर्यंत. ४. हत्तीचें मर्मस्थान भेदून. ५. वीज. ६. भगदत्तास. ७. भडका. ८. भटींत किंवा तव्यावर. ९. पतीची आज्ञा.

करिती कांहीं । कीं सैर[1] होवोनियां मही । धान्यउठावा नव्हेची. ॥ ८० ॥ तयापरी नरेंद्रकाज । न करीच बळिष्ठ गजराज । क्षतें विगत जालें तेज । रोष भूपा नावरे. ॥ ८१ ॥ निर्वाण अंकुश विश्वघाती । वैष्णवी अस्त्र ज्वलितकांती । प्रेरिता जाहला अर्जुनाप्रती । महाक्रोधें निघातें. ॥ ८२ ॥ सहस्रविजांचा एकवळा । कडाडिल्या अग्निज्वाळा । प्रदीप्त दिशा जाहल्या सकळा । वीरदृष्टी लोपिल्या. ॥ ८३ ॥ प्रळयकाळाचियेसरी । सुसाट पातला अर्जुनावरी । भक्तवत्सल कृपाळु हरी । कौशल्यमल्ल कान्हया; ॥ ८४ ॥ फाल्गुन घालोनियां पाठी । दणका सोशिला हृदयपुटीं । वैजयंती माळा गोमटी । जाली कंठीं अस्त्रांची. ॥ ८५ ॥ तेणें शोभला सर्वेश्वर । जाणों घना दामिनीहार । कीं इंद्रधनुष्याचा फेर । संध्यारागा पातला. ॥ ८६ ॥ अतसीपुष्प[2] घनसांवळा । अर्ककिरण कमळमाळा । कीं ते धूम्रमंडित अग्निज्वाळा । शिखा पीतांबर साजिरा. ॥ ८७ ॥ ऐसिया शोभे जगज्जीवन । देखोनी केशव केशिदमन । हास्यवदन पृथानंदन । बोलता झाला हरीतें. ॥८८॥ म्हणे, "माधवा ! रमारमणा ! । दानवारी ! दरिद्रहरणा ! । भवध्येया! भवाब्धिभंजना ! । दुरितदळणा ! त्रिमूर्ती ! ॥ ८९ ॥ विश्वंभरा ! विगताक्षा ! । धराधरा ! धरणीधीशा ! । परात्परा ! परमपुरुषा ! । पुरुषोत्तमा ! पुरुषार्थी ! ॥ ९० ॥ नेम नेमिला तुवां वचनीं हरी ! । जें[3] 'मी न करीं समरीं' । याचें विस्मरण पडिलें दूरी । विनोद जगा होतसे. ॥ ९१ ॥ तूं जें करिसी शोभे तुज । परी मातें येतसे थोर लाज । भूपअस्त्रांचें काय तेज ? । क्षणें क्षीण करितों मी. ॥ ९२ ॥ मत्पुरुषार्थाची अयनी[4] । साहे वीर नाहीं धरणी । विदित असतां चक्रपाणी । किमर्थ अस्त्रा साहिलें ?" ॥ ९३ ॥ हांसोनी बोले मुरारि, शौरी । जगदाधीश, कृपाळु, हरी । मायानियंता, मधुकैटभारी । जनार्दन, विश्वात्मा. ॥ ९४ ॥ म्हणे, "पार्था ! पुरुषार्थिया ! । अस्त्रप्रभव ऐकिजे वर्या ! । पूर्वी नरकासुरपुत्रराया । धरादेवी लाधली. ॥ ९५ ॥ महाबळी तेज वर्चस । देखोनी मही पावली तोष । म्हणे, 'यासी न बाधिजे विष । देवगंधर्वइंद्रांचें. ॥ ९६ ॥ सर्वां अवध्य अमर सृष्टीं । होइजे' ऐसें कल्पोनी पोटीं । पुत्रस्नेह कवळोनी हटीं । धरा तपीं बैसली. ॥ ९७ ॥ दृष्टी लावोनियां ऊर्ध्व नभीं । वायु भक्षुनी रा-

---

१. सर=पावसाची सर. थोड्याशा पावसानें धान्य पिकण्यास योग्य अशी जमीन तयार होत नाहीं–हा इत्यर्थ. २. अतसीपुष्प=तागाचें फूल. ३. 'मी युद्ध करणार नाहीं, फक्त सारथ्यच करीन' अशी कृष्णानें प्रतिज्ञा केली होती. ४. चाल, सपाटा.

हिली उभी । सहस्र वर्ष लोटतां '[1]नाभी । नाभी' म्हणे जगदात्मा. ॥ ९८ ॥ 'इच्छित अर्थ करीन पूर्ण । माग वर न करीं शीण'. । येरें वंदोनी श्रीचरण । मनकामना निवेदी. ॥ ९९ ॥ 'मानवदैत्यराक्षससुरा । सर्वां जयस्वी करीं कुमरा' । हरी तोषोनी ज्वलितधारा । अंकुश पाणीं अर्पिला. ॥ १०० ॥ म्हणे, 'हें माझें वैष्णवी अस्त्र । असतां हस्तीं, न बाधी शस्त्र । यत्नें रक्षितां [2]कुबेरमित्र । घात सर्वथा करील.' ॥ १०१ ॥ [3]सबीजवर्ण मंत्रदेवता । अर्पोनी अदृश्य जाहला धूर्ता ! । पुढें नरकासुर अन्यायपंथा । पावतां अच्युतें मर्दिला. ॥ १०२ ॥ तें अस्त्र ठेवा धराउदरीं । गुप्त होतां बहुकाळवरी । इंद्रमित्रत्व राजया करीं । भगदत्तासी लाधलें. ॥ १०३ ॥ तें रौद्र अस्त्र विश्वभक्षक । माझें म्यांची साहिलें देख । तया निवारण आणिक । समर्थ नाहीं मजवीण." ॥ १०४ ॥ ऐसें वदोनी दानवारी । [4]बुंजाविला पार्थ समरीं । 'भूपशक्तीची केली [5]बोहेरी । आतां वधीं अविलंबें.' ॥ १०५ ॥ भगदत्त क्रोधवर्धन । शत बाण सोडिले महाज्वलिन । असंभ्रांत सुभद्रारमणें । खंडूनी मध्यें टाकिले. ॥ १०६ ॥ गांडीव कर्षोनी आकर्ण । नाराच सोडिले महा कठिण । करींद्रकुंभ विदार्यमाण । करूनी मही शिरकले. ॥ १०७ ॥ जैसे व्याळ वारुळबिळीं । निघती तैसे शिरकले [6]भाळीं । द्विरदें फोडूनि घोर आरोळी । सोडुनी प्राण रिचवला. ॥ १०८ ॥ जेवीं वज्रघातें शैलशिखर । खचोनी पडे अवनीवर । कीं झंझावातें महातरुवर । सेवी धरा ज्यापरी. ॥ १०९ ॥ जैसा पडतां [7]प्रभिन्न हस्ती । [8]दाशार्ह बोले, अर्जुनाप्रती । 'भूप [9]उपनेत्र दिव्य कांती । असतां नेत्रीं अवध्य. ॥ ११० ॥ सोडुनी बाण फोडी पुरता । मग सुखें करीं भूपाच्या घाता.' । ऐके तत्क्षणीं अर्जुनें तथा । उपनेत्र तें भंगिलें. ॥ १११ ॥ अर्धचंद्र [10]नतपर्वणी । काळदंड अग्निवर्णी । शर सज्जोनी शरासनीं । कर्षोनी बाह्या सोडिला. ॥ ११२ ॥ उसळोनी [11]अशनीलोटी । येउनी बैसला भूपकंठीं । शिर उडालें गगनपोटीं । मुरडोनी धरा पिटिली. ॥ ११३ ॥ तालवृक्ष कुठारघायीं । छेदी धस उभारे मही । कीं नखाग्रीं पद्म खुडितां पाही । नलिनी [12]नुसंधे ज्यापरी. ॥ ११४ ॥ तेवीं नृपशिर पडतां तळीं । पांडववीरां वाहिल्या टाळी । विजयी जाहला किरीटमाळी । कौरवदळीं आकांतू.

---

१. भिऊं नको. २. शंकर. ३. मंत्राक्षरांसह. ४. समजाविला. ५. भस्म, नाश. ६. डोक्यांत, मस्तकांत. ७. मोठा. ८. कृष्ण. ९. भगदत्त आपल्या डोळ्यांस त्रास होऊं नये म्हणून एक प्रकारचें पातळ फडकें डोळ्यांस बांधीत असे—असें मूळांत आहे. १०. ज्याचीं पेरें वांकदार आहेत असा. ११. वज्राप्रमाणें दणका देणारा. १२. सांधत नाहीं, पहिल्याप्रमाणें होऊं शकत नाहीं.

॥ ११५ ॥ कुरुवर्यराज **दु**र्योधन । उसळला क्रोधें ज्वलिन । सर्वे वीरांचे समूहो पूर्ण । दावानळासारिखे. ॥ ११६ ॥ असो; पुढां युद्ध गहन । **कृ**तांतकाळ खवळला पूर्ण । वीररसाचें रसायण । पान सज्जनीं करावें. ॥ ११७ ॥ कीं ते वीररसाची प्रमदा बाळा । **'भीष्मपर्वी'** वरिली हेळा । तारुण्यभरें भोगार्थ कीळा । **'द्रोणपर्वी'** मुसमुसी. ॥ ११८ ॥ तिचिया गुणा लुब्धोनी श्रोते । कदा श्रोत्र न करिती परते । नाम ऐकतां धांवती तेथें । अत्यादरें आपसया. ॥ ११९ ॥ जेवीं **ह**रीची जारमारचोरी । ऐकता पावे स्वर्गी थोरी । तेवीं **भा**रतकथेची थोरी । पुण्या **मे**रु ठेंगणा. ॥ १२० ॥ श्रीगुरु **भी**मराज वर्षाकाळ । कृपाजलद करितां ढाळ । **न**रहरी **मो**रेश्वर मेहिमोल । कथाअंकुर उसळे. ॥ १२१ ॥

अध्याय आठवा.

संजय म्हणे, 'राजसत्तमा ! । **भ**गदत्त गेलिया **य**मधामा । वीर खळबळोनी क्रोधगरिमा । **अ**र्जुनाप्रती धांवले. ॥ १ ॥ सेनाअग्रीं सौबळ **श**कुनी- । सहित स्वचमू पुत्र गुणी । धडकला प्रतापअग्नी । श्लाघा वानीत मुखाब्जीं. ॥ २ ॥ **गां**धारसुत पर **पु**रंजय । आणि **वृ**षकेत संग्रामजयें । लोटुनी विक्रम **पृ**थातनयें । बाणजाळीं ताडिला. ॥ ३ ॥ न गणोनी **पा**र्थे करुनी त्वरा । **वृ**षकेत शरीं केला घाबिरा । सूत, वाजी, ध्वज, छत्रधारा, । छेदोनी बाणीं पाडिला. ॥ ४ ॥ चाप खंडूनी पाडिले धरणी । **श**कुनी विंधिला शतबाणीं । शरें त्रासितां अनीकिनी । पुन्हा युद्ध झगटलें. ॥ ५ ॥ चहूंकडूनी शस्त्रवृष्टी । करिती **पा**र्था प्रतापनेटीं । **फा**ल्गुनें न लगतां त्रुटी । बाणशक्ती सोडिली. ॥ ६ ॥ पांच शत **गां**धारवीर । खंडूनी पाडिले महीवर । परी न सरोनी पैरा वीर । घालिती उड्या मृत्युकुंडीं. ॥ ७ ॥ **श**कुनीतनय पांचजण । महाप्रतापी जैसे ज्वलिन । **वृ**ष, **क**च, **लो**म, **म**हात्मा, जाण । **रा**जनुशले पांचवा. ॥ ८ ॥ थडकोनियां **अ**र्जुनासी । करिती युद्ध महारोषीं । जेवीं **इं**द्र **वृ**त्रासुरासी । भिडे पूर्वी ज्यापरी. ॥ ९ ॥ पांचजणीं कडोविकडी । शर सो-

---

१. येथें मूळांतील अध्याय एकुणतिसावा समाप्त झाला. २. सहज, लीलेनें. ३. तेज, सौंदर्य. ४. अभिषेक, वर्षाव. ५. पृथ्वीसारखा. ६. ह्या गांधारसुतांचीं नांवें 'वृषक' व अचल' अशीं होतीं. ७. सैन्य. ८. चिटकी, क्षण. ९. पलीकडे, दूर. १०. हीं शकुनिपुत्रांचीं नांवें मुळांत सांगितलेलीं नाहींत. ११. युक्तिप्रयुक्तीनें किंवा कडाक्यानें.

डिले नाना प्रौढी । **फा**ल्गुनें तोडुनी कांडोकांडीं । भ्रष्ट केले क्षणार्धें. ॥ १० ॥ **गां**डीव सज्जोनी शर तीक्ष्ण । सोडिले दारुण फणिमान[1] । पांच शरें शशांकवदन । धरणीवरी पाडिले. ॥ ११ ॥ 'आहा!' शब्द पृतनामुखीं[2] । निघाले वीर राहिले बाकी । रथ लोटूनी **सौ**बळ शोकीं । रोषें **पा**र्था तगटला. ॥ १२ ॥ अभिचारअस्त्र[3] सज्जोनी होटीं । बाण सोडिला प्रभिन्न नेटीं[4] । मोह पावला **ज**गजेठी । **आ**त्माराम श्री**कृ**ष्ण. ॥ १३ ॥ विद्याप्रभाव विचित्र कळा । शस्त्रें प्रसवलीं नानाकळा । शूळ, पट्टे, गदा, अर्गळा, । लेंहुडी[5], चक्र, टोणपे, ॥ १४ ॥ त्रिशूळ, कोयत्या, धोंडे, फरश, । शतघ्नी[6], परिघ, आणि पाश । नानाविध शर,कर्कश, । वत्सदंत, गृध्रपुंखी. ॥ १५ ॥ जाणों आभाळ फुटलें शस्त्रीं । तैसीं शस्त्रें वर्षती धात्री । अनेक श्वापदें क्रूर वक्रीं । भक्षूं **पा**र्था धांवलीं. ॥ १६ ॥ खरोष्ट्रमहिषसिंहव्याघ्र-। चमरचिलिका[7]-वृक उग्र । श्वानें, गीधादि पातले शीघ्र । भुयीं माती उकरिती. ॥ १७ ॥ अनेक भूतांच्या हाडळी । विकट तुंडें, बीभत्स कीळी । क्रूर राक्षस धांवती सळीं[8] । भेडसाविती उडोन. ॥ १८ ॥ भूतबाधा **कृ**तांतकाळा । शीतें बाधिजे वन्हिज्वाळा । उष्णें उकांडा **हि**माचळा । श्रांत **गं**गा जीवनार्थी[9] ? ॥ १९ ॥ रवीआड खवळे अंधारी । गरुड चांचरे विषलहरी । **शे**ष डळमळी धराभारीं । हें कैसेनी घडेल ? ॥ २० ॥ तयापरी विजयी **पा**र्थ । निर्भय चित्तीं हर्षयुक्त । दिव्यास्त्र प्रेरुनी त्वरित । नाहींच केलीं क्षणार्धें. ॥ २१ ॥ अभिचारअस्त्र जातां वृथा । **सौ**बळें रोषें चुरूनी हस्ता । तमांधअस्त्र सोडिलें तथा । दिशा काजळें बुजाल्या. ॥ २२ ॥ निबिड अंधार प्रभिन्न कोडी । जाणों **का**ळपुरुषाची घोंगडी । दिशा पांघुरली महा कुडी । क्षया सर्वा न्यावया. ॥२३॥ **पा**र्थ प्रतापाचा हेळीं[10] । **आ**दित्यास्त्र प्रेरिलें कीळी । तम मेळविलें सर्व धुळी । जेवीं पापें **ह**रिनामें. ॥ २४ ॥ शर वर्षोन घनदाट । बाणीं शरीर जालें कूट[11] । [सौबल प्रतापी वीर उद्भट] । कूट[12] होवोनी पळाला. ॥२५॥ पुढा लोटतां **कौ**रववीरा । **पा**र्थ शरांच्या वर्षोनी गारा । वीर वीर खोंचले सैरा । रक्तधारा सर्वांगीं. ॥ २६ ॥ विगतमान वीरभय पोटीं । धांवोनी निघाले **द्रो**णापाठीं ।

१. सर्पासारखे. २. पृतना=सैन्य. ३. दुसऱ्याचा नाश करणारें अस्त्र. ४. मोठ्या नेटानें. ५. लहुडी=लोहांगी, लोखंडाची काठी. टोणपा=दांडकें, सोटा. ६. तोफा. ७. चिल्हिका=चिलट, घुंगुरडें. ८. छळ करण्याच्या उद्देशानें. सळ=छळ. ९. पाण्यासाठीं. १०. सूर्य. ११ डोंगर, पर्वत. १२. चूर्ण, पीठ.

जयभेरीच्या बोभाटीं । जयवाजंत्रीं लागलीं. ॥ २७ ॥ हताहत करूनियां सेना । **पार्थ** दक्षिणे पातला रणा । वीर मिनले रणकंदना । **अर्जुना**प्रती निघातें. ॥ २८ ॥ **दुर्योधन** सहित**द्रोण** । **धर्म**राजा तगटले त्राण[1] । उभय वीरांची मिठी घन । महा थोर माजली. ॥ २९ ॥ **भीम**सेन **सात्य**की रणा । पावतां, **पार्ष**द आपुली सेना । तिरस्कारुनी, रणांगणा । **द्रोणा**चार्या झगटला. ॥ ३० ॥ उभयवीरांची घोर मिठी । बाणजाळीं भरली सृष्टी । धडधडा वीर पडती पाठी । ताळफळासारिखे. ॥ ३१ ॥ **अश्व**त्थामा रोषावर्ती । पुढारुनी **नी**ळराजाप्रती । म्हणे, 'मातें युद्ध करीं, शक्ती । इतरां केवीं मानसी?' ॥ ३२ ॥ ऐकतां क्षणीं उसळोनी **नी**ळ । बाणीं वर्षला तीव्र हेळ । अकंप **द्रौ**णी शैल अचळ । क्रोधानळीं धडकला. ॥ ३३ ॥ कार्मुकीं सज्जोनी तीक्ष्ण भाली[2] । ध्वज, धनु, छत्र पाडिलें तळीं । पद्मकाया रुचिरकीळी । पद्मनेत्र कर्णान्त. ॥ ३४ ॥ सकुंडल शिर नागर[3] पाहीं । छेदोनी पाडिलें कोमळ मही । **पां**चाळ मारिला एके घायीं । **पृ**षददळीं आकांतू. ॥ ३५ ॥ **भी**मसेन पातला कैवारा[4] । तव पुढां लोटला मुख्य धुरा । **द्रो**णाचार्य करुनी त्वरा । शतबाण **भी**मा अर्पिले. ॥ ३६ ॥ त्यांवर आणीक **का**ळक्रोधी । ताडितां सदुसष्ट बाण वर्मसंधी । [**भी**मसेन] न पवतां आधी । **कर्णे** बारा विंधिले. ॥ ३७ ॥ **का**ळदंडासमान प्रतिमा । सत्तर अर्पी **अश्व**त्थामा । **दुर्यो**धनें धरूनी नेमा । सहा अर्पिले निघातें. ॥३८॥ **भी**म भीमपुरुषार्थी घन । न कंपत रोषें जाला ज्वलीन । जैसीं संक्रमणाचीं वाणं । घेवोनी पुन्हा देइजे. ॥३९. ॥ तयापरी **वृ**कोदर । करी सकळां पाहुणेर[5] । **द्रोण** प्रतापी महावीर । गुरुवर्य भूलोकीं. ॥४०॥ पांच शत शर विखारी । **का**ळपुष्पमाळेची सरी । अर्पोनी **गु**रूतें तूर्ण[6] समरीं । दाहा बाणीं विंधिला. ॥ ४१ ॥ दाहा बाण अहीसमान ऊर्मी[7] । **दुर्यो**धना ताडिले वर्मी । **अश्व**त्थामा नैष्ठिककर्मी[8] । आठ बाणीं विंधिला. ॥ ४२ ॥ **भी**मसेनें प्रभिन्न बाणीं । **सत्य**जित पाडिला धरणी । **कौ**रववीर लोटले रणीं । किलकिलाट शब्दांचा. ॥ ४३ ॥ ऐकोनी घाबिरा **यु**धिष्ठिर । प्रेरिले भूप प्रतापशूर । **सा**त्यकी आणि **मा**द्रीकुमर । **भी**मापाठीं थडकले. ॥ ४४ ॥ उभय चमूचा एकवळा । जाला, तुंबळ फोडिती कीळा[9] । वीरवीरांतें ताडिती सकळा । मृत्युभ-

१. त्राणें, मोठ्या आवेशानें. २. भल्लनामक बाण. ३. सुंदर. ४. साहाय्यार्थ. ५. पाहुणचार, आदरातिथ्य. ६. त्वरेनें, झटपट. ७. जळफळीनें, तडफडीनें. ८. एकनिष्ठपणें गुरूची सेवा करणारा, ब्रह्मचारी. ९. आरोळ्या. किळा=कील, गुडगुडींतील पाण्याचा जो आवाज (hubble bubble) होतो तो.

यातें त्यागोनी. ॥ ४५ ॥ अंकुश स्पर्शोनी माथे । हस्तिप हस्तिपा ताडिती व्यथे । अश्वारोह अश्वरातें । थडकोनियां हाणिती. ॥ ४६ ॥ पदाती पदातिया थोर हाव । भिडुनी रणीं हाणिती घाव । रथी रथिया शरलाघव । थडकोनियां दाविती. ॥ ४७ ॥ चतुरंग सेनांग एकत्र लोटी । मिळोनी करिती शस्त्रवृष्टी । आपपर नोळखोनी दृष्टी । करिती घात निघातें. ॥ ४८ ॥ म्हणे 'मारा, घ्या, घ्या' शब्द । सकळां मुखीं हाची विशद । शस्त्रखणखणी विविधभेद । रणमंडळीं माजला. ॥ ४९ ॥ हस्तिप हस्तिपा घालितां घाव । गज गजा पुसिला ठाव । छिन्नगात्री फोडिती रव । आर्द्र भेरीसारिखे. ॥ ५० ॥ एक जर्जर झाले घायीं । एक उभे ठाईंच्या ठायीं । पडिले, पाय नुचले कांहीं । सर्वांग क्षतें व्यापिलें. ॥ ५१ ॥ एकांच्या तुटोनियां माना । नुसंधे धडपडती रणा । शुंडाविरहित वस्त्राभरणा । विहीनपाद [१]खोडिती. ॥ ५२ ॥ चरणाविरहित को[२]थळ एक । नुसंधे रणीं पडिले देख । राऊत राणे [३]नामानिक । येरयेरां हाणिती. ॥ ५३ ॥ एकमेकांचे घायीं । [४]अशिरी होउनी पडती मही । [५]अश्वललाम विचित्र तेंही । खंडूनि शस्त्रें पडियलें. ॥ ५४ ॥ रथिया रथी लोटुनी सैरा । शरीं शरांच्या वर्षती धारा । खंडविखंड गात्रीं पुरा । येरयेरां टाकिती. ॥ ५५ ॥ चतुरंग एकत्र धसती । मिनले विसरले देहस्मृती । फावल्या ठायीं वीरांप्रती । वीरश्रीनेटें ताडिती. ॥ ५६ ॥ पति गजाचे घालिती घाव । राऊत रथिया घेती धांव । योग्यायोग्य विसरूनी सर्व । रणधुमाळी मिनले. ॥ ५७ ॥ चतुरंग सेनेचीं कलेवरें । मही दाटलीं निबिड सैर । ध्वजा, पताका, शस्त्रें तीव्र । विचित्र धुळी मेळविती. ॥ ५८ ॥ मुगुट, कुंडलें, वनमाळा, । बाहुभूषणें, कटिमेखळा, । गजाश्वभूषणीं कीळा । भूषित धरा भूषणीं. ॥ ५९ ॥ [६]शस्त्रसंपात वर्षे वन्ही । वीरां खळबळ घोर रणीं । भ्याड निघाले मागिले चरणीं । आप्तवर्गा त्यागोनी. ॥ ६० ॥ पुत्र पित्याची सोडुनी आशा । पळतां, येरू करी घोषा । न गणोनी म्हणे, 'जीर्ण[७]वयसा । किती दिवस ठेवणें?' ॥ ६१ ॥ असा सेनेचा वीरक्षय । उभयदळीं जाहला [८]वर्य । **द्रोण** प्रतापाचा सूर्य । बाणकिरणीं उसळला. ॥ ६२ ॥ किरणप्राय शोभाभरित । वेष्टित वीर अमित शत । **द्रौणी, कृप** ऐश्वर्यमंत । **रविनंदन** प्रतापी. ॥ ६३॥ वीरमांदीसी **जयद्रथ** । **विंदानुविंद मद्रनाथ** । शरजाळीं वर्षोनी त्वरित । वीरवीर त्रासिले.

---

१. खोडासारखे जख्खड होऊन पडतात. २. कोथळ, पोतें. ३. नामांकित. ४. शिरोरहित. ५. अश्वभूषण, उत्तम घोडा. ६. शस्त्रांचें एकमेकांवर आपटणें. ७. म्हाताऱ्यास. ८. श्रेष्ठ, मोठा.

॥ ६४ ॥ **ध**र्मराज **कु**रुनंदन । सहित वीर वर्षती बाण । जाणों अंगारवृष्टी[१] पर्जन्य । एकधारा लागली. ॥ ६५ ॥ क्रोधें संरब्धें[२] **द्रो**णाचार्य । शर वर्षोनी अप्रमेयें[३] । **चै**द्य, **पां**चाळ, **पां**डववर्य, । त्रासोनी सेना मर्दिले. ॥६६॥ विगतमान चमूमांदी । क्लेश पावले वीरसंधी[४] । किलकिलाट घोर शब्दीं । सेनामेळीं माजला. ॥ ६७ ॥ येरीकडे प्रतापी **पा**र्थ । वीरवर्य रणपंडित । धनुभृताचे मूर्ध्नि श्वेत । पताक मिरवे जयाची. ॥ ६८ ॥ तो **अ**र्जुन वीर धनुर्वाडा । **का**ळही येऊं न सके पुढा । **त्रि**गर्त सैन्याचा जुंबाडा । वस्ती **का**ळा वोपिल्या. ॥ ६९ ॥ **सं**शप्तक दानव सुर । बाणीं त्रासोनी केले स्थिर । धडमुंडांकित दैत्यवीर । अमित रणीं पाडिले. ॥ ७० ॥ गजाश्वरथी पदाति वीर । मर्दोनी सकळ केले चूर । जैसें धान्यकांड शूद्र सैरें[५] । कंडण करी ज्यापरी; ॥ ७१ ॥ तयापरी मर्दोनी सैन्या । निघता जाहला प्रतापराणा । विचित्र वाद्यघोष नाना । व्योमालागीं चुंबिले. ॥ ७२ ॥ जैसा अग्नि लागोनी गेहीं । उसळोनी पुढां चालिला तेही । कीं नदीपूर भरूनी डोहीं । सागरातें फुफाटे; ॥ ७३ ॥ ना तें **रा**मचंद्रें **ख**र**दू**षणा । मर्दोनी पातला **द**शानना । कीं तो **भा**र्गव **स**हस्रार्जुना । जिंकोनी क्षत्रियां मारिलें; ॥ ७४ ॥ तयापरी **सं**शप्तकां । विगत करुनी, **द्रो**णा निका । पावता जाला [तवका] । विजयश्रीये प्रतापें. ॥ ७५ ॥ विशाळ रथू **वा**नरध्वजू । तप्त हाटक तेजःपुंजू । पताका डळमळे जैसी विजू । वाजी वात हेळिती[६]. ॥ ७६ ॥ 'सर' म्हणत, 'मंदटा! परा । अडचणीं गुंतसी, पाहे थारा । मना! तूं विकळ कामातुरा । स्त्रीकुचाग्रा अडखळसी. ॥ ७७ ॥ अनेक तुझ्या विचित्र [धांवा] ! आमुतें मार्गें करिसी गोवा' । वदोनी ऐसें उसळोनी हावा । **द्रो**णानीका पातले. ॥ ७८ ॥ जैसा पूर्वे प्रकाशतां हेळी । उलूक माना घालिती तळीं । कीं चंद्रबिंब प्रकाशतां कीळीं । तस्कर होती घाबिरे; ॥ ७९ ॥ ना तो जारकर्मी दुराचारी । देखतां जना भयविकारी । ना तो कौलिकें[७] मार्ग अघोरी । पाहतां, पवित्रा लाजिजे; ॥ ८० ॥ तयापरी **स**व्यसाची । देखतां, असुरां अरुची । **पां**डवसेना आनंदाची । वृष्टी करी उल्हासें. ॥ ८१ ॥ जेवीं गत[८] पती पाहतां सती । आनंदाची भेरी जगती । कीं प्रिय वस्तु जाहलिया प्राप्ती । चित्तीं चिंता मावळे; ॥ ८२ ॥ हर्षयुक्त तैसी सेना । मिनली **पा**र्था, विक्रम दुणा । **फा**ल्गुन प्रतापाचा राणा । सेनाभारीं

---

१. अग्निवृष्टि. २. तप्त, व्याकुळ. ३ असंख्य. ४ समुदाय. ५. यथेच्छ, पुष्कळ. ६. उपहास करिती, जिंकिती, मागें टाकिती. ७. शक्त्युपासक, शाक्त. ८. प्रवासास गेलेला नवरा. ९. भरती.

मिसळला. ॥ ८३ ॥ गांडीव कर्षोनी आकर्ण । शर सोडिले महाज्वलीन । जाणों आकाशा लागला अग्न । देवगण भयभीत. ॥ ८४ ॥ वारियाऐसे फिरती बाण । तटतटां शिरें पाडिती त्राण । महाद्विरद प्रभिन्न घन । शैलमान कोसळती. ॥ ८५ ॥ लहरीवेगें तळपती वारू । दुधड होवोनी पडती स्थिरू । रथी विरथी सोडुनी धीरू । **कर्णा**पाठीं निघाले. ॥ ८६ ॥ चहूंकडूनी एक हाक । घाबिरे तेणें वीरनायक । **कर्ण** प्रतापाचा अर्क । उदय करी तयातें. ॥ ८७ ॥ 'नों[१] भी, नों भी' म्हणूनी सर्वा । रथ लोटिला पुढें बरवा । विशाळ बाणें [२]महाहवा । **पांडवी** सेना छादिली. ॥ ८८ ॥ अस्त्रप्रभव मंत्रसिद्धी । शरमय जाली धरा [३]संधी । विगत वीर **काळ**क्रोधी । छिन्न जाले स्वगात्रें. ॥ ८९ ॥ खळबळिले चमूभार । **भीमा** नावरे क्रोधभर । उसळला जैसा वैश्वानर । क्षयालागीं [४]क्षयांतीं. ॥ ९० ॥ सवें वीर महाज्वलीन । **सात्यकी** आणि **धृष्टद्युम्न** । धनुष्य कर्षोनी आकर्ण । बाणजाळीं वर्षले. ॥ ९१ ॥ क्षयाअंतीं **शनि**, **अं[५]गार**, **गुरु**, । तैसा [६]भाली घोर प्रचुरु । मुखीं विखार [७]स्फुलिंगभारु । सरसराट तेजस्वी. ॥ ९२ ॥ बाणजाळीं प्रतापी **कर्ण** । आच्छादिलें न दिसे [८]ठाण । किंचित क्रोधें **रविनंदन** । कार्मुक पाणीं कर्षिलें. ॥ ९३ ॥ अस्त्रप्रयोग करुनी त्वरा । बाण सोडिले [९]कुलिशधारा । **पार्थ** शरवृष्टी करूनी परा । दिशा दाही झांकिल्या. ॥ ९४ ॥ हस्तलाघव शमित कोप । त्रिवर्गांचीं छेदिलीं चाप । शर खडतरूनी अग्निरोप । त्रिवर्ग रक्तीं भरियेले. ॥ ९५ ॥ रोषें पावोनी **भीमसेन** । शक्ति सोडी महाज्वलीन । अट्टाहास्य फोडूनी वदन । दिशा तेजें डवरिल्या. ॥ ९६ ॥ जाणों काळसर्पाची भगिनी । सुसाट देखिली नयनीं । त्वरा करूनी शरसंधानीं । तीव्र शर सोडिले. ॥९७॥ त्रिखंड करुनी तीन तुकडे । मही पाडिले शीघ्र [१०]देहुडे । शर विंधोनी महाकुडे । तीन तीन तिघां ताडिले. ॥ ९८ ॥ सिंहरवें फोडुनी हाक । **पार्था**प्रती धसला देख । क्रोधऊर्मी बाण सतीख । तयालागीं अर्पिले. ॥ ९९ ॥ **फाल्गुन** वीर धनुर्वाडा । रथ लोटुनी जाहला पुढा । काळविखारी तीक्ष्ण दाढा । सात बाण अर्पिले. ॥ १०० ॥ **शत्रुंजय** शत्रुघाती । **कर्णसुत** रुचिरकांती । देखोनी **अर्जुनें** दोषावर्ती । षट् बाण सोडिले. ॥ १०१ ॥ वोढोनी **गांडीव** सोडिलें

---

१. भिऊं नका, भिऊं नका. २. भयंकर युद्धांत. ३. त्या संधीस, त्या वेळीं. ४. प्रळयकाळीं. ५. मंगळ. याची कांति निखाऱ्यासारखी लाल आहे. ६. भल्लसंज्ञक बाण. ७. स्फुलिंग= विस्तवाची ठिणगी. ८. स्थान, रणभूमी. ९. वज्रासारखी कठिण व तीक्ष्ण धार ज्यांची असे. १०. वांकडेतिकडे.

त्वरा । शिर उडवूनी पाडिलें परा । रुंडें[1] रथाचा सोडूनी थारा । महीवरी आतलें. ॥ १०२ ॥ कौरववीर कासावीस । होवोनी तिघे लोटले सरिसे । पाठी वीर मिनतां रोषें । क्रोध भीमा नावरे. ॥ १०३ ॥ संगीं वीर निबिड थाटी । लोटुनी केली बाणवृष्टी । तीन पंचक शर नेटीं । एकएकां ताडिले. ॥ १०४ ॥ विगत करुनी तयासी । कर्ण वोढिला चहूं पाशीं । रविनंदन प्रतापराशी । अचळ शैलासारिखा. ॥ १०५ ॥ निवारूनी वीरसंधान । धृष्टद्युम्नातें दाही बाण । अर्पोनी सूतवाजिप्राण । पांच पांच शरीं घेतले. ॥ १०६ ॥ भूमी[2] आतला पांचाळपती । बृहत्क्षेत्र बृहच्छक्ती[3] । धांवतां कर्णें विगतगती । करुनी क्षणीं भ्रष्टिला. ॥ १०७ ॥ रोषें संतप्त धृष्टद्युम्न । अन्य रथीं वळंघोनी त्राणें । चाप कर्षोनी महाज्वलीन । बाणकोटी सोडिल्या. ॥ १०८ ॥ कर्ण वीरांचा मुगुटमणी । शर खंडुनी पाडिले धरणी । सत्याहत्तर इषु काळमानी । भेदुनी धनु खंडिलें. ॥ १०९ ॥ सिंहरवें[4] फोडितां हाक । पार्षदा रोष अधिकाधिक । अन्य चाप कर्षोनी सतीख । बाण गुणीं लाविले. ॥ ११० ॥ मंत्रप्रयोग जपोनी वदनीं । सोडितां चौसष्ट जाले किरणी[5] । जाणों चौसष्ट योगिणी[6] रणीं । साह्य जाल्या पार्षदा. ॥ १११ ॥ सुसाट येतां प्रभिन्न घायीं । वारितां कर्णें भेदिला हृदयीं । मुष्टिपासाव कार्मुक मही । छेदोनियां पाडिलें. ॥ ११२ ॥ त्यांवर अनुसंधान । तीन शर अर्पिले ज्वलीन । जाणोनी गुणें व्यापिले जन । बाहुउरीं शिरकले. ॥ ११३ ॥ कर्ण अचळ उभा कदनीं । दुर्योधन लक्षुनी नयनीं । द्रोणासहित वीरश्रेणी । जयद्रथ पातला. ॥ ११४ ॥ पदाति, अश्व, नाग[7],रथी । वेष्टुनी कर्णा दाटिले क्षिती । रोषें वर्षती शस्त्रघाती । द्वंद्व निकरें पेटलें. ॥ ११५ ॥ पांडववीरीं त्यांचा घांवा[8] । पाहोनी लोटले रथ हावा । अर्जुनवीर समानमघवा । विजयरथीं लोटला. ॥ ११६ ॥ धृष्टद्युम्न भीमसेन । सहदेव आणि अभिमन्य । नकुळ सात्यकीआदि घन । वीरमांदी तगटले. ॥ ११७ ॥ उभयसेनेचा एकवळा । घोषें व्यापिला नभोमंडळा । दिशा कोंदाटलिया सकळा । खणखणाट शस्त्रांचा. ॥ ११८ ॥ पती न विचारोनी आपुले आधीं । धांवोनी गज ताडिती क्रोधीं । रथी वारण लोटोनी संधी । पदातिया मर्दिली. ॥ ११९ ॥ अश्वार[9] उसळोनी रथी नागा । ताडिती

---

१. धडानें. २. (रथांतून) जमिनीवर उतरला. ३. अत्यंत बलवान्. ४ सिंहरव=सिंहनाद, युद्धध्वनि, वीरांची गर्जना. 'वीरां मुखींचे विकट शब्द । या नांव बोलिजे सिंहनाद ॥' [मुक्तेश्वर आदिपर्व, अ० २९।६१]. ५. सूर्य. ६. देवताविशेष. ह्यांची पूजा भाद्रपदांतील अमावास्येच दिवशीं करितात. ७. हत्ती. ८. चाल, हल्ला. ९. स्वार.

शस्त्र फिरती मागां । वारण शिरकोनी अश्वदांगा । मर्दन करिती तयांतें. ॥ १२० ॥ अनन्य युद्धीं घोर पाहीं । माजलें तुंबळ घोर मही । मरणभय विसरूनी तेंही । भिडती हावा संग्रामीं. ॥ १२१ ॥ रथी धांवोनी मारिती द्विरदा । सरकोनी गज करी त्यांचा चेंदा । पदाति लोटुनी अश्ववृंदा । मारामारी पेटती. ॥ १२२ ॥ शूरत्वमदें रणधुमाळी । मोडितां शस्त्र, हातफळी¹ । भिंडोनी फोडिती आरोळी । मल्लयुद्धा मिसळती. ॥ १२३ ॥ रथअश्ववारणवृंद । भूमी प्रतापघोर विशद । शवें दाटलीं, हृदयीं खेद । काळाच्याही होतसे. ॥ १२४ ॥ घायाळ चरफडती शस्त्रघायीं । एका शब्द न बोलवे कांहीं । एक वोढिती चरण मही । हुंबेती² घायीं अपार. ॥ १२५ ॥ जैसा सर्प ठेंचितां मुखीं । उलथापालथा होय दुःखीं । कीं पुत्रनिधनाचिया शोकीं । माता जेवीं तळमळी. ॥ १२६ ॥ तयापरी आक्रंदमान । चहूंकडे शब्दाचें ठाण । रथी विरथी छिन्नभिन्न । खंड स्यंदन ढेंसळे. ॥ १२७ ॥ शैलशिखरातळीं धोंडी । पडती तैशा गजाच्या कोडी । शुंडेविरहित धांवती प्रौढी । फोडिती रव बीभत्स. ॥ १२८ ॥ अमोल्य वारु जैवागळे³ । छिन्नगात्री पडिले शिळे । शस्त्रें भूषणें रुचिरकीळे । ध्वज पताका प्रतापें. ॥ १२९ ॥ रौद्र रण भयंकर घोर । भूतगणा आल्हाद थोर । झोंबोनी कंठीं प्राशिती रुधिर । भेदिती हर्षें मांसातें. ॥ १३० ॥ वीरश्रियेचा अति उल्हास । वीर न पावोनियां त्रास । शर वर्षोनी बहु कँर्कश⁴ । एकमेकां ताडिती. ॥ १३१ ॥ रुधिरनदीचा संगम । वैरुणालया⁵ लोटतां भीम । वीर न पवतां संग्रामश्रम । महामारीं पेटले. ॥ १३२ ॥ तंव अस्ताचळा आक्रमी तरणी । लोहित भरिल्या दिशा गगनीं । पद्मिणी कोमाइल्या⁶ वदनीं । वियोगदुःखें पैंतीच्या⁷. ॥ १३३ ॥ असो; आवरूनी युद्धासी । अर्जुन निघाला शिबिरासी । धर्मराज वीरेमांदेसी⁸ । पिटोनी भेरी चालिला. ॥ १३४ ॥ सात्यकी भूप धृष्टद्युम्न । स्तवितां पार्थ गौल्यतामान । विजयश्रीचा आनंदघन । पावते जाले स्वस्थाना. ॥ १३५ ॥ दुर्योधनादि वीरश्रेणी । वेष्टित द्रोण विगतकिरणी । वैस्त्रालया⁹ पातले झणी । जेवीं निधान हरपल्या. ॥ १३६ ॥ असो. धर्मराज रणदीक्षित । चातुर्मास हवनीं उदित । मृत्युकुंडीं काळाग्नि प्रदीप्त । इंधना आयुष्य नेमिलें. ॥ १३७ ॥ शुचि स्रुँवा¹¹

---

१. हातघाईवर येऊन, हातपिटीस येऊन. २. कण्हती. ३. अत्यंत वेगवान्. ४. कठिण, तीक्ष्ण. 'कर्कशं कठिनं क्रूरं कठोरम्' इति अमरः. । ५. समुद्रास. ६. कोमेजल्या, म्लान झाल्या. ७. सूर्याच्या. ८. वीरसमुदायांसह. ९. येथें मूळांतील बत्तिसावा अध्याय संपतो. १०. तंबूंत. ११. स्रुवा=यज्ञांत आहुति देण्याची पळी.

भीमार्जुन । समिधा चतुरंग सैन्य । ऋत्विज मुख्य **यदुनंदन** । इंष्टी सांग त्याचेनी. ॥ १३८ ॥ त्यांमाजी द्वितीयदिवसयुद्धसमाप्ती । **भगदत्ताची** होमिली आहुती । पुढें अवदान उत्तरापती । तृतीय इष्टी नेमिली. ॥ १३९ ॥ तेवीं रसू अति सुरसू । थकित शूर शूरांचा इषू । श्रोते संतसज्जनीं हिमांशू । चकोरप्राय सेविजे. ॥ १४० ॥ श्रीगुरु[**भीम**]राजनिशाकर । कृपारश्मी करितां प्रसर । सोमकांत **नरहरमो**रेश्वर । प्रांय करी **भा**रत. ॥ १४१ ॥

अध्याय नववा.

संजय म्हणे, 'राजया ! दक्षा ! । **भ**रतकुळवंशजपक्षा ! । कीर्तिमैलागरू ! धर्मवृक्षा ! । छाया जनां सुखकारी. ॥ १ ॥ शिबिरा पावोनी उभय चमू । निशी विश्रामतां सर्व श्रमू । उदया येतां तेजिष्ठधामू । दिवाकर त्रिमूर्ती. ॥ २ ॥ आन्हिक कर्म सारूनी नेम । षड्रस भोजनक्रम । सारूनियां, गंधमाल्यादि उत्तम । विविध वस्त्रीं भूषिले. ॥ ३ ॥ विचित्र वहनें प्रदीप्तकांती । जाणों नक्षत्रगण पातले क्षिती । वीर वळंघोनी पुरुषार्थशक्ती । अनेक शस्त्रीं दाटले. ॥ ४ ॥ वीरश्रीउत्साहें वीर मनीं । शस्त्रें तुंकोनी लोटले रणीं । **द्रो**णाचार्य गौल्यतावाणी । दुर्योधना अनुवादे. ॥ ५ ॥ म्हणे, 'राजया ! सार्वभौमा ! । ऐश्वर्यनिधी ! **वास**वप्रतिमा ! । सेनाउदधी ! कल्पद्रुमा ! । जनां सर्वां सुखकारी. ॥ ६ ॥ नित्य पृतना पावे खेदू । तेणें हृदयीं जातवेदू । धडकला, तेणें शौर्यमेंदू । मंद जाला वीरांचा. ॥ ७ ॥ जैसी रजस्वला लिप्त दोषीं । बाहेर फिरे विवर्णतोषी । कीं सूतकी ब्राह्मण लोकराशी । देखोनी पळे ज्यापरी; ॥ ८ ॥ तयापरी नित्य पृतना । भ्रष्ट होतसे विचक्षणा ! । दुर्धर **पा**र्थाचिया संधाना । उभा **काळ** भीतसे. ॥ ९ ॥ सुरांसहित सुरेश्वरू । आणि धरेचे धनुर्धरू । मिनतां **अर्जुन** वीर शूरू । अजिंक्य जेवीं **पि**नाकी.' ॥ १० ॥ '**ध**र्म धार्मिक सत्यवादी । क्षमा, दया, समान बुद्धी, । **ह**रिभजनीं प्रेमवृद्धी । साधुसेवनीं नम्रता. ॥ ११ ॥ सगुणब्रह्म कैवल्यपती । जो **ह**रातें आराध्यमूर्ती । **ब्र**ह्मादिकां अव्यक्त व्यक्ती । अंत **अ**नंता न लभेची; ॥ १२ ॥ **ना**रद**स**नकादिक । वेडे होवोनी फिरती लोक । **इं**द्रासी अमरपदाची भीक । कृपेनें ज्याच्या लाधली; ॥ १३ ॥ तो दानवारी **म**धुहंता । दावानळ प्राशन कर्ता । त्रिजगचळणा ज्याची सत्ता । अतर्क्य तर्क तर्केना. ॥ १४ ॥ तो भक्तिभावें **क**मळापती । जाला **पा**र्थाचा

---

१. यज्ञ, होम. २. आहुति. ३. अभिमन्यु. ४. येथें 'पाझर' किंवा 'प्रसव' असा शुद्ध पाठ असावा. ५. पेलून. ६. मधुरोक्तीनें. ७. अग्नि. ८. शेषाला.

सारथी । तेथें केवीं जय विगती । होय करिसी ? नरेंद्रा ! ॥ १५ ॥ असो; ऐसिया नृपवृंदा । आजी रणीं वोपीन आपदा । व्यूह निर्मोनी, ज्याचिया भेदा । इंद्रादिकां न करवे. ॥ १६ ॥ संशप्तकांचिया युद्धा । सव्यसाची गेलिया सध्या । चक्रव्यूह निर्मोनियां बुद्ध्या[1] । जो अचोज[2] सुरांतें. ॥ १७ ॥ ज्याचा भेद महासमर्थू । जाणो भार्गव, प्रद्युम्न, पार्थू । चवथा हो कां सुभद्रासुतू । अढळ पैरता[3] नसे पां. ॥ १८ ॥ चौघांविरहित भूमंडळीं । नाहींत वीर अंतुर्बळी[4] । षड्रथी मिळोनीं एकमेळीं. । सावध सर्वीं असावें. ॥ १९ ॥ व्यूहभेदनीं धनुर्वाडों[5] । येईल शूर सौभद्र गाढा । करील चमूचा थोर रगडा । महायोद्धा प्रतापी. ॥ २० ॥ सर्वीं राहूनी सावधान । मरणभयाचें विसरिजे भान । त्यावरी शिवाचें वरदान । सैंधवातें[6] लाधलें. ॥ २१ ॥ तरी मी आजी समरांगणीं । एका पांडवा काळसदनीं । वोपीन हे अचूक वाणी । धातियाची जाण पां". ॥ २२ ॥ आचार्यमुखींची ऐकोनी गोष्टी । दुर्योधना आल्हाद कोटी । गौरवोनी वीरांच्या कोटी । थापटी पाठी उत्साहें. ॥२३॥ पिटोनियां संग्रामभेरी । अनेक वाद्यें थोर गजरीं । सेनासमुद्र लोटला समरीं । चक्रव्यूह निर्मोनी. ॥ २४ ॥ पांडवसेना कडकडाटी । लोटली जैसी कृतांतमिठी । विजयरथीं कृष्णकिरीटी । बालार्ककिरणीं शोभले. ॥ २५ ॥ तंव संशप्तकाचे दूत । काळआमंत्रणा आले त्वरित । वृत्तांत ऐकोनी सुभद्राकांत । जाता जाहला संग्रामा. ॥ २६ ॥ जैसें मरण घेइजे मोलें । कीं जळते गृहीं निद्रासोहळे । ना तें शस्त्र घर्षिजे कंठनाळे । मरण कैसें पाहावया. ॥ २७ ॥ कीं दाटोनी हैंरिकेजाळीं[7] । फणी[8] धरूं धाविजे हस्तकमळीं । ना तो अग्नि धडकतां, ज्वाळमाळीं । टाकितां उडी, वांचिजे. ॥ २८ ॥ तयापरी संशप्तकीं । मरण बळें आणिलें तोकीं. । असो, द्रोणाचार्य महातवकीं । पांडवचमू लोटला. ॥ २९ ॥ कौरववीर बळसमर्थू । नृपवृंदें युंवतरस्वी[9] धूर्तू । कृतास्त्र सर्वविद्यानिरतू । रुक्मध्वज साजिरे. ॥ ३० ॥ रक्तांबर सुवर्णमाळा । रत्नभूषणीं फांकती कीळा । रक्तपताका ज्वाळमाळा । हेमस्यंदन नेटके. ॥ ३१ ॥ चंदन अगरू अंगीं उटी । केशरें भाळ चर्चिलें बोटीं । जाणों मदनाच्या

---

१. बुद्धिपूर्वक, मुद्दाम. २. अगम्य, अभेद्य. ३. चौघांशिवाय दुसरा कोणी. ४. बलवान्. ५. धनुर्धर. ६. जयद्रथानें रुद्राचें आराधन करून त्यास प्रसन्न केलें. तेव्हां रुद्रानें 'अर्जुन नसतांना एक वेळ तूं पांडवांचा पराभव करशील' असा त्यास वर दिला होता. (पुढें अध्याय १० ओंव्या ७०–८८ पहा). ७. हारक नामक वृक्षाच्या जाळींत. ८. सर्प. ९. नव्या दमाचीं व आवेशी.

कोटी । मूर्तिमंत आंगवल्लया.[१] ॥ ३२ ॥ कुरुवर्यराज शिखामणी । लक्ष्मण, सवें वीरश्रेणी । दाहा सहस्त्र धनुष्यपाणी । नामांथिले[२] पुरुषार्थी. ॥ ३३ ॥ दुर्योधन ऐश्वर्यनिधी । वेष्टित नृपांची वीरमांदी । मध्यभागीं शोभाउदधी । छत्र-चामरीं मिरवला. ॥३४॥ राधेय, कर्ण, दुःशासन, । रुक्मस्यंदनीं विराजमान । कृप, द्रौणी राजश्रीमान्य, । समुद्रमान शोभले. ॥ ३५ ॥ पृतनाअग्रीं[३] द्रोणाचार्य । जाणों प्रभाते उदित सूर्य । सिंधुराज नृपतिसूर्य । गुरुसन्निध विराजे. ॥ ३६ ॥ तयापरिसरीं[४] अश्वत्थामा । जाणों रुद्राची दिव्य प्रतिमा । तव पुत्र त्रिदशगरिमा[५] । त्रिदशांपरी[६] जाण पां. ॥ ३७ ॥ जयद्रथाचिया पृष्ठीं । गांधारराज[७] कितव[८] हटी, । शल्य, भूरिश्रवा जगजेठी । वीरमांदी मिरवले. ॥ ३८ ॥ ऐसा वीरांचा एकवळा । जाणों अग्नीच्या ज्वाळमाळा । कीं क्षोभला काळ उदित काळा । पसरुनी मुख धांवला. ॥ ३९ ॥ ऐसियापरी कौरवभार । येतां लोटला वृकोदर । संगीं वीर अमित क्रूर, । धीर, शूर, प्रतापी. ॥ ४० ॥ सात्यकी आणि चेकितान । कुंतिभोज भूप, धृष्टद्युम्न । द्रौपदीनंदन पांचजण । सौभद्र सिंहप्रतापी. ॥ ४१ ॥ क्षेत्रधर्मा[९], चेदी, धृष्टकेतु, । घटोत्कचराक्षस भैमी[१०], माद्रीसुतू, । युधामन्यु, शिखंडी धूर्तू, । मत्स्य, पांचाळ, सृंजय. ॥ ४२ ॥ यांहीवेगळे वसुधानाथ[११] । कृतास्त्र सर्वविद्यानिरत । थडकले, द्रोणें हर्षयुक्त । बाणकोटी सोडिल्या. ॥ ४३ ॥ धुंई[१२] आच्छादिजे दिनकरा । कीं पर्वतीं निबिड जळधारा । असंभ्रांत[१३] शैलाकारा । भंगी वृष्टी तयाच्या. ॥ ४४ ॥ वीरसमुद्र क्षोभतां वेगें । वेळीं[१४] गुरुवर्य जाला अंगें । विगत करुनी शरांचीं शृंगें । वीरवीर त्रासिले. ॥ ४५ ॥ क्रोधें प्रदीप्त द्रोणाचार्य । जाणों माध्यान्हीं प्रदीप्त सूर्य । बाहुविक्रमाचें गांभीर्य । अद्भुत रायां![१५] देखिलें. ॥४६॥ वीर शूर आलिया पुढें । संध्या[१६] वोपी कृतांताकडे । फिरुनी जातां मागिलेपाडे । कोण्ही नाहीं देखिला. ॥ ४७ ॥ सृंजय, पांचाळ, विराट, । भूपमांदी वीर सुभट[१७] । विगत करुनी अर्पिले कष्ट । विन्मुख केले सर्वही. ॥ ४८ ॥ कासावीस धर्म मानसीं । कांहीं उपाय न चले त्यासी । धरे दाटल्या शवांच्या राशी ।

१. देह धारण करित्या झाल्या. २. नामांकित. ३. फौजेच्या अघाडीस. ४. त्याच्या जवळ. ५. तीसपट मोठेपणा ज्याचा असा. ६. देवांप्रमाणें (अत्यंत पराक्रमी). ७. शकुनि. ८. कपटी, जुगारी, द्यूतनिपुण. ९. धृष्टद्युम्नाचा पुत्र. ह्यास द्रोणाचार्यांनीं मारिलें. १०. भीष्मपुत्र. हें घटोत्कचाचें विशेषण. ११. पृथ्वीपति (राजे). १२. धुक्यानें. १३. अचळ, धैर्ययुक्त, शांत. १४. मर्यादा, सीमा, समुद्राचा किनारा. १५. धृतराष्ट्रा! १६. सद्यः, तत्काळ, तावडतोब. १७. उत्तम योद्धे.

हर्षराशी मावळला. ॥ ४९ ॥ जेवी नौका भंगितां विगतदशा । तारक लक्षितां दशदिशा । कीं कुटुंब पीडितां रोगपाशा । धांडोळिती[1] वैद्यातें; ॥ ५० ॥ तयापरी धर्मराज । वीरांतें बहु देतसे तेज । परी काळ भावोनी भारद्वाज । व्यत्यस्त[2] वीर चौफेरी. ॥ ५१ ॥ तंव अकस्मात वीरकेसरी । देखिला सौभद्र पटकेसरी । ज्याचिया बळें न टिके सरी । पार्थाविण जाण पां. ॥ ५२ ॥ युवतरस्वी शालस्कंधी[3] । आजानबाहु, ग्रीवावृद्धी । आठीवठाण,[4] सोज्वळ बुद्धी । रुचिरकाया तेजस्वी. ॥ ५३ ॥ मुखचंद्र विराजमान । कुमारदशा पूर्णिमा जाण । षोडश अब्दांचें प्रमाण । कळा सोळा विलसती. ॥ ५४ ॥ चौदा विद्या, चौसष्टी कळा । देहीं विसावल्या सकळा । धनुर्वेदीं वोतींव गोळा । प्रगट जाला अवयवीं. ॥ ५५ ॥ कीं सुभद्राशुक्त्युदर विशाळ । मेघपार्थ, स्वात्युदक निर्मळ । सौभद्र निपजलें मुक्ताफळ । तेजें कौस्तुभ भासत. ॥ ५६ ॥ कीं तो अर्जुनवरुणालय । माजी सुभद्रालहरी वर्य । अभिमन्युचंद्र विकासमय । वंशाभरण सत्कीर्ती. ॥ ५७ ॥ ना तो पार्थनंदनवन[5] । यादवीमाधवी[6] विराजमान । सौभद्रसुरतरू[7] युद्धदान । याचकक्षत्रियां गौरवी. ॥ ५८ ॥ कीं यादवपांडव पवित्र कुळीं । कुळदीप अभिमन्यु तेजें हेळी । ज्याचिया प्रतापाची कीळीं । विश्व सर्व डवरिलें. ॥ ५९ ॥ सत्यसंग्रही, निरतधर्मी, । शुची, दांत, विगतऊर्मी, । विप्रपूजन, आस्था कर्मी, । विनय, आर्जव, दक्षता. ॥ ६० ॥ युगांतअंतक वैरियां पाही । विक्रमें दुजा भार्गव मही । बळप्रताप जैसा देही[8] । भीमसेनासारिखा. ॥ ६१ ॥ धनुर्विद्या अर्जुनासम । गुण गांभीर्य धार्मिक धर्म । रूप लावण्य उत्तमोत्तम । मार नकुळासारिखें. ॥ ६२ ॥ कळा कौशल्य पुरुषार्थी । कृष्णासमान जाणिजे क्षिती । तेजें जैसा देव गभस्ती । विक्रमें इंद्र दुसरा. ॥ ६३ ॥ ऐसा सौभद्र विजयध्वज । देखोनी हर्षित धर्मराज । म्हणे, 'बापा! प्रतापतेज । दावी सर्वां क्षत्रियां. ॥ ६४ ॥ तुझिया पुत्रपणाच्या श्लाघ्यता[9] । आम्ही वसिन्नलों सुरांच्या माथां । वंशाभरण अवनिजाकांता[10] । तेवी तूं पुत्र कुरुकुळीं. ॥ ६५ ॥ पाहीं पां तुझिया अज्ञचमू । विगतमानसें पावे श्रमू । चक्रव्यूहाचा न कळे क्रमू । निस्तेज वीर सर्वही. ॥ ६६ ॥ तरी तुवां आपुलें बाहुवीर्यें । भेदोनी व्यूह

---

१. शोधिती. २. दाणादाण झालेले. ३. झाडांप्रमाणें विशाल आहेत खांदे ज्याचे, असा. ४. ज्याची बैठक अगदीं निश्चळ आहे असा. ५. अर्जुन हाच इंद्राचें नंदनवन. ६. सुभद्रा हीच माधवीलता. ७. अभिमन्यु हाच कल्पवृक्ष. ८. मूर्तिमंत, देहधारी. ९. बढाईमुळें, स्तुत्य कुल्यामुळें. १०. रामास लहु व कुश हे दोन पुत्र होते, त्यांप्रमाणें पराक्रमी.

करावी सोय । पाठी आम्ही सर्वत्र राय । जिंकोनी सेना क्षणार्धें. ॥ ६७ ॥ संग्रामसिंधूच्या आवर्ती । पडलों पुत्रा नव्हे निर्गती । नौकारूपें परपारप्राप्ती । करीं आम्हां याचकां.' ॥ ६८ ॥ अभिमन्यु म्हणे 'आजी ताता ! । कायसी अवघड व्यूहाची कथा ? तुमची आज्ञा माझिया माथां । डोलवीन[1] क्षत्रियां. ॥ ६९ ॥ यादवीकुशीं माझें जनन । रेतदानी श्वेतवाहन । उभय कुळें प्रसिद्ध घन । मी दिनमणी वर्तलों. ॥ ७० ॥ तरी मी आजी उभय वंशा । सोज्वळ करुनी दशदिशा । भरुनी सर्व कीर्तिघोषा । भुवनत्रयीं अक्षयी. ॥ ७१ ॥ मी ऐकांग[2] वीर आपुले प्रौढी । पृतना करीन देशधडी । कायसी द्रोणाची परवडी? । दावीन चोज सर्वांतें. ॥ ७२ ॥ अग्नि धडकतां पर्वतमूळीं । सरकतां कष्ट कायसा मौळीं[3] ? । कीं अगस्ती रिघतां समुद्रजळीं । पैलपारा अविलंबें. ॥ ७३ ॥ ना तें वैकुंठींच्या चढोवोढी । केवीं गरुडातें सांकडी ? । कीं प्रळयवायूचा झडाडी । अटक केवीं महेंद्रा ? ॥ ७४ ॥ तयापरी व्यूहभेदनीं । नाहीं आडवारा माझिये मनीं । परी तुम्ही येतां द्रोण रणीं । आड आडवा सलंब.' ॥ ७५ ॥ भीम बोले हर्षोत्तर । 'तुझ्या पाठी सर्वेही वीर । आम्ही रणनदी पावों पार । चिंता न करीं; सुपुत्रा!' ॥ ७६ ॥ पितृवाक्यपुष्पांजळी । येरें वंदोनियां मौळीं; । नमन करितां पादयुगळीं । आशीर्वादें गौरविला. ॥ ७७ ॥ जयशब्द पिटोनी वाणी । वाद्य त्राहटिलें रणीं । सौभद्र हर्षयुक्त मनीं । जावया धामा[4] उल्हासे. ॥ ७८ ॥ करुनी सेनेचा रगडा । कीर्तीचा उभवूं पूर्ण धेंडा । सारथीयातें गौरवोनी विडा । रत्नमाळा अर्पिल्या. ॥ ७९ ॥ सारथी[5] सारथ्यकलानिपुण । शस्त्रास्त्रमांदी भरुनी पूर्ण । बालार्ककिरणी स्यंदन घन । ध्वजपताकीं सज्जिला. ॥ ८० ॥ च्यान्ही वारू गुणसंपन्न । तरुण, सदृढ, वज्रठाण । जवें माघारती पवन । मनोरम, शुभदर्शी. ॥ ८१ ॥ हस्तकले डोलतां रज्जू । वारू उसळले जैसे विजू । सौभद्र वीर शिरिंताजू[6] । जाणों कुंमार[7] दुसरा. ॥ ८२ ॥ वारणवृंद नरपार्थिव । सौभद्रमृगेंद्र घाली कंव[8] । शर सोडिले प्रभिन्न हव[9] । धरातळीं सकंप. ॥ ८३ ॥ कीं तो काळ आयुष्यगणना । करितां, सौभद्र पातला रणा । धर्मआज्ञावेळीं पाश निपुणा । कर्षोनी काळें वोढिला. ॥ ८४ ॥ ना तो कृतांतकाळयंत्रें । दारू आयुष्य,

---

१. माना डोलवावयास लावीन, माझा पराक्रम पाहून ते माना डोलवतील—असा भाव. २. एकटा ३. (पर्वताच्या) शिखरापर्यंत. ४. रणस्थळावर. धाम=घर, स्थान, तेज, पराक्रम—असे अर्थ होतात. ५. सुमित्र नामक सारथि. ६. शिरोभूषण (श्रेष्ठ). ७. कार्तिकस्वामि. ८. उडी, पकड. ९. तोफ.

कळा सूत्र[1] । धर्मआज्ञा अग्निस्पर्शमात्र । काष्टें गोळा उसळला. ॥ ८५ ॥ वीरांमुखीं किलकिलाट । 'आला आला' म्हणती सुभट । 'घ्या, घ्या, मारा' शब्द वरिष्ठ । सर्वांमुखीं माजला. ॥ ८६ ॥ अनेक वाद्य वाजंतरीं । ढोल, दमामे, शृंग, भेरी । हलक्या, बुरंगे, नफेरी । एक घायीं बहुविध. ॥ ८७ ॥ जैसे नदी-पुराचे लोट । धांवले तैसे वीरसंघाट । करुनी दुर्गकोट । सौभद्र मध्यें वेष्टिला. ॥ ८८ ॥ हस्ती, पदाती, असिवार[2] । रथिया रथी शस्त्रसंभार । सोडिते जाले एकधार । जेवीं वांकुडी[3] पुष्याची[4]. ॥ ८९ ॥ बाप अभिमन्य वीरराजू । शर सोडिले तेजःपुंजू । तिखारधार[5], मेषध्वजू । जाणों भासे अवयवी[6].॥ ९० ॥ निवारोनी शरें त्यांचिया वृष्टी । वीर वीर भेदिले हटी । विगत करुनी सेना-मिठी । मध्यभागीं शिरकला. ॥ ९१ ॥ जैसा सिंह वारणदळीं । निघोनी त्यांची करी खंदळी । कीं अशोकीं[7] राक्षसफळी । करी धुळी हनुमंतू. ॥ ९२ ॥ तयापरी सुरेंद्रसूनू-[8]। तनय नुरवी वीरां भानू[9] । जाणों प्रदीप्त प्रळयभानू । क्ष-यालागीं क्षोभला. ॥ ९३ ॥ बाहुवीर्य अमोघ घन । कोटीच्या कोटी सोडिले बाण । कणीक[10] नाळीक[11] क्षयरूप जाण । सायकादि वत्सदंत[10]. ॥ ९४ ॥ जाणों समक्ष[12] काळदशन । तक्षकविषें घोळिले पूर्ण । वृश्चिकपुच्छा पीठ[13] पाषाण । तया पृष्ठी निर्मिले. ॥ ९५ ॥ ऐसिया शरांच्या वोघमाळा । लाविल्या देहुड्या[14] हस्तकळा । धडधडाट वन्हिज्वाळा । जेवीं वना धडकती. ॥ ९६ ॥ तटतटां वीर पडती रणीं । थटथटां शिरें उडती रणीं । रुक्मकुंडलें शुक्रगुरुमानी[15] । दिशा तेजें उजळती. ॥ ९७ ॥ सुंदर नास, आकर्ण नयन । विशाळ भाळ केशरपूर्ण । प्रवाळवोष्ठ, कुंदरदन । श्रीमुख शशीसाजिरें. ॥ ९८ ॥ ऐसिया शिरांचिया राशी । भूमी दाटल्या बाणकोशीं । भूषित बाहु [16]अंगदेशीं । व्यो-ममार्गीं उडविले. ॥ ९९ ॥ उतरतां भासती पंचबाणी । करमुद्रिका मुगुट-मणी । मुष्टि शस्त्रें झळकती किरणी । जाणों गरळा त्रिषाच्या. ॥ १०० ॥ रुचिरकांत कोमळतनू । सुगंधचंदनीं चर्चिला घनू । खंडविखंड नुरुनी भानू । भूमी अपार पाडिल्या. ॥ १०१ ॥ वीरांसहित खंडूनी हस्ती । धरें पाडिले

---

१. रंजूक, वात, सूत. २. अश्ववार, स्वार. ३. वृष्टि. वांकुडी=पावसाची झड. ४. पुष्य हें एक भरपावसाचें नक्षत्र आहे. ५. तीक्ष्ण आहे धार ज्यांची असे. ६. मूर्तिमंत, सजीव. ७. अशोकनामक उद्यानांत. ८. देवश्रेष्ठ जो इंद्र त्याच्या पुत्राचा (अर्जुनाचा) तनय (अभिमन्यु). ९. भान, देहभान. १०. बाणविशेष. ११. नालीक=भाला, बर्ची. १२. प्रत्यक्ष, साक्षात्. १३. आसन, बैठक. १४. मनोरे, माड्या. १५. शुक्र व गुरू यांच्या ताऱ्यांप्रमाणें (तेजस्वी). १६. अंगदासकट.

पर्वताकृती । घंटा, नेपुरें, पाखरा[1] किती । धुळीमाजी लोळती. ॥ १०२ ॥ अश्वरत्नें भूषित भूषणीं । सहित स्वार पाडिले रणीं । शोणितरंगें रंगली धरणी । भूषणें शस्त्र अपार. ॥ १०३ ॥ पदाति वीर वस्त्राभरणी । गदा-मुद्गरपाशपाणी । लहुडी, चक्र, त्रिशूळ, किरणी । भिंडिमाळादि अनेक. ॥ १०४ ॥ खंडविखंड गात्रस्थानीं । होउनी पडिले समरांगणीं । हुंबती, क्रंदती, बोभाती वाणी । 'काका! मामा! बांधवा!' ॥ १०५ ॥ सहस्रशः वीर रणांगणीं । पडिले बीभत्स वस्त्राभरणी । रोमवसनी, ऊर्णवसनी । चर्मवसनी, यवनादी. ॥ १०६ ॥ गजाश्ववीर छिन्नगात्री । शवें दाटली निबिड धात्री । हलकल्लोळ सेनासत्रीं । भूतगणा आल्हादू. ॥ १०७ ॥ प्रळयकाळ भावोनी वीरीं । भयचकित पळती दूरी । जैसा अग्नि धडकतां वनांतरीं । श्वापदातें आकांतू. ॥ १०८ ॥ ना तो विष्णु दानवी[2] सेना । विगत करुनी लाविली रणा । कीं तो महेश कैलासराणा । भ्रष्टी त्रिपुरा ज्यापरी. ॥ १०९ ॥ तयापरी एकांग वीर । सौभद्र शूर रणरंगधीर । विचरे जैसा समीर[3] । अटक कोठें असेना. ॥ ११० ॥ देखोनी संतप्त दुर्योधन । रोषें अधर[4] चावोनी पूर्ण । लोटला जैसा पंचानन । शस्त्रघायीं ताडिल्या. ॥ १११ ॥ द्रोण बोले महींद्रांप्रती[5] । 'काय पळतां? धरा शक्ती । देह मृत्यूचा सांगाती[6] । पळतां अमर होइजे?[7] ॥ ११२ ॥ कीर्तीनें जावें स्वर्गधामा । हाची क्षत्रियां धर्म तुम्हां । भय त्यागोनी, क्रोधगरिमा । रक्षा वेगीं रायातें.' ॥ ११३ ॥ ऐसें वदोनी गुरूच्या पाठी । धांवतां लोटल्या वीरांच्या थाटी । भ्रुकुटीसी घालोनियां गांठी । कृप-द्रौणी तगटले. ॥ ११४ ॥ कर्ण, कृतवर्मा, सौबळ । मद्रराज, भूरिश्रवा, शल्य । पौर, वृषसेन, बृहद्बळ । अनेक भूप लोटले. ॥ ११५ ॥ सहस्रशः एकेची वेळा । बुजोनी काढिला सौभद्र तळा । वर्षला खरशरौघमाळा । अंगुष्ठही दिसेना. ॥ ११६ ॥ जैसी कुलीन पतिव्रता । अवयवांतें लोपी दृढता । कीं साधु आपुली गुणवार्ता । आच्छादित ज्यापरी. ॥ ११७ ॥ तैसा आर्जुनी वीरराज । अचळ रणीं ऐश्वर्यबीज । शरासनीं शर सुतेज । कोटीच्या कोटी सोडिल्या. ॥ ११८ ॥ वात वितळी अभ्रपडळा । तेवीं विगत शरौघ-माळा । करोनी त्रासिलें वीरां सकळां । विन्मुखसेना अर्दितू. ॥ ११९ ॥ सिंहरवें फोडुनी हाक । फाल्गुनी रणीं अमित देख । विन्मुख वीर द्रोणादिक ।

---

१. पाखरा=हत्ती किंवा घोडे यांचें चिलखत. २. राक्षसांची. ३. वायु. ४. ओंठ. दांतओंठ चावणें—हें रागाचें एक चिन्ह आहे. ५. सर्व राजांप्रत. ६. मित्र, सोबती. ७. पळालेत तर अमर व्हाल काय?—हा इत्यर्थ.

पुन्हा युद्धा धडकले ॥१२०॥ वीरसमूहो समुद्रथडी । शरलाटा उसळती प्रौढी । सौभद्रवेळी वाळूकांडी । थोकोनी करी परौता. ॥१२१॥ वाजिवारण पदातिरथी । वेष्टूनियां उत्तरापती । वर्षते जाले इषूंच्या पंक्ती । अहिविषासारिख्या. ॥ १२२ ॥ दु:सह अर्पिले नवबाण । शिळाशित तीक्ष्ण घन । दु:शासनें बारा प्रभिन्न । हेमपुंखी सोडिले. ॥ १२३ ॥ शारद्वतें विंधिले तीन । द्रोणें सत्तर महाज्वलिन । विंशती समर्पी सत्याहत्तर बाण । काळघाती प्रभिन्न. ॥ १२४ ॥ कृतवर्मा यादवेश्वर । सात नाराच अर्पी घोर । बृहद्वळ तीक्ष्ण शर । आठ ताडी सौभद्रा. ॥ १२५ ॥ भूरिश्रवा क्षुरप्र तीन । मद्रराज सौबळ ज्वलीन । सौबळद्वय भुजंगमान । तीन राजा कुरुवर्य. ॥ १२६ ॥ बाप अभिमन्यु प्रतापराणा । निवारी एकदा त्यांचिया बाणा । तीन तीन अर्पी सर्वांजणा । रक्तांगीं सर्वा डवरिलें. ॥ १२७ ॥ थोर विद्येचें लाघव । हस्तकळा परम जवें । मंत्रशस्त्राचें तीव्र गौरव । थकित वीर सर्वही. ॥ १२८ ॥ शरासनीं कर्षोनी मुष्टी । शर सोडिले कोटीच्या कोटी । जाणों प्रळयदामिनीवृष्टी । विन्मुख पाठी वीरांच्या. ॥ १२९ ॥ पळतां शूरांतें भूमि थोडी । पाईं पडताती वेंगडी । पडती जैशा उतरडी । तळीं पात्रें भंगिल्या. ॥ १३० ॥ रौद्र संग्राम घोर वळसा । वीर निघाले सांडुनी धिंवसा । द्रोणाचार्य पावोनी त्रासा । पुन्हा लोटे वीरासी. ॥ १३१ ॥ कृपाचार्य. कर्ण, द्रोण, द्रौणी । शैली, शल्य, भूरिश्रवा, शकुनी । क्राथ, सोमदत्त, विंशती गुणी । वृंदारक, ललीत्थ, ॥ १३२ ॥ वृषसेन, सुषेण, प्रतर्दन । कुंडभेदी, दीर्घलोचन । प्रबाहु आणि दुर्योधन । अनेक वीर सहस्रश:. ॥ १३३ ॥ धडकोनियां शरासनीं । शर वर्षिले कृशानकिरणी । अभिमन्यु अमित वज्रठाणी । जेवीं राम दाशरथी. ॥ १३४ ॥ चाप कर्षोनी आकर्ण घन । नक्षत्रसंख्या सोडिले बाण । कर्णहृदय भेदोनी पूर्ण । धरेमाजी विझाले. ॥ १३५ ॥ जेवीं फणी रिघती बिळीं । तैशा भेदुनी गेल्या भाळी । अकंप कर्ण क्रोधानळीं । उल्का वमी विषाच्या. ॥ १३६ ॥ कुंडभेदी, दीर्घलोचन । सुषेणादि तीन तीन बाण । सौभद्रें ताडुनी केले क्षीण । पुढां येतां थोकले. ॥ १३७ ॥ अश्वत्थामा पंचवीस

---

१. बाणरूपी लाटा (किंवा) पाण्याच्या लाटा. शर=(१)बाण, (२) पाणी. २. अभिमन्यु हाच समुद्राचा किनारा. ३. बाण. ४. हस्तकौशल्य. ५. वेग. ६. वांकडेतिकडेपणाची स्थिति. हा शब्द मुक्तेश्वराच्या कवितेंतही आढळतो:—'उदरपृष्टीची घडी । करुनी चरणांची वेंगडी । झोंक सांवरितां दंडीं । शब्द तोंडीं न बोलवे.॥' हरिश्चंद्राख्यान–अध्याय ४।७२. ७. उतरडीच्या मूळाचें–बुडाचें–भांडें किंवा मडकें फोडलें असतां. ८. भरंवसा, धैर्य. ९. अग्निसदृश.

बाणीं । सोडोनी क्षताक्षित[1] केला रणीं । सात बाण अशनीमानी[2] । **कृ**तवर्म्यासी अर्पिले. ॥ १३८ ॥ **श**ल्यराया वोपोनी बाण । सूतवाजी घेतले प्राणें । अमित वर्षोनी इषु घन । वीरवीर त्रासिले[3]. ॥ १३९ ॥ माघारल्या वीरांच्या कोटी । पुढां पाय न घालवे सृष्टी । हर्षानंदें मुखसंपुटीं । गर्जना करी हरिखें. ॥ १४० ॥ जैसी शरपंजरीं वानरचमू । **शै**लारिशत्रु[4] पावती श्रमू । कीं **रु**क्मिणीस्वयंवरीं **ब**ळिरामू । करी विगती नृपातें[5]. ॥ १४१ ॥ ना ते **सौ**भसेना[6] दुःखावर्ती । पाववी जैसी **भा**मापती । कीं **बा**णचमू[7] विगतगती । करी जेवीं **र**तिर्नाहो[8]. ॥ १४२ ॥ तयापरी भ्रष्टुनी पृतना । **सौ**भद्र विचरे रणांगणा । भूतें भाविती अंत प्राणां[9] । **पां**शपाणी[10] समक्ष[11]. ॥ १४३ ॥ असो; पुढें संग्राम थोर । होईल महा घोरांदरें[12] । त्या वीररसाचें पान मधुर । श्रोते सज्जनीं सेविजे. ॥ १४४ ॥ श्रीगुरु**भी**मराज कृपाघन । कृपासुढाळें[13] वर्षतां घन । **न**रहर**मो**रेश्वर नदीमानें[14] । **भा**रत वर्णी सुसाटें[15]. ॥ १४५ ॥

अध्याय दहावा.

धृतराष्ट्र म्हणे, ‘**गा**त्रलगणी[16] ! । कुमारवयसा वीर **फा**ल्गुनी । परी प्रताप न पुरे धरणी । **सु**रेंद्रमान जाण पां. ॥ १ ॥ सान म्हणों नये कृशान । बटु न म्हणिजे **वा**मन । ब्राह्मण म्हणों नये **जा**मदग्न[17] । वीर राजे प्रतापी. ॥ २ ॥ तयापरी गुणवर्धन । **सौ**भद्र शूर वंशाभरण । पुढें काय करी विक्रम घन । करीं, तो मातें निवेदी.’ ॥ ३ ॥ **सं**जय म्हणे, ‘सार्वभौमा ! । सादर ऐकें ऐश्वर्यदमा[18] ! । **सौ**भद्राचा प्रतापमहिमा । आश्चर्यकर सुरांतें. ॥ ४ ॥ बालार्ककिरणी स्यंदन घन । ध्वजापताकीं विराजमान । **अ**भिमन्युवीर सुरेंद्रमान । विचरे अंतकासारिखा. ॥ ५ ॥ **कौ**रव वीर पाहोन नेत्रीं । संतापले थोर गात्रीं । दुःसह मानोनी भूपक्षत्री[19] । **श**ल्यबंधु लोटला. ॥ ६ ॥ शल्यकर्ता[20] वैरिया काया । यालागीं नाम **श**ल्य तया । दाहा बाण **पां**डवराया । अर्पिता जाहला

---

१. जखमेमुळें व्याकुळ. २. वज्राप्रमाणें. ३. घाबरवून सोडले. ४. पर्वतशत्रूचे (इंद्राचे) शत्रु (राक्षस). ५. शिशुपाळनामक राजास. ६. शाल्वसैन्याला. ७. बाणासुराचें सैन्य. ८. मदनावतार व कृष्णपुत्र प्रद्युम्न. नाहो=नाथ, पति. ९. भूतें प्राण अंत भाविती, असा अन्वय. १०. यम. ११. प्रत्यक्ष मूर्तिमंत. १२. फार भयंकर. १३. कृपेची वृष्टि. १४. (पुरामुळें दुथडा वाहात असलेल्या) नदीप्रमाणें. १५. वेगानें, आवेशानें. १६. संजया. १७. क्षत्रियांतक परशुराम. १८. वैभवनिधे! दम=धाम, घर. १९. क्षत्रिय राजे. २०. पीडा करणारा.

निघातें. ॥ ७ ॥ फोडुनियां विकट हाक । 'तिष्ठ तिष्ठ' म्हणे देख । **सौ**भद्र होवोनी हास्यमुख । चाप पाणी कर्षिलें. ॥ ८ ॥ त्वरा करूनी शरसंधानीं । रथ ससूत, वाजी गुणी । ध्वज, धनु, वर्म छेदोनी झणी । भूप धरणीं पाडिला. ॥ ९ ॥ रथरक्षक प्रतापी मानी । शिरें खंडुनी पाडिले अवनी । 'साधु साधु' ह्या वचनीं । वीरमांदी गर्जली. ॥ १० ॥ अनुचरसेना भ्रष्टमान । लंघिते जाले दिशांचें मान । वरवाळले वीर घन । गजाश्वरथी पदाती. ॥ ११ ॥ चाप **आर्जु**नी वीर सुभग । **कृष्णा**र्जुनापासाव विद्या सांग । पावला, त्याच वीरश्रीरंग । दावी सकळां क्षत्रियां. ॥ १२ ॥ शर वर्षोनी **काळ**धाडी । वीर वीर त्रासिले प्रौढी । दुःसह मानोनी वीरांच्या कोडी । रोषानळें धडकला. ॥ १३ ॥ **कर्ण, कृप, द्रोण, द्रौणी, शल्य** । **दुर्योधन, सो**मदंती, **सौ**बळ । अनेक वीरांचे तुंबळ । शस्त्रधारीं वर्षती. ॥ १४ ॥ अलातचक्राचिये सरी । मध्यें वेष्टिला केसरी । येरें बाण सोडूनियां समरीं । सहस्रशः वीर मर्दिले. ॥ १५ ॥ हर्षयुक्त **द्रोण कृ**पाचार्या । बोलता जाहला सद्गद काया । म्हणे, 'पाहें पां ऋषिराया ! । कोण विद्या वीराची ! ॥ १६ ॥ **खां**डवदाहाचा नंदन । **सं**सारशत्रूचा भाचा जाण ॥ **रा**मस्वसाजठरीं रत्न । कुळदीपक जन्मला. ॥ १७ ॥ धन्य **कुरु**वंश वंशाभरण । कीर्ती उजळिलें स्वर्गभुवन । पंच **पां**डव प्रतापवान । हर्षकारी त्यांसही. १८ ॥ वय पाहतां कुमारदशा । समान विक्रम **सुरा**धीशा । वीरमंडळीं ययाऐसा । वीर नाहीं सर्वथा. ॥ १९ ॥ संग्रामसागर क्षयारंभीं । वीरलोट उसळती नभीं । तारू**सौ**भद्र धैर्यस्तंभीं । वातवेगें विचरतू. ॥ २० ॥ **पार्थ**प्रताप वाणिजे वाणी । तरी तो **सुरें**द्र पुत्र गुणी । विजयी अस्त्र सुरप्रदानीं । दैवयोगें लाधला. ॥२१॥ अक्षयी रथधुरे हॅरी । अक्षयी भाते, ध्वजाग्रीं हॅरी । [रथ मिरवी **श्रीरंग हरि**] । हारी युद्धीं केवीं पां? ॥ २२ ॥ ऐसी नसतां युद्धसॅमादी । एकांग वीर समान उदधी । **अर्जु**नाहूनी शतावधी । विक्रम याचा आगळा.' ॥ २३ ॥ ऐसी प्रशंसा ऐकोनी कर्णीं । **दुर्यो**धन जल्पोनी मनीं । बोलता जाहला प्रफुल्लवाणी । **दु**:शासना**कर्णा**तें. ॥ २४ ॥ म्हणे, '**द्रोण** पांडवॅभाट । भाँटीव करी, त्याची वाट । पाहणें, हेंची मूर्खत्व श्रेष्ठ । वीरां सर्वा जाण पां. ॥ २५ ॥ प्रिय शिष्याचा नंदन । लालन करी, न करी कदन ।

---

१. हातानें. २. चढाई करून गेले. ३. बळिरामाच्या वहिणीच्या (सुभद्रेच्या) पोटीं. ४. घोडे. ५. मारुति. ६. पराजय. ७. युद्धाची सामग्री, साहित्य. ८. थोर, मोठा. हें द्रोणाचार्यकृत अभिमन्युपराक्रमवर्णन मूळापेक्षां सरस आहे (अध्याय ३९ श्लोक १०–१३ पहा). ९. पांडवांचा स्तुतिपाठक. १०. स्तुतिपाठ.

वीरक्षय होतसे दारुण । ईर्षा नये गुरुवर्या.' ॥ २६ ॥ तंव दु:शासन आफळी बाहो । म्हणे, 'तो रणदेवीचा नाहो । तरी मी समक्ष केतराहो । नाश करीन तयाचा. ॥ २७ ॥ राजाधिराजा! आपुले नयनीं । पाहसी सौभद्र पडिला रणीं । पुत्रशोकाचे शोकासनीं । पांडवांतें वधीन.' ॥ २८ ॥ ऐकोनीं आल्हाद दुर्योधना । वीरांसहित धाडिला रणा । अनेक वाद्यघोष नाना । भेरी, झल्लरी, मृदंग, ॥ २९ ॥ पणव, ककच, ढोल, नफेरी । शृंगें, बृंगें, कर्णे, मोहरी । प्रभिन्न शंख वाजंतरीं । सिंहनाद वीरांचे. ॥ ३० ॥ सेनाअग्रीं दु:शासन । लोटोनी पांडवा विंधिले बाण । येरें निवारुनी बाणघन । 'यावें' म्हणे, 'कां आजी?॥ ३१ ॥ कांका म्हणावें हीन जाती । तैसी चेमूची वर्णव्यक्ती । साध्वी देवी द्रौपदी सती । कपटद्यूतीं छळियली. ॥ ३२ ॥ जे विराटाची सम भगिनी । देवतास्त्रियांतें मुखरणी । पांडवसिंहांची धर्मपत्नी । वंद्य सर्वां जगातें. ॥ ३३ ॥ विनय आर्जव सदाचारी । क्षमा, दया, शांति, मंगळ गौरी । पतिवाक्यनिरत मधुरोत्तरीं । नास्तिक्यशब्दा नातळे. ॥ ३४ ॥ सर्वांगुणीं गुणमंडण । लावण्य समुद्रींचें दिव्य रत्न । कौरवकुळाचें कुळभूषण । जें मंडण धार्मिकां. ॥ ३५ ॥ धार्मिक धर्म धर्मी निरत । दु:शब्दवचनीं छळिला बहुत । भीमसेन काळ कृतांत । वांकुल्या त्यातें दाविल्या. ॥ ३६ ॥ तैंपासुनी तुजला हीना! । धुंडितां प्राप्त जाहलासी रणा । तूतें पाठवूनी काळसदना । अनृणी होणें जनकाचें.' ॥ ३७ ॥ ऐसें वदोनियां वचनीं । शर सज्जिला काळाग्निमानी । आकर्ण वोढोनियां त्राणीं । बाहुवीर्य सोडिला. ॥ ३८ ॥ सुसाट सुटला गरुडवेगें । तेजें दिशा डवरिलीं अंगें । शत्रुदेहें भेदोनियां रागें । धरेतळीं विझाले. ॥ ३९ ॥ जेंवीं वारुळीं शिरके अही । तैसा बाण भेदुनी देहीं । रक्तमांस प्राशोनी मही । निमग्न जाला क्षणार्धे. ॥ ४० ॥ हाची दृष्टांत पुन:-पुन्हा । देतां विकल्प श्रोतेजनां । तरी जें बोलिलें विचक्षणा । मीही तेंची अनुवादें. ॥ ४१ ॥ असो; त्यावरी क्रोधानळीं । पंचपंचर्क प्रदीप्त भाळीं । अर्पण करितां हृदयकमळीं । दु:शासन मूर्च्छितू ॥ ४२ ॥ बीभत्स गात्रें रक्तांग सकळीं । 'आहा!'शब्दें कौरवदळीं । हाहाकार वीरमंडळीं । घोरतुंबळ माजला. ॥ ४३ ॥ सारथी मर्दोनी ताडिले हय । पांडववीरां आनंदमय ।

१. दंड ठोकी. २. केतू व राहू. ३. अभिमन्यूनें. ४. काक=कावळा. काका=चुलता. येथें अभिमन्यु दु:शासनाची, कावळ्याच्या दृष्टांत देऊन, निर्भर्त्सना करीत आहे. ५. येथें 'तैसीच तुमची' असा शुद्ध पाठ असावा. ६ श्रेष्ठ. ७. हाच दृष्टांत मूळांतही आहे. (अध्याय ४० श्लोक ११-१२). ८. पंचवीस.

बाह्या पिटोनी हर्ष प्रमेय । द्रोणानिका तंगटले. ॥ ४४ ॥ महायुद्ध घोरांदर । होतां जालें प्रभिन्न थोर । दुर्योधन चुरोनी कर । कर्णाप्रती अनुवादे. ॥ ४५ ॥ म्हणे, 'पाहें पां रौद्रमदा । दुःशासनाची कैसी आपदा । विक्रमें सूर्यासी करीं स्पर्धा । लोळविला अभिमन्यें. ॥ ४६ ॥ तुह्मी धुरंधर समस्त वीर । असतां फिरे एकांग शूर । करीत चमूचा संहार । जाणों कैंाळ क्षेयाचा.' ॥ ४७ ॥ भूपमुखींची ऐकोनी मातू । क्रोधें लोटला भास्करसुतू । भंगी नृपाचे सांगातू । भयंकर शत्रूतें. ॥ ४८ ॥ कर्ण कर्षोनियां धनू । बाण सोडिले तेजिष्ठ भानू । सौभद्रें वारूनी शरें धनू । अनुचर रणीं पाडिले. ॥ ४९ ॥ अत्यंतक्रोध रविनंदन । शिळाशितची सप्त बाण । धारामुखीं डळमळी अग्न । सौभद्रातें अर्पिले. ॥ ५० ॥ अवलोकितां द्रोणें नेत्रीं । शरांचे वोघ सोडिले अस्त्रीं । भार्गवविद्यांचिया छत्रीं । बुजोनी सौभद्र काढिला. ॥ ५१ ॥ शरांमागें शरांचे दाँघा । देहुडे लाविले राया सुभगा । सौभद्र पीडितां वीरश्रीरंगा । सिंहमान उसळला. ॥ ५२ ॥ शिळाशित नतपर्वणी । बाण सोडिले अशनीमानी । अश्व, सूत, छत्र, ध्वज, चाप, गुणीं । छेदोनी धरे पाडिले. ॥ ५३ ॥ कर्ण चढवोनी आणिके रथीं । धांवला, सवें नृपांच्या पंक्ती । शर सोडुनी नाना युक्ती । बुजोनी कर्णें काढिला. ॥ ५४ ॥ सौभद्रें मानोनियां तोषू । बाणीं वारिले सर्व इषू । नाराच मोकळोनी कर्कशू । गजाश्वरथी भेदिले. ॥ ५५ ॥ राधातनय कर्णबंधू । अस्त्रविद्या अमोघ सिंधू । सौभद्रें करुनी त्याचा वधू । कर्णापुढें पाडिला. ॥ ५६ ॥ कैंणिकार वृक्ष वातवेगें । मही स्वीकारी जैसीं अंगें । खांद्या मोडिती लगबगें । सूताश्व तैसे मर्दिले. ॥ ५७ ॥ अस्त्रविद्याकुशळ कर्णीं । शरौघमाळा सोडिल्या रणीं । जाणों शैलभवृंद दाटले गगनीं । धराव्योमीं ऐक्यता. ॥ ५८ ॥ कीं तें संग्राम थोर विपिनँ । द्विरद रथी विटपी घन । तुरंगलता शोभायमान । पत्तिंतृण सुरवाडे. ॥ ५९ ॥ कौरव पांडव वेळुंदांघा । घर्षणीं आर्जुनी वन्हिवेगा । स्रवोनी जाती वन्हि सुभगा । तैसी सेना भष्टली. ॥ ६० ॥ व्योम दाटलें अवघें शरें । मुगुटसहित खचती शिरें । वीरबाहु मैलेंगिरें । चर्चित नभीं उसळती. ॥ ६१ ॥ शिक्षित

---

१. अनुमान करण्यास योग्य असा, खरा. २. भिडले, तुटून पडले. ३. (१) काळाचाही काळ; किंवा (२) सर्वांचा नाश होण्याचा समय, प्रलय. ४. दांघ=डांग–अरण्य, समुदाय. ५. पांगाऱ्याचें झाड. ६. टोळांचे समुदाय. ७. अरण्य. ८. वृक्ष. ९. पायदळरूपी गवत. १०. कळकाचीं वेटें. कळक एकमेकांवर घांसले असतां अग्नि उत्पन्न होऊन, अरण्यास आग लागते–हें प्रसिद्धच आहे. ११. चंदनानें.

हस्ती चित्रिले वदनीं । घंटा घागऱ्या चामरें किरणीं । इंद्रगोप[1] पाखरा वर्णीं । हिणाविती बालार्का. ॥ ६२ ॥ सहित युद्धीं माहावंत । खचोनी धरे पाडिले प्रेत । पदाति वीर असंख्यात । वस्त्राभरणीं पडियेले. ॥ ६३ ॥ नाना द्वीपींचीं अश्वरत्नें । जाणों चित्रींचीं जीवविलीं[2] यत्नें । छेदोनी पाडिलीं अप्रयत्नें । कृतांतसरी; नरेंद्रा ! ॥ ६४ ॥ सैन्य भोवंडिल्या आट घार (?) । व्यस्त वीर पळती शूर । पिशाचगणा आनंद थोर । कबंधें नाचों लागलीं. ॥ ६५ ॥ सौभद्रशरांच्या माहामारीं । अमित सेना पातली दुरी । धुळी दाटली अंबरीं । कोण्हा कोण्ही दिसेना. ॥ ६६ ॥ पळों जातां जिकडे तिकडे । सौभद्र शरांच्या वाडेंकोडें[3] । आड बाण येती तिकडे । थकित शूर शूरेंसी. ॥ ६७ ॥ दानवीसेनेंत सहस्राक्ष । विचरे तैसा आर्जुनी दक्ष । कोण्ही आलिया समक्ष । लावी वाटे यमाच्या. ॥ ६८ ॥ सहस्रशः वीर कदनीं । मर्दुनी वीर फिरे रणीं । वीर भाविती पाशपाणी । न्यावया आम्हां पातला.' ॥ ६९ ॥ धृतराष्ट्र वदे, 'संजया ! । सौभद्रबाळ विचित्र चर्या । एकलेन महींद्रवर्या । विगत केलें सर्वांतें. ॥ ७० ॥ धन्य जननी आणि जनिता । कुळीं कुळदीप समान सविता । कुरुवंशार्णव अक्षोभता । वीर रत्नें निपजती. ॥ ७१ ॥ असो. पांडव तयापाठी । किमर्थ न येती सांगें गोष्टी ? । तया अटक करितां सृष्टी । सुरसमूहो माघारे. ॥ ७२ ॥ तरी तें तयाचें सुचरित । करीं मातें बाळका ! श्रुत.' संजय म्हणे, 'देईं चित्त । सांगतों नृपा ऐकिजे.' ॥ ७३ ॥ सौभद्र रिघतां सेनाउदधी । पाठीं पांडवचमूलाटावृद्धी । लोटतां सैंधववेळासंधी । थोकोनी करी परौता. ॥ ७४ ॥ महायशस्वी धर्मराज । रौद्र प्रतापी तैंनयानुज[4] । शिखंडी, सात्यकी, माद्रीतनुज । धृष्टद्युम्न, विराट. ॥ ७५ ॥ द्रुपद, कैकेय, धृष्टकेतू । मत्स्याधिराज विशाळकेतू । थडकतां विक्रमें तव जामातू[5] । क्षीण करी क्षणार्धें. ॥ ७६ ॥ अद्भुत पौरुष[6] तये समयीं । देखिलें चोज सुरांहृदयीं । जैसें रावणात्मजें शरघायीं । वानरचमू खिळियले. ॥ ७७ ॥ तैसे एकलेनें विराजे । पांडवी सेना निस्तेज तेजें । केली.' ऐकतां हर्षभोजें[7] । राजा पुसे संजया. ॥ ७८ ॥ 'अपूर्व बाळका ! सांगसी कोडें । पांडव शूरांचिया पाडें । एकांग सैंधवें केले वेडे । कोण्या बळें सांग पां ?' ॥ ७९ ॥ संजय म्हणे,

---

१. इंद्रगोप नांवाच्या तांबड्या किड्यांच्या रंगांच्या झुली. २. निर्जीव चित्तें सजीव केलीं—हा भावार्थ. ३. मोठ्या आवडीनें. ४. येथें 'अनुजतनय' असा शुद्ध समास पाहिजे होता. ५. जयद्रथ हा दुःशीला नामक धृतराष्ट्रकन्येचा पति. ६. पराक्रम. ७. मोठ्या आनंदानें आणि आवडीनें. भोज=आवड, इच्छा, संतोष.

'**पां**डव वनीं । वसतां हरिली **याज्ञ**सेनी । पाठी **पां**डव धांवोनी झणी । धरुनी आ-
पदा दिधली. ॥ ८० ॥ सिंहआमिष[1] जंबुकास । पावतां, तया तोची नाश ।
कीं राजपत्नीच्या कुचाग्रास । स्पर्शतां प्राणी वांचिजे? ॥ ८१ ॥ ना तो मणी
काढितां शेषा । तया केवीं आयुष्या धिवसा? । कीं उत्तम देखोनी रुक्मरेसा[2] ।
प्राशितां सुख पाविजे? ॥ ८२ ॥ तयापरी स्मरुनी द्वंद्वा । **सैं**धवा **भी**में दी-
धली आपदा । तया परिहाराचिया खेदा । मत्स्यप्राय तळमळी. ॥ ८३ ॥
खडतर आचरोनी तपें । देह दंडी अतिसाक्षेपें । शीत उष्णादि साहोनी
तापें । अशनपान वर्जिलें. ॥ ८४ ॥ धमनीप्राय[3] जाहली तनू । ध्यानीं मनीं
शैलजारमणू । भक्तपाळक करुणाघनू । सर्वस्व **श**र्व तोषला. ॥ ८५ ॥ स्व-
प्नामाजी होवोनी प्रगट । अमृतरवें बोले स्पष्ट । म्हणे 'किमर्थ तप वरिष्ठ ।
करिसी मातें निवेदीं.' ॥ ८६ ॥ येरें प्रणाम करूनी चरणीं । जोडुनी अं-
जळी विनवी वाणी । '**पां**डव जिंकावे म्यां कदनीं । एकीं रथीं एकल्या.'
॥ ८७ ॥ **शं**भु वदे, 'विजयप्राप्ती । नसतां पावसी **सु**भद्रापती । चत्वारि
पांडव विगतगती । होती चमूसमवेत.' ॥ ८८ ॥ **शि**ववराची वरदोक्ती ।
देहीं पातली दुर्धर शक्ती । जैसी रंकनृपाची[4] मूर्ती । अजिंक्य होय समस्तां.
॥ ८९ ॥ कीं तो **रा**हू अमृताश्रय । श्रेष्ठता पावे ग्रहणीं वर्य । ना तो **सू**र्यवरदें
प्रल्हादतनय[5] । त्रासी सुरां सर्वांतें. ॥ ९० ॥ तयापरी **सैं**धवराज । लाहोनी
शक्ती, वीरश्री, तेज । लोटे जैसा अरुणानुज[6] । अहिमांदी[7] भंगावया. ॥ ९१ ॥
सैंधवदेशींचे उत्तम हय । वेगा वात खोंवी पाय । गंधर्वनगरांची सोये ।
भूषित रथ भूषणीं. ॥ ९२ ॥ श्वेत छत्र पताकायुक्त । चामरव्यजन ढाळिती
भृत्य । सवें वीर शतानुशत । देदीप्यमान प्रतापी. ॥ ९३ ॥ क्षणक्षणा वि-
स्फुरी धनू । नादें अंबर भरे घनू[8] । शिळाशित अवक्र बाणू । सोडिता जाहला
सरोष. ॥ ९४ ॥ वरवाळोनी **पां**डव वीर । वर्षते जाले तीक्ष्ण शर । येरू
अकंपत धीर शूर । बाणीं बाण वारिले. ॥ ९५ ॥ त्वरा करुनी शरसंधानीं ।
सात्यकीनें ताडिला तीन बाणीं । रणभूमीतें सांडुनी । येतां मागें घातला.
॥ ९६ ॥ आठ शर काळविखारी । **भी**में विंधिला स्तनांतरीं । घायासरिसे

१. आमिष=भक्ष्य, मांस. २. सोन्याचा रस. ३. फुंकणीसारखी (कृश). ४. रंकाचा राजा
झालेल्याची. ५. प्रल्हादपुत्र विरोचन यास सूर्यानें प्रसन्न होऊन एक जयशाली शिरस्त्राण ऊर्फ
टोप दिला होता. हा टोप डोकीवरून काढून त्याच्या ताळूस स्पर्श झाला असतां, त्यास मरण
यावयाचें होतें. या टोपाच्या जोरावर विरोचन देवमानवांना अजेय झाला. अखेर विष्णूच्या मोहि-
नीरूपानें त्यास भुलविलें, व अभ्यंगस्नान घालण्याच्या मिषानें तिनें त्याचा टोप काढून ताळूस स्पर्श
केला व त्यानें त्याचा नाश झाला. ६. गरुड. ७. सर्पांचा समुदाय. ८. मेघांची.

गिरिगिरी[1] । पावतां, धैर्य आफळी. ॥ ९७ ॥ अग्निवर्चस[2] साठ बाण । धृष्ट-द्युम्ना अर्पिले घन । सर्वांग भरिलें रुधिर, तेणें । दाहा वीरां विंधिलें. ॥ ९८ ॥ द्रुपदराज पांचाळपती । पांच अर्पी काळघाती । सप्त नाराच अग्निकांती । शिखंडीनें ताडिले. ॥ ९९ ॥ कैकेयराया अतिकर्कश । शर अर्पिले पंचवीस । द्रौपदीनंदनें फणिविष । तीन तीन विंधिले. ॥ १०० ॥ कुरुवर्यराज युधि-ष्ठिर । ताडिले बाण सत्याहत्तर । हर्ष पावोनियां थोर । सिंहनाद फोडिला. ॥ १०१ ॥ धर्म चतुर चतुरावर्ती । 'धनुष्य' खंडुनी पाडिलें क्षिती । मंद हास्य करुनी नृपती । 'सावध' म्हणे शालका[3]. ॥ १०२ ॥ येरें न लगतां अर्ध क्षण । अन्य कार्मुक सज्जिलें क्षणें । दक्ष सायक अतितीक्ष्ण । अर्पून तीन विंधिले. ॥ १०३ ॥ हस्तलाघव पाहोनी दृष्टी । भीमा कोप नावरे पोटीं । चाप कर्षूनियां मुष्टी । बाण नव सोडिले. ॥ १०४ ॥ ध्वजछत्र धनुष्य नि-गुती । छेदुनी पाडिले धरेप्रती । रोषें संतप्त सैंधवनृपती । अन्य कार्मुक वा-हिलें. ॥ १०५ ॥ आकर्ण वोढूनियां जाण । शर सोडिले प्रभिन्न घन । धा-रामुखीं डळमळी अग्न । हेमपिसारे साजिरे. ॥ १०६ ॥ वारितां आदळले रथाप्रती । अश्व छेदुनी पाडिले क्षिती । प्रभिन्न चाप रुक्मकांती । मुष्टीपा-साव छेदिलें. ॥ १०७ ॥ रत्नमंडित विशाळ केतू । शोभायमान झळझळितू । शिरा दावोनी गगनपंथू । धरातळीं पाडिलीं. ॥ १०८ ॥ भ्रष्ट करुनी रथो-त्तम । मही आणिला यादव[4], भीम । अद्भुत देखोनी रौद्रकर्म । वीर माना डोलविती. ॥ १०९ ॥ शूरकेसरी महावीर । छिन्नधन्वा पडिला स्थिर । भूप-मांदी खळबळी थोर । किलकिलाट माजला. ॥ ११० ॥ जयद्रथराजा रणां-गणीं । विचरे जैसा पाशपाणी । शर वर्षोनी प्रदीप्तकिरणी । वीरवीर त्रासिले. ॥ १११ ॥ वाजि, वारण, पदाती, रथी । छिन्नगात्री विगतगती । पलायमान सांवर[5] चित्तीं । वीरां कोणा न धरवे. ॥ ११२ ॥ जैसी पंचवटीं रामचाप-रेखा । उल्लंघन न होय दशमुखा । ना ते दावानळप्रदीप्तशिखा । उलंघ-वेना ज्यापरी. ॥ ११३ ॥ तयापरी व्यूहाच्या द्वारा । प्रवेश नव्हे पांडववीरा । माघारले पृतनाभारा । उपाय कांहीं न चाले. ॥ ११४ ॥ सात्यकिभीमादि धृष्टद्युम्न । घटोत्कच आणि माद्रीनंदन । विगतमानसें फिरती जाण । [अपेश-ओझें वाहुनी.] ॥ ११५ ॥ कासावीस कुरुनंदन । म्हणे, 'विचार करणें कोण ?। देखदेखतां काळाग्नीं जाण । बाळक कैसें वोपिलें? ॥ ११६ ॥ सकुमार कुमार

१. भोंवळ, चक्कर. २. अग्नीसारखे तेजस्वी. ३. मेव्हण्यास (जयद्रथास). ४. सात्यकी. ५. धैर्य.

कुमारीं । लोटिला आम्हीं रणसागरीं । भूतसंचार मम अंतरीं । आज्ञापिलें लें-करा. ॥ ११७ ॥ दुष्ट शत्रूची मांदोडी । माजी व्यूहाची परवडी । अभिमन्य धाडिला बुद्धी कुडी । जे असाध्य निर्जरां. ॥ ११८ ॥ धांवा, धांवा, वीर हो! तोषा । जीवित्वाची न धरूनी आशा । विभांडूनी शत्रूच्या कोशा । साह्य सौभद्रा होइजे.' ॥ ११९ ॥ असो. पुढां युद्ध दारुण । फाल्गुनी क्षत्री प्रतापवान । कुरुवर्यराज लक्ष्मण । स्वर्गधामा वरील. ॥ १२० ॥ तो कथारस चतुरचतुरीं । प्राशन कीजे श्रवणद्वारीं । नरहरीमोरेश्वर वैखरी । वदे श्रीगुरु-[भीजराज] प्रसादें. ॥ १२१ ॥

अध्याय अकरावा.

संजय म्हणे, 'धरत्रीनाथा ! । पुसिल्या प्रश्नाची कथिली वार्ता । अभिमन्युयुद्धाची रौद्रता । सादर आतां ऐकिजे. ॥ १ ॥ जयद्रथ पांडवें विन्मुख । करितां आल्हाद वीरां देख । वरवाळोनी भूप सतिखें । अभिमन्यातें लोटले. ॥ २ ॥ गजाश्वरथीपदाती । महात्राणें मिनले घातीं । जाणों उसळला अपांपती । क्षयालागीं ज्यापरी. ॥ ३ ॥ वेष्टोनी सौभद्र, शस्त्रवृष्टी । करिती रोषें निबिड दाटी । पार्थसुत प्रतापजगजेठी । वीर मल्ल धनुर्वाडा. ॥ ४ ॥ शर वर्षोनी कडाडी । सेना सकळ देशधडी । करितां, वृषसेनें तडाडी । स्यंदन पुढां लोटला. ॥ ५ ॥ बळी मत्स्यप्राय समुद्रोदरीं । उसळला वीर क्रोधलहरी । शर वर्षोनी अंशनीसरी । बुजोनी कार्ष्णी काढिला. ॥ ६ ॥ अकंपित सौभद्र शेष किरणी । बाण सोडिले सम अग्नी । चाप खंडुनी सारथी गुणी । यमसदना धाडिले. ॥ ७ ॥ त्वरा करूनी मैहारवें । अश्व ताडिले शरलाघवें । पोळतां उसळोनियां हैवें । रथासहित पळाले. ॥ ८ ॥ अरी वसाती राजेश्वर । धांवोनी विंधिले साठी शर । रुक्मपुंखी ज्वलीनधार । सौभद्रअंगीं रुतले. ॥ ९ ॥ आर्जुनी वीर वीरराय । शर सोडुनी भेदिलें हृदय । भूमीं पाडिले पादपप्राय । जेवीं वायु स्पर्शतां. ॥ १० ॥ दुःसह मानोनी कौरववीरीं । लोटले मुखासहित हारी । वर्षोनी शरांच्या तीव्र धारी । प्रळयमेघासारिख्या. ॥ ११ ॥ जैसा

---

१. दुर्धर माऱ्यांत, शत्रूच्या भयंकर दणक्यांत. २. समुदाय. ३. कोश=कोट, गोट, आवरण, वेष्टन (व्यूह). ४. वाणी. येथें मूळांतील त्रेचाळिसावा अध्याय संपतो. ५. उग्रता, प्रखरता. ६. वरवाळणें=चढाई करणें. ७. पराक्रमी. (तिख=तीव्र, तीक्ष्ण). ८. समुद्र. ९. पिटाळून (पळवून) लाविल्या असतां. १०. आकाशांतून तुटून पडणाऱ्या तारांप्रमाणें (भराभर व वेगानें). ११. अभिमन्यू. १२. स्थिर, भयरहित. १३. सिंहनाद फोडून. १४. त्वेषानें. १५. सोन्याचे पिसारे ज्यांना आहेत असे. १६. वृक्षांसारिखे.

अडचणी पंचानना । वेष्टोनी शस्त्र वर्षती नाना । सैन्य **अभिमन्यु** वीरराणा । घेवोनी त्राण ताडिती. ॥ १२ ॥ फरफराट धनुष्यघोषें । तळत्राणें स्फुरिती श्वास । खणखणाट शस्त्रमुखीं विष । व्यांळापरी[1] सांडिती. ॥ १३ ॥ 'हाणा हाणा' एकची ध्वनी । सर्वांमुखीं ऐकिजे श्रवणीं । एक सांपडला **आर्जुनी** । जावों नेदी सर्वथा. ॥ १४ ॥ रथीं वेढोनी कार्मुक सैरा । सोडिती सायक अग्निधारा । हस्तिपीं[2] पेलोनी गजभारा । विचित्र शस्त्रें वर्षती. ॥ १५ ॥ अश्ववार लोटोनी पदाती । विचित्र शस्त्रें फेंकिती शक्ती । अस्त्रमय जाले, व्योमपंथीं । रवी कांहीं दिसेना. ॥१६॥ **देवीयुद्धीं** रक्तबीज[3] क्रूर । रणीं दाटले जैसे असुर । तैसे अनेक शस्त्रांचे संभार । **सौभद्रावरी** लोटले. ॥ १७ ॥ बाप **अभिमन्यु** वीर सुभट । धनुर्विद्यांचें विद्यापीठ । अस्त्रप्रयोग करुनी नीट । बाणकोटी सोडिल्या. ॥ १८ ॥ तटतटा शिरें खंडुनी पाही । सकुंडल मुगुट पडती मही । जाणों भगणें[4] रिचवोनी देहीं । भूतळातें उतरलीं. ॥ १९ ॥ अनेक शस्त्रीं वीरपाणी । भूषित भूषणीं विचित्रवर्णीं । खंडुनियां पिटिती अवनी । **काळदंडासारिखी.** ॥ २० ॥ शाल्योदनीं पिशितअन्नें । काया वर्धली रुचिर घन । खंडविखंड होवोनी बाणें । शवें धरे दाटलीं. ॥ २१ ॥ अमोघ अश्वगजांचे सैंघ[5] । छिन्नगात्री पडिले अमोघ । रक्तनदीचे तुंबळ वोघ । खळखळाट लोटले. ॥ २२ ॥ रौद्ररण भयकर्कश । दारुण संग्राम वीरनाश । **यमराष्ट्** वर्धिलें, वीरां तोष । निघोनी गेला दिगंता. ॥ २३ ॥ खळबळोनी सैन्यश्रेणी । निघतें जाले मागिले चरणीं । **सत्यश्रव** भूप **काळमानी**[6] । सहित सेना लोटल्या. ॥ २४ ॥ **रुक्मरथ मद्रसेनतनय**[7] । जैसा अभिमानी सबळधैर्य । धडकोनी म्हणती, 'आयुर्दाय । क्षत्रिया ! तुझा खंडला. ॥ २५ ॥ जैसा फणिधामा[8] पातला मूषक । कीं व्याघ्रधामा सारंग[9] देख । ना ते मगरीधामा शशक । पावतां जेवीं वांचिजे; ॥ २६ ॥ तयापरी नृपसत्तमा । एकटा पातलासी संग्रामा । आयुष्याची लोटली सीमा । वश **काळा** जालासी.' ॥ २७ ॥

---

१. सर्पांप्रमाणें. २. हस्तिप=माहूत. पेलणें=सांभाळणें, ताब्यांत ठेवणें, आवरणें. ३. असुरविशेष. यानें उग्र तप करून रुद्रास प्रसन्न केलें, व 'माझें रक्त जमिनीवर पडलें असतां प्रत्येक बिंदूपासून माझ्यासारखे पराक्रमी राक्षस उत्पन्न व्हावे' असा वर संपादन केला. ह्या वराच्या योगानें शुंभनिशुंभवधकाळीं ह्याच्या रक्तापासून अनेक राक्षस निर्माण होऊं लागले, तेव्हां कालिकेनें विक्राळरूप धारण करून, ह्याचें रक्त जमिनीवर पडूं न देतां, याचा वध केला–अशी कथा आहे. (देवीभागवत–स्कंध ५ अध्याय २७–२९ पहा). ४. नक्षत्रें. ५. समुदाय. ६. यमासारखा. ७. शल्यपुत्र. ८. सापाच्या बिळांत. ९. हरिण.

अभिमन्यु म्हणे, 'रे ! पापिष्ठा ! । [1]श्लाघ्य बोलसी रणचोहटा । मी पातलों
मृत्यूच्या वाटा । तुम्हां सर्वां न्यावया. ॥ २८ ॥ आतां होईजे सावधान'. ।
म्हणोनी सूदले बाण । वोढें[2] काढुनी आकर्ण । वातवेगें सोडिले. ॥ २९ ॥
सुसाट उतरूनी गगनीं। तीन भेदिले हृदयभुवनीं । तीन तीन [3]प्रभिन्न बाणीं ।
उभय बाहू भेदिले. ॥ ३० ॥ पुन्हा सोडुनी तीव्र शर। सहभुज उडविलें शिर।
मद्रेशदळीं 'हाहा'कार । शत राजपुत्र लोटले. ॥ ३१ ॥ बाण सो-
डुनी [4]काळानळी। सौभद्र बुजिला तयातळीं । दुर्योधन पिटोनी टाळी ।
'घ्या, घ्या, चिरा;' म्हणतसे. ॥ ३२ ॥ गाढा आर्जुनी धनुर्वाडा । बाण
कर्षोनी झडझडा । शरें शराचा भंगोनी वेढा । राजपुत्र ताडिले. ॥ ३३ ॥
येरीं वमोनी क्रोधउल्का । गंधर्वास्त्र सोडिलें देखा । मोडीत वीर अनेक भेका।
गंधर्वमाया निर्मिल्या ॥३४॥ अभिमन्यु वीरचूडामणी । सर्वास्त्रभेदी कुलिशपाणी।
तुंबरास्त्र प्रेरुनी झणी । गंधर्वमाया दवडिल्या. ॥ ३५ ॥ अस्त्रप्रयोग करूनी
त्वरा । बाण सोडिले [5]क्षुरप्रधारा । शत राजपुत्र भेदुनी सैरा । शिरें व्योमा उड-
विलीं. ॥ ३६ ॥ जैसे कंदुक [6]दशावतारीं । खेळती, झेलती हस्तकुसरी । तैसीं
शिरें उसळोनी वरी । झणी येती तळांत. ॥ ३७ ॥ अभिमन्यु पेटुनी महा-
मारीं । गजाश्वपति पडिल्या हारी । शवें दाटली वसुधा [7]पुरी । रिक्त ठाव
असेना. ॥ ३८ ॥ हस्तविरहित पादहीन । शिररहित वपु पूर्ण । खंडविखंड
छिन्नभिन्न । नाना [8]कलेवरें दाटलीं. ॥ ३९ ॥ जिकडे तिकडे 'हाहा'कार ।
माघारले सेनाभार । दुर्योधन उभय थोर । म्हणे, 'धन्य पुरुषार्थी. ॥ ४० ॥
एकांग वीर समान इंद्र । बळप्रताप सम रुद्र । पार्थाहुनी विद्यासमुद्र । अक्षो-
भता नेणवे.' ॥ ४१ ॥ ऐसें वदोनी, नरनायक । जाला सौभद्रासन्मुख ।
द्रोणद्रौणिकर्णादिक । भूप सौबळभोजादी. ॥ ४२ ॥ सवें चतुरंग सेना-
भार । उसळे जैसा मकराकार । शस्त्र[9]संपातें सोडिती क्रूर । आस्फोटिती
शब्दातें. ॥ ४३ ॥ [10]वासवपौत्रें वासवासम । रणरंगधीर अचळ नेम । शर
वर्षोनी राजसत्तम । वीर वीर त्रासिले. ॥ ४४ ॥ बाणामागें बाण सुटी ।
कोण्हा न करवे वरती दिठी । वीरीं देवोनियां पाठी । अष्टदिशा निघाले.

---

१. योग्य, स्तुत्य. २. ताण. ३. मोठ्या. ४. प्रळयाग्नीसारखे. ५. सुऱ्यांच्या धारेसारिखे (तीक्ष्ण). ६. दशावतारांत ह्मणजे नाटकांत किंवा ललितांत जे नाचाचे, कसरतीचे व हस्तकौशलाचे प्रकार होत, त्यांवर येथें कटाक्ष आहे. ७. पृथ्वीरूपी नगरी (पुरी); (किंवा) पुरी=पूर्णपणें. ८. प्रेतें, शवें. ९. संपात=वर्षाव, मारा. १०. इंद्राचा नातू (अभिमन्यु).

॥ ४५ ॥ जैसा हलधर[1] भिंडिपाळ[2] । उडवी भोरंडीयांचे[3] पाळ । तैसे अभिमन्यु सैन्यमेळें[4] । वरिच्या वरी वारिले. ॥ ४६ ॥ कुरुवर्य राजशिखामणी । भद्र सैन्याचे निजमंडणीं । दुर्योधनाचे पुत्र वंशाभरणी । कुळदीपक जन्मले. ॥ ४७ ॥ लक्ष्मण लक्षणें सुलक्षण । तया क्षणें ईक्षण तीक्ष्ण । शिक्षण विलक्षण, प्रताप घन । पाहोनी क्रोधें धडाडी. ॥ ४८ ॥ श्रीमान्य, तनुकोमळ, रुचिर, । जाणों सदृश नैळकूबर[5] । प्रभिन्नचाप सज्जोनी शर । सौभद्रातें थडकला. ॥ ४९ ॥ रुक्मस्यंदन, सुवर्ण ध्वज, । कीळीं[6] फांकती अरुणतेज । कृतांतकाळीं आयुष्यकाज । वर्षोनियां वोढिला. ॥ ५० ॥ रुक्मपुंखी अवक्र शर । शिळाशित[7] तीक्ष्ण घोर । सोडुनी ताडिला उत्तरावर । बाहीं उरीं प्रतापें. ॥ ५१ ॥ येरें न गणोनी तया बाणा । हास्य करूनी म्हणे, 'रणा । किमर्थ आलासी ? नृपनंदना ! । कुरुमंडण वंशाचें. ॥ ५२ ॥ तुझिया तातें अपराध घन । करुनी, क्षत्रियां आणिलें मरण । आतां होउनी सावधान । रक्षीं तनू आपुली. ॥ ५३ ॥ सर्वां देखतां येची क्षणीं । तूतें वोपीन काळसदनीं'. । ऐसें वदोनी कुलिशमानी[8] । शितीं[9] शर सज्जिले. ॥ ५४ ॥ आकर्णांतें वोढोनी रोषें । सोडिला, पिटोनी घोरघोष । सुंसाट[10] उतरला चंडांशें[11] । धरा तेजें डळमळी. ॥ ५५ ॥ 'आहा!' शब्द कौरवमेळीं । येवोनी बैसला कंठनाळीं । शिर उडविलें अंतराळीं । मुगुटकुंडलें साजिरीं. ॥ ५६ ॥ दुर्योधन पिटोन हृदय । 'कुळदीप विझाला,' म्हणे 'सूर्य । आतां काय जीवित्वसोय ?' । म्हणोनी रणा लोटला. ॥ ५७ ॥ पाठी धांवल्या वीरांच्या कोटी । शस्त्रें अस्त्रें निबिड मुष्टी । धनुर्धरांमाजी जगजेठी । षड् रथी तगटले. ॥ ५८ ॥ त्यांचीं नामें म्हणसी कोण । द्रोण, द्रौणी, तिसरा कर्ण । कृप, कृतवर्मा, यादव जाण, । बृहद्बळ साहावा. ॥ ५९ ॥ सर्वास्त्रभेदी [शरमाळा] । शतशः वीरांतें भेदिती हेळीं[12] । क्रोधें वमोनी अग्निज्वाळा । सौभद्रातें धडकले. ॥ ६० ॥ वर्षोनियां बाणसमूहो । बुंजोनी[13] काढिला उत्तरानाहो[14] । येरू न पावतां मोहो । विन्मुख केलें सर्वांतें. ॥ ६१ ॥ गजानीका मिळोनी बळी । केली तयांची रंवंदळी[15] । पार्थतनय अतुर्बळी । शतशः दळीं लोटले. ॥ ६२ ॥ निकड

१. नांगऱ्या, शेतकरी. हल=नांगर. २. गोंफण, दगड मारण्याचें एक प्रकारचें दोरीचें शिंकें. ३. चिमण्यांचे समूह. ४. मेळ=समुदाय. ५. कुबेरपुत्र. ६. किरण किंवा ज्वाळा. ७. सहाणेवर पाजवलेला. ८. वज्रासारखे. ९. धनुष्याचे दोरीचे ठायीं, गुणीं. १०. सोसाट्यानें, वेगानें. ११. जणूं काय सूर्यच उतरला, असें वाटलें—हा इत्यर्थ. १२. सहज, लीलेनें. १३. आच्छादून, झांकून. १४. उत्तरेचा पति, अभिमन्यु. १५. नाश, चक्काचूर.

करुनी अस्त्रघायीं। देव्हडा[1] मारा केला तिहीं। येरें धनु कर्षोनी बाहीं। प्रदीप्त झाली सोडिल्या. ॥ ६३ ॥ पाद, पाणी, भुजा सरळा, । चीर, मौळे, मुगुट, माळा, । छेदुनी पाडिलें धरातळा। स्यंदनध्वजासहित. ॥ ६४ ॥ जैसा कुठार पादपशाखा। ढेसोनी करी निर्मूळ रुखा[2]। तैसें **सौ**भद्रें, नरनायका! क्रोधें पुत्रा मर्दिलें. ॥ ६५ ॥ हलकल्लोळ सेनामेळीं। 'पळा पळा' म्हणती सकळीं। 'क्षत्रियबीज धरणीतळीं। कांहीं तरी वांचवा.' ६६ ॥ ऐसीं वीरांचीं उत्तरें। ऐकोनी षड्रथी क्रोधभरें। लोटले **सौ**भद्रासामोरे। जेवीं षड्वैरी[3] प्राणिया. ॥ ६७ ॥ तालप्रमाण विशाळ चापें। प्रदीप्तबाणी विषाचे रोपे[4]। वर्षते जाहले महातापें। अभिमन्यातें निघातें. ॥ ६८ ॥ पंचशत बाण तीव्रधारा। **द्रो**ण समर्पी रोषें वीरा। **बृ**हद्बळ द्विशत शरां। ताडी **सौ**भद्रा आक्रोशें. ॥ ६९ ॥ **कृ**तवर्मा **या**दवपती। ऐशीं बाण समर्पी **का**ळघाती। **शार**द्वत सात शर निगुती। महा त्राणें समर्पी. ॥ ७० ॥ शिळाशित सुवर्णपुंखी। **क**र्णें विंधिले महातवकीं[5]। **अ**श्वत्थामा फणींद्रमुखी[6]। दाहा अर्पी प्रतापें. ॥ ७१ ॥ वारोनी सर्वांची शरवृष्टी। **क**र्ण विंधिला कर्णपुटीं। **कृ**पाचार्या ताडुनी निहटीं[7]। स्तनांतरीं अर्पिले. ॥ ७२ ॥ त्वरा करूनी शरसंधानीं। पृष्ठीं सारथी पाडिला रणीं। दश नाराचें हेमवर्णी। स्तनांतरी अर्पिले. ॥ ७३ ॥ **अ**श्वत्थामा प्रतापराशी। पंचवीस शर विंधिले त्यासी। येरें न गणोनी साक्षेपेंसी[8]। **सौ**भद्रातें ताडिलें. ॥ ७४ ॥ अकंपित **कां**र्ष्णी[9] महाहवा। तीन बाण अर्पिले सर्वां। क्रोधें संतप्त **द्रौ**णी तेव्हां। सासष्ट शर समर्पी. ॥ ७५ ॥ **अ**भिमन्यु वीर क्रोधानळीं। त्रिसप्त हेमपुंखी झाली। **अ**श्वत्थामा ताडिला बळी। **द्रो**ण रोषें धडाडी. ॥ ७६ ॥ सरसावोनी **द्रौ**णी तया। त्रिसप्त नाराच अर्पीत या। शत बाण प्रभिन्न **द्रो**णाचार्या। ताडी निघातें **पां**डव्यें[10]. ॥ ७७ ॥ चाळीस विंधिले **वै**कर्तनें। वीस **कृ**तवर्मा ज्वलीन। **बृ**हद्बळ दामिनी-मीन[11]। शर पंच्याऐशीं समर्पी. ॥ ७८ ॥ अवक्र[12] शर शिळाशित। दाहा विंधी **शा**रद्वत। 'मारिलासी[13],' म्हणोनी हर्षयुक्त। सिंहनाद फोडिला. ॥ ७९ ॥

---

१. देव्हडा=देहुडा=शरसंधान करण्याचे वेळीं उभें राहण्याचा एक प्रकार; एका पायावर भार घेऊन उभें राहून दुसऱ्या पायाचें पाऊल उचलून त्या पायावर टेंकिलें असतां जो पाय वक्र होतो तो. २. वृक्षास, झाडास. ३. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर व दंभ हे प्राण्याचे सहा शत्रू. ४ बाण. ५. मोठ्या आवेशानें. ६. ज्याचें पातें सर्पाच्या आकारासारखें होतें, असे बाण. ७. जोरानें. ८. सपाट्यानें. ९. सौभद्र. १०. पांडवपुत्र (अभिमन्यु). ११. विजेप्रमाणें. १२. सरळ. १३. मारिलासी=मारिला गेलास, ठार झालास.

साधक **फा**ल्गुनी वीर पुरता । शरीराच्या खंडुनी चलथा । दशरथां सायक सायक समस्तां । वर्मस्थळीं भेदिले. ॥ ८० ॥ कासावीस षड्रथी घन । **को**सलाधिपती धांविला त्राणें । **सौ**भद्रें सोडुनी बाण घन । सूताश्वरथ भंगिला. ॥ ८१ ॥ [1]खड्गचर्म वसवोनी करीं । रोषें धांविला **अ**भिमन्यावरी । येरें वर्षोनी बाणधारीं । शिर व्योमा उडविलें. ॥ ८२ ॥ प्रवेशोनी [2]पृतनाभारीं । करिता जाहला प्रभिन्न मारी । सहस्रशः वीर तया समरीं । **कृ**तांतधामा वोपिले. ॥ ८३ ॥ सेनेमाजी हलकल्लोळ । धरे दाटले शवांचे लोळ । [3]काळ भाविती वीर सकळ । [3]पुरला आपुला. ॥८४॥ आक्रंदमान समस्त सेना । षड्रथी लोटले महात्राणा । पाठी चतुरंग वीर बाणा । सज्जोनी धनु धांविले. ॥ ८५ ॥ रोषें संतप्त होउनी **क**र्णें । क्रोधें योध विंधिले बाणें । सर्वांग रुधिरें भरलें तेणें । [4]असंभ्रम **अ**भिमन्यु. ॥ ८६ ॥ धनुष्य वोढोनी [5]कानाडी । शर सोडिले महाप्रौढी । भेदोनी तनु [6]धराबुडीं । फणीप्राय रिघाले. ॥ ८७ ॥ झरझराट रुधिरधारा । जाणों सडा घातला धरा । उभय वीर शोभले सैरा । [7]किंशुकवृक्षासारिखे. ॥ ८८ ॥ परस्परें [8]अस्त्रकडसणी । दाविती निष्ठुरपणीं । न्यूनाधिक भासतां कोण्ही । षड्रथी धांवले. ॥ ८९ ॥ शर कर्षोनी एकसरा । ध्वजाश्वसूत ताडिले सैरा । **सौ**भद्रें बाण सोडुनी त्वरा । दशदश तयां अर्पिले. ॥ ९० ॥ अद्भुत युद्ध तये संधीं । मारिले हटी वीरमांदी । **मा**गधपुत्र **का**ळक्रोधी । **य**मसदना धाडिला. ॥ ९१ ॥ माघारला **भा**रती वीर । **दु**:शासनाचा ज्येष्ठकुमर । **दौ**:शासनी विक्रमी शूर । **सौ**भद्रातें थडकला. ॥ ९२ ॥ बाण सोडुनी अतिकर्कशा । सारथी वाजी विंधिले रोषा । येरू म्हणे, 'तुझा तात [9]घोषा । ऐसाची रणीं पातला. ॥ ९३ ॥ शेखीं पळोनी गेला मागें । न दावितां पुरुषार्थ शींगें । तैसें न करितां, प्रताप अंगें । पाहें माझ्या शरांचा. ॥ ९४ ॥ पाहत असतां षड्रथी । तूतें लावीन **य**माचे पंथीं.' । ऐसें वदोनी बाण शितीं । **कृ**तांतघातें सोडिला. ॥ ९५ ॥ विराजित केतु छेदोनी क्षितीं । पाडुनी, सारथी भरिला क्षतीं । नव सायक ज्वलितकांती । हृदयीं वर्मीं ताडिले. ॥ ९६ ॥ तेणें आली [10]गिरगिरी राया । भ्रमावर्तीं विकळ काया । जैसा मद्यपी विसरे देहा । तेवीं नरेंद्र सचिंतू. ॥ ९७ ॥ **सं**जय,

---

१. तलवार आणि ढाल. २. सैन्याच्या गर्दींत. ३. आयुर्दाय संपला. ४. न घाबरलेला, अचल. ५. आकर्ण, कानापर्यंत. ६. पृथ्वीतळांत, पाताळांत. ७. पळसाचे झाडाप्रमाणें. ८. अस्त्रविद्येची परीक्षा. ९. घोषयात्रेच्या निमित्तानें कौरवांनीं पांडवांवर हल्ला केला त्या वेळीं. (मुक्तेश्वर–वनपर्व–अध्याय १२, पृष्ठें २६३–२७४ पहा). १०. भोंवळ.

चंद्रकेतू । **सौ**बळ गोत्रज दळेंसी युक्तू । धांवत येतां खंडुनी पंथू । काळानळीं भस्मले. ॥ ९८ ॥ शरामागें शरांचे वोघ । लाविले जैसे प्रावृटीं[1] मेघ । विस्मित वीर म्हणती, 'सुभग । विचार कैसा करावा? ॥ ९९ ॥ क्षत्रधर्म स्मरोनी मन । पुढें होतां अचुक मरण । मागें सरतां वंशा उणें । मृत्यूच सुखा[2] मानिजे.' ॥ १०० ॥ ऐसे वदोनी वीर वाणी । वैरवाळले[3] रणांगणीं । **द्रोण** वदे स्मितवदनीं । **कर्णा**दिक वीरांतें. ॥ १०१ ॥ ऐकांग[4] वीर हा **फा**ल्गुनी । विचरे जैसा **पा**शपाणी[5] । धन्य याचीं जनकजननी । शूरा ऐशा प्रसवलीं. ॥ १०२ ॥ **पा**र्थासमान अस्त्रविद्या । धनुर्भृतांतें[6] होय वंद्या । हस्तलाघव तरी सद्या[7] । नयनीं तुम्ही पाहतां. ॥ १०३ ॥ आलातचक्रापरी[8] । गरगरां चाप फिरे समरीं । बाण घेतां, सोडितां, कुसरी । लक्ष कोण्हा लक्षेना. ॥ १०४ ॥ चतुर सूत वाजिवेगें । रथ चालवी विचित्र अंगें । वीरसमुद्रीं एकांग भागें । मत्स्यप्राय तळपतू[9]. ॥ १०५ ॥ रणांगणीं सन्मुख घायीं । वश्य करी, ऐसा वीर मही । नाहीं, नाहीं, प्रतापी पाहीं । असाध्य विद्या ययाची. ॥ १०६ ॥ स्वधर्मयुद्ध[10] करितां यासी । निःपात होय क्षत्रियांसी । यया अपाय योजनेसीं । सांगतों सर्वीं ऐकिजे. ॥ १०७ ॥ निकड करुनी ऐकमांडी[11] । जीवित्व त्यागोनी. मुरकुंडी । देउनी, दिशा रोधिजे तोंडीं । महा वीर प्रतापें. ॥ १०८ ॥ कोण्ही रथ, कोण्ही सारथी, । चाप कोण्ही, वाजी निगुती । छेदोनी, करितां विरथी, रथी । वश्य होय **का**ळातें. ॥ १०९ ॥ आणीकही अवघड थोर । अभेद कवच मंत्रोच्चार । जे म्यां सांगितले आदरें । **पृ**थानंदा संतोषें; ॥ ११० ॥ तेणें सिंचोनियां मंत्रा । कवच बांधिलें निजपुत्रा । त्याचा भेद मजवीण सुपुत्रा । कूंत[12] नाहीं कोणातें. ॥ १११ ॥ असो; विजनीं[13] धडकतां अनळ । एकल्या शांत नव्हे अळुमाळ । सहस्त्रीं लावोनी पाणियुगळ । शांत किजे क्षणार्धें.' ॥ ११२ ॥ ऐसी वदोनी दुष्टबुद्धी । मोकलिल्या अस्त्रसिद्धी । जैसी **पु**नर्वसूची घनवृद्धी । जेवीं वांकुडी[14] न खंडे. ॥ ११३ ॥ अभ्रें आच्छादिजे ऊष्मापती[15] । तैसी निबिड बाणशक्ती । वेष्टीत वीरांचिया पंक्ती । किलकिलाट शब्दांचा. ॥ ११४ ॥ सरसराट सुसाट शब्द ।

---

१. पावसाळ्यांत. २. सुखा=कोरडा निष्कारण, फुकट. ३. चढाई करून गेले. ४. एकटा. ५. यम. ६. धनुर्धरांस. ७. सध्या, ह्या प्रसंगीं. ८. आलातचक्र=कोलीत गरगर फिरविलें असतां जी चक्रासारखी आकृति दिसते तें. ९. शोभतो. १०. स्वधर्मास अनुसरून (सरळ मार्गानें) युद्ध केलें असतां. ११. एकोप्यानें, जुटीनें. १२. प्राप्त, साध्य. १३. अरण्यांत. १४. पावसाची संततधार. १५. सूर्य.

शर फोडिती घोर विशद । जाणों पातला दामिनीवृंद । क्षयालागीं निघातें. ॥ ११५ ॥ अष्ट दिशा भरल्या बाणीं । वारया वाट न चले रणीं । अभिमन्यु वीरचूडामणी । न गणोनी, बाणा मोकली. ॥ ११६ ॥ सहस्रशः रुचिर मौळें । भूमी पडती तनूचे मेळें । अश्वगजादि फोडुनी कीळे । धडधडा आदळती. ॥ ११७ ॥ रक्तप्रवाह मांसकर्दमू । रुतती, बुडती, गजोत्तमू; । हलकल्लोळभ्रांत चमू । वीरश्री पुढां लोटती. ॥ ११८ ॥ यमराष्ट्र वर्धलें महाघोर । दाटले शवांचे गिरिवर । षड्थी वृक भहाक्रूर । आमिषातें तळपती. ॥ ११९ ॥ द्रोणें करुनी त्वरा । लघुलाघवें सोडिलें शरा । कवच भेदुनी केले परा । मत्स्यजाळ्यासारिखे. ॥ १२० ॥ पृष्ठीकडूनी वैकर्तनें । सोडिले बाण ज्वलित अग्न । खंडुनी चाप प्रभिन्न घन । करुनी तुकडे पाडिले. ॥ १२१ ॥ भोजराज कृतवर्मा । पाडी छेदोनी अश्वोत्तमा । सारथिशिर उडवी व्योमा । अश्वत्थामा प्रतापें. ॥ १२२ ॥ पृष्ठीं सारथी कृपाचार्या । शिररहित करी काया । एकें भंगोनियां रथालया । त्यांहीं शतकृत्य साधिलें. ॥ १२३ ॥ रथी विरथी आतला धरणी । रणरंगधीर प्रतापवन्ही । खड्ग वोढण धरोनी पाणी । उसळोनी रोषें धांवला. ॥ १२४ ॥ जैसा सिंह उंकावे गजा । तैसा लोटला प्रभिन्नतेजा । वीरीं उभवोनियां भुजा । 'घ्या घ्या' शब्दें बोभाती. ॥ १२५ ॥ जेवीं आमिषा वायसमेळा । धांवती फोडुनी शब्दकीळा । कीं मृगेंद्र शस्त्रें विगतकळीं । होतां वीर लोटती. ॥ १२६ ॥ तयापरी चहूंकडुनी । वीर धांवले शस्त्रपाणी । अभिमन्यु वीर प्रतापतरणी । खड्गधारें निवटितू. ॥ १२७ ॥ तोडुनी असिलतेचा आघावो । खंड करुनी टाकी देहो । थोकले वीर, पावले मोहो । जीवित्वचिंता सर्वांतें. ॥ १२८ ॥ द्रोणें करुनी वेग । मुष्टीपासाव खंडिलें खड्ग । क्रोधानळीं भरुनी शीग । धरुनी चक्र धांवला. ॥ १२९ ॥ जाणों सदृश चक्रपाणी । अरिमर्दन तेजिष्ठ खाणी । भ्रांत पडली सर्वां नयनीं । म्हणती, 'श्रीकृष्ण पातला.' ॥ १३० ॥ लक्ष्य लक्षोनी सावधमती । कर्णे चक्र भेदोनी पाडिलें क्षिती । अभिमन्यु वीर रोषावर्ती । गदा हातीं पडताळी. ॥ १३१ ॥ उसळोनी मर्दितां सेनाभार । द्रौणी वर्षला दारुण शर । सर्वांग तेणें भरिलें रुधिर । रोषें रथ थडकला. ॥ १३२ ॥ गदा वोपुनी निकरें । अश्वसूत मारिले त्वरें । सुबळदायाद काळया वीर । आड आला सेनेसी. ॥ १३३ ॥ गदाघातीं समस्त

---

१. वाऱ्याला सुद्धां मिळेनाशी झाली. २. सोडी. ३. लांडगे. ४. वोढण=वोडण, ढाल. ५. झेंप घाली. ६. गतप्राण, मृत. ७. आपला प्राण कसा वांचेल, याविषयीं चिंता.

वीरां । मारुनी धाडिलें कृतांतघरा । ब्रह्मवसाती नृपवरा । दाहा रथियां मर्दिलें. ॥ १३४ ॥ कैकयराजें गदाघातीं । सात मर्दिले विख्यात कीर्ती । वीरांसहित प्रभिन्न हस्ती । दश एक मारिले. ॥ १३५ ॥ काळपुरुषाचिया पाडें । दौःशासनी पातला पुढें । जाणों [1]मागधघरा बद्रिकुंडें (?) । भीमसेन ज्यापरी; ॥ १३६ ॥ कीं तो रामचंद्र दशग्रीवा । वृत्रासुरातें देव मघवा । कीं शंबरासुर कामदेवा । भावी अंतक अंतींचा; ॥ १३७ ॥ तयापरी दौःशासनी । येतां लोटला आर्जुनी । गदा वोपितां स्यंदनीं । टाकी उडी बळिष्ठ. ॥ १३८ ॥ सहितसूतवाजी रथ । चूर्ण होउनी गेले त्वरित । जैसी वीज पडतां [2]पादपांत । भ्रष्ट शाखा अष्ट दिशा. ॥ १३९ ॥ तयापरी विगत नृपें । गदा घेवोनी धांवला कोपें । उभय बंधु क्रोधप्रतापें । एकमेकां ताडिती. ॥ १४० ॥ गती, युक्ती, विचित्र कळा । दावितां झेलिती; धांवे तळा । येरयेरांची प्राणकळा । घेऊं क्रोधें वांच्छिती. ॥ १४१ ॥ रौद्रसंग्राम अतिदारुण । जैसा अंधकासुरा त्रिनयन । ना तो कैटभासी मधुसूदन । पूर्वीं जेवीं वर्तला. ॥ १४२ ॥ परस्परें ताडितां घाय । उभय तनू रक्तमय । मावां सरोनी जैसा [3]गवय । प्रहार करिती ज्यांपरी. ॥ १४३ ॥ गदाघात निष्ठुरपाणी । पडतां उभयतांचे मूर्धीं । [4]तेंवा येउनी, पडिले धरणी । ताळफळासारिखे. ॥ १४४ ॥ ना तें, अंतकें वोढिलें पाशा । शेषआयुषी निघे जैसा । दौःशासनी वीर तैसा । सावध जाला क्षणार्धें. ॥ १४५ ॥ मूर्च्छा सांवरूनी आपदा । उठतां कर्णीं वोपिली गदा । मस्तक होवोनी गेलें चेंदा । [5]कूष्मांडफळासारिखें. ॥ १४६ ॥ धरे आतला नरेंद्रराज । जाणों खचला सुरेंद्रध्वज । ना तो सिंहासनीं [6]इंद्रानुज । भूमी आला निद्रेतें. ॥ १४७ ॥ तयापरी पार्थकुमर । [7]अचेष्टित मेदिनीवर । सर्वांग भरिलें पूर्ण रुधिर । धुळी तनू व्यापिली. ॥ १४८ ॥ मृत्युमंचकीं करुनी शय्या । [8]बुंथी सृजी प्रेतच्छाया । काळनिद्रे आथिली काया । अक्षयी शुभ्रता पातली. ॥ १४९ ॥ जैसा मृगेंद्र शस्त्रघातीं । छिन्न होवोनी आतुडे क्षितीं । मक्षिकप्राय वीरपंक्ती । घोंगाणती सभोंवत्या. ॥ १५० ॥ कीं रत्न स्पर्शतां जैसें वन्ही । विरूप रूप पावे गुणीं । तैसा सौभद्र बीभत्सरणीं । धरेवरी पडियेला. ॥ १५१ ॥ 'अहा!'शब्द सर्वां वदनीं । वीरां खळबळ अंतःकरणीं । म्हणती 'सौभद्र प्रतापतरणी । अस्त

१. जरासंध हा मागधदेशाचा राजा. ह्यास भीमानें मारिलें. (मुक्तेश्वर–सभापर्व–अ० ६।७ पहा.) २. झाडावर. ३. गवे, रानवृषभ. ४. घेरी. ५. कोहळ्याप्रमाणें. ६. विष्णु. ७. चेतनारहित. ८. आच्छादन.

जाला विक्रमी. ॥ १५२ ॥ **रु**द्रतुल्य प्रताप याचा । होय पुत्र **ध**नंजयाचा । कीर्तिघोष वर्णितां याचा । भ्रम मानसें होतसे. ॥ १५३ ॥ **कौ**रवसेना काळविखारी[1] । मर्दिली येणें गरुडासरी । दाहा सहस्र भूप समरीं । **य**मसदना धाडिले. ॥ १५४ ॥ पृतना एक अक्षौहिणी । निपातिली रणमेदिनी । शवें भरली पूर्ण अवनी । भयंकर बीभत्स. ॥ १५५ ॥ गिरिप्रमाण गुणाढ्य हस्ती । खंडविखंड पाडिले क्षिती । अश्वरत्नें प्रदीप्तकांती । छिन्न क्षतें पडियेले. ॥ १५६ ॥ ध्वजा, पताका, छत्र, चामरें । रत्नाभरणें, तगटांबरें, । वीर वदनें शोभा रुचिर । धरादेवी[2] ढेसँळली.[3]' ॥ १५७ ॥ ऐसी वदतां वीरवाणी । पँश्चिम[4] आक्रमी देव तँरणी[5] । धुँमीळ[6] दिशा पाहोनी नयनीं । माघारला **गु**रुवर्य. ॥ १५८ ॥ तृतीय युद्धाची समाप्ती । हर्षामर्ष वीरांचे चित्तीं । निघते जाहले शिबिराप्रती । विकळमानस सर्वही. ॥ १५९ ॥ पुढां **ध**र्माचा प्रलाप । **वा**ग्देवीतें नुमाणे माप । पुत्रनिधन वार्तासर्प । **पा**र्था हृदीं आतुडे. ॥ १६० ॥ शोकांमाजी करुणारस । सज्जनीं सेविजे सावकाश । जो ऐकतां संसारत्रास । निमोनी, भजें **अ**च्युता. ॥ १६१ ॥ श्री**भी**मराज वरदहस्तीं । मौळी स्पर्शतां, हरिगुणीं रती । **न**रहर **मो**रेश्वर **र**मापती । **भा**रतवर्णनीं पुँढारे. ॥ १६२ ॥

अध्याय बारावा.

संजय म्हणे, 'राजसत्तमा ! । माघारतां अँनीकिनी[7] धामा । **सौ**भद्रक्षय प्रतापगरिमा । वर्णितां मातें स्फुरली. ॥ १ ॥ कीं निधनवार्ता काळविखारी । उसळोनी **ध**र्माच्या कर्णद्वारीं । रिघोनियां अभ्यंतरीं । हर्षकाळजा[8] खंडिलें. ॥ २ ॥ दुःखविषें अंतली काया । शोकलहरी झोंके हृदया । मोहोझेंडू[9] कंठालया । शब्दमार्ग विरोधी. ॥ ३ ॥ गोड संपत्ती कडुवट । देहवासना कडू ते मीट । बुद्धि झांपडी निद्रालोट । मायाभरें जँकळे[10]. ॥ ४ ॥ कीं तो वीरयंत्रेंशब्दगोळा[11] । भेदला **ध**र्महृदयीं सरळा । इंद्रियें होवोनियां गोळा । उलंडला भूमिके. ॥ ५ ॥ चंडवातें कर्पूरजननी[12] । पडे उन्मळोनी मेदिनी ।

---

१. कृष्णसर्पासारखी. २. पृथ्वी. ३. पूर्णपणें भरली. ४. सूर्यानें पश्चिमेचा रस्ता धरिला, संध्याकाळ झाली–हा इत्यर्थ. ५. धूसर, अस्पष्ट. ६. येथें मूळांतील पन्नासावा अध्याय संपतो. ७. सेना. ८. हर्षरूपी मर्मस्थानास. ९. मूर्च्छारूपी झेंडू. झेंडू हा रोग गुरांच्या गळ्यास होतो. १०. जाकळणें=कळवळणें, मोह पावणें. ११. वीररूपी तोफेचा शब्दरूपी गोळा. अर्थसादृश्यः– 'ऐसा द्रौपदीमुखयंत्रींचा । यंत्रगोळा उसळला साचा । करुणातेजें सुतेजाचा । बाळभानु ज्यापरी. ॥ (मुक्तेश्वर–सभापर्व, अ० १५।१६३) १२. केळ.

कीं फळ चेवोनी वृक्षाहुनी । जेवीं पडे तळातें. ॥ ६ ॥ तेवीं तो **पां**डुकुमर । अचेष्टित धरणीवर । पडतां, सर्वही हाहाकार । करिते जाहले आक्रोशें. ॥ ७॥ **पां**डव पिटिती वक्षःस्थळ । **भीम** पाषाणीं मेळवी मौळें । नृपासहित **मा**द्री-बाळ । पांचजन्य स्फुरिती. ॥ ८ ॥ सकळिकांचे अंबकीं अंबू । मोहें स्रवते जाहले उष्ण बिंदू । मोहें वाढला दुःखकदंबू । चुंबित गेला व्योमातें. ॥ ९ ॥ मूर्च्छा सांवरुनी नृपवर । श्वास घाली महाथोर । हृदय पिटोनी वारंवार । दीर्घशब्दें आक्रंदे. ॥ १० ॥ म्हणे, 'माझी वंशवल्ली । बँहाळी पुष्पीं फळीं । संग्रामवारण काळवेळीं । शत्रुमशकीं खंडिली. ॥ ११ ॥ वंशाभरण विजय-केतू । खचोनी पडिला आनंदार्सहितू । दिशा उद्वस, राज्यहेतूं । हरुषचंद्र मावळला. ॥ १२ ॥ आतां जिणेयाचा काय पाड ? । **पा**र्थासी केवीं दावणें तोंड ? । असतां वीरांचे जुंबाड । बाळ **का**ला वोपिला.' ॥ १३ ॥ ऐसा शोक-सागरीं । निमग्न होतां दुःखलहरी । तंव **व्यास** भगवान् अवसरीं । येता जाहला त्या संधी. ॥१४॥ धांवोनी घातला दंडवत । वरासनीं पूजिलें त्वरित । धार्मिक **धर्म** शोकाकुळित । देखोनी बोले मृदुत्वें. ॥ १५ ॥ 'धर्मालया! धर्ममूर्ती ! । कश्मल काय धरिलें चित्तीं ? । नैश्वर्य देह मृत्यपंथीं । शाश्वत केवीं मानिजे ? ॥ १६ ॥ एक पुढें, एक मागें, पाहीं । सांडुनी संपदा सर्व मही । मृत्युमुखा पडती तेही । कीर्ति अकीर्ति ठेउनी. ॥१७॥ तुझिया पुत्राहुनी शतावधी । गुणी प्रतापी समान उदधी । राजपुत्र षोडश विक्रमनिधी । वश्य जाहले **अं**तका.' ॥ १८ ॥ **ध**र्म वदे, 'जनकजनका ! । ऐश्वर्यसिद्ध ज्ञान-दीपका ! । मृत्युभयदारुणशिखा । बाधी अमरा विश्वातें. ॥ १९॥ मृत्यु कोण ? काय ? कैसा ? । राजपुत्रा केवीं वेळसा ? । निवेदीं मातें ईश्वरपुरुषा ! । ऐकों इच्छों; दयाळा !' ॥ २० ॥ **ऋ**षी वदे, "राजया ! गुणी ! । पूर्वी **अ**कंपन राज्यासनीं । धरा शासितां धर्माचरणीं । पुत्र तया जन्मला. ॥ २१ ॥ नांव हरी सकळकळा-। धनुर्विद्येचा मरगळा । बळप्रतापें अग्निज्वाळा । समान

---

१. चवणें=च्यवणें, गळणें, पडणें. २. चेतनारहित, बेशुद्ध. ३. भीमानें दगडावर डोकें आपटून घेतलें–हा इत्यर्थ. ४. नकुळसहदेव शंख करिते झाले–हा इत्यर्थ. ५. डोळ्यांत. ६. पाणी (अश्रु). ७. प्रफुल्लित, टवटवीत. ८. येथें '**सहोक्ति**' नामक अलंकार आहे. ९. ज्याच्याकरितां राज्य मिळवावयाचें तो (अभिमन्यु). १०. जिण्याचा, जगण्याचा. ११. मोह, मूर्च्छा. १२. आजोबा (व्यासा). १३. उपद्रव, अडचण,

वीर्य हरी[1] पैं. ॥ २२ ॥ सहस्रशः मिळोनी वीरीं । भूप मारिला रणगव्हरीं । पुत्रशोकाच्या वैश्वानरीं । दग्ध पिता रात्रीदिन. ॥ २३ ॥ तया शांतविण्या नारद मुनी । पातला, बोधी नानावचनीं । 'मृत्यु ग्रासीत चारी[2] खाणी । काळ सर्वां अजिंत.' ॥ २४ ॥ 'ऐकों त्याच्या वाग्विलासा' । प्रश्न केला तुजची ऐसा । तो सांगतों नराधीशा ! । सादर श्रोतीं सेविजे. ॥ २५ ॥ सृष्टीआरंभाचिये काळीं । प्रजा वर्धल्या विपुळ तळीं[3] । भारें डळमळी धरा बाळी । दुःख सांगे धातया. ॥ २६ ॥ गजबजोनी पद्मयोनी । रोषें संतप्त अंतःकरणीं । उपाय योजतां, क्रोधअयनीं । ब्रह्मांड कढों लागलें. ॥ २७ ॥ रोषें भ्रुकुटीपासाव एक । कन्या[4] जन्मली प्रदीप्त अर्क[5] । नम्रत्वें जोडूनी हस्तक । 'आज्ञा केवीं ?' विचारी. ॥ २८ ॥ ब्रह्मा वदे क्रोधवाचा । 'संहार करीं स्थिरचरांचा' । येरी विनवी म्लान वाचा । 'घात मातें न करवे.' ॥२९ ॥ स्तब्ध पाहतां परमेष्ठी । मृत्यु निघाला गिरिकपाटीं । आचरे तपाचे तीव्रकोटी । ठाईं ठाईं पुण्य तीर्थी. ॥ ३० ॥ बहुकाळवरी[6] तपश्चर्या । नेमें दंडिली व्रतें काया । सोज्वळमति वरुणालया । विरंचीतें वंदिलें. ॥ ३१ ॥ विनयें जोडुनी उभय पाणी । म्हणे, 'काय आज्ञा ? वंदीन मूर्ध्नी.' । धाता वदे, 'प्राणहरणीं । उदित होईं विश्वाच्या.' ॥ ३२ ॥ गजवजोनी बोले वाचा । 'कोण भोग प्राक्तनाचा ? । माझेन[7] कृत्य हें नव्हे, साचा । आन आज्ञा आज्ञापीं.' ॥ ३३ ॥ क्रोधें संतप्त प्रजापती । तेथ पावला पशुपती । विनयवृत्ती शांतवी प्रीती । विश्वजनका सुवाणी. ॥ ३४ ॥ 'विश्वनिधनीं किमर्थ चिंता ? । आदिनारायणें येची अर्था । त्रिमूर्ती निर्मिल्या गुणासक्ता । निजकर्मीं तत्पर. ॥ ३५ ॥ यांहीमाजी तुमचा अर्थू । सकळ कोप हा न करवे व्यर्थू.' । मृत्यूसी वदे, 'भयासक्तू । किमर्थ होसी ? धर्मिष्ठा ! ॥ ३६ ॥ अधर्माचरणी ब्रह्मवाणी । सहसा न, मनीं सत्य मानीं । त्रिविधकर्माची सिराणी । देवत्रय चालविती. ॥ ३७ ॥ उत्पत्तीकारणें[8] चतुर्वदन । विश्वपालनीं मधुसूदन । संहारक त्रिनयन । जाण क्रिया मज हस्तीं. ॥ ३८ ॥ निमित्तमात्र तूतें पुढा । केलें, न मोडीं शब्द येवढा.' ।

---

१. मूळांतही असेंच आहे:–'तस्य पुत्र हरिर्नाम नारायणसमो बले.' (अध्याय ५२ पहा). २. जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज ह्या चार खाणी. ३. भूतळावर. ४. हीच मृत्यूची देवता. ५. सूर्य. ६. वरी=पर्यंत. 'वरी' या शब्दाचा उपयोग सध्या प्रौढ भाषेंत फारसा होत नाहीं, बायकांच्या बोलण्यांत मात्र हा शब्द बराच येतो. हा शब्द मुक्तेश्वराच्या कवितेंतही आढळतो:– 'पडिलों शोकाग्नीचे जोहरीं । जन्मवरी रे ! संजया ! ॥ (सभापर्व, अध्याय १७।५२). ७. माझे हातून. ८. उत्पन्न करणें, पोषण करणें व लयास नेणें हीं तीन कर्में. ९. आवड, प्रीति.

मृत्यु वदे 'लोक तडफडा । होतां, मातें गांजिती.' ॥ ३९ ॥ हांसोनी बोले **प**द्मयोनी । कर्मानुसारें जीवजंतुप्राणी । सुखदुःख भोगिती नानायोनी । तारी, मारी, कर्म त्यां. ॥ ४० ॥ ज्या ज्या युगीं आयुष्यरेखा । **वे**दें निर्मिली सकळिकां । चिरायु, मृत्यूचा धोका । नाहीं, ऐसें न बोले. ॥ ४१ ॥ दिसे तितुकें पावेल लैंय । **श्रु**तीचा ऐसा निज निश्चय । तूं कां त्यांचें धरिसी भय ? । कर्ता **ई**श्वर वेगळा. ॥ ४२ ॥ अहंकृतित्याग करितां देख । कर्म बाधक न्हे चोख । मिथ्या अशंका, कल्पिसी शोक । तोही हरे मद्वाक्यें. ॥ ४३ ॥ अष्टोत्तर रोग तूतें साह्या । देतों जया विजयी बाह्या । अनेक निमित्त विविधचर्या । तुझ्या पाणीं अर्पितों. ॥ ४४ ॥ कर्माचरणें तयाचा वधू । होय तैसा करीं बाधू । तूतें निमित्याचा शब्दू । न ये नेमें वर्ततां.' ॥ ४५ ॥ येरें वंदोनियां चरणा । 'अवश्य' म्हणे, 'समर्थ आज्ञा.' । श्रेष्ठसंहर्तनीं प्रज्ञा । **का**ळ जगा नागवी. ॥ ४६ ॥ अचुक **मृ**त्यूचा चपेटा । अमरादिकां न चुके स्पष्टा । जाणत असतां करिसी कष्टा । केवीं ? नृपा ! सुजाणा ! ॥ ४७ ॥ संसारदुःखाच्या सागरीं । निमग्न होतां शोकलहरी । **का**ळें ग्रासितां उँगळितां परी । नाहीं शैब्द ऐकिला. ॥ ४८ ॥ वाळू घाणा गाळितां वृथा । पाणी घुसळितां लोणी न ये हाता । वांज स्त्रियेच्या मैथुनीं आस्था । प्रजोत्पत्ती लाहिजे ? ॥ ४९ ॥ तयापरी राजसत्तमा ! । खेद सांडुनी वर्धवीं धर्मा । विहिताचारें आयुष्यनेमा । लोटोनी स्वर्गा पाविजे. ॥ ५० ॥ स्वस्थतां भूप अंतःकरणीं । अदृश्य जाला **ना**रद मुनी, । **व्या**स वदे, '**मृ**त्यूची करणी । ऐसी; नरेंद्रा. !' ॥ ५१ ॥ **ध**र्म वदे, '**बा**दरायणा ! । राजपुत्रमृत्युकथन मना । आणि जेणें स्वस्थ वासना । वाढ होय सुखातें.' ॥५२॥ **व्या**स वदे, 'राजसत्तमा ! । **शै**ब्यपुत्र **सृं**जयनामा । महाराज धार्मिक, **ध**र्मा ! । धरा शासी स्वधर्में. ॥ ५३ ॥ पोटीं नाहीं तया पुत्र । तेणें राजा विकळगात्र । कन्या एक परम पवित्र । रूपें **शा**रदा दुसरी. ॥ ५४ ॥ **ना**रद, **प**र्वत, त्यांचे सखे । येतां त्यांतें पूजी हरिखें । कन्या पाहोनी लावण्य निकें । बोलते जाले, नरेंद्रा ! ॥ ५५ ॥ 'ऋषिवर्यांसी कन्यादाना । अर्पितां, पावसी पुत्रनिधाना' । 'अवश्य' म्हणोनी पाणिग्रहणा । कन्या ऋषीतें अर्पिली. ॥ ५६ ॥ महाप्रतापी

---

१. 'यद्दृष्टं तन्नष्टं' असें वचन आहे. २. भगवद्गीता–अध्याय १८, श्लोक ५९ पहा. ३. उगळणें=ओकणें. ४. दोष. ५. ही शैब्यपुत्रसृंजयकथा **न**रहरीनें फारच थोडक्यांत वर्णिली आहे. कदाचित् विषयांतराच्या भीतीमुळें कवीनें असें केलें असेल.

तेजिष्ठ अर्क । पुत्रप्रसाद वोपितां देख । सुत जन्मला गुणाधिक । हेमवर्णी साजिरा. ॥ ५७ ॥ सुवर्णष्ठीवी नाम तया । पिता ठेवी आदरें राया ! । मळत्याग करितां काया । [1]रुक्म प्रसवे सर्वदा. ॥ ५८ ॥ तयाश्रयें गृहगोपुरें । भांड, भांडार, हेमांबरें । जिकडे तिकडे अळंकारें । प्रजा नृपती सारिखे[2]. ॥ ५९ ॥ भाग्यवंत सर्व नगरी । दैन्यचिंता पळाली दुरी । राजपुत्रातें सदाचारी । देवतुल्य मानिती. ॥ ६० ॥ दुष्ट चोरीं घालोनी घाला । वना नेवोनी वधिलें बाळा । पुत्रशोकाच्या अग्निज्वाळा । दग्ध जाहला; नरेंद्रा ! ॥ ६१ ॥ तया दुःखाचिया पुढें । केवीं धार्मिका ! तुझें कोडें ? । मृत्युलोकींचें कर्म कुडें । खेद टाकीं, जाणत्या ! ॥ ६२ ॥ नारद मुनी संजयाप्रती । बोधितां, न धरी कांहीं चित्तीं । तेची अर्थी कथा निगुती । सांगतों राया ! ऐकिजे. ॥ ६३ ॥ [3]सुहोत्र राजा धरातळीं । सत्य, धार्मिक, विजयी, बळी । नवनीतमवाळ दीन दुर्बळीं । सद्वासना स्वधर्मीं. ॥ ६४ ॥ प्रजापाळणीं जैसा धर्म । दातृत्वमानीं मेघासम । सुहृद्भावीं अचळ नेम । धरादेवीसारिखा. ॥ ६५ ॥ स्वधर्मे वश्य केलें सुरां । वैरी जिंकिले शस्त्रधारा । सर्वां भूतीं आप्तता सैरा । सुधावाक्यें रंजवी. ॥ ६६ ॥ ऐसियापरी पाळी वसुमती । पापद्रव्य न शिवे हातीं । तोष पावोनी जगत्पती । पर्जन्य पाडी हेमाचा. ॥ ६७ ॥ खर्व अखर्व धनाच्या राशी । गणना नोहे भांडारकोशीं । [4]कुरुजांगलतापसऋषी । यज्ञ करी सर्वदा. ॥ ६८ ॥ अश्वमेध सहस्र एक । राजसूययज्ञ शताधिक । दक्षिणादानीं धनिक । कुबेर केलें ब्राह्मणां. ॥ ६९ ॥ गृहीं भरिल्या सुवर्णकोटी । प्रजा हर्षित तुष्टिपुष्टी । दुःखदारिद्र्य न मिळे सृष्टी । स्वप्नीं राष्ट्रीं तयाच्या. ॥ ७० ॥ ऐसी शासितां धर्मे धरणी । अकाळ काळें दंडपाणी । नेता जाहला मृत्युसदनीं । प्रजा लोकां आकांतू. ॥ ७१ ॥ प्रळयकाळ भाविला लोकीं । सर्व दिशा [5]आहाळल्या शोकीं । नारद म्हणे, [6]कळंकीं । लिप्त भुवनें चौदाही.' ॥ ७२ ॥ हेंही असो आणिक [7]चर्या । तूतें सांगतों महाराया ! । [8]पौरवराज विजयी बाह्या । भूप प्रसिद्ध जगत्त्रयीं. ॥ ७३ ॥ सहस्रशः श्वेतवारू । अश्वमेध करिती पृथ्वीवरू । पुण्यमार्गे लोकाचारू । अधर्म स्वप्नीं मिळेना. ॥ ७४ ॥ वेदविद् ब्राह्मण निपुण । श्री मान्यविपुळा, आम्राच्छादन । मनोरमकांता, प्रियदर्शन । आल्हादकारी सर्वदा. ॥ ७५ ॥ नटनर्तकगं-

---

१. सोनें. २. राज्यांत इतकें सोनें झालें कीं प्रजा व राजा दोघेंही सारखींच संपत्तिमान् झालीं—हा इत्यर्थ. ३. मूळांतील अध्याय ५६ पहा. ४. कुरुक्षेत्रांतील तपी, जपी व यति. ५. पोळल्या. ६. पापामुळें. ७. वागण्याची रीति, चरित्र. ८. मूळांतील अध्याय ५७ पहा.

धर्वगानीं । नित्योत्साह आनंद सदनीं । तृप्त यज्ञ घृतावदानीं । संतुष्ट धनें द्विजाती. ॥ ७६ ॥ दहासहस्र कन्या समपद्मिणी । सालंकृत वस्त्राभरणीं । आरूढ करुनी गजवाहनीं । ऋषिवर्या अर्पिल्या. ॥ ७७ ॥ रुक्मस्यंदन शृंगारेंसी । सहस्रशः कन्या गुणैकराशी । ब्राह्मणां अर्पिल्या महातोषीं । वरदक्षिणा-समवेत. ॥ ७८ ॥ सहस्रशः गायींचीं शतें । हेमाभरणीं अळंकृतें । सवत्स सुदोहा भृत्यांसहित । कांस्यपात्रादि अर्पिल्या. ॥ ७९ ॥ दास दासी सहस्रशः । वस्त्राभरणीं लोपिती दिशा । साहित्य दक्षिणा ब्राह्मणाधीशा । पूजोनी मानें वोपिल्या. ॥ ८० ॥ गवारत्नें खरोष्ट्र पृष्ठीं । अमित दृष्टी द्विजा तुष्टी । [१]अजा-अविकांच्या बहु दाटी । [२]धरामरां दिधल्या. ॥ ८१ ॥ ऐसियातें काळ चपेटा । करुनी लावी स्वर्गवाटा । माझा पुत्र म्हणोनी कष्टा । केवीं करीसी? नरेंद्रा!' ॥ ८२ ॥ नारद वदे, 'हे तों किती?। [३]उशीनरेंसी श्रीनृपती । समुद्रवलयांकित जगती । एकच्छत्री शासितू. ॥ ८३ ॥ ज्याचिया रथाच्या ध्वनी । वनें पर्वत उलती झणी । अकंटक राज्य करी अवनी । कोशवसुसमृद्धी. ॥ ८४ ॥ जे जे यज्ञ बोलिजे शास्त्रीं । ते ते करुनी पाळी धात्री । दक्षिणादानीं ब्राह्मण-क्षेत्रीं । सुकाळ केला द्रव्याचा. ॥ ८५ ॥ अश्वमेधादि द्विविध यज्ञीं । सिंचिली तिथें जयाची मूर्ध्नी । धनें अर्पितां ज्यांचे पाणी । खंड नाहीं देखिला. ॥ ८६ ॥ वाजि, वारण, गवा, वसनें । धान्य, रत्नें, हेमभूषणें । [४]दशदानादि अनेक दानें । द्विजवर्यां अर्पिलीं. ॥ ८७ ॥ गणों येती पर्जन्यधारा । व्योमींच्या मोजों येती तारा । गंगावोघीं सिकितां सैरा । मोजवेल कदापी. ॥ ८८ ॥ अयुतप्रयुत ब्राह्मणश्रेणी । तृप्त होती षड्रसगुणीं । पयघृत लोट नदीमानी । खळखळाट सोटले. ॥ ८९ ॥ ऐसीं पुण्यें तोषोनी प्रभू । चतुर्विध पुरुषार्थ अर्पी शंभू । खंडतां आयुष्याचा कोंभू । वश्य जाहला मृत्यूतें. ॥ ९० ॥ 'आहा! पुत्र' म्हणोनी कां या । शोका [५]वेरपड करिसी काया?। मानवदेहें जैसी छाया । माध्यान्हिकीं सूर्याची. ॥ ९१ ॥ हेंही असो केतुली मातू । देवाधिदेव जगन्नाथू । [६]दाशरथी राम सीताकांतू । वंद्य हरा विधीतें. ॥ ९२ ॥ जनकआज्ञेचेन प्रयाण । पंचवटिका घातलें ठाणें । चौदा सहस्र राक्षसगण । निर्दाळिले एकदा. ॥ ९३ ॥ दुःसह मानोनी दशानन । जानकीचें करी हरण ।

---

१. शेळ्या व मेंढ्यांच्या. २. भूदेवांस (ब्राह्मणांस). ३. शिबीराजा. (अध्याय ५८ पहा). ४. दशदानें:—गोदान, भूमिदान, तिलदान, सुवर्णदान, वस्त्रदान, गुडदान, धान्यदान, आज्यदान, रौप्यदान व लवणदान. ५. गुंतलेली, मग्न. ६. अध्याय ५९ पहा.

शुद्धीकरितां हनुमान। सुग्रीव मित्र जोडला. ॥ ९४ ॥ वाळी वधोनी राज्य मित्रा। वोपोनी मर्दिलें दशवक्त्रा। सकुळी निवटोनी सर्वत्रा। बिभीषण राज्यीं स्थापिला. ॥ ९५ ॥ भंगोनी सुरांची बांदवडी। रामराज्याची उभविली गुढी। भरता भेटोनी आवडी। राज्य केलें स्वधर्मं. ॥ ९६ ॥ प्रजा सर्व आनंदमय। दैन्यरोगासी न मिळे ठाय। जरामृत्योचें नाहीं भय। नामें घुमे अयोध्या. ॥ ९७ ॥ अनेक यज्ञीं विविध दानीं। तृप्त केल्या ऋषींच्या श्रेणी। नगरी वाहोनियां विमानीं। अंतीं नेली वैकुंठा. ॥ ९८ ॥ मृत्युलोकींचिये वस्ती। देवादिकां चेळणप्राप्ती। इतरां पाड कायसा? नृपती!। 'पुत्र पुत्र' जल्पसी. ॥ ९९ ॥ एकाहुनी एक विशेष। महीं जन्मले राजपुरुष। सूर्यवंशीं वर नरेश। भगीरथ राजा ऐकिला. ॥ १०० ॥ जेणें भागीरथी गंगा। [आणितां खालीं उत्तरंगा]। स्नानपानें दुरितभंगा। करुनी स्वर्गा वर्धवी. ॥ १०१ ॥ सहस्रांचीं सहस्र शतें। कन्या रूपगुणी आभरणयुक्त। ब्राह्मणा आणि राजपुत्रातें। पाणिग्रहणीं अर्पिल्या. ॥ १०२ ॥ आंदणें एक कन्येसी। शत शत दासी गुणैकराशी। दश दश स्यंदन आभरणेंसी। हेमपताकी वोपिल्या. ॥ १०३ ॥ शत शत नाग एक रथा। सहस्र वाजी गजा एक तथा। अश्वअश्वासी गायी शता। धेनूसी मेंढ्या शत एक. ॥ १०४ ॥ खरोष्ट्रीं भरुनी कनकराशी। दश शत अर्पिले एकेकासी। षड्सें तृप्त ब्राह्मण ऋषी। अमित दक्षिणा तोषिले. ॥ १०५ ॥ ज्यांचे कीर्तीचें गुणवैभव। ऋषी, गंधर्व, पितर, देव। ऐकती गाती मधुर रव। डोलती मान सिद्धही. ॥१०६॥ सुकृत जोडुनी अनेक। आपैसा केला ब्रह्मलोक। मृत्युभयाचा कळंक। बाधी जन्मा आलिया. ॥ १०७ ॥ तेथ तव पुत्राची कथा। कोण? किती धरत्रीनाथा!। भूप दिलीप, 'राया! भारता!। जो मंडण धरेचा.॥१०८॥चतुःसमुद्र धरत्री। शासिली जेणें एकच्छत्री। संपत्ती संतती पुत्रपौत्रीं। अपूर्णा ठाव असेना.॥१०९॥ वसूनें वसुधा भरिली पूर्ण। वसुधाधिप विराजमान। प्रजालोक आनंदघन। पुण्यमार्गें वर्तती. ॥ ११० ॥ वेदीं बोलिल्या यज्ञपद्धती। तदनुसार आचरे भूपती। हिरण्यमय जगती। रत्नमंडप स्तंभेंसी. ॥ १११ ॥ तृप्त करुनी राही अग्नी। ब्राह्मणा वोपिल्या निष्कश्रेणी। वोझीं नेतां त्यागिले अवनीं।

१. शोधासाठीं. २.बंदिवास, कैद. ३.नगरींतील सर्व रहिवासी. ४. संकटप्राप्ति. ५. अध्याय ६० पहा. ६. विवाहांत. ७. रथ. ८. हत्ती. ९. आपलासा. १०. अध्याय ६१ पहा. ११. सुवर्णयुक्त.

रत्नाचळ या हेतू. ॥ ११२ ॥ स्वर्गप्राप्तीचे तीन घोष । स्वा[1]ध्याय, धनुष्य-स्फुरणें रोषें । षड्रसें ब्राह्मण तृप्त तोषें । दिवि[2] प्राप्त घोषैंत्रयें[3]. ॥ ११३ ॥ धर्में वेंचोनी आयुष्यधना । जाता जाहला स्वर्गभुवना । 'आहा! पुत्र!' रुदना । मूर्खजनासारिखा." ॥ ११४ ॥ ऐसें वदोनी **ना**रद मुनी । सांगता जाहला अन्य करणी । '[4]**न**हुषपुत्र **य**याती गुणी । **सो**मवंशीं महीचंद्र. ॥ ११५ ॥ धर्में परिपाळोनी धरा । करितां प्रसवे रत्नभारा । प्रजाजन आनंदकरा । धनें राया वोगळती[5]. ॥ ११६ ॥ धार्मिक भूप सदाचारी । निरतयज्ञीं आस्ता[6] पुरी । **अ**श्वमेध सांग **गं**गातीरीं । शताधिक अर्चिले. ॥ ११७ ॥ **रा**जसूययज्ञ शत एक । सहस्र एक **पुं**डरीक[7] । **वा**[7]जपेय विमळ चोख । दशक दहा संपादी. ॥ ११८ ॥ [7]**अ**तिरात्र शत एक । **चा**[7]तुर्मास नेमपूर्वक । [7]**अ**ग्निष्टोमादि विविध मख । **प्रा**[7]जापत्य आचरे. ॥ ११९ ॥ नक्षत्रतंत्र नानादृष्टी । स्मार्ताग्निहोत्र तुष्टीपुष्टी । आचरोनी ऋषींच्या कोटी । तृप्त केल्या षड्रसें. ॥ १२० ॥ धरेवरी तिळयत्र जाण । तितुक्या कन्या गाईधन । ब्राह्मणां अर्पिल्या बहुमान । इच्छा पुरत पर्याप्ती. ॥ १२१ ॥ मनोरम उभय कांता । प्रजा वर्धवी गुणसरिता । कुळदीप जन्मले राया! धूर्ता । **यदु कुरु** प्रतापी. ॥ १२२ ॥ काम पूर्ण करुनी मना । राज्यीं स्थापोनी **कुरु**नंदना । प्रवेशोनी पुनितारण्य । देहें[8] तपीं दंडिलें. ॥ १२३ ॥ भरतां आयुष्याचा माप । [9]अपैता केला **सु**राधिप । मृत्युभयाचा न सोडी ताप । किमर्थ शोकें जल्पसी? ॥ १२४ ॥ **ना**भाचा पुत्र [10]**अं**बरीष । महाप्रतापी वीर सौरस । सहस्रशः रणीं धराधीश । जिंकोनी प्राण सोडिले. ॥ १२५ ॥ हरण करुनी संपदा सर्व । [11]कोशीं भरलें वित्तविभव । पाचारोनी ऋषि गौरव । मख अनेक आचरे. ॥ १२६ ॥ यथाशास्त्र यज्ञपद्धती । त्यांहोनी विशेष आचरे भूपती । लक्षानुलक्ष ऋषींच्या

---

१. वेदाध्ययन. २. स्वर्गांत. ३. मूळांत 'पांच शब्दांचे घोष' असें आहे:—'पंचशब्दा न जीर्यन्ते खट्वांगस्य निवेशने । स्वध्यायघोषो ज्याघोषः पिबताश्नीत खादत ॥'. ४. ययातिराजाच्या कथेपूर्वीं मूळांत मांधाताराजाची कथा आहे. (अध्याय ६२ पहा). परंतु **न**रहरीनें ती कथा पुढें ६९ व्या अध्यायांतील पृथुराजाची कथा सांगितल्यावर वर्णिली आहे. यावरून हा कवि आपल्यापुढें मूळ भारत ठेवून काव्यरचना करित नसावा, असें वाटतें. तसेंच दिलीपराजाच्या कथेबरोबरच मूळांत खट्वांगराजाच्या कथेचा उल्लेख आहे, त्यासही **न**रहरीनें फांटा दिला आहे, यावरून आमच्या अनुमानास बळकटी येते. ५. प्राप्त होती. ६. आस्था, काळजी. ७. यज्ञविशेष. ८. 'देह' शब्द संस्कृतांत पुल्लिंगी व नपुंसकलिंगी आहे. ९. स्वाधीन, अंकित. १०. अध्याय ६४ पहा. ११. आपल्या खजिन्यांत.

पंक्ती । तेजोराशीसारिख्या. ॥ १२७ ॥ यांहीवेगळे प्रयुत दाहा । साग्निक[1] प्रख्यात नेमी महा । याचेनी मंत्रें सप्तजिंव्हा[2] । प्रगट वोपी वरातें. ॥ १२८ ॥ शर्करायुक्त पक्वान्न जाण । घृतपाचित[3] अनेक वर्ण । मेरूसमान राशी घन । अन्नशाळे समृद्धी. ॥ १२९ ॥ अपूप[4], फेण्या, गुळवरिया, । धीवर, जिलब्या, षष्कुलिया[5], । घाऱ्या, माट, कचोऱ्या, लुचया[6], । अनेक खाद्यें अपारें. ॥ १३० ॥ दधि, दुग्ध, मधु, आम्ररस, । केळीं, फणस, द्राक्ष सुरस, । अनेक शिखरणी, फळांचे घोंस, । तृप्ती ब्राह्मणां अर्पिले. ॥ १३१ ॥ 'पुरे पुरे' हाची शब्द । ऐकिला तेथें द्वादशाब्द । दक्षिणादानीं ब्राह्मण स्तब्ध । म्हणती वोझीं न जाती. ॥ १३२ ॥ सरतां आयुष्याची गुंथी । पावता जाहला स्वर्गाप्रती । तव पुत्राची कायसी कीर्ती ? । शोकें पुत्रा पावसी ? ॥ १३३ ॥ नारद म्हणे, 'महाराजा ! । शशिबिंदु[7] नामें भूप वोजा । धरातळीं त्याचिया तेजा । साम्य नाहीं; नरेंद्रा ! ॥ १३४ ॥ सहस्र भार्या गुणैकराशी । रूपें कुरूप उर्वशी त्यांसी । सहस्र पुत्र एकेकीसी । गुणगांभीर्य जन्मले. ॥ १३५ ॥ सर्व वेद-विद्यापारंगत । शस्त्रसाधनीं महाधूर्त । वस्त्राभरणीं अलंकृत । प्रयुत वाजी एकेका. ॥ १३६ ॥ चतुःसमुद्र शासोनी धरा । द्रव्य आणिलें मेरुभारा । अश्वमेध ब्राह्मणद्वारा । विधियुक्त संपादी. ॥ १३७ ॥ शत शत रथ जुंपोनी हस्ती । भरूनी सुवर्ण पर्याप्ती । एकेक ऋषीतें अर्पी भक्ती । हेममाळा भूषणीं. ॥ १३८ ॥ अमित[8] कन्या समपद्मिणी । नृपा वोपिल्या पाणिग्रहणीं । आंदणें वोपिल्या प्रीतीकरुनी । गणित श्रोत्रीं ऐकिजे. ॥ १३९ ॥ एकेक कन्येस शत हत्ती । गजासी शत रथ प्रदीप्तकांती । शतेक वाजी स्यंदनाप्रती । हेममाळा साजिऱ्या. ॥ १४० ॥ अश्वअश्वासी सहस्र गाई । धेनूप्रती पांचशत अंवी । मुखांटिले तेणें मही । भरूनी भाग्य निघाली. ॥ १४१ ॥ यावत् देहें पुण्यकोटी । करुनी पावे नाकपृष्ठीं[10] । मृत्यूसी वश्य सकळ सृष्टी । खेद किमर्थ ? नरेंद्रा !' ॥ १४२ ॥ नारद वदे संजयाप्रती । 'गयराज[11] प्रख्यातकीर्ती । वर्षा शतयज्ञसमाप्ती । करी, कीर्ती ऐकिजे. ॥ १४३ ॥ सदा तपस्वी व्रतें नेमी । अग्निशुश्रूषा मनोधर्मी । 'स्वाहास्वधा'कार शब्द धामीं । सर्वकाळ ऋषींच्या. ॥ १४४ ॥ दर्श अमा[12] इष्टिपूर्वक[13] । चातुर्मासादि मख अनेक । नाना इष्टी ऋषी अनेक । सांगती तैशा संपादी.

---

१. अग्निहोत्री. २. अग्नि. ३. तुपांत तळलेले. ४. अनरसे. ५. करंज्या. ६. चोखण्याचे पदार्थ. ७. अध्याय ६५ पहा. ८. असेंच वर्णन मागें ओंव्या ७७–८१ यांत आहे. ९. मेंढ्या. १०. स्वर्गांत. ११. अध्याय ६६ पहा. १२. अमावास्या. १३. यज्ञासह.

॥१४५॥ धन, धान्य, कलत्र, संपत्ती । पुत्र, पौत्र विभ्राजकांती । आल्हादयुक्त जनांच्या पंक्ती । अयोध्यावासीसारिख्या. ॥ १४६ ॥ त्रेसष्ट योजनें लंब मही । रुक्ममय केलें सर्व पाहीं । चोवीस गांवें रुंदीची नेवाई । रत्नमंडपी साजिरी. ॥ १४७ ॥ हेमखचित स्तंभ सरळ । झल्लरी, तोरणें, मुक्ताफळ । लैलामें भरली भूमी सकळ । गंगावाळूसारखी. ॥ १४८ ॥ अनेक मख अश्वमेधादी । शत वर्षा, खंडली अवधी । षड्रसें तृप्त ऋषींची मांदी । बसे शिंसारी अन्नाची. ॥ १४९ ॥ शेखी भूमी ऋषिब्राह्मणां । अर्पोनी वोपिली वरदक्षिणा । आसनें, शयनें, पात्रें, नाना । गवांबरें दिधलीं. ॥ १५० ॥ गयामहाराजाची कीर्ती । ऐकतां विस्मय वाटे चित्तीं । गयाराजासारिखे क्षितीं । याग नाहीं ऐकिले. ॥ १५१ ॥ सहस्रावधी सुदोहा धेनू । शतानुशत वाजी प्रवीणू । नित्य अर्पितां न ये शीणू । हर्ष मानसीं अपार. ॥१५२ ॥ आनंदमय सहित प्रजा । धर्माचरणीं [वर्तती सहजा] । काळमृत्यूनें आयुष्य पैजा । जिंकोन नेला स्वर्गातें. ॥ १५३ ॥ तेथ तव पुत्राचा विक्रम । कोण कीर्ती ? आचरे धर्म । महीमंडळीं राजसत्तम! । रंतिदेव ऐकिजे. १५४ ॥ महाराज ऐश्वर्यनिधी । धर्माचरणीं अचळ बुद्धी । भांडारकोशीं धनसमृद्धी । न्यून कुबेर त्यापुढें. ॥ १५५ ॥ दोनी सहस्र प्रतापी तनय । युद्धीं सुरेंद्र मानी भय । प्रजा सर्व आनंदमय । धर्माचरणें वर्तती. ॥ १९६ ॥ पाककर्ते सूपशास्त्री । पक्कान्नें करिती अहोरात्री । लक्षानुलक्ष ब्राह्मण श्रोत्री । तृप्त होती नित्यशः. ॥ १५७ ॥ साग्निक सदृश संशितव्रती । अमित ऋषींच्या दिव्य पंक्ती । वस्त्राभरणीं गंधाक्षतीं । शोभायमान सर्वदा. ॥ १५८ ॥ चर्मण्वती पवित्र गंगा । यज्ञारंभीं राया सुभगा! । यज्ञसामोग्री भरली सीगा । मेरु ठेंगणा दिसे पैं. ॥ १५९ ॥ रत्नमंडपीं ऋषींच्या श्रेणी । यागीं संतुष्ट साही अग्नी । प्रगट होवोनी देवता झणी । भाग स्वमुखें सेविती. ॥ १६० ॥ श्राद्धकाळीं पितृगण । कैंव्यान्न भक्षिती हर्षवर्धन । भूतसृष्टी तृप्ततापूर्ण । कुशळ राया वांछिती. ॥१६१॥ मखसमाप्तीचे काळीं । द्विजां अर्पिल्या निष्कांळजी । त्यांवर भारसुवर्णपळी । एक एका अर्पिली. ॥१६२॥ 'पुरे पुरे' म्हणतां वाणी । हांसोनी निष्क वोपी झणी । ग्रहदान विविधवर्णी । सत्वसंपदा अर्पिल्या. ॥ १६३ ॥ दंश दानें लक्षानुलक्ष । फळें सहित अर्पिले वृक्ष । तत्पर दानीं सदा लक्ष । नित्य नित्य

---

१. योजनें. योजन=चार कोस. २. नवल, अपूर्वपणा. ३. अलंकारांनीं. ४. वीट, तिरस्कार. ५. अध्याय ६७ पहा. ६. वेदशास्त्रसंपन्न. ७. पितरांप्रीत्यर्थ दिलेलें अन्न. ८. नाण्यांच्या ओंजळी. ९. मागें ओंवी ८७ वरील टीप पहा.

उत्साहो. ॥ १६४ ॥ ऐसिया संभ्रमें[1] वर्ततां सदा । प्राप्त जाली मृत्यूची बाधा । अक्षयी पावोनी स्वर्गपदा । भोग भोगी शचीतें.' ॥ १६५ ॥ नारद वदे उपहासित । 'दुष्यंतपुत्र राजा[2] भरत । महाप्रतापी बळसमर्थ । समान मारुती दुसरा. ॥ १६६ ॥ बाळपणीं अमोघ शक्ती । गंगा आणिली आश्रमाप्रती । व्याघ्र, सिंह, वृक, महिषे, हस्ती । चिरुनी सांडी हस्तकें.॥१६७॥ दमन करूनी सहित सर्प । मेंढ्या ऐसे चालवी कळप । ज्यांच्या बळाचा पावोनी ताप । दिशा राक्षस लंघिती. ॥ १६८ ॥ न्यायें शासोनी सर्व धरा । प्रजा लावोनी विहिताचारा । संपदारूपें हरीची[3] दारा[3] । वसे गेहीं अचळत्वें. ॥ १६९ ॥ शत अश्वमेध यमुनातीरीं । संपादिले विधियुक्त चार्‍ही । त्रिशत सरस्वतीच्या उदरीं । दक्षिणापूर्ती आचरे. ॥ १७० ॥ जान्हवीतीरीं चतुःशत । पुण्यक्षेत्रीं उर्वरित[4] । सहस्र अश्वमेध गणित । ऋषिमुखें संपादी.॥१७१॥ राजसूययज्ञ शत एक । ज्योतिष्टोम शतदशक । अग्निष्टोमादि अनेक मख । यजिले शास्त्रसंमती. ॥ १७२ ॥ धेनु, वाजी, स्यंदन, हस्ती, । सुवर्ण, रत्नें अनेकजाती । द्विजा वोपिलीं, नव्हे गणती । कन्यादान अमित. ॥ १७३ ॥ पुन्हा याचकां नव्हे आस्ता। ऐसी धरत्री केली तथा । अंतीं वरोनी सायुज्यता । कीर्ती जगीं ठेविली. ॥ १७४ ॥ तेथ तव पुत्राचा प्रताप । सूर्यापुढें लाविला दीप । हेंही असो, विक्रमी[5] पृथु[6] नृप । वंश विष्णूचा. ॥ १७५ ॥ पृथूपासाव प्रगट पृथ्वी । ही तों मात[7] सकळां ठावी । धनुष्य दंडुनी धरादेवी । समान केली पेरावया[8]. ॥ १७६ ॥ घालोनी गोटे पर्वत पाहीं । जेणें स्थापिले अक्षयी मही । अधर्में ग्रासितां बीजें तेहीं । क्षोणी[9] रोषें दंडिली. ॥ १७७ ॥ धेनुरूपें प्रगटोनी धरा । सर्व बीजें प्रसवलीं दुग्धधारा । जे ज्यां वस्तू प्रियकरा । दुहोनी सर्वीं घेतल्या. ॥ १७८ ॥ तयाश्रयें विपुळ धन धामीं । जन प्रवर्तती स्वधर्मकर्मीं । धरा पुरीत सर्व कामीं । हर्षानंदें जगत्रय. ॥ १७९ ॥ हिरण्यमय सर्व धरणी । गृहगोपुरें रत्नमणी । दुःखशोका पडिलें पाणी । फिटली चिंता विश्वाची. ॥ १८० ॥ धर्माचरणीं पृथुराजा । विभव संसार करुनी वोजा । अश्वमेधीं दक्षिणा द्विजा । इच्छा पुरती वोपिली. ॥ १८१ ॥ सासष्ट सहस्र हस्ती गुणी । शृंगारोनी वस्त्राभरणीं । वर दक्षिणा भरुनी रत्नीं । ऋषिवर्यां अर्पिले. ॥ १८२ ॥ लक्षानुलक्ष सुदोहा धेनू । द्विजां अर्पिल्या सुरभीमानू । वसुवसनें भूषणें भानू । लोपे ऐसीं दिधलीं. ॥ १८३ ॥

---

१. आवडीनें, प्रीतीनें. २. अध्याय ६८ पहा. ३. लक्ष्मी. ४. उरलेले, बाकीचे. ५. पराक्रमी. ६. अध्याय ६९ पहा. ७. गोष्ट, वर्तमान. ८. पेरण्यास, पेर्‍यांसाठीं. ९. पृथ्वी.

याचकीं यांञ्चे[1] करिजे पुन्हा । ऐसी वासना न उरे कोण्हा । आनंद करूनी सर्वजना । जाता जाहला स्वर्गातें.[2]' ॥ १८४ ॥ **नार**द वदे, 'ऐकें नृपती । तव पुत्राची कायसी कीर्ती ? । **युव**नाश्वपुत्र अमोघशक्ती । **मां**[3]धाता महिमान्य. ॥ १८५ ॥ **युव**नाश्वासी नव्हता सुत । तेणें क्षीण तंव अशक्त । ऋषी होवोनी कृपावंत । पुत्रइष्टी[4] करविली. ॥ १८६ ॥ सांगोपांग यज्ञसमाप्तीसी । मंत्रोनी उदक ठेविलें कलशीं । तृषाक्रांत नृपती निशीं । प्राशन करी न कळतां. ॥ १८७ ॥ प्रातःकाळीं पुरोडाशभाग । पत्नीसी अर्पितां, उदक व्यंग । पुसतां, राजा म्हणे, 'गांग[5] । चुकोनी रात्रीं सेविलें.' ॥ १८८ ॥ विस्मित होवोनी ऋषिवर्य । म्हणती, 'नासलें महत्कार्य । मंत्रसिद्धी प्रतापसूर्य । वृथा नोहे कल्पांतीं.' ॥ १८९ ॥ गर्भ वर्धला राजजठरीं । निर्गमा[6] मार्ग नव्हे द्वारीं । दक्षिण कुक्ष फोडुनी बाहेरी । गर्भ निघे प्रतापें. ॥ १९० ॥ प्रेतत्व होवोनी पडिला राजा । शोकारूढ संबंधी प्रजा । ब्राह्मणीं प्रार्थुनी वैद्यराजा । **अ**श्विनौदेवा आणिलें. ॥ १९१ ॥ उपचारूनियां नृपती । सजीव केला न लगतां पातीं । आनंदोनी ऋषी म्हणती । 'बाळ जीवे कैसेनी ?' ॥ १९२ ॥ **सुरें**द्र बोले कृपाराशी । मी वांचवीन बाळकासी । करांगुळी सुधावोरसी[7] । घालितां मुखीं तृप्तता. ॥ १९३ ॥ उदय अंतपर्यंत रवी । धर्में शासिली धरादेवी । हिरण्यमय भाग्यविभवीं । जगीं सर्वां आल्हादू. ॥ १९४ ॥ **अ**श्वमेधादि अनेक मख । **रा**जसूययज्ञ शत एक । संपादोनी नृपनायक । तृप्त करी द्विजातें. ॥ १९५ ॥ हिरण्य, रत्नें, भूषणें, पात्रें । हेममय अर्पिलीं दिव्यवस्त्रें । 'पुरे पुरे' बोलती वक्त्रें । न यो आतां याचितें. ॥ १९६ ॥ शोकदारिद्र्य तया राज्यीं । [लेशही न प्रजा गांजी] । पावतां **कृ**तांताच्या पांजीं[8] । जाता जाहला स्वर्गातें'. ॥ १९७ ॥ **नार**द म्हणे, 'शोकावर्ती । न पडें राया ! धरीं शांती । **भा**[9]र्गवरामप्रतापकीर्ती । वेदीं पुराणीं गाइजे. ॥ १९८ ॥ **का**र्तवीर्य **स**हस्रबाहो । उपद्रविता[10] रेणुकानाहो[11] । स्वर्गीं ऐकोनी मात्र टाहो । धांवोनी आला भूतळा. ॥ १९९ ॥ अन्यायकर्म जाणोनी चित्तीं । रोषें पिटिलें महासती[12] । **स**हस्रार्जुन तगटला युद्धार्थी । अमित दळीं

---

१. याचना, मागणें. २. पृथुराजाची कथा मूळांत ३२ श्लोकांत वर्णिलेली आहे. परंतु प्रस्तुत कवीनें ती फारच संक्षिप्त रीतीनें वर्णिलेली आहे. ३. अध्याय ६२ पहा. ४. पुत्रप्राप्त्यर्थ यज्ञ. ५. गंगाजल. ६. बाहेर पडण्यास. ७. अमृताचा पान्हा जीस आहे अशी. ८. पंजांत. मांधाताकथासुद्धां कवीनें फारच थोडक्यांत आटोपिली आहे. ९. अध्याय ७० पहा. १०. उपद्रव देणारा. ११. रेणुका+नाथ (नाहो)=जमदग्नि. १२. रेणुकेनें,

प्रतापें. ॥ २०० ॥ महायुद्ध घोरांदर । जालें, आटले सेनाभार । **राम** क्षोभला वैश्वानर । प्रळयकाळासारिखा. ॥ २०१ ॥ चौसष्टसहस्र महारथी । बाणीं निवटिले **का**ळघाती । अयुत सहस्रशः गणती । रथी वीर मर्दिले. ॥ २०२ ॥ चौदा सहस्र ब्रह्मद्वेषी । क्षत्री धाडिले **य**मराष्ट्रासी । मुसळें ताडुनियां शीशीं[1] । सहस्र एक मारिले. ॥२०३॥ असिलतेचिया[2] घायीं । सहस्रावधी पडिले ठाईं । अमित क्षत्री फरशें[3] पाहीं । तोडुनी **का**ळा वोपिले. ॥ २०४ ॥ कुठारपाणी वृक्षशाखा । ठेंसी, तैसी भुज खंडी देखा । सैन्य सकळत्रा सकळिका । **का**र्तवीर्या मर्दिलें. ॥ २०५ ॥ एकवीसवेळां धरत्री । निःपात केले सर्व क्षत्री । रुधिरऱ्हद धरापात्रीं । भरुनी तर्पणा सारिलें. ॥ २०६ ॥ वश्य करुनी सर्व धरणी । अनेक मख योजिले हवनीं । दक्षिणादानीं ऋषींच्या श्रेणी । तृप्त केल्या सर्वही. ॥ २०७ ॥ धनें रत्नें भरुनी धरा । **क**श्यपा वोपिली, राजेंद्रा! । ठाव मागोनी सैरितावरा[4] । **म**हेंद्र पर्वतीं राहिला.' ॥ २०८ ॥ **दे**वऋषी म्हणे, 'राजसत्तमा! । तव पुत्राची कीर्तिगरिमा । कायसी ते भूपमहिमा? । श्रवणीं राया ऐकिली?' ॥ २०९ ॥ शांत **सृं**जय तूष्णींभूत[5] । संततिहीन खेदाकुळित । ऋषी होवोन प्रसन्नचित्त । पुत्र जीववी प्रतापें. ॥ २१० ॥ चोरें मारिल्या लाधला कुमरा । भूषा आनंद न पुरे धरा । धनवस्त्रें **मे**रुभारा । भूरी[6] ब्राम्हणा वांटिलीं. ॥ २११ ॥ रत्नाभिषेक देव ऋषी । पूजोनी स्तवी महातोषीं । खंडला वंश लावोनी वृद्धीसी । जाता जाहला मुनींद्र. ॥ २१२ ॥ वेद**व्यास** म्हणे, '**ध**र्मराया! । शोका वरपडी न करीं काया । मृत्युलोकींच्या वितंडँ माया । शाश्वत केवीं मानिजे? ॥ २१३ ॥ ऐसे ऐसे पवित्र राजे । कीर्ती स्वर्गी पावले तेजें । तव नंदनें वीरश्रीमाजें । वश्य केलें दिवीतें. ॥ २१४ ॥ समरांगणीं रौद्रप्रताप । करुनी उजळिला शूरत्वदीप । धर्मवर्तिया! तयाचा ताप । करितां असाध्य सर्वथा. ॥ २१५ ॥ देही सांगतों तूतें राया! । देवीं अवतार धरिले कार्या । **चं**द्रासी प्रार्थितां, म्हणे, राया! । 'व्याधी मातें पुत्राची. ॥२१६ ॥ त्याचा वियोग न साहे मला । तुमच्या आग्रहें भूमंडळा । येतों, परी माझिया कैळा[7] । तिर्तुकीं वर्षें[8] क्रमणें.' ॥ २१७ ॥ ऐसें वदोनी **शी**तकर । **पा**र्थकुक्षी वर्धला सुर । प्रतापें दिशा उजळोनी सैर । जाता जाहला स्वस्थाना. ॥ २१८ ॥ पुराणांतरींचा सौरस । **सौ**भद्र **स**हस्रार्जुना अंश । चक्रव्यूहकथन **हृ**षीकेश । **सु**भद्रेतें सांगता.

१. डोक्यावर. २. तरवारेच्या. ३. परशूनें. ४. समुद्रापाशीं. ५. मौनव्रत, मुकाट्यानें राहणारा. ६. पुष्कळ, ७. अघटित. ८. सोळा.

॥ २१९ ॥ निद्राभरें व्यापितां ते । गर्भें हुंकार दिधला तेथें । चमत्कारुनी रुक्मिणीकांतें । कथाभाग आवरिला. ॥ २२० ॥ चक्र कवळोनी पाणी । मागता अर्पी चक्रपाणी । सहस्र भुजा छेदुनी झणी । दोन ठेवी जगदात्मा. ॥ २२१ ॥ असो. भारतीं ऋषिवाणी । वंदली नाहीं नायकों कर्णीं. । व्यास वदे, 'राजया! गुणी! । खेद सांडीं परौता[2]. ॥ २२२ ॥ तूं जाणता सर्वनिपुण । मायामळीं न लिंपीं मन । ईश्वरइच्छा प्रमाण जाण । ठेवी तैसें वर्तणें.' ॥ २२३ ॥ शोका उपशम ने राजा धर्म । अदृश्य जाहला ऋषिसत्तम । पुढें पार्थाचा खेदश्रम । पान सज्जनीं करावें. ॥ २२४ ॥ षोडश राजयाचें कथन । ऐकतां पावन होती जन । नरहर रंक दीन । प्रार्थी संतसज्जनां ॥ २२५ ॥

अध्याय तेरावा[3].

संजय म्हणे, 'नरमंडणा! । सोमवंशाभरणा! । सर्व धर्म विदित श्रवणा । पार्थवृत्तांत ऐकिजे. ॥ १ ॥ समरीं भिडतां संशप्तक । सेनेसहवर्तमान देख । निर्दाळोनी पितृलोकें[4] । देता जाहला प्रतापें. ॥ २ ॥ जैशा मत्त वारणांच्या थाटी[5] । भग्न होती शार्दूळदृष्टी । कीं नाना वनस्पती हव्यवाटीं[6] । भस्म होती तात्काळ. ॥ ३ ॥ ना तें, ग्रीष्मींचा दिनमणी । शोषिता होय जेवीं पाणी । तेवीं शत्रुसैन्य विभांडुनी रणीं । जयदुंदुभी ठोकिल्या. ॥ ४ ॥ मागध[7] वर्णिती ब्रीदावळी । हर्षयुक्त सेना सकळी । तंव अस्तमान पातला हेळी[8] । संध्यामार्जन सारिलें. ॥ ५ ॥ उपविष्ट होवोनियां रथीं । मार्गें परतला शिबिराप्रती । जयउत्साहहर्ष चित्तीं । ब्रह्मांडघटीं न समाय. ॥ ६ ॥ तंव अकस्मात एकाएकीं । कंठ दाटला शोकतवकीं । शुष्क जिव्हा, कोरड मुखीं । खेदांबु[9] गात्रीं डवरिलें. ॥ ७ ॥ विकळ गात्रें सर्व सैंढील[10] । काळजी डळमळी, करी कळ । दिशा उद्वस भासती सकळ । हर्षानंद मावळे. ॥ ८ ॥ तंव दिवाभीतांचे[11] शब्द । देते जाहले भय विविध । शिवा[12] येवोनी सन्निध । महाअनर्थ सूचिती. ॥९॥ ध्वजीं किलकिलती शकुनी[13] । भयभीत तेणें सैन्यश्रेणी । कंपवात गात्रस्थानीं । अनर्थ पार्था सूचवी. ॥ १० ॥ अर्जुन म्हणे, 'यादवेश्वरा! । करुणाकरा! दामोदरा! । दानवारी! गदाधरा! । रमावरा!

---

१. ओंव्या २१६–२१ ह्यांस मूळांत आधार नाहीं. २. दूर, पलीकडे. ३. ह्या अध्यायांत मूळांतील ७२–७७ अध्यायांतील कथाभागाचा समावेश झाला आहे. ४. मृत पितरांचें स्थान, यमलोक, मरण. ५. समुदाय, कळप. ६. विस्तवांत. ७. भाट, स्तुतिपाठक. ८. सूर्य. ९. घाम. १०. शिथिल, लुलीं. ११. घुबडांचे. १२. भालू. १३. गिधाडें इत्यादि पक्षी.

सुखमूर्ती ! ॥११॥ घोर विघ्न प्राप्त अनुत्तम[1] । सुखी असो राजा **धर्म.**' । विगतमानसें **पुरुषोत्तम** । म्हणे, 'अक्षयी तव भ्राता.' ॥ १२ ॥ रथ लोटुनी अतिसत्वरा । येतां मार्ग शिबिरागारा[2] । विव्हळ दशा राजेश्वरा । चमू कैसी देखिली? ॥ १३ ॥ षोडश[3] शृंगारें गोरटी । नसतां कुंकुम, गळसरी कंठीं, । कीं रत्नवापिका गोमटी । अंबुजगहनविरहित[4]. ॥ १४ ॥ कीं ग्रहग्रस्त[5] विधूचें चांदिणें । ना तें विधवेचें ऋतुशोभन । तैसी सेना **पृथानंदनें** । देखोनी बोले हरीतें. ॥ १५ ॥ म्हणे, अनंता ! **कमळाकांता** ! गुणातीता ! अव्यक्तव्यक्ता ! । कर्ता, हर्ता, आनंदभरिता! । **अच्युत** ! दुर्घट दिसे पैं. ॥१६॥अनेक वाद्यदुंदुभीध्वनी । मंगळ घोष नायकों कर्णीं । गीत आलापनृत्यांगनी । विवर्जध्वनी दिसे पैं. ॥ १७ ॥ शंख, सारंग, विणे, वेणू, । करताळिया, अलगुजीं, मानू । मृदंग, पणव, चंगघनू, । भाट, भाटिव[6], नायकों. ॥ १८ ॥ प्रवेशतां सभास्थानीं । बंधुवेष्टित राजश्रेणी । **पार्थ** देखोनियां नयनीं । अधोमूर्ध्नी सूदल्या. ॥ १९ ॥ **अर्जुन** म्हणे, 'कांसारीं[7] । परिपूर्ण जीवन **मुरारी** । असतां **पांडव**मुखकल्हारीं[8] । केवीं म्लानता पावली ? ॥ २० ॥ विवर्णवर्ण किमर्थ तनू ? । हर्षानंद मावळे भानू । शब्दमृगाचें उड्डाण वनू । स्थिर केवीं दिसे पैं? ॥ २१ ॥ समस्त भूपरत्नपंक्ती । वेष्टीत बंधु अवनीपती । **अभिमन्यु**हिरा न दिसे व्यक्ती । दिशा शून्य मज वाटे. ॥ २२ ॥ नेणों[9] चक्रव्यूह **द्रोणाचार्य** । रचिला त्याची भेदनसोयें[10] । भूप न जाणती वर्य[11] । **सौभद्र** एक भेदिता. ॥ २३ ॥ वीरश्रियेचा अद्भुत लोटू । तगटतां युद्धीं भरला घोटू । दुस्तर वीरची प्रभिन्न घाटू । जो **सुरेशा** असाध्य. ॥ २४ ॥ वीरीं मिळोनी मारिला तनय । हाची गमला अभिप्राय । **कर्णें, द्रोणें,** न धरिलें भय । कुमारत्वदशेचें. ॥ २५ ॥ **अभिमन्यु** माझें तान्हें बाळ । गुणीं गणना न करवे मोल । सिंहतुल्य विक्रमी बहेळ[12] । वश्य जाहला वैरिया. ॥ २६ ॥ रूपलावण्यें **मार**पुतळा । सुवर्णाचा ओतींव गोळा । कोमळतनू फांकती कीळा[13] । बाळसूर्यासारिखे. ॥ २७ ॥ रुचिर हनु, शुकनासिक, । विशाळ भाळ, प्रसन्न मुख, । पद्ममुख, भुजदंड चोख । परिघप्राय

---

१. चांगलें नव्हे असें, फार कठिण. २. मुक्कामाच्या जागीं, तळावर. ३. सोळा शृंगार:--नाहाण, चीर, कंचुकी, कुंकू, काजळ, कर्णफुलें, हार, मोतीं, वेणी, पैंजण, चंदनी उटी, कंबरपट्टा, तोडे, विडा, बांगड्या व चतुरता. ४. कमलवनहीन. ५. राहूनें ग्रासलेल्या. ६. स्तुतिपाठ. ७. धर्मराजरूपी सरोवरांत. ८. पांडवांच्या मुखकमलांचे ठायीं. ९. न जाणों, असें तर झालें नसेल ना? १०. युक्ति, उपाय. ११. मोठमोठे, श्रेष्ठ. १२. मोठा, फार. १३. प्रकाश, तेज.

सलंबा. ॥ २८ ॥ माताप्रियकर अत्यंतमान । सुभद्रेचा आवडता प्राण ।
द्रौपदीचें चित्तरंजन । हर्षउद्यान कुंतीचें. ॥ २९ ॥ प्राण न[1] वेंचे देहापरता ।
तैसा मज न विसंबे सर्वथा । शेजीं[2] असतां रिघोनी त्वरिता । सुखगोष्टी
संवादे. ॥ ३० ॥ त्या अमृताहुनी मिष्टा । गोडी लागती कर्णपुटा । दृष्टी
पाहतां ऐश्वर्यपीठा । निवे काय सुखाब्धीं. ॥ ३१ ॥ मम प्रियकर राजहंस ।
आनंदाचा पूर्ण कलश । सकळ सुखाचा मुक्तघोंस[3] । कौरवमूषकीं खंडिला.
॥ ३२ ॥ सन्निध असतां धरत्रीपाळ । युद्धा धाडिलें माझें बाळ । भीमसे-
नाची शक्ती सबळ । दग्ध जाहलें हुताशीं. ॥ ३३ ॥ दुष्ट शत्रूची मांदोडी ।
त्यांमाजी व्यूह रची परवडी । अभिमन्यु धाडिला बुद्धी कुडी । जे असाध्य
निर्जरा. ॥ ३४ ॥ जेणें स्वप्नींही अवदशा । देखिली नाहीं रुक्मिणीधीशा ! ।
भूवरमंचकीं रतिरंग तोषा । करी निद्रा विलासें. ॥ ३५ ॥ प्रातःसमयीं
नृत्यांगणीं । चेवें आणिती गायक गुणी । बंदी मागध स्तवितां वाणी । श्रीदा-
वळी कीर्तीची. ॥ ३६ ॥ तेणें काळमंचकीं शय्या । बुंथी सृजिली प्रेत-
च्छाया । काळनिद्रे आर्थिली काया । अक्षई शुभ्रता वावरे. ॥ ३७ ॥ चापल-
स्नेहें चर्चिले कुशळ । धुळीं लिंपिले असती कुंतळ । भूतश्वापदें फोडिती
कीळ । बीभत्समान भोंवती. ॥ ३८ ॥ कौसल्या, देवकी, अदिती, । रेणुका,
रुक्मिणी, तारामती, । यांचे पंक्ती पुत्रवंती । सुभद्रा विकळ पैं जाली.
॥ ३९ ॥ पुत्र संसारतरूची छाया । पुत्र सुखाची वाटिका, राया ! । पुत्रें
श्लाध्यता लोकीं यया । मुक्त स्वर्गी कपाटें. ॥ ४० ॥ पुत्र मुख्य ऐश्वर्यनिधी ।
पुत्र मुख्य वंशवृद्धी । पुत्र मुख्य गयाश्राद्धीं । वास्तव्य नाकीं पूर्वजां. ॥ ४१ ॥
पुत्रमुखें[8] भार्या उत्तम । पुत्रमुखें पवित्र धाम । पुत्रमुखें अतिथिसंभ्रम । सर्व
सौख्य पुत्रत्वें.' ॥ ४२ ॥ ऐसें वदोनियां वचनीं । गडबडा लोळे होय धरणी ।
हें देखोनी चक्रपाणी । धांवोनी पार्थ धरियला. ॥ ४३ ॥ सांवरूनी विकळ-
गात्रें ।[मुख-]कमळ स्पर्शिलें करें । कबरीभार सांवरूनी, वंक्र[9] । पीतांबरें पुसिलें.
॥ ४४ ॥ म्हणे, 'पार्था ! विवेकमूर्ती ! । इहलोकींची नश्वरवृत्ती । प्रारब्धयोगें

१. न जाई. २. शेजारीं, जवळ. ३. मुक्ताफळांचा घोंस (गुच्छ). ४. समुदाय. 'मांदी' ह्या शब्दाचें 'मांदोडी' असें रूप कवितेंत कधीं कधीं आढळतें. मुक्तेश्वराच्या कवितेंत ह्या शब्दाचें 'मांदोडा' असें पुल्लिंगी रूप आढळतें:–'रत्नवृक्षाचे मांदोडे । प्रवाळवल्लींचे झुंवाडे । वैडूर्यखाणी चहूंकडे । भानुतेजें झळकती. ॥' (सभापर्व, अध्याय ४।१०५). ५. जागृति. ६. दिली, अर्पण केली. ७. ओंव्या ४०–४२ ह्यांस मूळांत आधार नाहीं. ह्या नरहरीनें आपल्या प्रतिभाकौशल्यानेंच निर्माण केल्या आहेत. ८. पुत्रप्राप्तीमुळें. ९. तोंड.

दैवगती । लाभालाभ तद्योग. ॥ ४५ ॥ सुखदुःखाचें आभाळ सारें । अंगा लागे कर्मानुसारें । विवेकज्ञानी महाचतुर । त्यांतें दृष्टी नाणिती. ॥ ४६ ॥ विचारें निरीक्षितां पैं तेथें । देह तंव जाइजे सत्य । पंचविषयीं[1] गुणमिश्रित[2] । तंव सम्यक् जीवव्यक्ती. ॥ ४७ ॥ ईश्वरमायेचा बडिवार । मिथ्या दावी साचोकार[3] । जैसे स्वप्नींचे वेव्हार । चेईल्या[4] दृष्टी नातुडे. ॥ ४८ ॥ ना तें रोहिणीचें उदक । कीं शुक्तिकीं रजतन्याय देख । नाना गंधर्वनगरींचे[5] चोख । मिथ्या भास; सर्वज्ञा ! ॥ ४९ ॥ असो, येथींचें विवरणें । गांगेयसमरीं[6] तुज म्यां जाणें । निरोपिलें[7], तें अंतःकरणें । विवरूनियां वर्तणें. ॥ ५० ॥ आतां सोडुनी दुःखबुद्धी । करीं शोकाग्नीची शांती । वळंघोनियां विजयरथीं । वीर-विक्रमा दावणें.' ॥ ५१ ॥ ऐसा बोधोनी महावीर । शांत करी इंदिरावर । जैसा महानदीचा पूर । वोसरे[8] पंवे ज्यापरी. ॥ ५२ ॥ श्वास घालोनी फणि-प्राय । धर्माप्रती बोले विनय । 'युद्धवृत्तांताची सोय । समूळ मातें निवेदीं.' ॥ ५३ ॥ शोकाकुळित धर्मराजा । बोलता जाहला भीमानुजा । म्हणे, 'काय सांगों ? कपिध्वजा! । दुःखें उंभड[9] येतसे. ॥ ५४ ॥ दानवयुद्धा जातां तुंज[10] । द्रोणें घातली माजीं पैज । व्यूह निर्मोनी विगततेज । भूप सर्व त्रासिले. ॥ ५५ ॥ कोण्हा न करवे उठावणी । म्यां सौभद्र प्रेरिला रणीं । नेणों काळ शिरकला बाणीं । क्षया न्याया पुत्रातें. ॥ ५६ ॥ तो अभिमन्यु वीरराजू । महाप्रतापी अरुणानुजू[11] । वीरसागरीं डहुळोनी भुजू । क्षीण केलें क्षत्रियां. ॥ ५७ ॥ पाठी साह्य जातां[12] आह्मां[12] । क्षुद्र जयद्रथ पापकर्मा । शिववरदें बाहुविक्रमा । वीरां सर्वां रोधिलें. ॥ ५८ ॥ भीमादिकांचें प्रतापबळ । निर्फळ करुनी टाकिलें फोल । एकटें बाळ विक्र-मकीळ । वन्हिप्राय सुसाटे. ॥ ५९ ॥ षड्रथी[13] होवोनी एकत्र । वीरसामग्री छेदिल्या शस्त्रें । दुःशासनाचिया पुत्रें । गदाघातें मारिला. ॥ ६० ॥ विपरीत मुंगीनें ग्रासिला मेरू । टिवाटिवी[14] शोषिला जळधरू । तमें लोपिला सहस्र-

१. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध—ह्या पंचविषयांनीं युक्त. २. सत्व, रज व तम—ह्या त्रिगुणांनीं मिश्रित. ३. खरोखर. ४. चेतना प्राप्त झाल्यावर, जागृतावस्थेंत. ५. आकाशांतील ढगांत नग-रांसारखी आकृति दिसते व थोड्या वेळानें दिसेनाशी होते, तीस गंधर्वनगर असें म्हणतात. ६. भीष्माबरोबर लढतांना. ७. येथें भगवद्गीतेवर कटाक्ष आहे. ८. उतरे, कमी होई. ९. उमासा, उमाळा, गहींवर. १०. तुज जातां=तूं गेल्यावर. हा प्रयोग चिंतनीय आहे. ११. गरुड. १२. हा प्रयोग ५५ व्या ओंवींतील 'तुज जातां' या प्रयोगाप्रमाणेंच आहे. १३. द्रोणाचार्य, कृपाचार्य, कर्ण, अश्वत्थामा, कोसल व कृतवर्मा—हे सहाजण. (अध्याय ७३।१० पहा). १४. टिटवीनें.

करू । काळ वृकें फाटिला. ॥ ६१ ॥ वणवा विझविला दर्भकर्णीं । वृश्चिकविषें जाळिला अशनी । निर्झरोदकें अगस्ती मुनी । वाहोनी गेला सागरा. ॥ ६२ ॥ तयापरी तैसी गती । सौभद्रासी जाहली प्राप्ती । सहस्त्रशः मारिल्या वीरपंक्ती । नराश्वगज प्रतापें. ॥ ६३ ॥ आठ सहस्त्र नव शत । नवदशक रथी बळसमर्थ । दोन सहस्त्र राजपुत्रांतें । स्वर्गधामा वोपिलें. ॥ ६४ ॥ बृहद्बळा आणि लक्ष्मणा । प्रतापें धाडिलें यमसदना । वीरमंडळी डोलवी माना । जाता जाहला स्वर्गातें'. ॥ ६५ ॥ पार्थ गहिंवरोनी बोले वाणी । 'उदईक अस्ता न पावतां तरणी । जयद्रथ पाठवीन कृतांतसदनीं । सत्य, सत्य त्रिवाचा. ॥ ६६ ॥ कर्णद्रोणादि शूरवर । आड रिघतां करीन स्थिर । निश्चयें मारीन सैंधव[1] वीर । शेषापाठीं रिघतां. ॥ ६७ ॥ नेमिल्या नेमीं जयद्रथा । न मारितां, पाप बैसे माथा । केला उपकार नाठवी चित्ता । लोक मातें हो प्राप्त. ॥ ६८ ॥ ब्रह्मघ्न, पशुघ्न, भ्रूणहत्यारी, । गुरुतल्पग[2], मद्यपी, व्यभिचारी, । साधुनिंदक, द्रव्यापहारी, । वास्तव्य घडो मृत्युलोकीं. ॥ ६९ ॥ मातृद्रोही, जनकद्रोही । विषदाई, विपिनदाही, । पापसंगती, विश्रामदेही । घडो, न मारीं सैंधवा. ॥ ७० ॥ हें कार्य न पावतां सिद्धी । प्रवेश करीन अग्निसंधी । मम नेमाची अलोट विधी । भंगों न शके विधाता.' ॥ ७१ ॥ प्राकृत[3] कवीची वाग्वल्ली । सौभद्र पडिल्या भूमीवरी । लत्ताप्रहार मस्तकावरी । केला सैंधवें संतोषें. ॥ ७२ ॥ सौभद्रें प्राण धरिला कंठीं । होतां धनंजयाची भेटी । गुज सांगतां, क्रोधें किरीटी । प्रतिज्ञा करी प्रतापें. ॥ ७३ ॥ असो, पार्थप्रतिज्ञोत्तर । सर्वीं ऐकिलें अतिदुस्तर । मान तुकोनी यादवेश्वर । पांचजन्य स्फुरिला. ॥ ७४ ॥ देवदत्त वीर अर्जुन । वाजवितां, नादें भरिलें गगन । वाजंत्रादि वाद्य घन । सिंहनाद वीरांचे. ॥ ७५ ॥ नाद ऐकोनी वीरीं । दचक[4] मानिला बहु अंतरीं । गुप्त चार[5] प्रगट हेरीं । मात कर्णीं फांकली. ॥ ७६ ॥ ऐकतेक्षणीं हर्षमुद्रा । वोहँढोनी[6] मिनली समुद्रा । प्राणांत गमला नरेंद्रा ! । सैंधवातें ते काळीं. ॥ ७७ ॥ म्हणे, 'पार्थाची अचळ प्रतिज्ञा । अन्यथा नोहे राया ! सुज्ञा ! । मी जाँईन[7] राजिया ! प्राज्ञा ! । मृत्य टाळावया.' ॥ ७८ ॥

---

१. सिंधुदेशाचा राजा (जयद्रथ). २. गुरुपत्नीशीं गमन करणारा. ३. नरहरीनें त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या मराठी कवींचीं महाभारतें वाचिलीं होतीं, असें यावरून वाटतें. ओंव्या ७२।७३ ह्यांस मूळांत आधार नाहीं. त्या त्यानें वाचलेल्या मराठी महाभारतग्रंथाच्या आधारानें रचिल्या असाव्या. ४. भय, धाक. ५. गुप्तपणानें फिरणारे दूत. ६. ओव्हळाप्रमाणें वाहून. ७. तुमचा (कौरवांचा) पक्ष सोडून घरीं जाईन. (अध्याय ७५।१६ पहा).

दुर्योधन म्हणे, 'ऐसें न करीं । **द्रो**णासी श्रुत करीं झडकरी । सांगेल तैसी करूं परी । महाअरिष्टा निरसणें.' ॥ ७९ ॥ **क**र्ण, **श**कुनी, **सैं**धव, **कृ**प, । दुःशासन, **कौ**रवाधिप, । **अ**श्वत्थामा, काळसर्प । रणीं उरल्या डंखिता. ॥ ८० ॥ सर्व मिळोनी **द्रो**णधामा । जावोनी वंदिलें ब्राह्मणोत्तमा । म्हणती, "**अ**र्जुनें वरिलें नेमा । उदईक **सैं**धवा मारणें. ॥ ८१ ॥ ते तव मिथ्या नव्हे मातू । आमंत्रूनी गेला **का**ळदूतू । तयातें वृथा करावया समर्थू । तूंची एक प्रतिपाद्य. ॥ ८२ ॥ संग्रामसागरींचा महापूरू । तरलों कवळोनी **भी**ष्मतारू । **भ**गदत्ता देवोनी 'नाभी'[1]कारू । कासे[2] आह्मां लोविलें. ॥ ८३ ॥ तुझा आधार आह्मांस जाणा । पैलतीरा पाववी श्रेष्ठवर्णा[3] !" । ऐसें वदोनी **कौ**रवराणा । **द्रो**णचरणा लागला. ॥८४॥ 'ना भी' म्हणे **आ**चार्या । '**ज**यद्रथ रक्षीं, **न**रवर्या ! । सांगेन त्या करुनी उपाया । महारिष्टा निरसणें. ॥ ८५ ॥ उदईक निर्मू **श**कटव्यूहू । सप्तावरणी[4] महाबाहू । त्यामाजी प्रभिन्न **प**द्मव्यूहू । **सू**चिकाव्यूह त्यासंगीं. ॥ ८६ ॥ त्यांमाजी बसवोनी **सैं**धव । हुडहुडा[5] वीर वाँढीव[6] । ठेविजे, ज्यांचें हस्तलाघव । दिवौकसां[7] नाकळे. ॥८७॥ द्वाररक्षण मजकडे । **का**ळास पाहों नेदिती कोडें । कायसें **पा**र्थाचें सांकडें ? । षड्रथी[8] भूपा रक्षिती.' ॥ ८८ ॥ **आ**चार्यमुखींची ऐकोनी गोष्टी । **दु**र्योधना आल्हादकोटी । तुमंची[9] असतां माझी पाठी[10] । वाँढीव केतुली **पा**र्थाची ?' ॥ ८९ ॥ **सौ**बळ बोले, 'महाराजा ! । तुह्मा प्रसन्न **कै**लासराजा । उदईक पावतां **श**शांकभाजा[11] । **सैं**धव रक्षिल्या सिद्धता. ॥ ९० ॥ **पा**र्थनेम नेतां भंगा । प्रवेश करील अग्निसंगा । पाठी **पां**डववांटीव[12] भणगा— । प्राय जिंकणें क्षणार्धें.' ॥ ९१ ॥ वाक्यामृत सेवोनी गोडी । म्हणे, 'मातुळा ! प्रजा गाढी । उभवोनी स्वानंदाची गुढी । पिटोनी पाणी नाचतू.' ॥ ९२ ॥ दैवयोगें मरतां प्राणी । शुष्क जिव्हा होय वदनीं । अंतीं ज्येष्ठमध जिव्हाशनीं । देतां किंचित उपरमे. ॥ ९३ ॥ ना तो पांथिक नदीप्रवाहीं । बुडतां, तीरस्थ धिंवसा[13] पाही । देतां होवोनी आश्रय देही । बुडे शेवटीं ज्यापरी; ॥ ९४ ॥ तयापरी हर्षशोभा । विसर्जिली **द्रो**णसभा । वाद्यध्वनी पिटिलें नभा । सिंहनादें

---

१. अभयवचन. २. कमेरला लाविलें, पाठबळ दिलें. ३. ब्राह्मणा. ४. सात गोट ज्याला आहेत असा. ५. प्रत्येक बुरुजावर. ६. कीर्तिमान्. ७. देवांस. ८. कर्ण, भूरिश्रवा, अश्वत्थामा, वृषसेन, कृपाचार्य, व शल्य (अध्याय ७५।२६: पहा). ९. तुमचा आश्रय मला असल्यावर. १०. पराक्रम, बळ. ११. निशा, रात्र. चंद्र हा रात्रीचा पति मानिला आहे. १२. अर्जुनेतर पांडवांचा प्रताप. १३. धैर्यानें.

घनघोषें. ॥ ९५ ॥ विश्वेश, ईश, विश्व सृजता, । विश्वपाळण, विश्व हरिता, । विश्वंभर, विश्व सरता, । म्हणे **पार्था हरी** तो. ॥ ९६ ॥ 'तुवां प्रतिज्ञा स्फुरिली नेमें । घाबिरा **सैंधव** तेणें कर्में । दिशा लंघितां भयभ्रमें । **द्रोणें** पाठी सूदला. ॥ ९७ ॥ मुखें बोलिला पुरुषार्थ । व्यूह निर्मीन महासमर्थ । मध्यभागीं **जयद्रथ** । रक्षणा वीर चौफेरी. ॥ ९८ ॥ अग्रीं भूप महावरिष्ठ । **कर्ण, भूरिश्रवा, कृप** वरिष्ठ । **द्रोण, वृषसेन, मद्र**, श्रेष्ठ । जे **काळातें** अजिंक्य. ॥ ९९ ॥ एकएकासीं जिंकितां युद्धीं । षण्मासांची पुरे अवधी । त्वां तव प्रतिज्ञा स्फुरली संधी । असाध्य मातें दिसताहे.' ॥ १०० ॥ हांसोनी बोले **धनंजय** । 'काय **देवा**! घालिसी भय ? । **हिरण्यपुरीं** दानववर्य । **वासवातें** अजिंक्य. ॥ १०१ ॥ ऐके[1] रथीं शस्त्रसंधानीं । निर्मूळ केल्या दैत्यश्रेणी । तोष पावोनी **वज्रपाणी** । मुगुट मातें वोपिले. ॥ १०२ ॥ **शंभु** तोषविला वनीं । अस्त्रराज लाधलें गुणी । तेथें **कौरवांची** अनीकिनी[2] । कोण गणी ? स्वामिया ! ॥ १०३ ॥ तुझा मस्तकीं अभयकर । असतां, धरेचा नृपवर । सुरांसहित **सुरेश्वर** । स्थिरचरा दिक्पंक्ती. ॥ १०४ ॥ पायें चेपोनी भूपमूर्धी । सुरांदेखतां **ब्रह्मास्त्रबाणीं** । **जयद्रथशिर** पाडीन अवनी । रवी[3] असतां, प्रतापें. ॥ १०५ ॥ तया रुधिराचे प्रवाहीं । भूषित करीन देवी मही । माझे बांधव आनंदगेहीं । वसते करीन सुखानें. ॥ १०६ ॥ दुःखसागरीं **दुर्योधन** । लोटोन, ऊर्ध्व[4] करीन मान । तरीच **पृथेचा** नंदन । दास अनुज **धर्माचा**.' ॥ १०७ ॥ असो, ते निशी घोर काळी । **काळ** भाविला तये काळीं । नेणों पातली **भद्रकाळी** । क्षया सर्वां न्यावया. ॥ १०८ ॥ घोर विघ्नें उदेलीं अवनी । रक्तस्राव जाहला गगनीं । झुंझवातनाशकरणी । दृष्टी उघडों नेदिती. ॥ १०९ ॥ धूमांकित विवर्ण दिशा । कबंध नाचती अनेकशा । क्रव्यादपक्षी फोडिती घोषा । क्षयकारी जनातें. ॥ ११० ॥ गजाश्व रुदती, खळखळ । मूत्रमळ त्यागिती वेळोवेळ । दुश्चिन्हांचा[5] पातला मेळ । सकंप सेना सर्वही. ॥ १११ ॥ दुःखशोकाचा पडिभार । सेना सुषुप्ती[6] पावली घोर । निद्रा नये चटपटीवार[7] । **कृष्णार्जुना** जागृती. ॥ ११२ ॥ जैसी[8] जळावेगळी मासोळी ।

---

१. एकट्या वीरानें. २. सैन्य. ३. सूर्यास्तापूर्वी. ४. वर डोकें काढीन, यशस्वी होईन. ५. थोर, पराक्रमी व सज्जन पुरुषांस दुर्दशा प्राप्त व्हावयाची असल्यास आधीं सूचनार्थ दुश्चिन्हें घडतात, असें वर्णन संस्कृत, इंग्रजी व मराठी ग्रंथांत ठिकठिकाणीं आढळतें. ६. निद्रा. ७. तळमळीनें. ८. अर्थसादृश्यः—चुकलीये माये । बाळ हुरूहुरू पाहे. ॥ जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी. ॥

कीं बाळाविरहित माउली । कृपण धन मिळतां धुळी । तेवीं तळमळ पार्थातें. ॥ ११३ ॥ क्षणक्षणा वावरे शोक । जीवीं चिंता, विवर्ण मुख । स्वप्नांतरीं न दिसे सुख । दिशा दुःखें व्यापिल्या. ॥ ११४ ॥ असो; पुढां तेंची कथन । सज्जनीं पान किजे श्रवण । भीमराजसेवक जाण । नरहर मोरेश्वर कथी पैं. ॥ ११५ ॥

अध्याय[2] चौदावा.

संजय वदे, "अवनीपती ! । अर्जुन निमग्न शोकावर्ती । अश्रुपूर्ण विमनस्कमती । वदे ग्लानी हरीतें. ॥ १ ॥ 'पद्मनाभा ! पद्मजजनका ! । पद्मावल्लभा ! पद्मधारका ! । पद्मपाणी ! पद्मलेखा ! । गणितां गुण अमोल्य. ॥ २ ॥ कुंदरदना ! कुंभिनीधरा[3] ! । कुब्जाकुब्जीदिव्यकरा[4] ! । कुमतिहरणा ! कुशळसुरा ! । तवाश्रयें सुखाब्धी. ॥ ३ ॥ विनती तूतें सारंगपाणी[5] । प्रवेशोन राजभुवनीं । शांतवीं सुभद्रा याज्ञसेनी । सह वैराटी समस्त.' ॥ ४ ॥ विगत मानसें यदुनंदन । प्रवेशोनी भगिनीसदन । देखतांक्षणीं शोकक्रुशान[6] । दुःखआज्यें[7] धडकला. ॥ ५ ॥ मिठी घालोनियां गळां धनू[8] । हुंबाडा[9] फोडी जैसी धेनू । विवर्ण वर्ण, विकल तनू । अंबुधारा[10] अंबकीं[11]. ॥ ६ ॥ सुटोनी गेली वीरगुंठी[12] । कच[13] वावरे मुखसंपुटीं । छिन्नाभरणें सुरंग होटीं । बीभत्सता पातली. ॥ ७ ॥ वदनचंद्र विराजमान । शोक चतुर्दशीलें[14] हरीमान । लावण्यतेची प्रभा घन । अमाकाळीनें[15] ग्रासिली. ॥ ८ ॥ हृदयीं पेटला शोकवन्ही । रुदितरवशिखा गगनीं । मनमयूर आहाळुनी[16] । दुःखार्णवीं पडियेले. ॥ ९ ॥ 'अहा !' करुनी, 'कटाकटा[17]' । म्हणे, 'कर्मा रे ! बळकटा ! । पुत्रशोकाचा देशवटा[18] । प्राप्त जाहला ये काळीं. ॥ १० ॥ आजी जगडोल[19] जाहला प्राप्त । सृष्टी बुडाली आनंदासहित । दिशा उद्वस, संपदांजात[20] । शोकसागरीं बुडाल्या. ॥ ११ ॥ अभिमन्यु संतोषाचा केतू । सौख्यव्रताचा सरितांकांतू[21] । हर्षवि-

---

१. येथें मूळांतील 'प्रतिज्ञापर्व' नामक पोटपर्व संपतें. २. ह्या अध्यायांत मूळांतील ७८–८१ ह्या चार अध्यायांतील कथाभाग आला आहे. ३. (वराहावतारीं) पृथ्वी पेलून धरणाऱ्या. ४. कुबड्या कुब्जेला दिव्यदेहधारी करणाऱ्या. ५. शार्ङ्गपाणि. ६. शोकाग्नि. ७. दुःखरूपी घृताच्या योगानें. ८. घट्ट. ९. हंबरडा. १०. अश्रुधारा. अंबु=पाणी. ११. डोळ्यांत. १२. केसांचा आंबाडा, बुचडा. १३. कच=केंस. १४. चतुर्दशीच्या लाटांप्रमाणें. १५. अमावास्येनें. १६. पोळून. १७. हायहाय. १८. देशान्तर, स्वदेशत्याग. १९. भूकंप. २०. वैभवमात्र, सर्व प्रकारचीं वैभवें. २१. समुद्र.

लासाचा अक्षयी सेतू । दुष्ट **कौ**रवीं भंगिला. ॥ १२ ॥ आनंदाचें शोभा[1]यतन । उल्हासाचें वसे स्थान । माधुर्याचें पीयूषपान । भंगोनी गेलें एकदा. ॥ १३ ॥ मज सोडोनी राजहंस । उडोनी गेला आकाशास । [2]**मा**नससरोवर उद्वस । दुःख कोण्हा निवेदूं ? ॥ १४ ॥ आड रिघोनी वोसंगा[3] । पयःपान करी लगबगा । तो उत्साह महाभागा । **श**ची देवी अप्राप्त. ॥ १५ ॥ रूप लावण्य विराजमान । गुणगांभीर्य विक्रमी घन । समरांगणीं भूपशमन । दुजा **अ**र्जुन आभासे. ॥ १६ ॥ कुळवर्य पुत्र **फा**ल्गुनाचा । **त्रि**जगदीशा ! तुझा भाचा । [4]प्राणपढियंता **द्रौ**पदीचा । पितृव्यांतें[5] सुखकारी. ॥ १७ ॥ नाना [6]उपयोगीं करी निद्रा । जे अप्राप्य **सु**रेंद्रा । तो अजी प्रतापरु**द्रा** । भूमी लोळे निर्जनीं. ॥ १८ ॥ मी पापीण दैवहीन । केवीं लाहीन सुपुत्ररत्न ? । जेवीं **रा**हु प्राशितां सुधाकण । चक्र कंठीं शिरकलें. ॥ १९ ॥ आतां **कृ**ष्णा! करूं काय ? । कोणा मोकळूं दीर्घ धाय ? । पुत्रसुखाची बुडाली सोय ! । दुःखें पाठी पुरवली !' ॥ २० ॥ ऐसें वदोनियां वचनीं । लोळे शोकें गडबडां **ध**रणी । प्रमदावक्राची शंखध्वनी । भेदोनी गेली अंबरा. ॥ २१ ॥ जगन्मोहन, **ज**गन्नाथू । जगन्निवास, जगा असक्तू । जगदीश, [7]जगन्माताकांतू । [8]बुजावी भगिनी सुवाक्यें. ॥ २२ ॥ म्हणे, 'माये ! सभाग्यखाणी ! । **का**ळ ग्रासी लोक तीन्ही । बुद्बुदप्राय जंतुजीवनीं । शाश्वत केवीं मानिजे ? ॥ २३ ॥ अकीर्ति पुरुष जीतची मेला । कीर्तिमान् [9]इहपरत्रीं भला । सर्व लोक स्तविती त्याला । धन्य जननी पवित्रा. ॥ २४ ॥ तव कुमार शिरोरत्न । पितृतुल्य विक्रमी घन । वीरसागर डहुळोनी पूर्ण । अमित भूप मर्दिले. ॥ २५ ॥ क्षत्री पडतां समरांगणीं । त्यांसी [10]औंध्यता कोटिगुणी । रविमंडळ[11] भेदुनी झणी । अक्षयी पदा विराजे. ॥ २६ ॥ तैसा स्वधर्म आचरतां । तुवां किमर्थ करणें चिंता ? । दुःख-

---

१. सौंदर्यधाम. २. येथें 'मानस' शब्द **श्लिष्ट** आहे. ३. उत्संगा, मांडीवर. ह्या वर्णनाचें मर्म समजावयास सहृदय माताच पाहिजे. ४. प्राणप्रिय, प्राणासारखा आवडता. ५. चुलत्यांस, काकांस. ६. सरंजामानें. ७. लक्ष्मीकांत. ८. समजावी. ९. ह्या लोकीं व परलोकीं. १०. मोठेपणा, कीर्ति. ११. रणांत पाठ न दाखवितां शत्रुसंमुख उभें राहून जे वीर धारातीर्थीं प्राण देतात, ते सूर्यमंडळास भेदून ब्रह्मलोकास जातात असें शास्त्रांत सांगितलें आहे. अशा प्रकारचें वर्णन संस्कृतांत ठिकठिकाणीं आढळतें.—(१) विपक्षशस्त्रक्षपणैः पुनः पुनः क्षताखिलग्रंथि निजास्थिपंजरम् । चकार चंडद्युतिमंडलोदरे सुखप्रवेशार्थमिवापरो भटः ॥ (२) द्वाविमौ पुरुषव्याघ्र सूर्यमंडलभेदिनौ । परिव्राड्योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ॥

शोक सांडूनी परता । भजें कांता सद्भक्ती. ॥ २७ ॥ दुष्ट सैंधव पापकर्मा । मृत्युलोकीं पावेल सीमा[1] । पश्चिम आक्रमितां सूर्य, नेमा । छेदिलें शीस[2] ऐकसी. ॥ २८ ॥ पार्थप्रतापाची करणी । विदित असे तुझ्या कर्णीं । शोक सांडूनी अंतःकरणीं । सुखानुभवीं सभाग्य. ॥ २९ ॥ भगवंती उत्तरा देवी । पुत्र जन्मेल प्रतापरवी । सांगों विसरला[3] व्यास कवी । परी म्यां स्मरण दिधलें. ॥ ३० ॥ महाभागवत जगा नौका । पैंर[4] भवाब्धी करी लोकां । वंशीं लावोनी पताका । उद्धरील कुळ विश्वाचें'. ॥ ३१ ॥ असो, संबोखोनी भगिनी । शांतविली याज्ञसेनी । आज्ञा घेवोनी चक्रपाणी । पार्थाप्रती पातला. ॥ ३२ ॥ जैसा दीप अंतर्गृहीं । प्रकाश करुनी लवलाहीं । द्वारदेशीं लावोनि तेंही । करी सोज्वळ तमातें[5]. ॥ ३३ ॥ तयापरी श्रीअनंतें । शांतवोनी पांडवांतें । निद्रे धाडुनी समस्तांतें । जिष्णु सेना ऊठवी. ॥ ३४ ॥ रमाकुचाग्रीं जे का पाणी[6] । स्पर्शतां निवे जगत्स्वामिणी । तया करीं श्रीचक्रपाणी । पाणी धरी पार्थाचा. ॥ ३५ ॥ भक्तजनाची आवडी भारी । सांडणें[7] करी तनूचें वरी । दासचरणा दुःखलहरी । स्पर्शों नेदी सर्वथा. ॥ ३६ ॥ कर्पूरदीपिका अग्रभागीं । शय्यासना पातला वेगीं । परिचारिका कोमलांगी । उपभोगीं दाटल्या. ॥३७॥ अत्यंत रमणीक शय्यासदन । जाणों धनिकाचें कामभुवन । सुगंध द्रव्य, पराग घन । दिशा अवंतू[8] धांवती. ॥ ३८ ॥ मंडल घालोनी शुभलक्षण । केलें कुशास्तरण समसमान । लाह्या, रत्नें, गंधें, सुमनें । शेजे थाट दाटली. ॥ ३९॥ कनककुंभ पूर्ण जीवनीं । त्रिंबकबळी[9] विधानीं । संपादिले वेदोक्त. ॥ ४० ॥ स्वहस्तें अळंकार, चंदन, । फाल्गुना वोपी मधुसूदन । उपहार दिव्य मिष्टान्न । करीं[10] तांबूला निवेदी. ॥ ४१ ॥ शयनीं पहुडूनियां[11] पार्था । द्वारीं रक्षण ठेविलें दूता । बंदोबस्त करुनी भोंवता । निघे सद्मासी श्रीकृष्ण. ॥ ४२ ॥ दारुक[12] भक्तराज सांगातें । जैसें सूर्यासवें किरण भासतें । वेगळीक[13] पुष्प परिमळातें । नोहे, ऐक्यता[14] ज्यापरी. ॥ ४३ ॥ तयापरी भक्तभगवंत । शय्यासना पातला

१. शेवट, अंत. २. शिर, डोकें. ३. ओंव्या ३०-३१ यांस मूळांत आधार नाहीं. 'उत्तरेचें शांतवन कर' असें कृष्णानें द्रौपदीस सांगितलें–असें वर्णन मूळांत आहे. (अध्याय ७८।३९ पहा) व्यासकवि सांगण्यास विसरले, तें आपण सांगितलें आहे,–असे उद्गार नरहरीप्रमाणें मुक्तेश्वरांनींही एकदोन ठिकाणीं काढलेले आहेत. ४. संसारसागरापलीकडे. ५. अंधकारास. ६. हात. ७. त्याग, ओंवाळून टाकणें. ८. बोलावूं. ९. त्र्यंबकनामक बलीची पूजा करून, तो बळी कृष्णानें अर्जुनास उपाहारार्थ दिला (अध्याय ७९।४). १०. हातांत. ११. निजवून, निजावयास सांगून. १२. कृष्णाचा सारथि. १३. निराळेपणा, विभक्तत्व. १४. मागें पृ० १७, टी० ९ पहा.

त्वरित । विश्रामतां इंदिराकांत । पार्थप्रतिज्ञादुश्चितू. ॥ ४४ ॥ संतप्त मानस मुरारी । तर्क तर्की विविधा परी । रोषें प्रतापें मधुरोत्तरीं । दारुकातें अनुवादे. ॥ ४५ ॥ म्हणे, 'फाल्गुनें प्रतिज्ञापण । केला दुःसह महाकठिण । सिद्धी पावतां घोर दारुण । जो अवघड सुरेशा. ॥ ४६ ॥ द्रोणें सैंधव घातला पाठी । महावीराची निबिड मिठी । काळही न सके पाहों दिठी । यक्ष, राक्षस, सुरही. ॥ ४७ ॥ तरी मी दारुका! समरांगणीं । विगत करीन अकरा अक्षौहिणी । कर्णशल्यादि महामानी । दुर्योधना निवटीन. ॥ ४८ ॥ अद्भुत विक्रम अति दारुण । उदईक पाहसी सूता! जाण । भास्कर असतां वर्तमान । सैंधवशीस खंडीन.' ॥ ४९ ॥ संतप्तमान सर्व गात्रें । दारुकातें बोले वक्रें । म्हणे, 'माझीं जयस्वी शस्त्रें । वृथा कोण्हा करवितीं? ॥ ५० ॥ अक्षयी रथ बालार्ककिरणी । खेवण्या[२] जडल्या रत्नश्रेणी । पताका तेळपती[३] दामिनीमानी । गरुडध्वज सुशोभा. ॥ ५१ ॥ जे जयाशेची सफळ खाणी । ऐश्वर्याची पूर्ण भरणी । शोभासदन रणांगणीं । सुखकारक स्वामीतें. ॥ ५२ ॥ तो सैंजोगोनी[४] दिव्यरथ । विश्वकर्म्याचे वारु दत्त । जुंतिजे जे का बळोन्नत । वेगें वातासारिखे. ॥ ५३ ॥ माझी कौमोदकी दिव्य गदा । रिपुमर्दना उदित[५] सदा । सुदर्शनचक्र असुरमदा । सोज्वळ करी सर्वदा ॥ ५४ ॥ सारंगधनु विशाळ शक्ती । शरयुक्त तूणीर काळघाती । सांभाळोनी घालिजे रथीं । आयुधठेवा[६] सर्वही. ॥ ५५ ॥ अर्णवजनित पांचजन्यू । वृषभ शरें (?) स्फुरितां घनू । तुवां घेवोनी शीघ्र स्यंदनू । वातवेगें पाविजे. ॥ ५६ ॥ सूर्य असतां प्रगट व्योमीं । सैंधवशीस पाडीन भूमी । आड रिघतां षड्‌थी नामी[७] । काळधामीं वधीन. ॥ ५७ ॥ पार्थ माझा जिवलग प्राण । त्याविण अप्रीत[८] सर्वही जण । रमा रमणी जगत्स्वामीण । नाहीं चाड[९] तियेची. ॥ ५८ ॥ इष्टमैत्र, सुहृद, सुत, । धन, संपदा, ऐश्वर्यजात[१०] । अनावडी[११] सर्व पदार्थ । सखा पार्थ मज प्रिय.' ॥ ५९ ॥ दारुक म्हणे 'जगन्नाथा! । कायसी सैंधवाची व्यथा[१२] । इच्छामात्र भुवनचलथा[१३] । सृजूनियां निवटिसी. ॥ ६० ॥ तूं परमात्मा, परमेश्वर, । मायानियंता, सर्वेश्वर, । अपार-

---

१. कोंदणास. २. चकाकती, झळाळती. ३. वीजेप्रमाणें. ४. तयार करून, रथास घोडे जोडून. (संजोगणें=संयोगणें). ५. तयार, सिद्ध. ६. शस्त्रास्त्रांचें भांडार. ७. नामांकित, मोठे. ८. अप्रिय. ९. पर्वा, आवड. १०. नाना प्रकारचें ऐश्वर्य. ११. अप्रिय, न आवडणारे. १२. काळजी. येथें 'कथा' असा पाठ असता, तर बरें झालें असतें. १३. विश्वांच्या उतरंडी.

पार परमेश्वर । जाणोनी ध्यानीं निमग्न. ॥ ६१ ॥ ब्रह्मादिकां न कळे करणी । शेष वर्णितां भागल्या वाणी । तूं ऐश्वर्यकैवल्यदानी । भक्ताभिमानी कृपाळू. ॥ ६२ ॥ ऐशिया स्वामी! त्रिजगत्पती!। जाहलासी पार्थाचा सारथी । जयद्रथशीस पार्थ हातीं । पाडील, संशय कायसा?' ॥ ६३ ॥ येरीकडे [1]अवस्थानीं । स्वप्नीं फाल्गुन विव्हळ मनीं । दुर्घट प्रतिज्ञा आठवोनी । संतप्त दुःखें घाबिरा. ॥ ६४ ॥ म्हणे, 'माधवा! मधुसूदना!। मुकुंदा! कृष्णा! [2]द्विजकेतना!। मारजनका! नारायणा!। रमारमणा! श्रीमूर्ती! ॥ ६५॥ अच्युता! अनंता! धरापती!। अवनीधरा! अमोघशक्ती!। [विमलकीर्ती!सदयवृत्ती!] रक्षीं [3]आकांतीं केशवा!' ॥ ६६ ॥ हांसोनी बोले रमारमण । 'पाशुपत महाज्वलीन । ज्याचेनी योगें गिरिजारमण। दानवश्रेणी मर्दिल्या.' ॥ ६७ ॥ ऐसा स्तुतिवाद स्वप्नांतरीं । करितां, प्रगटे दानवारी । पार्थ आनंदोनी प्रीती करीं । आसन कृष्णा वोपिलें. ॥ ६८ ॥ मधुर रवें अब्जपाणी । अर्जुना बुजावी सौख्यदानी । म्हणे, 'सुज्ञा! खेदभरणीं । सौभद्रातें पावसी?' ॥ ६९ ॥ येरू वदे 'जगन्नाथा!। म्यां सोडिली त्याची चिंता। दुर्घटपणाची हृदयीं प्रतिज्ञा। पावे सिद्धी कैसेनी? ॥७०॥ एकादश चमूची भरणी । माजी वीर प्रतापतरणी । विद्यासागर आचार्य गुणी । पृष्ठी सैंधवा सूदलें. ॥ ७१ ॥ म्यां तों प्रतिज्ञा स्फुरली वदनीं । अस्ता न पावतां देव तरणी । जयद्रथ धाडीन काळसदनीं। अन्यथा होतां देहांतू. ॥ ७२ ॥ हेची चिंता सारंगपाणी!। हृदयीं वावरे [6]दुःखदानी । तवाश्रयें श्लाघ्यता मानी । दुष्करनेमा स्फुरिलें.' ॥ ७३ ॥ 'तें शस्त्र लाधलें तूतें प्रौढ । सैंधवमारणा कायसी कोड?। ध्यानीं धरुनी चंद्रचूड । प्रसन्न होई तयातें.' ॥ ७४ ॥ चमत्कारुनी धनंजय । शुची मानसें स्पर्शिती तोय । आसन घालोनी महावर्य । चिंतिले पाय शिवाचे. ॥ ७५ ॥ वैष्णवी माया अघटित घन । त्यामाजी नवल दाविलें कृष्ण । [7]ब्राह्मीमुहूर्त शुभलक्षण । उत्थान केलें उभयतां. ॥ ७६ ॥ कोमळ पाणी फाल्गुनाचा । कृष्णें धरुनी आवडी साचा । मार्ग क्रमितां उत्तरेचा । हिमालया देखिलें. ॥ ७७ ॥ रम्य पर्वत रजतवर्णी । शोभायमान [8]विटपींनीं । फळें, पुष्पें, विविध किरणीं । मघमघिती सुवासें. ॥ ७८ ॥ हेमपक्षी कूजती गहन। गंधर्वांची तुकविती मान। चतुष्पदादिश्वापदगण । स्वेच्छानंदें क्रीडती. ॥ ७९ ॥ नव रत्नाची वि-

१. राहण्याच्या ठिकाणीं, शिबिरांत. २. गरुडध्वजा! ३. संकटांत. ४. पुष्कळ शोक केलास, तरी अभिमन्यु प्राप्त होईल काय?—हा भावार्थ. ५. पाठीशीं घातलें, आश्रय दिला. ६. दुःखदायक. ७. रात्रीच्या चौथ्या प्रहरांतील मुहूर्त. ८. वृक्षांनीं.

चित्र खाणी । वोप[1] देती शृंगारवनीं । यक्षगंधर्वकिन्नरगानीं । नृत्यांगना नर्तती. ॥ ८० ॥ रत्नसरोवरें रुक्मकमळीं । झंकारसुस्वर अळिकुळीं[2] । देवतटिनी तुंबळ जळीं । प्रवाह वाहे खळखळा. ॥ ८१ ॥ त्वरमाण जातां उभय कृष्ण । जाणों लक्ष्मीनें केलें पेणें[3] । [कीं तेथ ये दर्शनाकारणें] । शिवसखा ह्मणोनी. ॥ ८२ ॥ तेथोनी पुढां गिरि कैलास । देखिला निर्मळ स्वप्रकाश । नाना हिरियांचा वोतिला रस । किंवा राशी रजताची; ॥ ८३ ॥ ना तो सहस्र इंदूंचा मेळा । घोळुनी एकत्र केले गोळा । कीं क्षीरसिंधु मथोनी सगळा । ठेविला भेळें[4] लोण्याचा. ॥ ८४॥ शोभायमान प्रकाशरासी । उणें त्रिभुवन तुळितां त्यासी । देवाधिदेव व्योमकेशी । वसे जेथें विश्वात्मा. ॥ ८५ ॥ मध्यभागीं रम्य शिखरीं । आसनारूढ शूळधारी । सहस्र सूर्यांची तेजें थोरी । उणी दिसे त्यांपुढें. ॥ ८६ ॥ सुंदर तनू कर्पूरगौर । भाळीं विराजे रंजनीश्वर[5] । जटाजूट महारुचिर । वसे गंगा ते ठाई. ॥ ८७ ॥ पंचवक्त्र, दश भुजा, । वामीं मिरवे शैलात्मजा । भस्मधूलित, रुद्राक्ष वोजा । माळा कंठीं विराजे. ॥ ८८ ॥ गजचर्म, व्याघ्रांबर । आयुधें युक्त राजित[6] कर । योगासनीं सर्वेश्वर । प्रसन्नमान बैसला. ॥ ८९ ॥ भोंवते ऋषिसिद्धांचे पाळे[7] । जैसे रवीसवें किरणमेळे । गीतवाद्यआलापकीळें । गंधर्व गुणी रंजिती. ॥ ९० ॥ साठ सहस्र गणपाळ । पुढें उभे प्रदीप्तकीळ । करांबुजीं लोहाच्या अर्गळ । विद्युत्प्राय झमकती. ॥ ९१ ॥ बाण, रावण, चंडीश, शौर्य, । नंदी, भृंगी, जटालय, । गणां मुख्य गणपती वर्य । सेवे विनयें तिष्ठती. ॥९२॥ नवनिधी[8], अष्टमहासिद्धी[9], । जोडुनी पाणी उभ्या संनिधी[10] । धनाध्यक्ष ऐश्वर्यसिद्धी । पुढें उभ्या नम्रत्वें. ॥९३॥ ऐसिया विभवें कपर्दी, । शंभु, पिनाकी, अचळवृद्धी । मृड, महेश, सोज्वळबुद्धी । पुरारातिं[11] देखिला. ॥९४॥ प्रणम्य करुनी उभयतां । पुढें उभे जोडुनी हस्तां । हर्षानंद पार्वतीकांता । उचंबळे मानसीं. ॥ ९५ ॥ प्रसन्न मानसें मधुरोक्ती । स्वागत केलें उभयांप्रती । वदे, 'दर्शनें निवालों चित्तीं । कार्य[12] आगमना[12] निवेदीं[12]. ॥ ९६ ॥ तें

---

१. तेज, शोभा. २. भ्रमरसमुदायांत. ३. मुक्काम. ४. मोठा गोळा, ढेप. ५. चंद्र. ६. विराजित, शोभायमान. ७. समुदाय. ८. 'महापद्मश्च पद्मश्च शंखो मकरकच्छपौ । मुकुंदकुंदनीलाश्च खर्वश्च निधयो नव'—हे कुबेराचे नऊ निधी (खजिने). ९. 'अणिमा लघिमा प्राप्तिः प्राकाम्यं महिमा तथा । ईशित्वं च वशित्वं च तथा कायावसायिता ॥' ह्या अष्टमहासिद्धी. १०. जवळ. ११. त्रिपुरांतक. १२. येण्याचें कारण सांगा.

कार्य पावलें सिद्धी । ऐसें मानिजे निश्चयबुद्धी । नरनारायण[1] अवतारसंधी । देवकार्या मी जाणें. ॥ ९७ ॥ तुम्हां चिंतिल्या अर्थ घन । त्यासी आणीक[2] करूं शके कोण ? । इच्छित कार्य सांगिजे पूर्ण । सिद्ध करीन सर्वथा.' ॥ ९८॥ शिवमुखींची ऐकोनी वाणी । नमन करोनी, जोडूनी पाणी । पार्थ स्तवी शूळपाणी । परमानंदेंकरूनी. ॥ ९९ ॥ 'नमो भवाय, रुद्राय, । नमो वरदाय, शर्वाय, । महादेवाय, भीमाय, । त्र्यंबकाय, नमो नमो. ॥ १०० ॥ ईश्वराय, मखघ्नाय, । पिनाकिने, नीलग्रीवाय, । लोहिताक्षाय, धूम्राय, । पशुपालाय, नमो नमो. ॥ १०१ ॥ वृषभध्वजाय, पिंगाय, । ब्रह्मवक्त्राय, शिवाय । [स्मरपुरदहनाय, हराय]। अंबिकापतये, नमो नमो. ॥ १०२ ॥ नित्यनीलशिखंडाय, । तप्तमानापमुंडाय,। हिरण्यवर्णाय, उग्राय, । शांभवाय, नमो नमो.'॥ १०३॥ ऐसी शतरुद्रनामावळीमाळा । स्तवितां तोषे जाश्वनीळा । हृदयीं धरुनी घनसांवळा । 'पुरे पुरे' वदतसे. ॥ १०४ ॥ 'तुज मज भेदाभेद पाहीं । स्वप्नांतरीं नाढळे कांहीं । कार्याकारणें व्यतिरेकदेही । लीलाविग्रहा घेतसों. ॥ १०५ ॥ तेथ उपचार आणि स्तवन । कोण्हा कोणास करिजे ? जाण । कौतुकें वाढविशी मान । मीतूंपण एकची. ॥ १०६ ॥ काय इच्छा ? करिजे आज्ञा' । श्रीहरी वदे वाक्यसंज्ञा । 'अर्जुनें स्फुरिली प्रतिज्ञा । सिद्धी नेई दयाळा!' । ॥ १०७ ॥ हर्षयुक्त बोले पशुपती । 'त्याची म्यां योजिली पूर्वीच शांती । पाशुपत वोपीं[3] पार्थाप्रती । धरणीभार हरावया. ॥ १०८ ॥ अस्त्रप्रभावें दैत्यश्रेणी । म्यां मर्दिल्या समरांगणीं । सृष्टिसंहार प्रळयवन्ही । शमना अस्त्र असेना. ॥ १०९ ॥ अमोघ असतां, जागतां हृदयीं । जयाशा दूर न वचे कांहीं । अस्त्रराज सिद्ध प्रदेहीं । असतां चिंता कायसी ?' ॥ ११० ॥ ऐसें वदोनी पुराराती । पार्था उपदेशी पुनरावृत्ती । मस्तक स्पर्शोनी वरद हस्तीं । 'जिंकिजे' म्हणे 'शत्रूतें.' ॥ १११ ॥ तव तेची काळीं नवलाव । शतरुद्र पैं महादेव । भुजंगें[4] जाहला अभिनव । तेजें दिशा लोपल्या. ॥ ११२ ॥ विषउल्बण[5] अग्निज्वाळा । भेदोनी गेल्या दिग्मंडळा । विस्मित पार्थ, घनसांवळा, । स्तवोनी करी शांतता. ॥ ११३ ॥ प्रसन्नमान होवोनी रूप । दिव्य शर,

---

१. स्वायंभुव मन्वंतरांत धर्मनामक ऋषीला मूर्तिनामक स्त्रीपासून दोन पुत्र झाले, त्यांचीं नांवें नर व नारायण अशीं होतीं. हे दोघेही विष्णूच्या अंशानें जन्मले होते. पुढें हे नर व नारायण अनुक्रमें अर्जुन व कृष्ण ह्या रूपानें पृथ्वीवर अवतरले, अशी कथा आहे. २. अन्यथा. आणीक करणें=फिरविणें, नाहीसें करणें. ३. पाशुपतास्त्र मीं अर्जुनास पूर्वींच दिलें आहे. (मुक्तेश्वर–वनपर्व–अध्याय ४ पहा). ४. सर्प, साप. ५. विषपूरित. उल्वण=पुष्कळ.

अक्षयी चाप, । फाल्गुना वोपितां सक्रप । घेवोनी शिरसा [1]वंदिलें. ॥ ११४ ॥ स्तवनीं स्तवोनी वृषध्वजा । मस्तक न्यासिला पादांबुजा । आज्ञा मागोनी महाराजा । शिबिराप्रती पातले. ॥ ११५ ॥ [2]दारुकेसी संवाद गोष्टी । करी तैसाची जगजेठी । विस्मयानंदें वीर किरीटी । जागृतीतें पावला. ॥ ११६ ॥ तंव मंत्रोच्चारआवृत्ती । पढतां बैसला सावधमती । फुल्ललोचन हर्षचित्ती । म्हणे, 'हे करणी कृष्णाची. ॥ ११७ ॥ तो विश्वात्मा, विश्वंभर । विश्वाधीश, विनीतसुर, । विधिहर [3]विदूषणें नेती पार । [4]इंदीवरदळलोचना. ॥ ११८ ॥ नीरदश्याम राजिततनू । नित्य नूतन कीर्ति घनू । निःसंग [5]अमळ भानू । भक्तप्रिय सुखदाता. ॥ ११९ ॥ ऐसा असतां माझिये पाठी । कायसी संग्रामाची गोष्टी ? । जयद्रथशिर पृथ्वीतटीं । [6]असतां रवी, पाडीन.' ॥ १२० ॥ प्राप्त जाहला प्रातःसमयो । स्वल्प नव्हे साच [7]प्रमेयो । चित्तीं स्मरोनी कृष्णपायो । करी गायन सद्भक्ती. ॥ १२१ ॥ असो पुढां तेंची कथन । भीमराजकृपेकरून । नरहर मोरेश्वर जाण । निवेदीत श्रोतियां. १२२ ॥

---

[8]अध्याय पंधरावा.

संजय म्हणे, 'ऐश्वर्यसिंधू! । उदया येतां [9]खगेंद्रबंधू । हर्ष पावोनी करिती शब्दू । मयूर[10]तीरं उल्हासें ॥ १ ॥ तेणें [11]चीयिरें जालें भ्रमरा । रजनीचरीं सोडिलें थारा । [12]उडुगणें मानोनी दरारा । आच्छादिती मुखातें. ॥ २ ॥ पुष्पवाटिकासह पद्मिणी । मंद अधर स्फुरिती गुणी । परागसंघ भरले गगनीं । [13]सांउमा सूर्या आवडी. ॥ ३ ॥ पातला भास्कराचें ठाण । [14]सोधकीं शंख [15]वाहिले घन । दिशादेवी सोज्वळमान । सरे मागें तमवृद्धी. ॥ ४ ॥ [16]त्रिअंबक

---

१. येथें मूळांतील बराच भाग कवीनें गाळिला आहे (अध्याय ८१ पहा). २. हा कृष्णाचा सारथी. ह्याचा मुलगा सुमती. हा प्रद्युम्नाचा सारथी होता ('दारुकाचा पुत्र सुमती । प्रद्युम्नाचा तो सारथी । मुक्तेश्वर–वनपर्व अ० ३।२९). यावरून दारुकाचे वंशज यादवांकडे वंशपरंपरा सारथ्याचा धंदा करीत असत, असें दिसतें. ३. पापें, अपराध. ४. कमलपत्रनेत्रा. ५. पवित्र. ६. सूर्यास्त होण्यापूर्वी. ७. ज्ञान, विषय. ८. ह्या अध्यायांत कवीनें मूळांतील अध्याय ८२–८७ यांतील कथाभाग वर्णिला आहे. ९. अरुण. १०. तीर=एक जातीचा पक्षी. ११. चलनवलन, चांचरेपण, चेव. १२. नक्षत्रांनीं. १३. समोर, सन्मुख. १४. योग्यांनीं. १५. फुंकिले, वाजविले. १६. जगताचा नेत्र (सूर्य). पृथ्वीवर होणारीं बरीं वाईट कृत्यें सूर्य पाहतो, अशी समजूत आहे.

निरंजनीं[1] । उजळतां देव सहस्रकिरणी । द्विजवर[2] उदित अर्घ्यदानीं । स्वकर्मातें सारावया. ॥ ५ ॥ असो; होतां प्रातःसमय । सुत गायक गुणिवर्य । विचित्र वाद्य वाहोनी प्रिय । जागृती भूपा आणिती. ॥ ६ ॥ धर्मराज मंगळगौरी । निद्रिस्त असतां, गायकहारी[3] । पातल्या भूषित दिव्यांबरी । रुक्ममाळा सुशोभा. ॥ ७ ॥ मागध, मधुप, वैताळिक, । सुत, गायक, नट, नर्तक, । वीणा, मृदंग, सारंगी, देख । झणत्कारिती सुस्वरें. ॥ ८ ॥ गंधर्वगायक मधुरतानें । ऐकतां स्तब्ध नदीचीं जीवनें । माजी बिभासभैरवमानें[4] । मोहीत पक्ष्यादि. ॥ ९ ॥ मधुर आलाप कोकिळारवी[5] । उठे, जैसा सरके हवई[6] । भेदी पुरुषची ते ठाईं । म्हणती तनु वारिजे. ॥ १० ॥ ढोल, पणव, झल्लरी, भेरी, । कर्णे, शृंगें, बुरगें, नफेरी, । आडंबर, शंख, दुंदुभी, मोहरी । जागृती कौंतेय पातला. ॥ ११ ॥ सेवकीं नमनें केलीं तोषा । सूत[7], मागध, स्तविती यशा । पुढें युद्धाचिया सौरसा । उठे स्नाना कुरुवर्य. ॥ १२ ॥ स्नानग्रहणाचिये विधी । बळिष्ठ युव कुशळबुद्धी । [करिती उभे राहूनी संधी] । धूत वस्त्रें परिधानें. ॥ १३ ॥ हरिचंदनचर्चित उटी । हेमपदकी माळा कंठीं । सुवर्णकुंभ भरुनी कटीं । उभे तत्पर सेवेतें. ॥ १४ ॥ रुक्मचौरंग तेजःपुंज । वरी आरूढे धर्मराज । सुगंध स्नेहें सुगंधराज- । मर्दन केलें मर्दकीं[8]. ॥ १५ ॥ चौवाचंदन[9], मृगनाभिक[10] । उटणें करुनी नरनायक । सुगंध द्रव्य उष्णोदक । मार्जनविधी सारिली. ॥ १६ ॥ परिधान दिव्य पीतांबर । भाळीं चर्चिलें नव केशर । हरिचंदनमिश्र अंगर[11] । अंगीं उटी रेखिली. ॥ १७ ॥ संध्या, मार्जन, अर्घ्यप्रदान । करुनी जपविसर्जन । होमशाळेमाजी प्रवेशोन । अग्नित्रय[12] वंदिले. ॥ १८ ॥ आवाहन करुनी, आहुती । अर्पण केली परम भक्ती । समारोपण करोनी आरती । देवशाळे प्रवेशे. ॥ १९ ॥ विध्युक्तभावें पूजोनी विधी । सारुनी नेम सोज्वळ बुद्धी । विप्रअर्चनीं आस्ताबुद्धी । हांकारिलें[13] द्विजवर्या. ॥ २० ॥ स्नातक[14], दांत[15], वेदव्रत । अवभृतस्नानीं[16] मूर्धासिक्त । ब्रह्मचर्य, विदुष, व्रतस्थ । सह विद्यार्थी सहस्रशः. ॥ २१ ॥ अठरा शतें मुख्य स्थानीं । इतर

---

१. निरुपाधिकस्थानीं (आकाशांत). २. ब्राह्मणश्रेष्ठ. ३. गवई लोकांचे ताफे. ४. हीं संगीतांतील रागांचीं नांवें. ५. कोकिळसारख्या सुराचे. ६. चंद्रज्योत किंवा सुरनळा. ७. स्तुतिपाठक. ८. आंगास तैलादि लावून चंपी करणारे लोकांनीं. ९. चंदनाची कुटी. १०. कस्तुरी. ११. ही एक चंदनाची जात आहे. १२. गार्हपत्य, आहवनीय व दक्षिण—हे तीन अग्नि. १३. बोलाविलें. १४. स्नातक=सोडमुंज झालेला ब्राह्मण. १५. दांत=तपाचें दुःख सोसणारा ब्राह्मण. १६. अवभृथस्नान=यज्ञसमासीनंतर जें स्नान करितात, तें.

कोण करी गणणी । बैसकातें[1] वोपोनी झणी । अर्घ्यपाद्यें पूजिले. ॥ २२ ॥ स्रेक्[2], चंदन, धूप, दीप, । मधु, सर्पी[3], फळें अमूप । अर्पण करुनियां नृप । घाली दंडवत समस्तां. ॥ २३ ॥ सुदोहा[4], कपिला, सगुण, धेनू । ब्राह्मणा अर्पी कुरुनंदनू । वस्त्रें, पात्रें, जळकुंभ, घनू । वोपी द्विजां आवडी. ॥ २४ ॥ भूरिदक्षिणा[5] एकएका । सुवर्ण निष्क पृथक् पृथक । देवोनियां कुरुनायक । करी[6] भोजन स्वपंक्ती. ॥ २५ ॥ विडे देवोनी समस्तांसी । वस्त्रें स्वीकारी महातोषी । भूषणें भूषित तेजोराशी । मुक्तमाळा स्वकंठीं. ॥ २६ ॥ भृत्यजनांचा भोंवता पाळा । चामरें ढळती सोमकीळा[7] । मागध वर्णिती वंशमाळा । पातला मेळा सभेतें. ॥ २७ ॥ मृदु अस्तरणें[8] इंद्रगोपवर्णी[9] । रुक्मसिंहासनें रत्नवर्णी । जे अर्पिलीं प्रीतीकरुनी । विश्वकर्मा[10] आवडी. ॥ २८ ॥ तया सिंहासनीं विराजमान । बैसला राजा कुरुनंदन । शिरीं छत्र हिमकरमान[11] । मुक्तझल्लरी सतेजें. ॥ २९ ॥ उभयभागीं वीरश्रेणी । शस्त्राभरणीं प्रदीप्त किरणीं । पुढें विनयें वेत्रपाणी[12] । रुक्मदंडी साजिरे. ॥ ३० ॥ मागध वर्णिती ब्रीदावळी । गुणिजन आलाप वाद्यमेळीं । जाणों अमृताची साउली । निवे सदा हृत्पद्मीं. ॥ ३१ ॥ नाकपृष्ठीं ऐश्वर्यबीज । तैसा शोभला धर्मराज । तंव सेना होवोनियां सज्ज । दर्शना नृपा पातले. ॥ ३२ ॥ गजाकिंकाट वाद्यध्वनी । [13]नेमीगर्जना त्यामाजी दुणी । अश्वघोष, खुरघोष, मेदिनी । कंपायमान थरारी.॥३३॥ पृथक् पृथक् सेनाभार । सन्नद्धबद्ध प्रतापवीर । येतां नमना नामोच्चार । वेत्र[14]पाणी जाणविती. ॥ ३४ ॥ मधुररवें[15] गौरवमान । समस्तां तोषी कुरुनंदन । तंव **वि**राट, **द्रु**पद, **धृ**ष्टद्युम्न । **भी**मसेन प्रतापी; ॥ ३५ ॥ **धृ**ष्टकेतु, **शि**खंडी, **चे**दिप, । **मा**द्रीतनुज वन्हिरूप, । **चे**कितान, **के**कयनृप । **द्रौ**पदीपुत्रादि पातले. ॥ ३६ ॥ सन्मानूनियां **यु**धिष्ठिरें । आसनीं बैसविलें आदरें । ऐसियामाजी **या**दवेश्वरें । येणें केलें सभेतें. ॥३७॥ परमानंद **ध**र्मराजा । स्वागत करुनी **अ**धोक्षजा । वरासन[16] अर्पोनियां वोजां[17] । केली पूजा विध्युक्त[18].॥३८॥ विनयें जोडुनी कृतांजळी । स्तविता जाहला वाक्यकमळीं । 'हरी! **मु**कुंदा!

१. बैठकांना, आसनांना. २. फुलांची माळ. ३. तूप. ४. पुष्कळ दूध देणाऱ्या. ५. विपुल दक्षणा. ६. 'करवी' असा पाठ अर्थानुरोधानें असावयास पाहिजे. ७. चंद्रप्रभेची, चांदण्यासारखी शुभ्र. ८. आंथरलेल्या गाद्या वगैरे. ९. इंद्रगोप नामक किड्याच्या रंगाप्रमाणें लालभडक. १०. विश्वकर्म्यानें. ११. चंद्रासारखें शुभ्र, तेजस्वी व वाटोळें. १२. छडीदार. १३. रथचक्रांचा गडगडाट. १४. भालदार. १५. गोड शब्दांनीं. १६. श्रेष्ठासन, सिंहासन. १७. काळजीपूर्वक. १८. अध्याय ८२ पहा.

वनमाळी ! । माळीसुमाळीअंतका ! ॥ ३९ ॥ देवदेवेश ! सनातना ! । विष्णु ! जिष्णु ! मधुसूदना ! । सारंगपाणी ! हरी ! कृष्णा ! । उरुविक्रमा ! त्रिमूर्ती! ॥ ४० ॥ अच्युता ! अनंता ! रमाकांता ! । त्रिविक्रमा ! वामना ! कंसहंता ! । भक्तपाळका ! भगवंता ! । विज्ञापना परिसिजे. ॥ ४१ ॥ अर्जुनें स्फुरिला प्रतिज्ञापण । तोतंव दुःसह महाकठिण । सेनेसह षड्रथी घन । जीवोदार रक्षणीं. ॥ ४२ ॥ ऐसियाच्या करितां घाता । अवकाश नाहीं रमाकांता ! । कौरवसमरीं बुडालों आतां । आश्रयनौका हरी तूं. ॥ ४३ ॥ हा काळवरी दुःख क्लेश । देखिला नाहीं सुखाचा लेश । आजी पातला काळदिवस । समाप्तीतें न्यावया. ॥ ४४ ॥ यांहीमाजी भरंवसा जीवा । तूं सारथी आमुतें देवा ! । मावां अमित दुःखार्णवा । विलया नेला अच्युता ! ॥ ४५ ॥ अनाथनाथ ब्रीदावळी । सत्य करावी वनमाळी ! । शत्रुजय मेळवोनी धुळी । फेडी काजळी चिंतांची.' ॥ ४६ ॥ जळदप्राय निश्चित शब्दू । हांसोनी बोले मंदमंदू । म्हणे, 'जाणत्या ! खेदविषदू । करणें तूतें अयोग्य. ॥ ४७ ॥ पार्थासमान धनुर्धारी । नाहीं वीर अवनीवरी । ज्याचिया युद्धा त्रिपुरारी । तोषोनी अर्पी पाशुपत. ॥ ४८ ॥ अस्त्रप्रभव सांडी कोटी । निवातकवच प्रेरिले हटी । हर्षित सुरेंद्र होवोनी पोटीं । किरीट वोपी पार्थातें. ॥ ४९ ॥ अस्त्र[कुशल], अमोघवीर्य । जितक्लमा, अचळधैर्य । तरुण, तरणिप्रतापवर्य । सिंह, दाक्षण्यतेजस्वी. ॥ ५० ॥ आणि मी सारथी त्रिजगत्पती । तृणप्राय कौरव भस्म क्षिती । पापकर्मा सौभद्रघाती । पडिलें शीस ऐकसी. ॥ ५१ ॥ प्रभिन्न तनु, व्यतिरेक शीस । गीधगोमायु भक्षिती मांस । पाठीसी सूदतां दिवौकस । शिक्षा करणें तयांतें. ॥ ५२ ॥ जयद्रथ गेला काळसदना ! निश्चय मानीं कुरुभूषणा ! । शोक त्यागुनी दुर्वासना । स्वस्थ राहें, श्रीमंता !' । ॥ ५३ ॥ श्रीकृष्णवाक्यामृतघन । कृपातुषारें वर्षती जीवन । धार्मिक धर्म क्षिती जाण । निवांत राहे स्वस्थता. ॥ ५४ ॥ तंव तो प्रतापाचा राणा । जेणें खांडव वोपिलें दाना । आरोग्य करुनी हुताशना । संरक्षी मयातें. ॥ ५५ ॥

---

१. जंबुमाळीच्या घातका! २ जीवावर उदार, आपल्या प्राणाची पर्वा न करणारे. ३. येथें किरातार्जुनीय कथानकावर कटाक्ष आहे. ४. निवातकवच नांवाचे तीन कोटी राक्षस होते, त्यांस अर्जुनानें मारिलें. (मुक्तेश्वर–वनपर्व–अध्याय १० ओंव्या ८६–९५ पहा). ५. आग्रही, नेटानें झुंजणारे. चिकाटीचे वीर. ६. बालसूर्याप्रमाणें. ७. गिधाडें व कोल्हे. ८. देवांनीं पाठीशीं घातला (आश्रय दिला) तरी. ९. हा शब्द श्लिष्ट आहे. जीवन=(१) पाणी; (२) चेतना, उत्साह, १०. खांडववन. (मुक्तेश्वरकृत–आदिपर्व–अध्याय ४९ पहा). ११. अग्नीस.

तो ऐश्वर्याचा पूर्ण पुतळा। जयश्रीचा वोतींव गोळा। सुहृद नृपाचा सवें मेळा। येता जाहला सभेतें. ॥ ५६ ॥ अर्जुन देखोनियां नयनीं। समस्त आल्हाद थोर मनीं। अभ्युत्थानीं नृपाच्या श्रेणी। सत्व धार्मिक कुरुवर्य. ॥ ५७ ॥ प्रसन्न मानसें कपिध्वजें। वंदिलें अग्रजपादांबुजें। स्नेहें आलिंगोनी धर्मराजें। अवघ्राणिलें मौळातें. ॥ ५८ ॥ बैसवोनी आसनानिकटीं। करी हर्षसंवादगोष्टी। म्हणे, 'बापा! प्रतापजेठी। प्रसन्नमुखी विराजें'. ॥ ५९ ॥ येरू वदे, 'श्रीकृष्णच्छाया। महदाश्चर्य देखिलें राया!। रात्रवृत्तांत निवेदिली पायां। विस्मयतोषें सर्वांतें. ॥ ६० ॥ हर्ष पावोनी धर्मराज। म्हणे, 'साहाकारी अधोक्षज। भक्तपाळक, [अरितरुगज]। करुणाकर, दीनबंधू. ॥ ६१ ॥ अनाथनाथ, अब्जपाणी। अनिवार सर्वां आनंददानीं। अभयदाता, ऐश्वर्यखाणी। कर्ता काय नव्हे पां? ॥ ६२ ॥ कार्य, कारण, कर्तव्यता। विदित सर्व रमाकांता। प्रसन्न करुनी कैलासनाथा। यश पार्था वोपिलें.' ॥ ६३ ॥ 'साधु! साधु!' हा या शब्दीं। पार्था प्रशंसी वीरमांदी। हर्षयुक्त वीरश्री संधी। उठते जाहले संग्रामा. ॥ ६४ ॥ फाल्गुनें प्रणम्य धर्मचरणा। करुनी निघतां, दाटली सेना। देवाधिदेव वैकुंठराणा। सेव्य विधिभवातें; ॥ ६५ ॥ योगी, मुनी, सनकादिकां। ध्यातां ध्यानीं नातुडे जो का। नानाविलासीं जगअंबिका। रंजवी प्रीतीसी कौतुकें; ॥ ६६ ॥ ऐसा समर्थ सर्वेश्वर। भक्तकाजीं वावरे सैर। आवडी उठोनियां सत्वर। सज्जी रथ पार्थाचा. ॥ ६७ ॥ विराजित तेजें बालार्ककिरणीं। तप्तकांचनीं रत्नाभरणीं। पताका तळपती मत्स्यमानी। ध्वजीं कपींद्र विराजे. ॥ ६८ ॥ वाजी जुंतोनियां अभंग। शस्त्रास्त्रमांदी भरले सीगं। धुरे बैसोनी रमारंग। पार्थासन्निध पातला. ॥ ६९ ॥ सूर्यसारथी चतुर अरुण। कीं सुरेंद्र येतां मातली प्रवीण। तेवीं सूतराज इंदिरारमण। करी सारथ्य पार्थाचें. ॥ ७० ॥ सव्यसाची हर्षवर्धन। ब्रह्मवृंदासी करी नमन। येरें जयमंत्र वदोनी पूर्ण। 'जिंकीं' म्हणती 'शत्रूतें.' ॥ ७१ ॥ करोनी स्यंदना प्रदक्षिण। हृदयीं स्मरुनी श्रीकृष्णचरण। 'जय जय' शब्दें नामस्मरण ॥ करुनी, रथीं आरूढे. ॥ ७२ ॥ भेरी, गोमुख, वाजंतरीं। अनेक वाद्यां

१. धर्मराजाच्या पदकमळांस. २. हुंगिलें. डोकें हुंगणें—हें प्रेमाचें व वात्सल्याचें चिन्ह आहे. मौळ=शिर, डोकें. ३. स्वप्नांत झालेलें शंकराचें दर्शन व त्यापासून झालेला अस्त्रलाभ इत्यादि वर्तमान. ४. साह्यकर्ता. ५. वीरसमुदाय. ६. सेवा करण्यास योग्य. ७. प्राप्त होत नाहीं. ८. जगन्माता (लक्ष्मी). ९. परिपूर्ण. १०. रथास.

लागल्या हारी । बंदी मागध नामोच्चारीं । श्रीदावळी[1] स्फुरती. ॥ ७३ ॥ मेरु-शिखरीं रविउदय । शोभला तैसा धनंजय । कराग्रीं प्रभिन्न चापवर्य । इंद्र-धनुष्यासारिखें. ॥ ७४ ॥ हरिरश्मी[2] डोलतां हरी । हरी वेगें लोटला समरीं । रथारूढ युयुधान चापकरी । पार्थासन्निध जातसे. ॥ ७५ ॥ जाणों बुध, शुक्र, एके स्थानीं । कीं चंद्र आणि देव तरणी[3] । ना ते श्रीराम, सौमित्र, गुणी । तेवीं उभय शोभले. ॥ ७६ ॥ शकुनलाभ[4] सुचिला पंथीं । वायु अनुकूळ मंदगती । हर्षनिर्भर सुभद्रापती । कृत कार्य मानिलें. ॥ ७७ ॥ तोषोनी सुरेंद्र रिपुकदन । यदुवर्यरमणीस्वसारमण । कुंतिभोजनंदिनीनंदन[5] । बोले वाक्य सात्यकी. ॥ ७८ ॥ म्हणे, 'बापा ! शिनिपुंगवा[6] ! । समान विक्रम तुझा मघवा । धनुर्विद्येचा पूर्ण ठेवा । दुजा प्रद्युम्न जाण पां. ॥ ७९ ॥ अपराजित[7] सर्व मही । अवक्र प्रेमा[8] आमुचे ठायीं । धर्मी व्यतिरेक[9] न वचे कांहीं । रक्षीं धार्मिक जगदात्मा. ॥ ८० ॥ द्रोणाचार्य प्रतापउदधी । धर्मग्रहणीं[10] पाहे संधी । समरांगणीं निगूढ बुद्धी । सांभाळिजे, नरवर्या ! ॥ ८१ ॥ तुझा भरवसा दृढ चित्तीं । मी जात कदनाप्रती । जाहली जयद्रथाची शांती । मनीं[11] निश्चिती, यादवा !' ॥ ८२ ॥ ऐसें वदोनियां वचनीं । दिधली आज्ञा गौरव-मानीं । येरू[12] हर्ष पावोनियां मनीं । धर्मानिकटीं पातला[13]. ॥ ८३ ॥ येरीकडे[14] कौरवमेळीं । स्वकर्म सारुनियां सकळीं । वीरश्रीची धरोनी फळी । संग्रामातें निघाले. ॥ ८४ ॥ कडकडाट सेनाभार । लोटले जैसे नदीचे पूर । शस्त्रअस्त्रें तुकिती सैर । सिंहनाद फोडुनी. ॥ ८५ ॥ पुढें उभा द्रोणाचार्य । जाणों वसंतीं प्रदीप्त सूर्य । तप्तहाटकस्यंदनवर्य[15] । शोभायमान पताकीं. ॥ ८६ ॥ वेदी, कृष्णाजिन, ध्वजिचिन्ह; । सेनेश, बळिष्ठ, महाप्रवीण । प्रभिन्न चाप,

---

१. कीर्ति वर्णन करिती. २. हरी (श्रीकृष्णानें) हरिरश्मी (घोड्याची लगाम) डोलतां (हालवून इशारा करितांच) हरि (रथाचा घोडा) वेगें (मोठ्या वेगानें) समरीं (युद्धांत) लोटला (घुसला)—असा सार्थान्वय. ३. सूर्य. ४. ह्या प्रसंगीं शुभ शकुन झाले, असें मूळांतही आहे (अध्याय ८४ श्लोक २४।२५ पहा). ५. कुंतिभोजराजाच्या कन्येचा (कुंतीचा) पुत्र (अर्जुन). ६. शिनिकुलश्रेष्ठा ! (सात्यकी). मूळांतही हाच शब्द आहे (श्लोक २८). ७. पृथ्वीमध्यें पराभव न पावलेला. ८. निष्कपट प्रेम. ९. अपवाद, उणेपणा. १०. धर्मराजास धरण्यासाठीं. ११. मान, समज. १२. सात्यकी. १३. येथें मूळांतील प्रतिज्ञापर्व संपून जयद्रथवधपर्वास आरंभ होतो. १४. येथें मूळांतील ८७ व्या अध्यायास आरंभ होतो. मूळांतील अध्याय ८५ व ८६ यांतील कथाभाग विशेष महत्वाचा नसल्यामुळें कवीनें तो गाळिला आहे. १५. तप्तसुवर्णासारिखा (झळकणारा) उत्तम रथ.

शरदारुण । **का**ळघाती हस्तकीं. ॥ ८७ ॥ पृथक् पृथक् राजभार । **आ**चार्या नमी शूर । [1]रजीं दाटलें [2]अंबर । सेना दृष्टी कळेना. ॥ ८८ ॥ हृष्टमानसें [3]**भा**रद्वाज । **ज**यद्रथासी वदे गुज । 'तव [4]अनीकिनी तेजःपुंज । वीर शूर संग्रामीं. ॥ ८९ ॥ तव रक्षणा आणीक सेनाभार । [5]दोहा सहस्र दशक अश्वस्वार । साहा [6]अयुत रथवर शूर । [7]दंती चौदा सहस्र. ॥ ९० ॥ दोनी लक्ष वीस सहस्र । पताकी वीर त्यांमाजी मिश्र । [8]युवतरस्वी मंडितशस्त्र । रत्नाभरणीं साजिरे. ॥ ९१ ॥ यांहीवेगळे षड्रथी । धीर, शूर, प्रभिन्नशक्ती । सर्वास्त्रभेदी, कुशळगती । जे **का**ळातें अजिंक्य. ॥ ९२ ॥ **अ**श्वत्थामा, **सो**मदत्ती, **क**र्ण, । चौथा **कृ**पाचार्य, **वृ**षसेन, । '[9]षष्ठम' **श**ल्य बळसंपन्न । रक्षणा तूतें वोपिले. ॥ ९३ ॥ आकाश खचतां करिती स्थिर । समुद्र लोटतां सारती दूर । **पा**र्थासमान एकवीर । धीर शूर प्रतापी. ॥ ९४ ॥ यांहीवेगळे सर्व [10]पार्थिव । तुझ्या रक्षणीं [11]उदित सर्व । व्यूह निर्मितों बहु अपूर्व । जो **वा**सवा असाध्य'. ॥ ९५ ॥ ऐसा **द्रोण** बोलतां वाणी । सेनासज्ज पातला **श**कुनी । सवें रथिवरांची भरणी । तिव्याहत्तर सहस्र. ॥ ९६ ॥ [12]हस्तिरोह प्रतापवान । शिक्षित गज प्रभिन्न घन । त्यांचा अर्धभाग **दु**र्मर्षण । घेवोनी सेना पातला. ॥ ९७ ॥ तया अग्रीं विपुल सेना । **दुः**शासन, **वि**कर्ण, आलेरणा । **सैं**धवरक्षणीं व्यूह निपुणा । **द्रो**णाचार्यें निर्मिले. ॥ ९८ ॥ सप्त योजनें पूर्ववाहिनी । वीस कोस रुंदीची भरणी । षट्कव्यूह सप्तावर्णी । सेना सकळीं सज्जिली. ॥ ९९ ॥ माजी प्रभिन्न **प**द्मव्यूह । [13]पौळी तीन अवघड बहू । संधी निगूढ **सू**चिकाव्यूहू । [14]**स**हस्राक्षा लक्षेना. ॥ १०० ॥ मध्यभागीं अल्पायुषी । **सैं**धव ठेविला सेनाकोषीं । **अं**तकदूत पातला त्यासी । फिरवी ऐसें ऐकिजे. ॥ १०१ ॥ असो ; रक्षणा [15]संधोसंधी । ठेविले वीर निबिड मांदी । जे **का**ळासही लोटती [16]संधी । बाहुविक्रमें माघारे. ॥ १०२ ॥ तीन व्यूह अवघड थोर । जाणे **सौ**भद्र त्याचें नगर । कीं तें **त्रि**पुरासुराचें पुर । एक **ह**रहरी भेदिता; ॥ १०३ ॥ तयापरी अनीकिनीदुर्ग । रक्षणा वोपिले वीर सुभग । [17]**सू**चिकाग्रहारी ऐश्वर्यसीग । **भो**जराज **कृ**तवर्मा. ॥ १०४ ॥ तया-

१. धुळीनें. २. आकाश. ३. द्रोणाचार्य. ४. सैन्य. ५. एक लक्ष (१०,०००×१०=१,००,०००). ६. अयुत=दहा हजार. ७. हत्ती. मूळांतही हीच संख्या दिलेली आहे (अध्याय८७श्लोक१२). ८. नव्या दमाचे व आवेशी. ९. वस्तुतः षष्ठ असें रूप पाहिजे होतें. १०. राजे. ११. तयार, तत्पर. १२. हत्तीवरील योद्धे. १३. तट, भिंती. १४. हजार डोळे ज्याला आहेत अशा इंद्रास सुद्धां. १५. ठिकठिकाणीं. १६. प्रसंग ठेपल्यास. १७. सूचिका व्यूहाच्या तोंडच्या (पुढच्या) फळींत उभा ठाकणारा.

पुढें **कां**बोजराजा । सेना बलिष्ठ फोडिली भुजा । तयानंतरें **ज**ळसंध ध्वजा । उभारोनी दळेंसी. ॥ १०५ ॥ **दुर्योधन** बंधुवर्गेंसी । यांपुढें उभा दळभारेंसी । सतत युद्ध आयुधेंसी । उँल्हाळती[1] शूरत्वें. ॥ १०६ ॥ **शकटद्वारीं द्रोणाचार्य** । महाप्रतापी तेजिष्ठ सूर्य । सदृढदळीं भूपतिवर्य । युद्धालागीं तळपती. ॥१०७॥ सेनासमुद्रीं वीरलहरी । उल्हाळती गगनोदरीं । चतुरंग सेना मत्स्यापरी । महाविक्रमें तेळपती[2]. ॥ १०८ ॥ वाद्यें त्राहटोनी अनेक । सिंहरवें फोडिती हाक । तंव **क**पिध्वज ज्वलित अर्क । देखते जाहले सुशोभा. ॥ १०९ ॥ रौद्र संग्राम अतिदारुण । वीररसाचें सुधापान । श्रोते सज्जनीं अर्तमान । ग्रहण किजे आवडी. ॥ ११० ॥ श्रीगुरु**भी**मराजसुधाकर[3] । कृपारश्मी करितां प्रसर । चातक[4]**नरहरमो**रेश्वर । निवोनी निववी श्रोतयां. ॥ १११ ॥

अध्याय सोळावा.

संजय[5] वदे, "राजसत्तमा ! । **अर्जुन** पावतां संग्रामा । जाणों **अं**तक पातला नेमा । ऐसें वीरीं मानलें. ॥ १ ॥ गडबडोनी नृपमांदी । 'ध्या, ध्या,' शब्दें बोलती संधी । सन्नद्धबंधू[6] लोटला युद्धीं । दुर्मर्षणॅं[7] अग्रता. ॥ २ ॥ श्लाघा वदे प्रफुल्लवाणी । '**स**व्यसाची खिळीन बाणीं । प्रेतासनीं पहुडूनी रणीं । प्रेतमक्षिका वोंगवीं. ॥ ३ ॥ अत्यंत चोज वीरां सकळां । दावीन आजी रणमंडळा'। धनुष्यबाण तुकोनी, दळा । लोटता जाहला सन्मुख. ॥ ४ ॥ तंव तो प्रतापमल्ल **किरीटी** । **दे**वदत्त स्फुरिता जाहला होटीं[8] । हर्ष पावोनियां **ज**गजेठी । **पां**चजन्य वाहिला[9]. ॥ ५ ॥ प्रभिन्न नादें व्यापिल्या दिशा । भयभीत सेना पावली त्रासा । भूतगणा थोर वळसा[10] । मळमूत्र अश्वीं सारिलें. ॥ ६ ॥ क्षीण होवोनी वीरें[11]**श्री**रंग । लक्षिती पळायाचा मार्ग । क्षात्रधर्म स्मरोनी सांग । उदित जाहले युद्धार्थी. ॥ ७ ॥ वाजंत्राची एक घाई । अनेक वाद्यें स्फुरिलीं तिहीं । क्रोधें लोटोनी रणमही । शस्त्रधारीं वर्षले. ॥ ८ ॥ गदा,

---

१. हर्षयुक्त झाले, आनंदानें उडूं लागले. २. शोभती, चकाकती. ह्या ओवींतील 'रूपक' फार सुंदर आहे. असेंच रूपक मुक्तेश्वराच्या कवितेंतही आढळतें. (आदिपर्व–अध्याय ४४ ओंव्या ५३–५४ पहा). ३. सुधाकर=चंद्र. ४. येथें वस्तुतः 'चकोर' पाहिजे होतें. (मागें पृष्ठ २७, टीप ३ पहा.) ५. ह्या अध्यायांत मूळांतील ८८–९३ अध्यायांचा सारांश ग्रथित केलेला आहे. ६. ज्याचे बंधु युद्धाकरितां कंबर बांधून तयार आहेत असा. ७. धृतराष्ट्राच्या ज्ञातपुत्रांपैकीं एक. ८. ओठीं, ओंठानें. ९. फुंकिला. १०. संकट. ११. योद्धे.

परिघ[1], तोमर[1], मुसळें, । लेंहुडी[2], चक्र, शरांचीं जाळें, । शूळ, पट्टे, सांग भाले, । भिंडिमाळा[3] मोकलिल्या. ॥ ९ ॥ हस्तिपीं[4] मौळें ताडोनी तोत्रें[5] । गज, पेलोनी[6] फेकिती शस्त्रें । अश्वारोहें वेगवक्रें । उसळोनी शस्त्रा हाणिती. ॥ १० ॥ रथी लोटोनी स्यंदनातें । शरीरीं[7] बुजिलें **ध**नंजयातें । जाणों पर्वतीं घनाचें भरतें । शस्त्रधारा रिचवती. ॥ ११ ॥ **पा**र्थ प्रतापाचा राणा । बोलता जाहला 'मधुसूदना ! । **मा**धवा ! **मु**कुंदा ! **ना**रायणा ! । **सा**मराजा ! **न**रहरी ! ॥१२॥ पतितोद्धरणा ! दीनबंधू ! । पतितपावना ! कृपासिंधू ! । पतितमारणा ! अक्षयानंदू ! । अघटित माया पैं तुझी. ॥ १३ ॥ **का**ळवश पुरतां अवधी । मुंगी सपक्ष निघतासंधी । दुःसह वन्हीची तेजवृद्धी । पतंगें उड्या घालिती; ॥ १४ ॥ तयापरी **ज**गन्नाथा ! । वीर वैरवाळले[8] माझिया [वरिता] । तरी स्यंदन भिडवी आतां । दुर्मर्षणासन्मुख.' ॥ १५ ॥ ऐकतक्षणीं वातवेगें । रथ लोटितां **र**मारंगें । सुसाटवात सारोनी मागें । सेनेमाजी शिरकले. ॥ १६ ॥ **निं**वातकवचअंतक[9] रोषें । **गां**डीव स्फुरोनी महाघोषें । शर वर्षोनी रौद्र कर्कश । निवारिलें शस्त्रातें. ॥ १७ ॥ मेघपडळ निबिडथाटी । वात भंगी न लगतां त्रुंटी[10] । कीं **शि**शिरऋतु पातल्या पाठी । पर्ण वृक्षा न थारे. ॥ १८ ॥ तयापरी सर्वही शस्त्रें । विगत केलीं **पां**डुपुत्रें । शर सोडिले जपोनी मंत्रें । विद्यातेजें व्यापिले. ॥ १९ ॥ सरसराट अग्निज्वाळा । तैशा विखुरल्या शरौघमाळा । तटतटां खंडुनी वीरमौळा । रुंडें धरा पिटिती. ॥२०॥ मुगुटकुंडलें रुचिर मौळें । उसळोनी अवनी[11] पडती सेळें[12] । जाणों श्रीमंतीं भूलिंगा कमळें । लक्षावधी अर्पिलीं. ॥ २१ ॥ शस्त्रासहित खंडती कर । पादरहित कित्येक वीर । खंडविखंड शरीरें सैर । भूमी इतस्ततः जाहलीं. ॥ २२ ॥ अश्वगजांची चाकोरी । बैसविल्या देहुड पाहारीं । जाणो खचोनी महागिरी । शय्या केल्या भूमिकें. ॥ २३ ॥ कबंधें[13] उठोनी शस्त्रासहित । धावोनी परातें करिती क्षत[14] । भूतगणांचे संघ बहुत । हर्षमान नाचती. ॥२४॥ ऐसा सेनेचा निःपात । जाला राया ! अति अद्भुत । जेवीं उदयो करितां आदित्य । तमाचा नाश ज्यापरी; ॥ २५ ॥ तयापरी विकळ सेना । **पा**र्थक्रोधाची नव्हे गणना । जाणों मध्यान्हीं तेजराणा । तपे सूर्य ज्यापरी. ॥ २६ ॥ **अर्जु**नाकडे

---

१. लोखंडी जाड काठी. २. सोंटे. ३. गोफणी. ४. माहुतांनीं. ५. अंकुशांनीं. ६. तोलांत धरून, सांवरून. ७. आच्छादित केलें. ८. माझ्यावर हल्ला करून आले. ९. अर्जुन. १०. चिपडी, चुटकी. ११. जमिनीवर. १२. वेगानें. १३. मस्तक तुटून गेलें असतांही चलनवलनयुक्त जें धड तें. १४. जखम.

पाहावया दृष्टी । कोण्हा सामर्थ्य नाहीं पोटीं । कासावीस होवोनी पाठी । पळाया मार्ग लक्षिती. ॥ २७ ॥ **फाल्गुन** प्रतापाचा लोटा । **दुर्मर्षण**सेना भ्रष्टुनी, वांटा[१] । लावोनी, शिरकला गज(घ)टा[२] । **दुःशासन** जे ठाई. ॥ २८ ॥ तंव तो गजानीकाचे भारीं । भूषणीं भूषित, चाप करीं । अनेक वाद्य पिटोनी समरीं । **पार्था**प्रती धडकला. ॥ २९ ॥ अंकुश स्पर्शोनियां मौळीं । गज प्रेरिले प्रभिन्नबळी । केली शस्त्रांची साउली । **अर्जुना**वरी प्रतापें. ॥ ३० ॥ येरू कुशळ धनुर्वाडा । शर वर्षोनी तवक गाढा । सहित वीर धडधडा । रुंडें धरे पाडिलीं. ॥ ३१ ॥ जैसीं ताडद्रुमाचीं पक्व फळें । भूमी पडती वातमेळें[३] । तैसीं गजानीकाचीं दळें । बीभत्समान पाडिलीं. ॥ ३२ ॥ खंडविखंड गात्रें पाहीं । रुधिरमय जाली मही । जर्जर होवोनी **पार्थ**घायीं । वांचले वीर निघाले. ॥ ३३ ॥ कार्मुक, शर, अंगुळित्राणें, । चित्रायुधें, विविधवर्णें । नाना भूषणें विराजमान । धरादेवी ढेसेली[४]. ॥ ३४ ॥ दुःशासनसेना करुनी भ्रष्ट । **द्रोणा**नीका[५] पातला सुभट । तंव तो व्यूहद्वारीं सेनासुभट । **मारु**तीप्राय देखिला. ॥ ३५ ॥ विभ्राजमान[६] कांचनरथीं । जाणों उदयाचळीं गभस्ती । तैसिया तेजें सोज्वळकांती । **द्रोणा**चार्य देखिला. ॥ ३६ ॥ श्री**कृष्ण**मतें करुनी नमन । जोडुनी अंजळी बोले वचन । '**पांडु**, **धर्म**राज, श्री**कृष्ण**, । तेवीं तूं मज **गुरु**वर्या ! ॥ ३७ ॥ कल्याण चिंतिजे मातें, जनका ! । युद्ध-सागरीं होवोनी नौका । तव प्रसादें कीर्ती लोका । वाढ जाली, स्वामिया ! ॥ ३८ ॥ दारुण पण न्यावया सिद्धी । मी तव उदित शौर्यबुद्धी । सिद्धी नेइजे कृपानिधी ! । मागणें हेंची, गुरुवर्या ! ॥ ३९ ॥ **अश्वत्थामा**होनी विशेष ! मज देखतां पावसी तोष । तुझिया प्रतापें माझें यश । जगीं मिरवे, स्वामिया । ॥ ४० ॥ त्याचें लालन करिसी प्रीती । तैसेंची मज रक्षीं कृपामूर्ती । तुझिया अभयें सेनेप्रती । रिघोनी **सैं**धवा मारीन. ॥ ४१ ॥ दुष्प्राप्य नेम अतिदारुण ? तव प्रसादें सिद्धी नेणें.' । **द्रोण** वदे स्मितवदनें । 'हें कैसेनी घडे पां ? । ॥ ४२ ॥ मज असतां वर्तमान[७] । कैसें घडे सैंधवहनन[८] ? । माझे आश्रयें ठेवोनी प्राण । उदित युद्धा सर्वही.' ॥ ४३ ॥ ऐसें वदोनी शरासन[९] । सज्जोनी तीव्र सोडिले बाण । सूत,स्यंदन, **श्वे**तवाहन । बुजोनी बाणीं काढिला. ॥ ४४ ॥ **अर्जुन** सरसावोनी धनू । शर सोडिले प्रदीप्त भानू । सुसाटें उतरुनी धरे

---

१. दाणादाण करून. २. हत्तींच्या समुदायांत. ३. वावटळीनें. ४. पूर्णपणें भरली. हाच शब्द पुढें ८१ व्या ओवींत आला आहे. ५. द्रोणाचार्यांच्या सैन्यासमोर. ६. देदीप्यमान, तेजस्वी. ७. मी जिवंत असतां. ८. जयद्रथवध. ९. धनुष्य.

धनू । **द्रो**णचरणा वंदिलें. ॥ ४५ ॥ क्षात्रधर्म स्मरुनी मनीं । क्रोधारूढ **पाक**-शासनी । नव बाण दुर्धर काढुनी । **गुरु**वर्या अर्पिले. ॥ ४६ ॥ खडतरुनी गात्रस्थानीं । रुधिर प्राशिलें तिहीं बाणीं । पुनः संधान करुनी ज्ञणी । धनु हातींचें खंडिलें. ॥ ४७ ॥ असंभ्रांत **भार**द्वाज । शर सोडुनी तेजःपुंज । धनुष्य छेदोनी खंडिलें बीज । शरवृद्धीचें प्रतापें. ॥ ४८ ॥ विस्मय पावोनी **सु**भद्रावर । सज्जोनी **गां**डीव, सोडिले शर । सर्वांग भेदुनी सत्वर । भूमीमाजी विझाले. ॥ ४९ ॥ **पा**र्थविद्येचें लाघव पूर्ण । तूंणीरांतुनी एक बाण । सज्जित धनुषीं षड्गुणें । सोडितां शंत सांत पैं. ॥५०॥ सरकतां पुढें सहस्र जाणा । लागतां अयुताची गणना । ऐसिया वृद्धी **आ**चार्यसेना । भ्रष्ट केली क्षणार्धे. ॥ ५१ ॥ मत्त मांतंग गिरिप्राय । गडगर्जना घनसमुदाय । विचित्र अश्व भूमि पाय । न लाविती विक्रमें. ॥५२॥ रथी, विरथी, पदाती । पडती, जळती बाणघातीं । जिकडे तिकडे शरांच्या पंक्ती । लखलखिती सुसाटें. ॥ ५३ ॥ पद्मतडागीं **हे**मंतकाळीं । पुढें हंसाची जेवीं साउली । तैशा भांली झळकती कीळीं । कीं मेघधारा सोज्वळ. ॥ ५४ ॥ हस्ती, वाजी, पदाती, रथी । सहस्र मिनले मृत्युपंथीं । **पा**र्थप्रतापाची दुर्धर शक्ती । चोज मानिती, महींद्रा ! ॥ ५५ ॥ विगत करूनी सेना पाहीं । **द्रो**णाचार्य भेदिला हृदयीं । विव्हळ होवोनी तये समयीं । अद्रिप्राय डोलला. ॥ ५६ ॥ धैर्यवसना धरुनी रोष । शर कर्कश काळविष । पांच सोडुनी **हृ**षीकेश । हृदयवर्मी ताडिला. ॥ ५७ ॥ दोन दशक एक आगळा । **पा**र्थ ताडिला उतावेळा । तीन अर्पिले वन्हि-ज्वाळा । ध्वजालागीं निघातें. ॥ ५८ ॥ **द्रो**णशिष्य **ध**नंजय । त्याचा महिमा वर्णिजे काय ? । क्षोभायमान **गु**रुवर्य । जाणों सूर्य ग्रीष्मींचा. ॥ ५९ ॥ मंड-ळाकार गरगराटी । धनुष्य फिरे अलक्ष्य दृष्टी । बाणीं आच्छादिला **कि**रीटी । गमे विस्मय **ह**रीतें. ॥ ६० ॥ सायकामागें सायकवृष्टी । कंकपत्री निबिड थाटी । कार्य जाणोनी **ज**गजेठी । खुणावी बोटें **पा**र्थातें. ॥ ६१ ॥ 'पुढां चतुरा ! महत्कार्य । करणें असे **सैं**धवजय । येथें गुंततां **द्रो**णाचार्य । वश्य नोहे प्रतापी.' ॥ ६२ ॥ ऐकोनी **ह**रीची वाणी । **पा**र्थ समजे आपुले मनीं । **गां**डीव स्थिरावोनी रणीं । नमी आवडी **गु**रूतें. ॥ ६३ ॥ प्रदक्षिणा करुनी भावें । **स**व्यसाची शिरके सेनेंत हेंवें । **द्रो**ण वदे, 'शत्रु जिंकितां जावें । योग्य मिळे **ध**र्मातें.' ॥ ६४ ॥ **अ**र्जुन वदे, 'महाराजा ! । पुत्रतैसा शिष्य मी

---

१. इंद्रपुत्र (अर्जुन). २. कौशल्य. ३. भात्यांतून. ४. सहापट. (अध्याय ९१ श्लोक १५.)
५. सातशें. ६. हत्ती. ७. भल्लनामक बाण. ८. मोठ्या त्वेषानें. (?)

तुझा । विक्रमीं भाव न करीं दुजा । कृपे रक्षीं बाळका.' ॥ ६५ ॥ साट[1] देवोनी वारुवांतें । लंघोनी द्वार शिरकला पंथें । रथरक्षक **पां**चाळसुतें । जातां परा सारिले. ॥ ६६ ॥ तंव पुढां **सा**त्वत **कृ**तवर्मा । महाप्रतापी शक्तिगरिमा । **कां**बोज, **श्रु**तायु, **दी**र्घतमा । सेना निबिड नृपाची. ॥ ६७ ॥ दाहा सहस्र रथवर श्रेष्ठ । **शू**रसेन, **अ**भिशाह बळिष्ठ । **शि**वयो, **व**शातय **मा**लव[2] पुष्ट । **कै**कय, **म**द्रक भूपादी. ॥ ६८ ॥ **ना**रायण **गो**पाळसेना । **अ**र्जुनद्वेषी मिनले[3] रणा । जैसा सूर्य लंघितां रात्रिमाना[4] । आडवी सेना दैत्यांची[5]. ॥६९ ॥ तयापरी महाराजा ! । वीर अस्फोटोनियां[6] भुजा । लोटोनी रोषें **क**पिध्वजा । बुजोनी बाणीं काढिलें. ७० ॥ जैसी सकुमार अबळा बळा । कुचमर्दनीं विगतकळा । कीं हिंमवंतीं[7] अग्निज्वाळा । सरे परा[8] ज्यापरी. ॥ ७१ ॥ क्रोधारूढ **हा**र्दिक्य थोर । दश नाराच[9] ज्वलित खर । वर्मीं ताडितां **सु**भद्रावर । क्रोधारूढ धडकला. ॥ ७२ ॥ कंकपत्री तीक्ष्ण धारा । बाणीं ताडिलें वीरवीरा । त्यावरी आणी तीव्रधारा । इषुत्रय अर्पिले. ॥ ७३ ॥ न गणोनी रोषें **भो**जपती । पंचवीस शर **का**ळघाती । एकेकासी ताडुनी शक्ती । हास्य करी विनोदें. ॥ ७४ ॥ दांडाइतासी दांडाईत[10] । दावोनी भेद, वळिती हस्त । तैसे उभय वीर समर्थ । दाविती चोज विद्येचें. ॥ ७५ ॥ **गां**डीव वोढोनी कानाडी । शर सोडिले महाप्रौढी । चाप छेदोनी लवडसवडी[11] । एकवीस गात्रीं निवाले. ॥ ७६ ॥ अन्य चाप छेदोनी नेटें । पंचसायक अग्निपुटें । **फा**ल्गुनें ताडिले महाहटें । त्यांवर पांच अर्पिले. ॥ ७७ ॥ **पा**र्थ धनुर्धरांचा राव । शस्त्रसाधनीं परम जव । नव बाण सोडुनी प्रभिन्न हव । स्तनांतर[12] भेदिलें. ॥ ७८ ॥ तेणें दाटली मूर्च्छा त्यांसी । **का**ळवेळा भाविती मानसीं । विगत करुनी हृषीकेशी । लोटी स्यंदन पुढारा. ॥७९॥ तंव **कां**बोजराजा महाबळी । आडवा उभा सेनामेळीं । येतां देखोनी **कि**रीटमाळी । बावरला संग्रामा.

---

१. चाबूक. २. मूळांत 'मावेल्लक' असें नांव आहे (अध्याय ९१ श्लोक ३९). ३. जमले. ४. रात्रिमाना सूर्य लंघितां=प्रातःकाळीं. ५. मंदेह नांवाचे साडे तीन कोटी राक्षस सूर्योदयाच्या व सूर्यास्ताचे वेळेस सूर्याचा ग्रास करण्याकरितां उत्पन्न होत असतात—अशी कथा आहे. ह्यांचा नाश करण्याकरितां गायत्री मंत्रानें तयार केलेल्या वज्ररूपी पाण्यानें सूर्यास अर्घ्यें देण्याचा प्रघात आहे. सूर्यास अर्घ्यें देतांच ह्या मंदेह राक्षसांचा नाश होतो, अशी समजूत आहे. ६. दंड थोपटून. ७. हिमालयपर्वतावर. ८. दूर, पलीकडे. ९. बाण. १०. योद्धा. (दांडाईत =दांडगा). ११. घाईनें, लवकर. [हा शब्द मुक्तेश्वराच्या कवितेंत आढळतो. आदिपर्व–अध्याय ३४।५१ पहा]. १२. छाती, ऊर.

॥ ८० ॥ **गां**डीव स्फुरोनी **पा**र्थें । सोडिलीं शरांचीं अमित शतें । चतुरंग सेना मर्दोनी, प्रेतें । धरादेवी ढेसली[1]. ॥ ८१ ॥ क्रोधारूढ महींद्र[2]मांदी । **श्रु**तायु गतायु लोटला संधीं । ज्वलित चाप झाडोनी युद्धीं । शितीं[3] शर सज्जिले. ॥ ८२ ॥ वोढ काढोनी क्रोधानळीं । त्रिशरीं भेदिला **कि**रीटमाळी । सत्याहत्तरीं **व**नमाळी । ताडुनी करी शब्दातें. ॥ ८३ ॥ **फा**ल्गुन वमोनी क्रोधउल्का । नव्वद सायक अग्निशिखा । ताडिलें हृदयीं नरनायका । गजा जेवीं अंकुश. ॥ ८४ ॥ **श्रु**तायु क्रोधआयनी । ताडिला रोषें **गां**डीवपाणी । सत्याहत्तर वाण **का**ळमानी । रक्तस्राव भूमी जाला. ॥ ८५ ॥ लत्ताप्रहारें फुपाटे अही[4] । कीं व्याघ्र उसळे शस्त्रघायीं । दारूमाजी स्फुलिंगकणयी[5] । स्पर्शे, अनर्था विलंबू ? ॥ ८६ ॥ तयापरी **गां**डीवधन्वा । रोषें संतप्त जेवीं **म**घवा । शर सोडुनी वन्हिप्रभवा । चाप हातींचें खंडिलें. ॥ ८७ ॥ नतपर्वणी[6] सात शरीं । नृप ताडिला स्तनांतरीं । येरें अन्य धनुष्य सज्जोनी शरीं । **पा**र्थ हृदयीं भेदिला. ॥ ८८ ॥ विस्मयमान **गु**डाकेश । सहस्रशः शर काळविष । सोडुनी अश्वसारथिशीस । व्योममार्गें लाविलीं. ॥ ८९ ॥ पंचाहत्तर प्रभिन्न शर । गात्रस्थानीं ताडिले सैर । हत **सा**मादि राजेश्वर । घोर गदा पडताळी. ॥ ९० ॥ जे वरदी[7] दुर्धर महागदा । **अ**मराधिपा करी चेंदा । ते **व**रुणें निर्मिली खेदा । पावावया भूतांतें. ॥ ९१ ॥ **स**लिलराज[8] मकरध्वज । **प**र्णाशानदी तयाची भाज[9] । पुत्र जन्मला ऐश्वर्यबीज । **श्रु**तायुध प्रतापी. ॥ ९२ ॥ मोहें झंळंबोनी[10] माता । प्रार्थिती झाली **स**लिलनाथा । 'जगीं अवध्य करिजे सुता[11] । **लो**केश्वरा! मजप्रती'. ॥ ९३ ॥ तनयस्नेहें हर्षगात्रीं । गदा वोपिली[12] सहित मंत्रीं । म्हणे, 'हा अवध्य सर्व धात्री । गदाश्रयें जाण पां. ॥ ९४ ॥ समरीं दुर्धर समरवीरा । संकटीं गदा वोपिजे निकरा । रोषें करितां अविचारा । मृत्यु तेणें पाविजे.' ॥ ९५ ॥ असो; पुरतां आयुष्यअवधी । तैसीच विपरीत जाली बुद्धी । अलक्ष[13] **अ**र्जुना करुनी संधी[13] । गदा वोपी **ह**रीतें. ॥ ९६ ॥ जैसी वीज तडके तळा । भेदोनी उसळे नभःस्थळा । तैसा दणका **त**मालनीळा । ताडोनी, उसळे माघारी. ॥ ९७ ॥ सुसाट वन्हीचा कल्लोळ । धडकोनी नृपाची फोडिली टाळू । **श्रु**तायु पडला

---

१. खचून भरली. २. राजमंडळ. ३. शित=धनुष्याची दोरी. ४. सर्प. ५. स्फुलिंगकणी, विस्तवाची ठिणगी. ६. बाकदार. ७. वरयुक्त, वरप्रसादानें प्राप्त झालेली. ८. जलाधिपति (वरुण). ९. भार्या, स्त्री. १०. झळंबणें=निमग्न होणें, गुंडाळलें जाणें, घेरलें जाणें. ११. श्रुतायूस. १२. (वरुणानें) दिली. १३. अर्जुनाचें लक्ष्य नाहीं अशी वेळ पाहून, अर्जुनाचा डोळा चुकवून मूर्च्छित, बेशुद्ध.

भूमी अचळ[1] । जेवीं पादप[2] मारुतें[3]. ॥ ९८ ॥ ना ते मूठ[4] टाकितां वैरियावरी । अपूर्ण शिक्षा[5] फिरे मावारी[6] । त्याचीच रक्षा[7] करी पुरी । तेवीं गती नृपाची. ॥ ९९ ॥ 'आहा!' शब्द सेनामेळीं । भूप निघाला अतुर्बळी । कृष्ण माउली पार्थसाउली । अरिष्ट केवीं स्पर्शे पां? ॥ १०० ॥ मृत्यु पावला **श्रु**तायुध । **कां**बोजपुत्र दाटला मदें । **सु**दक्षण करावया युद्ध । **अ**र्जुनाप्रती धांवला. ॥ १०१ ॥ चक्षीं[8] लक्षोनी रायातें । शर सात सोडिले वीर **पा**र्थे । येरें खंडुनी कुशळ हस्तें । धरेवरी पाडिले. ॥ १०२ ॥ दश बाण ज्वलित कंकपत्री । **फा**ल्गुन ताडिला वर्मगात्रीं । तीन शरीं भेदोनी अब्जनेत्री[10] । पांच **पा**र्था अर्पिले. ॥ १०३ ॥ **अ**र्जुनें सोडुनी शराचे पुंज । चाप खंडुनी, छेदिले ध्वज । भ्रुकुटीमाजी ज्वलिततेज । बाणत्रय शिरकलें. ॥ १०४ ॥ **सु**दक्षण तप्त क्रोधानळीं । शक्ती[11] प्रेरिली अग्निज्वाळी । रुक्मघंटा प्रदीप्त हेळी । वमी स्फुलिंग मुखानें. ॥ १०५ ॥ येतां सुसाट **पा**र्थाकडे । येरें भेदोनी टाकिले तुकडे । **सु**दक्षण पाहे चहूंकडे । विस्मयमान मानसें. ॥ १०६ ॥ **पा**र्थें कसोनी सोडिला शर । काळविखारी सुसाट घोर । मुगुटसहित उडविलें शिर । नभोमंडळीं प्रतापें. ॥ १०७ ॥ रुचिर तनु भूषणयुक्त । भूमी पाडिलीं बीभत्स प्रेतें । कर्णिकार[12] वृक्ष जैसा वातें । स्पर्शी धरा ज्यापरी. ॥ १०८ ॥ **कां**भोजपुत्र **सु**दर्शनी । कर्णी नास (?) ताम्राक्ष[13] गुणी । विषादें लोटला रणांगणीं । **पा**र्थाप्रती प्रतापें. ॥ १०९ ॥ शर वर्षोनी, अग्निशिखा । हृदयीं ताडिला अग्निसखा । हांसत हांसत कार्मुका । कर्षोनी, बाण सोडिले. ॥ ११० ॥ तिघां करुनी तीन वाटा । धरणी पाडिलें नृपश्रेष्ठा! । जैसा **सु**रेंद्र गिरिकूटा । भेदोनी पाडी तळातें. ॥ १११ ॥ 'आहा!' भूत समस्त सेना । इतस्ततः जाहली **कु**रुभूषणा! । धीर, शूर, प्रतापी, रणा । **पा**र्थाप्रती तगटले. ॥ ११२ ॥ **अ**भीशाह आणि **शू**रसेन । **शि**वयो, **व**साती, **श्रु**तायु, जाण । सवें सासष्ट शत वीर प्रवीण । शस्त्रधारी वर्षले. ॥ ११३ ॥ पळतां वीर पळुनी मागें । शस्त्रें वर्षती महारागें । सांगळोनी[14] वीर वीरश्रीभागें । एकमांडी[15] लोटले. ॥ ११४ ॥ **स**व्यसाची धनुर्वाडा । शर वर्षोनी **का**ळदाढा । वीर पाडिले

---

१. निश्चेष्ट, निश्चळ. २. झाडें, वृक्ष. ३. वाऱ्यानें. ४. मूठ मारणें–हा जादूचा एक प्रकार आहे. ५. पूर्ण ज्ञान नसेल तर. ६. जादू करणाऱ्याची. ७. राख, नाश, भस्म. ८. सुदक्षिण. ९. डोळ्यांनीं. १०. कमलनेत्र (कृष्ण). ११. अस्त्रविशेष. १२. पांगाऱ्याचें झाड. १३. लाल डोळ्यांचा. १४. सांगुळणें=घट्ट होणें, एकत्र जमणें, सांकणें. १५. एकदम.

दडाडा । शिरें व्योमा उडविलीं. ॥ ११५ ॥ जैसी तडागीं घनाची वृष्टी । तैसीं शिरें रिचवती सृष्टी । महा खळबळ, वीरांच्या कोटी । कासावीस मानसें. ॥ ११६ ॥ **पा**र्थस्पर्धी **श**तायु वीर । बाहुशाली[1] विजयी शूर । पुढारुनी **सु**भद्रावर । अमित बाणीं ताडिले. ॥ ११७ ॥ **पा**र्थें सोडुनी शरौघमाळा । बुजोनी काढिला **श्रु**तायु हेळा । येरें वमोनी क्रोधाग्निज्वाळा । प्रदीप्त तोमर प्रेरिला. ॥ ११८ ॥ उसळोनी **का**ळदंडमानें । **पा**र्थमौळीं बैसला त्राणें । जाणों वज्रधडक पर्वतीं घन । विंझे जेवीं प्रतापें. ॥ ११९ ॥ त्यांवरी शूळ ज्वलितधारा । कर्षोनी बाहीं ताडिला सैरा । तंव घोर दाटोनी धनुर्धरा । ध्वज पृष्ठिका स्पर्शिली. ॥ १२० ॥ मोहो पावला **र**मारमण । **कौ**रवसेना हर्षवर्धन । सिंहनाद करुनी त्राणें । सरसावले चौफेरीं. ॥ १२१ ॥ **पु**रारी-ध्येय, **पु**रुषोत्तम । पुराणपुरुष, सौख्यसद्म । पूरितकाम, पुनीतनाम । स्फुरे तेजें **पा**र्थातें. ॥ १२२ ॥ म्हणे, 'बापा! प्रतापसूर्या! । काय कश्मल[2] धरिलें हृदया । तुझिया यशा **सु**रेंद्र बाह्या । पिटी सर्वदा संतोषें. ॥ १२३ ॥ तो पराक्रम नराधिपा! । स्फुरित करी **कु**रुकुळदीपा! । **कौ**रव वोपोनियां तापा । वर्धी यश प्रतापें.' ॥ १२४ ॥ स्पर्शतां श्री**कृ**ष्णवाक्यामृत । **पा**र्थविक्रम वंधे[3] बहुत । **गां**डीव स्फुरोनी रोषाद्भुत । बाणकोटी सोडिल्या. ॥ १२५॥ **कौ**रव वीरीं ऐक-वळा[4] । करुनी लोटिले फोडुनी कीळा । शस्त्रें वर्षले अग्निज्वाळा । जाणों वृष्टी घनाची. ॥१२६॥ पर्वतदरीं पंचानन[6] । वेढोनी वर्षती शस्त्रें घन । तैसें **अ**र्जुना आवरणें । शस्त्रें घालोनी शस्त्रें ताडिती. ॥ १२७ ॥ भूमी अंतरिक्ष न दिसे कांहीं । निबिड शस्त्रांची पडली सायी । 'ध्या ध्या' शब्द एकची घायी । सर्वां वदनीं माजली. ॥ १२८ ॥ **फा**ल्गुन प्रतापी महाशूर । सर्वास्त्रभेदी जाणता चतुर । **इं**द्रास्त्र जपोनी सोडिला शर । बीजंयुक्त[7] सक्रोध. ॥ १२९ ॥ सरसराट वन्हिज्वाळा । जाणों विजांचा पातला मेळा । कोटींच्या कोटी फांकती कीळा । तेजें नभा उजळिलें. ॥ १३० ॥ थटथटा वीरशिसाळें । तुटोनी पडती भूमी अचळें । जाणों विखुरलीं रुक्मकमळें । किंवा बिंबें चंद्राचीं. ॥ १३१ ॥ सांगद[8] भुजा करमंडित । मवाळ[9] अंगोळिया मुद्रांकित । उसळोनी पडती लखलखीत । फणिवृंदांसारिख्या[10]. ॥ १३२ ॥ नागतनु[11] विराजमान । करचरणरहित भिन्नें[12] । धरणीं पडती महात्राणें । कूष्मांडफळें ज्यापरी. ॥ १३३ ॥ अश्वरोह,

१. प्रचंड भुजदंडांनीं मंडित. २. विषाद, उदासीनता. ३. वाढे. ४. जमाव, समुदाय. ५. गर्जना, आरडाओरड. ६. सिंह. ७. मंत्रासह, मंत्रानें अभिमंत्रून. ८. अंगदां (बाहुभूषणां) सह. ९. कोमल, मृदु. १०. सापांच्या समुदायाप्रमाणें. ११. हत्तीचें शरीर. १२. तुटलेलीं.

गजरोह, पदाती, । सहित वाहनें लोळती क्षिती । अमित शवांच्या दाटल्या पंक्ती । यमराष्ट्रघोरवर्धन. ॥ १३४ ॥ सेनाक्षय पाहोनी नयनीं । म्लेंच्छराज लोटले रणीं । यवन, पारद, दरद, गोयनी, । बाल्हिक काळदर्वाती. ॥ १३५ ॥ दरद्र, पौंड्र आणि तगण । अभिशाह वीर दारुण । सहस्रशः वीर लोटून । केले प्रहार पार्थातें. ॥ १३६ ॥ येरू प्रदीप्त क्रोधानळीं । जैसा सूर्य वसंतकाळीं । शरांमागें शरांची जाळी । मोकळी प्रौढी संतोषें. ॥१३७॥ गजाश्वरथी पदाती । खंडविखंड पाडिले क्षिती । शरमय अवघी [१]वसुमती । भयांच्या कोटी वीरांतें. ॥ १३८ ॥ पांच शत वीर महाप्रवीर । सहस्र हस्ती प्रभिन्न थोर । अश्वसादि पदाती वीर । असंख्यात मर्दिले. ॥ १३९ ॥ रुधिरनदी खळखळाटी । [२]गजकलेवरें वाहती लोटीं । चतुरंगशवांच्या दाटल्या थाटी । पाहतां दृष्टी कंटाळे. ॥ १४० ॥ रौद्ररण भयंकर पाहीं । वीरक्षय पातला घोर मही । अंबी[३]जराज विजयी बाहीं । तुळोनी गदा धाविला. ॥ १४१ ॥ बाणीं सडकितां धनंजय । न गणोनी, ताडिला यदुवर्य । दुःसह मानोनी कुरुवर्य । तीक्ष्ण बाणीं झोडिलें. ॥ १४२ ॥ अति अद्भुत नृपशार्दूळा ! । म्यां पाहिलें आपुल्या डोळां । अवमानोनी शरांचा [४]झोंला । गदा पार्था वोपिली. ॥ १४३ ॥ पुनः पुनः [५]उभय कृष्णा । गदा ताडी [६]महात्राणा । पार्थ प्रतापाचा राणा । छेदी बहुप्रतापें. ॥ १४४ ॥ शर सोडुनी ज्वलित क्रूर । वरीच्या वरी उडविलें शिर । बाणीं त्रासोनी सेनाभार । विमुख केलें सैनिकां. ॥ १४५ ॥ अर्जुनयुद्धाचें लाघव । स्वर्गीं सुर वानिती सर्व । पुढील युद्धाचें गौरव । श्रोते सज्जनीं ऐकिजे. ॥ १४६ ॥ श्रीगुरु भीमराज मेघ सधर । कृपाजळ [७]वोळैतां स्थिर । मयूर नरहर मोरेश्वर । टाहो करी हरिनामें. ॥ १४७ ॥

---

[८]अध्याय सतरावा.

संजय वदे, 'नरनायका ! । द्रोणानीका भेदूनी, भोजानीका । भ्रष्टोनियां, कांबोजानीका । पुढें पार्थ शिरकला. ॥ १ ॥ जैसा योगींद्र योगमार्गें । [९]वज्रचक्र भेदी करितां आंगें । तैसा फाल्गुन वीरश्रीरंगें । चतुर्थ [१०]पौळी पातला.

---

१. पृथ्वी. २. हत्तींचीं प्रेतें. ३. मूळांत 'अंबल' असें नांव आहे. (अध्याय ९३ श्लोक ६६.) ४. गुच्छ, समुदाय. ५. कृष्णार्जुनांस. ६. मोठ्या आवेशानें. ७. वळतां, येतां. ८. ह्या अध्यायांत मूळांतील ९४–१०३ अध्यायांतील कथानक आहे. ९. हटयोगांतील सप्तचक्रांपैकीं एक. १०. सेनेची रांग.

॥ २ ॥ खवळोनी सेनाउदधी । विगतमानस फेणदधी । व्यापिली तेणें उसाळ बुद्धी । क्षीण जाली; नरवर्या ! ॥ ३ ॥ कासावीस **सु**योधन । पावला जेथें प्रतापी **द्रो**ण । भाळीं वंदोनी श्रीचरण । बोले म्लान वचनीं **गु**रुवर्या. ॥ ४ ॥ '**पा**र्थ प्रतापनरकेसरी । चमूगजवृंदें भेदुनी समरीं । **सैं**धवहनना पातला वैरी । जेवीं **रा**हू **चं**द्रातें. ॥ ५ ॥ अमित वीर मारिले रणीं । जे **का**ळातें सारिती कदनीं । **श्रु**तायु तेजिष्ठ तरणी । विचित्रकरणी मर्दिला. ॥६॥ **श्रु**तायु, **च्यु**तायु, **सु**दक्षिण, । **अं**बिष्ट राजा रणप्रवीण । **म्लें**च्छभूप प्रतापवान । अयुतसंख्या मारिले. ॥ ७ ॥ **कृ**तवर्मा **भो**जपती । विगत केला सहनृपती । दुर्धर **पा**र्थाची महाशक्ती । सारी पैरा **इं**द्रातें. ॥ ८ ॥ तुमचा जाणोनी भरंवसा । **ज**यद्रथासी दिधला धिंवसा । तेतों वृथा होवो पाहे आशा । नेणों करणी तुमची ! ॥ ९ ॥ **पां**डवजयीं अक्षय बुद्धी । तरी कां मातें प्रेरिलें युद्धीं? । द्वैतवासना स्वधर्मविधीं । योग्य नव्हे **गु**रुवर्या !' ॥ १० ॥ **द्रो**ण बोले स्मितवाचा । 'तैसाच विक्रम **अ**र्जुनाचा । ज्याचा सारथी त्रैलोक्याचा । प्रतिपाळक **अ**नंतू. ॥ ११ ॥ भक्तवत्सल, भक्ताभिमानी, । भजकतारक भवनिर्वाणीं । **शां**भवनिर्वाणीं मर्मरध्वनी । सर्व काळीं जयाचे. ॥ १२ ॥ तो समक्ष **फा**ल्गुनरथीं । असतां अजय केतुली प्राप्ती ? । अग्निदत्त स्यंदन महाद्युती । अभंग वांजी जाण पां. ॥ १३ ॥ अक्षय, **गां**डीव, तूणीर, शर, । युंव तरस्वी प्रतापशूर । धनुर्विद्येचें लाघव थोर । सज्जोनी शर सोडिता. ॥१४॥ एक्या बाणाचे सहस्रशः बाण । होवोनी दिशा रोधिती पूर्ण । अग्रता धांवे कोस दोन । पृष्ठी तदर्ध, नरेंद्रा ! ॥ १५ ॥ वाम सव्य एकेक कोस । वावरोनी शर खंडिती शीस । तो तरुण, शक्तीचा नाश । माझ्या जाला वांर्धक्यें. ॥ १६ ॥ मज गुंततां सेना संधी । निघोनी गेला कुशलबुद्धी । **सैं**धवरक्षणीं वीरमांदी । **द्रौ**णी प्रतापी मजतुल्य. ॥ १७ ॥ तूंही राजिया वीरांच्या कोटी । वेवोनी मी निघें तुमचे पाठी । **पा**र्थप्रतापाची कायसी गोष्टी ? । दावीन

१. सैन्य व हत्तींचे समुदाय. २. अद्भुत पराक्रमी. ३. दहा हजार. ४. पलीकडे, दूर. ५. धीर. ६. भेदभाव, कपटबुद्धि. ७. अध्याय ९४।२० पहा. ८. संसारांतील संकटसमयीं. ९. खांडववनदहनकालीं अग्नीनें अर्जुनास एक दिव्यरथ व घोडे दिले होते. (मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय ४९ पहा.) १०. घोडे. ११. तरणा, नव्या दमाचा. १२. अर्जुनानें सोडिलेल्या एका बाणापासून अनेक बाण उत्पन्न होत असत व ते पुढें दोन कोस व पाठीमागें व बाजूंस एक एक कोस व्यापीत असत—असा भावार्थ. १३. म्हातारपणामुळें. येथें **वा**मनकृत 'भीष्मप्रतिज्ञा' काव्यांतील पुढील ओळीची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं:—'स्वयें गतवयस्क मी सरस वीर तूं रे! नवा.'

चोज प्रतापें. ॥ १८ ॥ सबीज मंत्र सिंचोनी उदका । स्वहस्तें बांधले नर-
नायका ! । [१]याचा भेद करिता देखा । वीर नाहीं जगत्रीं. ॥ १९ ॥ पूर्वी
वृत्रासुराच्या युद्धीं । विकळ **पु**रंदर होतां संधी । शरण जावोनी ऐश्वर्य-
निधी । **शू**ळपाणी प्रार्थिला. ॥ २० ॥ तेणें करूनियां कृपा । कवच-
धारण **सु**राधिपा । वोपितां निवारूनी तापा । अभेद जाला **वृ**त्रातें. ॥ २१ ॥
तेची शि[२]क्षा **अं**गिराऋषी । पावता जाला **शां**भवतोषीं । तेणें उपदेशोनी
गुरुसी । तेणें [३]**अ**ग्निवेशा अर्पिली. ॥ २२ ॥ तयापासाव लाधली मज ।
चमत्कारी अद्भुत तेज । तुज म्यां अर्पिली संग्रामपैज । घालोनी भिडे
पार्थासी.' ॥ २३ ॥ ऐसें वदोनी **द्रो**णाचार्या । [४]स्वस्तिवचन केलें तया ।
'स्वस्ति, रक्षो' म्हणे 'काया । देव, ऋषी, नृप, सिद्ध'. ॥ २४ ॥ आज्ञा देवोनी
संतोषें । **पा**र्थयुद्धा निघाले हर्षें । सवें सेना बळी रोषें । कडकडाटी लोटले.
॥२५॥ सहस्र रथ, रथी श्रेष्ठ । सहस्र दंती, बळ [५]उद्भट । नव आजी सुभट ।
[६]नावाजिक धनुर्वाडा. ॥ २६ ॥ येवोनी थडकले **पा**र्था पाही । अनेक वाद्य
लागले घायी । जैसा **वै**[७]रोचन विजयी बाही । [८]तगटे **इं**द्रा प्रतापें. ॥ २७ ॥
तव **पां**डवसेना कडकडाटी । अर्णवलोटें लोटली हटी । **द्रो**ण पर्वताचळ-
सृष्टी । वीरलहरी कैं वाहे? ॥ २८ ॥ अग्रता **पां**चाळ **धृ**ष्टद्युम्न । वीरवेष्टित
प्रभिन्न घन । थडकोनी वर्षोनी तीव्र बाण । **कौ**रवसेना ताडिली. ॥ २९ ॥
द्रोणाचार्य लोटला पुढां । रणभूमिका **प्र**यागहुडा । उभय सैन्या पडला वेढा ।
गंगा**य**मुनांसारिखा. ॥ ३० ॥ **धृ**ष्टद्युम्न त्रासितां सैन्या । अत्यंत क्रोध
पातला **द्रो**णा । शर वर्षोनी विचित्र नाना । वीर वीर भंगिले. ॥ ३१ ॥
जैसा वसंतीं वना वन्ही । धडकतां भ्रष्ट पादपश्रेणी । तैसी देखोनी गुरूची
करणी । त्रिधा भार लोटले. ॥ ३२ ॥ पुढारतां **वि**राट नृपती । **विंदा**नु**विं**द
अवंतिनृपती । धांवोनी वर्षले शरांच्या पंक्ती । परस्परें निघांतें. ॥ ३३ ॥
महायुद्ध घोरांदरें[११] । उभय गात्रीं प्रहार रुधिर । जैसे सिंहगजाचे [१२]चेंपेट घोर ।
वनांतरीं ज्यापरी. ॥ ३४॥ **बा**ल्हिक आणि **य**ज्ञसेन । युद्धा मिनले महात्राणें ।
द्रौपदेयें सोडुनी प्रभिन्न बाण । **बा**ल्हिक हृदयीं ताडिला. ॥ ३५ ॥ येरें

१. द्रोणाचार्यांनीं दुर्योधनास दिलेल्या कवचाचा. २. कवचधारण विद्येचें शिक्षण. ३. अगस्त्य ऋषीचा शिष्य व द्रोणाचार्यांचा गुरू. ४. आशीर्वाद. ५. पुष्कळ, भयंकर. ६. नामांकित, मोठमोठे. ७. विरोचनपुत्र (बळि). ह्यानें इंद्राचें राज्य घेण्याचा प्रयत्न केला होता परंतु विष्णूनें वामनाचें रूप घेऊन त्यास फसविल्यामुळें, तो त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. ८. तुटून पडणें, भिडणें. ९. झाडांच्या रांगा. १०. आवेशानें, जोरानें. ११. घनघोर, तुंबळ. १२. चापट्या, थडका.

प्रज्वळोनी क्रोधानळीं । नतपर्वणी नव भाळी । अर्पण केल्या ध्रुवमंडळीं । भयंकर भ्याडातें. ॥ ३६ ॥ सात्यकी लोटतां पुढारा । केलें दुःशासनें आडवारा । तेणें सायक तीक्ष्णधारा । नव हृदयीं अर्पिले. ॥ ३७ ॥ परस्परें ज्वलित शर । ताडिती, वळिती महावीर । घायीं शरीर रक्तांबर । जाणों किंशुक[2] वसंतीं. ॥ ३८ ॥ सौबळ शकुनी येतां रागें । सहदेवें भेदलीं त्याचीं आंगें । युद्ध जाहलें वीरश्रीरंगें । निकरें[3] दोघां तयातें. ॥ ३९ ॥ सहदेवप्रतापाच्या राशी । घायीं जर्जर केलें त्यासी । रणीं विन्मुख सेना, शेषी । द्रोणानीका पातला. ॥ ४० ॥ मद्राधिप लोटतां रणीं । धर्में विंधिला पांच शत बाणीं । त्यांवरी आणीक काळमानी । सात अर्पी निघातें. ॥ ४१ ॥ तुंबळ युद्ध दोघांजणां । जालें, अमित आटली सेना । जेवीं तारकासुरषडानना[4] । पूर्वीं युद्ध ज्यापरी. ॥ ४२ ॥ बंधु बंधु विविंशती भीम । करिते जाले रौद्रकर्म । द्वंद्वयुद्धाचा संभ्रम । येरयेरां ताडिती. ॥ ४३ ॥ पार्षद[5] वीर सेनापती । क्रोधें शिरकला चमूप्रती । प्रभिन्न सोडुनी शरांच्या पंक्ती । वीर वीर त्रासिले. ॥ ४४ ॥ सरसराट शरौघमाळा । शिरकोनी शिरें पाडिती तळा । हस्त पाद खंडुनी हेळीं[6] । भूमी तनू आपटिती. ॥ ४५ ॥ गजाश्व होवोनियां दुधडे । धडधडाट पडती मुंडें । जैसा कृषीवळ[7] छेदितां झाडें । तळीं शाखा रिचवती. ॥ ४६ ॥ कवच, शस्त्रें, पताक, ध्वज । धरे प्रपात[8] तेजःपुंज । रुधिरमय निस्तेजतेज । दाटलीं शवें चौफेरी. ॥ ४७ ॥ रौद्ररण कर्कश पाहीं । उठोनी कबंधें नाचती मही । भूतगणांची पडली सायी[9] । झोंबोनी रक्त प्राशिती. ॥ ४८ ॥ कंक[10], गीध, वायस, श्येन[11], । वृक[12]जंबुकादि श्वापदगण । मांसें भक्षिती हर्षवर्धन । रुचे ज्यातें जैसें. ॥ ४९ ॥ ऐसा देखतां सेनाक्षय । क्रोधवर्धन द्रोणाचार्य । शर वर्षोनी अप्रमेय[13] । वीरमिठी भंगिली. ॥ ५० ॥

---

१. बाण. २. पळसाचें झाड. पळसाचीं फुलें लाल असतात ह्मणून क्षतांकित योद्ध्यास पळसाची उपमा देण्याचा कविसांप्रदाय आहे. 'पुष्पवर्ण नटला पळसाचा, पार्थ सावध नसे पळ साचा ॥' ही वामनोक्ति प्रसिद्धच आहे. ३. अटीतटीनें. ४. तारकासुर हा वज्रांग दैत्याचा पुत्र. ह्यास 'लहान मुलाखेरीज इतरांच्या हातून मृत्यु येणार नाहीं,' असा ब्रह्मदेवानें प्रसन्न होऊन वर दिला होता. ह्यामुळें हा सर्व प्राणिमात्रास फार त्रास देऊं लागला. तेव्हां कार्तिकेयाचा (षडाननाचा) अवतार झाला व यानें तारकासुरास सातव्याच दिवशीं मारिलें—अशी कथा आहे. ५. पृषतपुत्र, धृष्टद्युम्न. ६. सहज, अनायासेंकरून. ७. शेतकरी. ८. खालीं पडणें. ९. दाटी, थवा. १०. पक्षिविशेष. ह्याच्या पिसाऱ्याचे बाण करितात. ११. ससाणा. १२. लांडगे, कोल्हे वगैरे. १३. अज्ञेय, फार उत्तम.

जैसा [1]आमीषा ससाण झडा । घाली, तैसा **पा**र्षद पुढां । लोटोनी, सायक **का**ळदाढा । **गु**रुवर्या समर्पी. ॥ ५१ ॥ **द्रो**ण प्रज्वळोनी क्रोधानळीं । चाप खंडुनी पाडिलें तळीं । **पा**र्षदा विंधिलें चौसष्ट भाळीं । छत्रध्वज छेदिला.॥५२॥ येरें सचंद्र प्रभिन्न [2]चर्म । असिलता [3]दामिनीसम । घेवोनी धांवला वीर विभ्रम,। जेवीं सिंह गजातें. ॥ ५३ ॥ प्रज्वळोनी **द्रो**ण क्रोधानळीं । चर्म छेदिलें शत बाणीं । खड्ग छेदोनी उडविलें गगनीं । दश सायकीं निघातें. ॥ ५४ ॥ करावया **पा**र्षदाचा घात । शर प्रेरिला **अं**तकदूत । तेजें दिशा पूर्ण भरित । [4]स्फुलिंग गगना विखुरले. ॥ ५५ ॥ येतां देखोनी **शि**निप्रवीरें । चौदा शर सोडुनी निकरें । छेदोनी करी चकनाचुरे । धरणीवरी पाडिला. ॥ ५६ ॥ धन्य धन्य वीरमांदी । स्तविती जाहली सोज्वळबुद्धी । **द्रो**ण क्षोभला प्रताप-उदधी । बाणकोटी मोकळिल्या. ॥ ५७ ॥ **सा**त्यकी वीर धनुर्बाडा । बाणीं बाण केले रगडा । **गु**रु कोपोनीं वेगाडा । शरांच्या माळा लाविल्या. ॥५८॥ उभयतां वीर महारथी । शरमय केली अवघी क्षिती । [5]अवकाश आकाशीं नसे रिती । सूर्यकिरणें लोपलीं. ॥ ५९ ॥ विमानयानीं [6]वृंदारक । पाहती दोघांचें कौतुक । तुकोनी मान म्हणती, 'देख । धन्य जननी पुत्रत्वें'. ॥ ६० ॥ रक्त-पीत शरौघमाळा । सरसराट वन्हिज्वाळा । रिघोनी गात्रीं भेदिती [7]तळा । जेवीं वारुळीं [8]काद्रवेय. ॥ ६१ ॥ सिंहाऐसा फोडिती रव । उसळोनी शर सोडिती [9]हेंव । उभयतांचें हस्तलाघव । पाहती वीर सर्वेही. ॥६२॥ विशाळ [धनू] गरगराटे । निघती शर सरसराटें । तळत्राणें फरफराटें । [10]घोषं सिंहांचे उस-ळती. ॥ ६३ ॥ वीरश्रीभरें उभयवीर । सोडुनी बाण खंडी शर । गात्रस्थानीं स्रवे रुधिर । गेरुपर्वतासारिखें. ॥ ६४ ॥ अस्त्रलाघव हस्तकळा । [11]ईडेपाडे ताडिती सकळां । जैसे वृषभ थडकती बळा । येरयेरां निघातें. ॥ ६५ ॥ तयापरी अनन्य युद्ध । माजलें तुंबळ घोर विशद । **द्रो**ण वर्षोनी शरांचे वृंद । दिल्हा खेद **या**दवां. ॥ ६६ ॥ तेणें अत्यंत क्रोधप्राप्ती । अस्त्र स्मरता जाला अंतीं । जेणें **भा**र्गवें केली शांती । **अ**र्जुनाची संग्रामीं. ॥ ६७ ॥ **भी**ष्मपासाव सर्व विद्या । **सा**त्यकी लाधला होता आद्या । तेची स्मरोनियां सध्या । सोडिले शर निघातें. ॥ ६८ ॥ बाणवृष्टी करूनी दुणी । छेदोनी चाप पाडिलें धरणी । अन्य सज्जितां त्वरेंकरूनी । तेंही हातींचें खंडिलें. ॥ ६९ ॥ जें

१. मांसाकरितां. २. ढाल. ३. वीजप्रमाणें तेजस्वी. ४. विस्तवाच्या ठिणग्या. ५. रिकामी जागा. ६. देव. ७. पृथ्वीतळाला. ८. सर्प. ९. त्वेषानें. १०. वीरांच्या सिंहनादाचे भयंकर शब्द. ११. ईर्ष्येनें.

जें धनुष्य **द्रो**णाचार्य । घे, तें तोडी **या**दववीर । सत्याणव चापें तेजमय । **शि**निप्रवीरें छेदिलीं. ॥ ७० ॥ तोषवोनी **गुरु**स्वमुखें । स्तवोनी त्यांतें पूजी हरिखें[1]। हस्तलाघव विद्यादिकें । जाणों **वा**सव दुसरा. ॥७१॥ ऐसें वदोनी **आ**चार्यराणा । शर सज्जिला प्राणहरणा । तेजें अग्नीच्या लोपल्या माना । जाणों सूर्य प्रळयींचा. ॥७२॥ 'हा हा'कार सर्वां वदनीं । म्हणती निमाला **सा**त्यकी गुणी । **ध**र्मराजादि वीरश्रेणी । लोटोनी अस्त्रा वारिलें. ॥ ७३ ॥ उभयदळींचे दाटले वीर । वर्षते जाहले शरांचे पूर । युद्ध जाहलें घोरांदर । **शुंभ**[2]**नि**शुंभांसारिखें. ॥७४॥ येरीकडे वीर **अर्जुन**। महाप्रतापी बळवर्धन। [रथीं सारथी **यदुनंदन**]। [3]षडैश्वर्यसुखमूर्ती. ॥ ७५ ॥ शिरकोनियां सेनाभारीं । फिरवी स्यंदन चक्राकारी । वरी **फा**ल्गुन घनापरी । वर्षाव करी शस्त्रांचा. ॥ ७६ ॥ जिकडे जिकडे लोटे रथ । तिकडे मोकळा होय पंथ । जैसा हस्ती मदद्रावित[4] । येतां सेना द्विभागे[5]; ॥७७॥ तयापरी **पा**र्थवीरा । जातां सैनिकीं आडवारा[6] । करुनी, युद्धा लोटले सैरा । अवंतिधिप[7] प्रतापें. ॥ ७८ ॥ **विंदा**नुविंद उभयबंधु । महाप्रतापी शौर्यसिंधु । **पा**र्थ ऐश्वर्याचा इंदु । चौसष्ट बाणीं ताडिला. ॥ ७९ ॥ सत्याहत्तर शर **हृ**षीकेशी । अर्पण केले महारोषीं । शत सायकें वारुवांसी[8] । वर्मस्थळीं भेदिलें. ॥ ८० ॥ तया **अर्जु**नें क्रोधावर्ती । नव सायक ज्वलितशक्ती । अर्पण करितां **का**ळघाती । अधिकाधिक क्षोभले. ॥ ८१ ॥ तैलघृततीक्ष्ण धारा । देहुड्या[9] लाविल्या **पा**र्थवीरा । आच्छादुनी **पां**डुकुमरा । सिंहनाद फोडिले. ॥ ८२ ॥ महाप्रतापी **क**पिध्वज । चापें छेदोनी खंडिले ध्वज । येरू आवरोनी रोषबीज । भ्रुकुटी शर ताडिले. ॥ ८३ ॥ तेणें **फा**ल्गुन क्रोधायमान । ताडिला फणीं[10] उसळे त्रीणें[11] । कीं तडागलोटें फुटे जीवन । तेवीं **पा**र्थ क्षोभला. ॥ ८४ ॥ **गां**डीव कर्षोनी आकर्ण । शिळाशित तीक्ष्ण बाण । सुवर्णपुंखी अतिदारुण । महारोषें सोडिले. ॥ ८५ ॥ अश्वांसहित सारथी पाहीं । पृष्ठरक्षक[12] मर्दिले तेही । ज्येष्ठशिरें[13] पाडिलें मही । जेवीं पादप मारुतें. ॥ ८६ ॥ **अनु**विंद पडिला रणीं । देखोनी उसळला जैसा फणी ।

---

१. हर्षानें. २. हे दोघे भाऊ होते. ह्यांस कालीदेवीनें मारिलें. ३. ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, यश, कीर्ति व औदार्य या सहांचें अधिष्ठान असा कृष्ण. ४. ज्याच्या गंडस्थळांतून मदोदकाचा स्राव होत आहे असा हत्ती. ५. दुभंग होई. ६. प्रतिबंध. ७. वस्तुतः 'अवंत्यधिप' असा शब्द हवा होता. ८. घोड्यास. ९. चौक्या. १०. सर्प. ११. जोरानें. १२. पाठराख्ये. १३. वडील बंधूचें (विंदाचें).

गदा घेवोनी प्रभिन्नपाणी । टाकोनी उडी धांविला. ॥ ८७ ॥ गदामंडळें विगती गती । दावोनी भाळीं[1] रुक्मिणीपती । ताडितां, डोलती मौळाप्रती । जेवीं मैनाक[2] सुवज्रें. ॥ ८८ ॥ तेणें फाल्गुना क्रोधभरितें । दाटोनी सोडी षट् शरांतें । पाद, भुजा, ग्रीवा[3], खंडुनी धूर्तें । शिर व्योमा उडविलें. ॥८९॥ जैसा पर्वत खचे धरणी । तैसें कलेवर पडे रणीं । सेना मर्दीनी केली धुंणी[4] । जेवीं दावाग्नी वनातें. ॥ ९०॥ अर्जुन ह्मणे, 'रमाधवा! । अच्युता! अनंता! केशवा! । अपार पार विधी, भवा, । संकर्षणा नेणवे. ॥ ९१ ॥ नरहरी! नरसिंहा! सामराजा! । मुकुंदा! मुरारी! गरुडध्वजा! । कृष्णा! वामना! अधोक्षजा! । नारायणा! श्रीपती! ॥ ९२ ॥ वरवाळले कौरवभार । जयद्रथातें बहु अंतर । श्रांत वाजी, इतस्ततः वीर । शरांचीं क्षतें सर्वांगीं. ॥ ९३ ॥ यामाजी प्राप्त माध्यान्ह समय । तप्तरश्मी वर्षे सूर्य । आज्ञेनुसार करीन सोय । तारक अर्णवीं शत्रूच्या.' ॥ ९४ ॥ श्रीहरी वदे, 'हॅरी आधीं । तोषोनी प्रवर्तिजे युद्धीं । दूर सारूनी वीरमांदी । उदकपाना निर्मिजे.' ॥ ९५ ॥ ऐकोनी कृष्णाच्या वचना । पार्थ प्रतापाचा राणा । शरीं रोधोनी कौरवसेना । सारी परा निघातें. ॥ ९६ ॥ जैसी प्रदीप्त हुताशनी[6] । माघां सरे जनांची भरणी[7] । स्थिर स्यंदन रथांगपाणी[8] । करुनी, उतरे तळातें. ॥९७॥ फाल्गुन विद्येचा मेंगळा । हस्तलाघव विचित्रकळा । वर्षोनी शरौघ अग्निमाळा । भूमी आकाश छादिलें. ॥ ९८ ॥ उभय कृष्ण धरणी स्थिर । संधी पाहोनी लोटले वीर । 'घ्या घ्या' शब्दा फोडुनी क्रूर । बाणजाळीं वर्षती. ॥ ९९ ॥ पार्थं विगत करूनी सर्वां । शैरावर्त घातला बरवा । वातही स्पर्शों न शके हवा । अभेद वज्र ज्यापरी. ॥ १०० ॥ वरुणास्त्र जपोनी बीजमंत्रें । शर सोडिले पाताळयंत्रें । भेदोनी उसळतां वक्रें । जळकल्लोळ दाटले. ॥ १०१ ॥ रम्य सरोवर बहळ[11] जळें । विकाशमान प्रफुल्ल कमळें । हंसकारंडकाचे[12] मेळे । चक्रवाकादि शोभले. ॥ १०२ ॥ मच्छ, कच्छ, जळचर सैरा । तळपती, उसळती भिन्नाकारा । मंद, सुगंध, शीतळ, वारा । वृद्धी श्रांता तोषातें. ॥ १०३ ॥ हर्ष पावोनी चक्रपाणी । अर्जुना स्तवी सुधावचनीं । आलिंगोनी

---

१. बाणांनीं. २. पर्वतविशेष. पूर्वी पर्वतांस पंख होते, यामुळें ते वाटेल तिकडे उडून जात असत व तेणेंकरून लोकांस फार त्रास होत असे. यास्तव इंद्रानें आपल्या वज्रानें त्यांचे पंख तोडिले–अशी कथा आहे. ३. मान. ४. आगटी, शेकोटी. ५. घोडे. ६. होळी. ७. चेप, गर्दी. ८. चक्रपाणी (कृष्ण). ९. प्रतिमा, मूर्ति, अवतार. १०. बाणांचा गराडा. ११. विपुल जलानें युक्त. १२. कारंडक=बदक.

प्रीतीकरूनी । पाठी थापटी स्वहस्तें. ॥ १०४ ॥ परमानंदें वस्त्राभरणें । सांवरूनी वाजी सोडिले प्रवीणें । कुरवाळुनी श्रीकरें पूर्णें । शर आंगींचे उपडिले. ॥ १०५ ॥ जैसा सुषेण औषधी । उपचारीत सुमित्रयुद्धीं[1] । तैसे हय जाले बळसमृद्धी । पाणिलाघवें[2] हरीच्या. ॥ १०६ ॥ प्रवेश करुनी सरोवरीं । जळ प्राशवी धणीवरी[3] । भक्तवत्सल श्रीकृष्ण शौरी । पूज्य पुरारिविधींतें. ॥ १०७ ॥ आराध्यमूर्ती त्रिभुवनाची । तो सेवा करी पार्थहयाची । भक्तभावना आवडीची । प्रेमा हरी भुकेला. ॥ १०८ ॥ धन्य पार्थाचा भक्तिमहिमा । सहस्रमुखातें[4] नेंपवे सीमा[5] । थकित मुनींद्र, देव, ब्रह्मा । विस्मयानंदें लक्षिती. ॥ १०९ ॥ ज्या करीं अमरी[6] मघवा । वोपोनी, स्थापिलें अक्षयी ध्रुवा । भवार्णवाचा दूर करूनियां गोवा[7] । वर्धवी दासा मुक्तते. ॥ ११० ॥ रमाकुचाग्रीं[8] जे का पाणी । स्पर्शतां निवे जगत्स्वामिणी । तयाकरें कैवल्यदानी । क्षाळी हय पार्थाचे. ॥ १११ ॥ ज्याचें शासन त्रिभुवना । शिक्षा करी[9] जो जंळजासना[10] । तो हया चाबूक खोवोनी माना । मुगुटावरी आवडी. ॥ ११२ ॥ सुरस दंत रमाअधरीं । क्षतें विलास रतिसमरीं । तया रदनीं वाजींची दोरी । धरुनी क्षाळी चहूं भुजीं. ॥ ११३ ॥ चरणपासाव उद्भव गंगा । अहिल्याशिळा उद्धरे सुभगा । ते पादें चुरुनी हय अंगा । पाहे मळ गेला कीं.॥११४॥ राजित तनू केशरउटी । लाळ माखिली निबिड पृष्ठी । प्रेम वसे मुखसंतुष्टी । पाहोनी कडे काढिले. ॥ ११५ ॥ अमृतकर लागतां सहजीं । श्रमातीत[11] थरकती वाजी । 'बाप! बापा!' म्हणे 'हो!' जी! । मायबाप विश्वाचा. ॥११६॥ रमा रमणी मंगळसूत्रें । वरी, त्या करीं हयाचीं सूत्रें । योजोनी स्यंदनीं प्रीतिपात्रें । धरी उजू आवडी[12]. ॥ ११७ ॥ स्यंदनारूढ धनंजय । जाणों माध्याह्नी प्रदीप्त सूर्य । विगत मानसें नृपवर्य । म्हणती, 'अंत पुरला. ॥ ११८ ॥

---

१. ज्यांत लक्ष्मणास शक्ती लागली होती, त्या युद्धांत. २. हस्तकुशलतेनें. ३. तृप्ति होईपर्यंत. ४. शेषातें. ५. अंत लागत नाहीं. ६. अमरावती पुरी. ७. गुंता. ८. वर्णनसादृश्यः—तों झालेंसें मध्यान्ह । वारू रथींचें तृषित जाणून । तेव्हां कुरुक्षेत्रींचें जीवन । पाजवी जगजीवन ते काळीं ॥ हयकंडू खाजवी नखेंकरून । ओंजळी भरुनी उडवी जीवन । तें देखोनी देवर्षिगण । आश्चर्य करिती मानसीं. ॥ जे हस्त इच्छीत रमा उरीं । देव इच्छिती मस्तकावरी । सदाशिव ध्यान धरी । न धारती तरी मानसीं. ॥ ब्रह्मा जन्मलासे [ज्या] उदरीं । तो दृढ आकळी हयदोरी । तुरंग धांवोनी झडकरी । रथास जुंपी लगबगें. ॥ (शुभानंदी भीष्मपर्व ३२।३२–३५). ९. उपदेशी. १०. कमलासनास, ब्रह्मदेवास. ११. परिहार झाला आहे ज्यांच्या श्रमांचा असे. १२. ओंव्या ९–१७ नरहरीनें आपल्या प्रतिभाकौशल्यानें निर्माण केलेल्या आहेत.

खळ कुटिल **दुर्योधन** । दुराविले **कुरुनंदन** । सर्वां क्षत्रियां आणिलें मरण । भूतगणा आल्हादू. ॥ ११९ ॥ **पार्थ**विद्येचें लाघव थोर । श्रांत हयांतें पाजिलें नीर । अद्भुत करणी, वांचतां वीर । **सैं**धव आजी दिसेना. ॥ १२० ॥ क्षात्रधर्म क्षत्रियां आप्त । माघां सरतां अधःपात' । ऐसें वदोनी नृपनाथ । सेनाभारीं मिनले. ॥ १२१ ॥ **पार्थ** प्रतापी वीर गाढा । रथ लोटोनी जाहला पुढां । स्फुरुनी **गां**डीव, वाहोनी मेढीं । बाण कोटी सोडिल्या. ॥ १२२ ॥ जाणों अग्नीच्या प्रळयधारा । तैसे शर सुसाटती सैरा । विगत मानसें माघारा । पंथ लक्षिती निघावया. ॥ १२३ ॥ तंव **दुर्योधन** पिटोनी बाह्या । लोटला समरीं **धनं**जया । **कौ**रवीं मानलें महाभया । न ये आतां परतोनी. ॥ १२४॥ '**पा**र्थासन्मुख जो जो वीर । गेला, तेणें **कृ**तांतघर । वसविलें, त्याचा समाचार । नाहीं कोणीं आणिला. ॥ १२५ ॥ धांवा, रक्षा नरपार्थिव' । ऐसें वदोनी लोटे सर्व । वीरश्रीभरें लघुलाघव । शरपंजरीं वर्षती. ॥ १२६ ॥ पुढें पाहोनी **दुर्योधन** । **पार्थ** तुकोनी बोले मान । म्हणे 'भला! भला! वीर प्रवीण! । दाविलें मुख रणरंगीं. ॥ १२७ ॥ वस्त्रहरणीं प्रफुल्लवाणी । करुनी छळिली **या**ज्ञसेनी । त्याचें उसणें आजी रणीं । घेई बाणीं, पापिष्ठा!' ॥ १२८ ॥ येरू वदे रोषावर्ती । '**कृ**ष्णाश्रयें बोलसी शक्ती । तरी मी आजी उभयांप्रती । **काळ**सदनीं वसवीन.' ॥ १२९ ॥ ऐसें वदोनी **दुर्योधन** । वर्मांग भेदी तीक्ष्ण बाण । शरासनीं कर्षोनी[1] पूर्ण । तीन **पा**र्था अर्पिले. ॥ १३० ॥ चारी चहूं वारुवासीं । ताडिले दाहा **हृ**षीकेशी । प्रतोद[2] तोडुनी त्वरेंसी । धरणीवरी पाडिले. ॥ १३१ ॥ चित्रविचित्र शिळाशित । वर्मभेदी महाज्वलित । चौदा बाणीं **सु**भद्राकांत । ताडिलें हटें निघातें. ॥ १३२ ॥ त्यांवरी आणीक पांच नव । वर्म भेदोनी शिरकले हवे । त्यांवरी आठ शत तीक्ष्ण सर्व । गात्रस्थानीं ताडिले. ॥ १३३ ॥ तेणें विकळ केला **पार्थ** । विस्मयमान **गो**पीनाथ । म्हणे, '**फा**ल्गुना! विपरीतार्थ । आजी कैसा वर्तला? ॥ १३४ ॥ पश्चिमे उगवला **दि**नकर । **गं**गावोघ चढे शिखर । वन्हीस बाधी शीतज्वर[3] । वश्य तापा **चं**द्रमा. ॥ १३५ ॥ वडवाग्नीसी मोडशी[4] । तृषेनें पीडित जळराशी[5] । गरुड आहाळला सर्पविषीं । धुळीं आकाश बुडालें. ॥ १३६ ॥ तैसा विपर्यय[7] आजी घडला । तव बाण भेदिती पर्वतमौळा । ते विफळ हो-

---

१. धनुष्याची दोरी. २. चाबूक. ३. अतिसार. मागें अ० ३, ओं० १९ पहा. ४. समुद्र. ५. भाजला. ६. ओंवी १३५-१३६ यांत **असंभवा**लंकार आहे. ७. उलटा प्रकार.

वोनी पडले । तृणांकुरांसारिखे. ॥ १३७ ॥ तुझा प्रताप प्रफुल्ल स्वर्गीं । धरणी वाणिजे भूपवर्गीं । ते विडंबण संग्रामसंगीं । विचित्र डोळां देखिलें.' ॥१३८॥ **अ**र्जुन वदे, 'अंबुजानना! । **अं**बुधिशयना! **ना**रायणा! । **अं**बुजोद्भवप्रिय-करणा! । विदित चरणा सर्वही. ॥ १३९ ॥ कवच मंत्रोनी विधियुक्तें । **द्रो**णें बांधिलें यातें हातें । जें [1]अभेद्य कुलिशातें; । मज ही विद्या ठाउकी. ॥ १४० ॥ तयानिमित्त बाणचलथा । वृथा जाहली **ज**गन्नाथा! । तरी मी भ्रष्ट करीन आतां । पाहें **अ**च्युता! [2]नवलाहो.' ॥ १४१ ॥ ऐसें वदोनी **गां**डीवधन्वा । शर सोडिले अग्निप्रभवा । **द्रो**णपुत्रें लक्षुनी बरवा । छेदोनी धरे पाडिले. ॥ १४२ ॥ विस्मयमान उभय **कृ**ष्ण । तैं विषोपम नव बाण । **ज**नार्दनातें **दु**र्योधनें । महात्राणें अर्पिले. ॥ १४३ ॥ विचित्र वर्षोनी बाणजाळीं । **पा**र्थ बुजिला शरातळीं । **कौ**रववीर [3]रणगोंधळी । पिटोनी टाळी नाचती. ॥ १४४ ॥ क्रोधयुक्त **श्वे**तवाहन । अधर चावोनी सोडिले बाण । प्राणघाती महाज्वलीन । **य**मदंडासारिखे. ॥ १४५ ॥ सुसाट उतरूनियां क्षिती । सहित अश्व उभय सारथी । छेदोनी चाप प्रभिन्नकांती । हातींचा [4]हस्तावाप खंडिला. ॥ १४६ ॥ रथांगाचीं अष्ट शकलें । करुनी भ्रष्टिला स्यंदन [5]सळे । मही वरितां **कौ**रवपाळें । सेना दृष्टी विलोकी. ॥ १४७ ॥ 'आहा!' शब्दीं लोटोनी वीर । पाठीसी सुदला **कौ**रवेश्वर । तोष पावोनी **र**मावर । स्फुरी शंख उत्साहें. ॥ १४८ ॥ असो पुढां संग्राम थोर । [6]झोटधरणीं भिडती वीर । श्रोतेसज्जनीं प्रेमादरें । कथामृत सेविजे. ॥ १४९ ॥ श्री**भी**मराज-कृपातुषार । धारणा महीसमान [7]उखर । दवणा **न**रहर **मो**रेश्वर । मघमघीत **ह**रिगुणीं. ॥ १५० ॥

---

[8]अध्याय अठरावा.

संजय, वदे 'नरनायका! । **कृष्णा**र्जुनें स्फुरिलें शंखा । तेणें [9]उतटली धरा देखा । घोषें दिशा व्यापिल्या. ॥ १ ॥ खळबळोनी **कौ**रवसेना । वीर उस-

---

१. इंद्राच्या वज्रानें भेद करण्यासही अशक्य. २. नवल, कौतुक. ३. युद्धास गोंधळाची उपमा देण्याचा प्रघात **मु**क्तेश्वराच्या काव्यांतही आढळतो. ४. ज्याघातवारण; धनुष्याच्या दोरीचा झटका बोटांना लागूं नये म्हणून बोटांना जें आच्छादन घालतात तें. ५. त्वेषानें. ६. केशाकेशि युद्ध झालें–हा इत्यर्थ. झोट=झोंटी=लांब केश. ७. नापीक, खडकाळ. ८. ह्या अध्यायांत मूळांतील १०४–१०९ अध्यायांचा सारांश आला आहे. ९. उफळली, तडली.

ळले रणांगणा । विचित्रवाहनें प्रदीप्त गगना । पूर्ण करिती स्वतेजें. ॥ २ ॥ हेमस्यंदन रुक्माभरणी[1] । ध्वजपताका प्रदीप्त किरणी । कुलीन[2] वाजी विचित्रवर्णी । सदृढ वेगें आगळे. ॥ ३ ॥ वीरवीरांच्या दिव्य पंक्ती । जाणों ग्रह ज्वलनकांती । चतुरंगसेना प्रभिन्नशक्ती । गंगापुरासारिख्या. ॥ ४ ॥ भूरिश्रवा, शल, वृषसेन, । कृपाचार्य, जयद्रथ, कर्ण, । अश्वत्थामा, शल्य आठवा जाण । दिग्गजमान[3] लोटले. ॥ ५ ॥ रुक्मकार्मुकें प्रभिन्न हातीं । रुक्मपुंख[4] शर शिळाशिती[5] । रुक्माभरणें प्रदीप्तकांती । मुक्तमाळा साजिर्‍या. ॥ ६ ॥ सहित वीर दुर्योधन । लोटले जैसे प्रावृटीं[6] घन । नाना अर्णव दाटले भरणें[7] । इंदूदयीं ज्यापरी. ॥ ७ ॥ सिंहनाद करुनी वीरीं । शंख वाहिले प्रभिन्न स्वरीं । अनेक वाद्यें सुखकारी । नादें दिशा व्यापिल्या. ॥ ८ ॥ दृष्टीभेटी[8] येकमेकां । रोषें अग्नीच्या प्रदीप्त शिखा । ताडी द्रौणीयें[9] यदुनायका । त्रिसप्त बाणीं निघातें. ॥ ९ ॥ प्रभिन्न बाण विंधिले पार्था । पांच पांच अश्वांसही तथा । ध्वजास्तंभीं अंजनीसुता । शरें एकें ताडिलें. ॥ १० ॥ रोषावर्ती गांडीवपाणी । कर्ण विंधिला दाहा बाणीं । वृषसेन वीर महामानी । शरत्रयें ताडिला. ॥ ११ ॥ शरासहित शरासन । छेदोनी शल्य महान । येरें अन्य धनुष्य घेवोनी पूर्ण । बाण पार्था वोपिले. ॥ १२ ॥ शिळाशित सुवर्णपुंख । अर्पी त्रया भूरिश्रवा देख । कर्ण विंधी शाहत्तर सायक । विषोपम साजिरे. ॥ १३ ॥ वृषसेन ताडी सात शर । जयद्रथ अर्पी सत्याहत्तर । कृप, मद्रेश, दाहा दाहा क्रूर । वोपी पार्था निघातें. ॥ १४ ॥ अश्वत्थामा चौसष्ठी बाणीं । ताडी नरसिंह गांडीवपाणी । वीस अर्पोनी चक्रपाणी[10] । पांच पार्था समर्पी. ॥ १५ ॥ न गणोनी तयाचे तीव्र बाण । उभय कृष्ण हर्षवर्धन । फाल्गुन वीरपंचानन[11] । सोडी शर निघातें. ॥ १६ ॥ कर्ण विंधिला बारा बाणीं । वृषसेन तीन काळमानी । शल्यधनुष्य छेदोनी गुणीं[12] । धरेवरी पाडिलें. ॥ १७ ॥ तीस शरीं ताडिला सोमदत्त । शल्यासी अर्पिले दाहा त्वरित । वन्हीसमान धगधगीत । द्रौणीतें आठ ताडिले. ॥ १८ ॥ पंच शर गौतमतनया । शत अर्पिले सैंधवराया ।

---

१. सोन्यानें शृंगारिलेले. २. उत्तम, जातिवंत. ३. दिग्गजांसारखे. हे दिग्गज आठ दिशांस उभे राहून जगाचें संरक्षण करीत असतात. ह्यांचीं नांवें:–'ऐरावतः पुण्डरीको वामनः कुमुदोऽञ्जनः । पुष्पदंतः सार्वभौमः सुप्रतीकश्च दिग्गजाः ॥'. ४. सोन्याचे पिसारे ज्यांना आहेत असे. ५. साहाणेवर पाजविलेले. ६. पावसाळ्यांत. ७. भरती आल्यामुळें. ८. नजरानजर. ९. द्रोणपुत्र (अश्वत्थामा). १०. कृष्णाला. ११. वीरश्रेष्ठ. १२. गुण=धनुष्याची दोरी.

सत्याहत्तर चिरंजीविया[1] । द्रोणपुत्रा वोपिले. ॥ १९ ॥ भूरिश्रवा क्रोधावर्ती । रोषें ताडी कमळापती । प्रतोद[2] हातींचा छेदोनी निगुती[3] । पृथ्वीवरी पाडिला. ॥ २० ॥ सत्याहत्तर धनंजया । अर्पण करी महाराया ! । पार्थें प्रतापें पिटोनी बाह्या[4] । शत बाण समर्पी. ॥ २१ ॥ घोर संग्राम अतिदारुण । माजला राम-रावणप्रमाण[5] । ईडेपाडे[6] वर्षती बाण । उसण्या[7] घायीं निघातें. ॥ २२ ॥ धरा आकाश तिहीं बाणीं । व्यापिली, न दिसे वासरमणी । वीर उत्साहें रणां-गणीं । जयालागीं तळपती. ॥ २३ ॥ हर्षनिर्भर चक्रपाणी । पांचजन्य स्फुरी वदनीं । घोषें दाटली पूर्ण अवनी[8] । बैसलीं टाळीं[9] काळाचीं. ॥ २४ ॥ येरीकडे धर्मराजा । युद्धा पातला भारद्वाजा । समागमीं वीर, तेजें[10] । मार्त-डातें लोपती. ॥ २५ ॥ वरवाळतां[11] येरयेरां । आड रिघोनी वर्षती शरा । इंद्रयुद्धाचा उभारा[12] । थोर निकर माजला. ॥ २६ ॥ घोर संग्राम कडकडाटी । रोषें मिठ्या घालिती कंठीं । आसडोनी भूतळवटीं । एकमेकां पाडिती. ॥ २७ ॥ वीरश्रीभरें दाटले वीर । झोडिती वीर महानिकरें । छिन्नगात्रीं गळती रुधिरें । न गणोनी पुढां लोटती. ॥ २८ ॥ धर्मराज वीरश्रीरंगें । द्रोणाप्रती थडकला अंगें । नव्वद सायक महारागें । गुरुवर्या अर्पिले. ॥ २९ ॥ भारद्वाज अग्निप्रतिमा । पंचवीस शर ताडिले धर्मा । येरू क्षो-भोनी, राजसत्तमा[13] ! । वीस द्रोणा अर्पिले. ॥ ३० ॥ तेणें गुरुवर्य क्रोधावर्ती । चाप छेदोनी पाडिलें क्षिती । सहस्र शर महापूर्ती । सोडुनी धर्मा छादिलें[14]. ॥ ३१ ॥ 'आहा' शब्द सेनावदनीं । म्हणती 'राजा मारिला रणीं' । येरू सावध अंतःकरणीं । अन्य धनु वाहिलें. ॥ ३२ ॥ सहस्रशः वर्षतां शर । द्रोण खंडी वरच्या वर । अद्भुत चोज विस्मयाकर । वीर चक्षीं[15] लक्षिती. ॥ ३३ ॥ द्रोण विद्येचा मेरगळा[16] । कार्मुक खंडुनी पाडिला तळा । आरक्त नेत्र अग्निज्वाळा । वमी[17] गरळा विशाळा. ॥ ३४ ॥ धर्म संतप्त रोषआयनी[18] । शक्ती योजिली काळभगिनी । हेमदंड अष्टघंटा किरणी । ब्रह्मदंडासारिखी.

---

१. अश्वत्थामा चिरंजीव आहे अशी समजूत आहे. २. चाबूक. ३. त्वरित किंवा खरोखर. ४. भुजा, बाहु, दंड. ५. मूळांतही हाच दाखला आहे (अध्याय १०६।१७). ६. ईर्ष्येनें, चढाओढीनें. ७. स्पर्धेनें व ताबडतोब. ८. पृथ्वी. ९. कानटाळीं बसलीं, कान किटले, कान बहिरे झाले. १०. तेजानें, प्रतापानें. ११. वरवाळणें=चढाई करणें, आंगावर धावणें. हा शब्द मुक्तेश्वराच्या कवितेंत वारंवार आढळतो. [आदिपर्व-अध्याय २३।११७; सौप्तिकपर्व-अ० २।७६ पहा.] १२. गर्दी, धुमाकुळ. १३. हे राजश्रेष्ठा (धृतराष्ट्रा !). १४. (बाणांनीं) आच्छादिलें. १५. डोळ्यांनीं. १६. मूर्ति, प्रतिमा, अवतार. १७. ओकें. १८. रागाचा सांठा किंवा रागाचा चेव.

॥ ३५ ॥ मुखें पाहुनी भैरव शब्द । फांकिली रोषें महा विशद । तेजें दिग्गज पावले खेद । येतां **द्रो**णें लक्षिली[1]. ॥ ३६ ॥ परमास्त्र जाणतां **द्रो**णाचार्य । अस्त्रप्रयोग करुनी वर्य । जाळोनी शक्तीचा पुसिलों[2] ठाय । रक्षा[3] करुनी टाकिली. ॥ ३७ ॥ कोपोनी **ध**र्में प्रेरिली गदा । उसळतां वीर पावले खेदा । सावध **गु**रुवर्य सर्वदा । गदा रोषें फेंकिली. ॥ ३८ ॥ येरयेरां आदळोनी पूर्ण । भूमी पडल्या आदळोनी छिन्न । **द्रो**णाचार्य क्रोधायमान । फणीपरी फुफाटे. ॥ ३९ ॥ निशित शर सोडुनी निगुती । च्यान्ही वारू पाडिले क्षिती । कार्मुक खंडून हातोहातीं । छेदोनी ध्वज पाडिला. ॥ ४० ॥ तीन शर काळविखारी[4] । अर्पण केले क्षणांतरीं । विगतसामादि धरेवरी । **कु**रुवर्य आतला. ॥ ४१ ॥ 'आहा!' शब्द पृतनामांदीं[5] । म्हणती 'राजा मारिला युद्धीं' । उड्या घालोनी वीर संधी । **ध**र्मराज वेष्टिला. ॥ ४२ ॥ **स**हदेवें प्रेरुनी रथोत्तम । वरी घेतला राजा **ध**र्म । वीर लोटले तीव्रविक्रम[6] । येरयेरां निघातें. ॥ ४३ ॥ **बृ**हत्क्षत्र **कै**कयराज । वीरांमाजी वीरश्रीतेज । लोटतां **क्षे**ममूर्ती[7] वीर पैज । घालोनी मार्गण[9] मोकली[8]. ॥ ४४ ॥ **बृ**हत्क्षत्र क्रोधानळीं । नतपर्वणी नव्वद भाळी । अर्पण करुनी हृदयकमळीं । चाप हातींचें खंडिलें. ॥ ४५ ॥ **क्षे**ममूर्ती अति आवेशें । अन्य कार्मुक वाहिलें रोषें । शर सोडुनी काळविष । वर्म संधी भेदिलें. ॥ ४६ ॥ येरू हांसत हांसत पाही । सायक सोडिले जैसे अही । अश्वसारथी पाडिले मही । रथासहित एकंदा[10]. ॥ ४७ ॥ त्वरा करुनी शरसंधानीं । शिर खंडुनी उडविलें गगनीं । मुगुटकुंडलें प्रकाशकिरणीं । दिशा दाही डवरिल्या[11]. ॥ ४८ ॥ **बृ**हत्क्षत्र पावतां जया । **धृ**ष्टकेतु लोटला राया! । **वी**रधन्वा आडवा तया । होवोनी वर्षे शरांतें. ॥४९॥ परस्परें रणधुमाळी । वीर मिनले क्रोधानळीं । उभय शरांची साउली । तरणिकिरण[12] लोपले. ॥ ५०॥ जैसे वनांतरीं मदोत्कट । हस्ती हस्तींसी भिडती नेटें । कीं सिंहासिंहांचे चपेटे । एकमेकां ताडिती. ॥ ५१ ॥ तयापरी उभय वीर । निकरें भिडती, वर्षती शर । **वी**रधन्वा प्रतापशूर । लघुलाघवविक्रमी. ॥ ५२ ॥ नतपर्वणी तीक्ष्ण बाणीं । चाप खंडुनी पाडिलें धरणी । **धृ**ष्टकेतु क्रोधआयनी । मोकळी शक्ती सरोषें. ॥ ५३ ॥ कडकडुनी दामिनीमानें[13] ।

---

१. ह्या क्रियापदाचा कर्ता 'शक्ति'. २. ठाय पुसिला=मागमूस देखील नाहींसा केला. ३. भस्म. ४. काळसर्प. ५. सेनेच्या पथकांत. ६. अत्यंत पराक्रमी. ७. मूळांत 'क्षेमधूर्ति' असें नांव आहे. हा पांडवांच्या पक्षाकडे होता. ८. बाण सोडिता झाला. ९. बाण. १०. एकदम. ११. भरल्या, शोभूं लागल्या. १२. सूर्यकिरण. १३. विजेप्रमाणें.

हृदय भेदुनी निर्वाली त्राणें[१] । प्राणपंचकीं सोडुनी ठाणें । **य**मगृहा वरियेलें. ॥ ५४ ॥ त्रिगर्तवीर **वी**रधन्वा । पडतां, दुर्मुख जाहला आडवा । पुढारूनी अग्रता हवा । **स**हदेवा ताडिलें. ॥ ५५ ॥ येरें वमोनी क्रोधउल्का । निशित शर अग्निशिखा । शत अर्पोनी **कु**रुनायका । हास्य करी विनोदें. ॥ ५६ ॥ **दु**र्मुखें पावोनी रोषातें । नव बाण अर्पिले **स**हदेवातें । तेणें दाटोनी क्रोध-भरितें । शर वितंड[२] सोडिले. ॥ ५७ ॥ कडाडिलें विजूच्यापरी । ध्वज छेदुनी, अश्व चाऱ्ही । मारुनी, सारथी धरेवरी । शिररहित पाडिला. ॥ ५८ ॥ पुन्हा करुनी शरसंधान । **दु**र्मुखा वोपिले पंचवीस बाण । येरू डळमळोनियां पूर्ण । **नि**र्मित्ररथीं आरूढे. ॥ ५९ ॥ **स**हदेव अत्यंत क्रोधभरणी । **नि**र्मित्र ताडिला प्रभिन्न बाणीं । शिर उडवोनियां गगनीं । पुनः धरे पातलें. ॥ ६० ॥ **कौ**रव-दळीं हाहाकार । म्हणती, 'निमाला **त्रि**गर्तकुमर' । **व्या**घ्रदंत **कौ**रववीर । रोषें पुढें लोटला. ॥ ६१ ॥ तंव **सा**त्यकी सत्यविक्रमी । त्यातें थडके क्रोधऊर्मी । एकमेकां सायकवर्मी । महाक्रोधें ताडिती. ॥ ६२ ॥ **या**दव प्रज्वळोनी क्रो-धानळीं । प्रदीप्त सोडिल्या विशाळ भाळी[३] । ध्वजाश्वसारथी पाडिले तळीं । **व्या**[४]घ्रदंतसमवेत. ॥६३॥ **मा**गधपुत्र पडतां रणीं । सेना सज्ज लोटली कदनीं । 'ध्या, ध्या,' शब्द सर्वा वदनीं । अस्त्रमाळा मोकलिल्या. ॥ ६४ ॥ **मा**गधवीर ऐं[५]कवळा । करोनी, शस्त्रें वर्षती सैं[६]ळा । सरसराट शरौघमाळा । गदात्रिशूळ-खड्गादी. ॥ ६५ ॥ चक्रें, तोमरें, लहुडी, परिघ, । भिंडिमाळा, मुद्गल सैंघं[७], । शक्ती, भाले, पट्टे, अव्यंग । चहूं दिशा वर्षती. ॥ ६६ ॥ बाप **सा**त्यकी धनु-र्वाडा । बाणीं शस्त्रांचा करुनी रगडा । वीर पाडिले दडाडा । पाशें जेवीं मृगवृंद. ॥ ६७ ॥ कीं वना धडकतां दावाग्नी । तृ[८]णपादपा होय धुणी । तैसी सेना भ्रष्टतां कदनीं । क्रोध **द्रो**णा नावरे. ॥ ६८ ॥ धांवतां वीर लोटले पुढें । जाणों मेघाचे देहुंडे[९] हुंडे । उभयतां वीर वीरश्रीगाढे । महामारीं पेटले. ॥ ६९ ॥ **सो**मदत्तपुत्र **सो**मदत्ती । उसळोनी लोटतां क्षिती । **द्रौ**पदीतनय क्रोधावर्ती । पंच भ्रातर तं[१०]गटले. ॥ ७० ॥ जाणों पंच शाँवक[११] हरीचे । गजा लोटले विक्रमें साचे । शर वर्षले फणी विषोंचे[१२] । कीं कल्लोळ वन्हीचा. ॥ ७१॥ **सो**मदत्ती युद्धप्रवीण । एकएकासी पांच बाण । ताडी आणि महाज्वलन ।

---

१. त्राण (शक्ति) नाहींसें झालें; जोर जिरून गेला. २. मोठे किंवा कणखर. ३. बाणविशेष. ४. मूळांत 'व्याघ्रदत्त' असें आहे. ५. जूट, जमाव. ६. जोरानें, त्वेषानें. ७. पुष्कळ. ८. गवत व झाडें यांची धुणी (शेकोटी) होई. असाच दृष्टांत अध्याय १७ ओंवी ९० हींत आहे. ९. वाडे. १०. भिडले. ११. सिंहाचे बच्चे. १२. विखारी.

सात सात एकएका. ॥ ७२ ॥ ते पीड्यमान पंच भ्रातर । जेवीं नववधूकुचाग्रीं कर । स्पर्शतां चुळबुळी पळे दूर । कासावीस मानसें. ॥ ७३ ॥ तयापरी कुरुनंदनें । त्रास पावोनी मिनले त्राणें । दोन दोन शर तीक्ष्ण । गात्रस्थानीं ताडिले. ॥ ७४ ॥ न गणोनी येणें सोडिलें शरा । तीन तीन अर्पिले तया कुमरा । अधिकाधिक कोपोनी सैरा । वेष्टोनी भूपा वर्षले. ॥ ७५ ॥ श्रुतकीर्ती पार्थतनय । शर वर्षोनी मारी हय । प्रतिविंध्यें शरसमुदायें । ध्वज व्योमा उडविले. ॥ ७६ ॥ भीमपुत्र श्रुतसोम गाढा । चाप छेदोनी पाडिलें पुढा । सारथी [शरें] काळदाढा । शतानीकें सरोषें. ॥७७॥ सहदेवपुत्र प्रतापराशी । [1]नाराच वर्षोनी महारोषीं । शिर पाडिलें धरणीसी । बाळसूर्यासारिखें. ॥ ७८ ॥ इतस्ततः होवोनी गेली सेना । अलंबुष राक्षस पातला रणा । भीमसेन, [2]कुरुनंदना! । लोटला त्यातें निघातें. ॥ ७९ ॥ जैसा सुमित्र रावणकुमरा । कीं भृगुवर्य [3]सहस्रकरा । ना तो देवेंद्र वृत्रासुरा । तेवीं पांडव तगटला. ॥ ८० ॥ परस्परें बाण तिखार । वर्षती, फोडिती शब्द घोर । राक्षसी सेना भयंकर । वेष्टुनी भीमा ताडिलें. ॥८१॥ रथारूढ कोणप बळी । तीन शर पाडिले तळीं । पुनः वर्षोनी बाणजाळीं । चारी शतें मारिले. ॥ ८२॥ अलंबुष वमोनी क्रोधउल्का । बाण सोडी वन्हिशिखा । हृदयीं थडकतां देखा । घोर मूर्च्छा दाटली. ॥ ८३ ॥ क्षणें होवोनियां सावधान । धनु कर्षिलें आकर्ण घन । शर सोडुनी महाज्वलन । अंगप्रत्यंग भेदिलें. ॥ ८४ ॥ रुधिरस्रावें व्यापिली तनू । जाणों वसंतीं किंशुकी मानूं । काळवेळ भावोनी पूर्णू । [6]आठव करी [6]बंधूचा. ॥ ८५ ॥ '[7]मज नसतां प्रतापसिंधू । [5]बक मारिला माझा बंधू । त्याचें उसणें उतरीन मदू । वीरां सर्वां देखतां. ॥ ८६ ॥ जेवीं चोर करुनी चोरी । मुख न दावी लोकांतरीं । आजी सांपडला माझ्या करीं । बकभेटीसी धाडीन.' ॥ ८७ ॥ ऐसें वदोनियां वचनीं । घोर रूप प्रभिन्नवदनी । धरणी अदृश्य होवोनी झणीं । गगनोदरीं संचरे. ॥ ८८ ॥ तेथोनी वर्षे शरांच्या धारा । जाणों पर्जन्यवृष्टी सैरा । [9]राक्षसी माव प्रभिन्नाकारा । तयामाजी सुचवी. ॥ ८९ ॥ क्षणैक दिसे, क्षणैक न दिसे । क्षणीं अवनीं, गगनीं वसे । सरसराट शस्त्रघोषें । सेना मर्दी निघातें. ॥ ९० ॥ कौरव वीर नाचती रणीं । अनेक वाद्यें पिटिती [10]त्राणीं । असह्य मानोनी भीम गुणी । त्वष्टास्त्र वेगीं सो-

१. बाण. २. हे धृतराष्ट्रा! ३. कार्तवीर्य सहस्रार्जुनाला. ४. तीक्ष्ण. ५. राक्षस (अलंबुष). ६. भावाची (बकासुराची) आठवण करी. ७. मी हजर नसतां. ८. मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय ३८ पृ० ३४२–४८ पहा. ९. आसुरी माया (कपटविद्या). १०. उत्साहानें, जोरानें.

डिलें. ॥ ९१ ॥ अस्त्रप्रभवें निमाली माया । प्रत्यक्ष राक्षस जाहला, तया । शर सज्जिला [1]निंवटावया । तेजें दिशा डवरिल्या. ॥ ९२ ॥ राक्षसें फोडुनी हाक मोठी । आड निघाला **द्रो**णापाठी । वीर लोटले [2]महाहटी । वर्षती कोटी शरांच्या. ॥ ९३ ॥ उभय वीर [3]क्षताचे [3]घायीं । सरसरा रक्तें स्रवती मही । वीरश्रीमदें न गणोनी मही । पुढां [4]धंसती उत्साहें. ॥ ९४ ॥ **घ**टोत्कचें महामारीं । वीरां केली [5]आनपरी । दुःसह मानोनियां समरीं । **आ**र्षशृंगी थडकला. ॥ ९५ ॥ एकमेकां वारुनी, माया । दावोनी,: ताडिती क्रोधें तया । **राम**रावणासारिखें तया । युद्ध दोघां माजलें. ॥ ९६ ॥ **अ**लंबुष राक्षस महारोषें । ताडी [6]**भै**मीतें शर कर्कश । येरू प्रदीप्त महारोषें । बाण वीस समर्पी. ॥ ९७ ॥ उभय वीर विचित्र माया । करुनी, भेदिती शरें काया । लघुलाघव हस्तक्रिया । येरयेरां कूसता. ॥ ९८ ॥ शर वर्षतां उभयतां । आच्छादिला देव सविता । निबिड इंषूंची घोर [7]चळथा । मार्ग वाता न होय. ॥ ९९ ॥ जैसी गजगजांची धुमाळी । कीं सिंहासिंहांची [8]हातफळी । ना तें, गंडभैरवा भैरवमेळीं । तेवीं [9]खंदळी दोघांची. ॥ १०० ॥ वज्रासमान ताडिती शर । नादें थरारी अंबर । [न सहुनी वेगाचा बडिवार] । खचती शृंगें गिरीचीं ॥ १०१ ॥ **अ**लंबुष राक्षस क्रोधानळीं । जाणों प्रदीप्त [10]देवहेळी । **पां**डव वीर लोटले सकळीं । बाणधारीं वर्षती. ॥ १०२ ॥ **आ**र्षशृंगी प्रतापशूर । ताडी पंचवीस **भी**मा शर । **घ**टोत्कचाचें [11]स्तनांतर । पंच बाणीं विंधिलें. ॥ १०३ ॥ **यु**ष्टिरातें तीन हवा । सात अर्पिले **स**हदेवा । त्रिसप्त शर वन्हिरवा । **न**कुळाप्रती वोपिले. ॥ १०४ ॥ पांच पांच **द्रौ**पदीतनया । शर ताडिले **भार**तें तया । पांच शतें [12]कृशानुप्रमेया । **घ**टोत्कचा विंधिले. ॥ १०५ ॥ त्यांवरी आणीक सत्याहत्तर । शर वर्षोनी प्रभिन्न क्रूर । मुखें [13]निस्वनस्वर । काळमेघासारिखा. ॥ १०६ ॥ दुःसह मानोनी **पां**डववीरीं । **भी**में ताडिला नव शरीं । **स**हदेवें स्तनांतरीं । पांच सायक अर्पिले. ॥ १०७ ॥ नव शतें वोपले **यु**धिष्ठिरें । चौसष्ट क्रोधें **न**कुळें निकरें । तीन तीन **द्रौ**पदीकुमरें । **घ**टोत्कच पांच शर. ॥ १०८ ॥ सर्वांगें व्यापिलीं तिहीं बाणीं । रुधिरस्राव जाला धरणी । कोपोनी **अ**लंबुष चौगुणी । पांच पांच ताडी सर्वांतें. ॥ १०९ ॥ क्रोधें प्रदीप्त **भै**मी वीर । जाणों प्रळ-

---

१. मारावया. २. मोठ्या नेटानें लढणारे. ३. जखमा लागल्यामुळें. ४. घुसती, शिरती. ५. भलतीच अवस्था, दीन दशा. ६. भीमपुत्रातें (घटोत्कचास). ७. बाणांची रास. ८. हातपिटी, झुंज. ९. दांडगाई, धुमश्चक्री. १०. हेळी=सूर्य. ११. छाती, वक्ष. १२. अग्नीप्रमाणें. १३. भयंकर गर्जना.

यींचा वैश्वानर। शरासनीं[1] शर तिखार। रुक्मपुंखी सज्जिले. ॥११०॥ वोढ काढोनी आकर्ण पाहीं। सोडितां उसळले जैसे अही। हृदयीं भेदोनी लवलाही। धरेमाजी शिरकले. ॥ १११ ॥ पर्वतशृंग खचे तळा। तैसा रथावरी पडे हेळा[2]। **पां**डव वर्षती शरौघमाळा। बुजोनी रथा काढिलें. ॥ ११२ ॥ टाकोनी उडी, फोडुनी कीळा। **भै**मी धांवला उतावेळा। रथ फिरुनी नभःस्थळा। धरेवरी आपटिला. ॥ ११३ ॥ जैसा खगेंद्र उचलितां फणी। गळोनी पडे जेवीं धरणीं। कीं मृत्[3]कुंभपुटींत पाणी। नेतां पडे तळातें. ॥ ११४ ॥ कर्णिकार[4] वृक्ष वातमेळीं। भंगोनी शाखा मिळती धुळी। तेवीं दोघांची वैरदळी[5]। अष्ट दिशा लंघिती. ॥ ११५ ॥ वीर **अ**लंबुष भूमी लंबू। जाला[6], न लगतां विलंबू। **कौ**रवदळीं माजला बोंबू। **पां**डवां हर्ष अपाडे[7]. ॥ ११६ ॥ अनेक वाद्य लागली घाई। **भै**मी आलिंगी **ध**र्म हृदयीं। म्हणे, 'बाप! विक्रम-[8]सायी। निवालों रणीं तुझिया.' ॥ ११७ ॥ **आ**र्षशृंगी[9] **का**ळसदना। जातां भ्रष्टली राक्षसी सेना। अमित क्रोध पातला **द्रो**णा। प्रेरुनी रथा लोटला. ॥ ११८ ॥ पाठी वीरांची निबिड मिठी। **पां**डव वीर लोटले नेहटीं। उभय वीरांची महादाटी। शरांची वृष्टी माजली. ॥ ११९ ॥ तंव **पा**र्थयुद्धाचा कडाका। **कौ**रवदळीं फोडी हाका। [10]धुंईधूसरें आच्छादिलें अर्का[11]। धूमांकित धरित्री. ॥ १२० ॥ **पां**चजन्यनिस्वनस्वर। फुफाटी **दे**व **या**दवेश्वर। नादें दुमदुमी चराचर। **फ**णिवरें[12] तळीं घाबिरा. ॥ १२१ ॥ **कौ**रवदळीं चंडगर्जना। शंखादि वाद्य करिती नाना। श्रवणारूढ **कु**रुभूषणा[13]। होतां, दचके मानसीं. ॥ १२२ ॥ 'एकटा **पा**र्थ **सैं**धवहनना। गेला **कौ**रवी प्रभिन्न सेना। षड्रथी महाविखारी जाणा। सारिती परा **का**ळातें. ॥ १२३ ॥ वाटे **फा**ल्गुनाची विपरीत[14] करणी। **कौ**रव शब्द फोडिती रणीं। आणी चराचराचा धणी। कैवल्यदानी, **वि**श्वात्मा, ॥ १२४ ॥ अव्यक्त व्यक्त, घनसांवळा, । माया अगम्य लीळा। **ब्र**ह्मादि विनीत[15] पादकमळा। सेवे **क**मळा रतली[16]; ॥ १२५ ॥ तो तमालनीळ **गो**विंदू। ज्याचे आज्ञे चाले वेदू। जयश्रीचा आनंदकंदू। वाटे युद्ध करितसे.' ॥ १२६ ॥ ऐसे तर्क विचित्र नाना। तर्कितां कश्मल[17]

---

१. धनुष्याचे ठायीं. २. सहज. ३. मातीच्या मडक्यांत. ह्या ओंवींतील दोन्ही दाखले मूळांत आहेत. (अध्याय १०९, श्लोक २७–२९ पहा). ४. पांगाऱ्याचें झाड. ५. भांडण. ६. अलंबुषराक्षस भूमी (जमिनीवर) लंबू जाला (लंबा होऊन पडला)=मरून पडला. ७. निरुपम, पुष्कळ. ८. सायी= सावलीनें. ९. लक्ष्य लावून, एकाग्रचित्तानें, एकतानतेनें. १०. धुकें व धुरळा यांनीं. ११. सूर्यास. १२. शेष. १३. धर्माला. १४. अन्यथा, व्यर्थ. १५. नम्र. १६. रमली. १७. लाजिरवाणें.

वाटलें मना । छिन्नमानसें ग्लानी वचना । सात्यकीतें अनुवादे. ॥ १२७ ॥ तो कथारस सज्जनीं पाहीं । पुढिले प्रसंगीं सेविजे तेही । करुणारसाची नवलायी । सुधापानासारिखी. ॥ १२८ ॥ श्रीगुरुभीमराजजलधर । कृपाअंबरीं करितां प्रसर । मयूर नरहरि मोरेश्वर । टाहो करी हरिनामें. ॥ १२९ ॥

अध्याय एकोणिसावा.[1][2]

संजय म्हणे, "अवनीपती![3] । चित्तीं व्याकुळ धर्म सुमती । कंठ दाटोनी दुःखावर्ती । अश्रुपात ढाळीत. ॥ १ ॥ ऊर्ध्वरोम पुलकांकित । प्रीतियुक्त काळसंमत । मधुरारवें[4] न्यायमिश्रित । सात्यकीतें अनुवादे. ॥ २ ॥ जेवीं राघव सौमित्रातें । इंद्रजितयुद्धा धाडितां त्यातें । प्रशंसीत निजकार्यातें । तेवीं धर्मराज यादवा. ॥ ३ ॥ म्हणे, 'बापा! शिनिपुंगवा! । वीरवर्मा! सुमतिधवा! । शौर्यप्रताप समान मघवा । धनुर्धरां कुळगुरु! ॥४॥ कृष्णचरणीं अवक्र[5] प्रेमा । विहित मार्गें रक्षिसी धर्मा । गुरुसेवनीं आर्तगरिमा[6] । प्राणांतींही नाटळे. ॥५॥ वृष्णिकुळवर्य दिनमणी । श्रीकृष्ण, माधव, चक्रपाणी । उपेंद्र, माधव, कैवल्यदानी । जो पुराणीं गाइजे; ॥ ६ ॥ तो श्रीधर, शेषशाई । करी आमुतें कृपेची साई । तुझाही भाव आमुचे ठाईं । तयापरी यदुवर्या! ॥ ७ ॥ याहीमाजी प्रतापतरणी । तव गुरुवर्य फाल्गुन मानी । जो विख्यात वीर लोकीं तिन्हीं । प्राणप्रिय तुज ताता! ॥ ८ ॥ तेणें सैंधवहननाप्रती । आम्हां वोपिलें तुझ्या हातीं । कौरव वीर काळघाती । जिंकितां दुर्घट जाण पां. ॥ ९ ॥ यावरी भरंवसा पूर्ण । जो, जयाशेचें निकेतन[7] । जया म्हणती मधुसूदन । तो सारथी आमुचा. ॥ १० ॥ असतां पार्था अटक करणी । नाहीं, ऐसा भरंवसा मनीं । कौरव दुष्ट दुरभिमानी । काय करिती कळेना. ॥ ११ ॥ तुवां जावें वीरराया! । किजे अर्जुनाचिया साह्या । सदा जयश्री तुझ्या बाह्या । श्रीकृष्णतुल्य प्रतापी. ॥ १२ ॥ आमुचे हितीं अनन्य प्रीती । सदा जल्पतां कौरवघातीं । सुमित्रा! मित्ररक्षण आर्तीं[8] । करितां पुण्य लाहिजे. ॥ १३ ॥ मित्रअर्थीं त्यजितां प्राण । द्विजा वोपिलें पृथ्वीदान । फळ पावोनी सहस्रनयन । मानें आसनें गौरवी. ॥ १४ ॥ तूंही

---

१. या अध्यायाचें **'अलंबुषराक्षसवध'** असें नांव हस्तलिखित पोथींत दिलेलें आहे.
२. ह्या अध्यायांत मूळांतील ११०–११४ अध्यायांतील कथाभागाचा समावेश झाला आहे.
३. पृथ्वीपते. (धृतराष्ट्र.) ४. मधुरोक्तीनें. ५. निष्कपट. ६. जबरदस्त हौस. ७. स्थान, राहण्याची जागा. ८. संकटकाळीं.

जाणसी सर्व धर्मा । पृथ्वीदानीं आगळी महिमा । भूप वर्धले स्वर्गधामा । भोगकारी अमित. ॥ १५ ॥ मीही याचक धर्मात्मिया ! । याञ्चा[1] करितों जोडुनी बाह्या । आर्त[2] पुरवितां यादवराया ! । घडे दान महीचें. ॥ १६ ॥ कौरव वीर कडकडाटी । मशकप्राय तुझी दृष्टी । भ्रष्टोनी, रक्षो वीर किरीटी । गोप्ता[3] तूंची आमुतें. ॥ १७ ॥ अर्जुन स्वस्थ तुजकरितां । जयस्विया ! यादवनाथा ! । तव शक्तीची मातें कथा । विदित सर्व, सुमित्रा ! ॥ १८ ॥ तूं पुरुषार्थवीरपंचानना ! । भेदीं शत्रूची दुःसहसेना । तुझिया बळाची तैवक[4] निपुणा । वाहे दरारा कृतांतू. ॥ १९ ॥ हलायुध राम[5] संकर्षण, । अनिरुद्ध, प्रद्युम्न, सारण, । गद, सांबादि विक्रमघन । समान मान; यदुवर्या ! ॥ २० ॥ अद्वैतवनीं वीर पार्थ । तुझा प्रताप [पुरुषार्थ] । दावी[6]; निवटीं संकटांत । तोषवल्ली वर्धवीं. ॥ २१ ॥ पाहे पां सैनिका द्रवमान[7] । कौरवसेना उसळे घन । कौरव शब्द फोडिती त्राणें । काळमेघासारिखे. ॥ २२ ॥ पर्वीं[8] समुद्र क्षोभे[9] जैसा । वीर लाटा उसळती तैशा । गजाश्वरथी धांवती रोषा । धुळी व्योमा दाटली. ॥ २३ ॥ पार्थ उदित सैंधवहनना । आड षड्रथी प्रभिन्न सेना । द्वय कृत्य संपादिता निपुणा । अवकाश नसे पणातें. ॥ २४ ॥ याकारणें शिनिप्रवीरा ! । साह्य होईं पृथाकुमरा । तुज समान योद्धा दुसरा । प्रद्युम्न एक, मी मानीं. ॥ २५ ॥ तूं अस्त्रज्ञ श्रीकृष्णसम । समानबळ बळिराम । अर्जुनासारिखा विक्रम नेम । जैंयस्वी[10] इंद्र दुसरा. ॥ २६ ॥ सर्वा गुणीं अळंकरण । धनुर्वेद अवगत पूर्ण । फाल्गुन जैंष्य[11] जैसा प्राण । ऐसा निश्चय मी मानीं. ॥ २७ ॥ तुझा गुरु श्वेतवाहन । त्यासी पूज्य मधुसूदन । तत्समान मानी मज अर्जुन । तुजही मान्य धर्मता. ॥ २८ ॥ साच करुनियां माझिया वचना । विभांडूनी[12] कौरवसेना । किरीटीसाह्य करीं निपुणा । यशें पार्था गौरवीं.' ॥ २९ ॥ प्रीतियुक्त मधुरवाणी । न्याययुक्त अर्थवर्धनी । तोषें पावोनी सात्यकी गुणी । धर्माप्रती अनुवादे. ॥ ३० ॥ म्हणे, "धार्मिका ! धर्ममूर्ती ! । धर्मात्मया ! स्वधर्मप्रीती । तुझिया वचनें निवालों चित्तीं । जेवीं पांथिक सुच्छाया[13]. ॥ ३१ ॥ राजराजया ! मुगुटमणी ! । बोलिलें सोरें[14] यथार्थ वाणी । कोळयुक्त[15]; वीरश्रीखाणी । योग्य

---

१. याचना, मागणी. २. इच्छा. ३. रक्षण कर्ता. ४. तेज. ५. बळराम. ६. वर्णीत असे. ७. पळणाऱ्या. ८. अमावास्या व पौर्णिमा या दिवशीं. ९. फार उचंबळे. १०. विजयशाली. ११. विजयी, पराक्रमी. १२. दाणादाण करून (वि+भंज्=भंग करणें). १३. उत्तम छायेच्या योगानें. १४. उत्तम, श्रेष्ठ. १५. प्रसंगोचित.

आह्मां क्षत्रियां ॥ ३२ ॥ माझा पुरुषार्थ स्फुरिलों[1] वदनीं । तो यथार्थ साच, चक्रपाणी । कौरवी सेना विभांडीन रणीं । जेवीं गरुड सर्पातें. ॥ ३३ ॥ साह्य होऊनी धनंजया । जयद्रथ धाडीन यमालया । पार्थविक्रमाची अगम्य क्रिया । चिंता केवीं मानसीं? ॥ ३४ ॥ सुरांसहित सुरेश्वर । यक्ष, राक्षस, दानववीर, । उरगदैत्यादि[2] नृपवर । मिनतां[3] पार्थ जयश्री. ॥ ३५ ॥ जेवीं वना धडकतां कृशान[4] । त्यास आडवों शके तृण? । कीं क्षयांतीं[5] लोटतां वारिधी[6] जाण । काष्ठपाषाण थोकिती[7]? ॥ ३६ ॥ ना ते संवर्तक[8]पर्जन्य-धारा । अल्पवातें वितळती? वीरा! । कीं कल्पांतसूर्य तपतां, शौर्या[9] । पर्णझोंपडी साहिजे? ॥ ३७ ॥ तयापरी क्षोभावतीं । कोण आवरी पार्थाप्रती? । जाली जयद्रथाची शांती । निश्चय मानीं, नरेंद्रा! ॥ ३८ ॥ तथापि तवाज्ञा प्रमाण । शिरसा वंदोनी करी गमन । परी आड रिघे पार्थवचन । परिहारिलें पाहिजे. ॥ ३९ ॥ ऐकत असतां सर्व सेना । जातां पार्थ सैंधवहनना । मातें बोलिला, 'विचक्षणा[10]! । यत्नें धर्मा रक्षिजे. ॥ ४० ॥ गुरुवर्य उदित[11] धर्मग्रहणीं[12] । सदा जपे युद्धआयनी । संधी पाहे अनुदिनीं यत्नीं । जेवीं चोर धनातें. ॥ ४१ ॥ सर्वास्त्रभेदी द्रोणाचार्य । काळविखारी[13] भूपतिवर्य । मिनले, अनर्था करिती सोय । क्षणीं धर्मा न विसंबें. ॥ ४२ ॥ सात्वता! मसी न करीं चिंता । जयद्रथ वधीन सूर्य असतां । मम नेमाची वृद्धि ताता! । भंगों नेणें परमेष्ठी. ॥ ४३ ॥ तुझा भरंवसा निजमानसीं । मी जातसें संग्रामासी । खचतां आकाश रोधिसी[14], त्यासी । द्रोणकेवा[15] कायसा? ॥ ४४ ॥ माझा सारथी रमारमण । मारजनक, मधुसूदन । अच्युत, अनंत, अरिमर्दन । उग्रविक्रम, पुरुषार्थी. ॥ ४५ ॥ विष्णु, जिष्णु, इंदिराधव, । गोविंद, गोपाळ हरि, केशव, । मुकुंद, मुरारी, तारक[16] भव[16] । भक्तवत्सल कृपाळू ॥ ४६ ॥ असतां, चराचर सर्व लया- । क्षया नेईन यादवराया! । गांडीव स्फुरितां विजयी बाह्या । काळ दचके मानसीं. ॥ ४७ ॥ परी एक चिंता मानसीं मज । अविघ्न[17] असो का धर्मराज । तुझ्या बळाचा मानोनी स्फुर्ज[18] । मी निर्भर[19]

---

१. उच्चारिला, वर्णिला. २. सर्प व राक्षसादि. ३. एकत्र मिळाले तरी. ४. अग्नि. ५. प्रळयकाळीं. ६. समुद्र. ७. थांबवून धरूं शकतील काय? ८. संवर्तक=प्रळयकाळचे मेघ. ९. तेजास, सामर्थ्यास (उष्णतेस). १०. ज्ञात्या (धर्मा). ११. तयार, तत्पर. १२. धर्मराजास धरण्याविषयीं (अध्याय ११।१४). १३. काळसर्प. १४. अटकाव करिशी, आंवरून धरिशी. १५. द्रोणाचार्यांची पर्वा. १६. संसारांत संरक्षण करणारा. १७. विघ्नरहित, कुशल. १८. अभिमान. १९. मोठ्या आनंदानें.

जातसें.' ॥ ४८ ॥ तेची आठवण वारंवार । वावरे हृदयीं राया! घोर । तुझे आज्ञेचा मी किंकर । शिरसा मान्य, नरवर्या! ॥ ४९ ॥ ऐसें वदोनी [1]पाकशासनी । जाता जाहला निर्भय मनीं । मातें वोपिलें तुमच्या चरणीं । रक्षणार्थ, नरवर्या!" ॥ ५० ॥ वदोनी ऐसें मधुर वाणी । विचार करी अंतः-करणीं । 'माझिया गुरूचा गुरु हा झणी । मज मान्य तैसाची.' ॥ ५१ ॥ पुढती वदे धर्मराजा । 'मी जातसें कंदना पैजा । तव रक्षणाची महाराजा! । वावरे चिंता मानसीं.' ॥ ५२ ॥ धर्म म्हणे, 'बाळका! गुणी! । [2]पैर्याप्त भीम-भैमी कदनीं । अमित राजयांची श्रेणी । मदर्थीं प्राण त्यागिती. ॥ ५३ ॥ यांहींवरी [3]पार्षदें । द्रोणनिधना प्रगटसी द्वंद्व । हवनीं तोषतां [4]जातवेद । प्रसाद वोपी नृपातें. ॥ ५४ ॥ सहित अश्व रथ सारथी । धनु कवच [5]हाटकदीप्ती । धृष्टद्युम्न कुमारव्यक्ती । अर्पिती प्रीती द्रुपदातें. ॥ ५५ ॥ देवदत्त यादवा! वीरा! । [6]वाव होय? अगा चतुरा! । प्रभिन्न द्विपमदाच्या धारा । स्रवतां सिंहा मर्दिजे? ॥ ५६ ॥ ना ते तृणाचे अमित भार । अग्नि विझे तयाच्या भारें । कीं कृष्णानदीच्या पूरें । वाहोनी जाय श्रीशैल? ॥ ५७ ॥ तयापरी आमुची चिंता । न करीं, साह्या जाइंजे पार्था । यमसदनीं जयद्रथा । वोपोनी, येईं [7]पार्थासीं.' ॥ ५८ ॥ तुष्टमान शिनिप्रवीर । मंगळस्नान करुनी रुचिर । परिधान दिव्य पीतांबर । भाळीं केशर सुरेख. ॥ ५९ ॥ आंगीं श्रीचंदनाची उटी । मुक्तमाळा शोभती कंठीं । ऋषिवरांची महादाटी । पूजी तुष्टी सद्भावें. ॥ ६० ॥ गंध, अक्षता, सुमनमाळा । अनेक खाद्य वोपिलें फळा । विडे अर्पोनियां सकळां । [8]भूरिदानें गौरवी. ॥ ६१ ॥ स्वीकारुनी वस्त्राभरण । [9]कैलातक मधु करी पान । करोनी ब्राह्मणा अभिवंदन । 'जयोस्तु' म्हणती सर्वही. ॥ ६२ ॥ [10]सुमित्र सारथी दारुकबंधु । [11]मातलीतुल्य प्रतापसिंधु । रथ

१. इंद्रपुत्र (अर्जुन). २. पुरेसे, समर्थ. ३. पृषतकुलोत्पन्न धृष्टद्युम्न. द्रुपदराजा व द्रोणाचार्य हे गुरुबंधु. द्रुपद राज्यावर बसल्यानंतर द्रोणाचार्य त्याच्या भेटीकरितां गेले असतां द्रुपदानें आचार्यांची भेट घेतली नाहीं. यामुळें आचार्यांनीं अर्जुनाकडून द्रुपदाचा पराभव करवून, आपणापाशीं बांधून आणविलें व अर्धें राज्य घेऊन त्यास सोडून दिलें. या अपमानाचा सूड उगविण्याकरितां द्रुपदानें यज्ञयाग करून आचार्यांस मारणारा पुत्र अग्नीजवळ मागितला—अशी कथा आहे. ४. अग्नि. ५. सुवर्णाप्रमाणें तेजस्वी. ६. व्यर्थ. ७. अर्जुनासह. ८. पुष्कळ दक्षिणा देऊन. ९. मूळांत असें आहेः—'तातः स मधुपर्कार्हः पीत्वा कैलातकं मधु। लोहिताक्षो वमौ तत्र मदविव्हललोचनः ॥' (अध्याय ११२।६२). पुढें अध्याय २१ ओंवी १२५पहा. १०. दारुकाच्या बंधूचें नांव 'सूत' होतें, असें मूळावरून वाटतें. (अध्याय ११२ श्लोक ५९ पहा). ११. मातली हा इंद्राचा सारथी.

सज्जिला दृढ विषदु । सिंहध्वज साजिरा. ॥ ६३ ॥ धौतपताका रौप्यवर्णी । विजूमानी तळपती गगनीं । शोभायमान रत्नखाणी । रुक्मस्यंदन दृढत्वें. ॥ ६४ ॥ कीं तो बालार्क पातला तळा । ना तो नवरत्नकीळें[1]चा गोळा । कीं तो फणींद्रमस्तकींचा भेळा[2] । किंवा ज्वाळा वन्हीच्या. ॥ ६५ ॥ ऐसा स्यंदन शोभायमान । घंटा, किंकिणी, माळा सघन । वैडूर्यकळस नक्षत्रमान । चहूं दिशा झळकती. ॥ ६६ ॥ कुलीन वाजी उच्चैःश्रै[3]वासरी । सदृढ वेग [4]श्वसनपरी । हेममाळाभूषित कुसरी । विचित्ररंगीं चित्रिले. ॥ ६७ ॥ कुरवाळोनी जुंतिले रथीं । शस्त्रसामादि[5] भरली पुरती । सज्जोनी पातला सात्यकीप्रती । जेवीं मातली इंद्रातें. ॥ ६८ ॥ आरोहण करी ते काळीं । द्विजीं वोपिल्या पुष्पांजुळी । [6]येरीं दूर्वांकुर सिंचोनी मौळीं । लाह्या सुमनें वर्षिलीं. ॥ ६९ ॥ मंगळघोष स्वस्तिवाचन । भूषीत सुवा[सनी] नीराजन । भाटीव[7] पढती बंदीजन । अनेक वाद्यें तर्जिलीं[8] ॥७०॥ सात्वतें धर्मा कृतांजळी । मस्तक न्यासिला पादयुगळीं । येरें आलिंगोनी हृदयकमळीं । अवघ्राणिलें[9] मौळीं[10]तें. ॥ ७१ ॥ घेवोनी आज्ञा रहंवरयानीं । बैसे, स्मरूनियां शार्ङ्गपाणी । 'जय, जय,' शब्द मंगळध्वनी । कुंजरभेरी तर्जली. ॥ ७२ ॥ विलोकोनी भीमसेनातें । सात्यकी बोले प्रसन्न चित्तें । म्हणे 'बा! धर्मराजातें । वीरविक्रमा रक्षिजे. ॥ ७३ ॥ तव बळाची अमोघ शक्ती । जाणोनी जातसें युद्धाप्रती । सेना विभांडूनी हातोहातीं[11] । उभय कृष्णा वंदीन.' ॥ ७४ ॥ भीम वदे उदित वाचा । 'कायसा प्रताप गुरूचा? । स्वस्थ जाई जेथें विश्वाचा । मायबाप श्रीकृष्ण. ॥ ७५ ॥ श्रीनिवास, श्रीधर, हरी, । शौरी, मुरारी, नरकेसरी, । राजमर्दन, दानवारी; । जयाशा हारी केवीं पां? ॥ ७६ ॥ क्षेम जावोनी सैंधवशीस । छेदिलें पाहिजे सावकाश । कुशळ येवोनी नराधीश[12] । धर्मराजा वंदिजे.' ॥ ७७ ॥ 'तथास्तु' वदोनी सात्यकी । रथ लोटला सेनामुखीं । जैसा मृगेंद्र मृगगणा तिखीं । सरके भारी ज्यापरी. ॥ ७८ ॥

---

१. नवरत्नांच्या तेजाचा. नवरत्नें:—माणिक, मौक्तिक, प्रवाल, मरकत, पुष्कराज, वज्र, नील, गोमेद व वैडूर्य. २. भेळा=गोळा, मणी. ३. समुद्रमंथनसमयीं चौदा रत्नें निघालीं त्यांपैकीं एक. ह्या घोड्याचे कान नेहमीं उभे राहत असत म्हणून यास 'उच्चैःश्रवा' असें म्हणतात. ४. वायूप्रमाणें. ५. हत्यारांची सामग्री, साहित्य. ६. द्विजांनीं. ७. स्तुतिपाठ. ८. वाजविलीं, ठोकलीं. ९. हुंगिलें. १०. मौळ=डोकें, मस्तक. डोकें हुंगणें हें प्रीतीचें लक्षण आहे. 'शिरस्याघ्राणं गुरुजनस्यापत्येषु वात्सल्यद्योतकम्' (मालतीमाधव—अंक ४ टीका). ११. ताबडतोब. १२. नरश्रेष्ठ (अर्जुन).

जेवीं **सौ**मित्र **इं**द्रजितचमू । शिरके तैसा राजसत्तमू । कीं **का**[1]र्तवीर्यसेने **प**रश-
रामू । पेटे तेंवीं **य**दुवर्य. ॥ ७९ ॥ येतां देखोनी **सा**त्यकी वीर । वरवाळले
कौरवभार । देखोनी दृष्टी **यु**धिष्ठिर । सेनामेळीं तगटला. ॥ ८० ॥ उभय
सेनांची मिळणी । जाणों **कृ**[2]ष्णा**भी**मा एकची दोन्ही । 'घ्या, घ्या,' शब्द
सर्वां वदनीं । अतितुंबळ माजला. ॥ ८१ ॥ **सा**त्यकी लोटतां पुढा । **कौ**रव-
वीरीं घातला वेढा । जाणों **लं**केसी समुद्र गाढा । घाली पै[3]रिखा ज्यापरी.
॥ ८२ ॥ चहूंकडुनी शस्त्रवृष्टी । करिते जाले घोर हटी । सुसाट उतरती
बाणकोटी । प्रळयानळासारिख्या. ॥ ८३ ॥ बाप यु[4]युधान धनुर्वाडा ।
बाण सोडिले धडधडा । शरीराचा घातला सडा । क्षाळिती क्ष्[5]मा रक्तौघीं.
॥ ८४ ॥ अद्भुत युद्ध, महाराया! । होतें जाहलें तया समया । **सा**त्यकी-
विक्रमाची चर्या । **का**ळतुल्य मज भासे. ॥ ८५ ॥ शतशः वीर प्रख्यात
कीर्ती । भंगोनी रथ पाडिले क्षिती । सु[6]धाकरासमान शांती । वक्रें तळीं
रिचवती. ॥ ८६ ॥ प्र[7]वाळवर्ण अधरवेली । सुरंग रंग तांबोलमेळीं ।
वृषभाक्ष राजित कुंडलें कीळी । धुळी मौळें लोळती. ॥ ८७ ॥ शरजाळ
भुजा चर्चित गंधीं । बाहुभूषणें मुद्रिका संधी । महाप्रताप अहिमांदी । जाणों
खगेंद्रें खंडिल्या. ॥ ८८ ॥ कनकदंड पताका छत्रें । ज्वलितकांति अमित
शस्त्रें । खंडविखंड पाहतां नेत्रें । विस्मयातें पाविजे. ॥ ८९ ॥
भूषित गज पर्वतासरी । छिन्न होवोनी पडले शरीं । अमोल्य वारू विगत
समरीं । सहस्रशः आटले. ॥ ९० ॥ प्रवर्तता महामारी । द्रु[8]द्रावल्या चमूच्या
हारी । **द्रो**ण लोटला जैसा हैं[9]री । गर्जोनियां सुसाटे. ॥९१॥ फुफाटे **सा**त्यकी
अर्णवलोटीं । वे[10]ळां **द्रो**ण तया परा लोटी । येरयेरां पडली मिठी । **ग**जेंद्र-
नक्रासारिखी. ॥ ९२ ॥ सरसावोनी, शरासनीं । शर सज्जोनी **का**ळमानी ।
भरल्या दिशा आणि अवनी । ठाव गगनीं न समाये. ॥ ९३ ॥ बाणच्छाया
पडली विशद । जाणों शैं[11]लभाचे पातले वृंद । तेणें दिग्गज पावले खेद ।
शुंडा मुखीं कवळिती. ॥ ९४ ॥ **गु**रुवर्य क्रोधऊर्मी । पंच सायक ताडिले वर्मीं ।
सात्यकी क्षोभोनी महानेमीं । सप्त नाराच समर्पी. ॥ ९५ ॥ तेणें **द्रो**ण क्षो-

---

१. कार्तवीर्य हा माहिष्मती नगरीचा राजा. ह्यास हजार हात होते म्हणून यास सहस्रार्जुन असेंही म्हणतात. यानें जमदग्नीस मारून, त्याची धेनु बळजबरीनें नेली म्हणून परशुरामानें यास ठार मारिलें—अशी कथा आहे. २. या नांवांच्या नद्या. ३. खंदक. ४. सात्यकी. ५. पृथ्वी. ६. चंद्राप्रमाणें. ७. पोंवळ्याच्या रंगाची, लाल. ८. पळाल्या. ९. सिंह. १०. (समुद्राचा) किनारा, सीमा. ११. टोळांचे.

भावतीं । हेमपुंख शिळाशिती । ताडिता जाहला **सा**त्यकीप्रती । साहा शरीं निघातें. ॥ ९६ ॥ पुन्हा करूनी शरसंधानें । सारथी, अश्व, विंधिले बाणें । **द्रो**णाचार्य क्रोधवर्धनें । शरौघमाळा वर्षतू. ॥९७॥ च्यान्ही[बाण] चहूं वारुवांसी । एक भेदिला सारथियासी । एक ताडुनी ध्वजासी । च्यान्ही वारू विंधिले. ॥९८॥ **शि**निपुंगवासहित रथ । बुजोनी काढिला बाणीं त्वरित । हास्य करुनी स्नेहयुक्त । **सा**त्यकीतें अनुवादे. ॥ ९९ ॥ म्हणे, "तव गुरु प्रख्यात **पा**र्थ । धनुर्धरांमाजी रणपंडित । [1]प्रदक्षिण विनयवंत । करुनी पुढां शिरकला. ॥ १०० ॥ बाहुविक्रमें पुरुषार्थमत्तें । जावों इच्छिसी जिंकोनी मातें । तरी मोक्ष पावसी माझेनि हस्तें । [2]यदुवर्या! निश्चयें." ॥ १०१ ॥ **सा**त्यकी वदे, "**गु**रुवर्यवर्या! । **ध**र्मआज्ञेस्तव **पा**र्थसाह्या । मी जातसें ऋषिवर्या! । आज्ञाधारक नृपाचा. ॥ १०२ ॥ कृपा करुनी **अ**र्जुनातें । मार्ग दिल्हा प्रसन्नचित्तें । मातें लाविजे तया पंथें । शिष्य मी निर्धारीं स्वामीचा." ॥ १०३ ॥ स्मितहास्य करितां **द्रो**णें । रथ काढिला मुखाहून । पुढां शिरकला जैसा अग्न। सेनाभारीं प्रतापें. ॥ १०४ ॥ तंव **कृ**तवर्मा **भो**जपती । आडवा जाला रोषावर्तीं लोटला. ॥ १०५ ॥ **कृ**तांतघाती । सवें वीरांच्या निबिडपंक्ती । **सा**त्यकी वीर प्रतापवान । सोळा सायक महाज्वलन । **कृ**तवर्म्यासी ताडुनी पूर्ण । च्यान्ही अश्वीं वोपिले. ॥ १०६ ॥ त्यांवरी आणीक काळविखारी । नतपर्वणी सोळा शरीं । ताडिता जाहला स्तनांतरीं । महारोषें निघातें. ॥ १०७॥ तेणें **हा**र्दिक्य क्रोधभरणीं । वत्सदंत शर अग्निमानी । आकर्ण धनु वोढोनी गुणीं । **सा**त्यकीतें ताडिलें. ॥ १०८ ॥ कवच खंडुनी भेदूनी तनू । धरे शिरकले प्रभिन्न घनू । रुधिरस्राव जाहले, जाणों घनू । वर्षाकाळीं वर्षतू. ॥ १०९ ॥ परमास्त्रभेदी **कृ**तवर्मा । शर वर्षोनी वन्हिप्रतिमा । चाप सज्जोनि राजसत्तमा! । सायक दाहा अर्पिले. ॥ ११० ॥ त्यांवरी आणीक तेजःपुंज । सोडुनी भेदिले दक्षिण भुज । **सा**त्यकी वरुनी [3]अनन्यश्रीभाज । अन्य धनु सज्जिलें. ॥ १११ ॥ सहस्रशः वर्षोनी शर । बुजोनी काढिला **भो**जवीर । भेदुनी सारथी बाणीं क्रूर । शिर व्योमा उडविलें. ॥ ११२ ॥ तेणें मोकळी पडली धरू । सहित रथ उसळे वारू । **सा**त्यकी नेटका महावीरू । लोटी स्यंदन पुढारा. ॥ ११३ ॥ **हा**र्दिक्य आवरुनी रहंवर ।

१. मला प्रदक्षणा घालून, मला मोठ्या आदरानें उजवें घालून. २. हे यदुकुलश्रेष्ठा (सात्यकि). ३. अप्रतिम वीरश्रीरूपी भार्या.

येतां मिनले पांडवभार । महावीर शिनिप्रवीर । कांभोजसेने शिरकले. ॥ ११४ ॥ कृतवर्मा सात्यकीपाठी । धांवतां पांडवीं घातली मिठी । सेना-[1]अर्णव लोटितां लोटीं । वेळा[2] थोपी कृतवर्मा. ॥ ११५ ॥ अद्भुत विक्रम यादवाचा । देखिला समरीं तीव्र साचा । वोतें[3] वोतला सेनेचा । एकसरा निघातें. ॥ ११६ ॥ संतप्त भीम क्रोधानळीं । भोज ताडिला तीस भालीं[4] । हर्षे शंख स्फुरिला कीळीं । आनंदकारी चमूतें. ॥ ११७ ॥ उसळोनी वीर एकसरा । ताडिते जाहले यादववीरा । सहदेवें करुनी त्वरा । वीस बाण अर्पिले. ॥ ११८ ॥ धर्मराजें कृतांतमानी । पांच वोपिले गात्रस्थानीं । शत नकुळें ताडिले झणी । अहिविषासारिखे. ॥ ११९ ॥ त्रिसप्त द्रौपदीतनय । वोपिते जाले एकैक वर्य । घटोत्कच राक्षसरायें । ताडिले सात निघातें[5]. ॥ १२० ॥ धृष्टद्युम्न काळविखारी । तीन अर्पी रणचत्वरीं[6] । विराट, द्रौपद, पांच पांच शरीं । भेदिती भोजा सरोषें[7]. ॥ १२१ ॥ पांचाळ शिखंडी महात्राणें । ताडी कृतवर्म्या पांच बाणें । त्यांवरी आणीक वीस ज्वलन । महा-रोषें समर्पी. ॥ १२२ ॥ भोजराज सर्वास्त्रप्रवीण । बाणीं बाण वारुनी ज्वलन । हेमपुंखी शर दारुण । पांच पांच सर्वां ताडिले. ॥ १२३ ॥ भीम भीमविक्रमी[8] वीर । विंधिले त्यातें सात शर । कवच भेदोनी स्तनांतर । महीमाजी रिघाले. ॥ १२४ ॥ सवेग करुनी तांतडी । ध्वज, चाप, सारथी, घोडीं, । छेदोनी पाडिलीं देहुडीं[9] । बाणधारीं सरोषें. ॥ १२५ ॥ रथी विरथी वृकोदर । होतां, शर सत्याहत्तर । ताडितां मूर्च्छा दाटली सैर । मही पडतां थरारी. ॥ १२६ ॥ देखोनी धर्म लोटला दळीं । सर्वे वीरांची धौंरहळी[10](?) । वर्षोनी शर काळानळी । पाठी भीमा सूदलें. ॥ १२७ ॥ सेनोपरी करुनी त्वरा । वर्षते जाले शरांच्या धारा । सावध भीम सक्रोध सैरा । मोकली शक्ती[11] निघातें. ॥ १२८ ॥ कडाडिली दामिनीसरी । तेजें दिशा भरल्या च्याऱ्ही । फुफाट येतां तक्षकपरी । चक्षीं[12] भोजें लक्षिली. ॥ १२९ ॥ आकर्ण वोढोनी कोदंडें[13] । शरद्वय सदृढ काळदंड । ताडुनी, करुनी दुखंड । धरेवरी पाडिली. ॥ १३० ॥ तेजें डळमळी ते पर्णधारा । जाणों खचोनी पडली तारा । तैसी पडली अवनीवरा । विझोनियां तेजातें. ॥ १३१ ॥ शक्ति वायां गेली थोर । संतप्तमान वृकोदर । अन्य धनुष्य सज्जोनी क्रूर । शरपंचक

---

१. सेनासमुद्र. हाच दृष्टांत मागें ओंवी ९२ हींत आहे. २. पाण्याची मर्यादा, किनारा. ३. ओघ. ४. भल्ल नांवाच्या बाणांनीं. ५. जोरानें. ६. रणांगणांत. ७. क्रोधानें. ८. अत्यंत पराक्रमी. ९. वेडीवांकडीं. १०. (?) ११. अस्त्रविशेष. १२. डोळ्यांनीं. १३. धनुष्य.

सोडिलें. ॥ १३२ ॥ उसळोनियां काद्रवेयमानी[1] । भेदोनी गात्रीं रिघाले धरणी । रुधिरस्राव ताम्रवर्णी । जाणों नदी पर्वतीं. ॥ १३३ ॥ तेणें शोभला यादवबळीं । जाणों किंशुक[2] फुलला फुलीं । हर्षे करुनी गदारोळी[3] । कार्मुक[4] बळें कर्षिलें[5]. ॥ १३४ ॥ तंव भीमसेनें करुनी त्वरा । शरत्रय वोपिले भोजकुमरा । पांडव वीर एकसरा । तीन तीन सर्वां ताडिले. ॥ १३५ ॥ बाप कृतवर्मा अस्त्रयुद्धीं । शरें शर निवारूनी संधी । बाण सोडुनी काळक्रोधी । सात सात वीरा अर्पिले. ॥ १३६ ॥ शिखंडी लोटतां संग्रामा । हास्य करुनी कृतवर्मा । शर सोडुनी अग्निप्रतिमा । धनु हातींचें खंडिलें. ॥ १३७ ॥ तेणें पावोनी क्रोधावर्ती । खड्ग चर्म[6] वसवोनी हातीं । धडकोनी भोजरायाप्रती । धनु हातींचें खंडिलें. ॥ १३८ ॥ पांडव वीर ऍकवळा[7] । तीन तीन शर वोपिले सकळां । कृतवर्मा जाणती कळा । अन्य चाप सज्जिलें. ॥ १३९ ॥ क्रोधउल्का वमोनी वदनीं । शिखंडी ताडिला त्रिपंचबाणीं । येरें अन्य चाप वाहोनी झणी । करी वृष्टी शरांची. ॥ १४० ॥ कृतवर्मा भीष्मनिधन । स्मरुनी क्रोधें प्रज्वळला पूर्ण । म्हणे, 'यातें कृतांतसदन । दावणें आतां निर्धारें.' ॥ १४१ ॥ ऐसें कल्पोनी निजमानसीं । शर कर्षोनी पूर्ण धनुषीं । ताडिता जाहला शिखंडीसी । सत्याहत्तर एकदा. ॥१४२॥ त्यावर सात काळानळीं । अर्पिता जाहला हृदयकमळीं । शिखंडी वमोनी रक्तगुरळी । पडे मूर्च्छित धरेतें. ॥ १४३ ॥ कैवारातें[8] पांडववीर । धांवतां त्रासिले पांडववीर । छिन्नगात्रीं गळिती रुधिर । निर्झरोदकासारिखें. ॥ १४४ ॥ सन्मुख यावया आवांका[9] । कोण्हा नोहे, नरनायका! । कैकय, सृंजय, पांचाळ, देखा । विन्मुख पांडव भीमादि. ॥ १४५ ॥ शरपीडित सेनामांदी । व्यत्यस्त वीर निघाले युद्धीं । स्तविती वीर प्रतापनिधी । भोजपती धनुर्वाडा. ॥१४६॥ निस्वन वीर करुनी सकळ । मागां लोटले जैसे फोल । न चले कोण्हाचेंही बळ । वीर दुर्धर कृतवर्मा. ॥ १४७ ॥ असो पुढां युद्ध दारुण । वीररसाची भरणी पूर्ण । श्रोते सज्जनीं कथाश्रवण । पान आदरें करावें. ॥ १४८ ॥

---

१. सर्पाप्रमाणें. २. लढाईत जखमा लागलेल्या वीरांस फुललेल्या पळसाची उपमा देण्याचा संस्कृत व मराठी कवींचा सांप्रदाय आहे. (मागें अध्याय १७ ओंवी ३८ पहा). ३. मोठी आरोळी, गर्जना. ४. धनुष्य. ५. ओढिलें. ६. चर्म=ढाल. ७. जमाव. ८. साह्यार्थ. ९. धैर्य, अवसान.

श्रीगुरु **भी**मराज कृपादृष्टी । करितां, निवाली मानससृष्टी । **न**रहरि **मो**रेश्वर केतकीपृष्ठीं । भगवद्गुणीं द्रावला. ॥ १४९ ॥

अध्याय[1][2] विसावा.

संजय वदे, 'महाभागा! । तव दुर्मंत्र[3] भोंवले जगा । क्षय पातला भूपवर्गा । सह सेना **पा**र्थातें. ॥ १ ॥ असो, आतां कायसी खंती[4] ? । **पां**डवी सेना विगतगती । करुनी, पातला **सा**त्यकीप्रती । **कृ**तवर्मा प्रतापें. ॥ २ ॥ आकर्ण वोढोनी शरासन । सक्रोध वीस ज्वलित बाण । अर्पण करितां महात्राणें । **सा**त्यकी रोषें धडाडी. ॥ ३ ॥ तुळोनी उभय दोर्दंडें[5] । शर सोडिले काळदंड । सूताश्वधनुपृष्ठरक्षकघड[6] । मर्दिले घायीं एकदा. ॥ ४ ॥ विरथी **हा**र्दिक्य छिन्नधन्वा[7] । 'आहा !' शब्द माजला तेव्हां । **द्रो**ण धांवला जैसा **म**घवा । क्रौंच[8]युद्धा निघातें. ॥ ५ ॥ सवें वीरांची अमित मांदी । पदाती, वाजी, कुंजर, क्रोधी । दुर्योधनाचिया हितीं बुद्धी । जीवोदार[9] सर्वही. ॥ ६ ॥ रथिवीरांची प्रभिन्न सेना । गंजानीकाशीं[10] **त्रि**गर्तराणा । लोटता जाहला रणांगणा । सर्वाभरणीं भूषितू. ॥ ७ ॥ प्रमत्त गज पर्वतसरी । कीं ते पौळे[11] जळदहारी[12] । घंटा, नूपुरें, चामरें पुरीं । तेजें [13]दूषिती सोमातें[13]. ॥८॥ वरी विराजित राजकुमर । भूषणें भूषित प्रतापशूर । करीं ज्वलित कार्मुक शर । हेमपुंखी झळकती. ॥ ९ ॥ वर्षोनियां तीव्र घाई । करिते जाहले शरांची सौंई[14] । **सा**त्यकीवीर विजयी बाहीं । मोकळी[15] कोटी [16]इषूंच्या. ॥ १० ॥ शरामागें शराची सुटी । जाणों उसळल्या दामिनी कोटी । खंडविखंड शरांच्या थाटी । पडल्या जाहल्या बीभत्स. ॥ ११ ॥ शुंडादंड विच्छिन्नरद । खंडमान वेगळे पाद । भैरव[17] शब्द फोडिती विशद । क्रंदमान किंकाळ्या.

---

१. या अध्यायाचें **'सात्यकीसेनाप्रवेश'** असें हस्तलिखित पोथींत नांव आहे. २. ह्या अध्यायांत मूळांतील ११५–१२० अध्यायांतील कथानकाचा गोषवारा आला आहे. ३. दुष्ट मसलती. ४. आतां दुःख करून काय उपयोग? ५. दोन्ही दंड उभारून. ६. घड=समुदाय. ७. ज्याचें धनुष्य तुटलें आहे असा. ८. क्रौंच=हिमवान पर्वतास मेनेपासून झालेला पुत्र. इंद्रानें आपल्या वज्रानें पर्वतांचे पंख तोडिले-ही कथा प्रसिद्धच आहे. ९. जीवावर उदार, मरण्यास तयार. १०. घोडदळासह. ११. समुदाय. १२. मेघपंक्ति. १३. चंद्रास उणेपणा आणिती. १४. छाया, साउली. १५. सोडी. १६. बाणांच्या कोटी, कोट्यावधी बाण. १७. भयंकर.

॥ १२ ॥ गजारोह[1] विगतगात्री । ध्वजा पताका लोळती धात्री[2] । घंटा, चामरें, भूषणें, शस्त्रीं । धरादेवी ढेसैली[3]. ॥ १३ ॥ ऐसी विवर्ण[4] देखोनी सेना । क्रोधें संतप्त, जरासंधराणा[5] । उसळोनी रोषें अहिमाना । **सा**त्यकीतें तगटला. ॥ १४ ॥ भाळीं आरक्त चंदनटिळा । मुगुट कुंडलें फांकती कीळा[6] । रुक्म-कवच शोभती माळा । मुक्तायुक्त साजिऱ्या. ॥ १५ ॥ रोषें कार्मुक वोढोनी बाहीं । शर सोडिले समान अही । हृदय भेदोनी निमाले मही । **सा**त्यकीतें ते काळीं. ॥ १६ ॥ हास्य करुनी निज कौतुकें । शर सोडिले विशाळ तिखे । धनुष्य छेदोनी खुडिलें बिकें[7] । शराचे जाण निघातें. ॥ १७ ॥ तया-माजी तापल्या खांदी । पांच नाराच अर्पिले हृदीं । वर्षोनी शरांची महा-मांदी । बुजोनी **मा**गध काढिला. ॥ १८ ॥ येरू अकंपत[8] जैसा **स्थाणू** । रोषें पावोनी अन्य धनू । 'तिष्ठ **या**दव!' म्हणोनी घनू । शब्द फोडी भैरव. ॥ १९ ॥ कर्षोनी धनु सोडी शर । सोडुनी भेदिलें जिव्हार[9] । **सा**त्वतें बाण पेलोनी सत्वर । चाप हातींचें खंडिलें. ॥ २० ॥ च्युतकार्मुक धडाडी क्रोधें । जेवीं व्याळ क्षोभे ताडितां पदें । तोमर प्रेरिला रोषें विशदें । **सा**त्यकीतें निघातें. ॥ २१ ॥ उसळला **का**ळदंडसरी । येरें दोन तीन शरीं । त्रिखंड करुनी वरच्या वरी । महीवरी पाडिला. ॥ २२ ॥ वृथा तोमर जातां पाहीं । **मा**गध फुफाटे जैसा अही । शंतचंद्र[10] ढाल कर्षोनी बाहीं । खड्ग करीं घेतलें. ॥ २३ ॥ पुसोनी धार, टाकिली उडी । रोषें धांवला महाप्रौढी । थरकसरक घालोनी उडी । **सा**त्वतधनु छेदिलें. ॥ २४ ॥ येरू सावध धनुर्वाडा । अन्य कार्मुकीं वाहिला मेढा[11] । इषु सज्जोनी **का**ळदाढा । बाहुद्वय उडविलें. ॥ २५ ॥ धांव पुरुनियां गगनीं । तळीं उतरले जैसे फणी । त्वरा करुनी शरसंधानीं । मौळ व्योमा धाडिलें. ॥ २६ ॥ तारा तुटोनी पडे तळीं । मुगुटकुंडलें प्रदीप्त कीळीं । तैसें शिर खचोनी धुळी । मिळे उसाळी महीतें. ॥२७ ॥ **मा**गध[12] वीर पडला रणीं । 'हाहा'कार सेनावदनीं । वीर अनेक लोटले रणीं । सह**नि**षाद अमित. ॥ २८ ॥ गजारूढ **नि**षाद-

---

१. हत्तीस्वार. २. जमिनीवर. ३. पूर्णपणें भरली. ४. निस्तेज, उत्साहरहित. ५. मूळांत 'जलसंध' असें नांव आहे (अध्याय ११५।४०). ६. तेज. ७. बिकें=तेजानें, पराक्रमानें. ८. निश्चल. ९. मर्मस्थान. १०. जीवर शंभर चांदिण्या किंवा टिकल्या लाविल्या आहेत, अशी ढाल. ११. धनुष्याची दोरी. १२. 'जलसंध' व मागधांचा राजा 'जरासंध' या दोन नांवाचा घोंटाळा करून कवीनें जलसंधास येथें मागध बनविलें आहे. जरासंधाला राजसूय यज्ञाच्या पूर्वींच भीमानें मारिलें होतें, हें वाचकांस अवगत आहेच.

राजा । शर वर्षोनी फोडिली भुजा । सात्यकी झुंझार महातेजा । लीले धनुष्य कर्षिलें. ॥ २९ ॥ बाण सोडुनी काळघाती । सहनिषाद मारिला हस्ती । अनेक वीर पाडिले क्षिती । उरले गेले अष्ट दिशा. ॥ ३० ॥ हांक वाजली संग्रामीं । द्रोण धांवला क्रोधऊर्मी । वेष्टित वीर राजसत्तमीं । चतुरंग शूर अफाटे. ॥ ३१ ॥ वेढे घालोनी माधवा देखा । 'ध्या, ध्या' शब्द फोडिती हाका । आच्छादिलें शरीं अर्का । मार्ग वाता न होय. ॥ ३२ ॥ द्रोणें उसळोनी क्रोधानळीं । सत्याहत्तर अर्पिल्या भाली । दुर्मर्षणें क्रोध उकळी । बारा बाण वोपिले. ॥ ३३ ॥ दुःसह मानोनी दुःसहें । दश शर अर्पिले महावर्य । त्रिषष्टि बाण वन्हिप्रमेय । विकर्णे यादवा ताडिले. ॥ ३४ ॥ दुर्मुखें वोपिले दश तीक्ष्ण । आठ अर्पिले दुःशासनें । चित्रसेनें दोन ज्वलीन । हृदयवर्मी भेदिले. ॥ ३५ ॥ मग ते शर काळमानी । दुर्योधनें [३]वोपिले पाँणी । अन्य वीरीं प्रभिन्न बाणीं । बुजोनी तया काढिलें. ॥ ३६ ॥ वीर सात्यकी धनुर्वोडा । क्रोधें रगडुनी तीव्र दाढा । शर सोडुनी झडझडा । विंधी वीरां प्रतापें. ॥ ३७॥ भारद्वाजासी तीन शर । ताडिले हृदयीं महा थोर । काळविखारी दुःसह घोर । नव बाणीं भेदिला. ॥ ३८ ॥ विकर्णा ताडिले पंचवीस । दुर्मर्षणा बारा काळविष । विंशती करुनी कासावीस । [४]च्यान्ही रोषें ताडिले. ॥ ३९ ॥ सत्यव्रत विंधिला दाहा बाणीं । विजया नव अर्पिले क्षणीं । चाप छेदोनी पाडिलें धरणी । काळसर्पासारिखें. ॥ ४० ॥ छिन्नधन्वा राजकुमर । पाहोनी लोटले कौरववीर । सात्यकी प्रताप मल्लशूर । सोडी कोटी शरांच्या. ॥ ४१ ॥ जैसी खगेंद्राची प्रताप उडी । [५]कांद्रवेयसेना देशधडी । तैसी वीरविगतप्रौढी । दुर्योधन लोटला. ॥ ४२ ॥ सवें बंधु भूपती श्रेष्ठ । वर्षाव करिती शरांच्या [६]वृष्ट । सात्यकीवीर बळवरिष्ठ । कर्षी [७]धँनुर्विद्या ते. ॥ ४३ ॥ एकएकासी पांच बाण । त्यांवरी आणीक सात ज्वलीन । अर्पण करुनी उडवी तृण । वायु जेवीं ज्यापरी. ॥ ४४ ॥ दुर्योधना काळविखारी । चत्वारि शर स्तनांतरीं । वोपोनी आणीक त्यांवरी । आठ रोषें निघातें. ॥ ४५ ॥ हास्य करुनी प्रसन्नवाणी । चाप छेदोनी पाडिलें धरणी । रत्नखचित शोभा किरणी । खंडुनी वेगें टाकिला. ॥ ४६ ॥ चत्वारि बाणें च्यान्ही हय । मर्दोनी स्वर्गी वोपिले सोय । शर एक भेदुनियां वर्य । सारथिशिर उडविलें. ॥ ४७ ॥ रोषें सायक वर्षोनी

---

१. लढवय्या. २. सूर्यास. ३. आपल्या हातानें सोडिले. ४. चार (बाण). ५. सर्पांचें सैन्य. ६. वृष्ट=वृष्टि. ७. सात्यकीनें धनुष्य ओढिलें नाहीं तर जणुं काय धनुर्विद्याच ओढिली—असा भाव.

वेगें । भेदोनी काढिलीं अष्टही[1] अंगें । अवनी पडुनी जैसे रोगें । व्याधिग्रस्त प्राणी ज्यापरी. ॥ ४८ ॥ 'अहा!' शब्द माजला रणीं । पडिला राजा **काळ**-वदनीं । ऐकोनी धाविल्या वीरश्रेणी । **कृ**तवर्मा समवेत. ॥ ४९ ॥ येतां देखोनी **भो**जरायातें । क्रोध नावरे **सा**त्यकीतें । रथ थडकोनी तयातें । स्फुरी चाप सरोष. ॥ ५० ॥ येरयेरां पडतां मिठी । सक्रोध भृकुटी घातल्या गांठी । वोढोनी धनुष्याच्या मुष्टी । सोडिती कोटी शरांच्या. ॥ ५१ ॥ उकावोनी एकमेकां । शर ताडिती जैशा उल्का । सिंहरवें फोडिती हांका । 'मारिलासी'[2] म्हणोनी. ॥ ५२ ॥ सरसराट शरासन । सुसाट उठती प्रभिन्न बाण । हस्त-लाघवकळानिपुण । न्यून अधिक न गणवे. ॥ ५३ ॥ शरमय जाली अवघी धरा । खचों पाहती तेजें तारा । दिग्गजीं मानोनी दरारा । सोडों थारा वांछिती. ॥ ५४ ॥ सिंहाऐसे हुंकारिती । वृषभाऐसे फुफाटिती । व्याळाऐसे फूत्कारिती । उसळती सक्रोध. ॥ ५५ ॥ ऐसी मांडली रणधुमाळी । उभय वीर अतुर्बळी । **कृ**तवर्मा कुशळांजळी । बाणजाळीं वर्षला. ॥ ५६ ॥ सदुसष्ट शर **काळ**मानी । **सा**त्यकी ताडिला गात्रस्थानीं । सात नाराच समानवन्ही । सारथीयातें विंधिले. ॥ ५७ ॥ चहूं वारूंसी सायक चार । ध्वजासी अर्पिला एक शर । रुक्मकार्मुक मनोहर । त्वरा हातींचें खंडिलें. ॥ ५८ ॥ सा[3]त्वत वीर प्रतापराशी । न गणोनी त्याचिया बाणासी । कार्मुक सज्जोनी महारोषीं । रुक्मभाली सोडिल्या. ॥ ५९ ॥ चौसष्ट विंधिले हयोत्तमा । सात सारथ्यां ताडिले नेमा । काळविखारी वन्हीसमा । शर तीक्ष्ण सोडिले. ॥ ६० ॥ सुसाट उतरुनी अं[4]तराळीं । भेदिले **भो**जाचे हृदयकमळीं । कवच भेदोनी विझाले तळीं । रक्तस्राव भूमी जाहला. ॥ ६१ ॥ शरचाप गळोनी हातीं । रथी पडुनी खिन्न चित्तीं । वीर लोटतां साह्याप्रती । **सा**त्यकी क्रोधें धडाडी. ॥ ६२ ॥ शर वर्षोनी **काळ**धाडी । भरल्या शवांच्या उतरडी । मुखें करुनी दे[5]हुडी । वांचले वीर निघाले. ॥ ६३ ॥ अर्दि[6]त सेना हलकल्लोळ । शब्द माजला घोर तुंबळ । जेवीं गोळा आ[7]वाजे. ॥ ६४ ॥ चाप वोढितां सुसाट शर । कीं वातस्पर्शें लोटला हर । तैसा पातला **द्रो**ण वीर । वातवेगें सरोष. ॥ ६५ ॥ धडकोनियां क्रोधानळीं । केली शरांची साउली । उभय वीर अतुर्बळी । येरयेरां ताडिती. ॥ ६६ ॥ जैसा व[8]ज्री आणि **वि**रोचनी[9] । निकरें

---

१. शरीराचीं आठ अंगें. २. मारिला, गेलास. ३. सात्यकी. ४. आकाशांतून. ५. वांकडीं. ६. दुःखी, जखमी. ७. आवाज करितो. गोळा=तोफेचा गोळा. ८. इंद्र. ९. विरोचनपुत्र (बळी). बळीनें इंद्रपद प्राप्त करून घेण्याची खटपट चालविली होती–हें प्रसिद्धच आहे.

युद्धा मिनले कदनीं । तैसे उभयतां क्रोधभरणीं । एकमेकां विंधिती. ॥ ६७ ॥ क्रोधें संतप्त **द्रो**णाचार्य । जाणों ग्रीष्मींचा तीव्र सूर्य । काळविखारी शरत्रय । पूर्ण ललाटीं भेदिले. ॥ ६८ ॥ तेणें शोभला **शि**निप्रवीर । जाणों शैलासी तीन शिखर । क्रोधें क्षोभोनी **सा**त्वत वीर । बाण रोषें मोकळी. ॥ ६९ ॥ अशनीसमान[1] सुसाट घोषें । येतां **द्रो**ण लक्षी रोषें । शरद्वय ताडुनी कर्कश[2] । धरेवरी पाडिले. ॥ ७० ॥ लघुलाघव मंत्रक्रिया । जाणता **गु**रु महाराया! । कौतुकें हास्य करुनियां । शर बाहत्तर समर्पी. ॥ ७१ ॥ त्यांवरी आणीक पांच शत । वोपिता जाहला क्रोध अद्भुत । **सा**त्यकी चतुर निवारीत । जेवीं पंडित शब्दातें[3]. ॥ ७२ ॥ अत्यंत क्रोधें **शि**निपुंगवें । सहस्रशः वोपिले हेवे[4] । त्यांहीमाजी लघुलाघवें । दाहा **द्रो**णा भेदिले. ॥ ७३ ॥ रुधिर प्राशोनी भरले अवनीं । जेवीं वारुळीं विशाळ फणी । **आ**चार्य शोभला चौगुणी । जाण प्रळयींचा चंडांशु[5]. ॥ ७४ ॥ नतपर्वणी तीक्ष्ण शर । भृकुटीं ताडिला **शि**निप्रवीर । ध्वजा विंधिला बाण क्रूर । सात सूता[6] वोपिले. ॥ ७५ ॥ चहूं हयांसी तीन तीन । अर्पिले शर अतिदारुण । काळविखारी प्रेरुनी बाण । शरासन खंडिलें. ॥ ७६ ॥ तेणें क्रोधार्णवा भरतें । दाटोनी पूर्ण **सा**त्वतातें । गदा प्रेरिली **द्रो**णातें । विजूमान सरोषें. ॥ ७७ ॥ **गु**रु झुंझारांचा राव । शर खंडुनी पुसिला ठाव । रोषें प्रदीप्त हव । चाप अन्य सज्जिलें. ॥ ७८ ॥ शिळाशित तीक्ष्ण शरीं । भेद करुनी स्तनांतरीं । सिंहरव फोडुनी समरीं । बाण सात वोपिले. ॥ ७९ ॥ रोष अत्यंत **द्रो**णाचार्या । शक्ति टाकिली, महाराया! । वारितां भेदोनी दक्षिण बाह्या । महीमाजी शिरकली. ॥ ८० ॥ सवेग करुनी तातडी । अर्धचंद्र नाराच प्रौढी । प्रेरुनी चाप मुष्टीवडी[7] । छेदोनियां टाकिलें. ॥ ८१ ॥ संतप्त **मा**धव[8] क्रोधभरें । अन्य धनु सज्जिलें निकरें । आकर्ण चाप कर्षोनी त्वरें । शर दुर्धर सोडिला. ॥ ८२ ॥ उसळोनियां दामिनीमानी । सारथिशिरा उडविलें गगनीं । पाहत असतां **द्रो**ण नयनीं । सेनाश्व वेगीं उधळले. ॥ ८३ ॥ चत्वार दिशा भ्रमत रथ । पाठीं वीर धांवले बहुत । राहिले वीर शूर **सा**त्वत । दंडी शरनिघातें. ॥ ८४ ॥ क्षतें परिप्लुत[9] रुधिरधारा । अर्दित भूप निघाले सैरा । मोकळा पंथ राजेश्वरा । शिरके पुढां **सा**त्यकी. ॥ ८५ ॥ **द्रो**ण सेनाश्व बुंजावोनी[10] । रथ आणिला रणांगणीं ।

१. वज्राप्रमाणें. २. कठिण, असह्य. ३. शब्द=शुष्क वादविवाद, वायफळ बोलणें. ४. त्वेषानें. ५. सूर्य. ६. सारथ्यास. ७. मूठवट, मूठ. ८. सात्यकी. ९. परिपूर्ण, भरलेले. १०. चुचकारून, शांत करून, थावरून.

पांडवसेना दाटली मूर्धी । व्यूहद्वारीं आंकांतू. ॥ ८६ ॥ उपेक्षोनी **या**दव-वीरा । **द्रो**ण पातला व्यूहद्वारा । **सा**त्यकी लोटला पुढारा । **पा**र्थ मागें वसोनी. ॥ ८७ ॥ पुढां देखिली **कां**भोजसेना । जाणों समुद्र लोटला रणा । रथी लाटा उसळती त्राणा । गजाश्वपती जळचरें. ॥ ८८ ॥ निबिड गजाची देखोनी मांदी । हृष्टमानसें केसर संधी । उकावे जैसा प्रतापनिधी । तेवीं **मा**धव हर्षतू. ॥ ८९ ॥ उल्हासोनी सारथियातें । बोलता जाहला प्रसन्न चित्तें । म्हणे, "पाहें पां मृत्युगृहातें । उदित जाहले सर्वही. ॥ ९० ॥ **द्रो**णानीका भेदोनी पाहीं? । हतवीर्य केला **भो**ज तेंहीं । **कां**भोजकेवा के-तुला काई? । मर्दोनी मही निजवीन. ॥ ९१ ॥ **श**क, **कि**रात, **द**र्दर, **ब**र्बर । **ता**म्रलीस्यक महाशूर । अन्य म्लेंच्छ प्रतापी वीर । करीन क्षीण क्षणार्धे. ॥ ९२ ॥ सूता! माझ्या स्फुरती बाह्या । दृष्टी पाहीन **ध**नंजया । आणि **श्री**निवास कल्याणच्छाया । **ज**नार्दना विश्वात्मा. ॥९३॥ **मु**रुनिधनी, **म**धुहंता। विश्वनिवास, त्रिजगीं सत्ता । उरुगाय, विक्रमपूर्णसरिता । तो या नयनीं पाहीन आवडी. ॥ ९४ ॥ परात्पर, अविनाशी । **मा**यानियंता, हृषीकेशी । **स**च्चिदानंद, **चि**द्विलासी । **वि**जयप्रीति श्रीकृष्ण. ॥ ९५ ॥ तो समस्त **फा**ल्गुनरथी । असतां जयाची कायसी खंती? । मीही आजी नृपाच्या पंक्ती । बाहुविक्रमें मर्दीन. ॥ ९६ ॥ पाहीं पां **सु**मित्रा! सुता! ताता! । कैशा शवाच्या पडल्या चलथा? । **अ**र्जुन विक्रमासी उमाणितां । बुद्धि भ्रामक **गु**रूची. ॥ ९७ ॥ त्याचा शिष्य मी रणांगणीं । चोज दावीन तुझ्या नयनीं । भिडवीं रथ महादा-टणी । **कां**भोजाची जे ठाई. ॥ ९८ ॥ रजधूळीची पडली सायी । वीर कालविती वीरश्रीघाई । शंख स्फुरी **वि**श्वगोसावी । आणी जयश्री **अ**र्जुना. ॥ ९९ ॥ गोपीगोपाळपरिपाळण । **उ**पेंद्र, **वा**मन, अरिसूदन । **य**मुना-पुलिनविहारण । दीनोद्धारण, श्रीमूर्ती. ॥ १०० ॥ बालार्ककिरणी वानरकेतू । दुरुनी दिसे लखलखितू । **ज**यद्रथाचा पुरला अंतू । जाण निश्चित **सु**मित्रा!" ॥ १०१ ॥ सूर्य असतां अंतर एक यांम । प्रेरी वारू उत्तमोत्तम । कुशळ सारथी हर्षसंभ्रम । मधुररवें अनुवादे. ॥ १०२ ॥ म्हणे "स्वामिया! प्रताप-मूर्ती! । समान विक्रम **र**तिपती । वीरवर्या! प्रख्यात कीर्ती । शरांची गती अनिवार. ॥ १०३ ॥ तव विक्रम तंव केसरी । **कां**भोजगज पावेल हारी ।

---

१. सिंह. २. सात्यकी. ३. द्रोणाच्या सैन्याला. ४. मोठ्यांनीं स्तविलेला, विष्णु. ५. तुलना करून पाहतां. ६. सावली. ७. जगन्नाथ. गोसावी=स्वामी. ८. प्रहर. ९. कांबोज देशचा राजा हाच हत्ती.

अही[१] । कीं रामानुज[२] रणमही[३] । देखतां रावण फुफाटे; ॥ ४ ॥ तयापरी क्रोधानळीं । सोडिता जाला विशाळ भाली । उभय वीरांची दाटली फळी । जयआस्था[४] सारिखी. ॥ ५ ॥ भीमें नतपर्वणी नव शरीं । कौरवें[५] विंधिला स्तनांतरीं । येरू प्रज्वळोनी वन्ही सरी । ताडी सात्वता शत बाणीं. ॥ ६ ॥ परस्परें सायकसंगीं । एकमेकां भेदिलें अंगीं । जाणों पर्वत गेरुरंगी । तेवीं वीर डवरिले[६]. ॥ ७ ॥ येरयेरां शस्त्रभेद । दावोनी, देती महाखेद । सात्यकी वदे, 'वयोवृद्ध । तूं ययाती[७] आमुतें' ॥ ८ ॥ येरू संतप्त पुत्रवधीं[८] । शर सोडिले काळक्रोधी । सात्यकीतें भेदोनी हृदीं । महीमाजी शिरकले. ॥ ९ ॥ क्रोध नावरे वृकोदरा । परिघप्राय सोडुनी शरा । मस्तकीं ताडोनी राजेश्वरा । न गणोनी वेथा धांवला. ॥ १० ॥ शिनिपुंगवें काळविखारी । शर योजिले अशनीसरी । सोडितां भेदिले जिव्हारीं । जाणों धडका विजांचा. ॥ ११ ॥ छिन्न होवोनियां गात्रीं । पडता जाला स्यंदनपात्रीं । मोहो वीरांतें पाहोनी नेत्रीं । बाल्हिक पुढां लोटला. ॥ १२ ॥ शर सोडिले प्रभिन्नवर्य । जेवीं वर्षाकाळीं[११] वर्षिजे तोयें[१२] । बाणीं आच्छादिला देवसूर्य । पडे अंधार संग्रामीं. ॥ १३ ॥ कासावीस वीरवाहिनी । भीमसेना क्रोधाभरणी । सात्यकीअर्थें[१३] नव बाणीं । बाल्हिकवीर ताडिला. ॥ १४ ॥ येरू प्रज्वळोनी क्रोधावर्ती । शितीं प्रेरिले महाद्युती[१४] । उसळोनी भेदुनी भीमाप्रती । पार जाती धरेतें. ॥ १५ ॥ गजघर्षणीं डळमळी वृक्ष । तैसा भीम थरके रुक्ष । गदा साधनीं परम दक्ष । वसोनी हस्तीं[१५] धांवला. ॥ १६ ॥ बळें वोपुनियां घावो । शतचूर्ण केला राजदेहो[१६] । जैसा पक्व कपित्थें[१७] सोडितां ठावो । चूर्ण होय ज्यापरी. ॥ १७ ॥ भयें थोकले महावीर । तंव पुत्रांसी[१८] क्रोधभर । रणा लोटले अष्ट भ्रातर[१९] । भीमसेना निघातें. ॥ १८ ॥ जाणों अष्ट भैरवांच्या[२०] प्रतिमा । रूप-

---

१. सर्प. २. लक्ष्मण. ३. रणस्थानीं, युद्धभूमीवर. ४. जयप्राप्तीविषयीं काळजी. ५. कौरवपक्षांतील योद्धा (सोमदत्त). ६. शोभले. ७. ययातीप्रमाणें तरुण. ययातीस जरावस्था प्राप्त झाली पण विषयवासना तृप्त झाली नव्हती ह्मणून त्यानें आपल्या पूरुनामक पुत्रापासून तारुण्यावस्था घेतली व त्यास आपलें वार्धक्य दिलें—अशी कथा आहे. ८. भूरिश्रव्याचे वधामुळें. ९. व्यथा, दुःख. १०. मर्मस्थानीं. ११. पर्जन्यकाळीं. १२. पाणी, जल. १३. सात्यकीचा बचाव करण्यासाठीं. १४. अत्यंत तेजस्वी बाण. १५. गदा हातांत घेऊन. १६. बाल्हिक राजाचें शरीर. १७. कंवठ, कंवठीचें फळ. १८. तुझ्या (धृतराष्ट्राच्या) मुलांस. १९. मूळांत 'दहा' असें आहे (अध्याय १५७।१६). २०. भैरव=शिवाचें एक उग्र स्वरूप. भैरव आठ आहेत त्यांचीं नांवें:— असितांग, रुद्र, चंड, क्रोध, उन्मत्त, कपाल (किंवा कुपति), भीषण आणि संहार.

लावण्यें हेळिती[1] हेमा । वेदनारविंद[2] सांडणें[3] सोमा[3] । वोवाळुनी[3] सांडिजे[3].
॥ १९ ॥ दिव्य स्यंदन विराजमान । दिव्य भूषणीं फांकती किरण । दिव्य-
मान शरासन बाण । रुक्मपुंखी साजिरे. ॥ २० ॥ परम **का**श्यपी, **ना**गदंत, ।
वीरबाहु, चौथा **दृ**ढरथ, । **वि**रजा, षष्ठ दृढ **प्र**हस्त, । **सु**रबाहु, **प्र**माथी.
॥ २१ ॥ लोटुनियां वीर एकमांडी । शर सोडिले **का**ळधाडी । न गणोनी
वीर अंगप्रौढी[4] । उकावला सरोष. ॥ २२ ॥ छेदितां आयुष्याचीं मूळें । पाश
कर्षोनी वोढिजे काळें । मत्स्यपीं[6] फेंकोनियां जाळें । वोढोनी आणी वधार्थी;
॥ २३ ॥ ना तो मृगेंद्रँ[7] क्षुद्र मृगें । देखोनी आवळी[8] चाटी रागें । तैसा
भीमसेन लगबगें । सोडी शस्त्र मृदु हस्तें. ॥ २४ ॥ बाण खडतरुनी कंठ-
नाळीं । शिरें उडविलीं नभःस्थळीं[9] । जैसीं उर्वारुकें[10] खंडी माळी । बाहुश्रम
न होतां. ॥ २५ ॥ जेंवी अष्ट **व**सु[11] शापधारा । खचोनी पावले **गं**गाउदरा ।
तैसीं अष्ट शिरें वसुंधरा-। पोटामाजी शिरकलीं. ॥ २६ ॥ चंडवातें पर्वत-
मौळीं । उमळोनी[12] वृक्ष पडती तळीं । तैसीं कळेवरें तेजाळीं[13] । प्राप्त जालीं
महीतें. ॥ २७ ॥ हाक वाजली एकसरा । **कौ**रववीर धावले सैरा । क्रोध
[14]**क**र्णकुमरा । बंधुद्वय[15] लोटले. ॥ २८ ॥ **क**र्ण भ्रातर **वृ**करथनामा । होवोनी
एकत्र ताडी **भी**मा । [उसळे निराळीं चंडधामा] । महारोषें शराग्नी.
॥ २९ ॥ **पां**डवें सरसावोनी धनू । शर सोडिले प्रदीप्त भानू । विखंडूनी
रुचिरतनू । **अं**तकधामा वोपिले. ॥ ३० ॥ **सौ**बळबंधु, **श**रभ, **ग**वाक्ष ।
शरसंधानीं परम दक्ष । सोडुनी बाण अलक्ष लक्ष । **भी**मतुरग मर्दिला.
॥ ३१ ॥ रोषें **यु**धिष्ठिर परम तापें । लोटला क्रोधें **कृ**तांतमापें । वर्षोनी
इषु विषरूपें । भूपपंक्ती पाडिल्या. ॥ ३२ ॥ **अं**बिष्ठ, **मा**लव, **त्रि**गर्त, ।

---

१. कमीपणा आणिती, तुच्छ समजती. २. मुखकमल (अरविंद=कमल). ३. सांडणें= ओंवाळून टाकणें. त्यांच्या मुखकमलावरून चंद्र ओंवाळून टाकावा, इतके ते सुंदर होते—असा भाव. ४. स्वतःच्या पराक्रमानें. ५. जाळें. ६. धीवरांनीं. (?) ७. सिंह. ८. ओंठ, जिभल्या. ९. आकाशांत. १०. वाळकें (ही एक कांकडीची जात आहे). ११. 'अह, धर, ध्रुव, सोम । अनळ, अनिळ, प्रत्युष, परम । प्रभास आठवा अतिउत्तम । अष्टौ नामें आठांचीं ॥' (मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय १४।८२). ह्या अष्टवसूंस 'तुह्मांस मृत्युलोकीं जन्म घडेल' असा वसिष्ठाचा शाप होता. त्याप्रमाणें ते सर्वजन गंगेच्या पोटीं आले, त्यांपैकीं पहिल्या सातांस तिनें पाण्यांत बुडविलें. आठवा भीष्म मात्र तिनें पाण्यांत बुडविला नाहीं. (मुक्तेश्वरकृत आदिपर्व—अध्याय २२ ओंव्या ९७—१३६ पहा). १२. उपटून. १३. तेजस्वी. १४. वृषसेनास. १५. कर्ण व त्याचा भाऊ वृकरथ.

अभिषाह, शिबी, समर्थ, । बाल्हिक, वसाती, हताहत[1] । करुनी सेना मर्दिली. ॥ ३३ ॥ शिबिवीर विख्यात भूमी । मद्रप तुंग[2] पराक्रमी । सहित चमू अंतकधामीं । वसती केली प्रतापें. ॥ ३४ ॥ किलकिलाट तुंबळ शब्द । द्रावमान[3] वाहिनीवृंदें[4] । देखतां द्रोण नयनारविंद । वातवेगें सुसाटे. ॥ ३५ ॥ पेंडखळोनी[5] धर्मराजा । वायव्यास्त्र सोडिलें भुजा । धार्मिक धर्में महातेजा । पर्वतास्त्र वोपिलें. ॥ ३६ ॥ वायव्यास्त्र जातां विलया । अत्यंत क्रोध द्रोणाचार्या । अस्त्रप्रयोग करुनी, राया! । अनेक शर सोडिले. ॥ ३७ ॥ याम्यास्त्र आणि वरुणास्त्र । अग्नित्वष्टासवितास्त्र । सोडिता जाहला महेंद्रास्त्र । जिंकावया धर्मातें. ॥ ३८ ॥ कडाडिली दामिनी । तेजा थिंटी[6] जाली अवनी । धर्में निरीक्षोनियां नयनीं । शमास्त्र योजिलें. ॥ ३९ ॥ अगस्त्यास्त्र, प्राजापत्य । सोडितां येरयेरें शांत । अस्त्रप्रयोग होतां व्यर्थ । द्रोण क्रोधें धडाडी. ॥ ४० ॥ धर्मनिधन कल्पोनी[7] जीवीं । शर सज्जिला प्रतापरवी । ब्रह्मास्त्र जपोनी अन्वयी[8] । महारोषें सोडिलें. ॥ ४१॥ सहस्र विजूंचा एकवळा । तैशा उदित अग्निज्वाळा । तेजें व्यापिल्या भूमंडळा । झांकल्या दृष्टी वीरांच्या. ॥ ४२ ॥ असंभ्रांत कुरुनंदन । ब्रह्मास्त्र जपोनी सोडिले बाण । तेजें दिशा संतप्त पूर्ण । खेचरांतें आक्रांतू. ॥ ४३ ॥ अस्त्रअस्त्रा संघट्टणीं । आपेंआप गेलीं विरुनी । जैसे गोवर्धनाचे मूर्ध्नी[9] । हंसडिंबक[10] निमाले. ॥ ४४ ॥ तयापरी अस्त्र विलया । वीरीं टाकिलें अंगींच्या भया । मुखें स्तविती धर्मराया । 'धन्य! धन्य!' म्हणोनी. ॥ ४५ ॥ ऐसी काळवतां वीरमांदी । फाल्गुन पातला तया संधी । [11]द्रवित सेना मिनली युद्धीं । उभयदळीं प्रतापें. ॥ ४६ ॥ द्रोणपार्थांचा संग्राम । महाभयानक रौद्रकर्म । निद्राभरें वाहिनीभ्रम । वरी मारा शरांचा[12]. ॥ ४७ ॥ धृतराष्ट्र वदे, 'गावल्गणी! । निबिड अंधार दाटतां रजनी । उभय वीर धसतां कदनीं । केवीं[13] संज्ञा[13] ठरावे[13]?' ॥ ४८ ॥ संजय

१. दाणादाण. २. अत्यंत, पुष्कळ. ३. पळूं लागलेलें, पिछेहाट झालेलें. ४. सेनासमूह. ५. चढाई करून, उठाव करून. ह्याचा कर्ता 'द्रोणाचार्य.' ६. थोडी, लहान. ७. इच्छून, चिंतून. ८. (बाणा) बरोबर जाणारें, अनुयायी. ९. गोवर्धन पर्वताचे शिखरावर. १०. हे दोघे भाऊ जरासंधाचे प्रधान होते. ११. अव्यवस्थित, दाणादाण झालेली. १२. वीररसाचें वर्णन करणें हा कवीचा मुख्य उद्देश असल्यामुळें, त्यानें मूळांतील १५८–१६० अध्यायांचा येथें लोप केला आहे. सदरहू तीन अध्यायांत कृपाचार्यांचें कर्णाशीं धिक्कारयुक्त भाषण, अश्वत्थामा व कर्ण यांचें भांडण, दुर्योधन त्यांचें भांडण सोडवितो—इत्यादि विषय आहेत. त्यांचा थोडक्यांत मासला पहावयाचा असल्यास पंतकृत द्रोणपर्व–अध्याय १७ पहावा. १३. ओळख कशी पटावी?

म्हणे, 'महाराया ! । तैलदीपिका प्रदीप्तकाया । लक्षानुलक्ष तया समया । उभय दळीं लागल्या. ॥ ४९ ॥ अश्वअश्वांस दोन दोन । प्रदीप्त दिवट्या महाघन । हस्ती हस्तीसी प्रकाशमान । सात सात एकेका. ॥ ५० ॥ दाहा दाहा रथिया वीरा । सैनिकांतें शतार्ध चतुरा । दुःशासना दिवट्या शतसंभारा । महारथी एकेका. ॥ ५१ ॥ ययापरी उभय कदनीं । प्रकाशमान सर्व अवनी । द्रोणाचळीं वनस्पती किरणी । तेवीं मही प्रदीप्त. ॥ ५२ ॥ निबिडवीरांची घोर मिठी । क्रोध नावरे द्रौणीपोटीं । पुढारतां, पांचाळ हटी । धृष्टद्युम्न लोटला. ॥ ५३ ॥ द्वयरथयुद्ध उभयतां । रणीं शरांच्या लाविल्या चलथा । खंडिती भेदिती चतुरता । शरलाघव विद्येच्या. ॥ ५४ ॥ इषूंमार्गे इषूंच्या थाटी । उसळती जैशा हवया पुष्टी । महावीरांच्या झांकती दृष्टी । भ्याड धरे रिचवती. ॥ ५५ ॥ उभय सिंहाचे चपेट । तैसे शर ताडिती अदट । क्षतें परिपूर्ण गात्रपुट । रुधिरांग डवरिलें. ॥ ५६ ॥ तेणें शोभला वीरू । जाणों फुल्लित किंशुकतरू । क्रोधनदीचा दाटला पूरू । येरयेरां क्षयार्थी. ॥ ५७ ॥ मुहूर्त एक कडोविकडी । दारुण संग्राम महाप्रौढी । मंडळाकार धनुष्य वोढी । रिक्तपाणी न साहे. ॥ ५८ ॥ आश्चर्यमान सकळ वीर । तटस्थ पाहती शक्तीचा भर । हुंकार शब्दाचा गजर । सेनामांदी कालवे. ॥५९॥ शस्त्रक्रिया सारिखी शक्ती । जय कोण्हा न कळे मती । शरीं व्यापिली वसुमती । वाट वारिया न चाले. ॥ ६० ॥ रौद्र युद्ध अतिदारुण । कुशळ शारद्वतनंदन । लघुलाघवें क्षुरप्र बाण । सोडी तीक्ष्ण विखारी. ॥ ६१ ॥ ध्वज, धनु, छत्र, पृष्ठिसारथी । छेदोनी सूताश्व पाडिले क्षिती । धृष्टद्युम्न विगतगती । सहस्रशः सेना मर्दिली. ॥ ६२ ॥ पांचाळवीर प्रभिन्नरथी । त्र्याण्णव वोपिले काळप्रस्थीं । सहसृंजय सुरांच्या पंक्ती । वसते केले प्रतापें. ॥ ६३ ॥ पाहत असतां सव्यसाची । खालाविलीं शिरें सैनिकांचीं; । कौरववीर, प्रसन्नतेची । वरुनी शोभा, नृत्यती. ॥ ६४ ॥ सिंहरव फोडी शब्द । जाणों निस्वनं गर्जे जळद । पांडव वीर पावोनी खेद । व्याघ्रन्यायें उसळले. ॥ ६५ ॥ धर्मराज भीमसेन । सदा जयस्वी श्वेतवाहन । अनेक वीर प्रतापवान । महारोषें लोटले. ॥ ६६ ॥ धडकोनियां द्रोणकुमरा । शर वर्षती अग्निधारा । गुरु पातला कैवारा । दुर्योधनासमवेत. ॥ ६७ ॥ धर्मराज क्रोधावर्ती । लाविल्या

---

१. मशाली, दिवट्या. २. द्वंद्वयुद्ध, दोन योद्ध्यांचें परस्परांशीं युद्ध. ३. चंद्रज्योति. ४. चातुर्यानें, कुशलतेनें. ५. पृथ्वी. ६. वाऱ्यास, वायूस. ७. यमनगरींत. ८. गंभीरध्वनीनें. ९. मेघ. १०. साह्यार्थ.

शरांच्या दिव्य पंक्ती । **अं**बिष्ठ, **मा**लव, **वं**ग, नृपती । **शि**वी, **त्रि**गर्त, मर्दितू[1]. ॥ ६८ ॥ अभिषाह **शू**रसेन । महादुर्मद सेनाघन । त्यांतें विगत **भी**मसेन । करुनी चमू विभांडी. ॥ ६९ ॥ **म**द्रक, **मा**लव सहानुग[2] । मर्दोनी **पा**र्थें केले व्यंग । रक्त मांसाचा कर्दम सांग । धरा देवी व्यापिली. ॥ ७० ॥ छिन्नगात्री विशाळ हस्ती । महीप्रपात शैलाकृती[3] । छत्रें चामरें राजित क्षिती । चतुरंग-शवें दाटिलीं. ॥ ७१ ॥ क्रोधें प्रदीप्त **द्रो**णाचार्य । शर वर्षोनी अप्रमेय । **पां**चाळ **सृं**जय वीरवर्य । अनेकशः मर्दिले. ॥ ७२ ॥ उभय वीरांची घोर मिठी । बाणवर्षाव होतसे सृष्टी । मूर्च्छा सांवरुनी उठाउठी । **सो**मदंत पातला. ॥ ७३ ॥ दृष्टी देखोनी **सा**त्यका । वमिता जाला क्रोधउल्का । म्हणे, 'अधमा! मम बाळका । **भू**रिश्रव्या मर्दिलें. ॥ ७४ ॥ परी तूं आजी माझिये बाणीं । वसता होसी **का**ळसदनीं । क्रोधें संरब्ध **दं**डपाणी[4] । मोकळी कोटी शरांच्या. ॥ ७५ ॥ **सा**त्यकी सिंह वीरराजा । आस्फोटोनी[5] उभय भुंजा । शर सोडिले ज्यांचिया तेजा । रविकिरण लोपले. ॥ ७६ ॥ परस्परें नाराच[6]-जाळीं । आच्छादिले वीर तळीं । जैसा भास्कर मेघमंडळीं । न दिसे दृष्टी जनांच्या. ॥ ७७ ॥ असंभ्रांत उभय वीर । रोषें प्रदीप्त **बा**ल्हिककुमर । काळविखारी सात शर । **सा**त्यकीतें समर्पी. ॥ ७८ ॥ **या**दवें करुनियां त्वरा । बाणीं ताडिलें भूपनिकरा[7] । उभय अंगीं रक्तधारा । गळल्यांपरी लागल्या. ॥ ७९ ॥ विचित्र मंडळ कडोविकडी । दावोनी विंधी बाणप्रौढी । जाणों पडली अग्नीची उडी । तेवीं बाण सुसाती. ॥ ८० ॥ क्रोधें प्रदीप्त **बा**ल्हिकसूनू । अर्धचंद्र[8] सोडुनी बाणू । खंडुनी **सा**त्यकीचें धनू । धरेवरी पाडिलें.॥ ८१॥ तापले हस्तें पंचवीस । शर वोपिले **सा**त्यकीस । त्यांवरी आणीक द्वादश । काळविखारी अर्पिले. ॥ ८२ ॥ दुःसह मानोनी **वृ**कोदर । नव परिघ आयस[9]-सार । प्रेरी लक्षोनियां जिंव्हार[10] । भेदावया नृपातें. ॥ ८३ ॥ सुसाट येतां दंभोलीसरी[11] । येरें निरीक्षोनी नेत्रद्वारीं । इषु प्रेरुनी काळविखारी । सर्पन्याय खंडिले. ॥ ८४ ॥ अत्यंत क्रोध **शि**निप्रवीरा । नतपर्वणी तीक्ष्ण शरा । सोडुनियां अति सत्वरा । छेदी धनु हातींचें. ॥ ८५ ॥ त्यांवरी आणीक सात बाण । विंधोनी हस्तांचें केलें भग्न । चत्वारि बाण अतिदारुण । चारी अश्व मर्दिले. ॥ ८६ ॥ त्वरा करुनी शरसंधानीं । सारथिशीस उडविलें बाणीं ।

---

१. पराजित करी. २. अनुचरांसह. ३. हत्ती पर्वताप्रमाणें जमिनीवर पडले. ४. यमासारखा. ५. दोन्ही दंड थोपटून. ६. नाराच=बाण. ७. (कौरवपक्षीय) राजांच्या समुदायास. ८. अर्धचंद्राकार बाणविशेष. ९. उत्तम पोलादी. १०. मर्मस्थान. ११. इंद्राच्या वज्रासारखा.

शिळाशित कृशानमानी । चापीं शर सज्जिले. ॥ ८७ ॥ रुक्मपिसारे हेमरेखा । सोडितां उसळले जैसी उल्का । हृदीं भेदुनी, नरनायका! । महीमाजी शिरकले. ॥ ८८ ॥ जैसें शिखर वज्रघायीं । खचोनी पडिलें जेवीं मही । तैसा सोमदत्त छिन्न मही । पडे अजीव धरेतें. ॥ ८९ ॥ सेनाधिप काळसदना । जातां, तयाच्या लोटेला सैन्या । सात्यकी प्रतापाचा राणा । इषूंच्या माळा मोकळी. ॥ ९० ॥ भग्न करुनी कौरवचमू । अनेक मारिले न पवतां श्रमू । सेनामेळें पावोनी भ्रमू । द्रोणापाठी निघाले. ॥ ९१ ॥ हर्षमान यदुवीर । पाठी अमित सेनाभार । द्रोणवधीं अत्यादर । सेनामेळीं शिरकला. ॥ ९२ ॥ शर वर्षोनी अनेक । मारी वीर ठळक ठळक । कासावीस वाहिनीमुख । वीर माघां सरकती. ॥ ९३ ॥ पाहोनी द्रोण लोटला पुढा । कार्मुकीं सज्जोनी कुऱ्हाडा । सोडितां, धांवले वेगाढा । माघां लोटुनी वायूतें. ॥ ९४ ॥ धडकोनियां धार्मिक धर्मा । धरणी पातले विश्रामा । येरें क्षोभोनी वन्हिप्रतिमा । पांच द्रोणा अर्पिले. ॥ ९५ ॥ तेणें गुरूतें क्रोधभरणी । सृक्किणी चावोनियां दशनीं । शर सोडुनी काळमानी । ध्वजधनुष्य खंडिलें. ॥ ९६ ॥ अश्वसूत भेदोनियां बाणीं । धर्मे ताडिला हृदयस्थानीं । कश्मल दाटतां, वीरश्रेणी । सहस्रशः लोटले. ॥ ९७ ॥ किलकिलाट शब्दस्वर । ऐकोनियां त्रिदशेश्वर । जो निर्मिता सचराचर । विधिगोंधळ ब्रह्मांडें; ॥ ९८ ॥ रुक्मिणीरमण, करुणाघन । रुक्मांगदव्रतपरिपाळण । रुक्मांगदें विराजमान । रुक्मियामान खंडिता; ॥ ९९ ॥ चूडामणी, शार्ङ्गपाणी । चूंडा अक्षयी जगस्वामिणी । चंद्रचूड अचूड ध्यानीं । कैवल्यदानी, अनंतू; ॥ १०० ॥ म्हणे, 'पार्था! पुरुषार्था! । द्रोणानीका वीरचलथा । दाटला, तेथें सुभद्राकांता! । वातवेगें जाइंजे.' ॥ १०१ ॥ येरू वदे, 'बहुत बरवें.' । स्यंदन प्रेरिला

---

१. साहाणेवर पाजवलेले. २. अग्नीसारखे. ३. प्राणरहित, मृत. ४. तुटून पडला. ह्याचा कर्ता 'सात्यकी'. ५. सैन्यांतील मुख्य. मुख=मुख्य, प्रमुख. '**मुखं** तु वदने मुख्ये ताम्रे छद्मनि ना पुमान्' इति भागुरिः. । ६. ओंठ. ७. मूर्च्छा. ८. रुक्मांगद हा एक ईश्वरभक्तिपरायण राजा होता. यानें एकादशीव्रत, उत्तमप्रकारें पाळून, ईश्वरकृपा संपादिली व आपल्याप्रमाणें सर्व नागरिकांसही वैकुंठलाभ करून दिला. "रुक्मांगद करी एकादशीव्रत । त्यासी पावलासी तू भगवंत । नगरनागरिक लोक समस्त । पुरी नेली वैकुंठा. ॥ ३९ ॥ (देवदासकृत संतमालिका). ९. रुक्मिया-हा रुक्मिणीचा ज्येष्ठ बंधु. ह्याच्या मनांतून शिशुपाळाशीं रुक्मिणीचें लग्न लावावयाचें होतें; परंतु लग्न लागण्यापूर्वीच कृष्णानें रुक्मिणीस पळवून नेलें व युद्धांत रुक्म्याची विटंबना केली.-अशी कथा आहे. १०. बांगड्या, कंकणें. ११. शंकर.

रमाधवें । रथचक्रनेमीचिया रवें । धरादेवी धुमधुमी[1]. ॥ १०२ ॥ वारणदळीं पावतां हरी[2] । ढुंद्रावती[3] गजांचिया हारी । **कौ**रव वीर म्हणती '[हारी] । आतां येईल निश्चयें.' ॥ १०३ ॥ **दु**र्योधन प्रबोधी वीरां । 'सर्वी रक्षिजे **द्रो**णाचार्या । **धृ**ष्टद्युम्न त्याचिया काया । न्याया लया टपतसे. ॥ १०४ ॥ तैसा **भी**म मातें पाही । सदा सादर मरणोपायीं । **र**विनंदना विगत [रणठायीं] । करूं भावी **अ**र्जुन. ॥ १०५ ॥ **गौ**तम नसतां आश्रमाप्रती । **इं**द्रें **अ**हिल्या भ्रष्टली सती । कीं **सी**ताहरण **लं**कापती । करी रक्षण न होतां. ॥ १०६ ॥ तयानिमित्त सादर सर्वी । रक्षिजे **गुरु** प्रतापरवी.' । ऐसें वदोनी समज स्वभावीं । वीर वोपी रक्षणीं. ॥ १०७ ॥ **हा**र्दिक्य[4] सिंह दक्षिण पाही[5] । **श**ल्यराज उत्तरे पाही । पृष्ठता वीर अमित तेही । नामानिक[6] वोपिले. ॥१०८॥ अग्रता तव सुत अतुर्बळी । सहस्र **त्रि**गर्त सेनामेळीं । यांहीवेगळे वीर बळी । ठाईं ठाईं योजिले. ॥ १०९ ॥ **पां**डव वीर जयश्रीभरें । **द्रो**णनिधना लोटले त्वरें । उभय चमू आशाभरें । एकमेकां थडकले. ॥ ११० ॥ हस्तिप लोटले हस्तिपां । असिवारांसी[7] असिवार, नृपा ! । पदातिया पदातिया थापा[8] । शस्त्राचिया हाणिती. ॥ १११ ॥ रौद्र संग्राम अतिदारुण । गर्जोनी वीर ताडिती त्राणें । जालें शवांचें सर्पण । रक्तें धरा नाहिली. ॥ ११२ ॥ **ध**र्मराज **द्रो**णनिधना । येतां लोटला **कृ**तवर्मराणा । युद्ध जाहलें दोघां जणां । **कं**सकृष्णासारिखें. ॥ ११३ ॥ **यु**धिष्ठिर क्रोधभरणी । **या**दव ताडिला पंचबाणीं । यांवरी आणीक **का**ळमानी । वीस गात्रीं वोपिले. ॥ ११४ ॥ रोषें संरब्ध **कृ**तवर्मा । पांच बाण ताडिले **ध**र्मा । छेदोनी चाप उडविलें व्योमा । फणिशवासारिखें[9]. ॥ ११५ ॥ अन्य कार्मुक सज्जोनी, बापा ! । दश बाण ताडिले **या**दवाधिपा । **हा**र्दिक्य कोपोनियां, नृपा ! । सात **ध**र्मा वोपिले. ॥ ११६ ॥ अकंपत **ध**र्म क्रोधभरणी । छेदोनी धनु पाडिलें धरणी । शिळाशित पंचबाणीं । **हा**र्दिक्यातें ताडिलें. ॥ ११७ ॥ कवच भेदोनी शिरले गात्रीं । रुधिर प्राशोनी भरले धात्री । जैसे पन्नग[10] **का**ळवक्रीं । वारुळातें शिरकती. ॥११८॥ पापणीस पापणी न लगतां । चाप सज्जिलें **भो**जें तथा । शत सात वोपुनी **ध**र्मसुता[11] । नव सारथ्यां ताडिले. ॥ ११९ ॥ **ध**र्मराजें क्रोधानळीं । हेमदंड

१. दुमदुमली, गजरयुक्त झाली. २. सिंह. ३. पळती, हतवीर्य होती. ४. कृतवर्मा. ५. देखरेख ठेवी. ६. नामांकित. ७. असिवार=स्वार, राऊत. ८. थडका. ९. सापाच्या प्रेताप्रमाणें. १०. साप. ११. धर्मराजास. धर्म हा यमधर्मांचा पुत्र होय.

प्रदीप्तकीळीं । सोडिली शक्ती; फोडुनी अरोळी । सात्वतातें निघातें. ॥ १२० ॥
वारितां नावरोनी अतुर्बळी । भुज छेदोनी विझाले तळीं । अन्य धनुष्य तेजें
कल्लोळीं । धर्मराजें सज्जिलें. ॥ १२१ ॥ शर वर्षोनी अपरिमित । बुजोनी
काढिला भोजनाथ । येरू धनुर्धरवर्य पंडित । सोडी इषु लघु हस्तें. ॥ १२२ ॥
रथ, चक्र, अश्व, ध्वज, सारथी, । छेदोनी धर्म केला विरथी । खड्गचर्म
स्वीकारुनी भक्ती । येतां तेंही खंडिलें. ॥ १२३ ॥ काळदंडासमान [सत्वरीं] ।
तोमर टाकिला सात्वतावरी । [2]येरें दुखंड करुनी शरीं । धरेवरी पाडिला.
॥ १२४ ॥ हास्य करुनी प्रसन्न मुखें । शरीं ताडिला कुरुटिळकें । छिन्न
कवच, रुधिर बि[3]कें । भूमीवरी वावरे. ॥ १२५ ॥ विगत करुनी युधिष्ठिरा ।
द्रोणरक्षणा पातला त्वरा । विन्मुख धर्म, राजेश्वरा ! । अन्यरथीं [4]वैंळघला.
॥ १२६ ॥ द्रोणवधनीं अचळ बुद्धी । सात्यकी पुढारतां युद्धीं । अश्वत्थामा
अमितक्रोधी । वारितां भैमी धडकला. ॥ १२७ ॥ तोची पुढां युद्धप्र-
संग । श्रोतेसज्जनीं ऐकिजे सांग । भीमराजकृपेचा प्रयोग । नरहर मोरेश्वर
निवेदी. ॥ १२८ ॥[5]

अध्याय एकोणतिसावा.

संजय वदे, "ऐश्वर्यनिधी । भैमी सक्रोध लोटतां युद्धीं । [7]पौरुष्यवचन
कटुवृद्धी । द्रौणीप्रती बोलतू. ॥ १ ॥ म्हणे, 'आजी माझिये बाणीं । मृत्यु
पावसी समरांगणीं । दुःखें फुटोनी तव जननी । देह त्यागील निश्चयें. ॥ २ ॥
द्रोणवंशनिधानठेवा । रणसागरीं बुडवीं हवा । शो[8]कतरंगिणीप्रवाहा । वसते
[8]करीन तयातें.' ॥ ३ ॥ येरू वदे, 'अचाट गोष्टी । वज्रा कैं बेडुक [9]घोटी? ।
पुनर्वसुपुष्याचिये वृष्टी । हिमालय वाहवे? ॥ ४ ॥ [10]व्यांळविषाचिया घोटीं ।
व्याकुळ होइजे धूर्जटी? । राक्षसाच्या मिनतां कोटी । हनुमान मानी दरारा?
॥ ५ ॥ तयापरी तव प्रतापरोष । अकाळ काळींचे घन [11]फोस.' । ऐसें वदोनी
क्रोधें कर्कश । शरौघमाळा सोडिल्या. ॥ ६ ॥ संतप्तमान राक्षसेंद्र । क्रोधें

---

१. सात्वत=यादव=कृतवर्मा. २. सात्वतानें. ३. बीक=आवड, सौंदर्य किंवा तेज. (ज्ञानेश्वरी ६।१५ व १३।७०१ पहा). 'बीकबाळी' या शब्दांतही 'बीक' याचा अर्थ असाच आहे. ४. चढला, बसला. ५. ह्या अध्यायाचें **'रात्रियुद्ध'** असें नांव आहे. ६. ह्यांत मूळांतील १६६–१७३ अध्यायांचा सारांश आला आहे. ७. कठोरवचन, कटू भाषण. ८. शोकनदीचा प्रवाह चालू करीन (अश्वत्थाम्यास मारून त्याच्या मातापित्यांस रडावयास लावीन)–हा इत्यर्थ. ९. गिळी. १०. सर्पांच्या विषाच्या एका घोटानें. ११. फोल, व्यर्थ, तुच्छ.

प्रज्वळिला जैसा **रु**द्र । जाणों **द**क्षालागीं[1] **वी**रभद्र । तेवीं रोषें धडाडी. ॥ ७ ॥ चाप कर्षोनी कर्णपुटा[2] । शर सोडिले जैशा लाटा । उभय शरांचिया थाटा । होय नभ अपुरतें. ॥ ८ ॥ शरांमागें शरौघमाळा । जाणों विजांचा एकवळा । वीरश्रीभरें फोडिती कीळा । महामेघासारिख्या. ॥ ९ ॥ बाणघाव उत्तम[3] आंगीं[3] । रुधिरस्राव होतसे वेगीं । वस्त्राभरणें रंगिलीं रंगीं । गुलालतोयासमान. ॥ १० ॥ **घ**टोत्कचें क्रोधतवकीं । क्षुरप्र, अर्धचंद्र, शिळीमुखी, । कर्णिक, नौळिक,[4] सायक तिखी,[5] । सहस्रशः सोडिले. ॥ ११ ॥ रजनीतम प्रभिन्न घोर । खद्योतप्राय[6] विचरती शर । भ्याड झांकिती **न**यनद्वार । **शू**र आनंदा पावती. ॥ १२ ॥ **घ**टोत्कच लवडसवडी[7] । बाण सोडी काळधाडी । येवोनी बैसले हृदयकुंडीं । [**द्रौ**णीचिया निघातें.] ॥ १३ ॥ नागधडकें[8] थेंडके द्रुम[9] । तैसा डळमळी विप्रसत्तम । चांचरी[10] [जावुनी] हस्तपद्म । ध्वजयष्टिका स्पर्शली. ॥ १४ ॥ 'आहा!' भूत तवं वाहिनी[11] । हर्षें **पां**चाळ नाचती रणीं । क्षणा[12] सावध जाहला **द्रौ**णी । जेवीं सूर्य ढगांतीं. ॥ १५ ॥ **द्रौ**णी प्रदीप्त क्रोधानळीं । **य**मदंडप्राय विशाळ भाळी । सोडितां भेदुनी हृदयकमळीं । सपिच्छ धरे[13] निघाले. ॥ १६ ॥ मृगेंद्रांचे[14] चपेटघायीं । जैसा मृगेंद्र[15] सेवी मही[16] । तैसा **भै**मी निस्विन्नदेही[17] । पडे निचेष्टित[18] इतस्ततः. ॥ १७ ॥ प्राणोत्कर्षाची जाणोनी वेळा । सूतें काढोनी अश्रु डोळां । रथ फिरवोनी उतावेळा । माघारला सैन्यातें. ॥ १८ ॥ 'आहा'कार **पां**डवचमू । क्रोधें प्रदीप्त जाहला **भी**मू । **द्रो**णवधाचा हृदयीं[19] कामू । भांवोनी धांवे सरोष. ॥ १९ ॥ **द्रो**ण वधार्थी **भी**मसेन । पुढारुनी **दु**र्योधन । शिळाशित शर दारुण । शत तीक्ष्ण

---

१. दक्षप्रजापति हा शंकराचा सासरा. ह्यानें शंकरपार्वतींस त्याच्याकडे सुरू असलेला यज्ञसमारंभ पाहण्यास बोलाविलें नाहीं. परंतु चुकीनें आपल्यास बोलावयाचें राहिलें असेल, असें समजून शंकर व पार्वती उभयतां यज्ञ पाहावयास गेलीं. तेथें दक्षानें यांचा अपमान केला. यामुळें शंकरानें आपल्या वीरभद्र नामक पार्षदाकडून यज्ञाचा नाश करवून दक्षाचा वधही करविला—अशी कथा आहे. २. आकर्ण. ३. मस्तकावर. ४. ह्या बाणांच्या जाती आहेत. ५. तीक्ष्ण, प्रखर. ६. काजव्याप्रमाणें. ७. घाईनें, झटपट. ८. हत्तीनें टक्कर मारल्यामुळें. ९. झाड पडतें. १०. अश्वत्थाम्यानें मूर्च्छित होऊन ध्वजस्तंभावर हात टेंकिला—असा भावार्थ. 'स मोहमनुसंप्राप्तो ध्वजयष्टिं समाश्रितः' असें मूळांत आहे (अध्याय १६६।३२). असेंच वर्णन **न**रहरिकृत 'कर्णपर्वा'त आहेः— 'तेणें दाटली मूर्च्छना तया (अश्वत्थाम्यास) । ध्वजयष्टीसी टेंकिली काया । सूतें पाहोनी विपरीत चर्या । रथ मागां फिरविला. ॥' (अ० १०।१५९). ११. कौरवांचें सैन्य. १२. क्षणांत. १३. जमिनींत घुसले. १४. सिंहाचे. १५. हरिणांचा राजा. १६. जमिनीवर पडतो. १७. घामाघूम. १८. चेतनारहित. १९. संकल्प धरून, हिकमत लढवून.

ताडिले. ॥ २० ॥ परिघप्राय वृकोदर । नव सायक महाक्रूर । ताडुनिय कौरवेश्वर । इषुकोटी मोकळी. ॥ २१ ॥ दुर्योधनें तीव्र विखारी । विंशती शर हैडंबावरीं । भेदोनी क्रोधें स्तनांतरीं । शरौघमाळा लाविल्या. ॥ २२ ॥ उभय बाणांचे नेहटीं[1] । झांकोळली[2] भूतसृष्टी । तीव्र शरांची होतसे वृष्टी । प्रळयमेघांसारिखी. ॥ २३ ॥ परस्परें शरलाघव[3] । दाविती शक्तीचें विभव । चतुर सारथी हयगौरव । विविधभेद सूचती. ॥ २४ ॥ अत्यंत क्रोध भीमसेना । पांच बाण ताडी दुर्योधना । चाप छेदोनी रणांगणा । बहुशा शर अर्पिले. ॥ २५ ॥ कौरवराजें रोषभरणीं । अन्य धनु सज्जिलें क्षणीं । नव नाराच[4] अशनीमानी । भीमसेना ताडिले. ॥ २६ ॥ जंभ[5] आणि सुत्रामा[6] पूर्वी । युद्धा मिनले वैरभावीं । तैसे उभयतां प्रतापरवी । एकमेकां ताडिती. ॥ २७ ॥ रोषें प्रदीप्त दुर्योधनू । वृकोदराचें छेदिलें धनू । अन्य चाप सजितां ज्वलीनू[7] । तेंही हातींचें छेदिलें. ॥ २८ ॥ कार्मुकामागें कार्मुक । पांच खंडिलें बाणें सतिख । वीरमांदी हर्षितमुख । [8]दुर्योधना पूजिती. ॥ २९ ॥ कोदंडें[9] धरूं नेदी हातीं । [10]पांडव भीम क्रोधावर्ती । सौदामिनीसमान शक्ती । सोडी रोषें निघातें. ॥ ३० ॥ कडाडिली महाघोषें । सकंप धरा थरके रोषें । वीरमांदीसी भयपिसें । भरुनी नेत्र झांकिती. ॥ ३१ ॥ क्षयाग्नीची प्रदीप्त कीळा । तैसिया तेजें उतरतां तळा । कौरवें लक्षोनियां डोळां । शरप्रयोग मंत्रिला. ॥ ३२ ॥ धनुष्य कर्षोनी आकर्ण । शरत्रय सोडिले ज्वलीन । निर्भर्त्सीनी शक्तीचा मान । त्रिखंड केले तीं ठाईं. ॥ ३३ ॥ देखतां संतप्त वृकोदर । क्रोधें गदेसी घातला कर । भ्रमोनी [11]झोंकिली कौरवावर । महात्राणें क्षयातें. ॥ ३४ ॥ येतां देखोनी काळभगिनी । उडी टाकोनी निघे सैन्यीं । सूताश्वाची करुनी धुंणी[12] । यमसदना वोपिले. ॥ ३५ ॥ खळबळली कौरवसेना । पांडवें शंख स्फुरिले वदना । जयश्रीवारें[13] माद्रीनंदना[14] । वधूं द्रोणा धांवला. ॥ ३६ ॥ सुवर्णरथ जडाव रत्नीं । ध्वजपताका प्रदीप्तकिरणी । पाऱ्यासमान[15] वारु[16] गुंणी । डळमळिती चहूं दिशा. ॥ ३७॥ रुक्मधनु, प्रभिन्न पाणी । शर सज्जिले काळमानी । येतां देखोनी कर्ण नयनीं । होवोनी पुढां

---

१. रेटारेटींत. २. आच्छादित झाली. ३. शरसंधान करण्याचें कौशल्य. ४. बाण. ५. हा एक राक्षस होता व याचा वध इंद्रानें केला. म्हणून इंद्राला 'जंभारि' असें नांव आहे. ६. इंद्र. ७. प्रज्वलित, प्रखर. ८. दुर्योधनाची स्तुति करूं लागले. ९. धनुष्य. १०. पांडुपुत्र (भीम). ११. फेंकिली. १२. भस्म, राख. १३. जयश्रीचें वारें अंगीं भरून, विजयानें फुगून. १४. सहदेव. १५. पाऱ्यासारखे चंचळ. १६. घोडे.

थोपिला[1]. ॥ ३८ ॥ [2]सपक्ष पाहोनी कर्णातें । रोष नावरे सहदेवातें । चापीं सज्जोनी नव बाणांतें । [3]वैकर्तना ताडिलें. ॥ ३९ ॥ पुन्हा नव नतपर्वणी । रुक्मपिसारे, विचित्रवर्णी । अर्पण करुनी बाणी । सिंहनाद फोडिला. ॥ ४० ॥ हास्यवदन रविनंदनू । शर सोडुनी छेदिलें धनू । सहदेव रोषें प्रदीप्त भानू । अन्य धनु वाहिलें. ॥ ४१ ॥ तीक्ष्ण शर सत्याहत्तर । वर्मीं ताडिला राधाकुमर । येरूनें भरुनी क्रोधनिकर । शर अमित सोडिले. ॥ ४२ ॥ चत्वार तुरंग [4]वातसरी । सह सारथी मर्दिला समरीं । विरथी सहदेव क्रोधलहरी । खड्गचर्म स्वीकारी. ॥ ४३ ॥ विविध भेद हस्तक्रिया । दावितां पुढां लोटला तया । कर्ण प्रतापी वीरवर्या । कौतुकें शर सोडिले. ॥ ४४ ॥ खड्गचर्माचे करुनी तुकडे । धरणी पाडिले देहुडे[5] । सहदेव क्रोधें धडाडे । जाणों वन्ही प्रळयींचा. ॥४५॥ [6]महती गदा आयससार । बळें झोंकिली कर्णावर । येरें सोडुनी बाण तिखार । खंडुनी धरे पाडिली. ॥४६॥ विफळ जातां गुर्वी गदा । माद्रीय चढे महाक्रोधा । [7]वैडूर्यकीळी शक्ति तदा । महारोषें सोडिली. ॥४७॥ कर्णें विंधोनी तीक्ष्ण बाणीं । त्रिखंड करुनी पाडिली धरणी । येरू उदित क्रोधभरणी । [8]चक्र रोषें मोकळी[9]. ॥ ४८ ॥ [10]मार्तंडदीप्ती वातवेगें । येतां कर्णें लक्षिलें अंगें । सायक प्रेरुनियां सांगें । खंडुनियां टाकिलें. ॥ ४९ ॥ जैसा हतभाग्याचा उदीम । करितां निर्फळ होय श्रम । कीं वांज स्त्रीचा संभ्रमें[11] । प्राप्त नोहे [12]फळार्थी. ॥ ५० ॥ तयापरी सहदेवाचा । कर्ण वीर धनुर्धरांचा । निर्फळ करुनियां साचा । दीक्षागुरु प्रतापी. ॥ ५१ ॥ सहदेववधा दारुण बाण । शरासनीं योजिला कर्णें । तंव कुंती[13]वचनाचें स्मरण । आड रिघे तांतडी. ॥ ५२ ॥ आखडोनी हस्त, प्रेरुनी रथ । बाण[14]कोटीं स्पर्शिलें त्यातें । म्हणे, 'वीरा! [15]बाळमतें । उदित युद्धा जाहलासी. ॥ ५३ ॥ आपणासमान पाहोनी योद्धा । त्यासी रण करिजे [16]स्पर्धा । आतां सोडुनी रणमदा । पार्थयुद्धा मिनिजे[17]. ॥ ५४ ॥ नाहीं तरी स्वधामासी । जायें, राहें आपुले तोषीं.' । ऐसें वदोनी सहदेवासी । पांचाळदळीं मिसळला. ॥ ५५ ॥ हतरथशस्त्रसामादी ।

---

१. अडविला, थांबविला. २. आपल्या पक्षाकडील वीरांसह. ३. सूर्यपुत्र जो कर्ण त्यास. ४. वाऱ्याप्रमाणें चपळ. ५. वांकडेतिकडे, अस्ताव्यस्त. ६. पोलादाची वजनदार गदा. ७. वैडूर्यनामक रत्नासारखी तेजस्वी शक्ति. ८. चाकाच्या आकाराचें शस्त्रविशेष. हें फेंकलें असतां गरगर फिरत जाऊन शत्रूवर आदळतें व त्याचा नाश करितें. ९. सोडी, फेंकी. १०. सूर्यासारखें तेजस्वी. ११. आवड, हौस. १२. संतानप्राप्त्यर्थ. १३. अर्जुनाशिवाय इतर पांडवांस मारणार नाहीं असें कर्णानें कुंतीस वचन दिलें होतें. १४. बाणाच्या टोंकानें. १५. पोरबुद्धीनें, मूर्खपणानें. १६. ईर्ष्येनें. १७. अर्जुन युद्ध करीत आहे तिकडे जाऊन त्याला मीळ—हा इत्यर्थ.

शरें पीडित मरणावधी[1] । कर्णवाक्यपारुष्य[2] हृदीं । क्षणक्षणा जाकळे[3]. ॥ ५६ ॥ पांचाळसुत जनमेजयें । प्रेरुनी रथ माद्रीतनय । वरी घेतला वीरवर्य । शांतविला सुशब्दीं. ॥ ५७ ॥ विराट धांवतां द्रोणवधीं । त्यातें मद्रराज वारी क्रोधी । युद्ध जाहलें उभयां स्पर्धी[4] । क्रौंचयुद्धासारिखें[5]. ॥ ५८॥ मद्रराज वीरश्रीलाटा । शत बाण वोपी विराटा । येरू प्रज्वळोनी क्रोधफाटा । नव बाण तया वोपिले. ॥ ५९ ॥ पुन्हा त्यांवरी एकवीस । नतपर्वणी काळविष । आणीक शत एक नराधीश । मद्रराजा समर्पी. ॥ ६० ॥ शल्यराज क्रोधनिर्भर । काळविखारी सोडुनी शर । चत्वार वाजी, सारथी, शिर । छेदोनी, धरे पाडिले. ॥ ६१ ॥ ध्वज उडविला नभ:स्थळीं । हृदीं सदृढ वोपिल्या भाली । मत्स्य[6] मत्स्यापरी तळमळी । पडे मूर्च्छित स्यंदनीं. ॥ ६२ ॥ शतानीक[7] धांवला कैवारा[8] । शरीं शरांच्या वर्षल्या धारा । शल्यें बाणीं करुनी पुरा । यमसदना धाडिला. ॥ ६३ ॥ विराटाचा सहोदर । रणीं निमाला, हाहाकार । खळबळोनी पांडव वीर । द्रोणाचार्या धडकले. ॥ ६४ ॥ जैसें आमीष[9] देखोनी नेत्रीं । कंकं[10] झडा घालिती धात्री । तैसे द्रोणनिधना वीर क्षत्री । झेंपावती क्षयातें. ॥ ६५ ॥ पृषतपुत्र पांचाळपंचानन । गुरुवधार्थी धांवतां त्राणें । त्यातें सिंह-शावक वृषसेन । लोटोनी वर्षे शरांतें. ॥ ६६ ॥ तेहीं रिघोनी अभ्यंतरीं । रक्त प्राशिलें धणीवरी[11] । द्रुपदातें क्रोधलहरी । उचंबळे अफाटें. ॥ ६७ ॥ धनु कर्षोनी आकर्ण वोढी । शर सात सोडिले महाप्रौढी । कर्णनंदना लव-डसवडी । बाहू उरीं भेदिले. ॥ ६८ ॥ वृषसेनें काळविखारी । शर वोपिले स्तनांतरीं । परस्परें शरांच्या हारीं । उभयवर्गा भेदिलें. ॥ ६९ ॥ रुधिरस्रावें माखल्या तनू । जाणों सुरंगी[12] सलिलघनू । ना तो पुष्पित[13] विराजमानू । किंशुक[14] तरू ज्यापरी. ॥ ७० ॥ उभयगात्रीं भेदिला शरू । जाणों स कंटक हिंगणतरू[15] । कीं मयूरबर्हाचा[16] वीरू । ना ते सायाळ[17] अद्भुत. ॥ ७१ ॥ तयापरी सर्वांग बाणीं । भरुनी इषु वर्षती त्राणीं । शरीं दाटली पूर्ण अवनी । फोडिती

---

१. मृतप्राय. २. पारुष्य=कठोरपणा, निर्भर्त्सना. ३. सळे, डंवचे. ४.उभयतांच्या मनांत स्पर्धा उत्पन्न करण्यासारखें. ५. क्रौंचारण्यांत रामाचें कबंध, अयोमुखी इत्यादि राक्षसांबरोबर युद्ध झालें त्याप्रमाणें. ६. विराटराजा. ७. हा विराटाचा भाऊ. ८. साहाय्यार्थ. ९. मांस, भक्ष्य. १०. गिधाडें. ११. पोटभर, इच्छा तृप्त होईपर्यंत. १२.जणुं काय रंगीत सजल मेघच—असा भावार्थ. सलिल= जल, पाणी. १३. फुललेला. १४. युद्धाचें वर्णन करितांना 'किंशुकतरू'ची उपमा दिल्याशिवाय संस्कृत व प्राकृत कवींस बरेंच वाटत नाहीं. ही उपमा मागें ७।८ ठिकाणीं आली आहे. मूळ व्यास-कृत महाभारतांत ही उपमा शेंकडों वेळां आलेली आहे. १५. हिंगणबेट (इंगुदी). १६. मोराच्या पिसाऱ्याचा. १७. साळपक्षी, साळींद्र. याची साळपिसें प्रसिद्धच आहेत.

रवें शूरत्वें. ॥ ७२ ॥ वृषसेनें क्रोधनिघातें । सात शर तीव्र द्रुपदातें । ताडुनी आणखी तयातें । सहस्रशः शर सोडिले. ॥ ७३ ॥ अंबुधारा[१] प्रावृट्काळीं । तैसे बाण रिचवती तळीं । द्रुपद प्रज्वळोनी क्रोधानळीं[२] । क्षुरप्र शर सोडिले. ॥ ७४ ॥ मुष्टीपासाव खंडिलें धनू । वृषसेन क्रोधें प्रदीप्त भानू । अन्य चाप भारक्षादनू । सज्जी निमिष न लगतां. ॥ ७५ ॥ आकर्ण वोढुनी शरासन । शर सोडिला जैसा शमन । हृदय भेदोनियां पूर्ण । महीमाजी शिरकला. ॥ ७६ ॥ तेणें द्रुपदा दाटली घुंर्मी[३] । निस्विन्न रथीं पडला भ्रमी । काळवेळा भावोनी श्रमी । सूत माघारी रथातें. ॥ ७७ ॥ पांचाळ केला विकळता । सृंजयपांचाळसेना तथा । लोटोनी शस्त्रांचा चलथा । वृषसेना ताडिती. ॥ ७८ ॥ येरू धनुर्धरांचा राजा । बाण सोडिले कर्षोनी भुजा । शरीं तयाची करूनी पूजा । विसर्जिले काळातें. ॥ ७९ ॥ सहस्रशः मर्दोनी वीरा । शवें भरली वसुंधरा । अर्दित चमू, राजेश्वरा! । देवोनी पाठी निघाल्या. ॥ ८० ॥ धृष्टद्युम्न, धृष्टवृद्धी । द्रोणहनना लोटले युद्धीं । सवें वीरांची महामांदी । अंतकदूतासारिखी. ॥ ८१ ॥ धांवतां गुरु जाला अग्री । पाठी वीर प्रत्यक्ष आगी । जाणों शंकर महायोगी । गँजासुरा[४] धडकला. ॥ ८२ ॥ उभय वीर क्षोभावर्ती । जेवीं अर्णव लोटले शक्ती । शरौघमाळा उसळती पंक्ती । सिंहनादगर्जना. ॥ ८३ ॥ पांचाळपुत्र सिंह तरुण । हँरिरव[५] फोडुनी त्राण । द्रोणाचार्या पांच बाण । महारोषें ताडिले. ॥ ८४ ॥ धनुर्धरां गुरुवर्य द्रोण । काळविखारी पंचवीस बाण । पार्षतातें ताडुनी जाण । चाप हातींचें छेदिलें. ॥ ८५ ॥ येरें वोष्ट चावोनी रदनीं । अन्य धनु सज्जिलें क्षणीं । तक्षकप्राय क्रोधभरणी । शर शितीं लाविला. ॥ ८६ ॥ जाणों दूत अंतक अंतकाचा । तेजें दिशा उवरिल्या साच्या । देव, गंधर्व बोलती वाचा । क्षेमकर्ता ईश्वर. ॥ ८७ ॥ सुसाटती दामिनीसरी । नेत्र झांकिले सकळ वीरीं । निर्भय कर्ण नयनोद्धारीं । लक्षोनी शर सोडिले. ॥ ८८ ॥ जैसें भूतासी महद्भूत । पाडी धरेसी करुनी प्रेत । तैसा बाण खंडुनी त्वरित । वीरां हर्ष दीधला. ॥ ८९ ॥ विस्मयमान धृष्टद्युम्न । दश बाण वोपिले कर्णें । रोषें पांच ताडिले द्रोणें । पुत्रें तितुके अर्पिले. ॥ ९० ॥ शल्य ताडिला दाहा बाणीं । दुःशासन तीन काळमानी । दुर्योधन क्रोधअयनी । वीस वर्मीं विंधिले. ॥ ९१ ॥ सौबळें बळ रोषावर्ती । पांच अर्पिले काळघाती । जाणों

१. जलधारा. २. अग्नि. ३. घेरी, मूर्च्छा (संस्कृत—घूर्णि). ४. गजासुरवधासंबंधें मोरोपंती विनायकमाहात्म्य-अध्याय २ पद्य. ५. सिंहासारखी गर्जना करून.

सप्तसागर क्षयांतीं । उदित[1] जाले एकदा. ॥ ९२ ॥ तैसे सातजणी एकदा ।
प्रहार करिती, न पावोनी खेदा । तीन तीन शर महाक्रोधां । वीरां तया अ-
र्पिले. ॥ ९३ ॥ घोर मिठी पडतां पाहीं । सात्यकी धांवला लवलाहीं । युद्ध
जाहलें वितंडें[2] मही । कर्ण आणि तयातें. ॥ ९४ ॥ [3]सांगोळिल्या उभयचमू ।
ताडिती निकरें वीर संभ्रमू[4] । रौद्र शूरांचा संग्रामू । शवें धरा ढेसली. ॥ ९५ ॥
निबिड वीरांची संघट्टणी । दीपिका विझोनी गेल्या झणी । तमें दाटली तीव्र
रजनी । त्यावरी भर निद्रेचा. ॥ ९६ ॥ कालवोनी उभय सेना । एकमेकां
पुसती संज्ञा[5] । मामा, काका, श्वशुर, मेहुणा । भाच्या, शालका बोभा[6]ती. ॥ ९७ ॥
जनक बाहती तनया । बंधु 'बंधुवा! ये' म्हणती; राया! । 'धांव धांव' म्हणती
'सखया! । टाकूं नको रणरंगीं.' ॥ ९८ ॥ अर्दित वीरांचे घोर शब्द ।
रात्रीभरें चमू सखेद । पुन्हा दीपिका विचित्रभेद । लक्षावधी लागल्या.
॥ ९९ ॥ स्वस्थमान सर्वही वीर । युद्धा मिनले घोरांदर । जैसा चंद्रोदयीं
सागर । भरतेनें उँफाळे[7]. ॥ १०० ॥ धृष्टद्युम्न क्रोधभरणी । पुढारुनी रणां-
गणीं । दश सायक काळमानी । कर्णाप्रती ताडिले. ॥ १०१ ॥ येरू साधक
धनुर्वाडा । पांच नाराच काळधाडा । अर्पोनी पांचाळ करुनी वेडा । चतुर[8]
अश्व निवटिले. ॥ १०२ ॥ शिळामुखी सोडुनी बाण । सूतशिर उडविलें
त्राणें । हर्षमानसें रविनंदन । मोकळी पंक्ती शरांच्या. ॥ १०३ ॥ रथी,
विरथी, क्षत, क्षीण । रणीं विन्मुख होतां जाण । प्रेरुनी सहदेवें स्यंदन । पां-
चाळ वरी घेतला. ॥ १०४ ॥ आवेश न धरे धर्मराजा । अमित वीर लोटतां
झुंझा । कर्णें वरुनी वीरश्रीभाजा । बाणचलथा सोडिल्या. ॥ १०५ ॥
पांचाळ, सृंजय अनेकशः । वीर मर्दिले, नराधीशा! । शरीराचा घोरं[9]वळसा ।
हाहाकार चमूतें. ॥ १०६ ॥ जाणों क्षोभला प्रळयरुद्र । किंवा युगांतीं
समुद्र । कीं धान्य[10]सवंगणीं जैसा शूद्र । तेवीं सेना मर्दितु. ॥ १०७ ॥
सिंह रिघोनी वारणदळीं । करी गजांची धुं[11]माळी । कीं गवागोठणीं व्या-
[12]घ्रेमेळी । तेवीं आकांत सेनेतें. ॥ १०८ ॥ धरे प्रपात गजोत्तम ।
सहस्रावधी तुरंगम । पदाती, रथी, प्रतापी, भीम । छिन्नभिन्न विखुरले.
॥ १०९ ॥ भूषणयुक्त भुजा सरळा । राजित [13]शीसें प्रदीप्त कीळा । इत-

---

१. उठावले, क्षोभले. २. अलौकिक, अमानुष. ३. हातघाईस आल्या. ४. घाईनें, गडबडीनें.
५. नांवें. ६. हांक मारिती, ओरडती. ७. उचंबळे. ८. चारी. ९. मृतयोद्ध्यांच्या शरीराचा
(प्रेतांचा) भयंकर वेढा. १०. सवंगण=शेतांतील धान्य मळून जमा करण्याचें काम; कापणी व
मळणी. ११. दाणादाण, त्रेधा. १२. वाघांची झुंड. १३. शिरें, मस्तकें.

स्तता लोळती, नरशार्दूळा! । माळा गळां मुंडांच्या. ॥ ११० ॥ कनक-ध्वज, भग्न रथ, । पताका, छत्र, असंख्यात । भूमी लोळती प्रकाशवंत । जाणों तारा नभःपुटीं. ॥ १११ ॥ वसंत काळींचा भास्कर । तैसा प्रदीप्त रविकुमर । शरासनीं अढळ कर । वीरधडें रिचवतो. ॥ ११२ ॥ सेनामेळीं किलकिलाट । पळतां वीरां न सुचे वाट । सेनापती होवोनी भ्रष्ट । माघारती शरमारीं. ॥ ११३ ॥ धार्मिक धर्म धर्मात्मा । पाहोनी चमूचा निर्जीवात्मा । ह्रदीं कळवळोनी, राजोत्तमा! । बोलता जाहला पार्थातें. ॥ ११४ ॥ म्हणे, 'फाल्गुना! पंचानना! । वीरवर्या! बळवर्धना! । धनुर्धरा! वीरमंडणा! । अजिंक्य नरांसुरांतें. ॥ ११५ ॥ तुझ्या युद्धाचें लाघवमान । सहस्रनयन डोलवी मान । सुर, सिद्ध, यक्ष, गंधर्वगण । कीर्ति कीर्तनीं कीर्तिती. ॥ ११६ ॥ ऐसिया प्रतापिया सूर्या! । तव वाहिनी भयाची छाया । हेची आश्चर्य गमे ह्रदया । वारंवार मज; ताता! ॥ ११७ ॥ वन्हीस वोळंबाची[1] भरणी? । खगेंद्रा फणीची जाचणी[2]? । उष्णें विव्हळ तारामणी[3]? । मृगांबु[4] गजें बुडिजे? ॥ ११८ ॥ तयापरी तुझी सेना । अर्दित रणीं, नरमंडणा! । रणसागरीं तिमिंगिलमाना[5] । वैकर्तनू[6] विचरतू. ॥ ११९ ॥ वीर वीर खिळिले बाणीं । कोण्हा न करवे उठावणी । कोस एक बाणभरणी । धडकोनी वीर पाडीत. ॥ १२० ॥ लघु-लक्ष[7] भेदोनी वीर । खंडुनी शरें धरेवर । गजाश्वरथीकळेवर[8] । दाटतां वाटा खुंटल्या. ॥ १२१ ॥ तरी तूं आजी समरांगणीं । कर्णास वसवीं काळसदनीं । वीरपुरुषार्थ स्फुरीं वदनीं । विश्वाचिया नरवर्या! ॥ १२२ ॥ तुवां काळखंज वधिला रणीं । निवातकवच मर्दिले बाणीं । त्याची प्रचीत दावीं नयनीं । निर्दाळोनी कर्णातें.' ॥ १२३ ॥ धर्मवाग्वात[9] सुसाटे । पार्थक्रोधाग्नी प्रज्वळे नेटें । कर्णशक्तिद्रुमाची[10] थाटे । भस्म करूं भावितू. ॥ १२४ ॥ विलोकी नेत्रीं घनसांवळा । कोटिकंदर्पलावण्यकीळा । सहस्र शशीच्या एकत्र कळा । मुखावरुनी सांडिजे[11]. ॥ १२५ ॥ मुकुट, कुंडलें, वनमाळा । आयुधयुक्त भुजा सरळा । त्रिवळी उदर, नाभिकमळा । कमळोद्भव जे ठाईं. ॥ १२६ ॥ कासे कासिला पींटोळा[12] । जाणों विजांचा मिनला मेळा । पदपद्म अतर्क्यकळा । कमळा तेथें लुब्धली. ॥ १२७ ॥ सकळ लावण्याचा गाभा । ज्याचेनि त्रिजगा

१. वाळवीची, उधईची. २. त्रास, भय. ३. चंद्र. ४. मृगजळांत. ५. तिमिंगल=तिमि नामक माशास गिळणारा फार मोठा मासा. ६. कर्ण. ७. निशाण (नेम) मारण्याचें कौशल्य. ८. प्रेतें. ९. धर्माचें भाषण हाच वायु. १०. कर्णाची शक्ति हीच झाडांची रांग. ११. ओंवाळून टाकाव्या. १२. पाटाव, पीतांबर.

आली शोभा । कीर्ती भरुनी उरली नभा । सहस्राननना [१]नुमाणे. ॥ १२८ ॥ ऐसिया समर्था मृदु वाणी । बोलता जाहला स्मितवचनीं । म्हणे, 'माधवा ! चक्रपाणी ! । सेना अर्दित पाहें पां. ॥ १२९ ॥ कर्णी कर्णप्रतापभरणी । ऐकिली, प्रत्यक्ष पाहिली करणी । भिडवीं सत्वर स्यंदन रणीं । बोळवूं [२] त्यातें कृतांता.' ॥ १३० ॥ पार्थवचन ऐकोनी प्रीती । अवाप्तकाम निर्जरपंक्ती । ज्याची योगिया महामती । बोले श्रीपती पार्थातें. ॥ १३१ ॥ म्हणे, 'सखया ! मम आत्मया ! । प्राणप्रिया ! धनुर्धरवर्या ! । क्रोधच्छाया यया समया । योग्य नोहे गुणाब्धी ! ॥ १३२ ॥ कर्ण वीर प्रतापवान । सर्वास्त्रभेदी, कलानिपुण । यामाजी जयाचें भरतें पूर्ण । वीरश्रीवारें फुफाटे. ॥ १३३ ॥ हेची असो; केतुली युक्ती । [३]शक्रदत्त निर्वाण शक्ती । सहस्र विजांचिया पंक्ती । येथोनी मातें दिसतसे. ॥ १३४ ॥ तीतें निवारण यया मही । करूं न शके [४]मारदाही । वीरश्रीभरें टाकितां तेही । उपाय कांहीं न चाले. ॥ १३५ ॥ या कारणें धरुनी धैर्या । शांत राहिजे वीरवर्या ! । शक्ती न्यावया रणीं लया । उपाय पूर्वी नेमिला. ॥ १३६ ॥ जेवीं पानडें [५]कोंडितां शुक्रें । मोकळें केलें अजाचे पुत्रें । तैसें हेंही विचित्र नेत्रें । आपुलिया देखसी. ॥ १३७ ॥ सांप्रत आकळोनी रो[६]षऊर्मी । कदनीं प्रेरिजे वीर भैमी । पर्याप्त शूर पराक्रमी । करीं समाप्ति शक्तीची.' ॥ १३८ ॥ अर्जुन वदे, 'रमाधवा ! । मुरुसूदना ! देवदेवा ! । मुकुंदा ! उपेंद्रा ! केशवा ! । नारायणा ! नरहरी ! ॥ १३९ ॥ रघुनंदना ! रघुपती ! । दशमुखांतका ! दाशरथी ! । मारीचमर्दना ! अमोघशक्ती ! । अयोध्याधिपती ! श्रीरामा ! ॥ १४० ॥ जनकजामाता ! जानकीपती ! । जनकवचनपाळणभक्ती ! । जन-कल्याणइच्छा पुरती । अमूर्तमूर्ती ! माधवा ! ॥ १४१ ॥ जे इच्छित तुझिया मना । तेंची किजे रमारमणा !' । ऐकतक्षणीं आनंद घटोत्कचा चरणा । पाचारी. ॥ १४२ ॥ येरू लागोनियां चरणीं । पुढें उभा जोडुनी पाणी । वदे, 'आज्ञा सूँ[७]चिजे वदनीं । शिरसामान्य सर्वथा.' ॥ १४३ ॥ श्रीहरी वदे 'बापा ! गुणनिधी ! । [८]जनककामीं अचळ बुद्धी । तुझ्या प्रतापाची तीव्र वृद्धी ।

---

१. अगण्य, असंख्य. २. पाठवूं, रवानगी करूं. ३. इंद्रानें दिलेली शक्ति. ४. शंकर. शंकरानें मदनास जाळून भस्म केलें म्हणून शंकरास 'मारदाही' असें नांव आहे. ५. हा काय कथाभाग आहे तो आम्हांस माहीत नाहीं. ६. रागाच्या लाटा. ७. सुचवावी, सांगावी. ८. पित्याचें काम करण्याविषयीं.

दिवौकसां[1] नावरे. ॥ १४४ ॥ **गं**धमादनीं तुवां जनका[2] । हरुनी क्लेश वार्धलें सुखा । कठिण समईं सांभाळ देखा । करिसी बापा ! प्रतापें. ॥ १४५ ॥ **भीम**रेतें राक्षसीकुशी[3] । तव पिंड वर्धला तेजोराशी । हीनत्व दवडोनी दाही दिशीं । **पां**डवयश वर्धिसी. ॥ १४६ ॥ तरी तूं आतां **पां**डवराया । स्वप्रतापें उजळीं बाह्या । **क**र्णा विक्रमें नेवोनी लया । यश वैंधीं[4] जगत्रयीं. ॥ १४७ ॥ जें इंद्रें[5] जईं **रा**वणातें । सौख्य दिधलें इंद्रजितें[6] । तैसें आजी **पां**डवातें । वोपोनी यश, गौरवीं.' ॥ १४८ ॥ ऐकोनी श्री**कृ**ष्णमुखींची गोष्टी । राक्षस आनंदें भरी सृष्टी । म्हणे, 'मी किंकर, आज्ञा मुगुटीं; । दावीन चोज समस्तां. ॥ १४९ ॥ **क**र्णशौर्याची[7] हातवटी । तृणप्राय माझिये दृष्टी । विगत करीन उठाउठी । मर्दीन सेना प्रतापें.' ॥ १५० ॥ ऐसें वदोनियां वाणी । सेना सज्जिली रणांगणीं । अभिवाद्य[8] **भीम**सेन पाणी । करी आवडी प्रतापें. ॥ १५१ ॥ अष्टचक्री विशाळ रथ । ध्वज पताकीं साळंकृत । पर्वती[9] वारु बळोन्नत । वेगें वाता सारिती. ॥ १५२ ॥ सिंदूरवर्ण विशाळ वदन । करांळ[10] दंष्ट्रा, प्रभिन्न घ्राण । सलंब बाहु, श्मश्रू[11] तीक्ष्ण । **का**ळखड्गासारिख्या. ॥ १५३ ॥ मुगुटमाळा वस्त्राभरणी । सदृढ[12] कार्मुक रुक्मवर्णी । अनेक शस्त्रें तीव्रपाणी । मायामयीं विचित्र. ॥ १५४ ॥ रथीं आरूढ राक्षसराजा । जाणों **कृ**तांत लोटला दुजा । राक्षसी सेना पिटोनी भुजा । अक्षौहिणी धांवली. ॥ १५५ ॥ अनेक वाद्यें एकें घाई । माजी सिंहनादाची नवाई । घोषें दिशा भरिल्या दाही । घाबिरी सेना **कौ**रवी. ॥ १५६ ॥ धडकोनी मिनला महारोषें । जाणों **अं**तकें वोढिला पाशें । मरणद्वारीं **रा**क्षसाधीशें ।

---

१. देवांस. २. पांडव वनवासांत असतां, तीर्थयात्रा करीत हिंडते वेळीं, त्यांस हिमालयाच्या गंधमादन नामक शिखरावर जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां पर्वतावर चढतां चढतां, सर्व ऋषी व भीमाशिवाय इतर पांडव व द्रौपदी वगैरे मंडळी इतकी थकली कीं, त्यांच्यानें एक पाऊलही पुढें टाकवेना. भीमसेन इतक्या सर्व मंडळीस उचलून नेण्यास समर्थ नसल्यामुळें, त्यानें घटोत्कचाचें स्मरण केलें. त्या वेळीं घटोत्कच तेथें तात्काळ प्रगट झाला व त्यानें सर्व मंडळीस एका क्षणांत पर्वताच्या शिखरावर नेऊन ठेविलें. अशी कथा आहे. (मुक्तेश्वरवनपर्व–अ०९–११०–१५. पहा.) ३. हिडिंबानामक राक्षसीचे पोटीं. ४. वाढव. ५. रावण देवांस जिंकण्याकरितां स्वर्गांत गेला असतां तेथें देवांचें व राक्षसांचें घोर युद्ध झालें. त्या काळीं इंद्रजितानें इंद्रावर चाल करून खूप पराक्रम गाजविला, व त्यास शस्त्रास्त्रांनीं जर्जर करून बद्ध केलें–अशी कथा आहे. ६. ह्याचें मूळचें नांव 'मेघनाद' पण ह्यानें इंद्रास जिंकलें म्हणून ह्याचें 'इंद्रजित्' असें नांव पडलें. ७. कसब, करणी, कृति. ८. हातानें भीमास अभिवादन (प्रणाम) केलें–हा भावार्थ. ९. पाहाडी घोडे. १०. भयंकर दाढा. ११. दाढीचे केंस. १२. बळकट.

कृतांतबाण[1] घेतलें. ॥ १५७ ॥ दारुण रौद्र अतिसंग्राम । **कर्णभैमी**चा महा[2]-भीम । **घटोत्कच** वरील **यम**धाम । पुढां सज्जनीं परिसिजे. ॥ १५८ ॥ श्रीगुरु**भीम**राजप्रसादें । **नरहर मोरे**श्वर वाग्वादे । कथितां, श्रोतया[3] निघती[3] दोंदें[3] । हर्षानंदें[3] आवडी. ॥ १५९ ॥

---

[4]अध्याय[5] तिसावा.

संजय वदे, 'राजसत्तमा ! । **भैमी** पावतां संग्रामा । **दुर्योधन** क्रोधप्रतिमा । **दु**:शासना अनुवादे. ॥ १ ॥ म्हणे, 'सखया ! बांधवा ! धूर्ता ! । **घटोत्कच** लोटला **र**विसुता । राक्षसी माया विविधा पुरता, । विक्रमवीर प्रतापी. ॥ २ ॥ सेनेसह विजयी बाह्या । रक्षण किजे **क**र्णराया.' । 'अवश्य' म्हणोनी वंदोनी तया । **रा**धेयातें मिनला. ॥ ३ ॥ **दुर्योधन** धुंमीळ[6] गात्रीं । सेना विलोकी दीर्घनेत्रीं । राक्षस देखिला सहित शस्त्रीं । **अ**लायुधा प्रतापी. ॥ ४ ॥ **किर्मीरजटा**सु[7]राचा बंधू । **भीम**वैरें हृदयीं खेदू । साह्य **कौर**वा विक्रमसिंधू । पाहोनी बोले नरेंद्र. ॥ ५ ॥ 'तुझ्या वैरियाचा कुमर । युद्धा मिनला **भैमी** वीर । तुवां रणीं करुनी प्र[8]सर । **काळ**धामा वोपिजे. ॥ ६ ॥ साह्यासी वीर **क**र्णादिक । तुज अनुकूळ महा सतिख । **घटोत्कचाचें** छेदोनी मुख । उत्तीर्ण होय बंधूचें.' ॥ ७ ॥ ऐकतक्षणीं हर्षवर्धन । सिंहनाद फोडिला त्राणें । म्हणे, 'यास्तव तूतें संलीन[9] । जालों तूतें, नरवर्या ! ॥ ८ ॥ **घटोत्कच** प्रभिन्न काया । माझेनि हस्तें **य**मालया । पावला ऐसें मानोनी, राया ! । स्वस्थ राहीं स्वस्थानीं.' ॥ ९ ॥ ऐसें वदोनियां वचनीं । स्यंदन लोटिला रणांगणीं । जाणों समक्ष **दं**डपाणी । भ्यासुररूप बीभत्स. ॥ १० ॥ अलायुध[10] क्रोधभरणी । धडकोनी **भै**मीतें दशबाणीं । ताडुनियां हृदयस्थानीं । अट्टाहास्य[11] फोडिला. ॥ ११ ॥ **कर्णें** कर्षोनी शरासन । सहस्रशः अर्पिले शर घन[12] । **घटो**त्कच क्रोधायमान । मोकळी बाण निघातें. ॥१२॥ **अलायुध** सरसराटी । सोडी इषूंच्या[13] महा थाटी[13] ।

---

१. यमाचें बाण (व्रत). २. फार भयंकर. हें 'संग्रामा'चें विशेषण. ३. श्रोते आनंदानें फुगतात. ४. ह्या अध्यायाला **'रात्रियुद्ध'** असें नांव आहे. ५. ह्या अध्यायांत मूळांतील १७४–१७९ अध्यायांचा सारांश आला आहे. ६. धूमल, धुरकट. ७. हे राक्षस भीमानें मारिले होते. ८.चाल. ९. अत्यंत लीन (नम्र). १०. घटोत्कचमाता हिडिंबा हिचा पिता. भीमानें जटासुर, बकासुर वगैरे राक्षस मारिले व आपली कन्या हिडिंबा हिचा परामर्ष घेतला म्हणून हा अलायुध भीमाचा द्वेष करीत असे. (अध्याय १७७।७ पहा). ११. गदारोळी, सिंहगर्जना. १२. दाट, पुष्कळ. १३. रांगा, समुदाय. इषू=बाण.

सक्रोध भैमी हृदयीं गांठी । घालोनी, सोडी शरातें. ॥ १३ ॥ धडकोनियां तिहीं बाणीं । अश्वसारथी मर्दिले रणीं । विरथी राक्षस क्रोधभरणी । पादचारी लोटला. ॥ १४ ॥ वज्रासमान वळोनी मुष्टी । भैमी ताडिला हृदयपुटीं । गिरकी खावोनी भूतळवटीं । शैलन्यायें पडियेला. ॥ १५ ॥ तवकें उठोनी, महाराजा ! । मुष्टिप्रहार केला वोजा । येरयेरां ताडिती कुंजा[1] । क्रोधभरें निघातें. ॥ १६ ॥ मुष्टिप्रहार, लत्ताप्रहार । कोपर, गुडघे, थाप, सैर । मो[2]जोनी मारिती येरयेर । 'उसणें घे, घे,' म्हणोनी. ॥ १७ ॥ करवतिया, बाहु, मुसळें । गदा, परिघ[3], प्रास[4], त्रिशूळ । मुद्गल, पट्टे[5], विटे, मुष्टी सरळ । एकमेकां ताडिती ॥ १८ ॥ तयामाजी राक्षसी माया । विविध निर्मित महाराया ! । एक अवगतां[6] वन्हीचर्या । दुजा पर्जन्य सुसाटे. ॥ १९ ॥ एक होतां तक्षकाकृती । दुजा गरुड धांवे क्षिती । एक मेघाची धरितां स्थिती । दुजा वायु भरारी. ॥ २० ॥ एक शश, दुजा सिंह तरुणू । एक भास्कर, दुजा स्वर्भानू[7] । विचित्र मायाप्रताप घनू । एकमेकां दाविती. ॥ २१ ॥ वासव आणि वैरोचनी[8] । पूर्ववैरें मिनले कदनीं । तेवीं उभयतां क्रोधभरणी । एकमेकां ताडिती. ॥ २२ ॥ घटोत्कच रोषअयनी । आसडोनी[9] त्वरें पाडिला धरणी । पाद चेपोनी हृदयभुवनीं । काळखड्ग कर्षिलें. ॥ २३ ॥ घाव घालोनी कंठनाळीं[10] । खंडुनी शिरें, फोडिली कीळी[11] । भयभीत वीर तये काळीं । दिशा दाही लक्षिती. ॥ २४ ॥ कराळ[12] शीस, बीभत्स वर्णी । रक्तस्राव होतसे धरणी । बोंबर[13] झोटी कवळोनी पाणी । निघे भैमी हर्षतू. ॥ २५ ॥ पाहत असतां द्रोण, कृप । दुर्योधनादि अनेक भूप । स्वरथीं शिर बांधोनी ताप । बोले रोषें कुरुवर्या. ॥ २६ ॥ घटोत्कच पुरुषार्थवाणी[14] । दुर्योधनासी बोले वचनीं । 'अलायुधशीस पाडिलें रणीं । विक्रम नेत्रीं पाहिला. ॥ २७ ॥ कर्णशिर छेदिलें बाणीं । सांप्रत पाहसी रणांगणीं । तुजसहित वीरांची भरणी । आश्चर्यातें पावती. ॥ २८ ॥ धर्म, अर्थ, तिसरा काम । इच्छा इच्छीत ज्यांचा नेम । रिक्तपाणी[15]

---

१. कुंज=हत्तीचे सुळे (दांत). हत्ती आपल्या सुळ्यांनीं एकमेकांस ताडण करितात, त्याप्रमाणें घटोत्कच व अलायुध एकमेकांस आपल्या मुठींनीं ताडण करूं लागले—हा इत्यर्थ. २. 'माजोनि' असें पाठान्तर. ३. लवंगी काठी. ४. भाला. ५. पट्टिश. ६. घेतां, स्वीकारितां. ७. राहू. ८. विरोचनपुत्र (बळिराजा). ९. हिसका देऊन, ओढून. १०. गळ्यावर. ११. आरोळी, किंकाळी. १२. भयंकर. १३. मोकळ्या पिंजारलेल्या केशांच्या झिपऱ्या, विखुरलेल्या झिंझोंट्या. १४. बाणेदार स्वरानें. १५. रिकाम्या हातानें (उपायनाशिवाय) राजा, ब्राह्मण व स्त्री यांजकडे जाऊं नये—हा इत्यर्थ. मूळांतही असेंच आहे:—'स्वधर्ममर्थं कामं च त्रितयं योभिवांच्छति । रिक्तपाणिर्न पश्येत राजानं ब्राह्मणं स्त्रियम् ॥' (अध्याय १७५।४३). मनुस्मृतींत 'रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुम् ।' असें आहे.

न पविजे धाम । स्त्री, ब्राह्मण, भूपती. ॥ २९ ॥ याकारणें सार्वभौमा[1]! । क्षणैक स्थिर राहीं संग्रामा । वधोनी कर्ण शीर्सपद्मा[2] । भेटीलागीं निवेदीं.[3]' ॥ ३० ॥ ऐसें वदोनी क्रोधावर्ती । रथ लोटिला कर्णाप्रती । राक्षसी सेना काळघाती । कडकडाटी संलग्न. ॥ ३१ ॥ विशाळ रूप भयंकर । सिंहनाद फोडी क्रूर । तेणें सेना भयभीत थोर । कंपवात आतुडे. ॥ ३२ ॥ अभीत कर्ण धनुर्वाडा । रथ लोटोनी जाला पुढा । रजनीचरांचा पडला वेढा । जेवीं समुद्र लंकेतें. ॥ ३३ ॥ येरयेरांची होतां धडक । धुमीळ शब्द माजला तिख । जैसी वृषभवृषभा धडक । किंवा गजगजातें. ॥ ३४ ॥ ना ते शंबर वज्रपाणी । पूर्वीं वैरें मिनले कदनीं । कीं जालंधर शूळपाणी । तेवीं युद्धा मिनले. ॥ ३५ ॥ उभयतां सज्जोनी कार्मुक । शर सोडिले महातिख । दिशादेवीचें भरलें मुख । आच्छादिलें रवीतें. ॥ ३६ ॥ परस्परें बाणधारीं । गात्रें भेदिलीं अभ्यंतरीं । रुधिरस्राव होतसे समरीं । अद्रिझरपासारिखा. ॥ ३७ ॥ वैकर्तना क्रोधभरणी । भैमी ताडिला प्रभिन्न बाणीं । डळमळी जैसा वृक्ष अवनी । वातवेगें ज्यापरी. ॥ ३८ ॥ गुप्त होवोनी राक्षसी माया । करिता जाहला तया समया । बीभत्स भूतें प्रभिन्न काया । सहस्रशः लोटलीं. ॥ ३९ ॥ गगनींहूनी शस्त्रवृष्टी । होती जाहली भूतळवटीं । अश्म, पादप, पाषाणथाटी । सर्प, विंचू, रिचवती.[6] ॥ ४० ॥ असिलता, पट्टे, त्रिशूळ, । तोमर, गदा, काठिया, शूळ, । चक्रें, लहुडी, शक्ती, मुसळ, । एकधारा वर्षती. ॥ ४१ ॥ तेणें उद्विग्न घाबिरी चमू । राधेय तैं न पवे श्रमू । महास्त्र सोडुनियां भ्रमू[8] । दूर केला तात्काळीं. ॥ ४२ ॥ वारुणी माया जातां लया । अत्यंत क्रोध राक्षसराया । चाप कर्षोनी आकर्ण बाह्या । शर तीक्ष्ण सोडिले. ॥ ४३ ॥ तिहीं[9] भेदोनी कर्णातें । महीमाजी होत शिरते । जैसा सक्रोध फणीभरतें[10] । धरारंध्रीं[11] शिरके. ॥ ४४ ॥ तेणें अत्यंत रोष कर्णा । धनु कर्षोनी प्रमितकर्णा[12] । दश बाण सोडिले जैसा कर्णा[13] । फुफाटे मांगल्यीं.[14] ॥ ४५ ॥ धडकोनी तिहीं बाणीं । राक्षस भेदिला वर्मस्थानीं । अंकुश ताडितां द्विरदमूर्ध्नी[15] । तेवीं भैमी डळमळी. ॥ ४६ ॥ क्रोधभरें फोडुनी हाक । चक्र प्रेरिलें प्रदीप्त अर्क[16] । शर सोडुनी महा सतिख । छेदोनी कर्णें पाडिलें. ॥४७॥

---

१. दुर्योधना. २. शिरकमळ. ३. नजराण्यादाखल अर्पण करीन—हा इत्यर्थ. ४. प्राप्त होई. ५. अत्यंत भयंकर. ६. वर्षाव करिती, फेकिती. ७. तरवार. ८. माया. ९. त्या बाणांनीं. १०. सर्पांचा समुदाय. ११. जमिनींतील बिळांत. १२. आकर्ण, कर्णापर्यंत. १३. वाद्यविशेष. १४. मंगलकार्यांत. १५. हत्तीचें मस्तक. १६. सूर्यासारखें.

चक्र व्यर्थ जातां समरीं । **घ**टोत्कचा क्रोधलहरी । गदा झोकिली **क**र्णावरी । जाणों भगिनी **य**माची. ॥ ४८ ॥ धनुर्धरां दीक्षागुरू । **र**वितनुज प्रतापशूरू । शर प्रेरुनी अति सत्वरू । गदा व्योमा उडविली. ॥ ४९ ॥ क्षीणायुषीं[1] औषध-मंत्रें । वृथा होती सर्व तंत्रें । तेवीं **भै**मीचीं अमोघ शस्त्रें । विफळ होती तत्क्षणीं. ॥ ५० ॥ त्वरेमाजी करुनी त्वरा । **क**र्णें लाविल्या बाणधारा । **घ**टोत्कच होवोनी घाबिरा । होयें अंबेरा[2] अक्षय. ॥ ५१ ॥ तेथोनी वर्षे शरांची जाळी । द्रुमपाषाणशस्त्रमेळी । **र**विनंदन अतुर्बळी । महास्त्र सोडिलें. ॥ ५२ ॥ तें उसळलें अग्निन्याय । **घ**टोत्कचाचें भेदिलें हृदय । तळा उतरूनी विद्युत्प्राय । माया सर्वेही भंगिल्या. ॥ ५३ ॥ क्रोधानळीं प्रदीप्त गात्रीं । विशाळ रूपें अवगे[3] धरित्री । भूतसृष्टी मावे वक्त्रीं । सिंदूरवर्ण आफाटे. ॥ ५४ ॥ अनेक भेद बहुधाकृती । मायामयी राक्षसपंक्ती । विविध शस्त्रें भेदिती क्षिती । **क**र्णाप्रती लोटला. ॥ ५५ ॥ त्यामाजी मिश्र राक्षसी सेना । शस्त्रें वर्षती विचित्र नाना । 'घ्या, घ्या' शब्द फोडिती वदना । काळमेघासारिखे[4]. ॥ ५६ ॥ पाषाण, पादप, भिंडिपाळा[5] । विविध शस्त्र नानालीळा । मोकळती बाह्या सरळा । चहूंकडूनी सारिखे. ॥ ५७ ॥ तया घाताचिया महामारीं । बुजोनी गेला **क**र्ण समरीं । जेवीं सूर्य धुंयीच्या[6] ज्वरीं । नाहींच होय ज्यापरी. ॥ ५८ ॥ बाप वीर **र**वि-तनुज । शर मोकळी मंत्रबीज । जेवीं क्षुधित अरुणानुज[7] । फणिमर्दना सुसाटे. ॥ ५९ ॥ तयापरी शरौघमाळा । सरसराट वन्हिज्वाळा । उसळोनी शिरें आणिती तळा । तारांगणासारिखे. ॥ ६० ॥ हस्त, पाद, खंडुनी पाहीं । धड-धडा राक्षस पडती मही । विशाळवक्त्र छिन्नदेही । क्षिती इतस्तता पडियेले. ॥ ६१ ॥ अर्धमान राक्षसी सेना । माया लोपली रणांगणा । रजनीचर वि-न्मुख कदना । वांचले[9] घायीं निघाले. ॥ ६२ ॥ जैसा सिंह धडकतां द्विरदां[10] । दिशा वोपोनी पडती खेदा । कीं वना सरकतां जातवेदा[11] । श्वापदगणा आकांतू. ॥ ६३ ॥ तयापरी रजनीचरा । वेळसा[12] भोंवतां राजेश्वरा । दांत खावोनी

---

१. अल्पायुषी मनुष्यास वांचविण्याचे कामीं औषध, मंत्र वगैरे उपाय निष्फळ होतात, त्याप्रमाणें घटोत्कचाचीं सर्व शस्त्रास्त्रें विफळ झालीं–हा इत्यर्थ. २. आकाशांत उडाला. ३. भुईवर उतरला. ४. प्रळयकाळच्या पर्जन्याप्रमाणें. ५. गोफण. ६. धुक्याच्या त्रासानें. ७. गरुड. ८. जमिनीवर. ९. जे वांचले, ते मोठ्या घाईनें पळून गेले–हा इत्यर्थ. १०. हत्तीवर. ११. अग्नि, विस्तव. १२. संकट, व्यसन.

करकरा। **भै**मी **क**र्णा लोटला. ॥ ६४ ॥ क्रोधें वोढोनी कोदंड[1] । शर सोडिले वितंडे[2] । **क**र्णें करुनियां दुखंड । राक्षस हृदीं भेदिला. ॥ ६५ ॥ तेणें पातली घुर्मी[3] तया । **क**र्णें शरांची केली छाया । अश्वसारथी **य**मालया । बाणसंधी[4] धाडिले. ॥ ६६ ॥ विरथी **भै**मी क्रोधभरणी । धावला वृक्ष पेंडताळोनी[5] । अभीत **क**र्ण वज्रासनी[6] । शर एक सोडिला. ॥ ६७ ॥ तिळप्राय करती दुखंडें । राक्षसा भेदिलें कुऱ्हाडें । तेणें तळमळोनी तडफडे । अदृश्य जाला ते क्षणीं. ॥ ६८ ॥ पुढां बीभत्स घोररूप । करुनी धांवला महाकोप । सलंब द्विकोसांचा माप । रुंदी तद्वद्‌विशाळा. ॥ ६९ ॥ रौद्र कराल दंतदाढा । पसरुनी मुख धांवला पुढा। **क**र्ण अचुक धनुर्वाडा । ताडी इषु निघातें. ॥ ७० ॥ हृदयीं भेदोनियां त्वरा । पार होवोनी निवाले धरा[7] । येरें शब्द फोडुनी गहिरा[8] । लघु जाहला तात्काळीं. ॥ ७१ ॥ क्षणीं सूक्ष्म अंगुष्ठमात्र । क्षणीं वर्धवी विपुळ गात्र । विविध रूपाचे भेद स्वतंत्र । दावी छांदी[9] क्षणार्धें. ॥ ७२ ॥ विचित्र मंडळ घिरटिया । करुनी निर्मी राक्षसी माया । प्रचंड शूळ पाणिद्वया । **क**र्णाप्रती प्रेरिला. ॥ ७३ ॥ जैसी वीज तडके तळा । तैसा येतां तेजउमाळा[10] । लक्षोनी **क**र्ण उतावेळा । सोडुनी शर खंडिला. ॥ ७४ ॥ **घ**टोत्कचा ताडूनी बाणीं । विकळ केला रणांगणीं । पुजिती हर्षें वीर वाणी[11] । 'भला, भला!' म्हणूनी. ॥ ७५ ॥ **क**र्णविक्रम देखोनी नयना । क्रोध नावरे **पां**डुनंदनां । सेनेसहित लोटले रणा । **वै**कर्तना निघातें. ॥ ७६ ॥ **भी**म, **स**हदेव, **न**कुळ, । **सा**त्यकी, **पा**र्षत, **पां**चाळ, । **शि**खंडी, **द्रौ**पदेय, रोषें प्रबळ । लोटोनी, शरां वर्षती. ॥ ७७ ॥ सर्वी संधान[12] एकसरा । करुनी सोडिल्या शरांच्या धारा । **क**र्ण वीर प्रतापी पुरा । अढळ[13] अद्रीसारिखा[14]. ॥ ७८ ॥ शर सज्जोनी धनुष्यकोटीं[15] । बाण सोडिले कोट्यानकोटी । शिलीमुख, सायकथाटी । क्षुरप्र, नाराच, पाटळी, ॥ ७९ ॥ वराहकर्ण, वत्सदंत, । नाळीक, कर्णिकार, । पोत, रुक्मपिसारे, शिळाघात । अनेक जाती शरांच्या. ॥ ८० ॥ सोडुनी शर भेदिली चमू । विगत करुनी वोपिला श्रमू । रथिया रथिया अवक्र भ्रमू । दशदिशा बाण वोपिले. ॥ ८१ ॥ **क**र्ण शराची महा[16]-

---

१. धनुष्य. २. विशाळ, फार मोठे. ३. घेरी, मूर्च्छा. ४. बाण लागतांच. ५. पडताळणें=(१) हातांत धरणें, (२) परजणें. ६. स्थिर–अढळ आहे बैठक ज्याची असा. ७. जमिनींत निवाले (शांत झाले). ८. खोल, आक्रोशयुक्त. ९. आच्छादी, गुप्त करी. १०. तेजाचा लोट. ११. वीर हर्षें (मोठ्या आनंदानें) वाणी (शब्दांनीं) पूजिती (स्तुती करिती)–हा भावार्थ. १२. शरसंधान. १३. निश्चल. १४. पर्वताप्रमाणें. १५. कोटि=धनुष्याचा अग्रभाग. १६. मोठा मार, वर्षाव.

मारी। न सोसवे वीरां समरीं। विन्मुख होवोनी रणचत्वरीं[1]। दक्षिण बाहीं निघाले. ॥ ८२ ॥ संतप्त कर्ण प्रतापवर्य। जाणों वसंतीं प्रतापसूर्य। मंडळाकृती धनुष्य सोय। काळचक्रासारिखें. ॥ ८३ ॥ दिशा प्रदिशा भरल्या बाणीं। शवें दाटलीं पूर्ण अवनी। किलकिलाट शब्दध्वनी। अतितुंबळ माजली. ८४ ॥ इंद्राशनीसमान चाप। ठणत्कारें सैनिका ताप। वेर[2] रथनेमीचा[3] आलाप। तळत्राण विशेष. ॥ ८५ ॥ देखोनी प्रताप कर्णाचा। रोष नावरे घटोत्कचा। दांतें[4] चावोनी कचकचा। कर्णासमोर लोटला. ॥ ८६ ॥ काळअवधीचा पुरतां लेखा[5]। बुद्धि भ्रमिक वावरे शेखा[6]। अंतकदूताचा क्रोधसखा। वोढोनी आणी मृत्यातें. ॥ ८७ ॥ तयापरी राक्षसराजा। कर्णाप्रती पातला झुंझा। विकट रूप विशाळ भुजा। काळदंडासारिख्या. ॥ ८८ ॥ अष्टचक्री प्रभिन्न रथ। वारिया ऐसा वावरे त्वरित। आकर्ण वोढोनियां सीतँ[7]। बाण अमित सोडिले. ॥ ८९ ॥ पाहोनी त्याचा शरांचा थवा। कर्णें बाण सोडिले हवा। जैसा जंभ आणि मघवा। महामारीं पेटले. ॥ ९० ॥ तयापरी सायकधाडी। येरयेरां ताडी प्रौढी। शर दाटले जैसी धाडी। महावातीं वृक्षांची. ॥ ९१ ॥ सिंहरव उभयतां। फोडुनी, सोडिती बाणचलथा। खंडिती भेदिती इतस्तता। महाक्रोधें जयातें. ॥ ९२ ॥ रविनंदन प्रतापी शूर। अश्वसारथी रहंवर। बाणीं करुनी चकचूर। भैमी[8] [हृदयीं] भेदिला. ॥ ९३ ॥ हताश्वरथसारथी। हिडिंबभाचा मही विरथी। फोडुनी रव महा भारती[9]। अदृश्य जाला मायावी. ॥ ९४ ॥ कर्णें आकर्ण शरासन। वोढोनी दिशा भरल्या बाणें। जैसें तिमिर दाटतां गगन। आन कांहीं न दिसे. ॥९५ ॥ किंवा शैलभाचे उत्थानीं[10]। भरुनी निघे जेवीं अवनी। कीं शरद्रात्रीं[11] ताराभरणी[12]। तेवीं बाण पसरिले. ॥ ९६ ॥ तंव राक्षसें वारुनी माया। अतर्क्य प्रेरिली महामाया। लोहितांबरें[13] दिशा समया। हुताशन धडकला. ॥ ९७ ॥ सरसराट अग्निकल्लोळ। ज्वाळा नभा सुटती सरळ। धूम्रें

---

१. रणांगणांतून. २. आणखी. ३. नेमी=चाकाची धांव. ४. दांत खाणें, दांत ओंठ चावणें—हें रागाचें लक्षण आहे (मागें ओंवी६४ पहा). ५. गणना, हिशोब. ६. शेखीं, शेवटीं. ७. धनुष्याची दोरी. ८. घटोत्कच. हिडिंबराक्षस हा घटोत्कचाचा मामा (हिडिंबेचा भाऊ). ९. वाणीनें, वाचेनें. १०. टोळधाड उठली (आली) असतां. ११. शरदृतूंतील रात्रीं. १२. ताऱ्यांची विपुलता. पावसाळा संपतांच शरदृतु लागतो व ह्या ऋतूंत आकाश निरभ्र असल्यामुळें पावसाळ्यापेक्षां जास्त तारे, नक्षत्रें वगैरे दृष्टीस पडतात. १३. त्या वेळीं अंबर (आकाश) व दिशा लोहित (आरक्त) झाल्या.

भरती दिग्मंडळ । कटु तीक्ष्ण विपर्यस्त[1]. ॥ ९८ ॥ गगनींहुनी एकधारा । विचित्र शरांच्या लागल्या सैरा । त्यांमाजी विजांचा भरारा । कोट्यावधी रिचवती. ॥ ९९ ॥ घोर शब्द अतिदारुण । सहस्रशः दुंदुभीनाद घन । बधिरत्व आतले[2] सेनाकर्ण । उमज कांहीं सुचेना. ॥ १०० ॥ तीव्र खदिरांगारवृष्टी । जळत, भीती पडती सृष्टी । रुक्मपुंख शरांच्या दाटी । स्फुलिंगकण विखुरती ॥ १०१ ॥ तीव्र शक्ती, पाश, मुसळें, । विटे, तोमर, त्रिशूळ, भाले, । परिघ, गदा, चक्र, सुढाळें[3] । भिंडेगुंडे अमित; ॥ १०२ ॥ लहुडी, मुद्गर, कोत्या[4], शूळ, । शतघ्नी[5], वज्र, शिळा, बहळ[6] । वृश्चिक, व्याघ्र, फणि, शार्दूळ, । फोडुनी दंष्ट्रा धांवती. ॥ १०३ ॥ विविध द्रुमाचीं झुंबाडें । तळीं पडती वाडेंकोडें । माजी वायूच्या झडाडें । शारीं[7] वीरां दाटलीं. ॥ १०४ ॥ अनेक राक्षस, पिशाचगण, । विविध शस्त्रें अतिदारुण । पसरुनियां विकट[8] वदन । भक्षावया धांवती. ॥ १०५ ॥ चहूंकडुनी एकवळा । दिशा प्रदिशा व्यापिल्या सकळा । कासावीस चमूचा मेळा । वेडावला तटस्थ. ॥ १०६ ॥ **क**र्णशरांचा उपाय । कांहीं न चले स्तब्धित[9] शौर्य । परंतु मायेचें गांभीर्य । तयाप्रती न बाधी. ॥ १०७ ॥ रथं[10] सोडुनी पंच हस्त । इतरां बाधा होय बहुत । महास्त्रवेत्ता रविसुत । मायावश कैसेनी ? ॥ १०८ ॥ जैसा **गो**कुळीं **गो**वर्धन । अंगोळी[11] धरी **रा**धारमण । मनमोहन **म**धुसूदन । लीलालाघवी **दा**शार्ह[12]. ॥ १०९ ॥ इंदिरावर[13]दळप्रफुल्ललोचन । **इं**दिरावर, जगजीवन । **इं**द्रपाळक, इंद्रजाळ[14]शमन । शमनवाढ[15] ज्याचेनी; ॥ ११० ॥ चराचर जग पाळिता । अजरामरांच्या मौळीं सत्ता । मेघवृष्टीआकांत कांता- । गोपगोपाळ संरक्षी; ॥ १११ ॥ तयापरी **आ**दित्यतनया । बाधा नोहे राक्षसी माया । इतरां पीडा तया समया । युगांतकाळासारिखी. ॥ ११२ ॥ अश्मवृष्टीचे तीव्र घायीं । रथी विरथी आटले मही । दुर्धर शरांचिये छायीं । वाजिस्वार पहुडले. ॥ ११३ ॥ गदाघातें गजांचिया हारी । दुद्रावल्या[16] विच्छिन्न समरीं । जैसी महामायेची[17] मारी । तेवीं पांड[18] लागला. ॥ ११४ ॥ हलकल्लोळ सेनामाजी ।

---

१. प्रतिकूळ, हानिकारक. २. लाभले. ३. तेजस्वी. ४. कोयत्या. ५. तोफ. ६. पुष्कळ, अनके. ७. शहारीं, कांपरीं. ८. भयंकर. ९. स्तंभित, विफळ. १०. रथापासून पांच हात अंतरावर. ११. कृष्णानें आपल्या अंगुळीच्या बळानें गोवर्धन पर्वत सांवरून धरिला, अशी कथा आहे. १२. कृष्णास दाशार्ह असेंही एक नांव कोठें कोठें दिलेलें आढळतें. १३. इंदिरावर=निळें कमळ. १४. गारुडी मायेचें नियमन करणारा. १५. नाश व वृद्धि. १६. पळवून लावल्या, पिटाळिल्या. १७. महामारी, पटकी. १८. पतन, गळून पडणें (मरणें).

माजला काळ, नेमिली पांजी । खंड विखंड द्विरद वाजी । पदाती पदीं विच्छिन्न. ॥ ११५ ॥ त्यांमाजी रात्र द्वितीयें वेयसा । निद्राभरें भयवळसा । कोण्हा न धरवे धैर्यधिवसा । पळतां शरें आडविती. ॥ ११६ ॥ जैसा हनुमान अशोकवनीं । धुंमसी बैनकरा क्रोधअयनी । तेवीं भैमीच्या संघट्टणीं । वीरभानें उडविलीं. ॥ ११७ ॥ 'आहा'कार वाहिनीमेळीं । गर्जुन वाद्यें बैसली टाळी । कुंठित वीर अतुर्बळी । यत्न कांहीं न चाले. ॥ ११८ ॥ कासावीस कौरव वीर । सहित बंधु राजेश्वर । म्हणती, 'आतां कोण विचार?। यया शांती योजिजे. ॥ ११९ ॥ नेणों महद्भूत पातलें घाता । युगांतकाळ पातला आतां । कीं आयुष्याची अँवधी पुरली तथा । यया रात्री सर्वांची. ॥ १२० ॥ महास्त्र अस्त्रप्रयोग । विविध शस्त्रें जालीं व्यंग । इंद्रशक्तीविना अरिष्ट मार्ग । मुक्त नोहे आणिकां.' ॥ १२१ ॥ सर्व म्हणती, 'विचार श्रेष्ठ । याविण उपाय सकळ भ्रष्ट.' । कर्ण होवोनी अंतरीं कूट । मधुर वचनीं अनुवादे. ॥ १२२ ॥ 'वासवदत्त निर्वाणशक्ती । परम यत्नें जाली प्राप्ती । तिच्या आश्रयें फाल्गुनाप्रती । तृणप्राय मी मानीं. ॥ १२३ ॥ जीवासी रक्षण शरीर । कांतेसी पोषितो भ्रतार । जळासी रक्षण कांसार । कुटुंबियासी स्त्री जेवीं; ॥ १२४ ॥ नदीपुरीं आश्रय नौका । महद्व्यसनीं द्रव्य सखा । संसारबंधाचिया धाका । मुक्त कर्ता गुरुराव; ॥ १२५ ॥ तेवीं अर्जुनाचिये कदनीं । रक्षण शक्ती सखी जननी । तया वधार्थी अनुदिनीं । संधीलागीं टपतसें.' ॥ १२६ ॥ येरू म्हणती, 'वांचल्या आतां । पुढें पार्थाचिया योजिजे घाता । सांप्रत मृत्याची हरिजे व्यथा । पुढें उपाय कल्पिजे. ॥१२७॥ ना तो अधरपाणी कुंठेवास । धान्य संग्रहीं न्यून मास । आधींच करितां उपवास । मरतां प्राप्त येरांतें. ॥ १२८ ॥ तैसी न करावी राया! युक्ती । वांचवीं रणीं सर्वांप्रती । विघ्न आड लोटतां राती । साह्य शंकर पुढारा.' ॥ १२९ ॥ आग्रह जाणोनी सर्वांचा । प्रसन्न आत्मा रविसुताचा । म्हणे, 'येची अर्थी विधिवाचा । पूर्वीं नेम नेमिला.' ॥ १३० ॥ ऐसें वदोनी सर्वांप्रती ।

---

१. बलिदान; पीक चांगलें यावें म्हणून शेतकरी कोंबडें, बकरें इत्यादि बळी देतात त्यास 'पांजी' असें म्हणतात. हा शब्द नरसिकृत कर्णपर्वांतही आला आहे (अ० १४।५५ पद्य). २. तरुण रात्र (मध्यान्ह रात्र). ३. ठोकी, मारी. ४. माळ्यांस, बागवानांस. ५. कानटाळी. ६. शक्तिमान्, बलाढ्य. ७. मर्यादा. ८. इंद्रानें कर्णास दिलेल्या अमोघ शक्तीच्या प्रयोगाशिवाय अरिष्टनिवारणार्थ दुसरा मार्ग नाहीं, हा भावार्थ. ९. गूढ, विचारयुक्त. १०. सरोवर. ११. निर्जळ—पाणी न पितां—राहणें.

भैमिवधीं दृढतरमती । धरुनी, विलोकितां शक्ती । मायिक माया हरपली. ॥ १३१ ॥ जैसें सूर्योदयींचे समई । नाहींच होय तमाची सायी । कीं दैवयोगें भाग्यनवाई । दरिद्र लंघितें दिशातें. ॥ १३२ ॥ तयापरी राक्षसी माया । विलया गेली, महाराया! । पुढें देखिला **भै**मी तया । **दे**वीबस्तासारिखा. ॥ १३३ ॥ पाहोनी, शक्तीची गैवसणी । काढितां, दीप्ती पसरे अवनी । राक्षसअंत भावी मनीं । आयुष्यदोरी खुंटली. ॥ १३४ ॥ विशाळ विकट धरुनी वपू । पुढां लोटला निर्जीव कोंपू । **क**र्णवीर कृतांतसर्पू । घाली कर शक्तीतें. ॥ १३५ ॥ सरसराट स्फुलिंगमाळा । विखरल्या जाल्या महीमंडळा । सबीजमंत्रें झोकिली बाहु सरळा । **य**मदंडासारिखी. ॥ १३६ ॥ कडकडाडिली विशाळ शब्दीं । जाणों क्षया पातली अवधी । तेणें खळबळोनी उदधी । स्पर्शों धांवे अंबरा. ॥ १३७ ॥ उल्कापातें दाटली धरा । प्रदीप्त दीप्ती खचल्या तारा । मही डळमळी थरथरा । भूतगणा आकांतू. ॥ १३८ ॥ सहस्र विजांचा एकवळा । कीं क्षयाग्नीची ज्वाळमाळा । ना ते **शिं**वनेत्रींची ज्वाळा । प्रदीप्त जाली क्षयातें. ॥ १३९ ॥ तेजें दिशा भरल्या गुंर्णी । झांपडी पडिली वीरांनयनीं । गजाश्व पडती उलथोनी । भ्यार्डी प्राण त्यागिले. ॥ १४० ॥ व्यापोनी व्योमीं उतरी तळा । **घ**टोत्कचाच्या वक्षःस्थळा । भेदोनी निघाली रसातळा । पंचप्राण समवेत. ॥ १४१ ॥ वज्रप्रहारें शैलशिखर । खचोनी पडे धरेवर । तैसें निर्जीव कलेवर । पडे विशाळ महीतें. ॥ १४२ ॥ तयातळीं अमित सेना । मृत्यु पावली, नरमंडणा! । 'आहा!' शब्द सकळां वदना । अतितुंबळ माजला. ॥ १४३ ॥ **कौ**रववीर हर्षित मनें । **क**र्णा स्तविती महामानें । **पां**डव चमू उद्विग्न घन । शोकार्णवीं आतुडे. ॥ १४४ ॥ प्रतापयुद्ध अतिदारुण । पुढें सज्जनीं करावें श्रवण । **भी**मराज गुरूच्या वरदानें । कथी **नरहर मो**रेश्वर. ॥ १४५ ॥

---

१. दाटी. २. बस्त=बोकड. देवीस बोकड बळी देण्याची चाल आहे. ३. आच्छादन. ४. शिवास तीन डोळे आहेत, त्यांपैकीं भालनेत्रांत विस्तव असतो. ५. उत्तम प्रकारें. ६. पृथ्वीतळीं, जमिनींत. ७. ह्या अध्यायाला **'घटोत्कचवध' असें नांव** आहे.

अध्याय[1] एकतिसावा.

संजय वदे, 'नरमंडणा! । **भै**मी पावतां **का**ळसदना । व्यथाभूत[2] **पां**डुनंदना । खेद खेदी अमित. ॥ १ ॥ नयनांबुजीं अश्रु बहळ[3] । जेवीं पद्मीं खंडित नाळ[4] । चंद्राननीं कळा विकळ । जेवीं ग्रसितू स्वर्भानु[5]. ॥ २ ॥ पुत्रनिधनशोकवन्ही । मनमयूर आहाळलें[6] क्षणी । पुरुषार्थठावो मंद वदनीं । काळिमा गात्रीं स्पर्शिली. ॥ ३ ॥ व्यथाभूत पृतनामांदी । मिनली तया शोकसंधी । खेद खेदी सकळां हृदीं । शूरत्वतेजीं दीनता. ॥ ४ ॥ ऐसिया क्लेशार्णवीं तारक । तारकारिजनक[7] पादोदक । वंदी तो **ता**र्क्ष्यगामी[8] देख । मायबांधव विश्वाचा. ॥ ५ ॥ चराचर जग पाळिता । परात्पर, मायानियंता । अपार पार वर्णितां तथा । अंत **अ**नंता न लागे. ॥ ६ ॥ तो लाघवी, मनमोहन, । लीलाविग्रही, **म**धुसूदन । तांडवनृत्यें हर्षित मन । करुनी, **पा**र्था आलिंगी. ॥ ७ ॥ वारंवार वदनारविंद । चुंबी आवडी परमानंद । क्षणक्षणा प्रेमें विशद[9] । चहूं भुजीं अंपंगी[10]. ॥ ८ ॥ जैसी **य**शोदा **गो**पाळपाळा । आवडी चुंबी वेळोवेळा । **कौ**सल्यादि **र**घूत्तमाला । चुंबी तेवीं **पा**र्थातें. ॥ ९ ॥ सद्गदकंठ फुल्ललोचन । हर्षें रोमांच, प्रेमजीवन । **नं**दनंदन आनंदघन । नर्तन करी उल्हासें. ॥ १० ॥ तटस्थ वीर आश्चर्यमान । जेवीं मृगी[11] गायनीं लीन । कीं नागसराच्या[12] मोहनें । तल्लीन फणी ज्यापरी. ॥ ११ ॥ जेवीं सकळां मौनमुद्रा[13] । **ध**र्म वदे, 'कल्याणभद्रा! । आम्ही आतलों शोकसमुद्रा । उल्हास तूतें किमर्थ ?' ॥ १२ ॥ ऐकोनी वदे **द**नुजदळणी । श्रेष्ठानुज[14] हलधरपाणी[15] । ज्याचा तनुज **वि**श्वसृजनी[16] । वाढ[करी]सर्वां जनांतें. ॥ १३ ॥ म्हणे, 'धार्मिका! धर्ममूर्ती! । **ध**र्मराजनंदना! सुमती! । माझा **पा**र्थ प्राणप्रिय अती । मुक्त भयार्थी निश्चयें. ॥ १४ ॥ **वै**कर्तन प्रतापी **क**र्ण । सबळांश पूर्ण प्रतापवान । सर्वास्त्रभेदनीं जाणता निपुण । दातृत्वदानीं **ध**नेश. ॥ १५ ॥ जितकर्मा[17], विनीत सर्वा । दयाळ, सुशीळ, नेमविभवा । सुलग्न[18]-

---

१. ह्यांत मूळांतील अध्याय १८०–१८४ यांचा सारांश आला आहे. २. व्यथायुक्त, शोकाकुल. ३. पुष्कळ. ४. कमळाचें देंठ (दांडा). ५. राहू. ६. होरपळलें, पोळलें. ७. तारकाचा (तारकासुराचा) अरि (शत्रु)=कार्तिकेय, त्याचा जनक (बाप)=शंकर. ८. गरुडवाहन, कृष्ण. ९. स्पष्ट, खरोखर. १०. अपंगणें=जवळ घेणें, आपलासा करणें. ११. हरिणांस गायन फार आवडतें, अशी प्रसिद्धि आहे. १२. पुंगी, वाद्यविशेष. १३. स्तब्धता. १४. येथें 'अनुज' हा शब्द 'बंधु' ह्या अर्थानें योजिलेला आहे, असें वाटतें. १५. बळिराम. १६. ब्रह्मदेव. सृज्=उत्पन्न करणें. १७. न दमणारा. १८. कर्णाच्या अंगास उपजतच वज्राप्रमाणें कवच व कानांत परम देदिप्यमान कुंडलें होतीं. (मुक्तेश्वर–वनपर्व–अध्याय १७ पहा).

कवच कांतिविभवा। प्रदीप्त कुंडल अक्षई. ॥ १६॥ तयाश्रयें अजिंक्य धरणी। पार्थस्पर्धा[1] उपजत मनीं। सदैव उदित त्याच्या हननीं। जेवीं कृतांत व्याधिस्ता[2]. ॥ १७ ॥ यास्तव चिंता माझे हृदईं। सदा संलग्न मरणोपाईं। प्रेरोनी वासव तयान्वईं। कवच कुंडलें याचिलीं[3]. ॥ १८ ॥ जेणें प्रसन्न करुनियां। निर्वाणशक्ती घेतली, राया!। तिच्या शमनीं[4] देवत्रया[5]। शक्ती नोहे निश्चयें. ॥ १९ ॥ अर्जुनप्राणाची[6] ग्राहिक। माझे चित्तीं चिंतावटक[7]। जाचितां, उपाय योजितां, देख। आजी सिद्धि पावली. ॥ २० ॥ मुक्त फाल्गुन प्रतापरुद्र। आहुती वोपिला राक्षसेंद्र। रविनंदनाचें निधनच्छिद्र। मोकळें जालें, नरेंद्रा! ॥ २१ ॥ भीष्ममरणाची राया! चिंता। नाहीं द्रोणाची मातें व्यथा। कर्णशक्तीची हृदईं तथा। मुक्त केली शांभवें. ॥२२॥ यास्तव हर्ष धर्मराया!। कौरवकर्ण यमालया। गेले, ऐसें दृढनिश्चया। मानीं मनीं; धर्मज्ञा! ॥ २३ ॥ अवतारकार्याची समाप्ती। सखा फाल्गुन विजयशक्ती। घटोत्कच राक्षस धर्मघाती[8]। केवीं देवा सोसवे? ॥ २४ ॥ शोक त्यागुनी नरपार्थिवा!। रणीं प्रसर करिजे हवा। संहर्तकाळ[10] मानवां सर्वां। चिंता करिजे कोण्हाची? ॥२५॥ कर्णें धरुनी जीवित्वआशा। रक्षिली शक्ती, नराधीशा!। माझिये[11] मायें[11] बुद्धिभ्रंशा। पावतां, दुष्टीं[12] वोपिली. ॥ २६ ॥ आतां पायवाटें[13] युद्धसागरें[13]। जेवीं सेतुबंधनीं[14] रघुवीर। धडकोनी वधी दशशिर। तेवीं सर्वां निवटिजे[15].' ॥ २७ ॥ धर्म वदे, 'गुणैकराशी!। अमितविक्रम हृषीकेशी!। भक्तपाळक! सुरेंद्रतोषी!। करुणाघना! श्रीमूर्ती! ॥ २८॥ वैकुंठा! विकुंठा! कुंदरदना!। कुंभिनीधरा[16]! मधुसूदना!। कुरुपाळणा! अरिभंजना!। भंजकजनपाळका[17]!

---

१. अर्जुनाविषयीं वैरभाव. २. रोगपीडितास, आजाऱ्यास. ३. मागून आणिलीं. इंद्रानें ब्राह्मणाचें रूप घेऊन कर्णापासून कवचकुंडलें मागून घेतलीं व कर्णास एक अमोघशक्ति दिली—अशी कथा आहे. ४. शमनार्थ, शांत्यर्थ, नाशास. ५. ब्रह्मदेव, विष्णु व शंकर, ह्या तिन्ही सर्वश्रेष्ठ देवांस ६. अर्जुनाचा प्राण घेणारी. ७. चितेचा गोळा. ८. संशय, भीती. ९. धर्माचा उच्छेद करणारा. १०. विनाशकाळ, मरणसमय. हे दोन चरण सुभाषितरूप आहेत. ११. माझ्या मायेमुळें. १२. दुष्ट जो घटोत्कच त्यावर सोडिली. १३. युद्ध हें अगदीं सोपें काम. १४. रामानें लंकेंत जाण्याकरितां समुद्रावर सेतु (पूल) बांधिला—ही कथा प्रसिद्धच आहे. १५. निवटणें=स्वच्छ करणें—हा मूळ अर्थ. परंतु ह्या शब्दाचा प्रयोग पुढें पीडाशमनार्थी उपयोगांत येऊं लागला. सध्या ह्याचा अर्थ मारणें, नाश करणें, क्रूरास मारून इतरांस सुखी करणें (=पृथ्वीवरील दुर्जनरूपी मल नाहींसा करणें)—असा होतो. १६. पृथ्वीपते! १७. 'भजनजन' असें पाठांतर.

॥ २९ ॥ तव प्रसादें आमुची कीर्ती । रक्षिसी आमुतें नाना युक्ती । पार्थयशाची त्रिजगीं बुंथी[1] । वाढ तुझिया संयोगें. ॥ ३० ॥ पाहें पां युद्ध अनर्थकारी । जाली वीरांची बोहेरी[2] । कौरव नाचती हर्षांतरीं । भैमीघातें संतोषें.' ॥ ३१ ॥ श्रीकृष्ण वदे, 'संग्रामसदनीं । आतुडे केवीं सुखाची काहणी ? । क्षणीं सौख्य असुखभरणी[3] । पाठी वाड[4] तैसीची. ॥ ३२ ॥ कश्मल त्यागोनी शोकचिंता[5] । रिपुजयीं धरिजे आस्ता'. । धर्म वदे, 'जगन्नाथा ! । आज्ञा मान्य आमुतें.' ॥ ३३ ॥ तेची समयीं बादरायण[6] । कृपेनें पातला भगवान । धर्मासहित श्वेतवाहन । लक्षोनी बोले सुवाणी[7]. ॥ ३४ ॥ म्हणे, 'कर्णशक्ति या[8] मारी । पार्थ क्षेम पाहिला समरीं । अमित भाग्य सदाचारीं । धर्मराजा ! धर्मज्ञा ! ॥ ३५ ॥ तव सुकृतें काळशक्ती[9] । लया गेली, जगतीपती ! । पुनः जन्म फाल्गुनाप्रती । जाला मानीं, सभाग्या ! ॥ ३६ ॥ परपीडकराक्षसघातीं[10] । किमर्थ कश्मल[11] धरिलें चित्तीं ? । बंधुक्षेम जयाचे पंथीं[12] । होयीं सादर, नरेंद्रा ! ॥ ३७ ॥ पंचम दिन उदय अवधी । क्षया पावे रिपूची मांदी । सत्य, तप, दान, क्षमा, हृदीं । **यतो धर्मस्ततो जयः**' ॥ ३८ ॥ ऐसें वदोनी भगवान । पावता जाहला अंतर्धान । धर्में मानोनी कृत कल्याण । शौर्य विक्रमें चळाळी[13]. ॥ ३९ ॥ 'जय जय कृष्ण !' वदोनी वाणी । सेना सज्ज लोटला रणीं । प्रतापबाहु ऐश्वर्यखाणी । देखोनी कर्ण थडकला. ॥ ४० ॥ विस्फुरूनी प्रभिन्न चाप । घोषें वर्धवी ताप । जाणों समक्ष षडाननबाप[14] । त्रिपुरदहनीं ज्यापरी. ॥ ४१ ॥ प्रभिन्न शंख वाहिला वदनीं । भैरवरव[15] तुमुळभरणी । पांडववीरीं ऐकोनी श्रवणीं । भेरी, शंख वाहिले. ॥ ४२ ॥ प्रभद्रक राजे सहशिखंडी । सहस्र रथी लोटले संधी । शतेक हस्ती शुंडादंडीं । लोहशृंखळ[16] खळाळी. ॥ ४३ ॥ पांच सहस्र अश्वसादी । तीन सहस्रक प्रभद्रकमांदी । पाठी

---

१. वेष्टण, आवरण. २. भस्म, नाश. ३. दुःखाची विपुलता. ४. (सुखदुःखाची) वाढ, वृद्धि. ५. कळकळ, चिंता. ६. व्यास. हे बदरीवनांत तप करीत होते म्हणून ह्यांस 'बादरायण' असें म्हणतात. ७. मधुरोक्ति. ८. कर्णाच्या शक्तिनामक अस्त्रानें या घटोत्कचास मारल्यामुळें. ९. निर्वाणशक्ति (मागें ओंवी १९ पहा). १०. घटोत्कचाच्या नाशाविषयीं. ११. उदासीनता, खेद. १२. ज्या मार्गानें (उपायानें). 'पक्ती' असा पाठभेद. १३. चळवळ करी. 'चालिले' असा अन्यपाठ. येथें मूळांतील 'घटोत्कचवधपर्व' समाप्त होऊन 'द्रोणवधपर्वा'स सुरुवात झाली आहे. १४. शंकर. १५. भयंकर गर्जना. १६. हत्तीच्या पायांतील लंगर. 'खळाळी' बद्दल 'खळखळी' असें पाठांतर.

मिनले युधिष्ठिर संधी । जेवीं त्रिदशें[1] सुरेंद्रा. ॥ ४४ ॥ कुंतिभोजसुतेचा[2] सुतू । मेषैधन्वाचा[3] पुरवी जो अर्थू । तालकेतभगिनीकांतू[4] । वदे मृदुत्वें हरीतें. ॥ ४५ ॥ 'वृष्णिमंडळकुळावतंसा[5] ! । आदिअनादि! स्वप्रकाशा ! । निगमादि शेष कीर्तिघोषा । वाणितां वाणी[6] वाणीची, ॥ ४६ ॥ तो तूं आमुतें कृपानिधी । वश्य जाहलासी कवणे विधी? । भक्तपाळक करुणानिधी । ब्रीदावळी हे सत्य. ॥ ४७ ॥ क्रोधें संतप्त युधिष्ठिर । कौरवमांदी निबिड घोर । प्रेरीं सत्वर रहंवर[7] । धर्मराज जे ठाईं.' ॥ ४८ ॥ ऐकोनी पार्थाचिया बोला । रथ लोटला जैसा गोळा[8] । मन, पवन, खगेंद्र तळा । थकोनी मागें राहिले. ॥ ४९ ॥ अपंगो-[9]नियां राया धर्मा । मिनता जाहला संग्रामकर्मा । कौरव वीर बळाची गरिमा । द्रोणासहित लोटले. ॥ ५० ॥ दृष्टी देखोनी ऋषिवर्या । क्रोध नावरे पांचाळतनया । पार्षत शिखंडी विजयी बाह्या । वोढोनी धनु वाहिलें. ॥ ५१ ॥ पांठीसीं[10] वीर माद्रीकुमर । द्रौपदेय पंचभ्रातर । द्रुपद, विराट, शिनिप्रवीर । कैकय, पांडव सर्वेही. ॥५२॥ एकवटले चमूभार । गजाश्व, रथी, पदाती, वीर । शस्त्रसंपात वर्षती घोर । प्रळयवृष्टीसारिखा. ॥५३॥ मुख्य मुख्य वीरनायक । अग्निप्राय शर सतीख । बाणधारीं पिकलें पीक । धरादेवी दाटली. ॥ ५४ ॥ पार्थशरांची आगळीक[11] । पाहोनी संतप्त कुरुनायक । येवोनी द्रोणाच्या सन्मुख । बोले वाणी सरोषें. ॥ ५५ ॥ 'गुरुवर्यराजचूडामणी ! । पाहें पां सेना अर्दित रणीं । गांडीवशरांची अतर्क्य करणी । वन्हिप्राय होतसे. ॥ ५६ ॥ तुजपासाव प्राप्त विद्या । त्याची वाढ शूरत्वें, प्राज्ञा! । पाहोनी दृष्टी समित-संज्ञा[12] । आश्चर्यकार आमुतें. ॥ ५७ ॥ नेणों तया धरिसी मया[13] । यास्तव चमू जातसे लया? । परी हें अयोग्य गुरुराया ! । श्लाघ्य समरीं नव्हे पां. ॥५८॥ समर्थ अंकित पीडितां रंका । हा हिणाव[14] कवणा? देखा । तव प्रतापें कृतांतमुखा । वाढ न करीं; द्विजेंद्रा ! ॥ ५९ ॥ आमुचे हितीं अनन्यबुद्धी[15] । धरुनी विभांडीं

---

१. देव. २. कुंतिभोजराजाच्या मुलीचा (कुंतीचा) मुलगा (अर्जुन). ३. अग्नीचा. अर्जुनानें इंद्राचा पराजय करून अग्नीस त्याचें खांडववन भक्षणार्थ दिलें आणि अग्नीस निरामय व तृप्त केलें; अशी कथा आहे (मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय ४९ पहा). ४. तालकेत (तालांक, बळिराम), त्याच्या बहिणीचा (सुभद्रेचा) पति (अर्जुन). ५. यादवकुलभूषणा! 'वृष्णिमंडण' असा पाठभेद. ६. कमतरता, उणेपणा. ७. रथ. ८. तोफेच्या गोळ्याप्रमाणें मोठ्या वेगानें—हा इत्यर्थ. ९. आलिंगन देऊन. १०. पाठीशीं, रक्षणार्थ. ११. आधिक्य, वरचढपणा. १२. युद्धासंबंधीं ज्ञान. १३. (पांडवांविषयीं) दयार्द्रभाव. १४. कमीपणा. १५. निष्कपट भाव.

वीरमांदी । मर्दोनियां खंडीं **पार्थ** आधीं । सरते करीं जगत्रयीं.' ॥ ६० ॥ ऐकोनी **दुर्योधनाच्या** शब्दा । गुरुवर्य **द्रोण** गदगदा । हांसोनी वदे, 'विपर्यय[1] कदा । घडे अघडे कैसेनी? ॥ ६१ ॥ वोधजळ शोषी सागरा ? । तित्तिरें ग्रासिजे वैश्वानरा ? । प्रळयवात फणीधरा । कैसेनी प्राशवे? ॥ ६२ ॥ वज्र-धारे मूढ पाषाणीं ?। काळविषातेंवी तुळे पाणी? । **अंतकदूत** रिक्तपाणी । माघां कोण्हीं सारिला? ॥६३॥ तयापरी **अर्जुनजयीं** । वीर नाहीं भुवनत्रयीं । समरीं तोषे **मार**दाही । हस्तकळे[2] पावला. ॥ ६४ ॥ **ह**विजिव्हा[3] आरोग्यकाया[4] । **खां**डव वोपोनी केला, राया! । **सु**रेंद्रविक्रम[5] तया समया । विगत केला प्रतापें. ॥ ६५ ॥ तुज देखतां गंधर्वपती[6] । हतवीर्य केला न लवतां पातीं । **हि**रण्यरिपु दानवपंक्ती । वज्रीं अटक[7] मर्दिल्या. ॥ ६६ ॥ **का**ळखंज साठ कोटी । एकलेन मर्दिले हटी[8] । **नि**वातकवच न गणिती[9] दृष्टी । **वा**सवा, त्यांतें मारिलें[10]. ॥ ६७ ॥ तया जिंकी वृथा आशा । जाणतां नेणें, नराधीशा! । **पांचाळसृं**-जयसेनाकोशीं[11] । नाहीं[12] करीन[12] प्रतापें. ॥ ६८ ॥ तेव्हांच कवच[13] विसर्जन । करीन[13], राया! सत्य वचन । तुझ्या हितीं अनन्य मन । बुद्धी नान्य सर्वथा. ॥ ६९ ॥ यांहीवरी सन्नद्ध[14] **पार्थ** । नसतां, चमूचा करीन घात'. । राजा वदे, 'संकल्प सत्य । करीं; स्वामी! **गुरुवर्या**! ॥ ७० ॥ मी आणि **सौ**बळ **श**कुनी । **क**र्ण वीर प्रतापतरणी । **पा**र्थ विभांडीन रणांगणीं । काय थोरी तयाची?' ॥ ७१ ॥ ऐसी वदोनी वचनोक्ती । त्रिवर्ग[15] लोटले **अर्जुना**प्रती । सवें **दुः**शासन रोषावर्ती । सेनामांदी शिरकले. ॥ ७२ ॥ उभय वीर एकवटी । मारा पेटले थोर हटी । शस्त्रसंभार वर्षती थाटी । प्रळयमेघासारिख्या. ॥ ७३ ॥ तया काळीं **का**ळरात । काळरूपी काळिकावत[16] । काळिमाकुळित[17] वीर क्रांत । निद्राभरें विकळता. ॥ ७४ ॥ श्रांतवाहन श्रमी वीर । क्षीण क्षतीं गळे रुधिर । माजी

---

१. उलटा प्रकार. २. हस्तकौशल्य, समरपाटव. ३. हुताशनाला, अग्नीला. ४. मागें ओंवी ४५ वरील टीपा पहा. ५. इंद्राचा पराक्रम. ६. चित्रसेनगंधर्व. घोषयात्राप्रसंगीं कौरव पांडवांस त्रास देण्याकरितां वनांत गेले होते. तेथें चित्रसेनगंधर्वांनें दुर्योधनास धरून बांधून नेलें होतें. परंतु अर्जुनानें पूर्वीचें वैर मनांत न आणितां चित्रसेनाचा पराभव करून दुर्योधनाची सुटका केली–अशी कथा आहे. (मुक्तेश्वर–वनपर्व–अध्याय १२ पहा). ७. विनहरकत, कोणी अडथळा न करितां. ८. पराक्रमी. ९. जे इंद्रास तुच्छ मानीत होते (पर्वा करीत नव्हते) ते निवातकवच राक्षस. १०. मुक्तेश्वरवनपर्व–अध्याय १० पहा. ११. कोश=समुदाय. १२. नाश करीन, नष्ट करीन. १३. आंगांतून चिलखत काढीन. १४. चिलखत घातलेला, युद्धास तयार. 'सन्निध' असा अन्यपाठ. १५. दुर्योधन, शकुनि व कर्ण. १६. काळ्या शाईसारखी. १७. अंधकारानें व्याप्त.

निद्रेचा महाभर । झांकती डोळे गपगपां. ॥ ७५ ॥ यांवरी शरांची महामारी । आपपर नेणवे समरीं । झोंके खावोनी धरेवरी । वीर वाहनें रिचवती. ॥ ७६॥ एकमेकां मारिती हाका । 'कोठें आहेसी?' पुसती शंका । निद्रे व्यापिलें सकळिकां । प्रळयकाळ भाविती. ॥ ७७॥ सेनेमाजी थोर वैळसा । चाप वोढितां हस्त तैसा । स्तंभित विनिद्रा ध्यासा । घाव घाळूं विसरती. ॥ ७८ ॥ ऐसी अवस्था तये संधी । कासावीस वाहिनीमांदी । पाहोनी, जैाकळोनी ह्रदीं । पार्थ बोले समस्तां. ॥ ७९ ॥ म्हणे, 'वीर हो! सुमुहूर्तवेळा । विधीनें नेमिली तुम्हा सकळां । येणें प्राप्ती, जयाचा भेंळा । याच संधी आंतुडे. ॥ ८० ॥ अति आग्रही विंचारा । मृत्यु आणिला राजेश्वरा । निर्वीर वीर वसुंधरा । कांतविना हीनांग. ॥ ८१ ॥ मागें पुढां ऐसी करणी । केली नायकों कोण्हा वदनीं । उदय पावतां वासरमणी । इच्छित अर्थं सेविजे'. ॥ ८२ ॥ समस्तीं ऐकोनी पार्थवाणी । पूजिते जाले माहामानीं । सांडुनी युद्ध रणांगणीं । प्रेतप्राय पहुडले. ॥ ८३ ॥ अन्नोदक चारियावीण । श्रांत वाहिनी क्षतें क्षीण । पटचित्रवत चमू पूर्ण । देहभानीं अचेष्टा. ॥ ८४ ॥ जेथींचीं तेथें वाहनें वीर । शय्यासनीं जाहले स्थिर । शिबिरा जावया न पुरे धीर । लोटले सैर इतस्तता. ॥ ८५ ॥ गजारोह गजास्कंधीं । कवळोनी गंड निजले संधी । जाणों स्त्रीकुच सुरतानंदीं । आलिंगिजे ज्यापरी. ॥ ८६ ॥ रथी रथावर निद्रापन्न । हस्तीरोह पृष्टता सलीन । अश्वस्वार वाग्दोर धरून । वाजीपांई पहुडले. ॥ ८७ ॥ विनास्तरण समान मही । न विचारितां विकळदेही । पहुडले वीर ठाईंच्या ठांई । अश्मकांटे न गणीत. ॥ ८८ ॥ नृपावरी सेवकजन । पडले इतस्तता सरुनी भान । महानिंद्रेचें प्रभिन्न ठाण । वर्णावर्णसमाप्ती. ॥ ८९ ॥ जेवीं शरपंजरीं राघवचमू । निद्रापन्न क्षतविभ्रमू । तेवीं सेना पावोनी श्रमू । निस्विन्न गात्रीं निजेले. ॥ ९० ॥ धृतराष्ट्र म्हणे, 'गावल्गणी! । प्रयत्नाची वृथा मांडणी । पुरुष प्रधान दैवगुणी । श्रमभरणी जाण पां. ॥९१॥ काळविक्रमी नरपार्थिव । साह्या मिनले प्रतापी देव । अजय पावोनी भस्मती सर्व । जयप्राप्ती नव्हेची. ॥ ९२ ॥ कर्णशक्तीचा भरंवसा । तंव तिची जाली ऐसी देंशा । सारांश संततीची आशा । खुंटली जाण मी मानीं. ॥ ९३ ॥ असो; आतां आजन्म

---

१. संशयानें. २. संकट. 'सेनामांदी घोर वळसा' असा अन्यपाठ. ३. कळवळोनी, चिडून. ४. डंप. ५. प्राप्त होईल. ६. विचार करून पहा. ७. सूर्य. ८. कापडावर काढलेल्या चित्राप्रमाणें. मूळांतही हाच दृष्टांत आहे (अध्याय १८५।४४). ९. मृत्यूचें. 'मोहनिद्रेचें' असा पाठभेद. १०. घटोत्कचावर सोडल्यामुळें नाश पावली.

शोक । पाठी लाविला दैवें देख । शतपुत्रांमाजी वर्य मूर्ख । दुर्योधन आग्रही. ॥ ९४ ॥ भूत भविष्य जाणोनी क्षत्ता[1] । वोपितां सामाच्या अक्षता । न गणोनी हृदयीं केलें क्षता । आजन्म मातें, बाळका ! ॥ ९५ ॥ आतां किमर्थ आठवण ? । होणार तैसें बुद्धीचें मान । भावी रेखेचें प्रमाण । टाळों पाहे कोणातें ? ॥९६॥ असो; पुढें वृत्तांत कैसा । जाला ? मातें निवेदीं घोषा' । संजय वदे, 'नरमहेशा ! । आज्ञा मान्य मस्तकीं.' ॥ ९७ ॥ [2]क्षीराब्धीची स्नुषा निशीदेवी । स्वसामर्थ्यें दवडूनी रवी । [3]तमासनीं एकांत दिवीं । निद्रा करी पतिसंगें. ॥ ९८ ॥ सख्या कुमुदिनी प्रसन्नवदन । खेचर विचरती आनंदमान । अरुणें जाणोनी निद्रापन्न । घाला घाली वैरत्वें[4]. ॥ ९९ ॥ दृष्टी देखोनी गरुडाग्रजा । त्यागोनी पळाली [5]दत्तानुजा । कांतावियोगें मंदतेजा । काळवंडला ते काळीं. ॥ १०० ॥ लगबगा पळतां देवी रात्री । तमवस्त्र पडतां धात्री । स्मृतिवातें उडवोनी वक्रीं । सागराच्या बुडविलें. ॥ १०१ ॥ सूर्यपक्षी आल्हादयुक्त । दिशेनें दिशा भरली त्वरित । अरुणरंगी आरत्या आर्तें । वोवाळिती आदित्या. ॥ १०२ ॥ तेची ज्योती विश्वचक्षीं । भरतां जागृत जाले पक्षी । साधक सावध धर्मपक्षी । चित्तीं चिंतिती [6]अनंता. ॥ १०३ ॥ असो; होतां अरुणोदयो । निघोनी गेला निद्रावायो । जागृती पावला सैन्यसमुदायो । उदित वीर संग्रामा. ॥ १०४ ॥ तो युद्धरस चतुर चतुरीं । पुढां सेविजे कर्णोदरीं । नरहरमोरेश्वरवाग्वल्लरी । वदे भीमराजप्रसादें. ॥ १०५ ॥[7]

---

[8]अध्याय बत्तिसावा.

संजय वदे, 'कुंभिनीपाळा ! । अरुण पावतां उदयाचळा । अग्रता पंच पंच उषःकाळा । महा वीर चेइले[9]. ॥ १ ॥ [10]अनुष्टुप स्वधर्मकर्मा । सारुनी लोटले संग्रामा । उभय वीर [11]रोषगरिमा । येरयेरां धडकले. ॥ २ ॥ चतुरंग चमूची महा दाटी । गजाश्वपती रथाच्या थाटी । वर्षते जाहले शरांच्या कोटी ।

---

१. विदुर. २. चंद्र हा समुद्रांतून उत्पन्न झाला म्हणून समुद्र हा त्याचा बाप व रात्र (चंद्राची पत्नी) ही समुद्राची सून होय. ३. अंधकाररूपी आसनावर. ४. 'त्वरेनें' असा अन्यपाठ. ५. दत्ताचा धाकटा भाऊ जो चंद्र, त्यास. दत्त, चंद्र व दुर्वासा हे अत्रिमुनीचे मुलगे. त्यांची आई अनसूया. ६. स्वर्गात, आकाशांत. ७. ह्या अध्यायास 'चतुर्थदीन–रात्रियुद्धसमाप्ति' असें नांव आहे. ८. ह्या अध्यायांत मूळांतील १८५–१८८ अध्यायांचा सारांश आला आहे. ९. चेतनायुक्त झाले, जागे झाले. १०. थोडक्यांत, संक्षिप्त रीतीनें. ११. मोठ्या रागानें.

विविध शस्त्रें अपार. ॥ ३ ॥ हस्तिप हस्तिपा ताडिती रोषें । स्वार स्वारांसी हाणिती घोषें । पदाति पदातिया त्रासें । निकरें घाव घालिती. ॥ ४ ॥ परस्परें ताडितां घाव । छिन्नगात्री विकळ सर्व । तरी न टाकोनियां हाव । धँसती पुढें जयार्थी. ॥ ५ ॥ रुधिरस्त्राव क्षतांकित । अमित वीर पांवले मृत्य । देखोनी धांवले नृपनाथ । उभयदळीं प्रतापें. ॥ ६ ॥ महावीरांची निबिड दाटी । पाहोनी लोटले **भीमकिरीटी** । वोढोनी गांडीवाच्या मुष्टी । बाण कोटी सोडिल्या. ॥ ७ ॥ तटतटां वीरशिँसाळें । खंडिती जेवीं रौंतोत्पळें । छिन्न वाजी द्विरँदमौळें । तुटोनी धरे रिचवती. ॥ ८ ॥ किलकिलाट शब्दध्वनी । **दुर्योधन**, **कर्ण**, **शकुनी** । धावोनी, वर्षाव केला बाणीं । **जिष्णु**वरी निघातें. ॥ ९ ॥ अस्त्रप्रयोग नानाविध । करुनी छादिला **पार्थ** विषँद । येरू हर्षित शूरत्वमदें । सोडी शर मंत्रोक्त. ॥ १० ॥ निवारुनी त्याची बाणच्छाया । दश शर वोपिले तया । विकळ वीर तया समया । सेना अमित मर्दिली. ॥ ११ ॥ चतुरंग शवें दाटली अवनी । रुधिरकर्दम माजला रणीं । विकळ मानसें सेनाश्रेणी । अष्ट दिशा लंघिती. ॥ १२ ॥ येरीकडे **द्रोणाचार्य** । धँनुर्धरांमाजी वर्य । जाणों वसंतीं प्रदीप्त सूर्य । किंवा वन्ही प्रळंईचा. ॥ १३ ॥ सहस्त्रशः शरांचीं शतें । लोटुनी धरा भरिली प्रेतें । हलकल्लोळ विकळ चित्तें । सेनामेळीं निशतें । लोटुनी धरा भरिली प्रेतें । हलकल्लोळ विकळ चित्तें । सेनामेळीं निघाले. ॥ १४ ॥ **विराट**, **द्रौपद** रोषावर्ती । धांवले क्रोधें प्राणाहुती । जेवीं वन्हीचिये असह्य ज्योती । उड्या घालिती पतंग. ॥ १५ ॥ तयापरी पृतना पाठी । वोढोनी धांवले चापकोटी । **पांचाळपुत्र** त्रिवर्ग हटी । लोटोनी **द्रोणा** ताडिलें. ॥ १६ ॥ स्मितहास्य करुनीं **गुरुराजें** । शर सोडिले शौर्यपुंजें । दूर करुनी तनूचें वोझें । शिरत्रयें उडविलीं. ॥ १७ ॥ पुरुनी धांव **पांचाळ** निकटीं । पडतां रोषें भरली सृष्टी । चाप वाहोनियां मुष्टी । शर अमित सोडिले. ॥ १८ ॥ **विराट**, **द्रुपद** एकविध । शर सोडिती विचित्रभेद । **द्रोण** प्रतापी जैसा स्कँद । **तार**कातें न गणितू. ॥ १९ ॥ ताडुनी बाण कुशळ हस्तें । विगत केलीं शरांचीं शतें । भेदोनी सायक क्रोधाद्भुतें । उभय चापें खंडिलीं. ॥ २० ॥ द्वय भूपती रोषावर्ती । दाहा तोमर काळघाती । मत्स्यें प्रेरिला **द्रोणा**प्रती । महाक्रोधें निघातें. ॥ २१ ॥ अँयसी शँक्ती भूषणी । **पार्षत** सोडी **काळभगिनी** । **द्रोणा**चार्य प्रतापतरणी । लक्षोनी सोडी

१. घुसती. २. 'पडिले मृत्यें' असा अन्यपाठ. ३. वीरांचीं शिरें. ४. तांबडीं कमळें. ५. हत्तींचीं मुंडकीं. ६. विषारी बाण सोडणारा. ७. 'मारा पेटला वीर' असा अन्यपाठ. ८. कार्तिकस्वामी. ९. पोलादी अस्त्रविशेप. 'ऐसी शक्ती' असें पाठांतर.

शरांतें. ॥ २२ ॥ दश तोमर दाहा बाणीं । छेदोनी शक्ती पाडिली अवनी । विशाळ भाली अरिमर्दनी । पीतवर्णी सोडिल्या. ॥ २३ ॥ दामिनीसम उसळोनी तेहीं । उभय वीर भेदिले हृदयीं । कार्णिकारवृक्ष[1] वातें मही । शेवें तेवीं पडियेलीं[2]. ॥ २४ ॥ पंचप्राणीं करुनी पेणीं[3] । धर्मधामा वसविलें मानीं । आहार्भूत[4] प्रभिन्न घनी । शब्द सेने माजले. ॥ २५ ॥ पुढार भूप प्रख्यातकीर्ती । मृत्यु पावले गुरूच्या हातीं । ऐकोन पार्षत नेत्रपातीं । ढाळी जळ ढळढळां. ॥ २६ ॥ तंव सहस्रांशु[5] दावी शिरसा । तेजें सोज्वळ दाही दिशा । वीर उत्साह पावोनी तोषा । संग्रामातें थडकले. ॥ २७ ॥ धृष्टद्युम्न जनकघातीं[6] । क्रोधानळीं प्रदीप्त चित्तीं । जैसा व्याधिस्तक्षयाप्रती । दंडपाणी उकावे. ॥ २८ ॥ तयापरी द्रोणाचार्या । पाहोनी चुरी उभय बाह्या । संतप्तमान क्रोधान्वया । भीमसेन अनुवादे. ॥ २९ ॥ म्हणे, "बापा! प्रतापसूर्या! । अग्निपुरुषा![7] वीरवर्या! । खेद टाकोनी द्रोणाचार्या । वधोनी पिता तोषवीं. ॥ ३० ॥ तुझ्या जनकें यया अर्थी । प्रसन्न केला स्वधापती । त्याचें उत्तीर्ण गुरुप्रती । वधोनी यश वर्धवीं. ॥ ३१ ॥ क्षणक्षणा बोलसी वाणी । 'वसवीन द्रोण काळसदनीं' । ते सत्य करुनी दावी रणीं । साह्य आम्हीं सर्वस्वें." ॥ ३२ ॥ आधींच उदित द्रोणघाता । तात[8]वधाची दुजी व्यथा । वरी पांडव विंधी[9] तिखारता । वन्हिप्राय धडाडी. ॥ ३३ ॥ समागमीं चतुरंगमांदी । द्रोणा तगटला महाक्रोधीं । जाणों क्षया पातला उदधी । तेवीं शर सोडिले. ॥ ३४ ॥ निबिड धार[10] तया समयीं । व्यापिली बाणें पूर्ण मही । हें देखोनी शूरत्व बाहीं । कौरवराज धावला. ॥ ३५ ॥ समागमीं कर्ण शकुनी । अमित वीर सैन्यश्रेणी । पाठी सूदोनी प्रतापगुणी । मार्गा पुढां वेष्टितू. ॥ ३६ ॥ येरयेरां अंगसंगें । झोडिती वीर महारागें । सम समान उभय भागें । एकमेकां ताडिती. ॥ ३७ ॥ विविध शस्त्र काळविखारी । वीर पेटले महामारीं । घाव घालिती उर्ध्वकरीं । दुंधड[11] होती शरीरें. ॥ ३८ ॥ न गणोनी क्षतें

१. पांगाऱ्याचें झाड. २. 'सेविती तेवीं पडियले' असा अन्यपाठ. ३. मुक्काम. ४. हाहाकारयुक्त. ५. सूर्योदय झाला—हा इत्यर्थ. ६. आपल्या बापाच्या शत्रूवर. ७. अग्नि; द्रोणाचार्यांनीं द्रुपदाचा अपमान केला होता या अपमानाबद्दल सूड उगविण्याकरितां द्रुपदानें तपश्चर्या केली व अग्निकुंडांतून द्रोणाला मारणारा पुत्र धृष्टद्युम्न मिळविला. (मुक्तेश्वर—आदिपर्व—अध्याय ३२ पहा). अशा रीतीनें धृष्टद्युम्नाचा जन्म द्रोणवधाकरितांच झाला होता. ८. द्रुपदराजा द्रोणाचार्यांचेच हातून रात्रियुद्धांत मरण पावला. ९. मर्मभेदक भाषण करी. १०. पर्जन्याचे धारेप्रमाणें बाणांचा वर्षाव. 'निबिडांधार' असा पाठभेद. ११. दुखंड, दोन तुकडे.

धांवती सैरा । शस्त्रें ताडिती महानिकरा । बाण शीसें गगनोदरा । भिन्नाकार उसळती. ॥ ३९ ॥ गजाश्वपती ताडिती बळें । न गणोनी ममत्व[1], भेदिती सेळें[2] । वीर मस्त, पुरुषार्थडौळें[3] । माघां कोण्ही न सरती. ॥ ४० ॥ क्षतांग लिप्त शराचे घायीं । तैसेची ताडिती पुढिल्या पाईं । निबिड युद्धाची नवलाई । एक मिठी[4] वीरांची. ॥ ४१ ॥ किलकिलाटें फोडिती हाका । 'घ्या घ्या' शब्द सकळां मुखा । सेना आटली[5], नव्हे लेखा । रुधिरनदी लोटली. ॥ ४२ ॥ रक्तमांसाचा कर्दम । प्रवाह स्वर्गभोगसंभ्रम । फेण वसनें उत्तमोत्तम । शस्त्रें जळचर अमित[6]. ॥ ४३ ॥ वाजि, वारण, पदाती, रथी, । खंडविखंड शवांच्या पंक्ती । भारें दाटली वसुमती । मार्ग नोहे वीरांतें. ॥ ४४ ॥ जागरसंगें[7] चमू विकळ । त्यांवरी क्षुधेतृषेचे अनळ । शस्त्रसंपात विषगरळ । प्रळयकाळ भाविती. ॥ ४५ ॥ अर्दमान विकळ सेना । रोष नावरे **पांडुनंदना** । शिरकोनी अग्रता ताडिती बाणा । **कौरव** वीर लोटले. ॥ ४६ ॥ येरयेरांच्या बाणजाळीं । आच्छादिला गगनीं हेळी[8] । निबिडांधार तये काळीं । कोण्ही कोण्हा दिसेना. ॥ ४७ ॥ अश्वखुरीं धुरोळा गगनीं । मिश्रवात[9] भरत नयनीं । वरी शरांची अति दाटणी । छाया रणीं पडियेली. ॥ ४८ ॥ कोठें **भीम**? कोठें **अर्जुन**? । कोठें **धर्मराज**? **माद्रीनंदन**? । **सात्यकी** कोठें? **धृष्टद्युम्न**? । चमूमांदी[10] दिसेना. ॥ ४९ ॥ तेवींच **द्रोण**, **दुर्योधन**, । **शल्य**, **शकुनी**, **दुःशासन**, । **कृप**, **कृपीतनय**, **कर्ण**, । सेनामेळीं हरपले. ॥ ५० ॥ किंचित शरांची शमतां वृष्टी । वीर वीरांतें पाहती दृष्टी । पुढारें धांवोनी उठाउठी[11] । येरयेरां पडखळती[12]. ॥ ५१ ॥ **दुर्योधनासी** **माद्रीतनय** । **द्रोणाचार्यातें** **धनंजय** । **रविनंदना** **भीमवर्य** । सज्जोनी चापा लोटले. ॥ ५२ ॥ षड्वीर लोटतां[13] निकर मारा । उभय चमू सुलग्न[14] सैरा[14] । विचित्र शस्त्रें शरांच्या धारा । भिन्नाकारा वर्षती. ॥ ५३ ॥ क्रोधें प्रदीप्त षड्थी । सोडिल्या शरांच्या दिव्य पंक्ती । जाणों आकाश फुटलें व्यक्ती[15] । लोकक्षयीं क्षयातें. ॥ ५४ ॥ सरसराटें इषूंच्या जाळी ।

---

१. आपलेपणा, प्रेमभाव. 'समत्व' असा अन्यपाठ. २. जोरानें, छळपूर्वक. ३. डौलें=झोंकानें, ऐटीनें, अभिमानानें. ४. भीड, दाटी. ५. नाश पावली. ६. असंख्य, अगणय. ७. जागरण झाल्यामुळें. ८. सूर्य. 'गगनहेळी' असा अन्यपाठ. ९. गोंधळणारे वारे. १०. सैन्याचा समुदाय. ११. घाईनें, लवकर. १२. चढाई करिती, हल्ला करिती. १३. 'लोटले' असें पाठांतर. १४. दोन्हीकडील फौजा एकमेकींशीं भिडल्या—हा इत्यर्थ. १५. प्रत्यक्ष, खरोखर.

जेवीं विजा पडती तळीं । बाणीं दिशा भरल्या सकळी । अनिळ[1]गती मंदली. ॥ ५५ ॥ रुचिरतनु वीरशिसाळें । खंडोनी तळीं रिचवती बळें । भूषित-भुजाफणिजाळें । व्योममार्गें उसळती. ॥ ५६ ॥ रुक्मवर्ण स्वरूप[2]कांती । गिळल्या पिका[3] बाहेर दिसती । शशांकवदनें कोमळकांती । छिन्नगात्री पडताती. ॥ ५७ ॥ मैदद्रावित[4] मत्त कुंजर । नाना द्वीपींचे शिक्षित[5] शूर । खंडविखंड पडिले सैर । गिरिशिखरांसारिखे. ॥ ५८ ॥ नाना जातींचे तुरंगम । पाखरा[6] सुढाळ जडितहेम । इतस्तता होवोनी प्राणोत्क्रम । करुनी मही पहुडले. ॥ ५९ ॥ सुवर्णरथ ध्वजमंडित । किंकिणी[7]पताकासुशोभित । छिन्न होवोनी पडिले बहुत । आख[8]चक्रविरहित. ॥ ६० ॥ दिव्य वस्त्रें, भूषणें, शस्त्रें, । मुगुट, उष्णीषें[9], रंगें विचित्रें । भूमी लोळती जैसीं पत्रें । शिशिरर्तू[10] ज्यापरी. ॥ ६१ ॥ सुवर्णदाम[11], मुक्तमाळा, । बाहुभूषणें, कटिमेखळा[12], । कटकें[13], कुंडलें, फांकती कीळी[14] । करमुद्रिका अपार. ॥ ६२ ॥ गजाश्वपाखरा इंद्रगोपवर्णी । पालवीं[15] मुक्ताफळांची भरणी । इतस्तता लोळती अमित धरणी । हार विचित्र रत्नांचे. ॥ ६३ ॥ तेणें शोभली धराबाळा । जाणों शारदी[16] नक्षत्रमाळा । कुंडलाकार शवांचा मेळा । उद्वस[17] ग्रामासारिखा. ॥ ६४ ॥ क्षोभावर्ती धांवतां नकुळ । कुळें[18] अकुळ **कौ**रवपाळ । व्याकुळ चित्त, क्रोध विपुळ । ताडी शरीं तयांतें. ॥ ६५ ॥ येरयेरां[19] अर्पिती शर । खंडिती भेदिती जिव्हार[20] । रक्तवोघीं आर्द्र शरीर । जाणों गुलाब[21] सिंचिला. ॥ ६६ ॥ **न**कुळवीर प्रतापवान । शत सायकीं दुर्योधन । भेदोनी हृदीं महोज्वलीन[22] । शरांच्या जाळीं बुजिला. ॥ ६७ ॥ कासावीस **कौ**रवभूप । विन्मुख रणीं पावे ताप । दुःशासन दुःसह माप । 'तिष्ठ तिष्ठ' म्हणतसे. ॥ ६८॥ क्रोधें लोटतां रहंवरा । **स**हदेवें केला आडवारा[23] । निकरें वर्षोनियां शरा । **दु**ःशासना ताडिलें.

१. वायूचा वेग. २. 'शरीरकांती' असा अन्यपाठ. ३. घश्यांतील पिक (थुंकी) बाहेर दिसणें, हें नाजुकपणाचें लक्षण आहे. ४. ज्यांच्या गंडस्थळांतून मदाचा स्राव होत आहे असे. ५. शिकविलेले. ६. पाखर=घोड्यास गोळी, भाला वगैरे लागूं नये म्हणून धातूचे तारांचें विणलेलें कांहीं आच्छादन, त्याचे अंगावर घालतात तें; घोड्याची झूल. ७. किंकिणी=क्षुद्र घंटा (घागऱ्या). ८. आख=आंस, रथाचे चाकांतील कणा. ९. पागोटीं, मंदिल. १०. हिंवाळ्यांत. ११. दाम=माळ, हार. १२. कंबरपट्टा. १३. कडीं. १४. तेज. १५. शेवटास, टोंकांस. १६. शरदृतूंतील. १७.उजाड, ओसाड. १८.आप्तेष्ट मंडळी असून नष्ट झाली आहे ज्याची असा. १९. अन्योन्यां, परस्परांस. २०. मर्मस्थान. २१. गुलाबी रंग. 'गुलाब संचला' असा पाठभेद. २२. अत्यंत प्रखर. २३. अटकाव, अडथळा.

॥ ६९ ॥ येरू निमग्न क्रोधभरें । बाण सोडिले क्रोधें निकरें । सहदेव सावध लघुकरें[1] । शरीं शर वाहिले. ॥ ७० ॥ तेणें तया क्रोधभरणी । सोडिता जाहला इषूंच्या श्रेणी । माद्रेय वीरमुकुटमणी । सोडी शर निघातें. ॥ ७१ ॥ निवारूनियां शरधारा । सारथी केला बाणीं चुरा । अश्व ताडिती[2] मोकळी धुरा[3] । सैरा रणीं उसळले. ॥ ७२ ॥ विन्मुख वीर रणांगणीं । कर्ण धांवला क्रोधभरणी । रथ लोटुनी गदापाणी[4] । तयाप्रती थडकला. ॥ ७३ ॥ देखोनी भीमसेन अग्रता । सोडिल्या तीव्र बाणचलथा । तळीं बुजोनी पांडुसुता । वर्म[5] आंगींचें भेदिलें. ॥ ७४ ॥ तेणें वृकोदर क्रोधावर्ती । कर्णा ताडिल्या शरांच्या पंक्ती । संग्राम जाहला उभयांप्रती । देवदैत्यांसारिखा. ॥ ७५ ॥ दोघे वीर क्रोधानळीं । फुफाटती वृषभकीळीं[6] । येरयेरांतें बाणजाळीं । ताडिती प्रौढिप्रतापें. ॥ ७६ ॥ अद्भुत युद्ध तयां वीरां । होतें जाहलें तीव्र निकरा । क्षतें शरीर रक्तांबरा-[7]। प्राय भासे वीरांतें. ॥ ७७ ॥ संतप्तमान वृकोदरें । गदा झोंकिली क्रोधभरें । कर्णस्यंदन चकचूर । होवोनी गेला तात्काळीं. ॥ ७८ ॥ अन्य रथीं वळंघोनी[8] कर्ण । शरीं ताडिला भीमसेन । येरू होवोनी रोषापन्न । गुर्वी[9] गदा मोकळी. ॥ ७९ ॥ रविसुतें लक्षोनी नयनीं । स्वगदा प्रेरिली रोषभरणी । परस्परें धडकोनी झणी । निवोनी[10] तळा आतल्या. ॥८०॥ राधेय वीर क्रोधानळीं । मोकळिल्या विषांच्या[11] भाली । रक्त पीत विचित्र कीळी । वृश्चिकविषासारिख्या. ॥ ८१ ॥ रुक्मपिसारे, ज्वलित धारा, । कर्दळीपत्राचा उभारा[12] । जाणों दामिनी क्षुधातुरा । भक्षावया पातल्या. ॥ ८२ ॥ धडकोनियां तिहीं बाणीं । सहित अश्वरथाची धुणी[13] । करितां, विरथी गदापाणी[14] । धरेवरी आतला. ॥ ८३ ॥ शरामागें शरांची भरणी । उच्छ्वास[15] टाकों नेदी वदनीं । इषु शिरकतां गात्रस्थानीं । वृक्षापरी डळमळी. ॥ ८४ ॥ क्षतांकित रुधिरधारा । स्थिर अभीत रणगव्हरा[16] । नकुळें प्रेरुनी रथ पुढारा । वरी घेतला पांडव. ॥ ८५ ॥ चंद्रचूड[17] कैलासगिरी । वळंघे[18], तैसा भीम वरी. । येरीकडे पार्थ समरीं । द्रोणाचार्या धडकला. ॥ ८६ ॥ जैसे सूर्य सूर्यासी थडकले । कीं

---

१. हस्तचापल्यानें. २. 'ताडितां' असें पाठांतर. ३. रथाचा पुढील भाग. ४. ज्याच्या हातांत गदा आहे अशा भीमापाशीं. ५. कवच, चिलखत. ६. बैलाच्या डुरकण्यानें, बैलाच्या डुरकीप्रमाणें. ७. आरक्त आकाशासारखें. ८. चढून, बसून. ९. मोठी. १०. गदा शांत होऊन. ११. 'विशाळ भाली' असा अन्यपाठ. १२. उभारणी, ऐट, डोल. १३. नाश. १४. भीम. १५. श्वासोच्छ्वास, दम, उसासा. १६. रणरूपी गुहेंत. १७. शंकर. १८. चढे.

सागर सागरा लोटले । ना ते गिरीतें गिरी [१]आंदोळले । वज्र वज्रा ज्यापरी; ॥ ८७ ॥ कीं **का**ळकूटासी **का**ळकूट । ना ते, **का**ळ **का**ळासी अदट । कीं **त**क्षकासी **त**क्षक एकवट । तेवीं युद्धा मिनले. ॥ ८८ ॥ उभय [२]विद्येचे अर्णव । धनुर्धारी शूर लाघव । अस्त्रक्रिया शरगौरव । देखतां आश्चर्य देवांतें. ॥ ८९ ॥ उभय स्यंदनीं विराजमान । जाणों जयश्रीचें शोभायतन । ध्वजापताकीं फांकती किरण । सूर्यरश्मीसारिखे. ॥ ९० ॥ वरी आरूढे महामती । जाणों **वा**सव द्विधा व्यक्ती । रुक्मकार्मुक विशाळ हातीं । **शि**वचापासमान. ॥ ९१ ॥ हेमपुंखी शर तीक्ष्ण । जाणों **त**क्षकाचे तीव्र दशन । सरसावोनी शरासन । बाणकोटी सोडिल्या. ॥ ९२ ॥ विद्यापीठ **द्रो**णराज गुरू । शिष्यत्वरूपें **पा**र्थ [२]श्रीअगारू । दीपापासाव दीपपसरू । तेजा वाढ सारिखी. ॥ ९३ ॥ सिंहशावक [३]प्रतापआगळा । उपजतां खंडी [४]गजांच्या मौळा । तेवीं **अ**र्जुन शूरत्वकळा । तेजागळा तिहीं लोकीं. ॥ ९४ ॥ **त्र्यं**[५]बकापासाव उद्भव **गं**गा । कीर्तिमान दुरितभंगा । तेवीं **पा**र्थ विक्रमसुभगा । वाटे क्षत्रियां सर्वांतें. ॥९५॥ गुरुशिष्याचिये कदनीं । कंपमान होय धरणी । [६]खेचरीमुद्रा वीरनयनीं । आश्चर्यजळीं निमग्न. ॥ ९६ ॥ उभय वीर रोषावर्ती । सोडिते जाहले शरांच्या पंक्ती । खर्व, अखर्व, पद्म, गणती । कोटीच्या कोटी [७]अमोज्य. ॥ ९७ ॥ धरा आकाश तिहीं शरीं । भरुनी काढिल्या दिशा चारी । ठायातळीं [८]रजनीवैरी । नाहींच जाहला ते काळीं. ॥ ९८ ॥ शरांमागें शरांचे पुंज । लखलखित निघती सतेज । खंड नोहे, उभयां [९]फुंज । शूरत्वाचा आपुल्या. ॥ ९९ ॥ सरसराट कुंजती चापें । शर उसळती फणींद्रतापें । घेतां सोडितां गणणें [१०]मोपें । कुशळकुशळां लक्षेना. ॥ १०० ॥ मंडळाकार गरगराटी । धनुष्य फिरती बारावाटी । बाण सरकती वमित [११]खोटी । विषाचिया झरझरा.॥१०१॥ परस्परें खंडी प्रौढी । अधिकाधिक वर्धे वाढी । विद्यालाघव कडोविकडी । कोण्ही कोण्हा [१२]न [१२]मेचे. ॥ १०२ ॥ हर्षयुक्त मानसीं **द्रो**ण । धूजी अंतरीं **श्वे**तवाहन । '[१३]मजहूनी विशेष कळानिपुण । रक्षो **ह**री ययातें'. ॥ १०३ ॥

---

१. हापटले, आदळले. २. बुद्धीचें माहेरघर. ३. प्रतापानें जास्त. ४. हत्तींच्या. ५. नासिकाजवळील त्र्यंबकेश्वर नांवाच्या गांवीं. ६. योगशास्त्रांतील समाधीचा एक प्रकार. ७. असंख्य, अगण्य. ८. सूर्य. ९. अभिमान, गर्व. १०. 'मापें' असें पाठांतर. ११. लगडी, गोळे. १२. न आटोपे, न आंवरे. मेचणें=कुंठित गति होऊन माघार घेणें, स्तब्ध राहणें, आटोपणें. १३. 'शिष्यादिच्छेत्पराजयम्'या न्यायानें गुरूवर शिष्यानें ताण केलेली पाहून गुरूस आनंद वाटणें साहाजिक आहे.

महास्त्रप्रयोग मंत्रोच्चारीं । करुनी वर्षला शरांची पुरी । इंद्रास्त्र, त्वष्ट्रास्त्र, वज्रास्त्र, गिरी-। वायव्यादि मोकळी. ॥ १०४ ॥ अनेक शस्त्रें, नाना विद्या । जपोनी, लाविलें शरांचे वृंदा । तेजें वातें जगातें खेदा । अत्यंतिक पावला. ॥ १०५॥ आंदोळिती पर्वतमौळें । खळबळती सागरजळें । उल्कापात अकाळकाळें । भूतगणा आक्रांतू. ॥ १०६ ॥ पार्थ विद्येचें मकरालय[1] । जें ज्या उपशमन[2] अस्त्रवर्य । तें तें सोडुनियां अन्वयें । द्रोणअस्त्रें वारिलीं. ॥ १०७ ॥ जैसें शास्त्रज्ञाचे अनुवाद । पंडित खंडिती शास्त्रभेद । कीं सभासदांचे कुशळ शब्द । चतुर युक्ती खंडिती; ॥ १०८ ॥ तयापरी विजयी पार्थ । द्रोणास्त्रें पावविलीं शांतें । विस्मयमान वीरांचीं चित्तें । 'धन्य' उभयां बोलती. ॥ १०९ ॥ अंतरिक्षीं त्रिदशांची[3] मांदी[3] । ऋषी, सिद्ध, गंधर्व, संधी[4], । यक्ष, राक्षस, किन्नरादी । पूजिती वीरां उभयतां. ॥ ११० ॥ 'निरुपम रौद्र युद्ध घन । यया साम्यता नाहीं आन । नच मानव देवगण । नच राक्षसदैत्यादी. ॥ १११ ॥ आश्चर्यमान उभयतांचा । संग्राम देखिला नयनीं साचा । मागें एकिला ना, दृष्टी कैंचा? । तो आजी नेत्रीं पाहिला. ॥ ११२ ॥ गुरुशिष्यांचें अमित वीर्य । न्यूनाधिक न कळे सोय । नेणों द्विधारूपें सुरेंद्रवर्य । श्रीशंकर अवगला[6]. ॥ ११३ ॥ कीं मूर्तिमंत धनुर्वेद । अवयवी आगळे विशद । नयनीं लक्षितां चतुरीं, खेद । पावती बुद्धिवैभवें.' ॥ ११४ ॥ ऐसें खेचर स्तविती उभयां । रोष नावरे द्रोणाचार्या । विधियुक्त मंत्री ब्रह्मास्त्र, राया! । महारोषें प्रेरिलें. ॥ ११५ ॥ कडकडाट सहस्रशः । दामिनीतेजें जाला वळसा । दिशा उजळल्या प्रकाशा । धरा सकंप शैलांसीं[7]. ॥ ११६ ॥ खळबळती सप्त सागर[8] । डळमळिती गिरिवर । भूचरां खेचरां प्रळय थोर । झडझडाट वावरे. ॥११७॥ अभीत पार्थ शैलसरी । अचळ उभा रणचत्वरीं[9] । अस्त्रोपशमा[10] मंत्रोच्चारीं । ब्रह्मास्त्रातें योजिलें. ॥ ११८ ॥ गांडीव वोढोनी कानाडी[11] । शर सोडिला महाप्रौढी । जाणों काळाची पडली उडी । दिशा तेजें डवरिल्या. ॥ ११९ ॥ अस्त्रें अस्त्र संघट्टणी । एकत्र तेजें जालीं दोनी । आपआपणा कालवूनी । शमालागीं पातलीं. ॥ १२० ॥ जैसी क्षयाग्निभरणी । विरोनी जाय समुद्र-

---

१. सागर. २. शांत करणारें, मारक. ३. देवांचा समुदाय. ४. त्या वेळीं. ५. अन्य, दुसरी. ६. प्राप्त झाला. ७. पर्वतांसह. ८. 'सैन्यसागर' असा पाठभेद. ९. रणांगणांत. १०. 'अस्त्रशमना' असा अन्यपाठ. ११. आकर्ण.

जीवनीं । कीं त्रिविध[1]तापें पोळितां प्राणी । निवे संगीं[2] सद्वाक्यें; ॥ १२१ ॥ तयापरी अस्त्रप्रयोग । विलया गेला समूळ सांग । प्रसन्नमान वीरभृंग । झेंपावले युद्धपद्मा. ॥ १२२ ॥ भीमराजकृपेचा वर । लाहोन नरहर मोरेश्वर । श्रोतेसज्जनां पाहुणेर[3] । कथामृताचा वोगैरी. ॥ १२३ ॥

अध्याय तेहतिसावा.[4]

संजय वदे, 'महाराजा ! । धृष्टद्युम्न पातला झुंजा[5] । दुःशासनें पिटोनी भुजा । तयाप्रती थडकला. ॥ १ ॥ परस्परें सोडुनी शर । पार्षतवीर प्रतापशूर । [क्रोधावेशें चावोनी अधर] । सोडी इषु निघातें. ॥ २ ॥ क्षणामाजी अश्वसारथी । विगत केला न लगतां पातीं । कौरवगात्रें शरांच्या क्षितीं[6] । विकळ केलीं क्षणार्धें. ॥ ३ ॥ विन्मुख होवोनी द्रोणानिकटीं । पातला जेथें वीरमिठी[8] । दुर्योधन सक्रोध दृष्टी । भ्रुकुटीगांठी[9] लोटला. ॥ ४ ॥ सात्वत सात्यकी आडवा तया । होतां, कौरव क्रोधालया । पाहोनी दश बाण अर्पी तया । महारोषें निघातें. ॥ ५ ॥ शिनिप्रवीर क्रोधावर्तीं । मोकळी रोषें शरांच्या पंक्ती । पांच शत कृतांतघांती[10] । वरी विंशती विखारी. ॥ ६ ॥ यावरी आणीक दाहा । प्रेरुनी केला [11]शरीरदाहा । क्षुरप्र[12] हस्तें नाराच[12] महा- । धनु हातींचें खंडिलें. ॥ ७ ॥ दुर्योधनें अन्य कार्मुक । सज्जोनी सोडिले बाण सतिख । बुजोनी काढिला यदुनायक । रोषावर्तीं निघातें. ॥ ८ ॥ सात्यकी वीरपंचानन । बाणीं बाण निवारून । शिळाधौत शर तीक्ष्ण । रुक्म पिसारे साजिरे. ॥ ९ ॥ लघुलाघव हस्तकळा । चाप खंडूनी पाडिलें तळा । बाण भेदिले वक्षःस्थळा । वज्रप्रहारांसारिखे. ॥ १० ॥ तेणें दाटली तया [13]घूर्मी । पडिला क्षीण स्यंदनसद्मीं । वीर धांवले पराक्रमी । कर्णादिक धनुर्वाड. ॥ ११ ॥ पाहोनी शरांचा उमाळा[14] । भीम लोटला वीरमेळा । उभय च-

---

१. ताप तीन प्रकारचे आहेत:—आधिदैविक (देवतांच्या क्षोभापासून होणारा; जसा, वीज पडणें); आध्यात्मिक (मनाच्या क्षोभापासून किंवा शरीराच्या रोगापासून होणारा; जसा—खरूज, ताप) आणि आधिभौतिक (पंचमहाभूतांच्या क्षोभापासून होणारा; जसा—भूकंप, अतिवृष्टि). २. सज्जनाच्या संगतीनें व उपदेशानें. ३. पाहुणचार, आदरसत्कार. ४. वाढी. ह्या अध्यायाचें "**पंचमदिवसयुद्ध**' असें नांव आहे. ५. ह्यांत मूळांतील १८९–१९२ अध्यायांचा सारांश आला आहे. ६. युद्धास. ७. समृद्धीनें. ८. योद्धयांची भीड (दाटी). ९. भोंवयांना आठ्या घालून. १०. यमाचा सुद्धां नाश करणारे. 'कृतांतयाती' असा पाठभेद. ११. आंगाची आग. १२. बाणविशेष. १३. मूर्च्छा. १४. तडफ, धडका.

मूचा एकवळा । सागरातुल्य माजला. ॥ १२ ॥ हास्य करुनी वैकर्तन । शतावधी सोडिले बाण । भीमसेनाचें चाप छेदून । करुनी तुकडे[1] टाकिले. ॥ १३ ॥ तेणें क्रोध अद्भुत तया । रोषें गदा मोकली बाह्या । ध्वजधनुसूत विघड काया । रथांगसह छेदिले. ॥ १४ ॥ एकचक्रस्यंदनशोभा । अभीत कर्ण रणीं उभा । जाणों अर्क[2] प्रगल्भआभा । रणातळीं[3] उगवला. ॥ १५ ॥ कर्ण सोडी शरांचे पुंज । अष्टदिशा विखुरे तेज । निरीक्षोनियां धर्मराज । वीरांप्रती अनुवादे. ॥ १६ ॥ म्हणे, 'शूर हो! कासावीस । किमर्थ युद्धीं धरितां त्रास? । क्षात्र धर्म श्लाघ्य, दिवस । दैवयोगें लाधला. ॥ १७ ॥ जिंत्वा संग्राम बहुत यज्ञ । भूरिदक्षिणा[6] विपुळ धन । तृप्त कृशान द्विज ब्राह्मण । अक्षयी सुख वोळँती. ॥ १८ ॥ दैववशें मृत्यु समरीं । पावतां, भोग भोगीं अमरीं । सुरांगना आलापचारीं । रंजविती नर्तनें. ॥ १९ ॥ पंचमदिवस द्रोणयुद्धा । निश्चयीं यश पावाल सध्या । द्रोणनिधना पार्षत आद्या । विधीनें नेम नेमिला. ॥ २० ॥ वीरअर्णवा शौर्यभरतें । हर्षलहरी आनंद चित्तें । लोटुनी भीमातें जाले वेष्टिते । जेवीं समुद्र मैनाका[10]. ॥ २१ ॥ पांचाळ वीर कडकडाटी । सहसृंजय कैकयदाटी । धृष्टद्युम्न अग्रता हटी । घालिती उड्या गुरूतें. ॥ २२ ॥ दृष्टी पाहोनी कौरव वीर । लोटले अमित शूरांचे भार । युद्ध माजलें घोरांदरें[11] । शुंभनिशुंभासारिखें. ॥ २३ ॥ द्रोणाचार्य प्रदीप्तरोष । जाणों फणींद्र शेष । शरासनीं शर कर्कश । कोटींच्या कोटी मोकळी. ॥ २४ ॥ कासावीस द्रवित सेना । शवें दाटलीं निबिड रणा । निरुत्साह वीरवदना । पाहोनी बोले श्रीकृष्ण. ॥ २५ ॥ द्वारकाधीश, दारुकपाळ, । द्वारउद्धवें[12](?), बळिद्वारपाळ, । गोकुळदारा द्वारीं अचळ । प्रेमें जया लक्षिती. ॥ २६ ॥ गदाग्रज[13], गदाधर, । गदगदाट स्वेन[14] गंभीर । अंगदें रुक्म, रुक्मिणीवर, । रुक्मांबरपरिधानी. ॥ २७ ॥ करुणाघन, कृपानिधी ! कुरुपाळक, विनीतसिद्धी । कृतकार्य, अचळ बुद्धी, । बोले समज[15] पार्थातें. ॥ २८ ॥ म्हणे, "सखया! भक्तराया! । प्राणप्रिया! आवडतिया ।

---

१. 'करूनी दुखंड टाकिलें' असा अन्यपाठ. २. सूर्य. ३. रणांगणांत. ४. भय. ५. जिंकून. ६. सुवर्णदक्षिणा, विपुल दक्षिणा. ७. पावती. ८. दैववशात्. ९. गाण्याच्या निरनिराळ्या प्रकारांनीं. १०. पर्वतविशेष. इंद्र ह्याचे पंख तोडूं लागला तेव्हां हा समुद्रांत जाऊन राहिला—अशी कथा आहे. ११. अत्यंत भयंकर. १२. 'दारु उद्धव' असें पाठांतर. १३. गद या नांवाचा कृष्णास वडील भाऊ होता. १४. ध्वनि, आवाज. १५. समजावणीची गोष्ट, उपदेश.

सदा जयस्वी! विजयीबाह्या! । कल्याणच्छाया! **पां**डवा! ॥ २९ ॥
द्रोणाचार्य क्रोधभरणी । तुळितां अतुडे[1] **दं**डपाणी । कार्मुक असतां
तया पाणी । अजित सुरांअसुरांतें. ॥ ३० ॥ तेथें मानवाचा काय
केवा? । जितक्लमा तपस्वी बरवा । सर्वास्त्रभेदी, नरपार्थिवा! । विद्या कळा
सर्वही. ॥ ३१ ॥ हा आपुल्या दुःखचित्तें[2] । धनुष्य सोडील जरी हातें ।
तरीच मरण, येऱ्हवीं मृत्यें । वीरां सकळां जाण पां. ॥ ३२ ॥ यानिमित्त[3]
एक युक्ती । सादर सर्वीं धरिजे चित्तीं । चतुर्धा सेना करोनी निगुती ।
युद्धालागीं तगटिजे. ॥ ३३ ॥ गजानीका विक्रमी **भीम** । रिघोनी,
अश्वत्थामा गजोत्तम । मर्दोनी, गर्जिजे वाङ्नेम । 'अश्वत्थामा मारिला.'
॥ ३४ ॥ सकळांमुखीं हेची मात । विस्तारिजे घोषें बहुत । ऐकोनी **द्रो**ण
भ्रमितचित्त । जांकळेल[4] रणरंगीं. ॥ ३५ ॥ सत्य मिथ्या पुसतां **धर्मा** ।
हेंची अवघड वाटे आम्हां । असो; तेही संपादणी[5] नेमा । करिजेल प्रसंगें.
॥ ३६ ॥ माझे मायेचे अतर्क्यवृद्धी । तेंही कार्य पावेल सिद्धी." । ऐसें वदत
कृपानिधी । हर्षित **भीम** मानसीं. ॥ ३७ ॥ चत्वार वीर करुनी झुंजा । वीर
मिनले, महाराजा! । **पां**चाळ घालोनियां पैजा । **द्रो**णाचार्या धडकले.
॥ ३८ ॥ **सृं**जय, **पां**चाळ, **म**त्स्यसेना, । वीरनायक लोटले **द्रो**णा । शर-
धारीं वर्षाव घना- । प्राय केला सर्वत्रीं. ॥ ३९ ॥ न गणोनी त्यांच्या शरौघ-
माळा । क्रोधें प्रज्वळला अग्निज्वाळा । आकर्ण कार्मुक वाहोनी बळा । बाण-
पंक्ती सोडिल्या. ॥ ४० ॥ शरांमागें शरांचा संघ । लाविला जैसा **गं**गावोघ ।
चतुरंग सेना विव्हलांग । भयार्दित कालवे. ॥ ४१ ॥ भूषणें भूषित
भुजा सरळा । रुचिर मौळें चंद्रभाकळा[6] । खंडुनी पडती मही तळा ।
विकीर्ण[7] तनू अपार. ॥ ४२ ॥ शैलाकार गज उद्भट[8] । खंडुनी पडती मही अ-
दट । वातवेग अश्वसुभट । तुंगतुंग रिचवती. ॥ ४३ ॥ रुधिरमांसाचा कर्दम ।
रणीं दाटला निःसीम सीम । वीरां सकळां प्राप्त भ्रमें[9] । किलाकिलाट शब्दांचा.
॥ ४४ ॥ **मा**धवमासीं[10] प्रदीप्त सूर्य । तैसा प्रज्वळला **द्रो**णाचार्य । **पां**चाळरथी
वीरवर्य । वीस सहस्र मर्दिले. ॥ ४५ ॥ सहस्र[11] अर्ध **म**त्स्यरथी । वोपिले दुर्धर

---

१. यमासारखा वाटे. २. 'सुखदुःखचित्तें' असा अन्यपाठ. ३. ही ओंवी रा. **स**रदेशमुख यांच्या प्रतींत मात्र आहे. ४. कळवळेल, मोह पावेल. ५. ढोंग, बतावणी, कार्य साधण्याची युक्ति. ६. 'चंद्रमाकीळा' असें पाठांतर. ७. पसरलेली, अस्ताव्यस्त. ८. मोठे, भयंकर. ९. 'श्रम' असा पाठभेद. १०. चैत्रवैशाखांत. ११. पांचशें.

काळपंक्ती । **सृं**जय वीर प्रख्यात क्षिती । साहा सहस्र मारिले. ॥ ४६ ॥ **व**सुदाननामा राजेश्वर । महाप्रतापी जैसा सुर । शरीं खंडूनियां शिर । [1]**काळ**-धामा वोपिलें. ॥ ४७ ॥ अयुत एक मत्त द्विरद । मर्दोनियां [2]सादिया दिल्हा खेद । [3]प्रयुतसंख्या अश्व विशद । छेदोनी मही पाडिले. ॥४८॥ चतुरंग शवांच्या ठेंसा । लागती रणीं, भ्रमे वळसा । महावीर पावले त्रासा । शरांची [4]मारी न सोसे. ॥ ४९ ॥ एक **द्रोण** वीरांप्रती । भासे सहस्रावधी मूर्ती । शरमय जाहली अवघी क्षिती । रविकिरण लोपले. ॥ ५० ॥ **पा**र्षत वीर रोषवर्धन । प्रज्वळला क्रोधहुताशन । शरासनीं सज्जिले बाण । **य**मदंडासारिखे. ॥ ५१ ॥ पाठीं वीरांची निबिड मांदी । जाणों क्षया उसळला अब्धी । शरीं [5]शरांच्या लोटली वृद्धी । धरातळीं न माये. ॥ ५२ ॥ सरसावोनी धनुष्यकोटी । **द्रोणें** सोडिल्या इषूंच्या कोटी । वीर वीर भेदिले हटी । शरांची वाढी अनिवार. ॥ ५३ ॥ छिन्नगात्री सहस्रशः । वीर पडिले विगतदशा । रुधिरस्राव धरणी-कोशा । [6]संमार्जनीं मारिले. ॥ ५४ ॥ क्षतांग वीर शरमारीं । **धृष्टद्युम्न** क्रोध-लहरीं । धनु कर्षोनी आकर्ण समरीं । बाण मंत्रोनी सोडिले. ॥ ५५ ॥ **य**मदं-डासमान तीव्र वृद्धी । येवोनी भेदिले **आ**चार्यह्रदीं । क्षोभे जैसा वातें उदधी । उसळती लाटा ज्यांपरी. ॥५६॥ तंव **धृष्टद्युम्न** महाहवा । केला शरांचा [7]पुरावा । **द्रोण** प्रतापी जैसा **म**घवा । अचळ उभा रणरंगीं. ॥ ५७ ॥ सायक सोडुनी अग्निपुटी । निवारिली तयाची वृष्टी । हस्तलाघव [8]शरसुटी । चाप हातींचें खंडिलें. ॥ ५८ ॥ त्वरेमाजी करुनी त्वरा । ध्वज, सारथिशिर, अंबरा । उड-वोनी, वाजी करुनी पुरा । मेदिनीवरी पाडिले. ॥ ५९ ॥ क्रोधवर्धन **धृष्टद्युम्न** । अन्य रथीं वळंघोनी जाण । शरासनीं शर दारुण । मेघातुल्य वर्षतू. ॥ ६० ॥ परस्परें सायकधाडी । खंडिती भेदिती [9]काळाप्रौढी । जाणों घनाची [10]वांकुडी । वर्षाकाळीं लागली. ॥ ६१ ॥ थकित वीर पाहती चोज । क्रोधें प्रदीप्त **भार**-द्वाज । शर सोडुनी तेजःपुंज । चाप हातींचें खंडिलें. ॥ ६२ ॥ **पा**र्षत वीर क्रोधभरें । गदा झोंकी महानिकरें । **द्रोणें** [11]तोडुनियां शरें । दुखंड केली येतांची. ॥ ६३ ॥ अत्यंत रोषें ज्वलित शक्ती । प्रेरिली बळें **द्रोणा**प्रती ।

---

१. 'काळयामा वोपिला' असा अन्य पाठ. २. स्वारांस, वर बसणाऱ्यास. 'अश्वारोहास्तु सादिनः' इत्यमरः. ३. शंभर हजार. ४. मारा. ५. शरांच्या शरीं=बाणरूपी पाण्यानें. शर=पाणी. 'शरांची लाटावृद्धी' असा अन्य पाठ. ६. सडा टाकण्याकरितां. 'संमार्जना मार्जिले' असा पाठभेद. ७. पुरवठा, पूर, विपुलता. ८. शरसंधानाचे योगानें. ९. हस्तकौशल्याच्या अभिमानानें, 'काळ-प्रौढी' असा पाठभेद. १०. पावसाची झड. ११. 'सोडुनियां' असा अन्य पाठ.

गुरु सावध अभीत चित्तीं । तृणप्राय खंडिली. ॥ ६४ ॥ शक्तिच्छेद देखोनी दृष्टी । रोषें खड्ग कवळिलें मुष्टी । शतचंद्र ढाल घनपुटी । बाहुमेळीं सूदली. ॥ ६५ ॥ उडी टाकोनियां त्राणें । धांविला जैसा आमिषा श्येन । थरकसरक मंडळें घनें । विचित्राकार दावितू. ॥ ६६ ॥ भारद्वाज जे जे शर । सोडी, ते ते वरच्या वर । खंडुनी टाकी राजेश्वर । जेवीं गरुड सर्पातें. ॥ ६७ ॥ वीर-मंडळी पूजिती तया । म्हणती, 'लाघव हस्तक्रिया । निश्चयें वधील द्रोणाचार्या। रंग आजी दिसताहे.' ॥ ६८ ॥ ऐसें वीर वदतां शब्दीं । येरू पातला स्यंदन-संधी । सेनाश्व वधोनियां आधीं । घाव उचली द्रोणातें. ॥ ६९ ॥ धनुर्धर-वर्य द्रोणाचार्य । शर सोडिला जैसा सूर्य । छेदोनी खड्ग, भेदोनी हृदय, । दाहा पांड[1] सारिला. ॥ ७० ॥ पाहोनी वीर लोटले पुढें । पार्षत जाहला रथारूढ । सकळिकीं शरांचीं जुंबाडें । मोकळिलीं एकदा. ॥ ७१ ॥ गुरुवर्य प्रतापनिधी । वीरवीर खिळिले युद्धीं । विकळ देखोनी वीरमांदी । शिनिप्रवीर पावला. ॥ ७२ ॥ वर्षोनियां बाणसमूहो । शरीं छादिला[2] गुरुदेहो । रोषें प्रदीप्त कृपीनाहो[3] । शरांच्या कोटी मोकळी. ॥ ७३ ॥ सरसराटें उसळती शर । प्रौढीं[4] खंडिती वरच्या वर । युद्ध माजलें घोरांदर । शंभुशंबरासारिखें. ॥ ७४ ॥ देखोनी लोटिला युधिष्ठिर । माद्रीनंदन वृकोदर । वेष्टोनियां शिनिप्रवीर । सेनामेळीं[5] थोकले. ॥ ७५ ॥ पांडववीर लोटतां समरीं । पातल्या कौरवांच्या हारी । माजली शरांची महामारी । महाधुमाळी क्षयातें. ॥ ७६ ॥ परस्परां ताडिती शस्त्रीं । एकमेकां भेदिती गात्रीं । छिन्न होवोनी पडती धात्रीं। धांवती रोषें तैसेची. ॥ ७७ ॥ धृष्टद्युम्न पांचाळ पाठी । रोषें मिनला द्रोणें-हटीं । वर्षती शरांच्या तीव्र थाटी । प्रावृट्वृष्टीसारिख्या[6]. ॥ ७८ ॥ 'घ्या' 'घ्या' शब्द फोडिती मुखें । वर्षती रागें शर तिखे । सरसराटी इषूंचीं विखें । व्योममंडळा व्यापिती. ॥ ७९ ॥ उकावोनी क्षणक्षणा । पार्षत धांवे द्रोण-निधना । जैसा सिंह मत्त वारणा । लक्षोनी रोषें उकावे. ॥ ८० ॥ विचित्र शर तीव्र धारा । वर्षाव करी रोषें निकरा । वीर पेटले महामारा । चहूंकडूनी सारिखे. ॥ ८१ ॥ तया बाणांचिया जाळीं । द्रोणाचार्य लोपला तळीं । जैसा सूर्य अभ्रमंडळीं । नाँहींच होयँ[7] ज्यापरी. ॥ ८२ ॥ वीरवार्ढ[8] देखोनियां नयनीं । द्रोण प्रज्वळिला जैसा वन्ही । कीं तो क्षयांतीं शूळपाणी । तेवीं

१. पांड=विध्याचा विसावा हिसा. २. 'छेदिलें' असें पाठांतर. ३. कृपीपति, द्रोणाचार्य. ४. पराक्रमानें. ५. द्रोणाचार्यांबरोबर युद्ध करण्यासाठीं. ६. पर्जन्यवृष्टीसारख्या. ७. दिसेनासा होतो. ८. (पांडवपक्षीय) वीरांचा पराक्रम.

क्रोधें पेटला. ॥ ८३ ॥ सरसावोनी शरासन । अस्त्रप्रयोग केला घन । निवा-
रूनी शरांचा घन[1] । बाण वितंडे[2] सोडिले. ॥ ८४ ॥ शरांमागें शरांच्या थाटी[3]।
अस्त्रप्रयोग जपे होटीं[4] । प्रळयविजा थडकती सृष्टी । तेवीं बाण सरकती.
॥ ८५ ॥ हस्ती, वाजी, पदातिवीर । खंडविखंड पाडिले सैर । छत्रछायी **पां**-
चाळशूर । वीस सहस्र पाडिले. ॥ ८६ ॥ **ऐ**रावतीसीं[5] करिती स्पर्धा । ऐसे
गजोत्तम पावोनी खेदा । सहस्रशः होवोनी चेंदा । महीवरी पडियेले. ॥ ८७ ॥
चित्रलेपासारिख्या[6] काया । जैवें[7] वायु लोटती पाया । ऐसे तुरंगम, महाराया ! ।
छिन्न असंख्य पडियेले ॥ ८८ ॥ विचित्र रथ विमानसरी । ध्वजा पताका
तंगटांबरी[8] । सहस्रावधी छिन्न समरीं । लोळती रणीं इतस्तता. ॥ ८९ ॥
चाप, कवच, छत्र, चामर, । विचित्र रत्न, अलंकार, । शस्त्रें, मुकुट, कुंडलें,
हार । धुळीमाजी लोळती. ॥ ९० ॥ हलकल्लोळ सेनामेळीं । **द्रो**ण प्रज्वळला
जैसा हेळी । मुखावलोकनें धैर्यहोळी । महावीरांची होतसे. ॥ ९१ ॥ मंडळाकार
गरगरा। धनु फिरे जैसा भोंवरा। शर उसळती भरभरा । दारूयंत्रासारिखे[9].॥९२॥
जैसा केळवला[10] बिजवर[11] । दृष्टी नाणी आन विचार[12] । तेवीं **द्रो**ण उदित थोर ।
पर्णावया मुक्तीतें. ॥ ९३ ॥ दुधार[13] शरांचिये मारीं । कोण्हा धीरें[14] न धरवे
समरीं । [व्याकुळ भ्रमती क्षत शरीरीं] । विगत पुरुषार्थी रणरंगीं. ॥ ९४ ॥
ऐसा आकांत सेनामेळीं । देखोनी, **भीम** अतुर्बळी[15] । प्रवेशोनी गजाचे दळीं ।
करी खंदळी[16] तयांची. ॥ ९५ ॥ शतावधी **अं**तकधामा । वोपुनी, गज **अश्व**-
त्थामा । मारुनियां, नृपसत्तमा ! । अट्टाहास्य[17] फोडिला. ॥ ९६ ॥ '**अश्व**त्थामा
मर्दिला पाहीं' । सेनेमाजी एक अवाही[18] । वीर नाचती पिटोनी दोनी बाहीं । चहूंकडे
सर्वेही. ॥ ९७ ॥ **भी**मसेन **ब्रा**ह्मणोत्तमा[19] । जाणवी, 'मारिला **अश्व**त्थामा ।
किमर्थ प्रवर्तसी संग्रामा ? । दृष्टी मुखा[20] विलोकीं. ॥ ९८ ॥ आहा ! वीर प्रतापी
द्रौणी । धनुर्धरां मुगुटमणी । विचित्र युद्धाची करणी । आश्चर्याकार भूपांतें.
॥ ९९ ॥ येथें न्यून काय तया ? । जाता जाहला स्वर्गालया । वृद्धपणीं **गुरु**-

१. पर्जन्य, वर्षाव. २. भयंकर. ३. ओळी, रांगा. ४. ओंठानें (तोंडानें). ५. इंद्राच्या हत्तीबरोबर. ६. चित्रासारख्या फार सुंदर. ७. वेगांत. ८. वर्खानें मढविलेल्या. ९. सुरनळ्यासारखे. १०. ज्याचें केळवण (गडगनेर) झाला आहे असा. ११. ज्याचें दुसरें लग्न व्हावयाचें असा नवरदेव. १२. लग्नाखेरीज दुसरा विचार. १३. 'दुधर' असा अन्य पाठ. १४. 'कोण्ही धीर न धरे समरीं' असा पाठभेद १५. अत्यंत बलवान्. १६. धुमाकूळ. १७. सिंहगर्जना. १८. अवाही=अवाई, बातमी, वर्तमान. 'नवाही' असा पाठभेद. १९. द्रोणाचार्यांस. २०. डोळ्यांनीं एकदां अश्वत्थाम्याचें मुख तरी पाहून घे–हा भावार्थ.

वर्या । शोकार्णवीं सुदलें.[1]' ॥ १०० ॥ ऐकतक्षणीं विकळ चित्तीं । स्तब्ध, न लवी पातिया पातीं । सभोंवतीं लक्षितां क्षिती । 'मारिला' हीची गर्जना. ॥ १०१ ॥ भ्रमावर्तीं पडिली बुद्धी । चिरंजीवें[2] हें न स्मरे हृदीं । श्रीकृष्ण-मायेचिये महोदधीं[3] । निमग्न जाहला सशंक[4]. ॥ १०२ ॥ विचार विवरी अंत-र्यामीं । 'चंद्र सूर्य अक्षई व्योमीं । तंववर **द्रौ**णि पराक्रमी । असिजे क्षेमें[5] निश्चयें. ॥ १०३ ॥ वीर वदती ऐसिया पुंजा[6] । जावोनी पुसिजे **धर्म**राजा' । ऐसें कल्पोनी; माहाराजा! । **पां**डवाप्रती पातला. ॥ १०४ ॥ वीर मिनले **धर्मा**-निकटीं । सहित **अर्जुन** **ज**गजेठी[7] । **ध**र्मासी वदती वीर गोष्टी । उचितानुचित[8] वर्तिजे. ॥ १०५ ॥ जेवीं इंद्रजितजीवनीं[9] नेम । **सु**लोचनेसी करितां **रा**म । वानरवाहिनीं[10] भयविभ्रमें[11] । **ह**नुमान **रा**घवा निषेधी. ॥ १०६ ॥ तेवीं **भी**म सांडुनी **ध**र्मभिडे । 'सत्य ठेविजे एकीकडे । जेणें समस्तां क्षेम जोडे । तेची धर्मीं प्रतिष्ठा. ॥ १०७ ॥ असत्य वदोनी पुढिलांचें हित । करितां, जोडे सर्व सुकृतें[12] । सत्यें घडे पराचा घात । याहुनी पाप असेना.' ॥ १०८ ॥ मृदुत्व बोले **र**मारंग । 'सत्य असत्य विविध मार्ग । भविष्यानुरूप[13] वंदिजे[14] सांग । प्रसंगोचित, धर्मज्ञा! ॥ १०९ ॥ शास्त्रमथितार्थ ठाउका तुज । सांगणें हेंची रहस्यगुज । विश्वहिताचें करिजे काज । ब्रह्मवाणी[15] ऐसीची.' ॥ ११० ॥ संकटावर्तीं **ध**र्मराज । जवळी पातला **भार**द्वाज । येरें वंदोनी पादांबुज । म्हणे, 'आज्ञा निरोपा.' ॥ १११ ॥ **गु**रुवर्य वदे, 'राजसत्तमा! । मारिला म्हणती **अ**श्वत्थामा । सत्य मिथ्या हे वाङ्नेमा । प्रकट करीं सत्यत्वें.' ॥ ११२ ॥ कासावीस **ध**र्म, पार्थिवा! । म्हणे, 'नरो वा कुंजरो[16] वा । संशयावर्तीं असे गोवां[17] ।

---

१. घातलें, टाकिलें. २. अश्वत्थामा चिरंजीव (मृत्युरहित) आहे ही गोष्ट. अश्वत्थामा, बळी, व्यास, हनुमान, बिभीषण, कृप आणि परशुराम हे सातजण चिरंजीव आहेत, अशी समजूत आहे. ३. महासागरांत. 'मोहोदधीं' असा अन्य पाठ. ४. संशययुक्त होत्साता. ५. खात्री-पूर्वक तो सुरक्षित असलाच पाहिजे—असा भाव. ६. जमावानें, एक जुटीनें. ७. जग-ज्ज्येष्ठ, जगांत श्रेष्ठ. ८. योग्यायोग्य. ९. इंद्रजितास पुन्हा सजीव करून, त्याची पतिव्रता स्त्री जी सुलोचना, तिच्या स्वाधीन त्यास करावें, अशी रामाची फार इच्छा होती, परंतु हनुमानादि सर्व योद्ध्यांनीं रामाचा फार निषेध केल्यामुळें रामानें इंद्रजितास जीवंत केलें नाहीं, अशी कथा आहे. १०. वानरसैन्यांत. ११. विभ्रम=भ्रांति. १२. मूळांत असें आहे:—'अनृतं जीवितस्यार्थे वदन्न स्पृश्यतेऽनृतैः ॥ ४८ ॥ कामिनीषु विवाहेषु गवां भक्ते तथैव च । ब्राह्मणाभ्युपपत्तौ च अनृते नास्ति पातकम् ॥ ४९ ॥' (अध्याय १९१) १३. पुढें प्राप्त होणाऱ्या परिणामानुरूप. १४. मान्य करावें. 'वदिजे' असें [illegible]

लोक[1]वदंती तंव ऐसी.' ॥ ११३ ॥ संधियुक्त श्रीव्यासवाणी । नरो वा कुंजर
रूढ जनीं । अश्वत्थामा गज, म्हणतां गुणी । वाद्यघोष पिटिला. ॥ ११४ ॥
द्रोणाचार्य सं[2]शयावर्तीं । पुत्रमोहें जा[3]कळे चित्तीं । विगतमानसें चमूप्रती ।
येता जाहला स्वदुःखें. ॥ ११५ ॥ संतप्तमान गात्र स्थानीं । क्रोधें प्रज्वळला
रुद्रभरणी । म्हणे 'सेनासह काळसदनीं । धृष्टद्युम्ना वोपणें.' ॥ ११६ ॥ रोषें
सरसावोनी धनू । शर सज्जिले शितीं घनू । पुत्रशोकें तळमळी, मी[4]नू । शुष्क-
जीवनीं ज्यापरी. ॥ ११७ ॥ उल्कापात डळमळी धरा । खचोनी तळा पडती
तारा । रुधिरवोघ उतरती धारा । झडझडा वायु आफाट. ॥ ११८ ॥ मोहा-
वर्तीं उभय सेना । ऋषी पातले तया स्थाना । जाणों शशीच्या प्रतिमा घना ।
देदीप्यमान सर्वही. ॥ ११९ ॥ **वि**श्वामित्र, **जा**मदग्नी, । **भा**रद्वाज, **गौ**तम-
मुनी, । **व**सिष्ठ, **क**श्यप, **अ**त्रि गुणी, । **श**मीक, **ग**र्ग, **वा**र्ष्णायन; ॥ १२० ॥
वालखिल्य तपोराशी, । **म**रीची, **भृ**गु, **अं**गिराऋषी, । ययांवेगळे ऋषी ता-
पसी । **द्रो**णानिकटीं मिनले. ॥ १२१ ॥ ऋषिवर्य पाहोनी नयनीं । **भा**रद्वाजें
केलें नमन । येरू वदती, 'वंद्य जाण । तूं आमुचा, बाळका ! ॥ १२२ ॥
ब्रह्मवर्चस्व, तपोनुष्ठानी, । जितेंद्रिय, सादृश्य गुणी, । वेदवेदांगपारंग, मुनी, ।
धनुर्वेद सांगता. ॥ १२३ ॥ शुचिष्मंत, सदाचरण, । भविष्य ज्ञान, विगत
मान, । सर्वांगुणीं गुणवर्धन । भ्रांतिभ्रमण केवीं पां? ॥ १२४ ॥ जेवीं
मोहावर्तीं **स**रस्वती । तमीं चों[5]चरे देव गभस्ती । वाचा कुंठित **वा**च-
स्पती । जळीं मीन बुडिजे; ॥ १२५ ॥ **अ**श्विनीदेवा[6] मात्रावि-
सँरू[7] । अज्ञानपात्र **स**र्वेश्वरू । भारें घाबिरा धराधरू । हें अघटित
ऐकिजे; ॥ १२६ ॥ तयापरी भ्रमणावर्तीं । केवीं बाळका! पडसी
आर्तीं? । सरली आयुष्याची शक्ती । **ब्र**ह्मप्राप्ती साधिजे. ॥ १२७ ॥ मृत्यु-
लोकीं कोणी अ[8]मरकाया? । अमरा काळगतीची छाया । कळतां, त्यागोनी स्वकर्म-
चर्या । क्षत्रधर्मीं आर्तता? ॥ १२८ ॥ 'अहिं[9]सा धर्म कल्याणप्राप्ती' । ऐशा
बोलती **वे**दश्रुती । ते सांडुनी अधर्मपंथीं । पाय न घालीं, पवित्रा! ॥ १२९ ॥
बोलती वेदश्रुती । ते सांडुनी अधर्मपंथीं ।
विरंचिवाक्यें वसुंधरा । नेमें नेमिली **यु**धिष्ठिरा । अग्निदत्त **पा**र्षतवीरा ।

१. बातमी. 'लोक वदति तव ऐसें' असा अन्य पाठ. २. 'संशयवृत्ती' असा अन्य पाठ. ३. कळवळे, व्याकुळ होई. ४. मीन, मासा. ५. चांचपडत चाले, अडखळे. ६. हे देवांचे वैद्य. ७. औषधाची आठवण विसरणें. ८. अविनाशी, चिरंजीव. ९. दुसऱ्यास पीडा न देणें. 'अहिंसा सर्वभूतेषु धर्मस्य विस्तरं विदुः' असें मूळांत आहे (अध्याय १९३।३८).

निधना तुझ्या वोपिलें. ॥ १३० ॥ तें टाळितां टळे केवीं ? । विश्वाधिपत्य[1] तुझ्या ठांई । सांडुनी संशयाची गोवी । ब्रह्मीं धरीं भावना. ॥ १३१ ॥ पुत्रनिधनें व्याकुळ चित्तीं । पुसों गेलासी धर्माप्रती । भविष्य जाणोनी यदुपती । प्रेरी धर्मा अनृतू. ॥ १३२ ॥ त्याचा संशय न धरीं मनीं । अक्षई[2] द्रौणि जंववरी धरणी । युद्ध सांडुनी रणांगणीं । ब्रह्मलोक वसविजे. ॥ १३३ ॥ धर्म जेथें वसे हरी । जय[3] तेथें कैंची हारी[4] ? । जाणोनी; सांडीं क्रोधलहरी । अवध्य पांडव सर्वथा.' ॥ १३४ ॥ ऐसें वदोनी अंतर्धान । पावतां, पातला भीमसेन । म्हणे, 'गुरुवर्या ! निष्ठुर मन । न करीं आम्हां बाळकां. ॥ १३५ ॥ अहिंसा धर्म ब्राह्मणोत्तमा । नेमोनी गेला देव ब्रह्मा । ते सांडुनी स्वधर्ममहिमा । क्षात्रधर्मा सेविलें. ॥ १३६ ॥ म्लेंच्छजनाची रोंहटी[5] । सेना मर्दिसी हटोहटीं । अधर्मकर्में कल्याणतुटी[6] । योग्य नव्हे; गुरुवर्या ! ॥ १३७ ॥ सत्य सुकृत अक्षई प्राप्ती । अधर्माची विगतगती । जाणतां, भ्रष्ट न करीं मती । शाश्वतपदीं स्थिरावें.[7]' ॥ १३८ ॥ आधींच कोमल ब्रह्महृदय[8] । त्यावरी ऋषीचा अनुग्रह । भीमवचनें सदयतावर्य । पश्चात्ताप पावला. ॥ १३९ ॥ जैसा नारद समुद्रमथनीं । देवदैत्य झगटतां रणीं । प्रबोधोनी[9] बळी वचनीं । माघारिला ज्यापरी. ॥ १४० ॥ तयापरी भारद्वाज । पर्णोनियां शांतिभाज । विसर्जोनी शौर्यतेज । निष्काम ब्रह्मीं भावना. ॥ १४१ ॥ पाहत असतां उभय सेना । बोलता जाला दुर्योधना । सहित कृपा वीर कर्णा । सर्वां देखतां उत्साहें. ॥ १४२ ॥ 'तुजनिमित्त संग्राम हव । अस्त्रप्रयोग केले सर्व । परी कल्याणरूप पांडव । श्रीकृष्णरूप अक्षई. ॥ १४३ ॥ आतां जातसें मोक्षपदा । आठव चित्तीं असों द्या सदा.' । ऐसें वदोनी कल्याणकंदा । रथावरुनी उतरला. ॥ १४४ ॥ विसर्जुनी धनुष्यबाण । पूर्वाभिमुख पद्मासन । प्राणायाम निष्काम मन । ऊर्ध्ववायु आकर्षी. ॥ १४५ ॥ 'ॐमित्येकाक्षरं ब्रह्म' । व्याहृति[10] इंद्रियोत्तम । देवाधिदेव पुरुषोत्तम । स्मरे अक्षर प्रभूतें. ॥ १४६ ॥ एकाग्र निश्चळ मन । स्वस्वरूपीं अनुसंधान । तदाकार भावना पूर्ण । चित्त चैतन्यनिमग्न. ॥ १४७ ॥ सभोंवती वीरमांदी । समक्ष श्रीकृष्ण कृपानिधी । अपार

१. सर्व विश्व तुझ्यांतच आहे, तूं विश्वस्वामी म्ह० विश्वस्वरूपी आहेस. २. चिरंजीव. ३. विजय (पक्षीं) अर्जुन. ४. पराजय. ५. वागणूक, रीत. ६. अकल्याण, हिताची तूट (वाण, कमतरता). ७. आपण स्थिर व्हावें, मोक्षपद प्राप्त करून घ्यावें. ८. ब्राह्मणाचें (द्रोणाचें) अंतःकरण. ९. उपदेश करून. (मुक्तेश्वरकृत आदिपर्व अ० ४ पहा). १०. उच्चार, वाग्व्यापार.

पार नेणवे **वि**धी। **वेदशे**षादि वर्णितां. ॥ १४८ ॥ अलिकुळकुं[1]तळकुजापती ।
कुं[2]तळपाळ विनीत भक्ती, । **श**कुंतळावंशजाप्रति प्रीती । पति **श्री**पती
विश्वाचा. ॥ १४९ ॥ सुराधीश, सुरतरुपाणी, । सुराअसुरा अर्पितां दानीं ।
भूसुरमानवर्धक जनीं । साहोनी लक्षी पदातें. ॥ १५० ॥ **मा**ळी**सु**माळीहंता,
घननीळ, । **मा**[3]लवमर्दक, **वै**[4]कुंठपाळ, । **मा**[5]तुळमारक, श्री**गो**पाळ । **ह**रि **ह**र
हरी तो. ॥ १५१ ॥ तो पुढें उभा समक्ष **वि**ष्णू । भक्तपाळ, कृपाळ,
सहिष्णू । **ध**र्मराज, **भी**मसेन, **जि**ष्णू, । **मा**द्रीसुतादि भूपती. ॥ १५२ ॥
उभी सेनेची एक मिठी । योगयुक्त **द्रो**णा लक्षिती दृष्टी । विस्मयानंदें हर्षित
पोटीं । स्तवनीं स्तविती **गु**रूतें. ॥ १५३ ॥ तंव अकस्मात एकाएकीं ।
पार्षतें खड्ग वोढोनी तवकीं । घाव घातला मस्तकीं । कंठनाळीं सरोषें.
॥ १५४ ॥ 'आहा!' शब्द किलकिलाट । सेनेमाजी मांजला स्पष्ट । 'धिक्
पुरुषार्थ! जीवित्व श्रेष्ठ! । धन्य जगीं श्लाघ्यता!'॥१५५॥ विगतमानसे उभय-
चमू । **धृ**ष्टद्युम्ना हर्षविभ्रमू । **द्रो**णें व[6]रुनी स्वर्गधामू । नक्षत्रगणीं मिनला.
॥ १५६ ॥ कथा बोलती ग्रं[7]थांतरीं । **अ**श्वत्थामा मारिला समरीं । ऐकोनी
द्रोण क्रोधलहरी । पुसों गेला **य**मातें. ॥ १५७ ॥ सरोष बोले **ध**र्मराजा ।
'चिरंजीव तनय माझा । केवीं आणिला अधर्मपैजा? । धर्मवर्तिया ! धार्मिका!'
॥ १५८ ॥ येरू वदे, '**वि**धीची वाणी । माझेनी अन्यथा होय जनीं? । **अ**श्व-
त्थामा गजराज गुणी । दूतीं माझ्या आणिला.' ॥ १५९ ॥ माघारा परततां
द्रोणाचार्या । **पा**र्षतें विखंड केली काया । **का**शिराजाच्या प्र[8]गटोनी देहा ।
युद्ध केलें सत्राणें. ॥ १६० ॥ परी मूळ**भा**रतीं कथा । नाहीं, न म्हणे लोक-
वार्ता. । असो, **पा**र्षतें क्रोधावस्था । शिर **कौ**रवा वोपिलें. ॥ १६१ ॥ तेणें
भयभीत वीर सर्व । दुःखावतीं बहु **कौ**रव । हर्षमान वीर विभव । **धृ**ष्टद्युम्ना
प्रशंसी. ॥ १६२ ॥ ययापरी **द्रो**णवीर । वरिता जाहला मुक्तीचें घ[9]र ।

१. भ्रमरांच्या समुदायाप्रमाणें काळेभोर केश आहेत जिचे अशा भूमिकन्येचा (सीतेच्या)
पति. कृष्ण व राम हे विष्णूचे व रुक्मिणी व सीता हे लक्ष्मीचे अवतार होत, हें प्रसिद्धच आहे.
२. कुंतलदेशाधिपति. ३. 'मल्लमर्दक' असें पाठांतर. ४. कंसहंता. ५. 'मातला पुष्ट' असें
पाठांतर. ६. स्वीकार करून. ७. अन्य ग्रंथांत. ह्या ओवीवरून व अशाच आणखी उल्लेखांवरून **न**र-
हरी हा मोठा ग्रंथपाठक होता असें वाटतें. नुसतें व्यासकृत 'महाभारत' वाचून त्याची तृप्ति होत
नव्हती. तो आणखी ग्रंथ नीटपणें वाचून मग ग्रंथरचना करीत असे, असें दिसतें. ८. येथें 'झग-
टोनी' असा पाठ असावा, असें वाटतें. ९. येथें मूळांतील 'द्रोणवधपर्व' संपून 'नारायणास्त्रमोक्षपर्व'
नामक उपपर्वास आरंभ होतो.

पुढें **द्रौ**णीचा प्रलाप घोर । श्रोते सज्जनीं ऐकिजे. ॥ १६३ ॥ श्रीगुरु**भी**म-राजप्रसादें । **न**रहर **मो**रेश्वर आनंदें । **भा**रतकथा **प्रा**कृतप्रबंधें । संतचरणीं निरोपी[1] ॥ १६४ ॥

अध्याय[2] चौतिसावा.

संजय वदे, '**प्र**ज्ञाचक्षू! । **द्रो**ण **कौ**रवां छायावृक्षू । संग्रामवाता जाला भक्षू । सेनातृण डळमळी. ॥१॥ **दु**र्योधनजीवित्वआशा । वश्य जाली **का**ळ-पुरुषा । विगतमानसें[3] दशदिशा । धांडोळीतें[4] स्वदुःखें. ॥ २ ॥ अश्रुपूर्ण गळित-नयन । वदनचंद्रमा म्लानता पूर्ण । कायांबरीं[5] तमाचें ठाणें । विकळ गात्रीं दीनता. ॥ ३ ॥ कल्पांत काळ भावीत मनीं । मही बुडाली मानी जीवनीं । विश्वासहित **कौ**रवधुणी । जाली म्हणे निश्चयें. ॥ ४ ॥ शफरी[6]प्राय तळमळी जळीं । शुष्क प्रवाळ[7]अधरवेली । कंठ दाटला शोकानळीं । जिव्हे बेबळी[8] निःशब्दें. ॥ ५ ॥ विकळमान[9] समस्त सेना । भयें पीडित कालवे रणा । जैसी नौका भंगितां जीवनां[10] । तेवीं आक्रांत सर्वांतें. ॥ ६ ॥ कीं राजदुहिता भूपकांता । कांत[11]अंत **अं**तकें[12] करितां । शोकावर्ती जनाची अवस्था । तेवीं वाहिनी सचिंत. ॥ ७ ॥ किलकिलाट घोर शब्द । कालवे चमू इतस्तता वि-शद । देखोनी वीरांचे लोटले वृंदें[13] । चहूंकडुनी सुसाटें. ॥ ८ ॥ **म**द्रराज **मा**-लवाधिप । सर्वे वीर प्रतापी भूप । पातला जेथ **गु**रुवर्यदीप । मावळला जे ठाईं. ॥ ९ ॥ **सं**शप्तक शेष[14] शूर । सह **सु**शर्मा राजेश्वर । समागमें वीर गं-भीर । मिनले मिठीं वीरांच्या. ॥ १० ॥ **वृ**षसेन **क**र्णनंदन । अयुत रथी प्रतापवान । तीन सहस्र नाग[15] प्रभिन्न । अश्वसादी[16] समवेत. ॥ ११ ॥ येवोनी मिनला सेनामेळीं । जेथें **द्रो**ण पडला तळीं । **सौ**बळ **श**कुनी वीरमंडळी । सुमार[17] पातला. ॥ १२ ॥ वीर **कृ**तवर्मा **भो**जराज। संगें वीरांचे अमित पुंज[18] । पावला जेथें **भा**रद्वाज । **का**ळ[19]मंचकीं पहुडला[20]. ॥ १३ ॥ **द्रो**णतनय प्रतापी

---

१. कथन करी. ह्या अध्यायाचें **'द्रोणाचार्यनिधन'** असें नांव आहे. २. ह्या अध्यायांत मूळांतील १९३–१९९ अध्यायांचा सारांश आला आहे. ३. उदासीन होऊन. ४. धुंडाळीत, भटकत. ५. शरीररूपी आकाशांत. ६. मासोळीप्रमाणें. ७. पोंवळ्यासारखे (रक्तवर्ण) अधर (ओंठ) ह्याच वेली(लता). ८. बोबडी, ढिलेपणा, मांद्य. ९. 'विकळ मानसें सकळ सेना' असा अन्य पाठ. १०. पाण्यांत. ११. भ्रताराचा अंत(मरण). १२. यम. १३. समुदाय. १४. युद्धांत मरून जे बाकी राहिले ते. १५. हत्ती. १६. सादी=घोड्यावर बसणारा. १७. ज्याचा मारा कठिण आहे असा. १८. समुदाय. १९. मरणरूपी पलंगावर. २०. निजला.

शि[1]खंडीसी समरांगणीं । इडे[2]पाडे भिडती. ॥ १४ ॥
द्रौणी । वीरवर्य मुगुटमणी । वीर धांवतां देखे नयनीं । पातला जेथें वीर
तुंबळ शब्द ऐकोनी कर्णीं । वीर धांवतां देखे नयनीं । पातला जेथें वीर
[3]अयनीं । महा दाटी सेनेची. ॥ १५ ॥ कर्ण, कृप, दुर्योधन, । उभे नृपती
म्लानवदन । निरुत्साह शोभाविहीन । दग्ध विपिन ज्यापरी; ॥ १६ ॥
दिव्य प्रमदा लावण्[4]यपेटी । कुंकुमगळसरी नसतां कंठीं । कीं रत्न[5]वापिका
गोमटी । अंबुजअंबुविरहि[6]त; ॥ १७ ॥ शून्य [7]ढवळार [8]कुसरी ।
वैधव्य शोभनोप[10]चारीं । कांतेविरहित [9]घरंबारी । शोभ[11]ाहीन ज्यापरी; ॥ १८ ॥
तयापरी विगतसेना । निरुत्साह अर्दित रणा । देखोनी द्रौणीच्या अं-
तःकरणा । शोकवायु फुफाटे. ॥ १९ ॥ दुश्चित गात्र, शुष्क मुख ।
क्षणक्षणा उद्भवे शोक । कळ कौ[12]ळजीं मारी झळक । विक[13]ळ वृत्ती म-
नाच्या. ॥ २० ॥ क्लेशविमू[14]ढता चित्तीं । येवोनी मिनला सेनेप्रती ।
जनकशव नेत्रपातीं । बीभत्सता देखिलें. ॥ २१ ॥ जेवीं दक्षाचा यज्ञाग्नी ।
वीरभद्र भंगितां गुणी । विरूपता पाहे हवनीं । तेवीं गुरूतें देखिलें. ॥ २२ ॥
चित्तीं धडके शोकक्रुशान । [15]ओहळोनी गेलें मुखउद्यान । मनमयूर भ्रमित
पूर्ण । ढाळी अंबु अंब[16]कीं. ॥ २३ ॥ सद्गदित कंठीं मोकळी धाय । 'कोणें
ग्रासिला प्रतापसूर्य ? । शौर्यसमुद्र शोषिला वर्य । हें अघटित मानसें.' ॥ २४ ॥
धैर्यें बळें आकळोनी मन । पुसे, 'कैसें जाहलें वर्तमान ?' । सत्वहीन नुचले
मौ[17]न । मान्य वीरां सर्वांही. ॥ २५ ॥ गहिंवरे कंठ कृपाचार्या । बोलता जाहला
द्रोणतनया । म्हणे, 'बापा! बाळका! सखया! । काय गोडी ऐकितां ?
॥ २६ ॥ पिचु[18]मंद प्राशिल्या समाधान । माधुर्यता पावे वदन ? । कीं द[19]ग्धपटें
निवोनी नयन । शांत होती; कुमारा ! ॥ २७ ॥ तयापरी द्रोणकथन । ऐकतां
संतापहुताशन । वर्धोनी अधिकाधिक जाण । सदाचरण विध्वंसे. ॥ २८ ॥

---

१. 'धृष्टद्युम्नासीं' असा पाठ असावयास पाहिजे. २. ईर्ष्येनें. ३. मार्गांत. ४. सौंदर्यमंजूषा.
५. रत्नखचित सरोवर. ६. कमळें व पाणी यांखेरीज. ७. धवलागार, चुनेगची घर. हा
शब्द ज्ञानेश्वरींत आढळतो. ८. उत्तम कौशल्याचें. ९. न्हाणवलीच्या उत्सवांत किंवा ओट-
भरण्यांत. १०. गृहस्थाश्रमी. ११. 'शोभा नाहीं' असें पाठांतर. १२. काळजामध्यें दुःखा-
तिशयामुळें झटके येऊं लागले—हा इत्यर्थ. झळक=झटका, तिडीक. १३. उद्विग्न, शोकाकुल.
१४. 'क्लेशें विमूढता' असा अन्य पाठ. १५. पोळून, भाजून. १६. डोळ्यांतून. अंबु=पाणी
(अश्रु). १७. हा अश्वत्थाम्याचा प्रश्न ऐकून मोठमोठे मान्य वीरही लाजून वर मान करीत
ना.—हा भाव. १८. कडू लिंब. १९. जळत्या वस्त्रानें.

तथापि तुझिया आग्रहें । सांगतों, दाटलें असे हृदय । **पां**डवीं धर्माची सोडिली सोय । कळी[1] प्राप्त आतांची. ॥ २९ ॥ **द्रो**णाचार्य समरांगणीं । प्रज्वळला जैसा सहस्रकिरणी[2] । बाणीं निवटिल्या सैन्यश्रेणी । **पां**चाळ **सृं**जय अमित. ॥ ३० ॥ गजाश्व रथी पदाती । मर्दोनी शवें भरिली क्षिती । विन्मुख[3] वीर, न चले शक्ती । उद्विग्न वीर सर्वही. ॥ ३१ ॥ तेव्हां नाटकी श्री**कृ**ष्णनाथें । मत[4] बोधोनी **भी**मसेनातें । मारोनी **अ**श्वत्थामा गजातें । शब्द तव नामें फोडिला. ॥ ३२ ॥ 'मारिला, मारिला, **अ**श्वत्थामा' । चहूंकडे हाची हमामा[5] । ऐकोनी **द्रो**ण, ब्राह्मणोत्तमा ! । कासावीस तव मोहें. ॥ ३३ ॥ सत्य मिथ्या पुसतां **ध**र्मा । येरू वदे "'**अ**श्वत्थामा । मारिला' म्हणती वीर-गरिमा । गज कीं नर नेणवे." ॥ ३४ ॥ असत्येंसी वर्तला **ध**र्मराज । तेणें उद्विग्न **भा**रद्वाज । पुत्रशोकें निस्तेजतेज । धनुष्यबाण विसर्जी[6]. ॥ ३५ ॥ योगयुक्त प्रायोपवेशनी[7] । ऊर्ध्ववायु **ह**रिचिंतनीं । प्राण सोडितां, विचित्र करणी । दुष्ट **पा**र्षतें केली पां. ॥ ३६ ॥ खड्ग पुसोनी[8] धांवला त्वरा । वीरीं निषेध केला सैरा । अमान्य करुनी, शिखा[9] निकरा । वामहस्तें[10] कर्षिली. ॥ ३७ ॥ घाव घालोनी कंठनाळीं । प्रदीप्त शिर पाडिलें तळीं । 'आहा'कार वीरमंडळीं । **पा**र्थ दुःखें दुखावला[11]." ॥ ३८ ॥ ऐकतक्षणीं क्रोधभरणी । **द्रौ**णी प्रज्वळला युगांत वन्ही । जेवीं दाक्षायणी[12] देह हवनीं । दाहतां, **शं**भु ज्यापरी. ॥ ३९ ॥ मंदरघसणी[13] **वा**सुकी गरळा । वमी, तैशा मुखीं अग्निज्वाळा । संतापताप हृदय-कमळा । विषापरी कडाडी. ॥४०॥ खदिरांगार ज्वलितनयन । तप्त शरीर जैसा ज्व-लन । किरण रोम थरकती त्राणें । स्फुरित वोष्ठ सरोषें. ॥ ४१ ॥ क्रोधें प्रदीप्त श्राद्ध-[14]देवो । तैसा सर्वां गमला भावो । फोडिता जाहला मुखीं टाहो । काळमेघा-सारिखा. ॥ ४२ ॥ म्हणे, 'अ**पां**डवी धरित्री । करीन आजी, पाहा नेत्रीं । **ना**रायणास्त्र विधियुक्त मंत्रीं । जपोनी आतां सोडितों. ॥ ४३ ॥ यया अस्त्रासी निवारण । **ब्र**ह्मांडगेहीं नाहीं जाण । पार्था देखतां[15] **धृ**ष्टद्युम्न । **का**ळधामा वो-

---

१. कलियुग. २. सूर्य. ३. युद्धापासून पराङ्मुख. ४. सल्ला, मसलत. ५. गडबड. ६. त्याग करी, टाकी. ७. अन्न पाणी वर्ज्य करून मरणास तयार असा. ८. तरवारीची धार नीट आहे कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं तीवरून हात फिरवून. ९. शेंडी. १०. डाव्या हातानें. ११. दुःखित झाला. १२. दक्षकन्या (पार्वती). दक्षानें पार्वतीचा अपमान केला म्हणून तिनें यज्ञकुंडांत उडी टाकून आपणांस जाळून घेतलें, अशी कथा आहे. १३. मंदरपर्वतावर घांसल्यामुळें. समुद्रमंथनसमयीं मंदरपर्वत रवी (मंथनदंड) झाला होता व वासुकि दोरी झाला होता—अशी कथा आहे. १४. यम. १५. अर्जुनाच्या समोर, अर्जुन पाहात असतां.

पणें. ॥ ४४ ॥ मम विक्रम बाहुवीर्य । अस्त्रप्रयोग वर्यवर्य । पाहोनी कृतांत मानी भय । पाय न घाली पुढारा. ॥ ४५ ॥ निर्वाणयुद्ध रणधुमाळी । सेना सर्व मेळवीन धुळी । रक्तनदीच्या खळाळी । सागरातें डहुळीन[1]?' ॥ ४६ ॥ ऐकोनी हर्ष कौरववीरा । पिटोनी[2] पाणी, नाचती सैरा । अनेक वाद्यें भिन्नाकारा । वाद्यकारीं[3] तर्जिलीं. ॥ ४७ ॥ शंख, भेरी, पणव, मृदंग, । ढोल, दमामे, कर्णे, शृंगें, । हलक्या, नफेरी, बुरंगें, । सहस्रशः लागलीं. ॥ ४८ ॥ तुंबळ शब्द माजली ध्वनी । घोषें दिशा भरिल्या रणीं । उसळोनी नाद पांडवसैन्यीं । हर्षानंदें डहुळलें[4]. ॥४९॥ एकत्र वीर जाले सर्व । म्हणती द्रौणीची क्रोध हाव । क्रूर युद्धाचें गौरव । विगत केलें पाहिजे. ॥ ५० ॥ तंव कौरवांचे महाभार । ऊतले[5] जैसे गिरिवरें । कीं क्षयालागीं सप्त सागर । एकत्र जाले क्षयार्थी. ॥५१॥ पांडव वीर लोटुनी पुढती । सोडिते जाहले शरांच्या पंक्ती । कौरववीर हर्ष चित्तीं । इषूंच्या कोटी वर्षती. ॥ ५२ ॥ चतुरंग चमूचा एकवळा । ताडिती एकमेकां सकळां । विगत देखोनी कौरवमेळा । अश्वत्थामा क्षोभला. ॥ ५३ ॥ सरसावोनी प्रभिन्न धनू । शर सोडिले प्रदीप्त भानू । अष्टदिशा भरूनी पूर्णू । वीर वीर खिळिले. ॥ ५४ ॥ चहूंकडे शरांचा सडा । धडें पडती दड-दडा । अश्व नाचती तडतडा । बाण गात्रीं लोंबती. ॥ ५५ ॥ भग्न होवोनी कुंभस्थळें[6] । उसळती ऊर्ध्व मुक्ताफळें[7] । गात्रें खंडुनी फोडिती कीळे । महीवरी रिचवती[8]. ॥५६॥ स्यंदन भंगोनी अनेकशा । रथी पावती मृत्यूची दशा । वाहनें धांवती अष्टदिशा । रथस्वामीविरहित. ॥ ५७ ॥ ऐसा आकांत सेनामेळीं । 'कोठें' पुसती, 'किरीटमौळी?' । धृष्टद्युम्नादि वीरमंडळी । पार्था निकटीं मिनली. ॥५८॥ वसंतकाळीं संतप्त जन । वृक्षच्छाये होती संलीन[9] । तेवीं वीर क्षतांगपूर्ण । अर्जुनाप्रती बोलती. ॥ ५९ ॥ वीरवर्य गांडीवपाणी । धनुर्धरां मुगुटमणी । शौर्यप्रतापें वासरमणी[10] । वासवातुल्य विक्रमें. ॥ ६० ॥ 'पाहें पां दृष्टी धनंजया! । सेना विकळ यया समया । बाहुविक्रमें मर्दोनी तयां । जयानंदें गौरवीं.' ॥ ६१ ॥ अर्जुन वदे सक्लेशवाचा । 'जळो संग्राम पातला कैंचा? । राज्यलोभाचिया आशा । रौद्रकर्म अधर्माच्या । पंकामाजी[11] संलग्न. ॥ ६२ ॥

१. घुसळीन, हालवून सोडीन. २. टाळी वाजवून. ३. वाजंत्र्यांनीं. ४. उसळले. ५. पूर्वी पर्वतांस पंख असत, त्यामुळें त्यांस वाटेल तेथें जातां येत असे. ६. हत्तीचीं गंडस्थळें. ७. हत्तीच्या गंडस्थळांत मोत्यें असतात, अशी समजूत आहे:—'करींद्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि. ॥' [कुमारसंभव, सर्ग १.६ टीका पहा] ८. 'रिक्त°' असें पाठांतर. ९. अत्यंत लीन, फार आसक्त. १०. सूर्य. ११. कर्दमांत, चिखलांत.

अन्योन्य कर्मीं उदित दशा । शाश्वत[1] देह अक्षई ऐसा । तरी मग घडो तैसेंची. ॥ ६३ ॥ पितामह[2] पवित्रमूर्ती । समान विक्रम **दाशरथी** । सदाचारी, स्वधर्मरती,[3] । **ब्रह्म**भावना, सद्भक्ती;[4] ॥ ६४ ॥ जितेंद्रिय ज्ञानविज्ञान । **शुका**चार्य तुळिजे मान । सर्वांगुणीं गुणवर्धन । उपमे आन असेना. ॥ ६५ ॥ तैसाच गुरुवर्य **भारद्वाज** । विद्यासागर उत्कर्षतेज । पुण्यप्रद मुक्तिभाज[5] । उभी जोडुनी करांतें. ॥ ६६ ॥ ऐसा समर्थ सर्वांपरी । आमुतें मान्य जनकासरी । विकृतिर्भाव[6] अभ्यंतरीं[7] । माझे ठाईं न पाहे. ॥ ६७ ॥ आमुचिये जयीं तोष तया । मातें लक्षिती अमृतच्छाया । कासवीऐसी[8] मजवरी माया । हर्षानंदें डुल्लती. ॥ ६८ ॥ तनय **द्रौणी** प्रीतिपात्र । न गणोनी,[9] मातें वोपिलीं अस्त्रें । कदनीं कृपेचीं करुनी छत्रें । यश माझें वाढवी. ॥ ६९ ॥ ऐसियासी समरांगणीं । चित्रविचित्र केली करणी । राज्यलोभें मारिला गुणी । निंद्य याहुनी कोण पां? ॥ ७० ॥ न्यस्तशस्त्र[10] **आ**चार्यराज । मुनिवृत्ती[11] उपविष्ट[12] सहज । ऐसियासी वधितां, फुंजें[13] । श्लाघ्यता केवीं मानणें? ॥ ७१ ॥ अहो! बत! महत्पाप । दुष्कर कर्म अधर्म ताप । कोण पुरुषार्थ वाधिला दीप । अमरत्व येणें पाविजे?' ॥ ७२ ॥ **पार्थ**तातें निंदी वचनीं । म्हणे, 'अयुक्त[14] केली करणी.' । उद्विग्नमान व्याकुळ मनीं । वदे, 'अधर्म कोण पां?' ॥ ७३ ॥ ऐकोनी संतप्त **भीमसेन** । म्हणे 'हें साधुपण कोण वन? । क्षत्रपणासी[15] अश्लाघ्य जाण । संधी[16] परा जिंकिजे. ॥ ७४ ॥ पाहें पां **सौभद्र** शस्त्रहीन । साहीजणें घेतला प्राण । **द्रौपदी** सती पतिव्रता जाण । जे कां मान्य[17] उमेतें. ॥ ७५ ॥ रजस्वला, एकवसनी । सभे गांजिली निष्ठुर[18] वाणी । **भीष्मद्रोणा**दिवीरश्रेणीं । कौतुक नेत्रीं लक्षिलें. ॥ ७६ ॥ सामर्थ्य असोनियां आंगीं । निषेध केला नाहीं प्रसंगीं । धन्य श्रेष्ठत्व हेंची जगीं । पवित्रता पुरुषार्थ? ॥ ७७ ॥ भविष्यानुरूप घडे कर्म । वृथा

---

१. जर हा देह शाश्वत (अविनाशी) असता, तर अशा प्रकारचें कृत्य घडलें तरी चाललें असतें—हा भावार्थ. २. भीष्म. ३. 'स्वधर्मरीती' असें पाठांतर. ४. 'सद्भक्त' असा पाठभेद. ५. मुक्ति (मोक्षप्राप्ति)रूपी भार्या. ६. कपटभाव. ७. अंतःकरणांत. ८. कासवी आपल्या पिलांचें नुसत्या प्रेमदृष्टीनें पाहून पालनपोषण करिते. 'कासवीचीं पिलीं । कूर्म दृष्टीनें सांभाळी ॥' ही **स**मर्थोक्ति प्रसिद्धच आहे. ९. प्रीतिपात्र पुत्र जो अश्वत्थामा त्याची पर्वा न करितां. 'न गणोनी त्यातें' असा पाठभेद. १०. ज्यानें आयुध खालीं ठेविलें आहे असा. ११. योग्याप्रमाणें ध्यानस्थ. १२. बसलेला. १३. गर्वानें, अभिमानानें. १४. अयोग्य. १५. क्षत्रियत्वास. १६. योग्य संधी साधून. परा=शत्रूंस. १७. सन्मान्य, आदरणीय. १८. दुरुत्तरें बोलून.

शिवाचा वरदनेम[1] ?। द्रोणनिधना अग्नि संभ्रम। वोपी पार्षत पांचाळ. ॥ ७८ ॥
हें असत्य घडे कैसिया परी ?। प्रारब्धयोगें घडवी हरी। शोक सांडुनी
रणचत्वरीं[2]। वाड[3] होय, नरवर्या ! ॥ ७९ ॥ समर्थ[4] माजी क्षेम गदा। वीरां
सकळां वोपीन आपदा। गदाघायीं करुनी चेंदा। यमसदना वोपीन.' ॥ ८० ॥
सात्यकी, पार्षत, धर्मराज। अनुमोदुनी[5] वर्धती तेज। वरवाळोनी[6] वीरांचे पुंज।
गुरुपुत्रा थडकले. ॥८१॥ एकसरा[7] वोढोनी धनू। कोटीच्या कोटी सोडिले बाणू।
बुजोनी काढिला द्रोणनंदनू। वीरां वळसा[8] भोंवला. ॥ ८२ ॥ पार्थे गांडीव
सजोनी नेटें। बाण सोडिले वन्हिपुटें। रिक्त ठाव न दिसे कोठें। शरांचीं
पेटें[9] दाटलीं. ॥ ८३ ॥ इषु उसळती सरसरा। कुंजे[10] गांडीव करकरा। सेने
रिचवती झरझरा। मेघधारासारिखी. ॥ ८४ ॥ माजी अस्त्रप्रयोगदाटी।
जाणों विजा पडती सृष्टी। सेना भंगतां बारा वाटीं। क्रोधें द्रौणी प्रज्वळला.
॥ ८५ ॥ जेवीं रावणिवधीं[11] रावण। क्रोधें प्रज्वळिला जैसा अग्न। शक्ती
प्रेरिली निर्वाण। तेवीं क्षोभे ऋषिवर्य. ॥ ८६ ॥ क्रोधउल्का वमी वदनीं।
नारायणास्त्र प्रयोगी रणीं। सबीजोच्चार करुनी वाणी[12]। विधियुक्त शर सोडिला.
॥ ८७ ॥ अस्त्रप्रभव होतां पाहीं। धूम्रें दिशा दाटल्या दाही। प्रबळ झुंझैवात[13]
एके घायीं। रजीं[14] अंबर दाटलें. ॥ ८८ ॥ सहस्र विजांचा एकवळा।
तैसा कडाडी[15] फुटला तळा। दचकोनी शेषें[16] भूमंडळा। टाकों भावी भयार्थी.
॥ ८९ ॥ सकंप धरा थरथराटी। गिरिमौळें खचती सृष्टी। सप्तसागर खळ-
बळ मोठी। लाटा नभा टिपिती. ॥ ९० ॥ उल्कापात, खचती तारा।
व्योमीं खेचरां न निघे थारा। भूतगणांस आकांत सैरा। दिग्गज दिशा
सांडिती. ॥ ९१ ॥ कोटिरवींचा एकवळा। तैसा लोटतां[17] तेजगोळा। ज्वाळा
भेदिती अंतराळा। घडघडाट सुसाटे. ॥ ९२ ॥ माजी विचित्र सुवर्णपुंखी।
शर धांवती वन्हिमुखी। वीर भेदिती गात्रीं तिखी। सेनामेळीं आकांतू.

१. शिवानें दिलेलें वरदान कधीं निष्फळ होईल काय ? 'गरदाननेम' असें पाठांतर. २. रणां-
गणांत. ३. वाड=वाढ, मोठा, प्रतापी. ४. बलवान्. ५. आपसांत सल्लामसलत करून. ६. तुटून
पडून, हल्ला करून. ७. एकदम. ८. कठिण प्रसंग. 'वीरीं वळसा भाविला' असा अन्य पाठ.
९. समुदाय. पेटें=सांगड, अनेक भोंपळे एकत्र बांधून नदी इत्यादिकांत तरावयाचें साधन करितात
तें. १०. शब्द करी, आवाज करी. ११. इंद्रजिताचा वध झाला त्या वेळीं. १२. वाणीनें.
१३. हा संस्कृत 'झंझावात' शब्दाचा अपभ्रंश. 'प्रवल' बद्दल 'प्रलय' असें पाठांतर. १४. धुळीनें.
अंबर=आकाश. १५. कडकडाट. १६. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर आहे, अशी समजूत आहे.
१७. 'लोटला' असें पाठांतर.

॥ ९३ ॥ रा[१]मदूताचीं उड्डाणें । तैसे शर उसळती त्राणें । भेदोनी वीरांचीं अंगे[२]त्राणें । शिरें व्योमा[३] उडविती. ॥ ९४ ॥ प्रभिन्न करि[४]टी मत्त हस्ती । शिररहित पडती क्षिती । फुटोनी पोटें, लोंबती अंत्रीं[५] । पाद शुंडा इतस्तता. ॥ ९५ ॥ घाईं जर्जर अनेकशः । भै[६]रव शब्द लंघिती दिशा । सदा वीर विगतदशा । मृत्युपंथा लागती. ॥ ९६ ॥ अश्वांसहित रा[७]उतराणे । मही पडती विगत प्राणें । छिन्नगात्री बहुधा रणें-[८] । विना वीर निघती, ॥ ९७ ॥ रथिया रथीं घोर आपदा । भंगोनी स्यंदन जाहले चेंदा । वीर वीरांतें वदती 'दादा ! । सांग पुत्रा[९] माझिया.' ॥ ९८ ॥ रुदित स्वरें मारिती हाका । नांना[१०] म्हणती, 'मामा ! काका ! । बंधु ! मातुळ ! सुत ! जनका ! । टाकों नका आमुतें.' ॥ ९९ ॥ ध्वज, पताका, वस्त्राभरणें, । कवचें, शस्त्रें, विचित्रवर्णें । भूमी लोळती न[११]क्षत्रमानें । चहूंकडे सारिखीं. ॥ १०० ॥ एक निश्चळ ठाईंचे ठाईं । एक घायाळ हुं[१२]बती मही । एक [१३]खोडिती पाय भुयी । 'पाणी ! पाणी !' विलपती. ॥ १०१ ॥ ऐसा आकांत सेनामेळीं । सुसाट पडती बाणजाळीं । पळों जातां रणमंडळीं । भेदिती इषु सर्वांगीं. ॥ १०२ ॥ शरमय जाहली अवघी धरा । कांहीं उपाय न चाले वीरां । किलकिलाट शब्द सैरा । गर्जुन वाद्यें फोडिती. ॥ १०३ ॥ जेवीं दावाग्नी धडकतां वनीं । तृणपादपांची करी धुं[१४]णी । तेवीं नारायणास्त्राची करणी । सेनाहोळी होतसे. ॥ १०४ ॥ क्रोधें प्रदीप्त **भी**मसेन । **सा**त्यकी आणि **धृ**ष्टद्युम्न । सह **पा**र्थ प्रतापवान । लोटोनी शरां वर्षती. ॥ १०५ ॥ अग्रता **भी**म पुरुषार्थी । सोडिल्या शरांचिया पंक्ती । परी शांत नोहे कोणे अर्थी । जेवीं वन्ही इंधनें[१५]. ॥ १०६ ॥ कीं ते प्रावृटींचे नदीलोट । सागरामाजी होती गॅ[१६]ट । तेवीं शरांची खटपट । बाधा नोहे अस्त्रातें. ॥ १०७ ॥ चहूंकडे सरकती शर । ठाईं तुटती अग्निलोळ सैर । रथा आदळतां, **वृ**कोदर । टाकोनी उडी निघाला. ॥ १०८ ॥ रथाश्वध्वजसह सारथी । भस्मीभूत जाला न लागतां पातीं । शक्ती न चले तयाप्रती । वीर वीर खोंचले[१७]. ॥ १०९ ॥ जेवीं [१८]शीतीं अर्दित गायी । वीर

---

१. मारुतीचीं. २. कवचें, चिलखतें. ३. आकाशांत. ४. हत्ती. ५. आंतडीं. ६. भीतियुक्त, भयंकर. ७. स्वार, योद्धे. ८. रणेंविना=युद्ध न करितां, युद्धपराङ्मुख होऊन. ९. 'मी मेलों' म्हणून माझ्या मुलाला सांग. १०. पुष्कळ योद्धे. ११. नक्षत्रासारखीं देदीप्यमान. १२. कुंथती. १३. पायाचे खोडे होऊन पडले. 'खुडिती' असें पाठांतर. १४. शेकोटी, नाश. १५. सर्पणामुळें विस्तव ज्यास्त भडकतो, त्याप्रमाणें भीमानें बाण सोडल्यामुळें नारायणास्त्र फार प्रज्वलित झालें—असा भावार्थ. १६. अदृश्य. १७. विद्ध (जखमी) झाले. १८. थंडीचे दिवसांत. 'शेतीं' असें पाठांतर.

निघाले मागिले पायीं । धर्मराजादि विन्मुख पाहीं । निरुत्साह मानसीं. ॥११०॥ पार्थें प्रज्वळोनियां हवे । शरौघवोघ लाविले बरवे । हस्तक्रियेचें लाघव सर्वें । कळाकुसरी विद्येच्या. ॥ १११ ॥ माजी अस्त्रप्रयोग नानाविध । कडोविकडी करी विशद । वायव्यास्त्र सोडितां राहिला स्तब्ध । उपाय कांहीं न चाले. ॥११२॥ जें जें अस्त्र सोडिलें पार्थें । तें तें विफळ जाहलें व्यर्थ । विकळमानस संकोचिंत[1] । कृष्णवदन विलोकी. ॥ ११३ ॥ तो भक्तपाळ, आनंदकंद, । विष्णु, परमानंद, । गोविंद, गोपाळ, मुकुंद, । कुंदरदन, दाशार्ह. ॥ ११४ ॥ श्रीहरी, श्रीनिवास, श्रीपती, । श्रीधर, श्रीकर, वैकुंठपती, । श्रीमान्य, श्रीकृष्ण, कैवल्यपती, । वदे प्रीती पार्थातें. ॥ ११५ ॥ 'ताता[2] ! सखया ! धनुर्धरा ! । मम प्रिया ! विश्रामकरा ! । वीरवर्या ! संगरचतुरा ! । विद्याधरा ! गुणनिधी ! ॥ ११६ ॥ यया अस्त्रास निवारण । नाहीं ब्रह्मांडगेहीं जाण । पाशुपतास्त्रासमान मान । विश्वदाहक जाण पां. ॥ ११७ ॥ याचिया शांतीसी उपाया । सांगतों तूतें, धनंजया ! । लीन होवोनी स्तविजे तया । मद्रूपता भावोनी.' ॥ ११८ ॥ शुचि[3] मानसें श्वेतवाहन । विसर्जोनी धनुष्यबाण । उडी टाकोनी साष्टांग नमन । घाली आवडी सद्भक्ती. ॥ ११९ ॥ म्हणे 'जयजय' नारायणा ! । विश्वनिवासा, भवतारणा ! । अच्युता ! अनंता ! संकर्षणा ! । मुरुमर्दना ! मुकुंदा ! ॥ १२० ॥ हरिस्वरूप[4], हरिहरमूर्ती, । तूं व्यापक सर्व जगतीं । भक्तपाळक, करुणाआर्तीं । रक्षीं आम्हां बाळकां.' ॥ १२१ ॥ ऐसें स्तवितां धनंजय । अस्त्रप्रभव पावला लय । समक्ष[5] रथीं त्रिदशवर्य[6] । केवीं बाधा बाधिजे ? ॥ १२२ ॥ जेवीं इंद्रजितवधीं महेशास्त्रें । प्रेरुनी सुमित्र आकर्षी सूत्रें । तेवीं अस्त्र शांतविलें अब्जनेत्रें । रक्षी भक्तां कृपाळ. ॥ १२३ ॥ अमृतसागरीं चुंबकला[7] । त्यासी मृत्यूचा बाधी झोला[8] ? । खगेंद्र-[9]स्कंदीं जो मिरवला । विषाची बाधा कायसी ? ॥ १२४ ॥ सुरतरूची[10] शीतळ छाय । निवतां क्षुधेची बाधा होय ? । कीं देवतटिनीचें[11] सेवितां तोय[12] । पाप बाधी तयातें ? ॥ १२५ ॥ तेवीं श्रीकृष्णप्रसादें पाहीं । महास्त्र विलया गेलें तेंही । वीरां हर्ष, संग्रामडोहीं । घालिती उड्या स्वानंदें. ॥ १२६ ॥ अस्त्र-

---

१. 'संकोचचित्त' असें पाठांतर. २. बापा! 'तातः पितरि पूज्ये च' इति कोशः । ३. 'शुचि-ष्मंत' असा पाठभेद. ४. 'हरि विश्वरूप' असा अन्य पाठ. ५. प्रत्यक्ष. ६. देवश्रेष्ठ (कृष्ण). ७. बुडविला. ८. टोला, धक्का. ९. गरुडाच्या खांद्यावरून. १०. कल्पवृक्षाची. कल्पवृक्ष पांच प्रकारचे आहेत:-'पंचैते देवतरवो मंदारः पारिजातकः । संतानः कल्पवृक्षश्च पुंसि वा हरिचंदनम्' (अमरकोश). ११. सुरनदीचें, गंगेचें. १२. पाणी.

प्रताप पावल्या वात्र[1] । दिशा धौतें[2] जाहल्या सर्व । पशुपक्षी, वीरांचे थवे । शांत जाहले समस्त. ॥ १२७ ॥ वायु पातला सुशीतळ । जंगमादि निर्भय सकळ । शौर्यप्रतापें उतावेळ । संग्रामातें तगटले. ॥ १२८ ॥ दारुण युद्ध पुढें पाहीं । वीर भिडती शौर्यबाहीं । त्या वीररसाचें नवाई[3] । पान सज्जनीं करावें. ॥ १२९ ॥ श्रीगुरुभीमराजकिंकर । विनवी नरहर मोरेश्वर । भारतकथामृत सारसार । श्रोतेसज्जनीं सेविजे. ॥ १३०[4] ॥

अध्याय[5] पसतिसावा.

धृतराष्ट्र वदे, 'बाळका ! कुशळा ! । अस्त्रप्रभव शमतां कीळा । पुढें **द्रौ**णी प्रतापलीळा । काय करी ? अनुवादें[6].' ॥ १ ॥ **सं**जय म्हणे, 'धरत्रीपती ! । महास्त्राची पावतां शांती । **गु**रुनंदना विस्मय चित्तीं । क्रोधानळीं धडकला. ॥ २ ॥ सिंहलांगूळचिन्हकेतू[7] । शोभायमान सदृढ रथू । क्रोधानळीं प्रदीप्तमंतू । धांवला रोषें प्रतापी. ॥ ३ ॥ पाठी वीरांचा समुदावो । लोटिला, जैसा सरितानाहो[8] । धनु कर्षोनी बाणसमूहो । वीस **पा**र्षता वोपिले. ॥ ४ ॥ त्यांवरी आणीक क्रोधविखारी । पंचवीस अर्पिले स्तनांतरीं । येरू प्रज्वळोनी क्रोधलहरी । शितीं शर सज्जिले. ॥ ५ ॥ सदुसष्ट शरीं ताडिला **द्रौ**णी । सूत विंधिला वीस बाणीं । चतुरें[9] हयासी निष्ठुरपणीं । चार चार वोपिले. ॥ ६ ॥ **द्रौ**णीगात्रीं धडकतां शर । डळमळी जैसा तरुवर । कीं [10]क्षतें तांडितां फणिवर । उल्का वमी विषाच्या. ॥ ७ ॥ द्वय सायक क्षुरप्रधारा । सोडुनी ध्वजें[11] केला पुरा । अश्वसारथी धाडिले घरा । **कृ**तांताचे संगती. ॥ ८ ॥ सुवर्णपुंख निशित शरीं । ताडुनी केला व्याकुळ समरीं । अनुचरांची[12] करुनी [13]बोहरी । **पा**र्षतातें त्रासिलें. ॥ ९ ॥ पाहोनी **द्रौ**णीचें क्रूरकर्म । **सा**त्यकी धांवला रोषें परम । शिळाशित शर उत्तम । आठ वक्षीं[14] ताडिले. ॥ १० ॥ पुन्हा त्यावरी वीस तीख । अर्पिले विचित्र हेमपुंख । ध्वज, कार्मुक, छेदोनी चोख[15] । अश्वसारथी मर्दिले. ॥ ११ ॥ रथ भंगिला बाणजाळीं । **अ**श्वत्थामा पाडिला तळीं ।

---

१. व्यर्थ, विफळ. २. स्वच्छ. ३. आश्चर्यपूर्वक. ४. ह्या अध्यायाचें **'द्रौणीविक्रमोत्कर्ष'** असें नांव आहे. ५. ह्यांत मूळांतील २००–२०२ अध्यायांचा सारांश आला आहे. ६. कथन कर. ७. ज्याच्या रथाचा सिंहपुच्छांकित ध्वज आहे असा (अश्वत्थामा). ८. नदीश, समुद्र. नाहो=नाथ. ९. रथाच्या चारही घोड्यांस. १०. दुखविलें असतां. ११. 'ध्वजधनु केलें पुरा' असा पाठभेद. १२. पाठीराख्यांची. १३. राख, भस्म, नाश. १४. वक्षस्थळीं, छातीवर. १५. चांगल्या प्रकारें.

क्षतांग धडके क्रोधानळीं। काळसर्पासारिखा. ॥ १२ ॥ देखोनी वीर धांवले त्वरा। धनुष्य वोढोनी करकरा । धनु सज्जोनी शरनिकरा। वर्षाव केला सर्वत्रीं. ॥ १३ ॥ वीस सायक दुर्योधनें। काळखारी वोपिले घन। कृपाचार्यें तीक्ष्ण तीन। गात्रस्थानीं ताडिले. ॥ १४ ॥ कृतवर्मा क्रूरकर्मा । दश शर वोपी सात्वतोत्तमा। रविनंदन क्रोधगरिमा। पांच शत समर्पी. ॥ १५ ॥ दुःशासन रोषभरीं। शत बाण ताडी स्तनांतरीं। वृषसेन सात इषु विखारी। अर्पण करी सरोषें. ॥१६॥ सत्य सात्यकी वीरराज। बाण सोडुनी तेजःपुंज। विरथी करुनी भग्नतेज। विन्मुख केले सर्वेही. ॥ १७ ॥ द्रौणी पावोनी चेतना। अन्य रथीं वळंघोनी त्राणा। क्रोधें प्रज्वळोनियां रणा। वन्हिप्राय उसळला. ॥ १८ ॥ धनुष्य वोढोनी क्रोधभरें। सात्यकी ताडिला महानिकरें। रोषें प्रज्वळोनी शिनिप्रवीरें। शर निघातें सोडिले. ॥ १९ ॥ सूतवाजीसहित रथ। भग्न करुनी टाकिला त्वरित । अमित शरांचे वर्षोंनी वोथें। बहळ सेना मर्दिली. ॥ २० ॥ वृषसेनाचे रथी श्रेष्ठ। तीन सहस्र केले पीठ। कृपाचार्यांचे दंती सुभट। अयुत एक मारिले. ॥ २१ ॥ सौबळ शकुनी शकुनीप्राय। उडवोनी असिवार लक्षवर्य। जीवित्वाचा पुसोनी ठाय । काळधामा धाडिले. ॥ २२ ॥ हलकल्लोळ रणांगणीं। अन्य रथीं वळंघोनी द्रौणी। बाण सज्जोनी प्रभिन्न गुणी। सात्यकीतें ताडिले. ॥ २३ ॥ परस्परें सायकधारीं। निकरें पेटले महामारीं । शरीं शरीरें भेदिलीं पुरीं । रक्त गळे झरझरा. ॥ २४ ॥ सरसराटें उसळती शर। खंडिती दोघे वरच्या वर। धनुर्विद्येचे प्रकार। एकमेकां दाविती. ॥ २५ ॥ द्रौणी प्रदीप्त महारोष। अशनिप्राय घोर कर्कश। शर प्रेरिले काळविष। भंगी ते शल्य क्षणार्धें. ॥ २६ ॥ उसळोनी तिहीं बाणीं। सात्यकी भेदिला गात्रस्थानीं । पार होवोनी विझाले धरणी। जेवीं वल्मीकीं फणींद्र. ॥ २७ ॥ तेणें दाटली मूर्छना तया । पडला निर्व्हिन्न रथालया। सूतें देखोनी विगतचर्या । माघारिलें रथातें. ॥ २८ ॥ रोषें धांवतां धृष्टद्युम्न। द्रोणसुतें लक्षिला नयनें । नतपर्वणी शर दारुण। भाळपडळीं ताडिला. ॥ २९ ॥ वज्रप्रहार पर्वतमौळीं । तैसा टणत्कार झाला तळीं। झोला खावोनी उतावेळी। ध्वजस्तंभीं टेंकला. ॥ ३० ॥ 'आहा'कार

१. जखमी. २. बाणांचा समुदाय. ३. आवेशानें. ४. ओघ, लोट. ५. पुष्कळ, बहुत. ६. योद्धे. ७. हत्तीवर वसून युद्ध करणारे योद्धे. ८. पक्ष्याप्रमाणें. ९. स्वार. ह्या शब्दाची व्युत्पत्ति अशी आहे:-अश्ववार=अश्वार=असिवार=स्वार=सिवार. १०. लाखों. ११. चढून. १२. 'ताडिती' असें पाठांतर. १३. वारुळांत. १४. घामाघूम.

पृतनामेळीं[1] । लोटले भीम, किरीटमौळी, । वृद्धक्षत्र, पौर अतुर्बळी, । चेदी, माळवनृपादी. ॥ ३१ ॥ द्रौणी सक्रोध जैसा मघवा । पांच पांच शर ताडिले सर्वां । त्यांवरी शत बाण पौरवा । वोपोनी, रथध्वज छेदिला. ॥ ३२ ॥ माळवराज तीन शरीं । भेदोनी विकळ केला समरीं । वृकोदर, पार्थ, धनुर्धारी । साहा साहा बाणीं विंधिले. ॥ ३३ ॥ युवराज भूप वीस बाणीं । भेदोनी विव्हळ केला रणीं । पुन्हा प्रतापी गांडीवपाणी । आठ बाणीं ताडिला. ॥ ३४ ॥ त्यांवरं[2] आणि सुभद्रावरा । साहा शर अर्पिले निकरा । दाहा नाराच यादवेश्वरा । श्रीकृष्णनाथा अर्पिले. ॥ ३५ ॥ दशार्ध[3] ताडिले भीमसेना । युवराजा चत्वार[4] गणना । माळव, पौरव, नृपभूषणां । दोन दोन वोपिले. ॥ ३६ ॥ तिग्मतेजें[5] शर दारुण । बुजोनी काढिला श्वेतवाहन[6] । शौर्यप्रतापें महाघन । सिंहनाद फोडिला. ॥ ३७ ॥ शरामागें शरांचे वोघ । लाविले जैसे शैलभसंघ[7] । कीं वारिधीलाटा[8] उसळती सैंघ[9] । एकामागें एक पैं. ॥ ३८ ॥ वज्रसुदर्शनतेज । तैसे विखुरती बाणपुंज । कीं शरच्चंद्र चकोरभोजं[10] । तेवीं शर लखलखी. ॥ ३९ ॥ चेदिपती युवराजा । चंदनचर्चित भूषित भुजा । छेदोनी अरविंदमुखतेजा[11] । शिर व्योमा उडविलें. ॥ ४० ॥ माळव, पौरव, सह सेना । मर्दोनी वोपिले काळसदना । रोष नावरे भीमसेना । क्रोधें त्यांतें धडकला. ॥ ४१ ॥ चाप कर्षोनी दोर्दंडें[12] । नाराच सोडिले वितंड । अमोघ शरांचें बळ प्रचंड[13] । भरोनी द्रौणी काढिला. ॥ ४२ ॥ येरू सावध धनुर्वाडा । बाण सोडुनी झडझडां[14] । शरीं शरांचा तडफडा । करुनी वेगें टाकला. ॥ ४३ ॥ हवा पेटोनी वृकोदर । कार्तस्वरभूषित[15] शर । सोडुनी वोतला महापूर । जेवीं वृष्टी मेघाची. ॥ ४४ ॥ तैसाची द्रौणी उमाळी करणी । सोडिले शर तेजिष्ठ तरणी[16] । भरुनी काढिला गदापाणी । स्यंदन रणीं दिसेना. ॥ ४५ ॥ परस्परें जिंकावया । बाण वर्षती; महाराया! । जाणों विजा प्रदीप्तकाया । क्षयालागीं तळपती. ॥ ४६ ॥ प्रभिन्न

---

१. सैन्यसमुदायांत. २. पांडव, माळव, पौर इत्यादि राजांवर. ३. पांच. ४. चार. ५. प्रखर तेजामुळें. 'तिग्मं तीक्ष्णं खरं' इत्यमरः. ६. अर्जुन. 'रजताचळातुल्य धवळें । झुंजतां बळ चढे आगळें । यालागीं बोलिजे देवपाळें । श्वेतवाहन हें नांव ॥' (मुक्तेश्वर–विराटपर्व. अध्याय ६।८०) ७. टोळधाड. ८. वारिधी=समुद्र. ९. बहुत, पुष्कळ. १०. भोज=संतोष, आवड. चकोरास संतोष देणारा जो शरच्चंद्र त्याचप्रमाणें बाण लकाकत होते–हा इत्यर्थ. चकोरपक्षी चंद्रकिरणांचें पान करितो, असा कविसमय आहे. ११. मुखकमलाचें तेज. १२. बाहुदंडांनीं, हातांनीं. १३. 'बंड' असें पाठांतर. १४. 'धडधडा' असा पाठभेद. १५. सुवर्णयुक्त. १६. प्रदीप्त सूर्य.

कार्मुक रत्नमुष्टी । सुसाट उठती बाणकोटी । धनुष्यें कुंजती बोभाटीं । वज्रि[1]चापासारिखीं. ॥ ४७ ॥ अलातचक्रें[2] मंडळाकारें । तैसीं कार्मुकें घेती फेरे । घेतां सोडितां इषूंचे भारे । लँक्षा[3] न येती वीरांच्या. ॥ ४८ ॥ अद्भुत विक्रम भीमाचा । देखिला राया ! नयनीं साचा । यथार्थ सुत वायुदेवाचा । होय भ्राता पार्थाचा. ॥ ४९ ॥ त्वरेमाजी करूनी त्वरा । ज्यौं[4] आणि धनुष्य खंडिलें सैरा । दश नाराच वन्हिकारा । स्तनांतरीं अर्पिले. ॥ ५० ॥ तेणें डळमळोनी द्रौणी । जैसा फुंफाटे ताडिला फँणी[5] । 'तिष्ठ तिष्ठ' म्हणोनी बाणीं । शब्द रोषें फोडिला. ॥ ५१ ॥ शिळाशित शर तीक्ष्ण । कुशळ हस्तें प्रेरुनी त्राणें । भीमधनुष्य छेदोनी जाण । बाण हृदयीं भेदिले. ॥ ५२ ॥ तेणें पांडव क्रोधभरणी । शक्ती टाकिली ज्वलित वन्ही । जाणों उतरली दामिनी । क्षयालागीं युगांतीं. ॥ ५३ ॥ द्रोणतनय पाहोनी चक्षीं । शरीं शरांच्या वोपिली भक्षीं । जेवीं व्योमीं विचॅरतां[6] पक्षी । श्येनँ[7] खंडी ज्यापरी. ॥ ५४ ॥ अन्य धनुष्य सज्जोनी वेगा । द्रौणी ताडिला; राया! सुभगा । भेदुनी तनु धरणी-भागा- । माजी जॅाला[8] निमग्न. ॥ ५५ ॥ सर्वांग जालें रुधिरमय । जेवीं किंशुकी[9] फुलिला वर्य । क्रोधभरें द्रोणतनय । सोडी शर निघातें. ॥ ५६ ॥ येवोनी बैसले सूतभाळीं । मूर्छा दाटली अतुर्बळी । उसळोनी पडतां धुरेतळीं । रँश्मी[10] हातींचे निष्टले. ॥ ५७ ॥ द्रोणनंदनें करूनी त्वरा । बाणीं ताडिलें वृकोदरा । अश्वांसही लागतां पिंसारा[11] । सैरा रणा उसळले. ॥ ५८ ॥ धरू धांवला सेनाभार । द्रौणी प्रज्वळिला वैश्वानर । शिरीं शरांचा वर्षोनी पूर । वीर वीर त्रासिले. ॥ ५९ ॥ दाट दाटली शवांची भरणी । गजाश्वपती कार्मुकपाणी । धरा शोभली वस्त्राभरणीं । श्रीमंत-भामी[12] मंगलीं. ॥ ६० ॥ विकळ पांचाळ पांचाळसेना । अर्दित निघाली दिशा[13] नाना । जेवीं वन्ही धडकतां वना । श्वापदपक्षिया आक्रांतू. ॥ ६१ ॥ कीं वृकं[14] मिनतां अजाकॅळपा[15] । आक्रांतमान पळती तापा । ना तें बिडाळ[16]

१. इंद्रधनुष्याप्रमाणें. २. जळतें कोलीत गरगरा फिरविलें असतां जें चक्र दिसतें तें. ३. ध्यानांत. ४. धनुष्याची दोरी. 'दौणी धनुष्य' असा अन्य पाठ. ५. सर्प. ६. 'उतरतां' असें पाठांतर. ७. बहिरी ससाणा. ८. ह्याचा कर्ता 'बाण' (अध्याहृत). ९. पळसाचें झाड. १०. घोड्यांच्या लगामा. ११. बाणांच्या मागच्या बाजूस पक्षांचीं पिसें लाविलेलीं असतात. १२. 'श्रीमंतबाळा मांगल्यीं' असा पाठभेद. १३. 'दिशानना' असें पाठांतर. १४. लांडगा. १५. मेंढ्यांच्या कळपास. १६. मांजर.

अंडजखोपा[1] । निघतां आकांत पक्षिया. ॥ ६२ ॥ कीं व्याळमेळीं[2] बभ्रूची[3] उडी । पडतां[4], होती देशधडी । कीं व्याघ्रविक्रमें तंडातोडी[5] । जेवीं होय पशूंची. ॥ ६३ ॥ तयापरी **पां**डवसेना । विन्मुख होवोनी निघे रणा । शंख **द्रौ**णीनें स्फुरुनी वदना । सिंहनाद फोडिला. ॥ ६४ ॥ भग्न सेना विन्मुख कदनीं । क्रोधें प्रज्वळिला **गां**डीवपाणी । रथ लोटोनी रणांगणीं । **द्रौ**णीप्रती तगटला. ॥ ६५ ॥ भग्न वीरवाहिनीसंव । सांगोळले[6] वीरांचे दांघ[7] । **पा**र्थापाठी मिनले सैंघ[8] । सभयें खेद त्यागोनी. ॥ ६६ ॥ **पा**र्थ देखोनी सन्मुख **द्रौ**णी । क्रोधें प्रज्वळिला जैसा वन्ही । कीं युगांतकाळीं **दं**डपाणी । क्षोभे तेवीं क्षोभला. ॥ ६७ ॥ आकर्ण कर्षोनी शरासन । शितीं योजिला वज्रबाण । महास्त्र प्रयोजोनी घन । अभिमंत्रोनी सोडिला. ॥ ६८ ॥ देवगंधर्वउरगराक्षसां । यक्षकिन्नरपिशाचमनुष्यां । प्रळयकाळीं धराकोशा । मुक्त केले शराग्नी. ॥ ६९ ॥ झुंझवात सुटला वायो । वंहन[9] उडती सोडुनी ठावो । वाहाटोळीच्या भियो[10] । नेत्रां झांपडी वीरांच्या. ॥ ७० ॥ पाडी सहस्र विजांचा कडका । तैसा शब्द फुटला देखा । ब्रह्मांड जाळी वन्हि ओंसका[11] । तैशा शिखा धडकल्या. ॥ ७१ ॥ सहस्रादित्यतेजउमाळा । तैसा प्रकाश, फांकल्या कीळा । सरसराट ज्वाळमाळा । धरणी नभा व्यापिल्या. ॥ ७२ ॥ तया उष्माचिये किरणीं । कढों लागलें समुद्रपाणी । जळचरां जाहली प्राणहानी । दिवौकसां[12] आकांतू. ॥ ७३ ॥ सुरांसहित सुरपती[13] । भयें उद्विग्न सशंक चित्तीं । यक्ष, गंधर्व, दिशांपती[14], । टाकोनी स्थानें निघाले. ॥ ७४ ॥ उल्कापात तडाडी धरा । खचोनी पडती तळीं तारा । कडकोनी विजा उतरुनी सैरा । पाताळकोशीं भेदिती. ॥ ७५ ॥ तया ज्वाळांचिये भरणी । वना धडकला दावाग्नी । धडधडा पादप जळती झणी । श्वापदांतें आकांतू. ॥ ७६ ॥ पशुपक्षादि अनेकशः । जळोनी जाले मही कोळसा । सेनामेळीं भोंवे वळसा[15] । युगांतकाळासारिखा. ॥ ७७ ॥ वाहनें जळती ठाईंच्या ठाईं । आहाळोनी[16] वीर पडती भुई । गजाश्वपाखरा[17] जळती पाहीं । धांवती रणीं इतस्तता. ॥ ७८ ॥ रथी विरथी पळती दुरी ।

१. पक्ष्यांच्या घरट्यांत. २. सापांच्या समुदायांत. ३. नकुळाची. 'विपुले नकुले विष्णौ बभ्रुर्ना पिङ्गले त्रिषु' इत्यमरः. ४. 'पळतां' पाठांतर. ५. दाणादाण, पळापळ. ६. जमले, गोळा झाले. ७. समुदाय. ८. पुष्कळ. ९. घोडे, हत्ती वगैरे वाहनें. १०. भीति, भय. 'प्रळयो' असें पाठांतर. ११. असगा, सर्व, पूर्णपणें. १२. देवांस, स्वर्गवासी प्राण्यांस. १३. इंद्र. १४. अष्ट दिग्पाळ. १५. संकट. १६. भाजून, पोळून. १७. हत्ती व घोडे यांचीं चिलखतें. पाखर=(१) चिलखत, (२) झूल.

उष्णीषें[1] जळती वरच्या वरी । त्यागोनी बोडके होतां समरीं । ज्वाळा अंगीं पेटती. ॥ ७९ ॥ किलकिलाटें फोडिती हाका । 'पळा! पळा!' म्हणती एकमेकां । चहूंकडे अग्नीचिया शिखा[2] । वावरती सैत्राणें[3]. ॥ ८० ॥ तापें तापलें त्रिभुवन । आहळोनी गेलें शूरत्वमान[4] । वन्हिचक्रीं पडिलें सैन्य । आक्रांत थोर वीरांतें. ॥ ८१ ॥ तयापाठीं[5] सुसाट शर । मुखीं[6] सांडिती अग्नीचे भार । अनेक इषूंचे प्रकार । सैरा दिशा वावरती. ॥ ८२ ॥ पीतरक्तहरितवर्णी । चहूंकडे बाणभरणी । हेमपिसारे, रुक्मभूषणी, । अग्रीं वन्ही डळमळी. ॥८३॥ ऐसा आक्रांत सेनामेळीं । महावीरांची फुटली फळी । सेना अक्षौहिणी[7] एकतळीं । भस्मीभूत जाहली, ॥८४॥ वीरांसहित **यु**धिष्ठिर । विन्मुख होवोनी, सांडिला धीर । **कौ**रववीर हर्षित थोर । पिटोनी पाणी नाचती. ॥८५॥ महोल्हासें तर्जिलीं[8] तुरें[9] । सिंहनाद गिरागजरें । हें देखोनी **सु**भद्रावरें । क्रोधानळ धडकला.॥८६॥ **गां**डीव कर्षोनी रोषावर्तीं । **ब्र**ह्मास्त्रप्रयोग केला आर्तीं । सर्वास्त्रभेदक **का**ळघाती । जें **वि**धीनें निर्मिलें. ॥ ८७ ॥ सबीजमंत्र वर्णोच्चारा । मुखीं स्मरोनी **या**दवेश्वरा । सोडिलें रोषें महानिकरा । **द्रौ**णीअस्त्रविनाशा. ॥ ८८ ॥ **ब्र**ह्मांड जाळी ऐसा वन्ही । लोटला, कडकडाट फुटला अवनी । खळबळिले लोक तीन्ही । कूर्मपृष्ठीं चुळबुळी. ॥ ८९ ॥ अस्त्रअस्त्राचे संघट्टणीं । द्वैतंता[10] निमोनी, ऐक्यता दुणी[9] । होवोनी, समरसें[11] तेजकिरणीं । शांत जाहलीं क्षणार्धें. ॥ ९० ॥ जेवीं क्रोधातमाची शिखा । नाश करी विवेकदीपिका[12] । कीं मोहमायेचा कडाका । ज्ञानरवी[13] विनाशी. ॥ ९१ ॥ कीं **'तत्'**पद समावे[14] **'त्वं'**पदीं । वायु समरसे व्योमसंधीं । विश्वाभास मुरे[15] तत्वबोधीं । **जी**वित्वभाव **शि**वत्वीं; ॥ ९२ ॥ तयापरी अस्त्रशांती । होतां, निर्भय वीर चित्तीं । वायु सुशीतळ वाहती क्षिती । निरभ्र व्योमीं स्वच्छता. ॥ ९३ ॥ ग्रहणनिवर्तनीं[16] निशाकर । कीं मेघवृष्टी दग्धकांतार । ना ते नौका बुडतां, पावतां[17] तीर । तेवीं आल्हाद सर्वांतें. ॥ ९४ ॥ हर्षमान **पां**डवसेना । तोष नावरे **म**धुसूदना, । **ज**गज्जीवना,

---

१. पागोटीं. २. ज्वाळा. ३. जोरानें. ४. शौर्याची प्रौढी. ५. 'तयापरीपरी' असें पाठांतर. ६. बाणाच्या मुखांतून अग्नीच बाहेर पडत असे—असा भाव. ७. गज २१८७०, रथ २१८७०, घोडे ६५६१०, पायदळ १०९३५०, ही गजादि संख्या एकत्र झाली असतां त्यास अक्षौहिणी म्हणतात. ८. वाजविलीं. ९. वाद्यें. १०. द्वैतभाव नाहींसा होऊन अद्वैतभाव दुणावला (दोन्ही अस्त्रें एकमेकांस मिळून गेलीं)—हा भावार्थ. ११. तद्रूप (तादात्म्य) होऊन. १२. सुविचाररूपी मशाल. १३. ज्ञानरूपी सूर्य. १४. मिळून जाई, तद्रूप होई. १५. नाहींसा होई, विरे. १६. ग्रहण सुटल्यावर. १७. तीरावर पोहोंचतां.

पद्मनयना, । मनमोहना, श्री**कृ**ष्णा, ॥ ९५ ॥ परात्परा, परमपुरुषा, । आदि-अनादि, अविनाशा, । सच्चिदानंदा, चिद्विलासा, । अमूर्तिमूर्ती, **ह**रीतें. ॥ ९६ ॥ **पां**चजन्य आनंदभरें । वादन केलें **या**दवेश्वरें । कृतकार्य केलें पैलपार । क्षेम **पा**र्था दिधलें. ॥ ९७ ॥ अनेक वाद्यें सहस्रशः । लागलीं, तेणें व्यापिल्या दिशा । **कौ**रववीर विगतदशा । [1]भयार्दित सर्वही. ॥ ९८ ॥ अस्त्रप्रयोगीं [2]विन्मुखचमू । **द्रौ**णीहृदयीं भ्रमे भ्रमू । निस्विन्नमान गात्रीं श्रमू । स्तब्ध [3]मुहूर्त सचिंत. ॥ ९९ ॥ तयानंतरें स्मृति वळसा । पावोनी, सोडिलें दीर्घश्वासा । म्हणे, 'धिक्कार असो विद्याभ्यासा । दैव बळिष्ठ जगत्त्रयीं. ॥ १०० ॥ कुळशीळ लावण्यरूप । सकळ विद्येचा खटाटोप । सेनासंपत्ती शक्तिप्रताप । वृथा हीनें[4] प्राक्तनें. ॥ १०१ ॥ [5]काळ अनुकूळ **पां**डुसुता । देवां अजिंक्य अस्त्रें वृथा । जालीं, धिक्कार असो आतां । चाप न धरणें हस्तकीं. ॥ १०२ ॥ संतापताप अंतःकरणीं । शोकपरायण, म्लानवदनी, । उद्विग्न चित्तें खेदभरणी । म्हणे 'इच्छा **सां**बाची.' ॥ १०३ ॥ तंव अकस्मात **बा**दरायण । **वेदव्यास** श्रीभगवान । येते जाहले कृपेकरून । [6]अवर्षणीं घन जेवीं. ॥ १०४ ॥ पुढें देखोनी **ऋ**षिवर्या । विगत मानसें नमिलें पायां । गहिंवरें कंठ दाटोनियां । दीन शोकें अनुवादे. ॥ १०५ ॥ म्हणे 'स्वामिया ! श्रीगुरु-नाथा !। सिद्धिप्रद असे मंत्रदेवता । पिशाचगंधर्वसुरां दैत्यां । सर्पराक्षसां अजिंक्य. ॥ १०६ ॥ तेथ मानवा कोण गणती ? । ऐसिया अस्त्राची विकळ मती । **पा**र्थ श्री**कृ**ष्ण [7]अक्षयी क्षिती । हेंची आश्चर्य मानसें. ॥ १०७ ॥ तरी हें ज्ञान ऋषिराया ! । श्रुत करुनी निववीं काया । जेणें संशयाची [8]माया । बाधा नोहे हृत्पद्मीं.' ॥ १०८ ॥ हांसोनी बोले **बा**दरायण । म्हणे, 'ऐकिजे सावधान । वि[9]श्वजनका जनक जाण । **ना**रायण या नामें. ॥ १०९ ॥ लीलावतारी, धर्मपाळक, । सदय, कृपा जगचाळक । विश्वहितालागीं तप अधिक । **मै**[10]नाक-मूर्ध्नीं अवलंबी. ॥ ११० ॥ **नरना**रायण ऐक्यमेळीं । हृदीं चिंतोनी **चं**द्रमौळी । ऊर्ध्वबाहु तनु सरळी । उभे वृक्षासारिखे. ॥ १११ ॥ अशनपानें[11] वर्जोनियां । वायु भक्षोनी [12]दमिती काया । साठी सहस्र वर्षें

---

१. भयाकुल, भयाभीत. २. 'विमुक्त चमू' असें पाठांतर. ३. दोन घटिका. ४. नशीब बलवत्तर नसेल तर कुलशीलविद्यादिकांचा कांहीं उपयोग होत नाहीं—हा इत्यर्थ. ५. 'सकळ' असा पाठभेद. ६. अवर्षण=पर्जन्याचा अभाव. ७. क्षयरहित, अभंग. ८. 'ठाया' असें पाठांतर. ९. ब्रह्मदेवाचा बाप. १०. कोणत्या पर्वतावर तप केलें, त्याचें नांव मूळांत नाहीं. 'स तपस्तीव्रमातस्थे शिशिरं गिरिमाश्रितः ।' (अध्याय २०१।५८). ११. खाणेंपिणें. १२. दमन करिती. 'दमी' असें पाठांतर.

तया । शतशः अधिक लोटलीं. ॥ ११२ ॥ तया तपाच्या तेजानळें । कढों लागलें ब्रह्मांड सगळें । विगतमान पाताळकुळें । सुरासुर सर्वही. ॥११३॥ महेश जाणोनी मानसीं । येता जाहला, वरदा[1] तोषी[2] । उमा भवानी अर्धांगेंसीं । भूतगण परिवार. ॥ ११४ ॥ जेवीं सूर्य सूर्याचे दर्शना । कीं क्षीराब्धी क्षीराब्धी भेटती जाणा । तेवीं कैलासींचा राणा । नारायणातें पावला. ॥ ११५॥ देखतक्षणीं हर्षसमुद्रा । भरतें दाटलें कल्याणभद्रा । स्तवनीं स्तवी वीरभद्रा । महारुद्रा शिवातें. ॥ ११६ ॥ चंद्रचूडा! श्रीशंकरा! । कपर्दी ! पिनाकी ! शशिशेखरा! । गिरिजामाता! गिरिजावरा! । महेश्वरा! पशुपती ! ॥ ११७ ॥ त्रिपुरांतका! गंगाधरा! । नरमुंडमाळा! कर्पूरगौरा! । मृत्युंजया! नीलग्रीवा! हरा! । शूळपाणी! त्र्यंबका! ॥ ११८ ॥ भाळनयना! स्मरसूदना! । अंधकदमना! पंचवदना! । प्रमथनाथ ! उमारमणा! । गजचर्मांबरधारका! ॥ ११९ ॥ वृषभध्वजा! व्योमकेशा! । मृगपाणी! मृडा! महेशा! । भुजंगभूषणा! परेशा! । भस्मोद्धारणा! ईशाना ! ॥ १२० ॥ रुद्राक्षभूषणा! सर्वेश्वरा! । महादेवा! डमरुधरा! । खट्वांगधरा! अभयंकरा! । कल्याणकरा! श्रीमूर्ती!' ॥ १२१ ॥ स्तुती तोषोनी जाश्वनीळ । म्हणे, 'कोण्हा कोणें स्तविजे बोलें? । असुरीं आश्रित[3] मदांध बळें । द्वैतता[4] भावें भाविती. ॥१२२॥ कार्याकारण द्विधा व्यक्ती । धरणें पडे लोकीं उत्पत्ती । असो; भूभारहरणार्थी । मजप्रती प्रार्थिलें. ॥ १२३ ॥ जयवंत तुझी विश्वार्जित । शस्त्रअस्त्रें सकळ युक्त । समरांगणीं अजयवात- । बाधा नोहे कल्पांतीं.' ॥ १२४ ॥ ऐसें वदोनी अंतर्धान । शिव पावतां, नारायण । मही अवतरे मधुसूदन । द्विधारूपें[5] नाटकी. ॥ १२५ ॥ पूर्णब्रह्म, लीलावतारी, । मायामुक्त, मुरारी, शौरी, । तो श्रीकृष्ण दानवारी । जाण निश्चित, बाळका[6]! ॥ १२६ ॥ नरावतार तोची अर्जुन । सर्वास्त्रभेदी, जयस्वी पूर्ण, । रणीं विन्मुख पाकशासन, । अजय[7] स्वप्नीं असेनां[8]. ॥ १२७ ॥ ययानिमित्त तवास्त्रबाधा । बाध नोहे, त्यागिजे खेदा.' । शांति पावोनी, श्रीव्यासपदां । मानोनी हरिहरां[9] वंदिलें. ॥१२८॥ विलोकितां वाहिनी दृष्टी । तंव सूर्य अस्ताचिये नेहटीं । श्रांत वाहनें वीर कष्टी । निरुत्साह सर्वांतें. ॥ १२९ ॥ पंचम युद्ध समाप्त द्रोण । चिंतार्णवीं समग्र लीन । आ-

---

१. प्रसन्न होऊन वर देणारी. २. शंकर. ३. दैत्यांनीं ज्यांनां आश्रय दिला आहे ते. ४. द्वैतबुद्धि, भेदभाव. ५. नर व नारायण ह्या दोन रूपांनीं. ६. हे अश्वत्थाम्या! ७. पराजय. ८. 'दिसेना' असा अन्य पाठ. ९. व्यासांचे पाय हेच हरिहर असें समजून. 'मानोनी' ऐवजीं 'नमोनी' असा पाठभेद.

वरूनियां युद्धकंदन । माघारले धामातें. ॥ १३० ॥ शोकारूढ **कौरवराज** । दीन मानसें विगततेज । निमोनी जयश्रीचा पुंज । निघता जाला शिबिरातें. ॥ १३१ ॥ हर्षयुक्त जयस्वी **धर्मे** [2] । आवरूनियां संग्रामकर्मे । शिबिरा पातला संभ्रमें [1] । वीरवेष्टित स्वानंदें. ॥ १३२ ॥

उपसंहार.

येथोनी सरलें **द्रोणपर्व** । पुढां **कर्णपर्व** अपूर्व ।
श्रीकृष्णलीळेचें लाघव । सुरादिकां अचोज[3]. ॥ १ ॥
दाहा सहस्र[4] पांचशतें । श्लोक साठ अधिक वरुते ।
द्रोणपर्व सत्यवतीसुतें । कथिलें पूर्ण **भार**तीं. ॥ २ ॥
तितुका कवळोनियां अर्थान्वय । कथासार पुष्टतावर्य ।
प्राकृत भाष्य करुनी सोय । सुगम केला श्रोतयां. ॥ ३ ॥
जया कथेचिया श्रवणीं । ब्रह्महत्यादि होती धुणी ।
सहस्रकपिलागोदानदानीं । श्रेयँ[5] लाधे श्रवणार्थ्या. ॥ ४ ॥
हरिगुणीं उद्भवोनी प्रेमा । भक्ति लिगटे **पु**रुषोत्तमा ।
अंतीं पावे सायुज्यधामा । श्रवणमहिमा अगम्य. ॥ ५ ॥
संतसज्जनश्रोतयांप्रती । मी विनवितों भावें आर्ती[6] ।
तुह्मी केवळ **ई**श्वरमूर्ती । परोपकारी विश्वातें. ॥ ६ ॥
तुमच्या आश्रयें कवित्वलता । वृद्धि पावोनी हरी व्यथा ।
हा प्रसाद तुमचा, ताता। शोभा ग्रंथा तुमचेनी. ॥ ७ ॥
मी हीन दीन किंकर पाहीं । अनन्य शरण तुमचे पायीं ।
करुनी कृपेची ग्रंथसायी । सनाथ मातें करावें. ॥ ८ ॥
तथापि कांहीं पँडलें[7] न्यून । सांभाळोनी करिजे मान्य ।
मी कवीश्वर[8] नव्हे धीमान[9] । रंक सेवक तुमचा. ॥ ९ ॥
समर्थ श्रीगुरु **भीम**राज । अवताररूपें श्रीरघुराज ।
समर्थसंप्रदायी कीर्तिध्वज । **रा**मदास लौकिकीं. ॥ १० ॥

---

१. आनंदानें; त्वरेनें. २. ह्या अध्यायाला **'पंचमदिवसयुद्धसमाप्ति'** असें नांव आहे. ३. अतर्क्य. ४. आमच्यापाशीं असलेल्या कलकत्ताप्रतींत (राय प्रतापचंद्र मुजुमदार यांनीं छापलेल्या) एकंदर ९६२६ श्लोक आहेत. ५. पुण्य. ६. लडिवाळपणानें. ७. 'पडेल' असें पाठांतर. ८. पंडितश्रेष्ठ. ९. बुद्धिमान.

तदनुग्रहहस्त माथां । वाचे स्फुरितां वाग्देवता ।
भगवद्गुणीं प्रेम आस्ता । भार[१]तीगंगा प्रगटली. ॥ ११ ॥
श्रीलक्ष्मीनृसिंह रामराज । ज्यांचेनि जगा साम्राज्य ।
सिंहवदन अधोक्षज, । भक्तपाळक, कृपाळू. ॥ १२ ॥
तया पदीं अनन्य शरण । त्याविण आन न स्मरे मन ।
काया, वाचा, मानस, ध्यान । गुणवर्णनीं आवडी. ॥ १३ ॥
तया प्रसादें वा[२]गुद्भव । सिद्धि पावलें द्रोणपर्व ।
ग्रंथाभिमानी लक्ष्मीधव । मी बिगारी येथींचा. ॥ १४ ॥
कुळदेवता श्रीभवानी । माया तुळजापूरस्वामिणी ।
कवित्वलतिका वाढे जनीं । हा प्रसाद तियेचा. ॥ १५ ॥
असो; जाहलिया द्रो[३]णनिधन । वीररसासी उतार पूर्ण ।
जैसी प्रसूत प्र[४]मदारत्न । सरे यौवन मागुतें. ॥ १६ ॥
कीं शरत्काळ आक्रमितां जाण । नदीपुराचें उतरे मौ[५]न ।
कीं वसंतअंतीं पं[६]चमस्वर गान । वोहँ[७]टे जेवीं त्यापरी. ॥ १७ ॥
असो, बालाघाटीं ईटनगरी । महा सुरवाड रम्य पुरी ।
नामें मोरोजी नरहरी । देशपांड्या तेथींचा. ॥ १८ ॥
त्याची भार्या गुणैकराशी । नाम भवानी भवानीतोषी ।
हरिभक्त जन्मला पुत्र कुशी । दास नरहरी संतांचा. ॥ १९ ॥
नृसिंहप्रसादें पर्वसमाप्ती । सिद्धि पावलें सज्जनआर्ती ।
श्रोतयां विनवीतसें भक्ती । पान आदरें करावें. ॥ २० ॥
शके सोळाशें नव्वद । आश्विन मास, प्रतिपदा शुद्ध ।
लेखन समाप्त जाहलें सिद्ध । पुण्यपावन श्रोतयां. ॥ २१ ॥
भारतींचा गहन अर्थ । प्राकृत भाषा गोविला[८] सत्य[९] ।
चार सहस्र नव शत । ओव्या पंधरा वरौत्या ॥ २२ ॥

---

१. भारतरूपी गंगा. २. वाचेची उत्पत्ति. ३. द्रोणाचार्यांचा मृत्यु. ४. स्त्रीरत्न. 'प्रसूता गतयौवना' असें सुभाषितही आहे. ५. प्रमाण. ६. वसंतऋतूंत कोकिळेचा आवाज पंचमस्वरांत असतो. ७. कमी होतो, उतरतो. ८. गुंफिला, ग्रंथित केला. ९. ह्या पर्वाचे पहिले तीस अध्याय छापून झाल्यानंतर, रा. रा. **वि**नायक **म**ल्हार **स**रदेसाई, असि० मास्तर, इंग्रजी शाळा, अक्कलकोट, यांनीं ह्या पर्वाची एक हस्तलिखित प्रत मोठ्या खटपटीनें पैदा करून आमच्याकडे पाठविली. ह्या त्यांच्या मेहरबानीबद्दल आह्मी त्यांचे अत्यंत ऋणी आहों.

नरहरिकृत द्रोणपर्वाचें परिशिष्ट.

पृष्ठ.	पद्य.	मुख्यमुख्य पाठभेद, शुद्धाशुद्ध, व टीपा यांचें परिशिष्ट.
१	१०	'भव्याकारां' ऐवजीं 'भाष्यकारां' असा पाठभेद.
५	५९	प्रतापाचा माळा=Tower of Strength.
६	८५	'क्रोधसौख्यें' बद्दल 'क्रोधसौरभ्यें' असें पाठांतर.
११	१	चरण दुसरा.—'पुत्रोत्पादनीं अपरस्रष्टा' असा पाठभेद.
,,	३	चरण तिसरा—'शस्त्रसमाधि विचित्रवर्य' असा मूळपाठ.
१५	६८	बिवुड=बींबूड, निर्बीज, नष्ट.
१७	१०७	वायोधारी=वायूच्या आधाराचीं, हवेंतील.
,,	१११	'सुरनायक' बद्दल 'शूरनायक' पाहिजे. जुन्या पोथ्यांत 'शूर' बद्दल 'सुर' असें लेखकांच्या अज्ञानानें लिहिलेलें वारंवार आढळतें.
२२	७६	उसण्या घाई=मोठ्या तांतडीनें; हातउसनी आणलेली वस्तु परत करण्यांत सज्जन व सुशील मनुष्य जसी घाई करितो, तशा घाईनें.
३१	५४	'आनंदासी' बद्दल 'अनंतासी' असा पाठभेद. अनंत=शेष.
,,	६५	हउळी=हाउळी=टोळी.
,,	६७	'शक्र' बद्दल 'शुक्र' हा योग्य पाठ.
,,	६८	'हस्तावा' हा 'हस्तावाप' (=ज्याघातवारण, धनुष्याच्या दोरीचा झटका हातास लागूं नये म्हणून हातांत घातलेला हातमोजा) या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश.
३२	७२	'चाप छेदोनी मारिलीं घोडीं । शर सोडुनी काळधाडी।' असा मूळपाठ.
,,	७३	पुरोनी अवधी=वर जाण्याची मर्यादा खुंटून.
३७	४१	'कुरंटा' ऐवजीं 'कुरटा' असा पाठभेद. कुरंटा=कुरटा=खुरटा=मनांत जळफळणारा.
,,	५२	'द्रोण विद्येचा मरगळा' असा शुद्ध पाठ. मरगळा=मूर्ति, अवतार.
३९	७२	'वीर धसले वीरश्रीरंगें' हा द्वितीय चरणाचा मूळपाठ.
४१	१२२	'नुगवे पुन्हा तृप्तीचा' असा अंत्य चरणाचा मूळपाठ.
४२	९	भिंगुरप्राय=भिंगुरड्याच्या रंगाचे, भुंग्यासारखे काळे.
४३	२६	पिशंगीवर्ण=राखी रंगाचा. पिशंगी=राख, भस्म.
४८	१२०	'रवी' बद्दल 'वीर' वाचावें.
५१	३४	'द्रोणा निका' बद्दल 'द्रोणानीका' असा पाठभेद.

पृष्ठ.	पद्य.	मुख्यमुख्य पाठभेद, शुद्धाशुद्ध, व टीपा यांचें परिशिष्ट.
५७	२५	'सौवळा भुलवी वाट' असा तृतीय चरणाचा मूळपाठ.
५८	४१	'काळपाशां'चा उल्लेख अनेक ठिकाणीं आढळतो. परंतु 'काळपुष्पमाळे'च्या उल्लेखांत बरेंच नवीनत्व आहे.
६४	७	'शौर्यमेंदू' बद्दल 'शौर्यमदू' असें पाठांतर.
६६	३२	'अंगवल्या' ऐवजीं 'अवगल्या' असा पाठभेद. 'अंगवल्ल्या' हें नाम समजल्यास 'अंगलता, कोमल शरीरें,' असा अर्थ करावा.
७२	४	'ऐश्वर्यदमा' बद्दल 'ऐश्वर्यद्रुमा' असा पाठभेद.
७३	२२	'अक्षय चाप, सारथी हरी,' असा तृतीयचरणाचा मूळपाठ.
७४	३३	विराटाची=विराट्स्वरूपी कृष्णाची. कृष्ण द्रौपदीस बहीण मानीत असे.
८२	६०	'शरमाळा' बद्दल 'कुशल कळा' असा मूळपाठ.
८४	९४	शीग=मापांत भरलेल्या धान्याचा शंकूच्या आकाराचा अग्रभाग. या मापाला 'भरमाप' म्हणण्याचा प्रघात आहे. या मूल अर्थावरून येथें 'शीग' म्हणजे 'पूर्ण उत्कर्ष' असा अर्थ होतो.
,,	९७	यमकावरून पाहतां 'देहा' ऐवजीं 'देह्या' असें रूप योग्य दिसतें. 'देह' शब्द सामान्यतः 'देहे' किंवा 'दहे' असा उच्चारीत असत व त्याचें सामान्यरूप 'देह्या' किंवा 'दह्या' असें होत असे. 'देह सोडितां कीर्ति मागें उरावी' या रामदासी श्लोकांत 'देह' याचा 'दहे' असा उच्चार आहे.
८७	१३६	'बुद्धि कुंडे' बद्दल 'बुद्धीकुडे' हा योग्य पाठ. कुडेबुद्धी=कपटी मनानें.
८८	१	'इमन्' प्रत्ययांत 'गरिमा,' 'महिमा,' वगैरे शब्द स्त्रीलिंगी समजण्याचा सामान्य मराठी कवींचा प्रघात आहे.
९१	४६	'श्रेष्ठ संहर्तनीं' ऐवजीं 'सृष्टिसंहर्तनीं' असा योग्य पाठभेद.
९४	१०१	'भूतळा आणिली महाभागा' असा द्वितीय चरणाचा मूळपाठ.
९७	१५३	'वर्तती सहजा' ऐवजीं 'वर्तता राजा' असा मूळपाठ.
९९	१९९	'मात्र टाहो' ऐवजीं 'मातृटाहो' हा योग्य पाठभेद.
१०४	४९	रोहिणी नक्षत्र हें पावसाळ्याच्या अगदीं आरंभींचें होय. तेव्हां उन्हाळ्यांत तापून रखरखलेल्या जमिनीवर रोहिणीचें पाणी पडतांक्षणींच जिरून कोठच्या कोठेंच नाहींसें होतें, म्हणून रोहिणीच्या उदकाची 'मिथ्याभासां'त गणना केली आहे.
१११	५६	'वृषभ शरें' बद्दल 'वृषभस्वरें' असें पाहिजे. कृष्णाच्या पांचजन्याचा स्वर बैलाच्या डुरकण्यासारखा गंभीर व भयानक होता.
११४	१०२	'त्रिनयनाय अचिंत्याय' असा तृतीय चरणाचा मूळपाठ.

पृष्ठ.	पद्य.	मुख्यमुख्य पाठभेद, शुद्धाशुद्ध, व टीपा यांचें परिशिष्ट.
११६	१३	'आठ शत दूत कार्यसंधी' असा तृतीय चरणाचा मूळपाठ.
११९	६१	'अरितरुगज' बद्दल 'श्रीभोज' हा मूळपाठ.
१२३	१४	मुंग्यांना पंख फुटून त्या इकडे तिकडे उडूं लागल्या म्हणजे त्या लवकरच मरून पडतात किंवा त्यांस कावळे वगैरे पक्षी खाऊन टाकितात. एकंदरींत त्यांचे पंख म्हणजे मृत्यूचे दूतच होत. या गोष्टीवर येथें कविकटाक्ष आहे.
१३५	७५	'सखा सारथी जनार्दन' असा तृतीय चरणाचा मूळपाठ.
,,	८२	'तैल घृत' ऐवजीं 'तैलधूत' हा योग्य पाठ. तैलधूत=तेल लावून पाजविलेले.
१४४	७७	'सारथी [शरें]' बद्दल 'सारथी वोपिले' असा मूळपाठ.
१४५	१०१	द्वितीय व तृतीय चरणांचा मूळपाठः—भैरव शब्द फोडिती क्रूर । नादें थरारी अंबर ।
१५१	७०	'सुवा [सनी]' बद्दल 'सुखासनीं' असा मूळपाठ
१५३	११३	'धरू' बद्दल 'धुरू' पाहिजे. सारथी मारला गेल्यामुळें रथाची धुरा (अग्रभाग) मोकळी राहिली व घोड्यांस कोणी शास्ता नसल्यामुळें, ते रथासह उधळले.
१५९	६४	या ओवींतील गळलेला तिसरा चरणः—'द्रोण धांवला उतावीळ.'
१६५	२५	'शर सोडिला काळमानी' असा द्वितीय चरणाचा मूळपाठ.
१६७	४७	२–४ चरणः—भाळीं अर्पिल्या सतीख भाळी । द्रोण क्षोभला जैसा हेळी । युगांत काळीं क्षयातें.–असा मूळपाठ.
,,	४९	'नेणे' बद्दल 'तेणें' पाहिजे.
१७०	१०२	'चत्वारि बंधु विजयी बाह्या'—असा मूळपाठ.
१७३	२१	'सेनामेळीं' असा प्रथम चरणांतील मूळपाठ.
१७५	५२	'श्रीरामबाण' असा प्रथम चरणांतील मूळपाठ.
१७७	८२	'दुःखें व्यापिलें भुवनत्रय' असा तृतीय चरणाचा मूळपाठ.
,,	८९	'सायकमारा' बद्दल 'आडवारा' असा मूळपाठ.
१७८	११२	'हताश्व धनुष्य सारथी' असा प्रथम चरणाचा मूळपाठ.
१७९	१२३	पूर्वार्ध मूळपाठः–युधामन्यु गदा कोपें । त्वरें घेऊनी धांवला महातापें.
,,	१२७	द्वितीयचरण मूळपाठः—रथ लोटुनी निघाले हटी.
१८२	३५	दाढांबरा टिपाले=आकाशाला जाऊन भिडले. दाढ=दृढ.
१८६	१०७	[श्रेष्ठ] बद्दल 'मान्य' असा मूळपाठ.

पृष्ठ.	पद्य.	मुख्यमुख्य पाठभेद, शुद्धाशुद्ध, व टीपा यांचें परिशिष्ट.
१९०	१०	'[स] बळसेना' ऐवजीं 'बळकट सेना' असा मूळपाठ.
१९१	३५	दाडा=दाड=द्राड=दांड. 'द्राड' शब्दाचा 'दाड' हा उच्चार नागपुर-वऱ्हाडाकडे करितात.
१९७	१२३	'[कन्यका] अर्थीं' बद्दल 'वधूचिया अर्थीं' असा मूळपाठ.
,,	१२४	इंद्र व प्रल्हाद यांच्या युद्धाचा प्रसंग हरिवंशांत असा आढळतो:—एकदा दैत्यांनीं प्रल्हाद आम्हांला इंद्र पाहिजे असा हट्ट धरिला. तेव्हां पुरूरव्याच्या वंशांतील रजिनामक राजा राज्य करीत होता. दोघांच्या भांडणांत आपला फायदा करून घेण्याच्या इराद्यानें, रजीनें असा विचार केला कीं देवदैत्यांपैकीं जे आपल्याला इंद्र करण्यास कबूल होतील त्यांचा पक्ष आपण घ्यावा. पुढें देवांनीं रजीला इंद्रपद देण्याचें कबूल केलें व रजीनें अधिष्ठित इंद्रादि देव व प्रल्हादप्रभृति दैत्य यांचा घनघोर संग्राम झाला. त्यांत दैत्य हरले व रजि इंद्रपद लाभला. पुढें रजीनंतर त्याचे मुलगे इंद्रपदाचा उपभोग घेऊं लागले, तेव्हां बृहस्पतीनें तयार केलेल्या कुतर्कशास्त्राच्या योगें इंद्रानें रजिपुत्रांस मोह घालून धर्मलंड बनविलें व स्वतः इंद्रपद पटकाविलें.
१९७	१३२	'अपूर्व' बद्दल 'सर्व' असा मूळपाठ.
२०१	५३	'[पौळी]' बद्दल 'भाळी' असा मूळपाठ.
२०२	८३	तृतीयचरणाचा मूळपाठः—भूषणीं भूषित अलभ्य आभा।
२०४	१०८	ओवीचा मूळपाठः—हा सूर्य, हा जयद्रथ,। मर्दोनी करीं पण यथार्थ। एक अवघड सांगतों तूंतं। जीवीं धरीं नरवर्या!॥
,,	१०९	'सरस्वती' बद्दल 'सैंधव नृपती' असें योग्य पाठांतर.
२०७	११	'[खलांचे भय]' बद्दल 'संशय' असा मूळपाठ.
२०८	३६	द्वितीय चरणाचा मूळपाठः—कृपाचार्य मद्रज मामा।
२०९	६०	'[तुम्ही पाप]' बद्दल 'वना धाडिले' असा मूळपाठ.
२१०	६९	पाठांतर—सांप्रत निशीचा अवसर। उदया पातल्या भास्कर। जैसे नक्षत्रांचे भार। नाहींच होती, महींद्रा!॥
२१७	७०	तृतीय चरणाचा मूळपाठ.—माजता जाला अतिविशद।
२१८	९१	'[अंधकार]' बद्दल 'रजनी' असा मूळपाठ.
२१९	११४	'तयामाजी धूळसंभ्रम' असा तृतीय चरणाचा मूळपाठ.
२२०	१२५	'भारसदन' बद्दल 'भीमनंदन' असें पाठांतर.
,,	१३६	'अशरी' बद्दल 'अशिरी' असें पाठांतर.

पृष्ठ.	पद्य.	मुख्यमुख्य पाठभेद, शुद्धाशुद्ध, व टीपा यांचें परिशिष्ट.
२२१	१४३	'वृक्ष' बद्दल 'वक्ष' असें पाठांतर.
,,	१४७	'पित' बद्दल 'पितर' हा योग्य पाठ.
२२३	२९	मूळपाठ.–कर्णभ्रातर **वृ**करथनामा । शकुनिपुत्र सुसाट **काळ**प्रतिमा । होऊनी एकत्र ताडी **भी**मा । महारोषें शराग्नी. ॥
२२८	१०५	'विगत [रणठायीं]' बद्दल 'विगतदेही' असा मूळपाठ.
२२९	१२४	'[सत्वरीं]' बद्दल 'तेजिष्ठरवी' असा मूळपाठ.
२३०	१४	'[जाउनी]' बद्दल 'जातां' असा मूळपाठ.
२४८	१३	'वाढ [करी]' बद्दल 'वाढे' असा मूळपाठ. वाढे=वाढवी. मूळरूपभेदी धातुरूपें प्रयोजकार्थी कवींनीं वारंवार योजिलेलीं आढळतात.—करी=करवी (अ० १५।२६); डोलती=डोलविती (१२।१०६) इ०.
२६२	२	दुसऱ्या व तिसऱ्या चरणांचा मूळपाठ.—एकमेकां ताडिती सैर । **पा**र्षतवीर प्रतापशूर ।
२६७	९४	उत्तरार्धमूळपाठ–विगतपुरुषार्थ वीरहारी । कालवती रणरंगीं. ॥
२६८	१०८	ही **ओं**वी **मु**क्तेश्वरकृत आदिपर्वांतील दुसऱ्या अध्यायांतील तेविसाव्या ओवीशीं अगदीं मिळती आहे.